# कऱ्हाड

## समग्र दर्शन

प्रा. वि. पु. गोखले
प्रा. का. धों. देशपांडे



# कऱ्हाड
## समग्र दर्शन

**लेखक व प्रकाशक**
विद्याधर पुरुषोत्तम गोखले
काशीनाथ धोंडो देशपांडे

**कऱ्हाड : समग्र दर्शन**

आवृत्ती पहिली
६ डिसेंबर २००८

PDF आवृत्ती
५ डिसेंबर २०२०

लेखकांकडे

**मुखपृष्ठ**
धनंजय कुलकर्णी
स्क्वेअर ॲडव्हर्टायझिंग, कऱ्हाड

**प्रकाशन**
विद्याधर पुरुषोत्तम गोखले
६७५ (जुना ४३६), सोमवार पेठ,
भ्रमणध्वनी – ९८५०८८४४३४
कऱ्हाड – ४१५ ११०

**मुद्रक**
श्रीधर रघुनाथ कुलकर्णी
श्रीधर मुद्रणालय,
३३८, सोमवार पेठ, कऱ्हाड – ४१५ ११०

**PDF आवृत्ती**
नरेंद्र गजानन वळवडे, कऱ्हाड
भ्रमणध्वनी – ९७३०१०१२००

मूल्य : चारशे रूपये

कऱ्हाड शहरास
आकार नि आशय
ज्यांच्यामुळे प्राप्त झाला
त्या सर्वांना कृज्ञतापूर्वक
सादर समर्पण...

# अनुक्रम


| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रारंभीचे चार शब्द | | | सात | |
| मनोगत | | | तेरा | |
| कऱ्हाड : समग्र दर्शन | | | | |
| | | | | PDF |
| प्रकरण | १ | तोंड ओळख | १ | 12 |
| | २ | राजकीय इतिहास | २७ | 25 |
| | ३ | इतिहासाच्या पाऊलखुणा | ६५ | 44 |
| | ४ | कऱ्हाडची नगरपरिषद | ९७ | 62 |
| | ५ | व्यापार व अर्थव्यवहार | १२७ | 75 |
| | ६ | उद्योगधंदे | १५१ | 87 |
| | ७ | सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सुविधा | १७१ | 97 |
| | ८ | कायदा व सुव्यवस्था | १८५ | 104 |
| | ९ | शिक्षण व संशोधन | १९५ | 109 |
| | १० | साहित्यिक कऱ्हाड | २२५ | 124 |
| | ११ | पत्रकारिता | २५३ | 138 |
| | १२ | रंगभूमी व चित्रपट | २७१ | 147 |
| | १३ | ललितकला | २८७ | 155 |
| | १४ | क्रीडा | ३११ | 167 |
| | १५ | धार्मिक | ३२९ | 176 |
| | १६ | संकीर्ण | ३७१ | 197 |
| | १७ | समारोप | ३९९ | 211 |
| | | कालपट | ४०४ | 214 |
| | | संदर्भ साहित्य | ४१७ | 220 |
| | | संदर्भ साहित्य | ४२० | 222 |
| | | संदर्भ साहित्य | ४३४ | 229 |


कृ ष्णा न दी
जुने कऱ्हाड

# प्रारंभीचे चार शब्द

आपलं कुटुंब, आप्त-स्वकीय, आपला ज्ञातिसमाज यांच्याबद्दल आत्मीयता असणं ही सहज भावनाच असावी. कावळ्यासारखा एखादा पक्षी मृत झाला, तरी आजूबाजूचे कावळे त्याच्याभोवती जमून गलका करतात, मग मानव प्राण्याची तर बातच सोडा. आपल्या कुटुंबातील एखाद्या वडीलधाऱ्यानं केलेल्या आगळिकीचा बोभाटा होऊन कुटुंबाची मानहानी झाली, तरी त्या वडीलधाऱ्या व्यक्तीबद्दल अन्य कुटुंबीयांची आत्मीयता कमी होत नाही. त्याचप्रमाणे आपलं बहुतांश जीवन ज्या गावात व्यतीत झालं, ते अनेक दृष्टीनं कुग्राम म्हणवून घेण्यास पात्र असलं तरी त्या आपल्या गावाबद्दल आपली प्रीती कमी होत नाही. व्यवसायादी निमित्ताने स्थलांतर केलं गेलं तरी आपल्या गावाची ओढ कमी होत नाही किंवा गावाबद्दल मनात घर करून राहिलेल्या आठवणी विस्मृतीत जात नाहीत. उलट वय जसजसं वाढत जातं तसतसं मन गावाबद्दल स्मृतिकातर होऊन स्मरणरंजनाची सवय लागते.

आपल्या लहानपणाच्या आपल्या गावाबद्दलच्या आठवणी हा जसा 'स्थानिक इतिहासा'चा प्रकार, तसाच संशोधन करून आपल्या गावाचा, नगराचा, शहराचा व महानगराचा इतिहास टिपून ठेवण्याचा प्रकारही 'स्थानिक इतिहासा'च. फक्त तो अधिक व्यापक असा प्रयत्न. नदीकाठी, सागरकिनारी मानवानं वस्ती केली, याचं कारण पाण्याची मुबलकता हेच असणार. वस्ती कारणपरत्वे वाढत जाणं वा स्थलांतर होण्यामुळे वाढत जाणं, लोकसंख्या वाढत राहिल्यानं नागरी समस्या वाढणं, त्या सोडविण्याचा प्रयत्न होणं, चांगल्या नागरी सुविधा असल्यानं तसंच रोजगार मिळण्याच्या वा आर्थिक यशाच्या संधी उपलब्ध असल्यामुळे अधिकांनी स्थलांतर करणं.... हे व असे नागरीकरणाचे महत्त्वाचे टप्पे ओलांडत नगर विकास होत राहतात. मग पुन्हा समस्या वाढतात. त्या सोडविण्याचे नवे प्रयत्न होतात. हे टप्पे ओलांडत राहिलेल्या नगरात राहणाऱ्यांची विशिष्ट अशी संस्कृती तयार होते, खास अशी भाषाशैली, आहार, आचार, विचार, रुची-अभिरुची, वाङ्मयीन आवड निवड... अशा 'खासियती' निर्माण होतात. या खासियतींचा अभ्यासपूर्ण

आढावा घेत त्यांना परंपरांचा मान देत त्यांची पुढील पिढ्यांसाठी जपणूक करून ठेवण्याचं कार्य 'स्थानीय इतिहास' करतात. अर्थात हे काम करणं जिकिरीचं आहे, यात शंका नाही. आपल्या गावाबद्दल, आपल्या नगराबद्दल आत्यंतिक आस्था असणारे कमी अधिक असल्याने पण प्रचंड अंगमेहनत करून, प्रसंगी पदराला खार लावून हा इतिहास एखाद्या ग्रंथात साकार करणं हे वर्षानुवर्षाचे काम आहे. 'स्थानीय परंपरांचा ', 'स्थानीय इतिहासा'चा अभ्यास करण्याची दृष्टी ही तुलनेनं नवी असल्याचंच म्हणावं लागेल. आपल्याकडे 'स्थल माहात्म्य' सांगणाऱ्या पोथ्या नव्हत्या असं नाही. पण बहुतांशी त्या स्थळाचं धार्मिक महत्त्व सांगणाऱ्या. सामाजिक इतिहास, सांस्कृतिक इतिहास, आर्थिक इतिहास, राजकीय इतिहास, भाषिक इतिहास सांगणाऱ्या त्या खासच नव्हत्या. आता म्हणजे 'स्थानीय इतिहासा'च्या कल्पना स्पष्ट झाल्यानंतर जर कोणाला एखाद्या शहराचा वा नगराचा स्थानिक इतिहास लिहावयाचा असेल तर वर उल्लेखलेल्या सर्व बाबींचा तसंच प्राचीन अर्वाचीन पारंपरिक इतिहास – लेखनातील आवश्यक तेवढ्या नोंदींचा परामर्श घेतल्याशिवाय त्या स्थानीय इतिहासाला परिपूर्णता येणार नाही.

या विवेचनात व्यक्त केलेल्या निकषांचा विचार करून प्रा. वि. पु. गोखले आणि प्रा. का. धों. देशपांडे या लेखकद्वयीनं साकारलेल्या 'कऱ्हाड : समग्र दर्शन' हा ग्रंथ आटोपशीर आणि तरीही परिपूर्ण असाच झाला आहे. लेखकद्वयीचं मनापासून अभिनंदन करताना कऱ्हाड नावाच्या विकसनशील नगरीबाबत एक मोठी उणीव भरून निघाली आहे असं मला वाटतं. त्यामुळे त्यांच्या प्रयत्नाचं महत्त्वही मी जाणून आहे. आजच्या कऱ्हाड शहरात फेरफटका मारल्यानंतरही त्याचं प्राचीनत्व ध्यानी येत नाही कारण तशा कोणत्याही पाऊलखुणा सहजासहजी नजरेत येत नाहीत. काल–आजच्या राजकारणात महत्त्वाचं आणि मानाचं स्थान लाभलेल्या या शहराचा प्राचीन इतिहासही तितकाच रोमहर्षक आहे. अर्थात स्मृतिकातर होऊन ऐतिहासिक सत्याचा अपलाप आपल्या लेखनात होऊ न देण्यावर दोन्ही लेखकांचा भर आहे, म्हणून सांगोवांगी कळलेल्या कथांना इतिहासाचा अंगरखा चढविण्याचा प्रमाद त्यांच्या हातून

घडलेला नाही, हे त्यांच्या लेखनाचं वैशिष्ट्यच म्हणावं लागेल. 'जसं घडलं तसं' सांगण्याचा निकष काही जागतिक इतिहास लेखकांनी तंतोतंत पाळला. विद्याधर गोखले आणि काशीनाथ देशपांडे हे त्याच पठडीतले इतिहास-लेखक आहेत, यात शंका नाही. स्वत: गोखले यांचा नित्य वावर साहित्य, नाट्य, पत्रकारिता, शिक्षण, समाजकारण अशा क्षेत्रांत गेली कित्येक वर्ष आहे, तर का. धों. देशपांडे यांचं कार्यक्षेत्र साहित्य, संगीत, कला यांच्याबरोबरच पर्यटनासारखं क्षेत्र आणि पर्यावरणासारख्या नवीन समस्या इतपत व्यापक आहे शिवाय ते इतिहास व राज्यशास्त्राचे अनुभवी व व्यासंगी प्राध्यापक. या दोघांपेक्षा अधिक अधिकारी व्यक्ती 'कऱ्हाड' या त्यांच्या शहराच्या इतिहास लेखनासाठी अन्य क्वचितच आढळतील.

'कऱ्हाड'च्या या 'समग्र दर्शनात' काय नाही ? कऱ्हाड या शब्दाच्या वेगवेगळ्या व्युत्पत्ती, त्यासंबंधीचं विवेचन, भौगोलिक माहिती, प्राचीन व अर्वाचीन इतिहास यापासून आजच्या नागरी सुविधांपर्यंत, शहराच्या गॅझिटिअरमध्ये असते, ती माहिती तर आहेच, पण कऱ्हाडच्या राजकीय इतिहासापासून सुरू होणारं 'कऱ्हाड दर्शन' स्थानिक स्वराज्य संस्था, व्यापार-उद्योग, कायदा-सुव्यवस्था, शिक्षण-संशोधन असे अनेक वळसे घेत साहित्यिक कऱ्हाड, कऱ्हाडमधील पत्रकारिता, रंगभूमी-चित्रपट, क्रीडा अशा अनेकपदरी दर्शनानं संपते. कऱ्हाडचं गॅझेटियर वेगळं असं प्रसिध्द होत नाही. ते साताऱ्याच्या गॅझेटियरमध्ये समाविष्ट होत असतं. म्हणूनच कदाचित 'कऱ्हाड'च्या 'स्थानीय इतिहासा'ला कऱ्हाडसंबंधी सांख्यिकीय व अन्य शासकीय व प्रशासकीय माहिती जोडण्याची लेखकद्वयीला इच्छा झाली असावी. त्यानं काही बिघडलं असं नव्हे. उलट एकाच ग्रंथात दोन प्रकारचे ग्रंथ वाचकाला मिळण्याची सोय झाली. 'कऱ्हाड : समग्र दर्शन' या शीर्षकातून ते सूचित केलेलं आहेच. हा ग्रंथ म्हणजे 'कऱ्हाडचा मार्गदर्शक' वा 'वाटाड्या' असल्याचंही म्हणता येईल. दुसऱ्या प्रकारे हा 'स्थानीय इतिहास' लिहावयाचा तर लिहिता येईल का ? अवश्य येईल. कऱ्हाडच्या सामाजिक जीवनातील महत्त्वपूर्ण घटना निवडून त्यांच्याभोवती कऱ्हाडचा स्थानीय इतिहास लिहिता येईल. म्हणजे इतिहासरूपी सांगाड्याला घटनारूपी रक्तमांस देऊन सजीवता

आणता येते आणि लेखन रसपूर्ण करता येतं. पण लेखकद्वयीला ते अपेक्षित नव्हतं. त्यांना अधिकारी ग्रंथ निर्माण करावयाचा आहे, हे लगेच ध्यानात येतं. तसा तो अधिकारी म्हणजे संदर्भमूल्य असलेला निश्चित झाला आहे. कऱ्हाड शहरावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाच्या घरी हा असणं अगत्याचं आहे, कऱ्हाडमधून देशाच्या अन्य शहरांत तसंच परदेशी स्थलांतर केलेल्यांना तर हा ग्रंथ आपल्या गावाची सतत आठवण करून देईल. त्या सर्वांच्या घरांत या ग्रंथाची प्रत हवीच.

गेली २०–२५ वर्षं मी पूर्वीच्या मुंबई इलाख्यात समाविष्ट असलेल्या शहरांमधील स्थळांवरील ग्रंथ, पुस्तिका, छायाचित्रं जमवत आहे. 'लोकल हिस्ट्री' या तुलनेने नव्या संकल्पनेचा आधार घेत मी लेखनही केलं. 'लोकल हिस्ट्री' ला मराठी पर्याय म्हणून 'स्थानिक इतिहास' असा शब्द माझ्यापूर्वी रूढ होता. खरं तर 'Local history is history of localities as well as localised history.' म्हणून मला 'स्थानीय इतिहास' हा पर्याय अधिक चांगला वाटला आणि तसा तो वापरावयास मी सुरुवात केली. आता 'स्थानीय इतिहास' हा पर्याय रूढ झाला आहे.

सातारा जिल्ह्यात प्राचीन अवशेष सर्वाधिक कऱ्हाडमध्येच आहेत. बौध्दकालीन, जैनांचे, हिंदू राजांच्या काळचे, मुसलमानी राजवटीतले असे अवशेष ज्ञात–अज्ञात अवस्थेत आजही कऱ्हाडमध्ये सापडतात. त्यांतली सर्वात प्राचीन आगाशिवाची तसंच जखिणवाडीची लेणी. ही बौध्दकालीन आहेत. आगाशिव म्हणजे शिव. आणि 'जखिणवाडी' हा 'यक्षिणवाटिका' या शब्दाचा अपभ्रंश. १०६ फूट उंचीचे दोन भव्य मनोरे ही जी एके काळी कऱ्हाडची ओळख होती, ते पहिल्या आदिलशहाच्या कारकिर्दीत इब्राहिमखानानं मशिदीच्या दोन्ही बाजूंना सोळाव्या शतकात बांधले गेल्याचं इतिहास सांगतो.

काश्मिरी पंडित बिल्हण, ज्याला विद्यापती म्हटलं गेलं आहे याच्या 'विक्रमाङ्कदेवचरिता'त शिलाहार कुलाच्या मारसिंह राजाच्या चंद्रलेखा नामक

अतिसुंदर कन्येच्या स्वयंवराची कथा दिली आहे. (११-१२ वे शतक). हे स्वयंवर कऱ्हाडला झालं हे वाचून आजच्या कऱ्हाडकरांना आश्चर्याचा धक्का बसेल. या स्वयंवरासाठी देशाच्या अनेक भागांतून नृप आले होते. बिल्हणानं चंद्रलेखेच्या सौंदर्याचं वर्णन करताना आपलं सारं भाषापटुत्व पणाला लावल्यासारखं दिसतं. या स्वयंवराइतकी मोठी घटना कऱ्हाडला घडली असेल तर शिलाहारांच्या काळी हे नगर महत्त्वाचंच असणार. शे-दोनशे राजे, त्या प्रत्येकाचा लवाजमा एवढा भार सोसण्याइतपत सुविधा तिथं नक्कीच असणार. रावबहादूर चिं. वि. वैद्यांच्या मतानुसार कऱ्हाड ही शिलाहारांची राजधानी होती. ती मुख्य राजधानी होती की वर्षाकाळी विहार करण्यासाठी होती, हे आता कळणं कठीण आहे. कऱ्हाडसंबंधीच्या अशा प्रकारच्या प्राचीन संदर्भामुळे कऱ्हाडवासीयांची छाती अभिमानानं फुलूनच यायला हवी. असो.

आतापर्यंत यशवंत राजाराम गुप्ते यांच्या छोट्याशा पण महत्त्वाच्या पुस्तकासह फारच थोडे संदर्भ ग्रंथ उपलब्ध होते. आता प्रा. विद्याधर गोखले व प्रा. काशीनाथ देशपांडे यांनी लिहिलेला ग्रंथ हाती आला आहे. लेखकद्वयीचं मनापासून अभिनंदन करताना मी या त्यांच्या ग्रंथाला हार्दिक शुभेच्छा देतो.

११ नोव्हेंबर २००८

**अरूण टिकेकर**
अ-३, विनायक सोसायटी,
गांधीनगर, वान्द्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी : ९८२१२५९५१२,
(०२२) २६४१८२०५

*****

१९७८ मध्ये तयार झाले. एस. टी. स्टँडच्या पश्चिम अंगाने (पूर्वीच्या) शिवाजी वसतिगृहापासून मार्केट यार्डाकडे जाणाऱ्या रस्त्याला मिळणारा रस्ता १९९८ मध्ये काढण्यात आला. २००४ मध्ये पोपटभाई शहा पंपाजवळून नव्या वॉटरवर्क्समार्गे महामार्गाला जोडणारा नवा रस्ता तयार करण्यात आला.

दरम्यान शहरात बरेच चढ-उताराचे रस्ते होते. विशेषत: कोटात जाणारा रस्ता, कोटाखालील धर्मशाळेपासून रॉयल टॉकीजकडे जाणारा रस्ता, बालाजी मंदिराकडून चावडीकडे जाणारा शिराळकर वाड्यापर्यंतचा रस्ता, असे उभा चढ असणारे रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने त्रासदायक होते. ते पातळीत आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. कऱ्हाड शहरातील चावडी चौकातून शनिवारात जाणारा मुख्य रस्ता अनेक कारणांमुळे रुंद होऊ शकला नव्हता. बाजारपेठेतील या मुख्य रस्त्याबाबत व्यापारी, जुम्मा मशिदीचे विश्वस्त आणि नगरपरिषद यांच्यात तडजोड झाल्यामुळे १९९९-२००० या काळात तो रस्ता तीस फूट रुंद होऊ शकला.

२००५ मध्ये शहरात ५२.०५ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. नगरपरिषद सुरू झाली त्यापेक्षा दीडशे वर्षांत रस्त्यांची वाढ आठ पटीने झाली आहे. मुख्य रस्त्यांची रुंदी वीस फुटांपासून साठ फुटांपर्यंत आहे. आता अवघे १.८५ कि.मी. लांबीचे खडीचे व कच्चे रस्ते वगळता ५०.२० कि.मी. रस्ते डांबरी झाले आहेत.

**वाहतूक सुरक्षा**

१९४२ मध्ये शनिवार पेठेतील नगरपरिषदेचा दवाखाना (सध्या तेथे यशवंत हायस्कूल आहे) ते दत्त चौकापर्यंतच्या रस्त्याला दोन्ही बाजूंना पादचारी पथ केले. मंगळवार पेठेतील टिळक हायस्कूलचा कोपरा ते रामोशाचा वड येथपर्यंतच्या मुख्य रस्त्याला १९५२ मध्ये पादचारी पथ केला होता . मध्यंतरी झालेल्या रस्तारुंदीमुळे हे दोन्ही पादचारी पथ आता अस्तित्वात नाहीत. सध्या शहरात एस. टी. बस स्थानकासमोरील व यशवंतराव चव्हाण स्मृतिसदनासमोरील रस्त्यांवर सुमारे १.१३ कि.मी. लांबीचे पादचारी पथ बांधून पादचाऱ्यांची सोय केली आहे.

पुरेशी रुंदी असणाऱ्या रस्त्यांवर दुभाजक बांधून दुभाजकांमध्ये शोभेची झाडे लावण्याचे काम नगरपरिषदेने सुरू केले आहे. शहरात ३.५० कि.मी. लांबीचे रस्ते दुभाजक बांधण्याच्या सोयीचे आहेत. दत्त चौकातील शिवाजी

पुतळ्यापासून पूर्वेकडे यशवंतराव स्मृतिसदन व तेथून पूर्वीच्या कृष्णानाक्यापर्यंत सुमारे १.८९ कि.मी. लांबीच्या रस्त्यावर २००१ मध्ये दुभाजक बांधलेले आहेत. शहरातील वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने वाहतूक सुरक्षा विभागाकडून आयलंडस्च्या जागा मान्य करून घेतल्या आहेत. मुख्य रस्त्यावरील चार ठिकाणी नगरपरिषदेमार्फत बांधकाम केले असून सहा छोटी आयलंडस् लोकसहभागातून बांधून घेतली आहेत. पूर्वी मोठ्या व जास्त वाहतूक असणाऱ्या सर्व रस्त्यांवर ठिकठिकाणी सुमारे १३१ गतिरोधक (स्पीड ब्रेकर्स) होते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आता हे सर्व गतिरोधक काढून टाकले आहेत. तथापि वाहतुकीच्या सोयीच्या दृष्टीने थर्मोप्लॅस्टिक परावर्तित रंगांचे पट्टे रस्त्याच्या दुतर्फा आखण्यात आले आहेत. काही चौकांत रोड रिफ्लेक्टर्स बसविण्यात आले आहेत. शहा पेट्रोल पंप चौक आणि विजयदिन चौक अशा दोन ठिकाणी स्वयंचलित वाहतूक नियंत्रक दिवे बसविले आहेत.(१९९८ - ९९)

शहरातील प्रमुख रस्ते रुंद झाले तरी गेल्या काही वर्षांत दुचाकी-चौचाकी वाहनांचा वापर फारच मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने काही रस्ते पूर्ण किंवा अंशकालीन 'प्रवेशबंद' ठरविण्याचे प्रयोग करण्यात आले. वाहन चालक आपली वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभी करत. व्यापाऱ्यांना माल वितरण करणाऱ्या ट्रक्स, गाड्या रस्त्यात उभ्या असत. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होई. म्हणून आता प्रमुख रस्त्यावर सम-विषम तारखांप्रमाणे वाहने उभी करण्याच्या दृष्टीने तसे फलक लावून अंमलबजावणी केली आहे.

**वाहनतळ**

२४ मे १८९६ रोजी नाना येडोजी मुळीक यांच्या विनंतीवरून परगावहून विक्रीसाठी माल घेऊन येणाऱ्या बैलगाड्या सोडण्यासाठी नगरपरिषदेने शनिवार पेठेतील मरीआईच्या देवळाजवळ जागा ठरवून दिली आणि तेथे देखरेख करण्यासाठी एक नाईकही नेमला. पूर्वी गावात वैयक्तिक वाहने मर्यादित होती. सायकलींचा वापर असायचा. माल वाहतूक बैलगाड्यांनी आणि प्रवासी वाहतूक टांग्यांनी होई. जुना नवा मोटार स्टँड, मंगळवारातील बागवान बिल्डींग, चावडीचौकात अर्बन बँकेजवळ अशा ठराविक ठिकाणी टांग्यांचे अड्डे असत. आता स्कूटर्स व चार चाकी मोटारगाड्या वापरण्याचे प्रमाणही वाढले आहे.

रिक्षांचा वापर सर्रास होऊ लागला आहे. सध्या शहरात पाच ठिकाणी वाहनतळ आहेत.ट्रक्स, बस इ. जड वाहनांसाठी सध्या साईबाबा मंदिरासमोर तात्पुरत्या स्वरूपाचा एकच वाहनतळ आहे.

**राज्य व राष्ट्रीय महामार्ग**

कोल्हापूर, चिपळूण आणि पंढरपूर, विजापूर या भागांकडे जाणारे त्या वेळचे प्रांतिक (राज्य) रस्ते कऱ्हाड शहरातून जात . जुना कोयनापूल ते कृष्णापूल ( राज्य महामार्ग क्र. ४७ ) नगरपरिषदेच्या हद्दीतून जाणारा गुहागर–विजापूर रस्त्याच्या कि. मी. क्र. ८५/५ ते कि.मि. क्र. ८६/७ राज्य शासनाच्या बांधकाम विभागाकडून नगरपरिषदेकडे १९७६ सालीच हस्तांतरित झाला आहे. जुना कोयनापूल ते संगम हॉटेल चौक दरम्यानचा राष्ट्रीय महामार्ग क्र.४ मधून सोडून दिलेला भाग कराड नगरपरिषदेस १९७९ मध्ये मिळाला.

**पूल**

नगरपरिषद अस्तित्वात आली त्यावेळी शहराच्या सभोवतीने वाहणाऱ्या कृष्णा–कोयना नद्यांवर पूल नव्हते. पावसाळ्यात वाहतुकीसाठी नावांचा वापर केला जात असे. पावसाळ्याखेरीज एरवीच्या दिवसांत दाभोळ वेस किंवा रंगारवेस बाजूस असलेल्या कोयना नदीच्या उतारातून किंवा उत्तरेस मसूर उतारातून मांड्याएवढ्या पाण्यातून चालत पलीकडे जावे लागे. सैदापूर, गोटे या गावांसाठी औंध संस्थानची वल्ह्यांची नाव होती.

कोयना नदीवरील पुलाचे बांधकाम जुलै १८५६ मध्ये सुरू झाले. हा पूल १ मे १८७२ रोजी वाहतुकीस खुला झाला. हा पूल अंशत: बांधकाम केलेला व अंशत: लोखंडी होता. एकूण आठ कमानींपैकी चार कमानी (५४ फूट X ४ = २१६ फूट लांब) दगडी बांधकाम आहे. नदीच्या पात्रावरून जाणाऱ्या लोखंडी तुळया (गर्डर्स) (१०८ फूट X ४ कमानी = ४३२ फूट लांब) दगडी बांधकामात उभ्या केलेल्या खांबांवर टाकल्या आहेत. नदीच्या पात्रावरील भाग २१।। फूट रूंद व ८०।। फूट लांब असून पात्रातील जमिनीच्या स्वरूपामुळे काही ठिकाणी खांबांचा पाया घेणे कठीण गेले होते. पुलासाठी रु. ४,८५,९४०/– खर्च आला. या पुलास १९७२ साली शंभर वर्षे पूर्ण झाली. वाढत्या वाहतुकीसाठी तो अपुरा होता. त्यामुळे त्या पुलाच्या वरील बाजूस एक नवा उंच, रुंद व भक्कम पूल

कोयना नदीवर १९ मे १९७४ साली बांधण्यात आला. त्यानंतर अलीकडे राष्ट्रीय महामार्ग चौपदरी करण्याच्या योजनेत त्या पुलाचेही विस्तारीकरण करण्यात आले आहे. जुना कोयना पूल सध्या पादचारी पथ म्हणून उपयोगात आणला जातो.

१८८७ मध्ये कराड रेल्वे स्टेशन कऱ्हाडपासून पाच कि.मी. अंतरावर सुरू झाले. त्या सुमारास किंवा त्या आधी १८६७ मध्ये कृष्णा कॅनॉलचे पाणी कऱ्हाड शहरात घेऊ लागले त्या वेळी सध्याच्या कृष्णा पुलाच्या पूर्वेस खडकाळ जागी १२ ते १५ फूट रुंदीचा दगडी फरशी असलेला ४ ते ५ फूट उंचीचा कठडे नसलेला कॉजवे केला असावा. हा 'फरशी' नावाने ओळखला जाई. पावसाळ्यात कराड रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी कमळेश्वर मंदिराजवळून त्या वेळच्या जिल्हा लोकलबोर्डाच्या नावांतून वाहतूक करावी लागे. ही वाहतूक त्रासाची, धोक्याची आणि खर्चाचीही होती. त्यामुळे कृष्णा नदीवर पूल व्हावा यासाठी १९२६ पासून नागरिकांचे व कराड नगरपरिषदेचे प्रयत्न चालू होते. सरकारी योजनेप्रमाणे हा पूल खोडशीच्या धरणाजवळ बांधला जाणार होता. तो बदलून सध्या आहे त्या जागी पुलाचे बांधकाम १९३६ साली सुरू झाले. प्रारंभी कमानींचे काम झाले आणि त्या वेळी पावसाळ्यात एवढा पूर आला की, त्या कमानी तर पाण्याखाली गेल्याच पण त्यावरही पाच एक फूट पाणी चढले. त्यामुळे मूळ आखणीतील पुलाची उंची वाढविणे सरकारला भाग पडले. कृष्णा नदीच्या पात्रापासून ४५ फूट उंच, १४ कमानींच्या ९०० फूट लांबीच्या या पुलाचे बांधकाम १९३९ मध्ये पूर्ण झाले. या पुलासाठी एकूण खर्च रु. ४,७१,००० आला. कृष्णा पुलाचे उद्घाटन ३ ऑक्टोबर १९३९ रोजी ना. नूरी यांच्या हस्ते झाले.

या कृष्णापुलाच्या पलीकडे झालेल्या शैक्षणिक-औद्योगिक प्रकल्पांमुळे एवढी वर्दळ वाढली आहे की तो पूल आता अपुरा पडू लागला आहे. गेल्या काही वर्षांत त्या पुलाला पादचारी पथाची पुरवणी जोडली होती. ती २००५ व २००६ मध्ये झालेल्या महापुराने कुचकामी ठरविली त्यामुळे नवीन मोठ्या व भक्कम कृष्णा पुलाचा सुमारे ७ कोटी रू. चा प्रस्ताव आला आहे. सध्याच्या पुलाच्या पूर्वेस रूक्मिणीनगर बाजूकडे हा पूल असेल व सध्याच्या पुलापेक्षा २० फूट उंच असेल

कऱ्हाड तासगाव ही वाहतूक उन्हाळ्याच्या दिवसांत गोळेश्वरमार्गे नदीकाठच्या खडकातून कष्टप्रद पद्धतीने होई. एरवी पलीकडे जाण्यासाठी नावेचा वापर करीत. १९३९ साली कृष्णा पूल झाल्यावर कराड स्टेशनमार्गे कार्वे–तासगाव अशा लांबच्या रस्त्याने जाण्याची सोय झाली. कार्वे येथील संभाजीराव थोरात यांनी सातारा जिल्हा लोकल बोर्डात निवडून गेल्यावर १९४१ मध्ये कऱ्हाड–तासगाव रस्त्यावर गोळेश्वर खडकावर फरशी (कॉजवे) व्हावी असा प्रयत्न केला होता. त्यांच्या खटपटीमुळेच पुढे १९६२ साली कृष्णा नदीवर कार्वे येथे भव्य पूल उभारला गेला व त्या भागाकडील वाहतुकीची उत्तम सोय झाली.

### गटारे

शहरात पूर्वीपासून रस्त्यांच्या कडेने उघडी, रुंद व खोल गटारे होती. ती स्वच्छ ठेवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्यांमधून सांडपाण्याचा निचरा नीट होत नसे. पुढे रस्तारुंदीचा कार्यक्रम हाती घेतल्यावर जसजसे रस्ते रूंद झाले, तशी त्या रस्त्यांच्या दुतर्फा व्ही टाईप गटारे बांधण्यात आली.

मंडईतील मटण–फिश मार्केट, कन्याशाळा, गवळवेस बाग–करडीपीर हा जुन्या कऱ्हाड शहरातील मुख्य खंदकाचा किंवा ओढ्याचा भाग होता. तो भरून घेऊन आर. सी. सी. ४ फूट व्यासाच्या पूर्ण गोल बंदिस्त सिमेंट गटारातून शहराच्या सखल भागात साठणारे पाणी बाहेर काढण्याची व्यवस्था केली आहे. कऱ्हाड शहरात १९५३–५४ मध्ये ११ मैल (१७.६० कि.मी.) लांबीची गटारे होती. २००५ मध्ये वाहतुकीसाठी उत्तम स्थितीत असलेल्या सुमारे ५० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या कडेला गटारे असून त्यातून स्टॉर्मवॉटर निचऱ्याची व्यवस्थाआहे.

### सार्वजनिक प्रकाशयोजना

३० डिसेंबर १८५७ पासून नगरपरिषदेने शहरातील प्रमुख ठिकाणी रस्त्यावर रात्री प्रकाशाची सोय व्हावी म्हणून २२ कंदील लावण्यास सुरूवात केली. हे कंदील महिन्यातून फक्त १९ अंधाऱ्या रात्रीच लावत. प्रत्येक कंदिलाचा दरमहा खर्च ११ आणे येई. कराड इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी १९३५ मध्ये सुरू

झाली. ५ जुलै १९३६ पासून कंपनीने शहरास वीजपुरवठा सुरू केला. आता शहरात एकूण २२१० फिक्चर्स आहेत. शाहू चौक, दत्त चौक, रेव्हेन्यू क्लब अशा चौकांत सोडियम लँपचे बकेट तसेच ८० प्रमुख ठिकाणी सोडियम व्हेपर लँप बसविले आहेत. त्यामुळे भरपूर प्रकाशाची सोय झाली. वीज खर्च वाचविण्यासाठी नगरपरिषदेने संपूर्ण प्रकाशयोजनेवर स्वचंचलित नियंत्रक (ऑटो टाइमर) ९० ठिकाणी बसविले आहेत.वीज प्रवाह अचानक बंद पडल्यास सोमवार पेठेतील दोन भागांत सौर दिव्यांची पर्यायी सोय लोकसहभागातून तसेच प्रीतिसंगम उद्यानात नगरपरिषदेने केली आहे.

## पुतळे

शहरामध्ये उभारल्या जाणाऱ्या मान्यवर व्यक्तींच्या पुतळ्यांविषयी नगरपरिषदेने १९७४ मध्ये ठराव करून धोरणात्मक निर्णय घेतला.

कऱ्हाड शहरात ठिकठिकाणी पुढीलप्रमाणे पुतळे आहेत.

| | *पुतळ्याचे वर्णन* | *ठिकाण* | *बसविल्याची तारीख* | |
|---|---|---|---|---|
| १. | छ. शिवाजी महाराज | अर्ध | नगरपरिषद | १५-०८-१९७२ |
| २. | कर्मवीर भाऊराव पाटील | अर्ध | एस. टी. स्टँड | ११-०३-१९७३ |
| ३. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | पूर्णाकृती | नगरपरिषदेजवळ | २८-०४-१९७४ |
| ४. | लोकराजा शाहू छत्रपती | अर्ध | पशुवैद्यकीय दवाखाना | ६-०५-१९७७ |
| ५. | स्वा. सै. सदुभाऊ पेंढारकर | अर्ध | कोटाखाली | २२-०८-१९७७ |
| ६. | स्वा.सै. दादासाहेब उंडाळकर | अर्ध | पंचायत समितीजवळ | २२-०८-१९७७ |
| ७. | शंकरराव करंबेळकर | अर्ध | शिवाजी विद्यालय | ४-१०-१९८० |
| ८. | स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर | अर्ध | कन्याशाळेसमोर | १०-०४-१९८४ |
| ९. | स्व. यशवंतराव चव्हाण | पूर्णाकृती | स्मृतिसदन | १२-०३-१९८७ |
| १०. | छ. शिवाजी महाराज | पूर्णाकृती | दत्त चौक | ३१-०५-१९९६ |
| ११. | राष्ट्रपिता महात्मा गांधी | पूर्णाकृती | कोल्हापूर नाका | २-१०-२००१ |
| १२. | छ. शिवाजी महाराज | अर्ध | शिवाजीनगर | - |
| १३. | शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे | पूर्णाकृती | न्यायालयाजवळ | - |
| १४. | महात्मा फुले | पूर्णाकृती | प्रभात टॉकीजजवळ | १०- ३- २००८ |

**रस्त्यांची नावे**

कृष्णा घाटापासून चावडी चौकातून कोल्हापूर नाक्यापर्यंत जाणारा उत्तर-दक्षिण रस्त्यास 'महात्मा गांधी पथ'(१९४८), चावडी चौकातून पांढरीच्या मारुतीपर्यंत स्टेशन रस्त्याला मिळणाऱ्या पश्चिम-पूर्व रस्त्यास 'टिळक पथ' (८ जुलै १९५६), मंगळवार पेठेतील बागवान यांच्या घरापासून बुधवार पेठेपर्यंत १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील 'वीर दौलता हरी पवार पथ' (१०-८-१९५७). कोटामध्ये जाणाऱ्या मुख्य रस्त्याला 'हुतात्मा सदुभाऊ पेंढारकर पथ' (१०-८-१९५७), तहसिलदार कार्यालय ते कार्वे पुलापर्यंत 'ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव पथ' (१३-६-२००६) अशी नावे नगरपरिषदेत ठरावाने मान्य झालेली आहेत.

**चौकांची नावे**

शनिवार पेठेत तहसीलदार कचेरीकडून मार्केट यार्डकडे जाणाऱ्या रस्त्यास दत्त चौकातून येणारा रस्ता मिळतो त्या चौकास 'स्वातंत्र्यवीर दादासाहेब उंडाळकर चौक' (४-१२-१९७४). कराड मार्केट यार्ड गेट नं.१ समोरील चौकास 'आण्णाप्पा नारायण कल्याणी चौक'(२-१-१९८०) अशी नावे नगरपरिषदेने ठराव करून मंजूर केली आहेत.

**बागा-उद्याने**

गुरूवार पेठेत दर्ग्याजवळ नगरपरिषदेची बाग असल्याचा उल्लेख गॅझेटियर (बाँबे प्रेसिडेन्सी, सातारा डिस्ट्रिक्ट १८८४ पृ. ४७३) मध्ये आहे. १८५९ मध्ये नगरपरिषदेने शनिवार पेठेत एक धर्मशाळा बांधली. तेथे १८६५ मध्ये दवाखाना सुरू केला. दवाखान्याच्या पिछाडीस एक बागही तयार केली.(आता या जागेत यशवंत हायस्कूल आहे.) बुधवार पेठेत १०,१४३ चौ. यार्ड क्षेत्रफळाच्या प्रशस्त जागेत नगरपरिषदेने एक टुमदार बाग तयार केली. तिचे उद्घाटन २६ जानेवारी १९५० रोजी झाले. या जागेस 'शिवाजी उद्यान' असे नाव देण्यात आले. १९५१ मध्ये या उद्यानात रु. ४००० खर्च करून 'रेडिओ हाऊस' बांधण्यात आले. याच उद्यानाच्या जागेत आता यशवंतराव चव्हाण सदनाची सुंदर इमारत उभी राहिली असून या परिसरात सुंदर बाग व नयनरम्य हिरवळ आहे.

यशवंतराव चव्हाणांनी १६ मे १९६१ रोजी त्या वेळेच्या नगरपालिकेच्या अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रातील इच्छेस अनुसरून भुईकोट किल्ला व नदी यांच्यामधील 'स्वामीची बाग' या नावाने ओळखली जाणारी सुमारे साडेसात एकर जमीन नगरपरिषदेने संपादित केली. त्या जागेत बाग तयार करण्यात आली होती. पण ६ जून १९७६ रोजी आलेल्या महापुराने ती बाग अक्षरश: वाहून गेली. त्यानंतर पुण्याचे गार्डन आर्किटेक्ट जयंत धारप यांच्याकडून करून घेतलेल्या त्या आराखड्यानुसार नागमोडी रस्ते, छोट्या उंचीची विविध झाडे, प्रशस्त हिरवळ, फुलांचे मनोहारी ताटवे, प्रवेशद्वाराजवळच लहान मुलांसाठी वेगवेगळ्या प्रकारांची अत्याधुनिक खेळणी, या पद्धतीने हे उद्यान विकसित करण्यात आले. कोयना नदीपलीकडे असलेल्या सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याच्या उपसा जलसिंचन योजनेतून नदीत पाईप लाईन टाकून उद्यानासाठी पाणी आणले असून प्रशस्त हिरवळ टवटवीत ठेवण्यासाठी ठिकठिकाणी स्प्रिंकलर्स बसविले आहेत. उद्यानात ध्वनिमुद्रित सुमधुर संगीत प्रसारण यंत्रणा व शोभिवंत कारंजे हे उपक्रम यशवंतराव चव्हाणांच्या समाधिस्थळाचे पावित्र्य कमी होते म्हणून जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केल्यामुळे २२-५-२००६ पासून बंद होते. नुकतीच ही बंदी उठविली आहे. या शिवाय सोमवार पेठेत बालाजी मंदिरासमोर सदुभाऊ पेंढारकर पुतळ्यामागे नाना - नानी पार्क, शिवाजी हौसिंग सोसायटीत व स्मशानभूमीलगत नगरपरिषदेचे बगीचे आहेत.

**भाजी मंडई**

रोजची मंडई व आठवड्याचा रविवारी होणारा बाजार मनोऱ्याखाली मळग्यात भरत असे. मनोऱ्यासमोरील रस्ता हा मुख्य रस्ता असल्यामुळे या रस्त्यावरील रहदारीस अडथळा होई म्हणून प्रथम २२-११-१८५५ पासून ही मंडई व बाजार रविवार पेठेत शिंपी गल्लीत व नंतर ६ एप्रिल १८५६ पासून मंगळवार पेठेत हलविण्यात आले. ३ मे १८५७ पासून आठवड्यातून गुरुवारी व रविवारी असा दोन दिवस बाजार भरविण्यास सुरुवात झाली. मंगळवार पेठेतील बाजाराची जागा शहराच्या एका बाजूस असल्यामुळे सर्वांच्या सोयीच्या दृष्टीने १८६४ मध्ये गुरुवार पेठेतील मनोरे-मशिदीच्या पूर्वेकडील सप्रे यांची जागा खरेदी करून

नगरपालिकेने तेथे दोन कट्टे बांधले. त्यावर झाडे लावली. तेथे बाजार भरू लागला. १८६८ मध्ये बाजारच्या लोकांना पाणी पिण्यासाठी सहा रांजण ठेवून ते भरण्यासाठी दरमहा १२ रु. पगारावर एक भिस्ती नेमला. १८९४–९५ मध्ये मटण मार्केट बांधले. १९१०–२० या काळात मंडईसाठी दोन ओळींत १६ स्टॉल्स उभारले. मटण मार्केटमध्येही गाळे पाडले.१९२८–२९ मध्ये माल–विक्रीस बसण्यास लोकांसाठी सोयीस्कर अशा गोल व भव्य इमारतीची आखणी केली. १९३१ मध्ये ही इमारत पूर्ण झाली. १९८८–८९ मध्ये मटन मार्केटची दुरुस्ती केली. त्यालगतच खाटिकखान्याची इमारत बांधण्यात आली. १९४१–४२ मध्ये मंडईत ४८९६ चौ. फूटाचे सात कट्टे बांधण्यात आले. १०१३९ चौ. फूट जागेवर दगडी फरशी बसविण्यात आली. मंडईच्या वाढीसाठी मंडई इमारतीच्या पूर्व बाजूस गोरक्षणाची जागा होती ती १९४९ मध्ये नगरपालिकेने ताब्यात घेतली. याच वर्षी दक्षिण बाजूच्या जोत्यावर ८३'X २२' ची चाळ १५५०० रु. खर्च करून बांधली. तसेच मच्छी मार्केटमध्ये विक्रेत्यांना बसण्यासाठी कट्टे बांधण्यात आले. १९६२ साली एक प्रशस्त व पक्के भाजी मार्केट बांधण्यात आले. भाजी मार्केटच्या बाहेरच्या बाजूस २३ छोटे गाळेही बांधले. आता ही इमारतही पाडून तेथे मंडईसाठी नव्याने बांधकाम चालू आहे. १९६८ मध्ये नवीन फिश व मटण मार्केट बांधण्यात आले. शहराचा विकास विस्तार दक्षिण दिशेकडे होत होता. त्या भागातील नागरिकांना ही भाजी मंडई लांब पडेल म्हणून त्यांच्या सोयीसाठी शनिवार पेठेतील जुन्या पोलीस चाळीसमोर नगरपरिषदेच्या जागेत भाजी मंडईसाठी इमारत १९८० मध्ये बांधण्यात आली.शनिवार पेठेतील साठ फुटी रस्त्यालगतच्या नगरपरिषदेच्या जागेत अद्यावत सुपरमार्केटसाठी भव्य इमारती १९९० ते १९९६ या काळात तीन टप्प्यांत बांधण्यात आल्या. या सुपरमार्केटमध्ये एकूण ६६ गाळे आहेत.

### ट्रान्सपोर्ट सेंटर

कऱ्हाड हे व्यापारी शहर असल्यामुळे येथे माल वाहतूक कंपन्यांचे व्यवसाय आणि तदनुषंगिक उद्योग मोठ्या प्रमाणात वाढले असले तरी हा व्यवसाय विखुरलेल्या अवस्थेत पसरलेला होता. एकाच ठिकाणी सर्व वाहतूक

कंपन्यांची कार्यालये, वाहनतळ आणि गोदामे अशी एकत्रित सुविधा प्राप्त झाल्यास त्याला शिस्त येईल, या हिशेबाने नगरपरिषदेने मार्केट यार्ड रस्त्यावरील स्वत:च्या जागेत १९९२-९३ मध्ये २८ फूट X १२ फूट असे २४ गाळे व मागे पुढे बरीच खुली जागा असे ट्रान्सपोर्ट सेंटर बांधकामाचे स्वरूप होते. तथापि १९९३ व १९९६ दोन वेळा लिलाव जाहीर करूनही वाहतूकदारांनी प्रतिसादच दिला नाही.

**धर्मशाळा**

प्राचीन काळापासून कऱ्हाड शहर हे तीर्थक्षेत्र आणि मोठी बाजारपेठ असल्यामुळे दूरदूरचे लोक शहरात येत. त्यांची उतरण्याची सोय धर्मशाळांतून केली जाई. १८५५ मध्ये नगरपरिषदेची स्थापना झाली. त्यावेळी कोयना नदीपलीकडे असलेली धर्मशाळा नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात होती. जुन्या काळात कऱ्हाडवरून दाभोळमार्गे हज यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरुंच्या राहण्या-जेवण्याची व्यवस्था येथे केली जात असावी. तेथे स्वयंपाकघर, विश्रांतीची जागा, गुरेढोरे बांधण्याची जागा या सोयी होत्या. सध्या गोटे गावात चिश्ती महंमदशहा बाबा म्हणून असलेले मुस्लिम देवस्थान तकिया म्हणून ओळखले जाते, तीच ही धर्मशाळा असावी.

१८५५ मध्ये पंतप्रतिनिधींच्या कोटात प्रवेशद्वाराच्या बाहेर (म्हणजे सध्या श्री कृष्णाबाई उत्सव समितीचे सांस्कृतिक केंद्र आहे त्या जागेत) पूर्वाभिमुख धर्मशाळा अस्तित्वात होती. रविवार पेठेतील (सि. स. नं. ५४) भवानदीन लाला परदेशी यांची इमारत धर्मादाय कामासाठी ते उपयोगात आणत. २२ मार्च १८५७ रोजी ती इमारत त्यांनी नगरपरिषदेस धर्मशाळा म्हणून वापरण्यासाठी दिली. सध्या (२००५ मध्ये) यशवंत हायस्कूलची इमारत ज्या ठिकाणी आहे. त्या जागेत नगरपरिषदेने १८५९ साली एक धर्मशाळा बांधली होती. त्याच इमारतीत पुढे १८६५ मध्ये नगरपरिषदेचा दवाखाना सुरू झाला.

१९२८-२९ मध्ये शेठ किसनलाल प्रेमराज लाहोटी यांनी सोमवार पेठेत कोटाखाली एक पश्चिमाभिमुखी धर्मशाळा बांधून ती चालविण्यासाठी नगरपरिषदेच्या ताब्यात दिली. अलीकडे कालमानानुसार धर्मशाळांची

आवश्यकता राहिली नसल्याने या धर्मशाळेच्या जागेत प्राथमिक शाळेसाठी नगरपरिषदेने इमारत बांधली. सध्या तेथे शेठ रामविलास किसनलाल लाहोटी नेत्ररूग्णालय आहे. शनिवार पेठेत पोलीस स्टेशनजवळ जयसिंगराव मल्हारी करपे यांनी एक मोठी सार्वजनिक धर्मशाळा बांधली आहे.

**स्मशानभूमी**

मृत्यूनंतर दहन किंवा दफन इ. अंत्यसंस्कार करण्याची वेगवेगळ्या धर्ममतांनुसार वेगवेगळी पद्धत असते. कृष्णा नदी घाटाला लगटून वाहत असे त्या काळात दहनसंस्कार कोठे करीत होते ही माहिती नेमकी उपलब्ध नाही. तथापि अल्पवयीन बालकांची दफनभूमी देशपांडे आळीच्या घाटाजवळ आहे. खोडशीचे धरण बांधल्यावर कृष्णा नदीचा प्रवाह सैदापूरकडे सरकला आणि मारूतीचे देऊळ नदीच्या दक्षिणेकडे राहिले तेव्हापासून म्हणजे इ. स. १८६७ पासून जवळ जवळ सव्वाशे वर्षे पावसाळ्याचा आणि विशेषत: पुराचा काळ सोडता वाळवंटातील मारुतीच्या देवळाजवळ दहनसंस्कार केले जात होते.त्यामुळेच हा मारुती 'मढ्या मारुती' म्हणून ओळखला जाई. नगरपरिषदेने १९७२ मध्ये मंगळवारातील करडी पीराच्या उत्तरेकडील बाजूस नवी दहनभूमी तयार केली. तेव्हापासून तेथे वेळोवेळी सुधारणा व बांधकामे, अंतर्गत रस्ते, वृक्षसंवर्धन, पाण्याची व प्रकाशाची सोय यात वाढ करण्यात आली. सध्या तेथे एकूण चार शेडस्‌मध्ये एका वेळी आठ मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याची सोय आहे. दहनासाठी कमी सरपण लागेल अशी शवदाहिन्यांची रचना आहे. आंघोळीसाठी शॉवर, बरोबर आलेल्या मंडळींना थांबण्यासाठी निवारा, दशक्रिया विधीसाठी शेड अशा सुविधांबरोबरच स्वयंसेवी संघटनेच्या मदतीने लोकसहभागातून सौर उर्जेवर गरम पाणी, दहनसंस्कारासाठी लागणारे सर्व साहित्य एकत्र मिळण्याची सोयही या स्मशानभूमीत केली आहे. रक्षा विसर्जनासाठी तीन रक्षाकुंड तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे नदीच्या पाण्यात मृतदेहाची रक्षा विसर्जित केल्यामुळे होणारे प्रदूषण टळेल. स्मशानमूमीच्या प्रवेशद्वारी तुकाराम महाराजांचे गरूडधारी शिल्प कमानीवर बसविले आहे.

मुस्लिमांची प्रेते सध्याच्या सर्किट हाऊसच्या परिसरात पुरली जात असा १८२२ च्या कागदपत्रात उल्लेख असल्याचे सांगतात. सध्याच्या विठामाता विद्यालयाच्या दक्षिणेकडील बाजूस महालक्ष्मीच्या प्राचीन उद्‌ध्वस्त देवळाच्या मागे असलेल्या भागास निमजग्याचा माळ किंवा इदगा म्हणतात. त्या भागात मुस्लिमांचे सार्वजनिक कब्रस्तान आहे. इदगाहच्या भिंतीतील एका शिलालेखावरून अली आदिलशहा पहिला यांनी मुस्लिम कब्रस्तानसाठी जमीन इ. स. १५७३ (हिजरी सन ९८०) मध्ये राखून ठेवली असल्याचे दिसते. या सार्वजनिक कब्रस्तानखेरीज करडी पीराजवळ करडीपीर मुजावरांचे, खाजा मशिदीमध्ये खाजाच्या मुजावरांचे, नव्या पुलाजवळ आंबेकरी लोकांचे अशीही कब्रस्ताने आहेत.

ख्रिश्चन समाजाची दफनभूमी आगाशिव डोंगराच्या पायथ्यास किर्लोस्कर कारखान्याच्या पूर्वेस अडीच एकर जागेत आहे तर लिंगायत समाजाची दफनभूमी मंगळवारातील कमळेश्वर मंदिराच्या पूर्व बाजूस आहे.

### पाणीपुरवठा

लोक पिण्यासाठी कृष्णा – कोयना नद्यांचे पाणी खांद्या–डोक्यावरून कळशांनी घरी आणत. उन्हाळ्यात मोठे वाळवंट तुडवून नदीचे पाणी आणताना लोकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी वाळवंटात दुतर्फा कळक रोवून त्यावर सावलीसाठी कडब्याच्या पेंड्या घालण्याची व्यवस्था १८५८ मध्ये नगरपरिषदेने केली. उन्हाळ्यात प्रवाह खंडित होऊन नद्यांचे पाणी खराब होऊ नये म्हणून दर वर्षी जानेवारी ते जून अखेर राखणीसाठी नदीवर एक रखवालदार नेमण्याची व्यवस्था १८६२ पासून सुरू केली होती.

कृष्णा नदीवर खोडशी येथे धरण १८६० मध्ये झाले. १८६३ मध्ये कृष्णा कालव्याचे काम सुरू झाले. हा कालवा खोडशीच्या धरणापासून कृष्णा नदीच्या उत्तर अंगाने पूर्वेस वहात जातो. या कालव्याचे पाणी नदी ओलांडून दक्षिणेस शहराच्या बाजूस घेण्यासाठी नदीच्या उत्तर आणि दक्षिण तीरांवर समोरासमोर दोन मोठे तलाव करून नदीच्या पात्रात मोठे लोखंडी नळ टाकून जोडण्यात आले. कृष्णा कालव्याचे पाणी पोटकालव्याने उत्तर बाजूच्या

तलावात घेऊन ते पाणी लोखंडी नळातून उताराने (ग्रॅव्हिटेशनने) शहराकडील तलावात घेतले जाई.

शहराकडील तलाव लंगर मशिदीजवळ होता. तेथून शहरापर्यंत खापरी नळ व पुढे लोखंडी नळ पुरलेले होते. शहरात (१) मंगळवार पेठेत जोतीबाच्या देवळाजवळ एक, (२) मंगळवार पेठेच्या उत्तर बाजूस वेगवेगळ्या जातींसाठी वेगवेगळे तीन, (३) वेगवेगळ्या जातींसाठी गवळवेशीत दोन, (४) वामन शिवराम मुजुमदार यांच्या आवारात त्यांचा स्वत:चा एक, (५) मंडईत एक, गुरूवार पेठेतील दर्ग्याच्या दक्षिण बाजूस दोन, (६) चावडीजवळ उसास (हौदासारखा वापर), (७) नालबंद यांच्या घराच्या कोपऱ्यावरील एक, (८) कोटाजवळ धर्मशाळेपुढे एक, (९) सोमवारात मुतालिक यांच्या वाड्याच्या पिछाडीस बागेच्या शेजारी कोटाखाली दोन, अशा जागोजागीच्या पंधरा हौदांत ग्रॅव्हिटेशनने पाणी येई. या हौदातील पाण्याचा उपयोग लोक मुख्यत: पिण्याकरिता करीत. दूषित पाण्यामुळे उद्‌भवणाऱ्या साथीपासून नागरिकांना उपद्रव होऊ नये यासाठी हे पाणी तपासण्याकरिता वेळोवेळी मुंबईस पाठविण्यात येई. शहराच्या पाणी पुरवठ्याची ही पहिली महत्त्वाची योजना १८६७ मध्ये झाली. या योजनेतून मिळणारे पाणी फक्त सहा महिने, तेही अस्वच्छ आणि शहराच्या एक चतुर्थांश वस्तीपुरतेच मिळे. पाणी स्वच्छ करण्याची तरतूद नसल्यामुळे कॉलऱ्यासारखे रोग वरचेवर उद्‌भवत. त्यामुळे १९१० पासून पाणी-पुरवठ्याची पर्यायी योजना करण्याचा विचार सुरू झाला.

कोयना नदीच्या काठी शुक्रवार पेठेतील मोटेच्या म्हसोबाची उंचावर असलेली खडकाची जागा वॉटर वर्क्ससाठी ठरवून त्यालगत फिल्टर बेडस् व पंपिंग स्टेशनसाठी पुरेशी जागा घेण्यात आली. शहरातील मध्यभागात उंचावर ९०००० गॅलन्स क्षमतेची पाण्याची लोखंडी टाकी बांधण्यासाठी रविवार पेठेतील जागा मिळविण्यात आली. सुमारे साडेतीन लाख रू. ची खर्चिक योजना १९१८ मध्ये पूर्ण झाली.त्यावेळी शहराची लोकसंख्या ११००० होती. पाणी जोडण्या निदान पाचशे मिळतील अशी अपेक्षा असताना फक्त २४३ च खाजगी नळ घेण्यात आले. पाणी पुरवठ्याची ही अद्यावत योजना त्या वेळच्या मुंबई प्रांतातील पहिली. त्यानंतर दर वर्षी सार्वजनिक आणि खाजगी नळांची संख्या वाढत गेली. पण पाण्याचा दाब कमी होत गेला. रविवार पेठेतील पाण्याच्या टाकीपासून दूर

असलेल्या उंच भागांत पाणीपुरवठा अपुरा पडू लागला. सोमवार पेठेत दीड लाख गॅलन्सची पाण्याची टाकी, जागोजागी नवीन मोठे नळ आणि खाजगी नळांना मीटर्स लावून पाणी पुरवठ्याच्या प्रमाणात पाणीपट्टी अशी पब्लिक हेल्थ डिपार्टमेंटमार्फत तयार झालेली योजना १९५० मध्ये पूर्ण झाली. या योजनेमुळे सगळीकडे पाणी भरपूर दाबाने मिळू लागले.

सध्या विद्यानगर नावाने ओळखल्या जात असलेल्या उद्यमनगर तसेच ओगलेवाडी नजिकची औद्योगिक वसाहत या नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्राबाहेरील भागासही नगरपरिषदेने १९६२ पासून पाणीपुरवठा सुरू केला. शहरातील शनिवार पेठेत मार्केट यार्ड परिसरात झालेल्या वस्तीला पाणीपुरवठा करण्यासाठी १९७४ मध्ये मार्केट यार्डात एक लाख गॅलन क्षमतेचा जलकुंभ (पाण्याची टाकी) बांधण्यात आला.शहराचा विस्तार होऊ लागला, शहराची लोकसंख्या वाढू लागली, भुयारी गटार योजनाही पूर्ण झाली. त्यामुळे पाण्याची गरजही वाढत गेली. पण त्या प्रमाणात शुक्रवार पेठेतील वॉटरवर्क्समधून होणारा सात दशलक्ष लीटर्स पाणीपुरवठा अपुरा पडू लागला. म्हणून परिसर अभियांत्रिकी विभागाने कोयना नदीवरील जुन्या व नव्या पुलांच्या मधील जागेत पावणेचार कोटी रु. च्या योजना अंमलात आणल्यामुळे सप्टेंबर १९९२ पासून नवीन वॉटरवर्क्समधून शुद्ध, स्वच्छ व भरपूर पाणीपुरवठा होऊ लागला आहे. या योजनेची क्षमता १८ दशलक्ष लीटर्स आहे.१९१८ पासून १९७९ पर्यंत सरकारमार्फत व १९७९ मध्ये अस्तित्वात आलेल्या पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळामार्फत १९७९ पासून १९९३ पर्यंत कऱ्हाड शहरास पाणीपुरवठा केला जाई. कऱ्हाड शहराच्या पाणी पुरवठा केंद्राची मालकी व ताबा १ मे १९९३ रोजी पासून नगरपरिषदेकडे आहे . कऱ्हाड शहर आणि संलग्न भागातील लोकवस्तीला पाणीपुरवठा करण्यासाठी नगरपरिषद दररोज सरासरी ११,८५,००० लीटर पाणी कोयना नदीतून उपसून घेते. पूर्वी हे अशुद्ध पाणी किती उपसले हे मोजण्याचे साधन नव्हते. आता २००५ मध्ये शनिवार पेठ जलशुद्धिकरण केंद्रावर विद्युत चुंबकीय संगणक जलमापक (कॉम्प्युटराईज्ड फ्लोमीटर) बसविला आहे. महाराष्ट्रात असा जलमापक बसविणारी कराड नगरपरिषद ही एकमेव आहे. नगरपरिषदेच्या जलशुद्धीकरण केंद्रात तुरटीचा वापर, वाळूतून गाळणी आणि क्लोरीन गॅसचा वापर ही पद्धत वापरतात. क्लोरिनचे योग्य प्रमाण देण्यासाठी अद्ययावत व्हॅक्युम टाईप स्वयंचलित स्वयंनियंत्रित इलेक्ट्रॉनिक क्लोरिनेटर या यंत्राचा वापर केला जातो.

तसेच पॉवर फॅक्टर कंट्रोल युनिटमुळे विजेच्या बिलावरही नियंत्रण ठेवता येते.जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्ध केल्यानंतर ते सोमवार पेठ (०.७ दशलक्ष), रविवार पेठ (१.५ दशलक्ष), टाऊन हॉल (१.५ दशलक्ष) आणि मार्केट यार्ड (२ दशलक्ष) या चार टाक्यांत एकूण ५.७ दशलक्ष पाणी साठवून ठेवले जाते. शहरात रोज सकाळी एक तास व सायंकाळी एक तास पाणी वाटप केले जाते. घरगुती ८१४६, व्यापारी १८७, संस्था १६८ आणि नळखांब ८ अशा एकूण ८५०९ नळजोडण्या आहेत. झोपडपट्टीतील ८ सार्वजनिक नळ जोडण्या वगळता कोठेही सार्वजनिक नळ नाहीत.

कऱ्हाड शहरात २००५ व २००६ मध्ये अतिवृष्टीमुळे नगरपरिषदेची संपूर्ण जॅकवेल व्यवस्था महापुराच्या पाण्यात दहा दिवसांपेक्षा अधिक काळ राहून देखील नगरपरिषदेने पाणीपुरवठा खंडित होऊ दिला नाही. तसेच कोणतीही जीवितहानी झाली नाही, ही विशेष नमूद करण्यासारखी बाब आहे.

नागरिकांना पुरविले जाणारे पाणी शुद्ध असल्याबद्दल नियमितपणे रोज वेगवेगळ्या ६० ठिकाणांचे पाणी तपासून पाहिले जाते. पाणी साठविण्याच्या टाक्याही वर्षातून एकवार साफ करून घेतल्या जातात. 'ब' वर्ग नगरपालिकांना लागू असलेल्या निकषाप्रमाणे दररोज दरडोई १०० लीटर पाणी पुरविले पाहिजे. कऱ्हाड नगरपरिषद दरडोई ११८ लीटर पाणी पुरवठा करते आहे.

शहरालगतच दोन नद्या बारमाही वहात असल्यामुळे पाणी टंचाईची समस्या नाही. तरीही वाढती लोकसंख्या आणि पाण्याचा अनिर्बंध वापर यामुळे तात्कालिक अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यासाठी पाणी खेचण्यापासून त्याचे वितरण होईपर्यंत असलेल्या यंत्रणेत गळती होऊ नये म्हणून दैनंदिन नियंत्रण ठेवून दक्षता घेतली जाते. सार्वजनिक नळांऐवजी समूह नळ ही कल्पना काढली. पावसाचे पाणी संकलन करण्याचा एक प्रकल्प शिवाजी स्टेडियम बुधवार पेठ येथे कार्यान्वित असून तेथे २५०० चौ. फूट क्षेत्रात पाणी संकलित केले जाते. शहरात ४ ठिकाणी विद्युत पंप असून ७९ हातपंपापैकी ५२ पंप चालू स्थितीत आहेत. पावसकर गल्ली, बटाणे गल्ली, पंताचा कोट आणि संभाजी मार्केट या चार ठिकाणी कूपनलिकांवर सबमर्सिबल पंप बसवून परिसरासाठी पर्यायी पाणीपुरवठा सुविधा लोकसहभागातून उपलब्ध आहे.

*****

# २

# राजकीय इतिहास

### प्राचीन काळ

आज ज्याला कऱ्हाड-कराड असे म्हणतात त्याचे जुने उल्लेख करहकट, करहाकडक, करहाडक, करहाटक, करहाट, करहाड व करहड अशा नावांनी ताम्रपटांत, शिलालेखांत व महाभारतात सापडतात. मात्र कऱ्हाडचा लेखी स्वरूपातील सर्वांत प्राचीन उल्लेख महाभारताच्या सभापर्वातील ३२ व्या अध्यायात पांडवांपैकी एक असलेल्या सहदेवाच्या संदर्भात आहे.

तिमिङ्गलं च स नृपं वशे कृत्वा महामतिः ।।
एकपदांश्च पुरुषान्केरलानन्वनवासिनः ।। ७१।।
नगरीं संजयन्तीं च पाषण्डं करहाकटम् ।।
दूतैरैव वशे चक्रे करं चैनानदापयत ।।७२।।

अर्थ - (त्या बुध्दिमान सहदेवाने) (ताम्रद्वीपाचा राजा) तिमिङ्गल यास वश करून एकपाद, केरल, वनवासी (वनवासी प्रांतात राहणारे) हे लोक नगरी संजयन्ती व ज्यात पाखण्डवादी लोक आहेत असे करहाकट (कऱ्हाड) ही (आपल्या) दूतांकडूनच ताब्यात आणिली व त्याजकडून कर वसूल केला.

कऱ्हाड हे पाखंडवादी म्हणजे प्रस्थापित वैदिक धर्माविरुद्धचे बौद्ध व जैन लोक असावेत. महाभारतकाळ जरी इ. स. पूर्व ४ थे सहस्रक असला तरी त्या महान ग्रंथाचा लेखनकाळ बराच अलीकडचा म्हणजे इ. स. पू. ३०० ते ४०० असा मानतात. कऱ्हाडच्या दक्षिणेकडील आगाशिवाच्या डोंगरात हीनयान पंथीयांची लेणी याला साक्ष देतात. कऱ्हाडचा बौद्धपूर्व वृत्तांत मात्र निश्चित सांगता येत नाही. कारण तसे पुरावे सापडले नाहीत. मात्र इ. स. १९४८-४९ मध्ये पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळाने जे उत्खनन केले. त्यावरून व इ. स. १९६५ ते १९६८ च्या सुमारास कऱ्हाडच्या पंतांच्या

कोटात भुयारी गटार योजनेसाठी जे खोदकाम केले त्यावेळी जे अवशेष सापडले त्यावरून  कऱ्हाडचे प्राचीनत्व बरेच मागे म्हणजे शातवाहन काळाच्या मागे आपल्याला नेता येते.

महाभारतात व पुराणात एवढेच नव्हे तर पुढील काळातील धार्मिक वाङ्मयातदेखील कृष्णानदीचा उल्लेख कृष्णा–वेण्णा किंवा कृष्णा–वेणी असा होतो. या बाबतीत वि. का. राजवाडे असा खुलासा करतात की, 'प्राचीन पुराणात उल्लेखित वेन राजाच्या वंशातील वेन जमातीची वसाहत कृष्णा नदीच्या परिसरात प्रथम झाली असावी ते कृष्ण म्हणजे कृषिकर्म करणारे लोक असावेत'

प्राचीन काळातील ज्या राजवटींच्या राज्यांचा विस्तार आपणास माहित आहे, त्यावरून असे दिसते की इ.स.पू. ७ वे ते ३ रे शतक या काळात राष्ट्रिकांचे राज्य कऱ्हाडवर असावे. या राष्ट्रिकांवरूनच आपल्या प्रांताला महाराष्ट्र असे नाव मिळाले. राष्ट्रिक–रठ्ठी–महारठ्ठी–मराठी असा हा प्रवास आहे. त्यानंतर आले ते मौर्यांचे, जवळ–जवळ संपूर्ण भारतावर असणारे साम्राज्य. इ.स.पू. ३२२ ते इ. स.पू. १८५ या काळातीलअशोकाच्या साम्राज्याच्या सीमा तर आपणास माहीत आहेत. मात्र कऱ्हाडवरील या दोघांही राजवटींचा प्रत्यक्ष पुरावा नाही. त्याचप्रमाणे शातवाहन किंवा आंध्रभृत्यांचे राज्यदेखील कऱ्हाडवर असावे. नंतरच्या काळात होऊन गेलेल्या विजयसेन, दामजमदश्री, दुसरा रुद्रसेन, विश्वसिंह, भार्तृदामन व विश्वसेन क्षत्रपांची नाणी मात्र कऱ्हाडजवळील गोवारे गावी व खुद्द कऱ्हाडमध्ये टिळक हायस्कूलच्या बाजूस सापडली होती. त्यांची राजवट बहुधा इ.स. २८० ते ३०४ पर्यंत असावी. यानंतर वाकाटक किंवा भोज यांचे राज्य. नंतर आली चालुक्याची राजवट. (इ. स. ५५० ते ७५३).

या राजांपैकी माधववर्मा नावाच्या राजाच्या ताम्रपटात रेट्टरक (रेठरे), बेलवाटिका (बेलवडे), कोलिकावाटिका (कोळे) आणि वट्टरिका (वाठार) या कऱ्हाडजवळील वाड्यांचा उल्लेख आहे. दरम्यान कुंतलराजांनी पण तेथे अंमल गाजवला असावा. कारण आजचे कुंडल हे त्या नावाचाच अपभ्रंश असावा. माधववर्मा हा कदाचित चालुक्यांचा मांडलिकही असावा.

त्यानंतरचे राष्ट्रकूट हे मात्र कऱ्हाडवर नक्कीच राज्य करत होते. कारण या घराण्यातील दुसरा दन्तिदुर्ग या राजाने इ. स. ७५३ साली दिलेल्या ताम्रपटात करहाटक असा उल्लेख आहे. याच घराण्यातील तिसऱ्या गोविंदाने व्यासभट्ट

नावाच्या एका ब्राह्मणाला देणगी दिली. त्या देणगीचा जो ताम्रपट आहे. त्यात या ब्राह्मणाचे राहण्याचे गाव करहड असे दिले आहे. या दानपत्राची तारीख आहे २३ एप्रिल ८१०. कऱ्हाडच्या ब्राह्मणांना कऱ्हाडे ब्राह्मण ही उपाधी याच काळात मिळाली असण्याची शक्यता आहे.

याच राष्ट्रकूट घराण्यातील तिसरा कृष्णराज याने एक ताम्रपट दिला आहे. त्यात कऱ्हाडचे नाव करहाट असे दिले आहे. या ताम्रपटात कऱ्हाड हा विषय म्हणजे जिल्हा असल्याचे नमूद केले आहे. याची तारीख आहे ९ मार्च ९५९. ही देणगी एका तपश्चरण करणाऱ्या ईशानशिवाचा विद्यार्थी गगनशिव याला दिली आहे.

यानंतर कऱ्हाडवरील सिंद या राजवटीचा थोडासा पुरावा मिळतो. सिंद मूळ सिंध प्रांतातून आले असावेत. त्यांच्या एकूण तीन शाखा होत्या. त्यांतील एका शाखेचा उल्लेख इ. स. ११६५ च्या हरिहरच्या लेखात आला आहे. ह्या सिंदाच्या एका पूर्वजास करहाट प्रांत त्याचे वास्तव्याचे ठिकाण होणार आहे असे सांगितल्यावर तो तेथे गेला. तेथील मूळच्या राजास या सिंदाने हाकलून दिले व ४००० गावे व शहरे असलेल्या करहाट प्रांतावर त्याने राज्य केले. हे सिंद शिलाहारांच्या पूर्वीचे असावेत. शिंदे या आडनावाचा या सिंदांशी संबंध असावा.

इसवी सनाच्या ११ व्या व १२ व्या शतकात कऱ्हाड, वाळवे व कोल्हापूर या प्रांतांवर शिलाहारांचा अंमल होता. दक्षिण महाराष्ट्रातील अनेक बुलंद दगडी किल्ल्यांच्या बांधकामाचे श्रेय शिलाहारांकडे जाते. कऱ्हाडच्या प्रीतिसंगमावर असलेला भुईकोट किल्ला कदाचित यांनीच बांधला असावा. इ. स. १०५८ या वर्षांत मारसिंह या शिलाहार राजाने एक ताम्रपट दिला होता. त्यात कऱ्हाडचा उल्लेख करहाट असा आहे. हा प्रांत त्याच्या ताब्यात होता. त्याच्या मुलीचे नाव चंद्रलेखा असे असून तिचा विवाह पश्चिम चालुक्य राजा शककर्ता सम्राट सहावा विक्रमादित्य याच्याबरोबर झाला. हा विवाहसोहळा करहाटास म्हणजे कऱ्हाडात झाला. याचे रसभरित वर्णन काश्मिरी पंडित कवी विद्यापती बिल्हण याच्या 'विक्रमांकदेवचरित्रा'तील ८ व्या व ९ व्या सर्गांत आले आहे. हा विवाह फार मोठ्या राजाचा होता. त्याचा लवाजमादेखील तसाच मोठा असणार. तेव्हा लग्नाचे स्थळही त्याच योग्यतेचे असले पाहिजे.

याचाच अर्थ कऱ्हाड हे त्या काळी फार भरभराटीचे व महत्त्वाचे शहर असले पाहिजे. 'राजतरंगिणी' ग्रंथातही अध्याय ७ (इ.स. ११२४) मध्ये कऱ्हाडची राजकन्या चंद्रलेखा हिचा उल्लेख आहे.

या शिलाहारांच्या शाखेतील सर्वात प्रसिद्ध राजा म्हणजे विजयादित्य हा होय. इ. स. ११४२ ते ११५४ या काळातील त्याचे लेख प्रसिद्ध आहेत. हा राजा मोठा लक्ष्मीभक्त होता व कऱ्हाड त्याच्या राज्याची सरहद्द असावी म्हणून कऱ्हाडलादेखील त्याने एक अतिशय भव्य लक्ष्मीमंदिर बांधले. त्याचा दगडी चौथरा आजही निमजग्याच्या माळावर दिसतो. या देवळातील लक्ष्मीची मूर्ती कनकआभा म्हणजे सुवर्णतेजाची असून सोळा हातांची होती. या मंदिरात अनेक कोनाडे असून त्यात अनेक देवतांच्या मूर्ती होत्या. त्यातील एक म्हणजे कऱ्हाडच्या सोमवार पेठेतील भैरोबा गल्लीतील उत्तरालक्ष्मीची मूर्ती. ही मूर्ती इतकी सुंदर आहे की त्यावरून मूळची लक्ष्मीची मूर्ती किती भव्य व सुरेख असेल याची कल्पनाच केलेली बरी.

इ. स. ११२९ मध्ये उभारलेल्या एका स्तंभलेखावरून समजते की सामन्तभद्र नावाच्या एक जैन पंडिताने श्रवणबेळगोळ येथील स्तंभ उभारून झाल्यावर अनेक देशांचे परिभ्रमण केले व नंतर तो 'बहुभट, विद्योत्कट व संकट' म्हणजे मोठमोठे पंडित व पुष्कळ योद्धे असलेल्या करहाट नगरीत वादासाठी येऊन पोहोचला.

विजयादित्याचा पुत्र दुसरा भोज किंवा वीर भोज देव याचा २५ डिसेंबर ११९० चा एक शिलालेख आहे. त्यात या राजाने कऱ्हाडच्या आदित्यभट्ट, लक्ष्मीधरभट्ट व प्रभाकर घैसास या कऱ्हाडे ब्राह्मणांस एक शेत, घर व उमामहेश्वराची मूर्ती पूजेसाठी दिल्याचा उल्लेख आहे.

कऱ्हाडे ब्राह्मण मूळचे कोण होते याबद्दल बरीच चर्चा झाली आहे. पण त्यांचा कोकणातील विस्तार प्रामुख्याने शिलाहारांच्या काळातच झाला. शिलाहार घराण्यातील दुसऱ्या भोजाची सत्ता इतकी वाढली की तो आपणास पश्चिम चक्रवर्ती म्हणून म्हणवून घेऊ लागला. पण नंतर मात्र यादव काळातील सम्राट सिंघण याने हा मुलूख आपल्या साम्राज्यात सामील करून घेतला.

हे शिलाहार राजे नंतरच्या काळात विजयनगरच्या राजाचे मांडलिक झाले असावेत. कारण नंतरच्या या काळात त्यांचे अस्तित्व दाखवणारे पुरावे उपलब्ध झाले नाहीत.

अशा तऱ्हेने मुसलमानपूर्व काळात कऱ्हाड हे मोठे वैभवसंपन्न राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे व व्यापाऱ्यांनी गजबजलेले शहर होते. एकूणच हा काळ महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णकाळ असल्याने कऱ्हाड तरी त्याला कसा अपवाद असणार ?

**मुसलमानी अंमल**

महाराष्ट्रातील शेवटची देशी राजवट म्हणजे यादवांची. शेवटचा यादव रामदेवराय याच्या कारकिर्दीत उत्तरेकडील दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याचे महाराष्ट्रावर आक्रमण झाले. त्याने यादवांचा संपूर्ण पराभव केला. पण महाराष्ट्रावर मुसलमानी अंमल येण्यास मात्र इ. स. १३१३ साल उजाडावे लागले. मात्र त्यापूर्वी दक्षिणेत मुसलमान नव्हते असा त्याचा अर्थ नव्हता. कारण कऱ्हाडमध्ये मंगळवार पेठेत करडेपीर नावाचे थडगे इ. स. १२६२ मध्ये तयार झाले होते. दिल्लीच्या सल्तनतीमध्ये सुद्धा नंतर केंद्रसत्ता दुबळी झाली. त्यामुळे दूरदूरचे सुभेदार स्वतंत्र होऊ लागले. त्यातीलच एक जाफरखान किंवा हसन गंगू या सुभेदाराने १३४७ मध्ये दक्षिणेत स्वतंत्र राज्य निर्माण केले. हेच ते बहामनी राज्य. हे नंतर सुमारे दीडशे वर्षे टिकले. त्याचे पाच तुकडे आदिलशाही, निजामशाही वगैरे नावांनी प्रसिद्ध झाले. कऱ्हाडवर प्रथम बहामनींची व नंतर आदिलशाहीची राजवट १४९७ पासून बराच काळ होती. मुसलमानी काळात कऱ्हाडला कलहराबाद असे म्हणत. एका सनदेत 'कल्हाट' असेही म्हटले आहे. पंताच्या कोटामधील नकट्या रावळाची प्रेक्षणीय विहीर ही बहामनी काळातील. पण पेठेतील १०६ फूट उंचीचे दोन मनोरे व त्याजवळील जुम्मा मशीद या इमारती विजापूरचा पाचवा बादशहा अली आदिलशहा याने इ. स. १५७३ ते १५७६ या काळात बांधल्या. या मनोऱ्यात त्या काळी कैदी ठेवले जात. बहामनीच्या काळात कऱ्हाडला इ. स. १३९६ ते १४०८ या काळात प्रचंड दुष्काळ पडला होता. हाच तो दुर्गादेवीचा किंवा दुर्गाडीचा दुष्काळ होय. त्यावेळी विजयनगरहून दादो नरसिंह काळे हा बिदरच्या बादशहास भेटला व त्याने या उद्ध्वस्त झालेल्या मुलखाची वतनदारी मिळवली. त्याने १४२६ मध्ये वस्ती करेपर्यंत कऱ्हाड उजाड होते. त्या मागोमाग देशपांडेही आले. एका वतनाचा मजहर इनाम कमिशनरकडे नोंदला आहे. हे वतन काशीपंत धानतराव देशपांडे यांना दिले होते.

या मजहराची तारीख आहे ५ मे १६५७. आदिलशाहीत कऱ्हाड मोकासा हा एखलासखानाकडे होता. त्यानंतर त्याचा मुलगा,आसतखानाकडे होता. त्यानंतर त्याचा मुलगा, आसतखान लाहारी, हा पुढे मोकासाईखान म्हणून प्रसिद्ध झाला. त्यानंतर अलमखान व मुस्तफाखान हे मोकासदार होते.

दरम्यान भोसले घराण्याशी संबंधित अशी एक घटना कऱ्हाडलाच घडली. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी व त्यांचे मेहुणे राव वणंगपाळ ऊर्फ जगपालराव नाईक निंबाळकर यांनी निजामशहाच्या बाजूने आदिलशाहीत बंडाळी माजवली. या बंडाळीत या दोघांनी इ. स. १५९६ मध्ये कऱ्हाडचा भुईकोट किल्ला व पुढे पन्हाळा प्रांत घेतला. कोटाचाच खास उल्लेख असल्याने तेथेच लढाई झाली असली पाहिजे. या वणंगपाळाबद्दल 'राव वणंगपाळ, बारा वजिरांचा काळ' असे म्हटले जाई. या पराक्रमामुळेच मालोजी 'मालोजीराव' झाले. इ.स. १६३७ मध्ये आदिलशाहीतील मातब्बर सरदार शहाजीराजे यांना बादशहाकडून कऱ्हाड प्रांतातील बावीस गावांची देशमुखी मिळाली. यांपैकीच एका गावात म्हणजे मसूरला समर्थ रामदास स्वामींनी सार्वजनिक रामजन्मोत्सवाला सुरुवात करून आपल्या सामाजिक व राजकीय कार्याची मुहूर्तमेढ रोवली. पुढे राजे शहाजी यांनी आदिलशाही सोडली व कऱ्हाडचा मोकासा प्रथम झुंजारराव घाडगे, नंतर आदिलशाहीतील राजमाता बडी साहेबीण व शेवटी इ.स. १६५३ मध्ये मुधोळचे बाजी घोरपडे यांच्याकडे आला. स्वत: आदिलशहा दुसरा अली हा फौज घेऊन शिवाजी महाराजांबरोबर लढण्यासाठी जानेवारी १६६१ मध्ये आला. ही लढाई कऱ्हाडच्या इदगा माळावर झाली.

या काळातील आणखी एक गंमत म्हणजे इ. स. १६५९ मधील अफझलखानवधानंतर त्याचा मुलगा फाझलखान व बायका मुले यांना सुरक्षित पोहोचवण्याची जबाबदारी पैशाच्या लालचीने खंडोजी धर्मोजी काकडे याने घेतली. पण महाराजांच्या भीतीने हा काकडे एक महिनाभर कऱ्हाडच्या जुम्मा मशिदीत लपून बसला होता.

**मराठशाही**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यावेळेपासून महाराष्ट्रात मराठशाही सुरू झाली असे आपण मानतो. याबाबतचा कऱ्हाडच्या

संदर्भातील पहिला उल्लेख असा " कसबे कऱ्हाड ये स्थलींच्या ब्राह्मणास पूर्वी आदलशहाचे कारकिर्दीस कित्येक वृत्ती होत्या " त्या वृत्ती काढून शिवछत्रपतींनी योग्यायोग्यता पाहून त्या धर्मादाय दिल्या. राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत शिवापूर (सैदापूर) हा गाव ब्राह्मणास अग्रहार करून देण्यात आला. अशाच एका सनदेवरून असे दिसते की शिवाजी महाराजांनी कऱ्हाडच्या प्रीतिसंगमी स्नान पण केले होते. याच कारणासाठीं राजाराम महाराजांनी सनद देऊन सैदापूरचे शिवापूर असे नाव ठेवले. ही सनद राज्याभिषेक शक २४ म्हणजे इ. स. १६९८ मधील आहे. शिवछत्रपतींचा कऱ्हाडमधील तीर्थोपाध्याय कऱ्हाडचा विश्वनाथभट्ट गिजरे हा होता.

मराठशाहीत राज्यांच्या सीमा पक्क्या नसत. समुद्राच्या लाटा जशा मागे पुढे होतात तसेच राज्यांच्या सीमा पण मागे पुढे होत. अफझलखान वधानंतर म्हणजे इ. स. १६५९ नंतर महाराजांनी मोठ्या झपाट्याने पन्हाळ्यापर्यंत धडक मारली. त्यावेळी महाबळेश्वर ते पन्हाळा हा सर्व मुलूख स्वराज्यात आला. म्हणजे कऱ्हाडही त्याचवेळी त्यांच्या ताब्यात आले. महाराजांच्या मृत्यूच्यावेळी पण ते त्यांच्याच ताब्यात होते. स्वराज्य रक्षणासाठी महाराजांनी शेजारच्या वसंतगडाचा मोठा उपयोग करून घेतला. त्यामुळेच सभासदासारखा आद्यबखरकार देखील वसंतगड त्यांनीच बांधला असे म्हणतो. वास्तविक तो १२ व्या शतकात शिलाहारांच्या काळात बांधला गेला आहे.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूच्यावेळी त्यांचे सेनापती होते हंबीरराव मोहिते. हे मोहिते कऱ्हाडजवळील तळबीडचे. शहाजीराजांची एक पत्नी तुकाबाई, शिवाजी महाराजांची एक पत्नी सोयराबाई व राजाराम महाराजांची एक पत्नी सुप्रसिद्ध रणरागिणी ताराबाई या सर्व तळबीडच्या मोहित्यांकडील. या हंबीररावांनी थोरल्या महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीराजे पन्हाळ्याहून येऊ नयेत म्हणून त्यांचा रस्ता कऱ्हाडच्या आसपास रोखून धरला व हेच हंबीरराव नंतर मोरोपंत पिंगळे व आण्णाजी दत्तो यांनी संभाजीराजांविरुद्ध जी हालचाल केली, त्यावेळी संभाजीराजांना ससैन्य येऊन मिळाले तेही कऱ्हाडलाच.

राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत रामचंद्रपंत अमात्य मराठी दौलतीचा कारभार करत. त्यावेळी कऱ्हाड प्रांताचा बंदोबस्त ते वसंतगड किल्ल्यावरूनच बघत. १६५९ मध्ये अफजलखानवधानंतर महाराजांनी हा किल्ला घेतला. त्याचवेळी

मसूरचा सुलतानजी जगदाळे हा पातशहाला फितूर झाला म्हणून त्याला कैद करून वसंतगडावर त्याचा शिरच्छेद केला. त्यानंतर मिर्झाराजा जयसिंगाबरोबर झालेल्या तहात हा किल्ला मोंगलाना द्यावा लागला. नंतर इ. स. १६७३ च्या आसपास वसंतगड शिवशाहीत आला. इ. स. १६८२ त स्वत: औरंगजेब महाराष्ट्रात उतरला व मराठ्यांनी आपले जगप्रसिध्द स्वातंत्र्ययुध्द सुरू केले. एकदा मराठ्यांची, संभाजीराजांना पकडणारा औरंगजेबी सरदार शेख निजाम ऊर्फ मकर्रबखान याच्याबरोबर इ. स. १६९०-९१ मध्ये गडाच्या पायथ्याशी लढाई झाली. त्यात मराठ्यांचा पराभव होऊन त्यांच्याकडील उदाजी मोहिते हा ठार झाला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर पन्हाळा ते पुणे या भागाला बरेच महत्त्व आले. त्यातूनही वसंतगड मध्यवर्ती असल्याने मराठ्यांनी या किल्ल्याला बरेच महत्त्व दिल्याचे दिसते. 'राजारामचरितम्' लिहिणारा केशव पंडित म्हणतो की संभाजीराजानंतर मराठ्यांची जी पळापळ झाली, त्यात शंकराजी नारायण यांनी महिमानगड, गुणवंतगड (मोरगिरी) व सुंदरगड (दातेगड) जिंकून पाटणच्या राजाचा पराभव केला व धनाजी जाधवाबरोबर आपल्या पायदळासहित तो वसंतदुर्गास गेला. दि. २० जुलै १६९९ रोजी राजाराम महाराज ताराबाईसह वसंतगडावर होते. इ. स. १६९९ च्या ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये औरंगजेबाने वसंतगडावर ताकदीनिशी हल्ला केला. त्यासाठी मसूरहून तरबियतखान यास वसंतगडाकडे पाठविले. मोगली ताकदीला मराठे अपुरे पडले व ५ ऑक्टोबर १६९५ रोजी वसंतगडचा किल्लेदार रतनराव याने शरणागती पत्करली. पुढे तो मोगलांच्या चाकरीतही गेला. औरंगजेबाने किल्ल्याचे नाव 'किली-द-फतेह' असे ठेवले. १७०१ ते १७०७ या काळात महाराणी ताराबाईच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी औरंगजेबाने घेतलेले बहुतेक किल्ले परत घेतले त्यात वसंतगड इ. स. १७०६ मध्ये मराठ्यांकडे आला. तर ताराबाईकडून तो इ. स. १७०८ मध्ये शाहू छत्रपतींनी घेतला.

छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर स्वराज्यरक्षणासाठी ज्यांनी आपले बुद्धिचातुर्य आणि पराक्रम कारणी लावले, त्यामध्ये किन्हईचे परशुराम त्रिंबक कुलकर्णी हे एक होते. ते प्रथम पंतअमात्यांचे सेवक होते. पुढे ते 'सरदार' झाले. १६९८ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी परिस्थितीची गरज म्हणून अष्टप्रधानांखेरीज प्रतिनिधी हे एक नवीन पद निर्माण केले. मराठा मंडळात

दुफळी माजल्यावर ते ताराराणीच्या पक्षाला मिळाले होते. औरंगजेबाच्या कैदेतून १७०७ साली सुटका झाल्यावर परशुरामपंत कुलकर्णी यांनाही शाहूंनी आपल्या बाजूस वळविले आणि त्यांना १७१० साली 'पंतप्रतिनिधी' हे पद दिले. त्यावेळी दिलेल्या सनदेत (८-४-१७१४) शाहू महाराजांनी कऱ्हाड प्रांत प्रतिनिधींकडे दिला. परशुरामपंत यांचे निधन २७ मे १७१८ रोजी झाल्यावर त्यांचे चिरंजीव श्रीपतराव ऊर्फ श्रीनिवास परशुराम हे प्रतिनिधी झाले. सातारा आणि कोल्हापूर येथील छत्रपतींमध्ये लढाया होत. १७३० मध्ये श्रीपतराव प्रतिनिधींनी वारणा काठावर कोल्हापूरच्या (राजाराम महाराजांच्या दुसऱ्या पत्नीचा राजसबाईचा मुलगा) छत्रपती संभाजी यांचा पराभव केला. त्यानंतर २८ फेब्रुवारी १७३१ रोजी कऱ्हाडजवळील जखिणवाडी येथे सातारकर व कोल्हापूरकर छत्रपतींची भेट झाली. दोघांच्या राज्याच्या सीमा ठरविणारा 'वारणेचा तह' येथे झाला. या तहाने वारणेच्या दक्षिणेचा मुलूख कोल्हापूरकरांकडे ठेवण्यात येऊन उत्तरेकडचा मुलूख सातारकरांकडे आला. त्यामुळे कऱ्हाड वगैरे प्रांताचा कारभार श्रीपतराव प्रतिनिधी यांच्याकडे आला. प्रतिनिधींनी आपली राजधानी कऱ्हाड येथे भुईकोट किल्ल्यात ठेवली. भोवतालचे सदाशिवगड, वसंतगड, मच्छिंद्रगड हे डोंगरी किल्ले आपल्या ताब्यात ठेवून संरक्षणाची सोय केली. कऱ्हाड हे छत्रपतींच्या प्रतिनिधींच्या राजधानीचे गाव असल्यामुळे मुख्य सैन्याचा तळ कऱ्हाडास असे.

श्रीपतराव पंतप्रतिनिधी यांचे २५-११-१७४६ रोजी निधन झाल्यावर जगज्जीवनराम, त्रिंबकराव, भवानराव (श्रीनिवास गंगाधर) हे वंशपरंपरा प्रतिनिधिपदावर आले. भवानराव आणि भगवंतराव हे दोघे आपआपसांत लढत बसले. त्यामुळे कऱ्हाड प्रांत ओस पडला (१७६५). भवानरावांचा ३०-८-१७७७ रोजी बेलवडे येथे मृत्यू झाला. त्यांचा मुलगा परशुराम श्रीनिवास त्याच दिवशी जन्मास आला. नाना फडणवीस आणि भवानराव यांचा स्नेह असल्यामुळे या मुलाची मुंज १७८३ मध्ये आणि लग्न १७८९ मध्ये नाना फडणवीसांनी पुढाकार घेऊन केले. या मुलाचे नाव परशुरामपंत असेच ठेवले होते. हे दुसरे परशुरामपंत 'अवलिया'च होते. यांनी १७९५ मध्ये खड्र्याच्या लढाईत भाग घेतला होता. त्यांचा उजवा हात लढाईत तुटला म्हणून त्यांना 'थोटे पंत' असेही म्हणत. दुसऱ्या बाजीराव पेशव्याने सरदार बापू गोखल्यांकरवी थोटेपंतांचा मुलूख जप्त केला. थोट्या पंतास १८०६ ते १८११ पुण्यास पेशव्यांच्या ताब्यात राहावे

लागले. १०-२-१८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाली. सातारचे रेसिडेंट ग्रांटसाहेब यांनी २२-४-१८२० रोजी तहनामा करून तुमचा 'दर्जा व मर्तबा पूर्वीप्रमाणे चालत राहील.' असे अभिवचन दिले. थोटे पंत निपुत्रिक होते, दत्तक घेण्याची त्यांची इच्छा नव्हती. पण साहेबांनी व संबंधितांनी एक दत्तक मारून मुटकून त्यांच्या मांडीवर बसविला (१८-३-१८४७). थोट्या पंतांचा १८४८ मध्ये मृत्यू झाल्यावर त्यांचा दत्तक पुत्र श्रीनिवास आपल्या वागणुकीने राजर्षिपदाला पोचला. इंग्रजी राज्याच्या नवीन जडणघडणीत १८५५ मध्ये कऱ्हाड इंग्रज सरकारच्या अंमलाखाली आले ते श्रीनिवास परशुरामांच्या कारकीर्दीतच. पंतप्रतिनिधींनी आपली राजधानी औंध ही केली. इंग्रजांनी कऱ्हाडच्या मोबदल्यात पंतांना एवढी बारकीसारकी (७२ खेडी, ४९ वाड्या, ५०० चौ.मै., ४ ते ५ लाख रुपये वार्षिक उत्पन्न) गावे दिली होती की, "ज्यापैकी एकाचा वसूल करून प्रतिनिधी दुसऱ्या गावाला जातील तर दुसऱ्या गावाचा वसूल होईपर्यंत पहिल्या गावाच्या वसुलातील बाकी शून्य व्हायची." अशी चेष्टा त्यावेळच्या कऱ्हाडच्या 'विदूषक' साप्ताहिकात उघड-उघड केली होती.

पंतप्रतिनिधींची राजधानी औंधास गेली तरी कऱ्हाडचा भुईकोट किल्ला पंतप्रतिनिधींच्या ताब्यातच होता. तेथे भवानी देवीचे देवघर, मंडप होते. पूर्वीप्रमाणेच कऱ्हाडात दरसाल नवरात्र मोठ्या थाटाने करीत. १८९६-९७ मध्ये प्लेगचा कहर झाल्यामुळे त्या निमित्ताने 'औंधास देवी आणून उत्सव करावा' असा कौल देवीने दिला. म्हणून कोटातील देवी, नारायण जागळेकर या कारभाऱ्यांनी औंधास नेली ती कायमचीच. इ. स. १७६३ मध्ये गमाजी यमाजी व नरसिंगराव पागे यांच्यामध्ये कऱ्हाडला लढाई झाली. गमाजी पराभूत होऊन पाटणजवळील दातेगडास पळाला.

सातारकर छत्रपतींना पेशव्यांविरुद्ध मदत करण्यासाठी कोल्हापूरकरांनी स्वारी केली. पण २१ जुलै १७९८ रोजी हे सैन्य पंतप्रतिनिधींची बायको काशीबाई हिने कोयनेवर अडवून ठेवले. पंतांच्या कोटातील भवानीमंदिर व प्रतिनिधींचा राजवाडा याच काशीबाईंनी बांधला.

शिवछत्रपतींपासून ते प्रतापसिंहाच्या अमदानीपर्यंत कऱ्हाडची देशमुखी यादवांकडे होती. या यादवांनी थोरल्या महाराजांना तोरणा किल्ला घेण्याच्या व बांधण्याच्या कामी खूप मदत केली होती. बहुधा याच घराण्यातील अर्जोजी

यादव व गिरजोजी यादव यांच्या वतनाचा वाद छत्रपती संभाजी राजांसमोर चालू होता व ते ज्या दिवशी संगमेश्वरला मोगलांकडून पकडले गेले, त्याच दिवशी म्हणजे १ फेब्रुवारी १६८९ रोजी या वादाचा निकाल त्यांनी दिला होता. या गिरजोजीवर संभाजी राजांची खूप मर्जी होती. कारण त्यांनीच राजांची एक पत्नी दुर्गाबाई हिला सोडविण्यासाठी श्रमसाहस केले होते. याच यादवांच्या संदर्भात एक आख्यायिका आहे. सातारचे शेवटचे छत्रपती प्रतापसिंह यांनी यादवांच्या एका मुलीस मागणी घातली. पण यादव हे स्वत:ला आपण भोसल्यांपेक्षा श्रेष्ठ वंशाचे आहोत असे मानत. तेव्हा देशमुखांनी ही अडचण दूर करण्यासाठी आपल्या लेकीस पोत्यात घालून कृष्णा-कोयनेच्या 'प्रीतिसंगमात' बुडवले. याचा परिणाम असा झाला की त्यांची देशमुखी खालसा करण्यात आली. प्रतापसिंहाच्या कारकीर्दीत बाळाजी चिटणीस यांचे हस्तक वैद्य यांच्याकडे वसंतगडची कारखानिशी होती.

**ब्रिटिश अंमल**

मराठी राज्य इ. स. १८१८ मध्ये नष्ट झाले असे समजले जाते. पण इंग्रजांनी सातारची शिवछत्रपतींची गादी ता. १६-५-१८४९ रोजी खालसा केली आणि खऱ्या अर्थाने हे राज्य लयाला गेले. याविरुद्ध प्रतापसिंहांनी अटीतटीचे प्रयत्न केले. त्यासाठी कायदेशीर मार्गाने झगडण्यासाठी छत्रपतींचे कारभारी रंगो बापूजी हे चौदा वर्षे इंग्लंडमध्ये जीवाचे रान करीत होते. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. प्रतापसिंहराजे हे खरे तर लोकांचे राजे होते. त्यामुळे त्यांची एकनिष्ठ प्रजादेखील इंग्रजांच्या या अन्यायाविरुद्ध पेटून उठली. ता. ५-९-१८३९ रोजी इंग्रजांनी प्रतापसिंहाना पदच्युत केले आणि कऱ्हाडजवळील कोळे येथील धारराव पवार यांनी बंड केले. तर खुद्द रंगो बापूजी यांनी स्वत: इंग्रजांना हाकलून छत्रपतींच्या गादीची पुनर्स्थापना करण्याच्या उद्देशाने उठावाची तयारी केली. त्यांच्या सैन्यभरतीची जी ठिकाणे होती, त्यांत कऱ्हाड हे एक प्रमुख केंद्र होते. रंगो बापूजींच्या प्रमुख अनुयायांत कऱ्हाडच्या मंगळवार पेठेतील दौलता हरी पवार हे होते. पवार यांनी कऱ्हाडहून थोडे थोडके नव्हे तर चारशे सैनिक या उठावासाठी मिळवून दिले. दुर्दैवाने या उठावाला यश आले नाही. रंगो बापूजींच्या चौतीस मातब्बर अनुयायांपैकी

सतरा कंपनी सरकाराच्या हाती लागले. जे शेवटपर्यंत हाती लागले नाहीत त्यापैकी दौलता पवार हे एक होते. याच उठावातील एक बंडखोर, कऱ्हाडातील बहिरोबा आळीत राहणारे रामचंद्र गोपाळ जोशी लढा यशस्वी झाला नाही म्हणून घरी परतलेच नाहीत. संन्यास घेऊन त्यांनी उर्वरित आयुष्य 'लंबोदरानंद' या नावाने अलिबाग येथे कनकेश्वराच्या मंदिरात घालवले.

इ. स. १८५७ चा स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रयत्न अपयशी झाला. आता भारतीयांनी निराळ्याच मार्गाने प्रयत्न सुरू केले. लोकजागृती करून व त्याच वेळेला सामाजिक सुधारणांचे व्रत घेऊन सुशिक्षित भारतीय वाटचाल करू लागले. यामध्येच पाश्चात्यांच्या परिचयामुळे राष्ट्रवादाचीदेखील जाणीव त्यांना झाली. या दोन प्रवाहांनीच पुढच्या काळात स्वातंत्र्याच्या दिशेने वाटचाल केली. कऱ्हाड शहराचा इतिहास अभ्यासताना या राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या घटनांचेच कधी जोरदार तर कधी क्षीण प्रतिसाद उठलेले आपल्याला दिसतात.

या स्वातंत्र्य चळवळीचे आणखी दोन प्रवाह आहेत. एक क्रांतिमार्गाने हिंसेचा वापर करून इंग्रजांना घालवायचे व दुसरा प्रवाह म्हणजे लोकजागृती करून, लोकमताची ताकद निरनिराळ्या चळवळी, सभा, परिषदा, बहिष्कार इत्यादी मार्गांनी वाढवून परकीय सत्तेवर दडपण आणावयाचे. या दुसऱ्या मार्गाची सुरुवात महाराष्ट्रात पुण्यातील सार्वजनिक सभा, जिल्हा असोसिएशन, शेतकरी सभा अशा संघटनांनी सुरू केली. कऱ्हाडचे गोपाळ वामन फडके हे पाटण येथील १९१८ मधील एका जिल्हा सभेचे स्वागताध्यक्ष होते. त्यांच्या स्वागतपर भाषणात त्यांनी 'इंग्रजांनी जी नवविद्या दिली त्याचाच परिणाम ही सभा आहे' असे सांगितले. अर्थात ही गोष्ट फार पुढची झाली. 'तरुणांची सुधारणा व्हावी आणि सरकार जे कायदे करते ते योग्य की अयोग्य' हे सर्वांना समजावे म्हणून वसईचे गोविंद बाबाजी जोशी यांनी इ. स. १८७० साली कऱ्हाडात 'सभा' स्थापन केली. आणि यामधूनच १३ ऑगस्ट १८७१ रोजी वेदोनारायण गुण्डाचार्य घळसासी यांच्या नेतृत्वाखाली 'कऱ्हाड सार्वजनिक सभेचा' जन्म झाला. या सभेने इ.स. १८७२ मध्ये खानदेश रिलीफ फंड जमवला. 'कऱ्हाडमध्ये शंभर रुपये जमले. पण मामलेदार कचेरीची पैदेखील नाही' असा गमतीदार उल्लेख सापडतो. त्या उलट कऱ्हाड येथील मुन्सफ श्रीपाद अमृत उर्फ बाबासाहेब नागपूरकर हे रात्रीच्या शाळा, स्त्री शिक्षण,

वक्तृत्वोत्तेजक सभा अशा सार्वजनिक कामांत भाग घेऊन लोकांत मिसळत.

इ. स.१८८१ साली पुण्यात लो. टिळकांचा 'केसरी' प्रसिद्ध होऊ लागला. त्याचे पहिले संपादक गोपाळ गणेश आगरकर हे कऱ्हाडच्या भाऊसाहेब भागवतांचे भाचे. या लो. टिळक व आगरकर यांना ११-८-१८८२ रोजी शिक्षा झाली. त्यावेळी ही शिक्षा माफ व्हावी म्हणून सातारा वाई बरोबरच कऱ्हाडहून पण अर्ज गेले होते.

इ. स. १८८३ मध्ये कर्ज मुक्तीचा कायदा झाला. या कायद्याचा फायदा आम जनतेला व्हावा म्हणून प्रचाराची मोठी चळवळ झाली. त्यावेळी या कायद्यापायी सातारा जिल्ह्याच्या वाटणीस आलेल्या पोलन साहेबांची भेट ता. ४-२-१८८३ रोजी दादासाहेब करंदीकर यांनी घेतली व कऱ्हाडचे भास्कर गोपाळ सावरकर हे शेतकऱ्यांची वकिली उत्कृष्टरीत्या करतील असे सांगितले. तर रानड्यांचा दक्षिणेतील शेतकऱ्यांसंबंधीचा इतिहास व अभिप्राय पोलनसाहेबाने वाचावा असा इशारा भागवतांनी दिला.

काँग्रेसचे कऱ्हाडमधील प्रत्यक्ष काम ता. २४ सप्टेंबर १८८८ रोजी चांदशा काजी यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाले. त्यामागील प्रेरणा होती, कृष्णाजी आबाजी गुरुजी यांची. त्यासाठी वर्गणी गोळा करण्याचे काम सुरू झाले. कऱ्हाड तालुक्यातून घरटी प्रत्येकी एक पैसा या दराने चाळीस रुपये वीसशे घरातून जमले. नंतर राष्ट्रीय सभेवर प्रतिनिधी निवडून देण्यासाठी छोट्या काँग्रेसची स्थापना होऊ लागली. १८९७ सालच्या इस्लामपूर येथील अशा छोट्या काँग्रेसचे अध्यक्ष कऱ्हाडचे दत्तोबा नाईक काळे हे होते. त्या अगोदर १८९१ मध्ये इस्लामपूरलाच भरलेल्या काँग्रेसमध्ये कोंडोपंत सहस्त्रबुद्धे, सुपनेकर, अष्टेकर या कऱ्हाडच्या मंडळींनी भाग घेतला. ता. १८-१२-१८९५ च्या पहिल्या पुणे काँग्रेसकरता पैसा व प्रतिनिधी पाठविण्यासाठी सभा झाली. यात कऱ्हाडचे प्रतिनिधी म्हणून शिराळकर, सुपनेकर, भाऊसाहेब भागवत इत्यादी लोक गेले होते. २२ नोव्हेंबर १८९१ रोजी भाऊसाहेब भागवत, विठ्ठलराव सुपनेकर यांनी भरवलेली कऱ्हाड तालुक्याची छोटी काँग्रेस संस्मरणीय होती.

काँग्रेस चालू झाली तरी तिच्या बाहेर वैयक्तिक व सामुदायिक पातळीवर लोकांच्या तक्रारी निवारण्याचे काम चालू होतेच. असे एक उदाहरण म्हणजे साताऱ्याच्या कलेक्टरने कऱ्हाड तालुक्यातील रस्त्याकडील झाडांची मालकी

रयतेची आहे असे ता. १४-१०-१८६५ च्या ठराव क्र. ८२ अन्वये मान्य केले होते. पुढे मात्र सरकाराने ते अमान्य केले. ती झाडे सरकाराचीच, असे ते म्हणू लागले. त्यावेळी कऱ्हाडच्या लोकांनी स्थानिक 'विदूषक' या वर्तमानपत्रातून सरकारालाच नोटीस दिली (१८८७). मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. हा धडा घेऊन निदान ठिकठिकाणी जप्त केलेली गायराने तरी वाचावीत म्हणून कऱ्हाड व इतर तालुक्यामधून हजारो शेतकऱ्यांच्या झुंडी सप्टेंबर १८९१ मध्ये कलेक्टरच्या बंगल्याभोवती जमा झाल्या.

राष्ट्रीय एकात्मतेबरोबर हिंदु-मुसलमान ऐक्याचेही महत्त्व वाढत चालल्याची चिन्हे या काळात दिसून आली. यापूर्वी कित्येक वर्षे कऱ्हाडात सार्वजनिक गणेश उत्सव करण्याची प्रथा रविवार चौकातील भालचंद्र उर्फ बाळू सोनार, कृष्णाप्पा काँट्रॅक्टर आणि शनिवारातील संभू आप्पा तेली, कृष्णा मुंढेकर यांनी सुरू केली होती. पुढे गुरुवारातील बटाणे बंधूंनीपण हा उपक्रम चालू केला. सवाद्य मिरवणुकांमधून इतरत्र हिंदू-मुसलमानांचे दंगे होत असताना कऱ्हाडमध्ये मात्र असे काही घडले नाही. उलट कऱ्हाडला हसन मुजावर, सिलेमान आवटे प्रभृती मुसलमान पुढाऱ्यांनी गणपतीच्या पालख्या आपल्या खांद्यावरून एक साल नव्हे तर लागोपाठ पाच वर्षे अगदी मशिदीवरून नेल्या. हे मुजावर म्हणजे कऱ्हाडचे एक अभिमानास्पद रत्न होते. पैलवान म्हणून त्यांची कीर्ती मोठी होती. इ. स. १८९६ च्या दुष्काळात धान्याचे भाव कडाडले. गोरगरिबांना धान्य स्वस्त मिळावे म्हणून हसन मुजावर प्रभृतींनी कऱ्हाडच्या धान्य व्यापाऱ्यांना चार शेरांऐवजी आठ शेराने जोंधळे विकून गरिबांवर उपकार करण्याची विनंती केली. तलुकचंद गुजर, ज्ञानोबा बटाणे व भागवत भुसार आणि कंपनी यांनी त्यांच्या शब्दाला मान दिला. पण रामदास धस, आशाराम प्रभृती धान्य व्यापाऱ्यांनी अधिक नफ्याच्या आशेने गाड्या भरून धान्य दुसऱ्या बाजारात नेण्याचा घाट घातला. त्यामुळे अशा नफेखोर व्यापाऱ्यांची दुकाने १० नोव्हेंबर रोजी सकाळी वामन खेर, तात्या माने, भाऊ म्होप्रेकर, सिलेमान आवटे, कोंडी काटकर, रामू भापकर इ. सहकाऱ्यांच्या मदतीने वस्तादांनी गोरगरिबांकडून लुटवली. लुटीच्या उत्तेजकांनी मात्र स्वत: साठी एकही दाणा उचलला नाही. नैतिक दृष्टीने हे कृत्य एवढे थोर होते की या गुन्ह्याखाली मुजावरांना पकडणे साहेबाला देखील अशक्य झाले. भोवती

पोलिसांचा फेर व मध्ये झाडाखाली उस्ताद निवांत बसले होते. शेवटी त्यांची समजूत धनी बाबा कुलकर्णी यांनी घातली तेव्हा पोलिसांच्या स्वाधीन झाले. त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांसह सक्तमजुरीची शिक्षा झाली. त्यावेळी तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या लोकमान्यांचे वॉर्डन उस्ताद होते. लोकमान्यांवर त्यांची जबर श्रद्धा होती. वॉर्डन या नात्याने त्यांनी लोकमान्यांची सेवा तर केलीच पण पुढे त्यांच्या कऱ्हाड भेटीत त्यांची जी मिरवणूक निघाली, त्यावेळी आपल्या या उस्तादांनी या लोकनेत्याला खांद्यावरही घेतले.

काँग्रेसचे या काळातील कार्य कऱ्हाडमध्ये पांडुअण्णा शिराळकर, सुपनेकर वकील, भाऊसाहेब भागवत हे करीत असल्याचे दिसते. इ. स. १८९५ च्या पुण्याच्या काँग्रेससाठी पांडुअण्णा शिराळकरांनी कऱ्हाड तालुक्यामधून निधी गोळा केला.

राजकीय व सामाजिक जागृतीचा एक भाग म्हणून लोकमान्य टिळक यांनी अनुक्रमे इ. स. १८९३ व १८९५ मध्ये गणपती व शिवाजी उत्सव सुरू केले. त्यामुळे कऱ्हाडातही उत्सव व मेळे यांनी चांगलाच जोर धरला. 'बाकी कोठेही नाही, पण कऱ्हाडचा उत्सव मात्र पोलिसांना त्रासदायक आहे'. असे ता. २४-९-१८९५ चा 'चित्रगुप्त' म्हणतो.

राष्ट्रीय चळवळीचा एक भाग म्हणून देशात स्वदेशीचे वारे वाहू लागले. वंगभंग चळवळीतील चार सूत्रांपैकी ते एक सूत्रच होते. बाबुराव अंगापूरकर वगैरेंनी कऱ्हाडात प्रत्यक्ष माग घालून स्वदेशी वस्त्रोत्पादन करून प्रत्यक्ष कृती केली. शेतकरी सुखी व स्वावलंबी व्हावा म्हणून तालुकानिहाय शेतकरी सभा स्थापन झाल्या. त्यातील शेवटची सभा इ. स. १९०४ मध्ये कऱ्हाडला स्थापन झाली. ता. २६-१०-१९०५ रोजी हाटकेश्वर मंदिरात आबासाहेब धोपाटे यांनी काकासाहेब बहुलेकरांच्या अध्यक्षतेखाली स्वदेशीव्रत कसे आचरावे यासंबंधीचे मार्गदर्शन केले. इ. स. १९०६ मध्ये कऱ्हाडमध्ये दहा दिवस चालणारे एक प्रदर्शनही भरले होते. ११ फेब्रुवारी १९०६ रोजी खुद्द लोकमान्य टिळकांच्या अध्यक्षतेखाली शिवराम महादेव परांजपे यांचे स्वदेशीवर कोटाखालच्या धर्मशाळेत व्याख्यान झाले. या स्वदेशी चळवळीचाच एक भाग म्हणून कऱ्हाडचेच गुरुनाथ प्रभाकर उर्फ नागूदादा ओगले हे गावोगावी व्याख्याने देत फिरले. या ओगल्यांनीच पुढे कराड स्टेशनजवळ काचसामानाचा

मोठा उद्योग उभा केला. तसेच या स्वदेशीच्याच ऊर्मीतून जून १९०६ मध्ये कऱ्हाडला आगपेट्यांचा कारखाना सुरू झाला.

सनदशीर चळवळीचा वृत्तांत बघत असताना त्याचवेळी क्रांतिकारकांचे कर्तृत्व समजून घेतले पाहिजे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे या दोन्ही चळवळी समांतरच निदान १९२० पर्यंत चालल्या होत्या. वासुदेव बळवंत फडके हे आद्य क्रांतिकारक होते. त्यांचे तीन गट होते. त्यातील सातारा जिल्ह्यातील गटाचे काम कऱ्हाडचे नारायण जोगळेकर हे बघत होते. वासुदेव बळवंतांना एडनला कायमचे पाठविल्यावरही इंग्रज जोगळेकरांच्या मागावर होते. त्यांनी आपले रविवार पेठेतील घर व मुलगी (वालुताई बर्वे,विटे) कऱ्हाडचे वकील पटवर्धन पागे यांच्या स्वाधीन केली होती. तेथे येत असतानाच जोगळेकरांना पकडण्यासाठी इंग्रजांनी सशस्त्र वेढा घातला. पण या पहाऱ्यातूनही भर वेगाने घोड्यावरून जात त्यांनी सुटका करून घेतली. शेवटपर्यंत ते इंग्रजांच्या हाती लागले नाहीत.

यानंतर कऱ्हाडची महत्त्वाची क्रांतिकारक व्यक्ती म्हणजे कृष्णाजी मारुतराव उर्फ भाऊसाहेब कळंबे हे होते. त्या काळात कोल्हापूरचा शिवाजी क्लब, औंध समूह, ढापरे बंधू याचा हनुमान क्लब अशा निरनिराळ्या संघटना ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र उठावाचा प्रयत्न करीत होत्या. त्यात कळंबे गुरुजींचा सातारा क्लबही होता. गुरुजींवर कोल्हापूरच्या शिवाजी क्लबचा मोठा संस्कार होता. भाऊसाहेब कळंबे हे मूळचे प्राथमिक शिक्षक. पुण्यास ट्रेनिंग कॉलेजला असतानाच त्यांनी कॉलेजात बंद पडलेला गणपती उत्सव पुन्हा सुरू केला. इ. स. १९०४ मध्ये परदेशी कपड्यांची होळी केली व पोलिसांचे लक्ष चुकवून आपल्या सहकाऱ्यांना स्वातंत्र्यासाठी जीवनाचा होम करण्याच्या शपथा देऊ लागले. स्वदेशीचे व्रत ते अतिशय काटेकोरपणे पाळीत व इतरांनाही आग्रह धरीत. रॉकेल तेल परदेशी, तर गोडेतेल देशी म्हणून समया लावाव्यात यासाठी तीन दिवसांचा एक संपही त्यांनी घडवून आणला. कळंबे गुरुजी कोरेगावला शिक्षक होते. त्यावेळी क्रांतिकार्याबरोबर धार्मिक व राष्ट्रीय संस्कारदेखील ते विद्यार्थ्यांवर करीत. आपल्या सहकाऱ्यांबरोबर 'भवानी तलवार' नावाचे एक हस्तलिखित ते काढत असत. पुढे इ . स. १९०८ मध्ये शिवाजी क्लबच्या दामू जोशी यांच्याकडून काही शस्त्रे व रसायने घेऊन ते

तासगावला आले. यामधूनच कळंबे यांच्यामागे पोलिसांचा ससेमिरा लागला. इ. स. १९०९ मध्ये नाशिकला कलेक्टर जॅक्सनचा वध झाला. चौकशीत कऱ्हाडचे कळंबे गुरुजी व बाबुराव अंगापूरकर यांचीच नावे पुढे आली. कळंब्यांचा तीन दिवस प्रचंड पोलिसी छळ झाला. यामध्ये त्यांचे सहकारी होते विनायकराव जोशी. हे पुढे विनायक महाराज मसूरकर म्हणून प्रसिद्धीस आले व शुद्धीकरणाच्या क्षेत्रात त्यांनी फार मोठे काम केले. या सर्व प्रकरणात कळंबे मास्तरांची नोकरीपण सुटली. ते कऱ्हाडला बाळनाथबुवांच्या मठात राहू लागले. पण तेथेही पोलिसांमुळे राहता येणे अशक्य झाले. शेवटी ते गोव्यात गेले व त्यांनी तेथे एक राष्ट्रीय शाळा काढली. त्यांना यावेळी कऱ्हाडचे दानशूर पांडुअण्णा शिराळकर यांनी तसेच भाऊसाहेबांचे सहकारी शिक्षक यांनी आपल्या पगारातून गुप्तपणे मदत पाठवली. गोव्यातही कळंबे आपले सहकारी नारायण कृष्ण भावे यांच्या सहकार्याने हिंदुस्थानात शस्त्रे आणण्याचा व महाराष्ट्रात दोन हजार तरुण जमविण्याचा प्रयत्न करीत होते. पण शेवटी त्यांना निराश व्हावे लागले. इ. स. १९०१ ते १९१० या काळात कृष्णाजी मारुती कळंबे, लक्ष्मण हरी पराडकर, बाळकृष्ण भाऊ जोशी, नारायण कृष्ण भावे आणि बाळकृष्ण सावळाराम बुधकर यांना त्यांच्या क्रांतिकार्यामुळेच 'समर्थ पंचायतन' असे संबोधत असत. कऱ्हाडमध्ये क्रांतिकार्य करणारे बाबुराव अंगापूरकर यांना पोलिसी छळातच इ. स. १९११ साली मृत्यू आला तर त्यांचे सहकारी भाऊकाका गरुड, नारायणराव पोतनीस व राघवेंद्र पाच्छापूरकर (पुढील काळात उत्तर प्रदेशात 'बाबा राघवदास' या नावाने प्रसिद्ध झाले) यांचे शिक्षण यामुळेच बंद झाले. आपण केसरी वाचनाने शिवाजी उत्सवास प्रवृत्त झालो असे ताठ मानेने त्यांनी सांगितले त्याची ही शिक्षा होती.

कोल्हापूरच्या सुप्रसिद्ध शिवाजी क्लबचा सभासद दामू दुसाने हा मूळचा कऱ्हाडचाच होता. विसाव्या वर्षी इ. स. १८९९ मध्ये दामूला अकरा महिन्यांची शिक्षा झाली. पुढे नेपाळातून पंजाबात आलेले क्रांतिकारक हणमंतराव कुलकर्णी यांच्याबरोबर तो होता. सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर यांचा पुतण्या नारायण विनायक उर्फ नाना हाही क्रांतिकारक होता. द्रविडांच्या तालमीतील सुप्रसिद्ध क्रांतिकारक चाफेकरबंधूंचा हा

सहकारी. चाफेकर बंधूंना द्रविडांनी दगा दिला म्हणून द्रविडांचा काटा काढण्यात नानाचा सहभाग होता. पुढे इंदुरास तेथील ब्रिटिश रेसिडेंटच्या जीवाशी खेळ खेळण्याचा प्रयत्न केल्यामुळे टेंभूकर आगरकर जन्मठेपेवर गेला व शेवटी विपन्नावस्थेत कऱ्हाडात त्यांचे निधन झाले.

यावेळी कोल्हापूर सोडून कऱ्हाडला यावे लागलेले आप्पासाहेब आळतेकर यांचे नेतृत्व उदयास येत होते. इ. स. १९१४ नंतर राष्ट्रीय सभेचे मद्रासला (चेन्नई) जे अधिवेशन झाले त्याला आप्पासाहेब गेले होते. त्यांच्या पुढाकाराने टिळक पर्स (वर्गणी), होमरुल लीग शाखांच्या स्थापना अशी कामे होत होती. मसूर कऱ्हाड येथील शाखांच्या कामात लक्ष घालणारांत पांडुरंगराव भाटे हे प्रमुख होते. इ. स. १९१७ मध्ये नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांची चाफळ व कऱ्हाड येथे व्याख्याने झाली. त्यावेळी 'स्वराज्याच्या तपश्चर्येत कितीही रंभा मेनका आल्या तरी डळमळू नका किंवा तिलोत्तमांनी भरीला घातले म्हणून सुंदोपसुंदी करू नका' असा उपदेश त्यांनी केला.

त्यावेळी प्रागतिकांचाही गट सातारा जिल्ह्यात आपापल्या परीने काम करीत होताच. अर्थात त्यांचे निराळे असे गट नव्हते. स्वातंत्र्याच्या चळवळीत काम करणारेच इकडे सामाजिक सुधारणांचाही आग्रह धरीत होते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे असेच पूजनीय व्यक्तित्व होते. न्यायमूर्तींच्या निधनानंतर त्यांची पुण्यतिथी दरवर्षी श्रद्धेने साजरी होत होती. इ. स. १९३१ साली सातारा येथे व इ. स. १९३२ साली कऱ्हाडच्या कृष्णाबाई घाटावर कऱ्हाडचे बाबुराव गोखले यांची अविस्मरणीय अशी व्याख्याने झाली. आप्पासाहेब आळतेकरांनी कऱ्हाडच्या सार्वजनिक वाचनालयाला राजकीय विषयावरील ग्रंथ पुरवून त्याच्या अभ्यासाची सोय केली. प्रागतिक पक्षाचे लोक नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचीही पुण्यतिथी होत होती.

याच काळात ब्राह्मणेतर किंवा सत्यशोधक समाजाचेही कार्य सातारा जिल्ह्यात विशेषत: काले येथे होत असे. इ. स. १९२५ साली या विषयावरील बाबुराव गोखले यांनी कऱ्हाड येथे दिलेले व्याख्यान चांगलेच गाजले होते. यामध्ये सत्यशोधक समाजाच्या जवळकरांवर बाबुरावांनी चांगलीच टीका केली. त्याचा हेतू एवढाच होता की गांधीपासून ते जिल्ह्यातील छोट्या काँग्रेसपर्यंत सातारा जिल्ह्याने शेतकऱ्यांच्या व बहुजन समाजाच्या हितासाठी

जपले असता त्याचा विपर्यास जवळकरांकडून होत होता. हेच जवळकर पुढे काँग्रेसमध्ये येऊन कायदेभंगाच्या चळवळीत भागही घेते झाले हे विशेष.

इ. स. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला व नव्या गांधीयुगाला सुरुवात झाली. नोव्हेंबर १९२० मध्ये म. गांधींचा दौरा सातारा जिल्ह्यात झाला. त्यावेळी त्यांच्याबरोबर मौ. महंमदअली व मौ. शौकतअली हेही होते. कऱ्हाडमध्ये त्यांची सभा गोरक्षण संस्थेच्या जागेत झाली. इ. स. १९२१ मध्ये असहकाराची रूपे नाना तऱ्हांनी दिसू लागली. विनायकराव फणसळकरांनी कऱ्हाडास राष्ट्रीय उत्थापनाची प्रभातफेरी सुरू केली. आप्पासाहेब आळतेकर, यशवंतराव देशपांडे, मारुलकर वगैरे वकिलांनी वकिली सोडली. मारुलकर वकीलांनी सेनापती बापटांनी सुरू केलेल्या मुळशी सत्याग्रहात भाग घेतला व शिक्षाही भोगली व त्यांच्याच हस्ते तांबवे या कऱ्हाडजवळील गावात परदेशी कापडाची होळी झाली. कऱ्हाडला इतर गावांबरोबरच मद्यपानविरोधी निदर्शने झाली व कऱ्हाड, मसूर येथे प्राथमिक राष्ट्रीय शाळाही निघाल्या. शिंद्यांसारख्या नगरपरिषदेतील शिपायाने म. गांधींचा कार्यक्रम तरुणांच्या सहकार्याने लोकांत पोचविला. याच काळात सप्टेंबर १९२१ मध्ये कोकणातून आप्पासाहेब आळतेकर यांच्या घरी शाम कवी आले. त्यांनी बरेच दिवस कऱ्हाडातील गल्लीबोळातून व्याख्याने, गाणी यांच्या सहाय्याने इंग्रजांविरुद्ध प्रचार केला. बंदी असताना देखील सभाबंदी मोडून व्याख्यान दिल्यामुळे त्यांना अटक होऊन सहा महिन्यांची शिक्षा झाली. "शाम कवीचे व्याख्यान ऐकू नये" असा व्यवहारविसंगत फतवाही मामलेदाराने काढला.

असहकाराचे वातावरण पुढे चांगलेच तापले. मावळ भागात मुळशी येथे होणारे धरण शेतकऱ्यांच्या जमिनी खाणार होते. त्यासाठी मुळशी सत्याग्रह झाला. कऱ्हाडचे मारुलकर व उंब्रजचे नारायणराव शिराळकर यांनी या सत्याग्रहात भाग घेतला. मुळशीचे धरण, जालियनवाला बाग प्रकरण ही हिंदी राष्ट्राच्या अंत:करणातील शल्ये होती. त्यासाठीच इ. स. १९२१ साली राष्ट्रीय सप्ताह सर्वत्र साजरा व्हावयाचा होता. कऱ्हाडास जाधव, बटाणे, शिराळकर, मौलवी, कोल्हापुरे इत्यादी कार्यकर्त्यांवर कऱ्हाड पाटण तालुक्यात असहकारितेच्या प्रचाराने वातावरण तापवले म्हणून १४४ कलमांतर्गत भाषणबंदी आणल्याने, कऱ्हाडकरांनी तो सप्ताह सैदापूरला कृष्णेच्या वाळवंटात साजरा केला. गणपतराव आळतेकर

व बाबुराव गोखले यांनी या सभा आपल्या वक्तृत्वाने चांगल्याच गाजवल्या. स्वदेशी चळवळीचा एक भाग म्हणून खादी वापराची चळवळ सुरू झाली. कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये सूतकताईचे शिक्षण सुरू झाले. खादीचा प्रसार एवढा सुरू झाला की दसऱ्याच्या दिवशी कऱ्हाडला चार हजार हिंदू-मुसलमानांनी खादी पोशाखात सीमोल्लंघन केले. यामध्ये कऱ्हाडातील हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याचेही हृद्य दर्शन झाले. ही असहकाराची चळवळ दबून जावी म्हणून सरकार अनेक खटले उभे करीत होते. त्यात कऱ्हाड तालुक्यातील अनंत हरी बेळगावकर यांचे इनाम जप्तीत निघाले. का? तर हे बेळगावकर साराबंदीचा उपदेश करीत फिरत होते म्हणून.

इ.स.१९२१ मधील ही गोष्ट. १९२१ नंतर प्रतियोगी सहकारतेचे युग सुरू झाले. कायदेमंडळ वगैरेंच्या निवडणुका लढवायच्या नाहीत. निवडून जायचे नाही. ही झाली असहकारिता, पण काँग्रेसमधील एका गटाचे म्हणणे असे होते की, आपण निवडून जाऊ व तेथे सरकारला अडचणीत आणू.

इ. स. १९२३ मध्ये काकासाहेब बहुलेकरांच्या सहकार्याने कऱ्हाड येथे प्रागतिकांची परिषद सर चुनीलाल मेहता यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पडली.

इ. स. १९२६ च्या निवडणुकीत प्रति सहकारवादी लक्ष्मण महादेव उर्फ नानासाहेब देशपांडे हे निवडून आले. त्यांनी येणाऱ्या तुकडेपट्टी बिलाबद्दल सर्व जिल्हाभर हिंडून लोकमत जाणून घेतले आणि त्याचा उपयोग कायदेमंडळातील आपल्या कामासाठी करून घेतला. नानासाहेब इ. स. १९२६ ते १९३० या काळात या कायदेमंडळाचे सभासद होते. मुंबईत सत्याग्रही स्त्रियांवर लाठीहल्ला झाला, त्याच्या निषेधार्थ इ. स. १९३० मध्ये त्यांनी राजीनामा दिला. नानासाहेबांवर लोकमान्यांच्या राष्ट्रीय बाण्याचा फार मोठा प्रभाव पडला होता. इ. स. १९२७ मध्ये पांडुरंगराव मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली सारावाढीविरुद्ध कऱ्हाड तालुका शेतकरी परिषद झाली.

महात्मा गांधींनी कऱ्हाडला इ. स. १९२७ रोजी खादी संघटना प्रचारासाठी दुसरी भेट दिली. कऱ्हाड नगरपरिषदेने त्यांना मानपत्र दिले. कऱ्हाडातून खादी संघासाठी सहा हजार सभासद व ५०१ रुपयांची थैली मिळाली. हाराचा लिलाव करुन ४१ रुपये मिळाले. सभा कृष्णाबाईच्या वाळवंटात झाली.

त्यासाठी भव्य मंडप घातला होता. स्वयंसेवक दल यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली काम करीत होते. म. गांधींच्या हस्ते खादी भांडार उघडण्यात येऊन मांगवाड्यात विठ्ठल मंदिराची स्थापना झाली. पांडुअण्णा शिराळकरांनी हरिजन मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून हे मंदिर बांधले.

यथावकाश येणार म्हणून गाजलेले ते तुकडेपट्टीचे विधेयक इ. स. १९२७ साली आले. जमिनीच्या एकत्रीकरणाच्या उद्देशाने आणलेल्या या कायद्यामुळे गरीब शेतकऱ्यांचे नुकसान होत होते. विधेयक मंजूर होऊ नये म्हणून नानासाहेब देशपांड्यांनी जीवाचे रान केले. त्यांना बाबुराव गोखले, पांडुआण्णा शिराळकर, गणपतराव आळतेकर यांनी मदत केली. कऱ्हाड, शेणोली, कोळे, चरेगाव, उंब्रज अशा गावोगावी निषेध सभा होऊ लागल्या.

यानंतर कोयना धरणाचाही प्रश्न उपस्थित झाला. या धरणामुळे अनेक गावे उठणार होती. त्यामध्ये शेतकऱ्यांची बाजू घेऊन अनेक नेते सरकार विरुद्ध उभे राहिले. त्यामध्ये कऱ्हाडचे पांडुअण्णा शिराळकर, नानासाहेब देशपांडे, गणपतराव आळतेकर, आबासाहेब धोपाटे, बाबुराव गोखले व उंब्रजचे बापूसाहेब आगाशे ही मंडळी होती. ता. १३ मे १९२८ रोजी देवघर नावाच्या खेड्यात या नेत्यांनी सभा घेतली. धरण व्हावे की नाही हा प्रश्न आता नाही. पण विस्थापितांचे प्रश्न आजही आहेत आणि त्याकाळी या नेत्यांनी जी बाजू मांडली तशीच बाजू आजचे नेतेही मांडत असतात. फक्त त्यावेळी सरकार राजकीय होते तर आज आपले म्हणवणारे देशी सरकार आहे.

ता. ९ मे १९२७ रोजी काँग्रेसचे अध्यक्ष श्रीनिवास अय्यंगार व म. गांधी हे कऱ्हाडला येऊन गेले. भारताला नव्या सुधारणा देण्याच्या मिषाने १९२८ मध्ये सायमन कमिशन आले. या कमिशनवर राष्ट्रसभेने देशभर बहिष्कार घातला. त्यासाठी जे लोकजागरण झाले, त्यामध्ये नानासाहेब देशपांडे होते. तसेच १९२८ साली लाठी हल्ल्यात थोर देशभक्त लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला. त्याबद्दलही कऱ्हाडमध्ये निषेध सभा झाली.

१९२८ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांचे नेतृत्वाखाली बार्डोली सत्याग्रह झाला. कऱ्हाडास नानासाहेब देशपांडे, गणपतराव आळतेकर व बाबुराव गोखले आणि त्याहीपेक्षा वल्लभभाईंचे काम प्रत्यक्ष पाहून आलेले आप्पासाहेब आळतेकर यांनी शेतकऱ्यांवर स्वावलंबनाचे महत्त्व ठसविले.

१९२८ मध्ये कऱ्हाड काँग्रेस कमिटीची स्थापना झाली. याच वर्षी पांडुअण्णा शिराळकरांनी पुण्यात 'सार्वजनिक कार्यकर्त्यांचा शिक्षण वर्ग' सुरू केला. त्याच्या कार्यवाहीचे काम त्यांनी दा. न. शिखरे यांचेवर सोपविले. अध्यापक आपले काम विनामूल्य करीत. पांडुअण्णांचे औदार्यही भरपूर होते. पण शिक्षण संपल्यावर जन्मभर पोटासाठी व्यवसाय मिळवून देण्याची सोय नसल्यामुळे हा उपक्रम चालू शकला नाही.

१९२९ साली काँग्रेसने पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर केला. त्यावेळी १९३० च्या २६ जानेवारी प्रतिज्ञावाचन करण्याची तयारी कऱ्हाडहून बाबुराव गोखले यांनी दाखवली. पुढे मात्र शांतिसंग्रामाचे पर्व संपूर्ण जिल्ह्यात सुरू झाले. कायदेभंगाचे सत्र पुन्हा सुरू झाले. त्याच्या प्रचारासाठी ठाण्याचे दामले नावाचे नेते कऱ्हाड व आसपासच्या गावात आले. स्वयंसेवक व आर्थिक मदत मिळवण्यासाठी जिल्ह्याचे निरनिराळे भाग निरनिराळ्या व्यक्तींना वाटून देण्यात आले. म. कृ. आठल्ये व रायरीकर यांच्याकडे कऱ्हाड तालुका आला. तालुक्यात उंब्रजचे नारायणराव शिराळकर, केशवराव फडके, बाबुराव जोशी, चरेगावला बाळाराम शेठ गुजर, शंकरराव तेली, मसूर भागात बी. जी. जगदाळे, पाशूसाहेब पीरजादे हे होते. या शिवाय राघुआण्णा धोपाटे व बळवंतराव जाधव हे जीवाचे रान करीत होते. जिल्ह्यातील प्रत्येक गावातून निदान एकतरी या शांतिसंग्रामात यावा असे प्रयत्न झाले. कऱ्हाडमध्ये गणपतराव बटाणे व हरिभाऊ लाड यांच्या प्रयत्नाने कायदेभंगाच्या संघर्षासाठी ४५० स्वयंसेवक नोंदले गेले. वि. वा. उर्फ बापू नेने हा टिळक हायस्कूलचा विद्यार्थी 'बालसत्याग्रही' म्हणून सर्वत्र चमकू लागला. मिठाच्या सत्याग्रहासाठी कोकणात जाताना कऱ्हाडवरून जावे लागे. त्यामुळे कऱ्हाड ही स्वयंसेवकांची उतारपेठच झाली होती. कऱ्हाड मधील बटाणे व जाधव यांच्या मोटारी स्वयंसेवकांच्या मालकीच्या झाल्या होत्या. शांतिसंग्रामाच्या जादूने जनता भारून गेल्याकारणाने मे महिन्याच्या आरंभी कऱ्हाडमध्ये लाठीबंद प्रभातफेऱ्या सुरू झाल्या. त्यामध्ये मुले मुली मोठ्या उत्साहाने पहाटे उठून भाग घेत असत. कृष्णाघाटावर सभा नाही व तिला हजारो श्रोते नाहीत अशी एकही संध्याकाळ जाईनाशी झाली. बाबुराव गोखले व गुलाबभाई बागवान ही जोडी अनेक उत्सव उरुसातून कायदेभंगाचा प्रचार करीत फिरू लागली. या चळवळीचा एक भाग म्हणून

शिक्षण संस्थांवर राष्ट्रीय निशाण लावण्याचा कार्यक्रम सुरू झाला. कऱ्हाडमध्ये टिळक हायस्कूलवर असे निशाण लावण्यात आले. राष्ट्रीय निशाण हा लोकांचा मानबिंदूच झाला होता. अशावेळी सरकारदेखील या अभिमानविषयावर प्रहार करू बघे. त्यामुळे लोकही तेवढीच तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करीत. मसूर येथे एकदा पोलीस बाजारपेठेतील राष्ट्रीय निशाण काढायला गेले. त्यावेळी त्यांना एवढा प्रतिकार झाला की लोकांमधील दत्तू महाजन यांना लाथांचा मारा बसला. सत्तावीस माणसांना कैद झाली. तेव्हा कोठे त्यांना हे राष्ट्रीय निशाण काढता आले.

या गडबडीत १३ जुलै १९३० रोजी मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर फ्रेडरिक साईक्स यांचे आगमन कऱ्हाडला झाले. त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे ता. १२ जुलैला बहिष्कारासाठी कऱ्हाड येथे भरलेली सभा तत्कालीन सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागातून सुमारे ३५,००० लोक जमलेल्या स्त्री-पुरुषांची होती. कऱ्हाडला तेथील नगरपालिकेत त्यांना मानपत्र देण्याचा कार्यक्रम होता. समारंभासाठी इकडून तिकडून कसेतरी लोक गोळा करण्यात आले. निमंत्रितांपैकी अवघे एक पंचमांश लोक हजर राहिले. खुद्द कार्यक्रम चालू असतानाच गोपाळराव बदामी, राघुअण्णा लिमये, सीतारामपंत गरूड वगैरे स्वयंसेवकांनी गुप्तपणे प्रवेश केला आणि काळी निशाणे दाखवून म. गांधींच्या नावाचा प्रचंड जयजयकार केला. कऱ्हाडमधील कोयनेचा जुना पूल ते कृष्णेवरील फरशीपर्यंत (त्यावेळी कृष्णेवर पूल नव्हता.) समारंभ संपवून व नगराध्यक्षांकडील खाना घेऊन गव्हर्नर ज्या मार्गाने गेले त्या मार्गावर लोकांनी काळी निशाणे दाखवून व म. गांधींच्या जय-जयकारांनी आकाश दुमदुमून सोडले. यावेळी नेतृत्व होते राघुअण्णा धोपाटे यांचे (म्हणूनच ते 'सेनापती' म्हणून ओळखले जात) व काले आणि मसूर येथील मंडळींचा प्रमुख सहभाग होता. सातारा जिल्ह्यातील पस्तीस हजार लोक या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांच्या जेवण्याखाण्याची व्यवस्था भाऊकाका गरुड, नारायणराव पोतनीस, बाबुराव गोखले यांनी केली होती.

१९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहासारखेच जंगल सत्याग्रहही झाले. त्यावेळी झालेल्या बिळाशीचा सत्याग्रह हा 'छोटा जालियनवाला बाग' म्हणून गाजला. सत्याग्रहाच्या वेळी पोलिसांनी लोकांवर मोठ्या प्रमाणावर हल्ला केला.

झेंड्याच्या संरक्षणार्थ साठ स्वयंसेवक व वीस स्त्रिया धावल्या. त्यांना चांगला मार बसला. नवाकाळच्या वृत्ताप्रमाणे बेचाळीस जखमी, चार बेपत्ता तर बुटाचा मार लागल्याची तक्रार पन्नास स्त्रियांकडून आली. मंगरुळ येथे सात अत्यवस्थ तर पंचवीसतीस जखमी व रेळे येथे एकतीस जणांना जखमा झाल्या. या दु:खित बांधवांच्या समाचाराला साताऱ्याप्रमाणेच कऱ्हाडहून डॉ. कोल्हापुरे, डॉ. गुणे, डॉ. गोगटे, दिवेकर वैद्य प्रभृती डॉक्टरांच्या बरोबर राघूअण्णा लिमये व इतर चार स्वयंसेवक आडवळणांनी गेले. कऱ्हाड येथे आप्पासाहेब आळतेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन बिळाशी अत्याचाराची चौकशी करण्यासाठी न. चिं. केळकर, रा. ब. काळे, सरदार मुतालिक, गुंजाळ व रामराव शिंदे यांची कमेटी नेमावी असा ठराव झाला.

१३ जानेवारी १९३१ रोजी कऱ्हाडमध्ये हुतात्मादिन पाळण्यात आला. त्यादिवशी पोलीस गराड्यात पाच पाच सभा झाल्या. पोलिसांची पळता भुई थोडी झाली.२३ जून १९३१ रोजी 'राष्ट्राची शक्ती जनता' या विषयावर पं. मदनमोहन मालवीय यांचे कोटाखाली स्फूर्तिदायक व्याख्यान झाले.

ता. १६ डिसेंबर १९३१ रोजी पं. जवाहरलाल नेहरू रेल्वेने सातारा जिल्ह्यातून गेले. त्यांच्या दर्शनासाठी ऐन रात्रीदेखील लोक स्टेशनवर थांबले होते. त्या पाठोपाठ ता. २५ डिसेंबर रोजी अपरात्रीच देशगौरव सुभाषचंद्र बोस हे ही कऱ्हाडला आले व त्यांची सभापण झाली.

ता. ७ जानेवारी १९३२ रोजी कऱ्हाडचे आप्पासाहेब व गणपतराव आळतेकर पितापुत्र, पांडुअण्णा शिराळकर, भय्याशास्त्री वाटवे व मसूरचे विनायक महाराज यांना इतर नेत्यांबरोबर कैद करून येरवड्यास हलविण्यात आले. काँग्रेसशी संबंधित अशा सगळ्या संस्था, शाळा एवढेच नव्हे तर मसूरचा ब्रह्मचर्याश्रमही बेकायदा ठरविण्यात आले. सरकारने बजावलेल्या हजेरीच्या नोटीसा मोडून हरिभाऊ लाड, बाबुराव गोखले यांनी तुरुंगवास पत्करला. स्वातंत्र्य संग्रामाची भित्तिपत्रके (बुलेटिन्स) लावल्याबद्दल यशवंतराव चव्हाण, पांडुतात्या डोईफोडे इत्यादी तरुणांना ता. २४ जानेवारीस तुरुंगात डांबण्यात आले.

यातूनच काँग्रेस कमिट्यांऐवजी 'सर्वाधिकारी–डिक्टेटर' नेमण्याची पद्धत सुरु झाली. अशा सर्वाधिकाऱ्यांमध्ये तांबव्याच्या कासाबाई परटीण व मसूरच्या

पार्वतीबाई काटकर यापण होत्या. त्यातही विशेष म्हणजे पार्वतीबाई काटकर सर्वाधिकारी झाल्या, त्यावेळी त्या अवघडलेल्या अवस्थेत होत्या आणि अर्थातच त्या तुरुंगात प्रसूत झाल्या. कऱ्हाडचे सर्वाधिकारी लक्ष्मण गणेश जोशी हे २९ सप्टेंबर १९३२ रोजी येरवड्याच्या तुरुंगात तर कऱ्हाडचे बाबुराव गोपाळ कुष्टे हे तुरुंगातून सुटल्यावर स्वर्गवासी झाले. तुरुंगातील हालअपेष्टा हे एक कारण त्याला नक्कीच होते.

ता. १४ मे १९३५ पासून दोन दिवस काँग्रेस अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांचा दौरा सातारा जिल्ह्यात झाला. त्यात कऱ्हाडला त्यांचे भव्य स्वागत व मोठी जाहीर सभा झाली.

ता. २८ डिसेंबर १९३५ रोजी काँग्रेसचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. त्यावेळी प्रत्येक जिल्ह्याचा राजकीय इतिहास लिहिण्याची कल्पना निघाली. त्यावेळी कऱ्हाडचे सुप्रसिद्ध समाजसेवक साहित्यिक पु. पां. उर्फ बाबुराव गोखले यांनी सातारा जिल्ह्याचा इतिहास सांगणारा 'जागृत सातारा' हा बहुमोल ग्रंथ लिहिला. विशेष म्हणजे या योजनेखाली संपूर्ण भारतात फक्त याच जिल्ह्यात असे एकमेव पुस्तक प्रकाशित झाले.

१९३६ च्या अखेरीस कॉ. मानवेंद्रनाथ रॉय कऱ्हाडला निवडणूक प्रचारासाठी येऊन गेले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना इ. स. १९२५ साली झाली. परंतु कऱ्हाडमध्ये संघाचे काम साताऱ्याच्या करंदीकर यांच्याकडून इ. स. १९२८ साली सुरू झाले. इ. स. १९३७ साली संघ संस्थापक डॉ. हेडगेवार यांची भेट कऱ्हाडला झाली होती. ता. १४ मे १९३७ रोजी कऱ्हाड तालुका शेतकरी परिषद इंदोली येथे भरली होती. अध्यक्ष लक्ष्मणराव कोळपे पाटील यांनी शेतकऱ्यांना स्वातंत्र्यासाठी समर्पणाची तयारी ठेवावी असा संदेश दिला.

इ. स. १९३७ मधील निवडणुकीच्या प्रचारासाठी पं. जवाहरलाल नेहरू हे दुसऱ्यांदा कऱ्हाडला आले. त्यांचे जंगी स्वागत कमानी उभारून झाले. व्याख्यान स्वामीच्या बागेत झाले. त्यावेळी काही अडचणींमुळे त्यांना मोटार उपलब्ध होऊ शकली नाही. पण काँग्रेसविरोधी मुस्लीम लीगचे नगराध्यक्ष खानसाहेब अहमद कासमसाहेब कच्छी यांच्याकडे यशवंतराव चव्हाण यांनी शब्द टाकताच त्यांनी आपली गाडी तर दिलीच पण 'आधी कल्पना असती तर पंडितजींच्या

स्वागतासाठी नवीनच मोटार आणली असती' असे उद्गार काढले. पंडितजींचा सत्कार अर्थातच नगराध्यक्ष या नात्याने खानसाहेबांनी केला. सभा सकाळी आठ वाजता असूनही लाखावर समाज स्वामीची बाग व कृष्णेच्या वाळवंटात पसरला होता. कऱ्हाडात प्रथमच या सभेच्या निमित्ताने ध्वनिक्षेपकाचा उपयोग केला गेला.

सातारा जिल्ह्यात इ. स. १९३७ ते १९५५ पर्यंत लोकसेवा संघाचा ग्रामीण जनतेस स्वावलंबनाचे दृष्टीने समर्थ करण्याच्या उद्देशाने एक अपूर्व प्रयोग झाला. ही कल्पना चाफळचे विष्णू आण्णा देशपांडे व कऱ्हाडचे पांडुअण्णा शिराळकर यांची. इ. स. १९३६ साली पांडुअण्णा शिराळकर यांनी एकट्याने तीस हजार रुपयांची देणगी दिली आणि त्याच साली भाऊसाहेब सोमणांच्या साठी समारंभावेळी लोकांनी त्यांना दिलेली पाच हजार रुपयांची थैली, त्यात सोमणांनी स्वत:चे पाच हजार रुपये घातले. त्यापूर्वीचे दादासाहेब करंदीकरांचे एक हजार होतेच. या आधारे ता. २१ जून १९३७ रोजी श्री शिवराज्याभिषेक दिनी हा लोकसेवा संघाचा उपक्रम कऱ्हाडचे लोकसेवक पुरुषोत्तम पांडुरंग उर्फ बाबुराव गोखले यांनी सर्व जबाबदारी घेऊन सुरू केला. पुढे भय्याशास्त्री वाटवे व नंतर दहिवडीचे धोंडीराम नारायण काशीद हे त्यांना येऊन मिळाले. सातारा जिल्ह्यातील सुमारे तीनशे गावांना या कार्यकर्त्यांनी समक्ष भेटी दिल्या. गावांच्या विविध स्वरूपाच्या अडचणी समजावून घेतल्या व त्या सर्वांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न सरकारी दरबारी केला. त्यानंतर अनेक गावांत लोकसेवा संघाचे विधायक काम सुरू झाले.

नंतर दुसऱ्या वर्षी म्हणजे इ. स. १९३८ मध्ये गोखले व काशीद हे स्वत: चिमणगाव या कोरेगाव तालुक्यातील गावी चार महिने जाऊन राहिले. या काळात या दोघांनी या गावाचे सर्व बाजूंनी सेवा व निरीक्षण केले. गावाची संपूर्ण आर्थिक माहिती तपशीलवार गोळा केली. इतर अनेक गावांची पहाणी केल्यावर 'राज्य इंग्रजांचे, कारभार काँग्रेसचा पण अंमल गुंडांचा' असा प्रकार सर्वत्र दिसून आला. त्यानंतर जळालेल्या परळी खोऱ्यातील वेणेगावच्या स्थिरस्थावरतेसाठी प्रयत्न केले. गोखले यांनी साठ गावांतील कर्जबाजारीपणाचा अभ्यास केला व तो प्रसिद्धही केला. लोकसेवा संघाच्या कामाची प्रशंसा अनेक वृत्तपत्रांनी केली. संघाला संशोधक संस्थेचा दर्जा असल्याचे मान्य

केले. अशा तऱ्हेचे काम इ. स. १९५५ पर्यंत चालू होते.

इ. स. १९३८ मध्ये मसूरला जिल्हा स्वदेशी प्रदर्शन व मातंग परिषद भरली. तर चाफळ येथे बाबुराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली पाटण तालुका शेतकरी परिषद भरली. इ. स. १९३८ मध्ये कुळकायद्याने संतप्त होऊन जमीनदारांचा मोर्चा कऱ्हाडला शिराळकरांच्या घरावर आला. त्याउलट कृष्णा घाटावर आमदार आत्माराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुळकायद्यास पाठिंबा देणारी सभाही झाली.

म. गांधींनी सुरू केलेल्या युद्ध विरोधी वैयक्तिक सत्याग्रहात (१९४१) वालचंद गांधी, गौरीहर सिंहासने यांनी भाग घेतला. या सुमारास सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीची अधिकारसूत्रे यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आली.

कऱ्हाडमध्ये हिंदुमहासभेचे कार्यही चालू होते. इ. स. १९२४ च्या बेळगाव काँग्रेसच्यावेळीच हिंदुमहासभेचे अधिवेशन व गोरक्षण परिषद भरली होती. या अधिवेशनास कऱ्हाडहून गणपतराव बटाणे, पु. पां. गोखले, वि. ना. फणसळकर हे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. इ.स. १९३८ मध्ये हैद्राबादच्या निजामी राजवटीविरुद्ध हिंदुमहासभेने सत्याग्रहाचा कार्यक्रम केला. या सत्याग्रहात कऱ्हाडच्या द. पां. आफळे, पूर्णप्रज्ञ घळसासी, व वासुदेवशास्त्री घळसासी यांनी भाग घेतला. १९४० मध्ये कऱ्हाडात जिल्हा हिंदुसभा संमेलनात शि. ल. करंदीकर यांचे भाषण झाले. तर इ. स. १९४१ मध्ये बिहारमध्ये भागलपूर येथे स्वा. सावरकरांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन होणार होते. त्याला सरकारने बंदी घातल्यामुळे जो सत्याग्रह झाला त्यात कऱ्हाडच्या शं. बा. जोशी, के. वा. जोशी यांनी भाग घेतला होता. कऱ्हाडमध्ये भाऊकाका गरुड, गो. भि. बदामी, शं. बा. जोशी, विष्णुअण्णा जोशी, के. वा. जोशी, विनायकराव फणसळकर, उ. द. कुलकर्णी, आण्णासाहेब पटवर्धन, नाना भावे, गणपतराव फडके, डॉ. वा. रा. जोशी, कृ. म. आठल्ये हे हिंदुमहासभेचे कार्य करीत. ता. २-१०-१९४० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कऱ्हाडला भेट दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंताच्या कोटातील भवानी शाखेवरील एका कार्यक्रमासाठी पाहुणे म्हणून ते आले होते.

## स्वातंत्र्याचा शेवटचा अभूतपूर्व लढा

इ. स. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरु झाले होते . राष्ट्रीय सभेतील लढाऊ गटाचे नेते सुभाषचंद्र बोस यांनी जर्मनी–जपानमध्ये जाऊन भारतीय स्वातंत्र्ययुद्ध आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन त्याला सशस्त्र युद्धाचे स्वरूप दिले. त्याची प्रतिक्रिया देशातील राष्ट्रीय सभेवर देखील झाली. मुंबईस भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस समितीने ८ ऑगस्ट १९४२ रोजी 'चले जाव' चा ठराव मंजूर केला. महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू वगैरे सर्वच प्रथम दर्जाच्या नेत्यांनी ब्रिटिशांविरुद्ध अतिशय जहाल भूमिका घेतली. हिंसा, अहिंसेचा विचार बाजूला झाला. अगदी बंड करण्यासदेखील त्यांनी सांगितले. त्याचा परिणाम म्हणून काँग्रेसच्या या वरिष्ठ नेत्यांना ताबडतोब अटक करण्यात आली. ९ ऑगस्टला सातारा जिल्ह्यातील चौदा प्रमुख पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. त्यात कऱ्हाडचे पांडुअण्णा शिराळकर, गणपतराव आळतेकर, राघूअण्णा लिमये हेही होते. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीस यशवंतराव चव्हाण, काशिनाथ देशमुख, विठ्ठलराव पागे, गौरीहर सिंहासने आदी नेते हजर होते. या नेत्यांनी गुप्त बैठक घेऊन 'करू अथवा मरू' या आदेशाप्रमाणे कृती करावयाचे ठरवले.

यशवंतराव चव्हाण व हे नेते गुप्तपणे जिल्ह्यात परतले. यशवंतराव इंदोलीमार्गे कऱ्हाडला आले व लोकमत तयार करण्यासाठी प्रथम जाहीर सभा घ्यावयाचे त्यांनी ठरवले. त्यावेळी सातारा जिल्ह्यात एकूण १६७ मिरवणूका व १४८ सभा झाल्या. त्यापैकी कऱ्हाड तालुक्यात ६१ मिरवणुका व ५० सभा झाल्या. नंतर सर्वत्र मोर्चांची तयारी सुरू झाली. कऱ्हाडला ता. २४–०८–१९४२ रोजी म्हणजे अवघ्या पंधरा दिवसांत कऱ्हाड मामलेदार कचेरीवर मोर्चा नेण्यात आला. त्या अगोदर म्हणजे ९ ऑगस्टला सायंकाळी बाबुराव गोखले यांचे भाषण झाले व त्यांना अटक झाली. २४ तारखेला दोन गटांचा कार्यक्रम ठरवण्यात आला. पहिल्या गटाने न्यायालयासमोर निदर्शने करावयाची व दुसऱ्याने मामलेदार (तहसिलदार) कचेरीवर मोर्चाने जाऊन तेथे तिरंगा झेंडा लावायचा असे ठरले. पहिल्या गटाने दिनकरराव निकम, भिकोबा साळुंखे व गणपतराव बटाणे यांच्या नेतृत्वाखाली न्यायालयासमोर निदर्शने केली. त्यात वकिलांनी वकिली सोडावी, सरकारी नोकरांनी नोकऱ्या सोडाव्यात अशा

घोषणा दिल्या. याच दिवशी दुसऱ्या गटाने बाळकृष्ण आनंदराव पाटील उर्फ दादा उंडाळकरांच्या नेतृत्वाखाली मामलेदार कचेरीवर २५०० लोकांचा मोर्चा नेला. पोलिसांनी तो अडवला. त्यानंतर तेथे सभा झाली. दादांना अटक झाली. लोक प्रक्षुब्ध झाले. दादांनी सर्वांना शांत राहण्यास सांगितले. लढा अहिंसक मार्गाने चालावा असे आवाहन केले. तरीही लोक कचेरीत घुसण्याचा प्रयत्न करीत होते. यावेळीही पांडुरंग देशमुख यांच्या हातावर संगिनीचा वार बसला. नंतर कृष्णाबाई घाटावर मोठी सभा झाली.

वातावरण तापू लागले. यशवंतराव चव्हाण, गौरीहर सिंहासने या कऱ्हाडच्या नेत्यांना पकडून देण्यासाठी हजार रुपयांचे बक्षीस लागले. यशवंतराव चव्हाण हाती लागावेत म्हणून त्यांच्या गृहलक्ष्मींना सौ. वेणूताईंनादेखील सरकारने तुरूंगवास घडविला. प्रांतातील विध्वंसक चळवळीचे प्रमुख अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे हे होते. कऱ्हाडचे सदुभाऊ पेंढारकर हे त्यांच्याशी जिल्ह्यातर्फे संपर्क ठेवत. नंतर चळवळ चालविण्यासाठी निरनिराळ्या भागातील गट स्थापून त्यांच्यावर त्या त्या भागाची जबाबदारी सोपवण्यात आली. सबंध जिल्ह्यासाठी एकूण ९ गट तयार करण्यात आले. त्यात कऱ्हाड भागासाठी यशवंतराव चव्हाण गट ७५ लोकांचा व काशिनाथ देशमुख गट ३० जणांचा होता. कऱ्हाडच्या या गटाने कऱ्हाड चावडी, उंब्रज, मल्हारपेठ येथील डाकबंगले, कऱ्हाडचे टिळक व महाराष्ट्र हायस्कूल यांना आगी लावल्या. सदाशिवराव पेंढारकरांच्या पुढाकाराने शिरवडे स्टेशन जाळले. या कामी त्यांना ७ वर्षांची शिक्षा झाली. ती भोगत असतानाच त्यांचे कॅन्सरच्या विकाराने निधन झाले. ओगलेवाडी-विटा रस्त्यावरील पूल उडवून देण्यात आला. सुरली घाटात टपाल मोटार लुटली. ७ जून १९४५ रोजी नाना पाटील गटाने बिचूद-शेणोली दरम्यान पगाराची आगगाडी लुटून वीस हजार रुपये नेले.

डिसेंबर १९४२ पर्यंत यशवंतराव चव्हाण जिल्ह्यातील चळवळीचे काम पहात असत. जानेवारी १९४३ मध्ये प्रमुख असे नेते पकडले गेले. त्यानंतर जबाबदारी कऱ्हाडचे धन्वंतरी म्हणजे लक्ष्मण गणेश कासेगावकर यांच्याकडे आली. याच सुमारास माधवराव जाधव यांनी कऱ्हाड शहर पोस्टाची थैली लुटली व पोलीस पाठलागाची पर्वा न करता भुईकोट तटावरून ३५ फुटांची उडी मारुन ते पसार झाले. इ. स. १९४४ नंतर जानेवारीत खोडशी-मुंढे येथील तारा तोडल्या गेल्या. रामचंद्र हरी पवार यांची बंदूक लांबवली गेली. व २६

जानेवारीची पत्रके चिकटवत असताना माधवराव जाधव पकडले गेले. या काळात सरकार अगदी त्रस्त होऊन गेले होते. कऱ्हाडला तर लष्करच आणले गेले. सामुदायिक दंडही बसवण्यात आला. १४ जून १९४४ रोजी इतर कार्यकर्त्यांबरोबरच माधवराव जाधव यांनी आपली कऱ्हाडच्या तुरुंगातून सुटका करून घेतली.

पुढे क्रांतिकारकांनी प्रतिसरकारची भूमिका स्वीकारली. या नात्याने न्यायदान, गुन्हे करणाऱ्यांना शिक्षा, संरक्षण ही कामे पण सुरू केली. सवादे येथील न्यायदान चांगलेच गाजले. तर तुळसण येथील चोरी पकडून ज्याच्या वस्तू त्यास दिल्या गेल्या. २६ डिसेंबर १९४४ रोजी कऱ्हाड मुख्य पोलीस ठाण्यातूनच पोलिसांच्या साहाय्यानेच बंदूक काढली. त्यात तीन पोलीस, महिंद मास्तर व इतर ६-७ जणांवर खटला घालूनही सर्व निर्दोष सुटले. जिल्ह्याचे एक नेते रामानंद स्वामी सभा व मिरवणुकाद्वारे अखंड प्रचार करीत होते. अतिश्रमाने ते आजारी पडले. गोंदी, ता. कऱ्हाड येथे त्यांना अटक झाली. पुढे अटकेतच त्यांना कऱ्हाडला व औंधला आणण्यात आले. कऱ्हाडला भडकमकर दवाखान्यात डॉ. श्री. म. कुलकर्णी यांच्याकडे रुग्ण म्हणून ते राहिले तर औंधला आप्पासाहेब पंत यांनी त्यांना संभाळले. १२ जून १९४६ रोजी किसन न्हावी कऱ्हाडकर यास सरकारचा खबऱ्या म्हणून पत्र्या मारल्या. (पायाच्या तळव्यावर काठीने मारणे). यापुढील काळातही सरकारी बगलबच्यांना शिक्षा देणे, रायफली, बंदुका हिसकावून घेणे, दारुच्या भट्ट्या उद्ध्वस्त करणे अशी कामे चालू होती. नडशी या गावी हतुतूच्या (कब्बड्डी) सामन्यासाठी मुले जमली होती. त्याला हजारेक पोलिसांनी वेढा घातला. परंतु या वेढ्यातून माधवराव जाधव, धन्वंतरी हे सुरक्षितपणे सुटून गेले. तेथून या मंडळींनी तळबीड येथे सभा घेतली. तेथे वाचनालय व सेवादलाची शाखा सुरू केली. पुढे २६ ऑगस्ट १९४६ रोजी माधवराव जाधव व २ सप्टेंबरला धन्वंतरी पकडले गेले. नंतर दीड महिन्यांनी तुरुंगातील ६० लोकांनी उपोषण सुरू केले. सात दिवसानंतर सरकारने शरणागती पत्करली.

या क्रांतिपर्वात कऱ्हाडजवळील टेंभू या गावाने लक्षात येण्यासारखी कामगिरी बजावली. तेथील मारुतराव तांबवेकर व तासगावच्या महारुद्रस्वामी यांनी सेवादल प्रबळ केले. अनेक तऱ्हेची विधायक कामे सुरू केली. श्रमदान,

न्यायदान अशी कामे सुरु केली. ९ ऑगस्ट १९४५ ला आगरकर माळावर जी. डी. लाड यांचे व्याख्यान व्हावयाचे होते. त्यावेळी गोळीबार झाला. किसन भुसारी यांस गोळी लागली. त्याच्या शुश्रूषेसाठी सर्व एकत्र आले. तेव्हा सर्वांना अटक झाली व मारहाण करण्यात आली.

कऱ्हाडमध्ये शांताराम इनामदार, बाबुराव कोतवाल, बाळ भुरके, शामलाल खोजा, डी. एम्. पाटील, नेमचंद शहा, माधवराव जाधव, शांताराम गरूड, राजाराम कुलकर्णी, आत्माराम जाधव, कॉ. डी. जी. देशपांडे अशा तरुणांचा गट कार्यरत होता. त्यावेळच्या सातारा जिल्ह्यात भूमिगत कार्य करणाऱ्या परिसरातील स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणा देण्याचे काम करणारांत नाना पाटील यांचा महत्त्वाचा वाटा आहे. आपल्या तुफानी भाषणांनी त्यांनी सबंध जिल्हा ढवळून काढला. इ.स. १९३१ पासून त्यांनी केलेल्या कार्याचा प्रभाव वाढला होता. इ.स. १९३७ मध्ये कराड येथे झालेल्या जाहीर सभेत पंडित नेहरूंनी ''नाना पाटलांसारखा पैलवान आमच्याबरोबर असल्यावर स्वराज्य आता कितीसे दूर आहे ?'' असा प्रश्न त्यावेळच्या विराट लोकसमुदायास विचारला होता. इ.स. १९४२ च्या 'चलेजाव' चळवळीत यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, रामानंद भारती, किसनवीर, बर्डे मास्तर, पांडुमास्तर यांच्याबरोबरच नाना पाटलांनी अस्सल ग्रामीण ढंगाच्या मराठीत बोलून सभा गाजविल्या. समांतर शासन निर्माण करण्याच्या कल्पनेतून सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार निर्माण करण्यात आले. गुन्हेगारांना व देशद्रोह्यांना ते पत्री ठोकण्याची शिक्षा देत असल्याने त्याला पत्री सरकार असेही म्हटले जाई. या प्रतिसरकारचे नेते नाना पाटील 'क्रांतिसिंह' म्हणून ओळखले जाऊ लागले.

१९४२ चे क्रांतियुद्ध हे सातारा जिल्ह्याच्या इतिहासातील एक महान पर्व होते. समाजाच्या सर्व स्तरातील हजारो लोकांनी आपला सहभाग त्यात दिला होता. त्यासाठी पराकाष्ठेचा त्याग करून अगणित कष्ट सोसले होते.

ता. ५ मे १९४६ रोजी सर्व भूमिगत कार्यकर्ते कोणेगाव (ता. कऱ्हाड) येथे प्रकट झाले. त्यांचा भव्य सत्कार जनतेने केला. कऱ्हाडच्या प्रमुख बाजारपेठांतून भूमिगत कार्यकर्त्यांची प्रचंड मिरवणूक व सत्कार स्वामींच्या बागेत झाला.

या क्रांतिपर्वाशी एका थोर व्यक्तींचा संबंध आहे. ती व्यक्ती म्हणजे

सुप्रसिद्ध साम्यवादी कार्यकर्ते भाई विष्णुपंत चितळे. भाईंचे पुढील कर्तृत्व पुण्यातच घडले. पण त्यांच्या कार्याची सुरुवात कऱ्हाड येथे झाली. इ. स. १९३६ च्या सुमारास ते सातारा जिल्ह्यात आले. कऱ्हाड तालुका हे त्यांनी आपले कार्यक्षेत्र निश्चित केले. सर्व तालुकाभर पायी फिरून त्यांनी प्रचार केला. अनेक माणसे जमवली. अनेक शेतकरी तरुण त्यांच्या भोवती गोळा झाले. कऱ्हाड येथे त्यांनी वाचनालय सुरू केले. तरुण कार्यकर्त्यांचे शिबिर घेतले. पुढील काळात त्यांनी प्राथमिक शिक्षकांची संघटना बांधली. प्राथमिक शिक्षकांचा चोपन्न दिवसांचा अभूतपूर्व राज्यव्यापी संप झाला. त्यात सातारा जिल्ह्यातील यशाचे श्रेय विष्णुपंतांकडेच जाते. विष्णुपंत पुढील काळात साम्यवादी पक्षाचे भारतीय पातळीवरील नेते झाले. १९४२ मधील क्रांतियुद्धाबद्दल भूमिका घेण्याची पाळी आली, त्यावेळी भाईंनी आपल्या पदाविरुद्ध जाऊन या लढ्याची बाजू घेतली. यशवंतराव चव्हाण व इतर काँग्रेस नेत्यांनी त्यांचे फार जिव्हाळ्याचे संबंध होते.

दुसऱ्या महायुद्धानंतर भारताचे स्वातंत्र्य जवळ येऊ लागले. इ. स. १९४३ मध्ये बाबुराव गोखले सुटले होते. त्यावेळी त्यांनी ज्वलंत झालेल्या अन्नसमस्येसंबंधी सांगलीच्या 'लोकसखा' व साताऱच्या 'श्रीशाहू'मधून अनेक विधायक सूचना केल्या. त्यातील काही सरकारने स्वीकारल्या. कापील येथे बभ्रुवाहन जाधव इत्यादींनी सातारा जिल्हा विद्यार्थी परिषद भरवली व त्यामध्ये म. गांधींच्या चळवळीला पाठिंबा दिला. त्यामुळेच भडकून जाऊन या परिषदेला पाठिंबा देणाऱ्या बाबुराव गोखले, पांडुतात्या डोईफोडे, गंगाधर पागे प्रभृतींवर फिरुन स्थानबद्धतेची पाळी सरकारने आणली.

शेवटी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. सर्वत्र मोठ्या उत्साहाने हा दिवस साजरा झाला. कऱ्हाडमध्येही काँग्रेस पक्षातर्फे एक मोठी प्रभात फेरी या निमित्ताने निघाली होती. शिवाय कऱ्हाड शहर काँग्रेस कमिटीतर्फे कऱ्हाड विषयक ऐतिहासिक प्रदर्शनही सुधाताई स्मारक मंदिरात (टिळक हायस्कूल समोर) भरवले होते. या कामी बाबुराव गोखले आणि विभूते पेंटर इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले होते.

ता. ३० जानेवारी १९४८ रोजी एक भयंकर घटना घडली. महात्मा गांधींचा खून झाला. संपूर्ण राष्ट्राला धक्का बसला. ठिकठिकाणी शोकसभा

झाल्या. सातारा जिल्ह्यात इतर पवित्र स्थळांबरोबरच कऱ्हाड येथील प्रीतिसंगमात गांधीजींच्या रक्षेचा अंश विसर्जित झाला. त्या पाठोपाठ या जिल्ह्यात जळिताचे सत्र सुरू झाले. महात्मा गांधींचा खुनी ब्राह्मण होता म्हणून खुनाचा बदला घेण्यासाठी ब्राह्मणांविरुद्ध कायदा हाती घेतला पाहिजे अशी या चळवळ्यांची धारणा होती. ३१ जानेवारी १९४८ रोजी जुन्या स्टँडवर झालेल्या शोकसभेत हाच सूर होता. कऱ्हाडातील रा. स्व. संघाचे केळकर वकील, हिंदूमहासभेचे शंकरराव जोशी (कॅश केमिस्ट), बुधकर वकील, नथुराम गोडसेचे नातेवाईक गणपतराव फडके यांना लक्ष्य करून काहींनी आखणी केली. सबंध जिल्ह्यात जाळपोळ, खून व अत्याचार यांचे सत्र सुरू झाले. मात्र कऱ्हाड आणि त्याच्या आसपासच्या भागात कसलेही अत्याचार घडले नाहीत. याचे श्रेय यशवंतराव चव्हाण, गणपतराव आळतेकर, बाबुराव गोखले, विष्णुमास्तर निगडीकर व माधवराव जाधव यांच्याकडे जाते. महाराष्ट्रात तरी निदान कऱ्हाड हे अपवाद ठरले असावे. नंतर कऱ्हाडभोवतीच्या ग्रामीण भागातील ब्राम्हणवर्ग प्रामुख्याने कऱ्हाडातच स्थायिक झाला.

गोमांतकाच्या स्वातंत्र्याची चळवळ महाराष्ट्रातूनच प्रामुख्याने चालवली जात होती. सत्याग्रहींचे जथेच्या जथे गोमांतकात इ. स. १९५४ पासून जात होते. मे १९५५ मध्ये ज्ञानदेव कराळे, जून १९५५ मध्ये काल्याचे राजाराम पाटील व भाई आत्माराम पाटील यांनी सातारा जिल्ह्यातील आपापल्या तुकड्यांसह गोव्यात प्रवेश केला. भाई चितळ्यांच्या मोर्चामध्ये देखील सातारा जिल्ह्यातील सुमारे १५० लोक होते. त्यांच्याच प्रेरणेने दि. १० जून १९५५ रोजी पोर्तुगीज दडपशाहीला न जुमानता ज्या पाच सत्याग्रहींनी पणजीतील पोर्तुगीज सचिवालयावर तिरंगा फडकवला. त्यापैकी रघुनाथराव चव्हाण हे एक होत. दि. १५-८-१९५७ रोजी कऱ्हाडचे नाथ चव्हाण यांनी बांदा आघाडीवर गोळीबारास तोंड दिले तर श्रीनिवास लद्दड यांना पोलीसांनी पकडून मारहाण करुन जंगलात फेकून दिले त्या अगोदर नगरहवेली मुक्त करण्यासाठी महाराष्ट्रातून एक तुकडी मोठ्या धाडसाने तेथे गेली होती. त्यामध्ये कऱ्हाडजवळील रेठरे येथील सदुभाऊ पाटील आपल्या दहा साथीदारांसह गेले होते. दि. १५ ऑगस्ट १९५५ ला पुणे येथे जे झेंडावंदन झाले. त्याचे प्रमुख पाहुणे होते कऱ्हाडचे बाबुराव गोखले. गोवा मुक्तीसाठी पराक्रम करावा असे

त्यांनी आवाहन केले. या शिवाय कऱ्हाड शहरातील गोवे सत्याग्रही पुढीलप्रमाणे होते. कृष्णराव गोविंदराव चव्हाण, रामचंद्र मलू कदम, सीताराम पांडुरंग देशमुख, शामराव बंडू वाडकर, बादशहा अली मुल्ला, हालू उर्फ हसन कासम नदाफ, शंकर एकनाथ धावडे, हुसेन गुलाब मुजावर, ज्ञानदेव केशव देसाई, रामचंद्र कृष्णा शिंदे, दिनकर वाघमारे, लक्ष्मण हरी गिजरे, शिवराम उर्फ पंजाबराव नाईकजी चव्हाण.

शिवछत्रपतींच्या जयंतीची आणि टिळक पुण्यतिथीची सुट्टी राष्ट्रीय महत्त्वाचे दिवस म्हणून द्यावी ही महाराष्ट्राच्या लोकमानसातील भावना कऱ्हाडचे आमदार व्यंकटराव पवार यांनी तत्कालीन मुंबई राज्य विधानसभेत प्रश्न विचारून व्यक्त केली, त्याचप्रमाणे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा हा मराठी जनतेचा आवाजही १९४८ मध्ये विधानसभेत बिनसरकारी ठराव मांडून पवारांनीच प्रथम उठविला होता. १९५३ मध्ये कऱ्हाडच्याच आमदार यशवंतराव मोहिते यांनी विधानसभेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या बिनसरकारी ठरावाने त्याच मागणीचा पुनरुच्चार केला होता. १९५६ मध्ये राज्यपुनर्रचना विधेयकाबाबत लोकसभेत नेमलेल्या प्रवरसमितीच्या अहवालात त्या समितीचे एक सभासद कऱ्हाडचे गणपतराव आळतेकर यांनी भिन्न मतपत्रिका जोडून मुंबईला स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्याचा किंवा ते शहर केंद्रशासित करण्याचा विचार करण्याचे कारण नाही मुंबई शहर महाराष्ट्रातच राहणे न्याय्य आणि लोकशाही तत्त्वास सुसंगत ठरेल असे ठामपणे नोंदविले होते.

इ. स. १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा सर्व महाराष्ट्रभर जोर होता. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व पालिका काँग्रेस पक्षाच्या हातातून निसटून समितीच्या ताब्यात गेल्या होत्या. त्यामुळे या काळात कऱ्हाड नगरपरिषदेत देखील बरीच घालमेल होत होती. दि. २२-१०-१९५५ च्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी राज्य पुनर्रचना समितीने नाकारल्याबद्दल खेद व्यक्त करुन ती मागणी पुन्हा आग्रहाने करणारा ठराव करण्यात आला. दि. ७-८-१९५९ रोजी नगरपालिकेचे सभासद सर्वश्री बुधकर, मुळे, शेख व मुतवल्ली यांनी नगरपरिषदेच्या खास बोलावलेल्या सभेत मुंबई-म्हैसूर सीमावादाचा प्रश्न मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण शांततेने व सनदशीरपणे सोडवत आहेत म्हणून त्यांना पाठिंबा व व त्यांच्यावरील विश्वास

व्यक्त करणारा ठराव मांडला व तो मंजूर झाला.

इ. स. १९६२ मधील भारत-चीन युद्धानंतर कऱ्हाडचे सुपुत्र यशवंतराव चव्हाण यांनी देशाच्या संरक्षणपदाची सूत्रे हाती घेतली. इ. स. १९६५ पर्यंत संरक्षणदलाची संपूर्ण पुनर्रचना त्यांनी केली. त्यामुळेच इ. स. १९६५ मधील पाकिस्तानाविरुद्धचा विजय सहज मिळवता आला. इ. स. १९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी आणली व व्यक्तिस्वातंत्र्याची चहुकडून मुस्कटदाबी केली. मिसा नावाच्या अन्याय्य कायद्याखाली अनेकांना तुरुंगवास घडवून आणला. त्यावेळी कऱ्हाडचे संघचालक नानासाहेब बुधकर व बिपिनराव पेंढारकर, रामभाऊ गिजरे, नारायणराव ढवळीकर हे संघाचे स्वयंसेवक एकोणीस महिने तुरुंगात होते.

इ. स. १९९७ हे वर्षे भारतीय स्वातंत्र्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष होते. त्यानिमित्त १४ ऑगस्टला रात्री संपूर्ण कऱ्हाडमध्ये पन्नास मशालीसह एक प्रचंड फेरी निघाली होती. संपूर्ण आकाश या प्रकाशाने उजळून निघाले होते. या फेरीत सर्व स्तरांतील सुमारे पंचवीस हजार लोक सामील झाले होते. बरोबर रात्री बारा वाजता तत्कालीन जिल्हाधिकारी वंदना खुल्लर यांच्या हस्ते ध्वजारोहण व ध्वजवंदन झाले.

लोकशाहीत कायदेमंडळात प्रतिनिधित्व करणे हे फार महत्त्वाचे काम आहे. मुंबईच्या विधानपरिषदेवर लक्ष्मण महादेव ऊर्फ नानासाहेब देशपांडे (१९२६-३०), त्यांनी राजीनामा दिल्यानंतर त्या जागी भीमराव नागोजीराव ऊर्फ भाऊसाहेब पाटणकर तर महाराष्ट्र विधान परिषदेत संभाजीराव मारुतराव थोरात (१९५८-७०), पांडुरंग दादासाहेब पाटील ( १९६०-६३), भास्करराव ज्ञानोबा शिंदे , जयवंतराव कृष्णराव भोसले ( १९८० - ८२) यांनी प्रतिनिधित्व केले

मुंबई राज्य विधानसभेवर दक्षिण सातारा मतदारसंघातून आत्माराम पाटील ( काँग्रेस), पांडुरंग केशव शिराळकर (काँग्रेस), आण्णाप्पा नारायण कल्याणी (स्वतंत्र) आणि शंकरराव पांडुरंग मोहिते (स्वतंत्र) हे चौघे १९३७ मध्ये निवडून गेले, पैकी शंकरराव मोहिते यांनी महसूल खात्यात नोकरी स्वीकारल्याने राजीनामा दिला. त्या जागी चंद्रोजीराव पाटील ( काँग्रेस) निवडून आले होते. १९३७ मध्ये मुस्लिम मतदार संघातून

अहमद कासम कच्छी यांची निवड झाली होती. १९४५ मध्ये झालेल्या निवडणुकीत यशवंतराव बळवंतराव चव्हाण, पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, व्यंकटराव पिराजीराव पवार आणि के. डी. पाटील हे चारही काँग्रेसचे उमेदवार निवडून गेले. या वेळी मुस्लिम मतदारसंघातून दादामिया सय्यद यांची निवड झाली होती. याच काळात उत्तर सातारा मतदारसंघातून गौरीहर एकनाथ सिंहासने (काँग्रेस) निवडून आले होते. मुंबईत व नंतरच्या महाराष्ट्र विधानसभेवर उत्तर कऱ्हाड मतदारसंघातून यशवंतराव बळवंतराव चव्हाण (१९५२–६२), पांडुरंग दादासाहेब पाटील (१९६३–६७, १९८०–८५, १९९५–९९) यशवंतराव बाबुराव पाटील (आबा पार्लेकर) (१९६७–७२) बाबुराव रामचंद्र कोतवाल (१९७२–७७), जनार्दन बाळकृष्ण ऊर्फ शामराव अष्टेकर (१९८५–९५) आणि शामराव पांडुरंग ऊर्फ बाळासाहेब पाटील (१९९९ पासून) (हे सर्व काँग्रेस/राष्ट्रवादी काँग्रेसचे) निवडून आले. १९७७–८० या काळात शे. का. पक्षाचे केशवराव पाटलोजी पवार यांची निवड झाली होती.

कऱ्हाड दक्षिण मतदार संघातून यशवंतराव जिजाबा मोहिते (शे. का. पक्ष १९५२–६१, नंतर काँग्रेस१९६१ ते १९७७) तर विलासराव बाळकृष्ण पाटील (काँग्रेस) १९७७ पासून सातत्याने निवडून येत आहेत. पाटणमधून दौलतराव श्रीपतराव ऊर्फ बाळासाहेब देसाई (काँग्रेस) (१९५२ पासून) तर धोंडीराम शिदोजीराव ऊर्फ दादासाहेब जगताप (काँग्रेस) सातारा मतदार संघातून (१९६१ पासून) निवडून येत होते.

कऱ्हाडातून निवडून गेलेल्या यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, दादासाहेब जगताप, यशवंतराव मोहिते, विलासराव उंडाळकर आणि शामराव अष्टेकर यांची मंत्रिपदीदेखील निवड झाली होती. विधान परिषदेचे अनेक वर्षे सभापती असलेले वि. स. पागे हेही कऱ्हाडचेच.

मध्यवर्ती कायदेमंडळावर १९२३ मध्ये सरदार मुतालिक निवडून आले होते. लोकसभेवर कऱ्हाड मतदारसंघातून दाजी रामचंद्र ऊर्फ आनंदराव चव्हाण प्रथम शे.का. पक्षातर्फे व पुढे काँग्रेस पक्षातर्फे (१९५२–७३), प्रेमलाताई चव्हाण ( काँग्रेस), (१९७३–७७, १९८४–१९९१), यशवंतराव मोहिते (काँग्रेस) १९७७ – ८४ , पृथ्वीराज दाजी चव्हाण (काँग्रेस) १९९१–२००० आणि २००० पासून राष्ट्रवादी

काँग्रेसचे श्रीनिवास दाजी पाटील निवडून आले. सातारा मतदारसंघातून काँग्रेसचे व्यंकटराव पिराजीराव पवार ( १९५२-५७) यांनी प्रतिनिधित्व केले होते. यशवंतराव चव्हाण १९६२ मध्ये प्रथम नाशिक मतदारसंघातून आणि त्यानंतर सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. १९४५ मध्ये मूळचे कऱ्हाडचे पण नंतर उत्तर प्रदेशात स्थायिक झालेले बाबा राघवदास ( राघवेंद्र शेषो पाच्छापूरकर ) काँग्रेसतर्फे उत्तर प्रदेश विधान सभेत निवडून आले होते तर तारा गोविंदराव सप्रे या ( स. गो. बर्वे यांच्या भगिनी व कऱ्हाडच्या स्नुषा) बर्वे यांच्या निधनानंतर त्यांच्या जागी काँग्रेसतर्फे निवडून गेल्या होत्या. आनंदराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण केंद्रीय मंत्रिमंडळात होते आणि पृथ्वीराज चव्हाण सध्या राज्यमंत्री आहेत. प्रेमलाताई चव्हाण (१९८२-८४) राज्यसभेवर निवडून गेल्या होत्या. पृथ्वीराज चव्हाण २००० पासून राज्यसभेवर आहेत.

कऱ्हाड व परिसरात राजकीय जागृती चांगली आहे. कऱ्हाडात राष्ट्रीय काँग्रेसखेरीज अन्य राजकीय पक्षांचे व संघटनांचे कामही आपापल्या कुवतीप्रमाणे चालू असते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शेतकरी कामकरी, कम्युनिस्ट, हिंदुमहासभा, भारतीय जनता पक्ष, भारतीय रिपब्लिकन पक्ष, शिवसेना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू एकता, बजरंग दल इत्यादी संस्था/पक्ष कार्यरत असून नाथ चव्हाण, राजाराम पाटील, केशवराव पवार, कॉ. डि. एम. पाटील, केशवराव जोशी, डॉ. वा. रा. जोशी गारवडेकर, डॉ. प्रकाश सप्रे, रामभाऊ गिजरे, रवींद्र पवार, राजाभाऊ देशपांडे, जे. टी. भिंगारदेवे, युनुसभाई कच्छी इत्यादींनी आपापल्या संघटनांची निष्ठेने जोपासना केली असून सामान्यत: तात्त्विक किंवा पक्षीय शिस्तीच्या बाबी सोडून सार्वजनिक कामांत परस्परांशी संवाद असतो, निदान इतरांच्या विधायक कामात अडसर आणण्याची प्रवृत्ती तरी नाही. कॉ. डी. एम. पाटील भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव व पॉलिट ब्युरोचे सदस्य होते तर जनता पक्षाचे नाथ चव्हाण उपाध्यक्ष (१९८०) व युनूस कच्छी सरचिटणींस (१९८४) होते.

कऱ्हाड शहराचे व पी. डी. पाटील यांचे नाते अतूट आहे. त्यांचा जन्म गरीब शेतकरी घराण्यात झाला. पण स्वकर्तृत्वाच्या बळावर ते वकील

झाले. व नंतर इ. स. १९५३ पासून त्यांनी नगरपरिषदेच्या कामात लक्ष घालावयास सुरुवात केली. त्यांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत कऱ्हाड शहराची सर्वांगीण प्रगती होऊन ते महाराष्ट्रातील तालुका पातळीवरील एक आदर्श शहर झाले. या शहराचे भौतिक व बौद्धिक जीवन समृद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अनेक शिक्षण संस्थांचे ते आधारस्तंभ आहेत. कऱ्हाडजवळील शिरवडे येथे त्यांनी एक आदर्श स्वरूपाचा सह्याद्रि सहकारी साखर कारखाना उभारला. कऱ्हाड नगरपरिषदेला शंभर वर्षे पूर्ण झाल्यावर नगरपरिषदेने कऱ्हाड नगरपरिषदेचा शत सांवत्सरिक ग्रंथ प्रसिद्ध केला. त्याचे संपादन पी. डी. पाटील यांनी केले होते. त्यावरून आपल्याला त्यांचा अभ्यासूपणाची व संशोधन वृत्तीची कल्पना येते. पी. डी. पाटील हे सर्वच अर्थाने आधुनिक कऱ्हाड नगरीचे शिल्पकार आहेत.

यशवंतराव चव्हाण यांच्या उल्लेखाशिवाय कऱ्हाडचा इतिहास पूर्ण होणार नाही. एका गरीब घराण्यात जन्म घेऊन कर्तृत्वाची अनेक उत्तुंग शिखरे त्यांनी गाठली. सायमन कमिशनवरील बहिष्कारापासून त्यांनी राजकारणात भाग घ्यावयास सुरुवात केली. असहकार आंदोलनात त्यांना अठरा महिन्यांची शिक्षाही झाली. पुढे इ. स. १९४२ साली जे स्वातंत्र्य आंदोलन झाले, त्याचे सातारा जिल्ह्यातील नेतृत्व त्यांनी केले. नंतर कायदेमंडळात निवडून येवून पार्लमेंटरी सेक्रेटरी या पदापासून राज्याचे मुख्यमंत्री, भारताचे संरक्षण मंत्री, अर्थमंत्री व शेवटी भारताचे उपपंतप्रधानही झाले. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलशही त्यांनीच आणला. महाराष्ट्र राज्यातील पंचायती राज्य व सहकारी साखर कारखानदारी यांनी सुरुवात करून त्यांनी महाराष्ट्राचा चेहरामोहरा पार बदलून टाकला. आपल्या ऋजू व संस्कारी व्यक्तिमत्त्वाने राजकारणाखेरीज इतर अनेक क्षेत्रांत त्यांनी मानाचे स्थान मिळवले. अशा या कऱ्हाडच्या सुपुत्राचा अभिमान कऱ्हाडकरांना नक्कीच वाटतो.

*****

३

# इतिहासाच्या पाऊलखुणा

**ऐतिहासिक कऱ्हाड**

हिंदू संस्कृतीच्या लोकांची वसाहत कृष्णा नदीच्या परिसरात आंध्र प्रदेशाकडून प्रथम वाढत जाऊन ती कृष्णेच्या उगमापर्यंत येऊन पोहोचली असे पुरातत्त्व संशोधक प्रा. डॉ. ह. धी. सांकलिया यांचे मत आहे.

इसवीसन पूर्व तिसरे ते इसवी सन आठशे या अकरा शतकांच्या काळात कऱ्हाड हे नगर राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्धीच्या शिखरावर असून पश्चिम महाराष्ट्राची राजधानी होती.

कल्याणी येथील चालुक्य राजांच्या, तसेच यादवांच्या शिलालेखात या नगराच्या परिसरातील प्रदेशाचा निर्देश अनुक्रमे 'करहाट' ४००० आणि 'करहाड' २००० या नावानी आढळतो. फ्लीट यांच्या मते चालुक्यकालीन 'करहाट' ४००० देशविभाग सध्याचा सातारा जिल्हा आणि भूतपूर्वकालीन भोर आणि फलटण या संस्थानांचा काही भाग मिळून बनलेला असून त्याची दक्षिण सरहद्द कृष्णा नदीने आणि उत्तर सरहद्द 'प्रत्यंडक' ४००० (सध्याचे फलटण) देशाने बनली होती.

डॉ. सांकलिया यांच्या मते यादवकालीन 'करहाड' २००० या देशविभागात सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड, विटे, तासगाव, खरसुंडी तालुके, सांगली जिल्ह्यातील मिरज व सांगली तालुके व बेळगाव जिल्ह्यातील अथणी या तालुक्यांचा समावेश होत असे. (म. म. डॉ सिध्देश्वरशास्त्री चित्राव, प्राचीन भारतीय स्थलकोश)

कोठल्याही शहरात ज्या प्रमाणात व ज्या काळातील ऐतिहासिक अवशेष सापडतील त्या प्रमाणात त्या स्थळाचे ऐतिहासिक प्राचीनत्व सुसंगत रीतीने

सिध्द होते. काही प्रमाणात हे अवशेष लिखित साधनांपेक्षादेखील महत्त्वाचे ठरतात कारण वर्तमानकाळाला जोडणारे ते दुवेच असतात. इतरत्र उल्लेख केल्याप्रमाणे कऱ्हाड नगरी ही प्राचीन आहे व त्या दृष्टीने याही शहरात वास्तू, मंदिरे, मूर्ती, वस्तू, शिलालेख, नाणी, ताम्रपट यांच्या रूपाने असंख्य अवशेष आहेत. यामधील मंदिरांचा आढावा स्वतंत्रपणे घेतला आहेच. या ठिकाणी प्रामुख्याने वास्तुरूपाने जे अवशेष आहेत त्यांची माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

कऱ्हाड शहरातील अवशेषांचे साधारणपणे चार गट पाडता येतील. १. बौध्द व जैन अवशेष . २ . हिंदू अवशेष. ३. मुस्लिम अवशेष. व ४. सामाजिक अवशेष.

**बौध्द व जैन अवशेष**

कऱ्हाडच्या आसपासचे सर्वात प्राचीन अवशेष म्हणजे आगाशिव व जखिणवाडीची बौध्द लेणी ही होत. संसार हा दु:खस्वरूप असल्याने त्याचा त्याग जेवढा लवकर करता येईल तेवढे चांगले या भूमिकेतून अनेक बौध्दधर्मीय संन्यास घेत असत. यांना भिख्खू किंवा श्रमण असे म्हणत. तसेच या भिख्खूंना एकाच ठिकाणी राहणे वर्ज्य असल्याने ते सारखे भ्रमण करत असत. पण पावसाळ्यात मात्र त्यांना एकाच ठिकाणी मुक्काम करणे आवश्यक होई. त्यासाठी वस्तीपासून दूर पण हमरस्त्याजवळ ते आपली राहण्याची व्यवस्था डोंगरातील गुहांमधून करत. जेथे गुहा नसतील तेथे त्या खोदल्या जात. लेण्यांची सुरवात हीच होय. यामुळेच महाराष्ट्रातील बहुतेक लेणी ही महत्त्वाच्या हमरस्त्यावर आहेत. कऱ्हाडहून कोकणात जाणारा रस्ता हा प्राचीन काळापासून महत्त्वाचा आहे. त्यामुळेच ही कऱ्हाडजवळील लेणी निर्माण झाली आहेत. याच रस्त्याच्या संरक्षणासाठी कऱ्हाडपासून अगदी कोकणापर्यंत संरक्षक किल्ल्यांची साखळी आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

कऱ्हाडच्या दक्षिणेला आगाशिवाचा डोंगर आहे. या डोंगराच्या सर्वात उंच जागी शंकराचे देऊळ आहे. त्यालाच आगाशिव असे म्हणतात. या जागेपासून पूर्वेकडे जो डोंगर जातो त्याच्या दोन्ही बाजूंना लेण्यांचे पुंजके आहेत. त्यापैकी दक्षिण बाजूचा जो गट आहे त्याला जखिणवाडीची लेणी असे म्हणतात. कारण याच्या पायथ्याशी जखिणवाडी म्हणजे प्राचीन काळातील यक्षिणवाटिका हे गाव आहे. बौध्द धर्मात संरक्षक देवता म्हणून यक्ष व यक्षिणी यांना खूप महत्त्व आहे. कदाचित या लेण्यांमुळेच ते गाव वसले असण्याची शक्यता आहे. डोंगराच्या उत्तरेच्या बाजूला पण एक लेण्यांचा गट आहे.

या लेण्यांची दखल अगदी प्रथम इ. स. १८४९ मध्ये सर बार्टल फ्रेअर यांनी घेतली. त्यांनी या सर्व लेण्यांना तीन गटांत विभागले. पहिला गट दक्षिणेकडील जखिणवाडीचा. यामध्ये एकूण २३ गुहा येतात. त्यानंतर डोंगराच्या उत्तरेकडील उतारावरील १९ गुहांचा दुसरा गट व तिसरा कोयनेच्या खोऱ्याकडे तोंड करून असलेला २२ विखुरलेल्या गुहांचा अशा या एकूण ६४ गुहा म्हणजे लेणी आहेत. याशिवाय इतर बारीकसारीक अर्धवट खोदकाम आहेच. यामुळे एकूण संख्येबाबत भिन्नता दिसून येते.

ही लेणी तशी सामान्यच आहेत. कार्ले–भाज्यासारखी शिल्पसमृध्दता येथे नाही. त्याची तीन कारणे असावीत. एक समृध्द लेण्यांना योग्य असा दगड येथे नाही. दोन, ही लेणी हीनयानपंथीयांची किंवा बौध्दधर्माच्या सुरुवातीच्या कालखंडातील असल्याने शिल्पांची विपुलता त्याकाळच्या बौध्द धर्माला मान्य नव्हती. आणि तिसरे कारण या भागातून बौध्द धर्माचे उच्चाटन झाल्यामुळे त्यांची वाढच थांबली असावी.

ही लेणी हीनपंथीयांची आहेत याचे पुरावे पुढीलप्रमाणे आहेत. १. मोठ्या हॉलमध्ये खांब नसणे. २. खोदकामातील ओबडधोबडपणा. ३. चैत्यांचे विशिष्ट स्वरूप व ४. सर्व गुहांमध्ये असलेला शिल्पांचा जवळजवळ अभाव.

साधारणपणे बौध्द लेण्यांमध्ये विहार म्हणजे भिक्षुंच्या राहण्याची व्यवस्था, चैत्यगृह म्हणजे त्यांच्या उपासनेची किंवा प्रार्थनेची जागा असे दोन भाग असतात. या दोन्हींपुढे बहुतेक वेळा मोकळी जागा पाषाणातीलच असते. तर काही ठिकाणी मध्ये असलेल्या मोकळ्या जागेभोवती ओवऱ्या पण काढलेल्या असतात. अशा ओवऱ्या विहार व चैत्य या दोन्ही ठिकाणी असतात. कऱ्हाड येथील लेण्यांत अशा विविध प्रकारच्या गुहा अर्थात लहान स्वरूपात आढळतात. येथे भव्य म्हणता येईल असे एकही लेणे नाही. बहुतेक गुहांच्या प्रवेशद्वाराजवळ एक व्हरांडा, मग उभे खांब व नंतर हॉल अशी रचना आहे. या हॉलमध्ये किंवा अगदी सुरुवातीलादेखील दगडी बाके कोरली आहेत. काही ठिकाणी प्रवेशद्वाराजवळ दगडातच काढलेल्या खिडक्याही आढळतात. काही लेणी चैत्याच्या स्वरूपात आहेत. त्यामध्ये जरा मागच्या बाजूला स्तूप आहे. स्तूप म्हणजे एक प्रकारे बुध्दाच्या अवशेषावरील स्मारकेच असत. जमिनीलगत वर्तुळाकार बैठक, तीवर अंडाकृती घुमट, त्यावर चौकोनी हार्मिका म्हणजे अवशेष ठेवलेली पेटी आणि टोकावर घुमट अशी स्तुपाची रचना असते. जखिणवाडी येथील पाचव्या क्रमांकाचे लेणे या दृष्टीने प्रेक्षणीय आहे. प्राचीन काळी चैत्याच्या सुरक्षिततेसाठी छताला तुळया बसवल्या जात. लाकडी असल्याने कालांतराने त्या नष्ट झाल्या. (कार्ल्याच्या लेण्यांत अशा तुळया अजूनही आहेत.) पण त्यासाठी केलेल्या खोबण्या मागे राहतात. या पाच क्रमांकाच्या लेण्यात दगडात केलेल्या खोबण्या दिसतात. स्तुपाच्या पायावरील अर्धांड, हर्मिका, छत्रदंड व छत्र असून हर्मिकेवर वेदिकेची नक्षी आहे. छत्रदंड तुटलेल्या अवस्थेत आहे. बुध्दाचे सिंह हे प्रतीक असते तर धर्माचे धर्मचक्र व बुध्दाच्या महापरिनिर्वाणाचे स्तूप हे प्रतीक या चैत्यगृहातील स्तुपावर आढळून येतात. या सर्व लेण्यांत बुध्दमूर्ती कोठेही नाही. कोयनेच्या बाजूला एका लेण्यात तीन मानवी शिल्पे आहेत. ही शिल्पे कार्ला, भेडसा येथील शिल्पासारखीच आहेत. मानवी आकार अस्पष्ट असले तरी त्यांची वस्त्र नेसण्याची पध्दत व डोक्यावरील पागोटे स्पष्ट दिसते.

दगडाच्या ठिसूळपणामुळे त्यावरील लेख टिकून राहणे अवघडच. पण दोन लेख आपले अस्तित्व दाखवून देतात. एक लेख असा – 'गोपालपुतस संघमितरस लेण देयधम' म्हणजे गोपालाचा पुत्र संघमित्र याची धार्मिक देणगी अथवा याचा दानधर्म म्हणजे हे लेणे होय. म्हणजे कऱ्हाडच्या व्यापाऱ्यांनी जशी बारहुतसारख्या दूरदूरच्या लेण्यांना मदत केली तशीच आपल्या गावच्या लेण्यालाही केली. संघमित्र हा कऱ्हाडचा किंवा आसपासचा असावा. दुसरा लेख पहिल्याहूनही अस्पष्ट आहे. 'ध्रमरखितस देय (धम) = धर्मरक्षितस्य देयधर्म म्हणजे धर्मरक्षिताची देणगी. पहिली अक्षरे गेल्यामुळे नाव काय होते हे कळत नाही. सातारा गॅझेटियर व Cave Temples या पुस्तकाचे कर्ते फर्ग्युसन यांच्या मताप्रमाणे ही लेणी इसवी सनाच्या पहिल्या शतकातील असावीत.

सातारा जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्ये म्हटले आहे की, ६४ लेण्यांशिवाय इतरत्रही काही खोदकाम आहे. अगदी अलीकडे आगाशिव डोंगराच्या पश्चिमेला असलेल्या डोंगराच्या बाजूला काही लेणी नव्याने सापडली आहेत. ही लेणी मातीने पूर्ण बुजून गेली होती. पण आता पुरातत्त्व खात्याने ही लेणी स्वच्छ व मोकळी केली आहेत. ही लेणी एकूण चार आहेत व नजीकच्या जखिणवाडी आगाशिवा या गटाप्रमाणेच आहेत. एक चैत्य व तीन विहार आहेत. चैत्य असूनही स्तुपामध्ये हर्मिका, त्यावरील अर्धांड, छत्रदंड व छत्र दिसत नाही. येथील दगड हा कच्चा असल्याने एकतर लेण्यांचे नुकसान झीजेने झाले असावे किंवा लेणीच अर्धवट सोडली असण्याची शक्यता आहे.

आतापर्यंत कऱ्हाड येथे फक्त कोयनेच्या दक्षिणेला असलेल्या डोंगरातच लेणी असल्याचा समज होता. पण कोयनेच्या उत्तरेला वनवासमाची या गावाजवळ प्रा. का. धों. देशपांडे यांना असेच एक लेणे सापडले आहे. एकाच खोलीचे हे लेणे आहे. सुरवातीला व्हरांडा, मग खांब, आत मोकळी जागा असे या विहाराचे नेहमीचे स्वरूप आहे.

ही लेणी कऱ्हाडच्या जवळ आहेत. पण खुद्द शहरात कोठेही बौध्द अवशेष नाहीत किंवा तसे असल्याचा उल्लेख नाही. कोटाखालील बालाजीच्या देवळाजवळ रुद्रेश्वर नावाचे शंकराचे देऊळ आहे. या देवळात

शंकराची पिंडी आहे. त्यावरी शाळुंकी म्हणजे बुध्दाचे मस्तक आहे. या मस्तकाचे तोंड पूर्वेस आहे. कानाच्या पाळ्या, त्यावरील आभूषणे स्पष्ट दिसतात. चेहऱ्याची मोडतोड झालेली आहे. डोक्यावर जे कुरळे केस आहेत ते रुद्रासारखे दिसतात. मस्तकाच्या आकारावरून ही मूर्ती ६-७ फूट उंच असावी. शहरातील हा एकमेव बौध्द अवशेष असावा.

कै. गुप्ते बौध्दकालीन नाण्यांचा उल्लेख करतात.रॉयल एशियाटिक सोसायटीच्या एका नियतकालिकात असा उल्लेख आहे. विजयसेन, ३ रा दामजदश्री, २ रा रूद्रसेन, विश्वसिंह, भर्तृदामन व विश्वसेन या महाक्षत्रपांची नाणी कऱ्हाडास सापडली आहेत. त्यांचा काळ इसवी सन २५० पासून ते इसवी सन ३०४ हा आहे. दाभोळ दरवाजालगतच्या भिंतीत एका सुंदर स्त्रीची प्रतिमा कोरलेला एक दगड अर्धवट दिसत असे. त्याचा काळ इसवी सनाच्या ६ वे शतक हा असावा.

### जैन अवशेष

आजच्या कऱ्हाडमध्ये जैन अवशेष नाहीत. हाटकेश्वराच्या देवळाजवळील एका नक्षीकामाच्या दगडाचा उल्लेख य. रा. गुप्ते करतात. त्यावरील मूर्ती जैनांच्या होत्या व त्याचा काळ ७०० ते ९०० हा असावा. याशिवाय त्यांना कोटाखाली १० व्या शतकातील २-३ दिगंबर जैनांच्या मूर्तीपण मिळाल्या. जखिणवाडीला पण अशीच एक दिगंबर जैनाची मूर्ती त्यांना दिसली व तिचे छायाचित्र त्यांनी घेतले. भारत इतिहास संशोधक मंडळात पण कऱ्हाडात सापडलेला पुसट लेख व त्यावर जैनप्रतिमा असलेला दगड आहे.

### हिंदू अवशेष

कऱ्हाड शहरातील प्राचीन म्हणून जी देवळे समजली जातात, ती शिव किंवा शंकर या देवतेची आहेत. त्याची संगती अशी असावी. आर्यपूर्व काळात जी आदिम संस्कृती या भागात होती, तिचे दैवत शैव हे असावे. या संबंधीचे विवेचन द. ग. गोडसे यांनी आपल्या 'शक्तिसौष्ठव' या ग्रंथात फार चांगले केले आहे. दुसरे असे की बौध्दधर्माच्या पाडावानंतर या भागात शैवांचा

प्रभाव वाढला असावा. आगाशिव धरून अनेक लेण्यांत हिंदूंनी शंकराची पिंडी स्थापन केली. वर उल्लेख केलेले रुद्रेश्वराचे उदाहरणही लक्षणीय आहे. यामुळेच कऱ्हाडमधील हाटकेश्वर, रत्नेश्वर, काशीविश्वेश्वर, कपिलेश्वर, पावकेश्वर, आनंदेश्वर ही प्राचीन देवालये शंकराचीच आहेत. मात्र ती जशी पूर्वी होती तशी आज नाहीत. त्यांचा अनेकवेळा जीर्णोध्दार झालेला आहे. त्यातील काहींच्या तारखाही उपलब्ध आहेत. मात्र हिंदूधर्मातील मंदिर ही कल्पनाच ५ व्या किंवा ६ व्या शतकानंतरच्या काळातील सल्यामुळे ही मंदिरे त्यानंतरच्या काळातील असावीत. त्यापैकी पावकेश्वर हे सैदापूरला म्हणजे संगमापलीकडे आहे. त्याची हेमाडपंती बांधणी त्याचे प्राचीनत्व दाखवून देते. हाटकेश्वर तसे ग्रामदैवत व म्हणून प्राचीन, पण त्याचे स्थलांतर झालेले असावे. त्यातूनही आजच्या हाटकेश्वराचा गाभारा हा पुढील मंदिरापेक्षा जुना म्हणजे शिवकालीन असावा.

भाट्यांच्या मळीत असलेले रत्नेश्वर हे मंदिर वैशिष्ट्यपूर्ण आहे. या देवळाचा गाभारा व मंडप हे हेमाडपंती असून वरचे शिखर मात्र पेशवाईतील आहे. मंदिराला मुस्लिम पध्दतीचे चार मिनार आहेत. मध्ये नेहमीच्या पध्दतीने शंखाकृती निमुळते शिखर आहे. या मिनारामध्ये जी शिल्पे आहेत त्यामध्ये वरती हत्ती आहे. हत्ती असणे हे दुर्मिळ आहे. मिनार हा मुस्लिम स्थापत्याचा प्रभाव किंवा मंदिराच्या बचावाची तरतूद असावी.

संगमेश्वराचे देऊळ संगमावरच आहे. देऊळ सामान्यच आहे. १९७६ च्या पुरानंतर या देवालयाचा काही भाग तसेच काही भाग तसेच पुरापासून नुकसान होऊ नये म्हणून जी तटबंदी बांधली होती ती वर आली. त्यावरून हे देऊळ मूळचे बरेच मोठे असावे असे वाटते.

या संगमेश्वराच्या देवळाजवळ एक लहान रामाचे देऊळ आहे. त्यातील मूर्ती या देखण्या असून शिलाहार काळातील असाव्यात असे वाटते. या साध्या देवळात या मूर्ती कशा आल्या याचे आश्चर्य वाटते. यातील लक्ष्मणाची उभे राहण्याची पध्दत लक्षात घेण्यासारखी आहे.

प्राचीनकाळी शिवाखालोखाल शक्तीची उपासना होत होती व म्हणून लक्ष्मी व भवानी यांची मंदिरे मोठ्या संख्येने होती. एस. टी. स्टँडच्यामागे

निमजग्याच्या माळावर असेच लक्ष्मीचे भव्य देऊळ होते. आज या महालक्ष्मीच्या प्रचंड मंदिराचा चौथरा तेवढा शिल्लक राहिला आहे. या मंदिरातील मूर्ती तेवढीच भव्य असली पाहिजे. ती काही उपलब्ध नाही. पण याच मंदिरातील महिषासुरमर्दिनी स्वरूपातील देवीची लहान मूर्ती मात्र भैरोबागल्लीत उत्तरालक्ष्मीच्या देवळात स्थापिली आहे.

सोमवार पेठेतील उत्तरालक्ष्मीचे देऊळ १७२७ मध्ये बांधले. या देवालयातील मूर्तीच्याखाली भुयारवजा खोली आहे. देवीची सुरक्षितता हाच या भुयाराचा हेतू असावा. देवीची मूर्ती अतिशय सुंदर असून तिचा काळ व कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिराचा काळ म्हणजे १२ वे ते १३ वे शतक हा असावा. देवी महिषासुराचा वध करताना दाखवली आहे. मूर्तीला तीन भंग म्हणजे बाक आहेत. हेच मूर्तीच्या प्राचीनत्वाचे मुख्य लक्षण आहे. साधारणपणे ३१ इंच उंच व १६ इंच रूंद एवढीच ही प्रतिमा आहे. पण ही मूर्ती प्राचीन ग्रंथांत सांगितल्याप्रमाणे पूर्ण शास्त्रीय पध्दतीने घडवली आहे.

कऱ्हाड शहरातील इतर अनेक मंदिरांतील मूर्ती या प्राचीन आहेत. पण त्यांचा उल्लेख धार्मिक या भागात केलाच आहे.

वीरगळ म्हणजे प्राचीन पध्दतीने केलेली युध्दात धारातीर्थी पडलेल्या वीरांची स्मारके. त्यावरून आपल्याला तत्कालीन पोषाख, शस्त्रास्त्रे यांची माहिती समजते. वीरगळ हे सामान्यत: गावाच्या सीमेवर उभारले जातात. कऱ्हाडमधील आज लक्षात येणारे वीरगळ म्हणजे कोटाच्या पाणदरवाजाजवळील बुरुजाच्या भिंतीतील व कृष्णाबाई घाटावरील दीपमाळेजवळील हे होत. याशिवाय पूर्वी कन्याशाळेसमोर, बुधवारात ठिकठिकाणी वीरगळ होते पण आता ते तेथे नाहीत. कऱ्हाडातील वीरगळांची संख्या दीडदोनशे एवढी असावी.

**इतर**

घाटावर व कोटाखालील गणपतीजवळ नागप्रतिमा आहेत.

कोटातील भवानीच्या देवळात भवानीचे जे आसन आहे ते ९ ते ११ व्या शतकातील असावे. त्यावर ज्या तीन मूर्ती आहेत त्यातील एक बुध्दाची असावी असे वाटते. घाटावरील विश्वेश्वराच्या मंदिराच्या दरवाजावर

दोन उभे व एक आडवा खांब आहे. त्यावरील शिल्पे अत्यंत सुरेख असून ती प्राचीन शिल्पांपैकीच आहेत.

कोटाखालील गणपतीचे देऊळ तसे अलीकडील आहे. पण त्यातील गणपतीची मूर्ती ही निमजग्याच्या माळावरील लक्ष्मीमंदिराच्या प्रवेशद्वारावरील गणेशपट्टीवरील होती असे सांगितले जाते.

गणेश अंताजी जोशी यांनी खरेदी केलेल्या घरातून उत्तर गुप्तकालीन धर्तीच्या नक्षीचे सातव्या शतकातील दोन दगड य. रा. गुप्ते यांना सापडले ते त्यांनी नेले.

काझींच्या जमिनीत सुमारे ९ व्या शतकातील एका लहान पण सुंदर देवळाचे अवशेष गुप्ते यांना मिळाले. एकावर गंगायमुनांच्या प्रतिमांच्या धर्तीवर मूर्ती खोदलेल्या आहेत. मंगळवार वेशीजवळ खंडित मूर्ती असलेला एक दगड पायामध्ये सापडला. त्यावर एका बाजूस नंदीवर शंकरपार्वती बसल्याचा तर दुसऱ्या बाजूस ती सिंहासनावर आरूढ झाल्याचे दाखवले आहे. कोटातील पाणदरवाजाजवळ खंडित मूर्तीचा दगड पायात लागला होता. तो १२ व्या-१३ व्या शतकातील असून औंध येथे पाठवण्यात आला. १९२६ मध्ये गिजरे यांना कार्तिकेयाची सुंदर मूर्ती कोरलेला महिरपीचा एक काळा दगड सापडला होता. सुप्रसिध्द दोन मनोऱ्यांमधील १२-१३ व्या शतकातील एका खांबाचा उल्लेख गुप्ते आपल्या पुस्तकात करतात. काझींच्या जमिनीपलीकडील उंचवट्यावर समारे १२ व्या शतकातील महिरप कोरलेला एक संगमरवरी दगड एका कोळ्यास सापडला. पूर्वीच्या शनिवारवेशीच्या बाहेर असलेल्या देवळातील गणपती हा १२-१३ व्या शतकातील असावा.

१२ ते १४ शतकातील काही विच्छिन्न प्रतिमा कृष्णेच्या पात्रात टाकल्या तर काही देवळाच्या पायात घालण्यात आल्या. (गुप्ते) मंगळवार पेठेत टिळक हायस्कूलजवळ क्षत्रपांची काही नाणी सापडली. तेथे सापडलेले इमारतींचे पाये हे क्षत्रपकालीन नसून ते शिलाहारांच्या राजवाड्याचे असावेत असे डॉ. भांडारकर यांचे मत आहे.

लंगर मशिदीच्या आसपास मडकी, विटा, नाणी इत्यादी अवशेष

मिळाले. ते १३-१४ शतकातील असावेत. १९४८-४९ मध्ये पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाने पंताच्या कोटात उत्खनन केले होते. त्यांनाही नदीजवळ वर्तुळाकार विहिरी (Ring wells), मातीची भांडी, मणी, दगडी व लोखंडी वस्तू, नाणी टेरेकोटा वगैरे वस्तू सापडल्या होत्या. एस. टी. स्टँडजवळील बिरोबा देऊळ हे पंधराव्या शतकातील हेमाडपंती मंदिराच्या अवशेषावर बांधले आहे. संत सखूच्या देवळाला लागून जुना मंडप व धर्मशाळा होती. त्या १९२६ च्या सुमारास पडल्या.

**भाळवणी शिलालेख**

भाळवणी, ता. खानापूर जि. सांगली येथे कऱ्हाडच्या श्री शिवाजी विद्यालयाचे शिक्षक भगवानराव घार्गे यांना चार शिलालेख उपलब्ध झाले. (महाराष्ट्र टाईम्स, २६-६-१९७१) महाराष्ट्र राज्याच्या पुरातत्त्व व पुराभिलेख विभागाचे तत्कालीन संचालक वि. गो. खोबरेकर यांनी या शिलालेखाचे ठसे काढून नागपूरचे विद्वान इतिहास संशोधक डॉ. वि. भि. कोलते यांना पाठविले होते. 'आपल्या महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख' या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने १९८७ मध्ये प्रकाशित केलेल्या ग्रंथात या शिलालेखावर डॉ. कोलते यांचा एक लेख आहे.

उपरनिर्दिष्ट चार शिलालेखांपैकी एक देवनागरी लिपीतील संस्कृत भाषेत आहे. तथापि शेवटच्या काही ओळींतील शब्दांवरून तो मराठीत असावा. शिळा ३९ सेंमी उंच व ३० सेंमी रूंद असून प्रत्येक ओळीत १७ ते १८ अक्षरे अशा एकूण १५ ओळी त्या शिळेवर आहेत. शिलालेखावर धात्री संवत्सर वैशाख शु ३ गुरुवार शके ११३८ (म्हणजे इ. स. ता. २१ एप्रिल १२१६) असा कालनिर्देश आहे. हा लेख द्वितीय सिंघणदेवाच्या राज्यकालातील, पण तो त्याच्या अधिकाऱ्याचा आहे. कऱ्हाड मंडळात श्री पदुमण ऐडि, चैय्यण देव व श्री सोईदेव हे सिंघणाचे अधिकारी होते, त्यांच्या उपस्थितीत भाईदेवाच्या मांगलिक पूजेसाठी काही राज्यवृत्ती दिल्याची ही नोंद असावी (कोलते पृ.३३१)

## शिवकालीन शिलालेख

सखाराम बापूजीराव डुबल यांच्या घराच्या मागील बाजूस य. रा. गुप्ते यांनी पाहिलेल्या एका शिवकालीन शिलालेखाचा उल्लेख त्यांच्या 'कऱ्हाड' या पुस्तकात आहे. हा आसपासच्या पण आता अस्तित्वात नसलेल्या देवालयाचा असावा असा गुप्ते यांचा तर्क आहे. ते लिहितात, 'ते देवालय करहाटकर कुलकर्णी रामरामी अथवा रामरामे किंवा रामनामे यांनी इ. स. १६७२–७३ मध्ये बांधले असावे, शिलालेख असा आहे :–

"।। स्वस्ति श्री नृपशाली ।।<br>
।। वाहन शके १५९ [ ४ ] प [ रि ] ।।<br>
।। धावी सवछर बलदेव सह ।।<br>
।। यशश्री पिलदेव रामरामी ।।<br>
।। कुलकर्णी कसबे करहाट [ –] ।।<br>
।। कर यांनी देवालय माय [ – ] ।।<br>
।। लेकरे गताग [ तम् ] ।। "

(शके १५९४ परिधावी संवत्सर असावे.)

प्रस्तुतचा शिलालेख सध्या (२००८) घाटावरील श्री कृष्णाबाई मंदिराच्या दक्षिणेकडील भिंतीत पश्चिम कोपऱ्यात तळाशी बसविलेला आहे.

मंगळवार पेठेतील कमळेश्वराच्या देवळाजवळ संत सखूचे देऊळ आहे. त्या देवळातच श्री विठ्ठल रखुमाईच्या मूर्तीसमोर मंडपात संत सखूची समाधी म्हणून एका कट्ट्यावर तुळशीवृंदावर व सखूची मूर्ती असलेली समाधी आहे.

## घाट

कृष्णा – कोयना या नद्यांच्याकाठी कऱ्हाडकर नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने पायऱ्यापायऱ्यांनी नदीकडे उतरत जाणारे घाट सध्या जरी नदीच्या प्रवाहापासून बरेच अलीकडे असल्याचे दिसत असले तरी मुळात ते नदीच्या प्रवाहालगतच होते. १८६० मध्ये खोडशीचे धरण झाल्यावर कृष्णेचा प्रवाह घाटापासून उत्तरेकडे सरकला.

सर्वांत जुना घाट रंगारवेसेजवळचा. २४९ फूट लांब व ७८ फूट रूंद असा हा घाट गावकऱ्यांनीच कोयनेच्या काठावर १७२७ मध्ये बांधला. १७५४ मध्ये अंताजी वासुदेव मुतालिक यांनी तत्कालीन स्वामीच्या बागेच्या कोपऱ्यावरील पिंपळापासून ८४ फूट लांब आणि ४६ १/२ फूट रूंद असा घाट बांधला होता. याच वर्षी त्रिमलपंत देशपांडे यांनी देशपांडेआळीचा ८२ १/२ फूट ३७ १/२ फूट आणि कमळेश्वराच्या देवळाजवळ १२४ १/२ फूट लांब व २४ फूट रूंद परशुराम नाईक अनगळ यांनी असे घाट कृष्णाकाठी बांधले. कृष्णाबाईच्या मंदिरापासून कृष्णेच्या तत्कालीन पात्रापर्यंतचा घाट १७७७ मध्ये आबा खानवेलकर निसब्बत पंतप्रतिनिधी यांनी बांधला आणि गरूडमामांच्या देवळापासून कृष्णाबाई मंदिरापर्यंतच्या घाटाची पुरवणी (३०९ फूट X२४ फूट ) शामजी व्यंकटेश काळे यांनी १८३३ मध्ये जोडली. त्यापूर्वी १७८२ मध्ये देशपांडे आळीच्या घाटास लागून ४० फूट लांब व ३१ फूट रूंद असा घाट निरंजनस्वामीच्या स्मरणार्थ त्यांच्या शिष्यांनी बांधला. गवळवेशीस बहिरवपंत गिजरे यांनी ६० फूट लांब ४८ फूट रूंद आणि वेण्णाई तुळसणकरीण यांनी २४ फूट लांब ३६ फूट रूंद असा घाट १८३८ मध्ये बांधला. संगमाजवळ संगमेश्वर महादेवाच्या पलीकडे कोटाखाली असलेल्या उंचवट्यास लागून ज्या झिजलेल्या पायऱ्या होत्या त्या कोटातील देवळावरून नदीवर जाणाऱ्या घाटाच्या असणे शक्य आहे.

प्रतिवर्षी पुराच्या काळात पाण्याबरोबर येणारा मातीचा गाळ या घाटावर एवढा साचत गेला की आज कृष्णाबाईच्या मंदिरासमोर दिसणाऱ्या पायऱ्यापायऱ्यांचा घाट आणि त्याच्या टोकाला असलेले सुंदर बुरूज तेथे होते की नव्हते हे कळेनासे झाले होते. पन्नास पाऊणशे वर्षे साठलेला गाळ १९४१ मध्ये गावकऱ्यांनी श्रमदानाने काढून त्याला पूर्ववैभव प्राप्त करून दिले. त्यामुळेच गेल्या काही वर्षांत श्री कृष्णाबाईच्या उत्सवकाळात होणाऱ्या रंजनात्मक कार्यक्रमासाठी प्रशस्त प्रेक्षागृहच घाटाच्या रूपाने उपलब्ध झाले आहे.

**पार**

सोमवार पेठेत गोपाळकृष्ण मंदिराच्या उत्तर बाजूस, तसेच कोटात चढताना सिद्धिविनायक मंदिरालगत वडाच्या झाडाखाली, कृष्णाबाई घाटावर सध्याच्या ज्ञानेश्वर कमानीलगत व प्रीतिसंगम उद्यानात यशवंतराव चव्हाणांच्या समाधीच्या पूर्वेला तसेच परिपूर्णानंद स्वामींच्या समाधीलगत एक, सात शहीदाजवळ, रविवारात पागे यांच्या घराजवळ असे प्राचीन पार आहेत.

**मुस्लिम अवशेष**

बहामनी व त्यापाठोपाठ आलेली आदिलशाही या दोन्ही पातशाह्यात कऱ्हाड हे महत्त्वाचे ठाणे होते. त्यामुळे या शहरावर असलेला मुस्लिम संस्कृतीचा प्रभाव तेथील मनोरे मशिदी यावरून लक्षात येतो.

कऱ्हाडचा कोट हा जरी मुसलमानपूर्व काळातील असला तरी त्यातील सर्वात लक्ष वेधून घेणारी वास्तू म्हणजे नकट्या रावळ्याची विहीर ही होय. किल्ल्याच्या पश्चिम टोकाला ही विहीर असून येथून कोयनेचे पात्र सुमारे १०० फुटावर आहे. विहिरीची जमिनीवरील लांबी १३६ फूट आहे. हा भाग चौकोनी असून जेथे मोट लावायची तो कोपरा नक्षीदार गोलाकार करण्यात आला आहे. राहिलेल्या १०० फूट लांबीमध्ये अतिशय भव्य अशा ८३ पायऱ्यांचा जिना आहे. दर २० पायऱ्यानंतर पायरीच्या रूंदीच्या तिप्पट जागा मोकळी सोडण्यात आली आहे. अगदी तळाशी जेथे पायऱ्या संपतात, तेथे एकावर एक अशा भव्य कमानी आहेत. त्यातील दोन पूर्णपणे अस्तित्वात आहेत तर त्यावरील तिसरी मात्र आज शिल्लक नाही. या तीन कमानींमुळे पाण्याचा साठा व पायऱ्या यामध्ये विहिरीची चौथ्या बाजूची भिंत तयार झाली आहे. कमानीची उंची १० फूट असून ही चौथी भिंत ७० फूट उंचीची आहे. कमानीच्या शैलीवरून ही विहीर मुस्लिम स्थापत्यापैकी आहे हे कळते. विहिरीचे सर्व बांधकाम मोठमोठे घडीव दगड व चुन्यातील आहे. सबंध विहिरीत समांतर अशा साधारणपणे १३ व १५ फुटांवर खाचवजा पोकळ्या आहेत. त्यामध्ये लाकडी अडसर घालता येत होते. काही पोकळ्यांत असे अडसर दिसतात सुध्दा. गॅझेटियरच्या

म्हणण्याप्रमाणे या खाचामध्ये तुळया घालून विहिरीवर मजले बांधण्याची सोय होती. अस्तित्वात असलेल्या दोन कमानी याला पुष्टी देतात. याच तीन मजली इमारतीमधून कोटाचा व पर्यायाने कऱ्हाड सुभ्याचा कारभार चालत असावा. ही विहीर आदिलशाहीपूर्वीची म्हणजे बहामनी काळातील असावी. या विहिरीमध्ये अधूनमधून हिंदू शिल्पखंड स्पष्ट दिसतात.

निमजग्याच्या माळावर ३० फूट उंच व २५० फूट लांब असा इदगा आहे. या इदग्याच्या कोनाड्यात एक शिलालेख आहे. त्यावरून असे दिसते की शाह अली आदिलशाहाने 'मुसलमानांची प्रेते पुरण्यास व इदग्याच्या दुरुस्तीस एक चाहूर जमीन सार्वजनिकरीत्या दिलेली आहे ' म्हणजे याही इदग्याचा काळ १७ व्या शतकाच्या मागे जातो. इदग्याच्या भिंतीत दोन तीन मूर्ती खोदलेले दगड डोकावत होते. काही खोदीव दगड उलटे लावलेले आहेत असा उल्लेख 'कऱ्हाड' मध्ये आहे.

मशिदीजवळ दोन दर्गे सुस्थितीत असून त्यापैकी एक अहमदनगरच्या सुप्रसिध्द चाँदबिबीने बांधला आहे.

कऱ्हाडजवळील मलकापूर हद्दीत मुस्लिमकालीन काही अवशेष आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचा म्हणजे कुवामहल हा होय. ही एक पाण्याने भरलेली चौकोनी विहीर असून त्याच्या दक्षिण बाजूला सहा भरीव कमानी असून पश्चिमेला तीन कमानी आहेत. या कमानी थोड्या लहान आहेत. पूर्वेला विहिरीत उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. या कमानी अर्धवट पाण्याने भरलेल्या असतात. उत्तरेच्या बाजूला एक गुप्त मार्ग असूनन तो पाण्यात असतो. जेथे तो उघड्यावर येतो त्याठिकाणी तो चिऱ्याने बंद केला आहे.

या विहिरीपासून जवळच एक अतिशय भव्य घुमट असलेली 'मलिकामहल' नावाची इमारत आहे. ५५ फूट लांब, ५५फूट रूंद या आकाराच्या चौथऱ्यावर ही मुस्लिम पध्दतीची देखणी इमारत उभी आहे. इमारतीच्या प्रत्येक कोपऱ्यात हिंदू पध्दतीचे चिरे आहेत. उत्तर,

पूर्व व दक्षिण या बाजूंना प्रवेशद्वारे आहेत. आतमध्ये चुन्यातील पाच शिल्पयुक्त कमानी आहेत. घुमटावर जाण्यासाठी आतून जिना असून घुमटाभोवती मळाच्या पानासारखे ५२ कट्टे आहेत. या इमारतीच्या शिल्पावर हिंदुशिल्पपध्दतीचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

या दोन्ही अवशेषांजवळ खाशाबा गणपत कराळे यांच्या शेतात एक बांधीव भुयारी मार्ग आहे. प्रवेशमार्ग ९ फूट रूंद व माथा ४ फूट उंच आहे. पुढे मात्र हा मार्ग बंद झाला आहे. कदाचित घुमटाकडे आतून जाण्याचा तो मार्ग असावा.

या शिवाय मंगळवार पेठेतील कर्डेपीराचे थडगे, शनिवारातील ख्वाजा खिजरचा दर्गा हे ही प्राचीन आहेत. कर्डेपीर तर इ. स. १२६२ मधील म्हणजे ज्ञानेश्वरीपूर्वकालीन आहे. तुलनात्मक दृष्टीने कऱ्हाडमधील मुस्लिम काळातील अनेक शिलालेख सुस्थितीत असून त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास होणे आवश्यक आहे.

**किल्ले**

देशावरून कोकणात जाणारे जे रस्ते आहेत त्यात कऱ्हाडहून गुहागरला जाणारा रस्ता आजच्याप्रमाणेच प्राचीन काळीही महत्त्वाचा होता. कऱ्हाडला असणारी लेणी हा जसा त्यासाठीचा पुरावा आहे, तसाच कऱ्हाडजवळ आणि कोकणरस्त्याजवळ असणारे किल्ले हा देखील महत्त्वाचा पुरावा आहे. कऱ्हाडजवळील सदाशिवगडपासून ही किल्ल्यांची रांग सुरू होते. सदाशिवगड, वसंतगड, दातेगड, मोरगिरी व शेवटी भैरवगड असे हे किल्ले आहेत. त्यावरून जुन्या राजवटींना या रस्त्याचे वाटणारे महत्त्व लक्षात येते. कऱ्हाडचा किल्ला डोंगरी नसला तरी कऱ्हाड सुभ्याचे ठिकाण म्हणून त्याचे महत्त्व आगळेच आहे.

कऱ्हाडचा भुईकोट किल्ला

कऱ्हाडला असलेल्या कृष्णा व कोयनेच्या संगमाच्या दक्षिणेकडील बेचक्यात हा किल्ला वसला आहे. भुईकोट असला तरी तो शहराच्या सपाटीवर नाही. थोडासा उंच आहे. यालाच पंताचा कोट असे

म्हणतात. कऱ्हाड शहरातून कोटात जाताना गणपतीचे देऊळ व कृष्णाबाई मंगल कार्यालय या दरम्यान एक छोटेसे चढाचे वळण लागते. गणपतीला लागूनच सरळ पायऱ्यादेखील आहेत. पूर्वीदेखील या दगडी पायऱ्या होत्या व आता त्या जीर्णोध्दारित आहेत. पायऱ्याजवळ एक प्रचंड वडाचे झाड आहे. गणपतीमागे कोटाचे प्रवेशद्वार होते. त्यानंतर जरा चढून गेले की वहिवाटदारांचा जुना मराठमोळा पध्दतीचा वाडा होता. या वाड्यावरून थोडे डावीकडे व पुन्हा पश्चिमेला गेले की श्री भवानी मंदिर लागते. श्रीनिवास प्रतिनिधी यांच्या पत्नी काशीबाई यांनी इ. स. १८०० मध्ये हे मंदिर बांधले. या मंदिरावरून जरा खाली गेले की प्रचंड स्वरूपाची नकट्या रावळ्याची विहीर लागते. त्यावरून पुढे गेले की कोटातील मुख्य चौक लागतो. या चौकाच्या जरा पुढे उजवीकडे प्रतिनिधींचा राजवाडा ( येथे आता महाराष्ट्र हायस्कूल आहे.) आहे. या राजवाड्याच्यासमोर कोटाचे वहिवाटदार असलेल्या पेंढारकरांची घरे आहेत. सर्व कोटाभोवती बारा बुरुजांनी युक्त अशी दगडमातीची तटबंदी आहे.

इतिहासकाळात आपल्याला एकदम घेऊन जाणारी वास्तू म्हणजे कोटाची तटबंदी होय. प्रवेशद्वार पूर्वेकडे, नंतर प्रत्येक बाजूला मध्ये दोन व कडेला दोन असे चार बुरूज होते. त्यांची एकूण संख्या बारा होते. आजच्या पालकर शाळेच्या मागे असलेला दक्षिण-पूर्वेला असलेला बुरूज हा अजून तरी सर्वात सुस्थितीत असलेला बुरूज होय. त्यानंतर उजव्या बाजूच्या कोयनेकडील बुरूज काही वर्षांपूर्वी चांगला ओळखू येत होता. आज तशी स्थिती नाही. त्यानंतर प्रीतिसंगमाच्या बाजूला असलेल्या विवेकानंद शिक्षण संस्थेच्या जवळ असलेला बुरूज चांगल्या अवस्थेत आहे. नंतर पूर्वेकडे निघाले की पाणदरवाजा म्हणजे नदीकडे जाणारा दरवाजा. या जवळचा बुरूजही चांगल्या अवस्थेत आहे. त्याच्या जंग्या, नक्षी सर्व काही दिसते. या बुरुजावरून आपल्याला तत्कालीन बांधकामाची कल्पना येते. पाणदरवाजावरून खाली गेले की येते स्वामीची बाग व यशवंतराव चव्हाण समाधी

परिसर. या किल्ल्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे वीस एकर असावे. किल्ल्याच्या चारही बाजूंनी खालचे दगडीकाम वरचे वीटकाम, मातीकाम दिसते. पूर्वेला झालेल्या दाट घरांमुळे तर पश्चिमेला दरवर्षीच्या पुरामुळे कसलाच मागमूस राहिला नाही. उत्तरेकडे म्हणजे स्वामीच्या बागेकडे उतार दिसतो. बांधकाम मात्र दिसत नाही.

कोटाच्या मुख्य दरवाजाजवळ दोन बुरूज होते. एवढेच नव्हे तर वरती नगारखाना पण होता. पाणदरवाजाचे तोंड मात्र नदीकडे नसून पश्चिमेला होते. किल्ल्यांच्या दरवाजाची पध्दत अशीच असते. या दरवाजाजवळील बुरूजात एक वीरगळ पण बसवला आहे.

पंतांचा वाडा कोटाच्या मध्यभागी पण थोडासा ईशान्येला आहे. म्हणजे होता. त्याचे तोंड पश्चिमेला होते. संपूर्ण वाडा अगदी अलीकडेच पाडून तेथे नवीन बांधकाम केले आहे. वाडा दुमजली होता. सुरूवातीला दिंडी दरवाजा असलेला मोठा लाकडी दरवाजा, दोन्ही बाजूंना ओवऱ्या आणि मराठा पध्दतीप्रमाणे मोठा चौक व बाजूला इमारत होती. दरवाजाच्या दक्षिणेला ८३X३१ फूट असा दरबार हॉल होता. मध्ये १४ फुटांची मोकळी जागा व दोन्ही बाजूंना खांब होते. हॉलच्या पूर्व भागात भवानी देवीसाठी उंचवट्याची जागा होती. त्याला भवानी मंडप म्हणत. गॅझेटियरने या वास्तूचे फार चांगले वर्णन केले आहे. दिवाणखान्याचा कडिपाट चांगला सागवानी असून त्याला काळा रंग दिला होता. हा महाल काशीबाई यांनीच १८०० च्या सुमारास बांधला व बाकीचा वाडा पण त्याच पध्दतीने पुरा करण्यात आला. या वाड्यात पुढे १९०६ मध्ये काड्यापेट्यांचा कारखाना निघाला व त्यामुळेच वाड्याला मोठी आग लागली होती.

यानंतर कोटातील पुराणवस्तू म्हणजे भवानी मंदिर होय. हे देऊळ वर उल्लेखिल्याप्रमाणे मातुश्री काशीबाई यांनी बांधले. देऊळ तसे साधेच आहे. भवानी मूर्ती नऊवारी पातळातील आहे. पण या मूर्तीचा जो चौथरा आहे तो मात्र एकदम प्राचीन काळातील म्हणजे ९ ते ११ व्या शतकातील शिल्पपध्दतीचा आहे. त्यामध्ये नक्षी व तीन उत्कृष्ट मूर्ती आहेत. असाच शिल्पयुक्त खांब कृष्णाबाई मंदिरासमोरील काशीविश्वेश्वराच्या

दरवाजावर बसवला आहे. कोटात अशा शिला बऱ्याच असाव्यात.

कोटातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे एक भव्य दगडी विहीर होय. (मुस्लिम अवशेषात तपशील आहेत.)

कोट जरी पंतांचा असला तरी या विहिरीमुळे त्याचा काळ बहामनी युगापर्यंत तरी नक्कीच जातो. पण मुस्लिमांनी महाराष्ट्रात कोठलेच किल्ले नव्याने बांधले नसल्यामुळे याचा काळ एकदम वाकाटक – शिलाहारापर्यंत जातो. या ठिकाणच्या उत्खननात सापडलेल्या रोमनकालीन अवशेषांवरूनही याला पुष्टी मिळते.

पंतांच्या कोटासंबंधी असे सांगतात की हा किल्ला बांधताना कोयनेचा ओघ बदलण्यात आला. कोयनेच्या जुन्या पुलापाशी आपल्याला या जुन्या पात्राच्या खुणा दिसतात. गावात सापडणारी वीरगळाची ठिकाणे, मंगळवारातील जुन्या कऱ्हाड शहराचे अवशेष, नदीच्या दोन्ही बाजूंच्या डगरीतील मातीच्या स्तरातील फरक, लक्ष्मीच्या मंदिराचे प्रतिबिंब कोयनेत पडत असे अशी आख्यायिका असे काही पुरावे सांगितले जातात. पण असे नदीचे पात्र संपूर्ण बदलण्याचे प्रयोजन काय असावे हे समजत नाही. कोटाभोवती एक मोठा खंदक होता. आता मात्र तो पूर्णपणे बुजला आहे.

१८९६ मध्ये श्रीनिवास पंतप्रतिनिधी यांच्या काळात कोटातील राजवाड्यात असलेली भवानी औंध येथे हलवण्यात आली. त्याचे कारण कऱ्हाड येथील प्रतिनिधींचे ठिकाण औंधला गेले होते व केवळ उत्सवासाठी प्रतिनिधींना कऱ्हाडला यावे लागे. कऱ्हाडच्या या भवानीची स्थापना औंधच्या राजवाड्यात खास मंडप बांधून करण्यात आली व तिला कऱ्हाडदेवी असे म्हणण्यात येऊ लागले.

**वसंतगड**

कऱ्हाडहून चिपळूणला जाणाऱ्या ऐतिहासिक हमरस्त्यावर सुमारे ५ कि. मी. अंतरावर वसंतगड हा परिवहन मंडळाचा थांबा आहे. तेथून उत्तरेकडे ३.४ कि.मी. वर वसंतगड (उंची ३०००) हा किल्ला आहे. पूर्वी हा थांबा श्रोत्रीवाडी या नावाने होता. कारण येथे गडाची वतनदार श्रोत्रीमंडळी राहत असत. या

गडावर गडाच्या उत्तरेला पुणे-बंगळूर रस्त्यावर असलेल्या तळबीड या गावातूनही जाता येते. तळबीड हे मोहित्यांचे गाव. शहाजीराजांची पत्नी तुकाबाई, शिवाजी महाराजांची पत्नी सोयराबाई व राजाराम महाराजांची पत्नी ताराबाई या सर्व मोहित्यांकडील. तळबीडच्या बाजूने सुरुवातीला सुमारे दीडशे पायऱ्या लागतात. पुढे मात्र काही नाही. गडाच्या शेजारी आणखी एक डोंगर असून त्याचा शेवट कऱ्हाडच्या दिशेला सुपने येथे होतो. या दोन डोंगरांमधून तळबीडची खिंड लागते. तर गडाच्या पश्चिमेलादेखील गडावरून एक उतार व पुन्हा लगेच डोंगर सुरू होतो. या बेचक्यातच समर्थांची चंद्रगिरी ही घळ आहे.

गडाच्या उत्तरेकडील तटबंदीच्या जरा खाली दोन मोठे वटवृक्ष शेजारी शेजारी उभे असलेले दिसतात. त्यामधूनच गडाची वाट जाते. गडाच्या तटबंदीशी असलेले प्रवेशद्वार एकदम लक्षात येत नाही. शत्रूच्या लक्षात येऊ नये म्हणून दरवाजा एकदम समोर न करता आतल्या बाजूला करतात. त्याला गोमुखपद्धत असे म्हणतात. आता या दरवाजाची प्रचंड पडझड झाली आहे. कारण हा दरवाजा इंग्रजांनी १३ मे १८१८ रोजी तोफांनी जमीनदोस्त करून टाकला. इंग्रज अंमलदार मनरो याच्या नावावर हे दुष्कृत्य आहे. पुढे गेले की बाजूला एका देवळीत श्री गजाननाची चार साडेचार फुटांची एक सुंदर मूर्ती दिसते. शिवकालीन गडाचे दुसरे आवडते दैवत म्हणजे उग्रस्वरूप हनुमान. त्याचीही देवळी गडाच्या दुसऱ्या दरवाजाजवळ म्हणजे नाईकबाजवळ आहे.

गडाच्या माथ्यावर आहे एक प्रचंड लंबगोलाकार मैदान. वाकडेतिकडेपणा नाही. मध्यभागी झाडीचा पुंजका. तेथे चंद्रसेन महाराजांचे मंदिर आहे. इकडे याला चंद्रोबा - चांदोबा असेही म्हणतात. मंदिराच्या भिंतीवर जीर्णोध्दाराच्या काही नोंदी आढळतात. इतिहासाच्या त्या विराट मंचावरून बाद होऊन इतकी वर्षे झाली तरी हा किल्ला जिताजागता राहिला आहे. तो या चंद्रोबामुळेच. या पंचक्रोशीचे हे दैवतच आहे. देऊळ चांगले दगडी असून सभामंडप पण मोठा आहे. गाभाऱ्यात मात्र चांगलाच अंधार आहे. शेजारी वीरभद्र किंवा कोळेश्वराचे, तर समोर जरा खालच्या बाजूला रामाचे

देऊळ आहे. संपूर्ण पडक्या अवस्थेत असलेल्या या निव्वळ छपराला राममंदिर कसे म्हणावे ? या ठिकाणी रामपंचायतनाच्या मूर्ती दोन वेळा बसवल्याचे दिसते. दोन्ही वेळच्या मूर्ती अलीकडीलच पण अतिसुंदर आहेत. जुन्या भंगलेल्या मूर्ती शेजारीच खाली आहेत. तर नव्या चौथऱ्यावर आहेत. त्याही पूर्णपणे छिन्नविच्छिन्न झालेल्या दिसतात. गडावर जनावरांचा वावर मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या मूर्तींना इजा झाल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले.

चंद्रोबा हा शूर्पणखेचा मुलगा. रावणाचा भाचा. खूप तपश्चर्या करून शिवाकडून त्याने खड्ग प्राप्त करून घेतले. शेवटी लक्ष्मणाने त्याचे दोन्ही हात तोडले. सध्याच्या चंद्रोबाच्या मूर्तीला दोन्ही हात अर्धेच आहेत. मात्र शेजारील जी उत्सवमूर्ती आहे ती मात्र पूर्ण हात असलेली आहे.

चंद्रोबाच्या देवळासमोर पूर्वी एक प्रचंड दीपमाळ होती. ती पडली. व तेथे आता तिचे दोन तुकडे छान उभे आहेत. चैत्र वद्य एकादशीला चंद्रोबाची जत्रा भरते. या दोहोदरम्यान एक लहानसे शिवमंदिरपण आहे.

गडाचा जो प्रचंड माथा आहे, त्याच्या भोवती काळीभोर भिंतीवजा नैसर्गिक अशी उंच तटबंदी आहे. त्यावर आवश्यक तेथे बांधकाम करून ते भक्कम केले आहे. त्यामुळे या बांधकामाच्या रूंदीची पायवाट सर्व तटबंदीवर तयार झाली आहे. तटबंदीवर एकूण चार मोठे बुरूजआहेत. त्यापैकी पूर्व व पश्चिमेकडील बुरूज चांगल्या अवस्थेत आहेत. पश्चिम बुरूजावर चढण्यासाठी जिनादेखील आहे. औरंगजेबाचा सरदार मुखलिसखान याच्या पत्रातील उल्लेखाप्रमाणे गडावर एकूण बारा बुरूज व तीन विहिरी होत्या.

गडाला दोन दरवाजे आहेत. दोन्हीही गडाच्या उत्तरेला म्हणजे तळबीडच्या बाजूला आहेत. त्यातील तळबीड दरवाजा पूर्व भागात आहे तर पश्चिम भागात नाईकबा दरवाजा आहे. हा दरवाजा चांगला भव्य आहे. या दरवाजापुढे अर्धवर्तुळाकार भिंत आहे. याही दरवाजाची प्रचंड पडझड झाली व त्याचे अवशेष जवळच पडलेले दिसतात.

गडाच्या दक्षिणणेला कऱ्हाडहून कोकणात जाणारा प्राचीन रस्ता व त्यापलीकडे कोयना नदी आहे. याच बाजूला समोरच आगाशिवाची हीनयानपंथीय लेणी आहेत. त्यामुळे या परिसराला मुसलमानपूर्व काळात देखील महत्त्व होते. शिवाय या काळातदेखील शेजारचे कऱ्हाड हे सुभा म्हणून नव्हे तर राजधानीचे ठिकाण म्हणून महत्त्व पावले होते. आणि म्हणूनच वसंतगड, दातेगड (सुंदरगड), मोरगिरी (गुणवंतगड), भैरवगड अशा संरक्षक किल्ल्यांची रांगच या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आहे. त्यावरून काही ठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणेच हा गड शवाजी महाराजांनी बांधला नसावा. दुसरे असे की अफजलखानाचा वध झाल्यानंतर महाराजांनी पन्हाळ्यापर्यंत एक वादळस्वारी काढली, त्यावेळी त्यांनी वसंतगड घेतल्याचा उल्लेख आहे. तो महाराजांनीच बांधला असता तर स्वराज्याचा सुरवातीच्याच काळात आदिलशाहीकडून का घ्यावा लागला असता? तेव्हा हा किल्ला शिवकालापूर्वीच भोज शिलाहार यापैकी कोणीतरी निर्माण केला असावा. औरंगजेबाने हा किल्ला घेतला त्यावेळी त्याचे नाव किली-द-फतेह असे ठेवले होते.

गडावर पूर्वी चांगल्या मोठ्या अशा दहाबारा तोफा होत्या. आता तेथे काही नाही. पूर्वी गडावरून एक तार पार तळापर्यंत टाकलेलीअसायची. गवताच्या भाराचा हुक या तारेला लावला की तो आपोआप खाली जाई.

सध्या गडावर कृष्ण व कोयना या नावाची दोन लहानशी तळी आहेत.

**सदाशिवगड**

कऱ्हाडपासून पूर्वेला सुमारे ४.५ कि.मी.वर ओगलेवाडी आहे.या ओगलेवाडीच्या दक्षिणेला सदाशिवगड आहे. या गडाचा डोंगर येथूनच सुरू होतो. तो जवळजवळ कुंडलपर्यंत तसाच जातो. कऱ्हाडहून पूर्ववाहिनी झालेली कृष्णानदी येथूनच दक्षिणवाहिनी होते व ती या डोंगराच्याच अंगाने खाली जाते.

गडाची उंची सुमारे ३००० ते ३५०० फूट एवढी असून चढही बराच उभट आहे. किल्ल्याच्या जीर्णोध्दार समितीने अगदी वरपर्यंत पायऱ्या बांधून काढल्या आहेत व वरपर्यंत वीजेच्या दिव्याची पण सोय केली आहे. गडाच्या माथ्यावरून चहूकडील कृष्णा खोऱ्याच्या रम्य परिसर दृष्टिपथात येतो.

माथ्यावर प्रचंड आकाराची सपाटी असून मधोमध महादेवाचे पूर्वाभिमुख मंदिर आहे. मंदिरही आता चांगल्यापैकी बांधले आहे. मूळचे दगडी बांधकाम छोटेखानी असून पुढील सभामंडप नंतर बांधलेला आहे. त्यामुळे येथे दोन नंदी आढळतात. गाभाऱ्यात महादेवाची पिंड असून वैशिष्ट्य म्हणजे तेथेच हनुमंताची मूर्तीपण आहे. गाभाऱ्यावर भव्य घुमट असून तो आतून अष्टादशकोनी आहे. मंदिराच्या प्रांगणात भली मोठी बांधीव विहीर आहे. गडावर पाण्याची टाकी बरीच असावीत. असे एक टाके पश्चिम टोकाला आहे. श्रावणात येथे खूप गर्दी असते आणि महाशिवरात्रीला भंडाऱ्याचा कार्यक्रम असतो.

गडावर इतरत्र कोठेही ऐतिहासिक अवशेष आढळत नाही. पण या गडाच्या आसपास हजारमाची, बाबरमाची, राजमाची व वनवासमाची अशा चार माच्या आहेत. आज त्या नागरी वस्तीने गिळून टाकल्या आहेत. त्यातील हजारमाची ही ओगलेवाडीत किल्ल्याच्या पायथ्याशीच असून तेथून चढाच्या पायऱ्या आहेत. या माच्यावरून हा किल्ला होता हे नक्की. शिवाजी महाराजांनी जे किल्ले बांधले त्यात सदाशिवगडाचे नाव आहे. याचे क्षेत्रफळ २३ एकर असून १८६२ मध्ये हा किल्ला उद्ध्वस्त, पडक्या स्थितीत होता असा उल्लेख गो. रा. माटे यांनी आपल्या सातारा जिल्ह्यावरील पुस्तकात केला आहे.

## सामाजिक अवशेष

कऱ्हाड शहराभोवती मजबूत तट व भुईकोट किल्ल्याभोवती खंदक होता. हा खंदक अर्थातच किल्ल्याच्या गावाकडील भागात म्हणजे पूर्वेकडील बालाजी मंदिराच्या आसपास होता. नगरपालिका शतसांवत्सरिक ग्रंथातील इ. स. १८७१–७२ मधील पेठांच्या हद्दी दिल्या आहेत. त्यातील उल्लेख असा –

शनिवार पेठ – दक्षिणेकडील खंदकाच्या पलीकडील भाग.

गुरूवार पेठ – चावडीवरून मंगळवार वेशीपर्यंत

शुक्रवार पेठ – दाभोळ दरवाजाकडे जाणाऱ्या रस्त्यापर्यंत त्याच्या

पश्चिमेकडील वस्ती.
मंगळवार पेठ - वेशीबाहेरील वस्ती

'साहित्यिक कऱ्हाड' मध्ये गवळवेस, रंगारवेस, मसूरवेस, दाभोळ दरवाजा, ब्राह्मणवेस, बुधवार पेठवेस, मंगळवार पेठ वेस, गाडी उतार वेस असे उल्लेख आहेत.

अतिप्राचीन करहाटक म्हणजे आजच्या मंगळवारपेठेपासून खाली टेंभूपर्यंत व दक्षिणेकडील निमजग्याच्या माळापर्यंतचा भाग होय. या भागात प्रागैतिहासिक काळातील नाणी, पाटे, जाती, टेरेकोटे, शिक्के अशा कितीतरी गोष्टींचा संग्रह कऱ्हाडमधील इतिहासप्रेमी संशोधक भगवानराव घारगे यांनी केला होता. त्याचप्रमाणे पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाने पंताच्या कोटात १९४८-४९ मध्ये उत्खनन केले होते. त्यांनाही मातीच्या भांड्याचे तुकडे, मणी, दगड, शिंपा लोखंड हाडे यांच्यापासून बनवलेल्या वस्तू, बांगड्या, टेरेकोटा, नाणी, रोमन नाण्याच्या प्रतिकृती अशा वस्तू सापडल्या. त्या इ. स. पू. २ रे ते इ. स. २ रे शतक या काळातल्या असाव्यात.

## कऱ्हाडमधील अर्वाचीन स्मारके

### यशवंतराव चव्हाण समाधी

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व भारताचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांचे निधन २५ नोव्हेंबर १९८४ रोजी झाले. त्यांच्या पार्थिवावर २७ नोव्हेंबर १९८४ रोजी कऱ्हाडच्या प्रीतिसंगमावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर कऱ्हाडचे लोकप्रिय नगराध्यक्ष पी. डी. पाटील व शहर नगर परिषद यांच्या पुढाकाराने त्यांच्या दहनस्थानी एक अतिशय सुंदर असे राष्ट्रीय स्मारक उभारण्यात आले. कोल्हापुरचे वास्तुतज्ज्ञ बेरी यांनी या स्मारकाचे आरेखन केले आहे. ही समाधी अष्टकोनी असून तिची लांबी रूंदी २०'X२०' एवढी आहे. समाधीभोवती ८'X६' रूंदीची परिक्रमा आहे. त्याच्या बाहेर १६ फूट रूंद व ४ फूट उंच कठडा आहे. समाधीच्या पूर्वेस पाणघाटावर ३०'X३०' आकाराचा अष्टकोनी चौथरा आहे.

तेथून समाधीकडे जाणाऱ्या मार्गाची रूंदी १५ फूट व लांबी ९५ फूट आहे. वरील चबुतरा, समाधीमार्ग व समाधी आणि तिच्याभोवतालची परिक्रमा ही परस्परास मोठ्या कलात्मकतेने एकमेकाला जोडलेली आहेत. हे सर्व काम गोकाक सँड स्टोनमध्ये तर बांधकामामधील जाळी संगमरवरी आहे. परिक्रमा, चौथरा व मधला मार्ग या सर्वांवर आग्रा टाईल्स तर समाधीच्या सभोवार व माथ्यावर पिंक शेडची ग्रेनाईट स्टोन फरशी बसवलेली आहे. समाधीवर फरशी बसवण्यापूर्वी त्यामध्ये एक ताम्रमंजुषा ठेवलेली आहे. त्यात चव्हाणसाहेबांचे साहित्य, त्यांच्यासंबंधीचे ग्रंथ, त्यांची भाषणे, लेख, नियतकालिके, विशेषांक, दैनिके, साप्ताहिके, पत्रे, छायाचित्रे इत्यादी साहित्य ठेवलेले आहे. मंजुषेवर त्यांचे चरित्र कोरण्यात आले आहे. समाधीचे काम दि. २५ नोव्हें. १९८८ रोजी पूर्ण झाले.

समाधीच्या दक्षिणेला ५०'X२३' आकाराची पर्णकुटी नावाची एक सुरेख इमारत बांधली आहे. त्याचा नक्की उपयोग मात्र नीटसा कळत नाही.

### सौ. वेणुताई चव्हाण स्मारक भवन

यशवंतराव चव्हाण यांच्या पत्नी सौ. वेणुताई चव्हाण यांचे निधन १ जून १९८३ रोजी झाले. त्यानंतर यशवंतरावांनी आपले इच्छापत्र लिहिले, "माझी पत्नी कै. सौ वेणुताई हिचे स्मरणार्थ मी एक सार्वजनिक न्यास करणार आहे. तिने मला खाजगी व सार्वजनिक जीवनात अमोल साथ दिली आहे. त्यासाठी तिची आठवण जागती ठेवणे हा माझ्या जीवनातील उरलेला एकच आनंद आहे. त्या दृष्टीने माझ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. माझ्या गावी कऱ्हाड येथे एखादी जमीन विकत घेऊन त्यावर एखादी वास्तू बांधावी व अशा वास्तूत माझ्या स्वत:च्या ग्रंथालयातील अनमोल ग्रंथ ठेवावेत. तसेच माझ्या जीवनात अनेक व्यक्तींनी व संस्थांनी अनेक वस्तू मला प्रेमाने भेट दिल्याआहेत. त्यांचेही संरक्षण व्हावे व वस्तुसंग्रहालयाच्या रूपाने त्यांचे जतन व्हावे, अशी माझी इच्छा आहे आणि हे ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय माझ्या पत्नीची स्मृती म्हणून त्याच्या दैनंदिन जपणुकीची आणि वाढीची योजना करावी असा संकल्प आहे.

या स्मृतिमंदिरासाठी जी रक्कम लागेल त्यापैकी शक्य तो भाग मी देणार आहे. देणगी म्हणून, माझ्या पत्नीचे दागदागिने आहेत. त्याचे रूपांतर करून जी रक्कम उभी राहील ती सारीच्या सारी या स्मारकास द्यावी. शिवाय मौजे उरळीकांचन येथील बागायत जमीन विकून जी रक्कम येईल ती सारीच्या सारी वरीलप्रमाणेच या न्यासास द्यावी."

७-१०-१९८३ चे हे पत्र आहे व त्याप्रमाणे अस्तित्वात आलेले स्मारक म्हणजे सौ. वेणुताई चव्हाण सभागृह भवन.

आपल्या हयातीतच हे काम व्हावे असा यशवंतरावांचा प्रयत्न होता. त्यासाठी त्यांनी सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट निर्माण केला व १ जून १९८४ रोजी म्हणजे सौ. वेणुताईच्या प्रथम पुण्यतिथीदिवशी त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना उपस्थितीत स्वत:च स्मारकाचे भूमिपूजन केले व वेणुताईंची प्रथम पुण्यतिथी पं. भीमसेन जोशी यांच्या संगीत मैफलीने केली. पुढे २५ नोव्हेंबर १९८४ ला यशवंतरावांचेही निधन झाले. त्यामुळे पुढील कामाची अंमलबजावणी ट्रस्टने केली.

या स्मारकासाठी शिवाजीनगर को.-ऑप. हौसिंग सोसायटीने नाममात्र एक रुपया भाड्याने १७-१८ गुंठे जागा दिली. स्मारकाचे उद्‌घाटन २५ नोव्हेंबर १९९२ रोजी झाले. स्मारकाच्याभोवती सुंदर बाग आहे. दारात यशवंतराव १९६२ पासून वापरत असलेली ॲम्बेसिडर गाडी आहे. स्मारकाच्या आत ३०X८५ फुटांचे सभागृह आहे. त्याच्या दोन्ही बाजूस यशवंतराव व सौ. वेणुताई यांचे अर्धपुतळे आहेत. या सभागृहास लागून २५X३२ फुटांचे ग्रंथालय आहे. तेथे काचेच्या लाकडी कपाटात यशवंतरावांचा सुमारे ७००० दुर्मिळ व मौलिक ग्रंथसंग्रह, तीनशेच्यावर जुन्या मासिकांचे बांधीव गठ्ठे व दुर्मिळ छायाचित्रांचे सारे संग्रह आणि त्यांच्या भाषणांच्या साठ कॅसेटस् आहेत. याशिवाय यशवंतरावांच्या चाळीस वर्षांच्या वैयक्तिक पत्रव्यवहाराच्या असंख्य फायली, हजारो हस्तलिखिते, कागदपत्रे, लेख, भाषणे, मुलाखती व आठवणी, गौरवांक, विशेषांक आदि साहित्य आहे.

या ग्रंथालयाचे रूपांतर संशोधन ग्रंथालयात झाल्याने व त्याचा फायदा

अनेक लोक घेत असल्याने त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे.

ग्रंथालयाच्या दुसऱ्या बाजूस २५X३२ फुटांचे कलादालन आहे. तेथे यशवंतरावांना देश परदेशात भेट मिळालेल्या वस्तू कलात्मक रीतीने ठेवण्यात आलेल्या आहेत. सौ. वेणुताई व यशवंतराव नेहमी वापरत असलेले कपडे व इतर वस्तूही एका काचेच्या पेटीत ठेवण्यात आलेले आहेत.

ग्रंथालयास लागून २०X ३२ फुटांचे दालन आहे. त्यात चाळीस व्यक्तींची बसून वाचण्याची सोय आहे.

यशवंतरावांच्या इच्छेप्रमाणे या स्मारकभवनाच्या पहिल्या मजल्यावर एक सांस्कृतिक सभागृह उभारण्याचे विश्वस्तांनी ठरवले. त्याचे उद्घाटन २१ जून २००१ रोजी पं. भीमसेन जोशी यांच्याच गायनाने झाले. या अद्यावत सभागृहात एकूण ५५३ प्रेक्षकांच्या बसण्याची सोय आहे. संपूर्ण सभागृह हे अत्याधुनिक ध्वनिशास्त्रावर आधारित असून छत व भिंतींची विशेष रचना केली आहे. आधुनिक नाट्यगृहाला व सभागृहाला लागणाऱ्या सर्व सोयी येथे आहेत.

सौ. वेणुताई चव्हाण स्मारक भवन हे केवळ कऱ्हाडलाच नव्हे तर महाराष्ट्राला भूषण असे आहे.

## स्वातंत्र्यसैनिक स्मृती

१९४२ च्या क्रांती आंदोलनाची सुरवात कऱ्हाडमध्ये २४-८-१९४२ रोजी झाली. त्यादिवशी बाळकृष्ण आनंदराव पाटील ऊर्फ दादा उंडाळकर यांचे नेतृत्वाखाली कऱ्हाडच्या मामलेदार कचेरीवर भव्य मोर्चा नेण्यात आला होता. त्यानिमित्ताने मामलेदार (तहसील) कचेरीमध्ये आता एक स्मृतिस्तंभ उभारण्यात आला आहे. तसेच कराड नगरपरिषदेच्या आवारातही एक स्मृतिशिला आहे. तीवर भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कऱ्हाडकर स्वातंत्र्यवीरांची नावे कोरण्यात आली आहेत.

श्री. अंतुले हे मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात सर्वत्र हुतात्मा स्मारके उभारण्याची योजना त्यांनी राबवली.

त्या योजनेअंतर्गत कऱ्हाडच्या दक्षिणेकडे पुणे-बंगळूर हमरस्त्याजवळ असे स्मारक उभारले आहे.

**काही ऐतिहासिक घराणी**

वाईस उंब्रजकर व आंधळीकर असे दोन *देशपांडे* आहेत. वाई परगण्याला प्रथम एकच आंधळीकर देशपांडे होते. तथापि, त्यांच्या घरी एक वेळ कर्ता पुरूष नाही, पोरवडा झाला, त्याचा गैरफायदा घेऊन क्षीरसागर नावाच्या एका मनुष्याने देशपांडेपणाचे वतन थिट्यांच्या घरातील आहे असा बनाव करून विजापूरच्या सुलतानाकडून सनद मिळविली. पुढे आंधळीकर देशपांड्यांची मुले कर्ती झाल्यावर हे वतन परत मिळविण्यासाठी त्यांनी दावा केला. त्या दाव्यासाठी त्यांनी आपले गोत्रज उंब्रजकर म्हणजेच कऱ्हाडकर देशपांड्यांची मदत घेतली व त्या मदतीपोटी आपल्या वतनाचा अर्धा हिस्सा कऱ्हाडकर देशपांड्यांना दिला असे सांगितले जाते.

वाईतील दगडी दरवाजा देशपांड्यांना कऱ्हाडकर (उंब्रजकर) देशपांडे म्हणतात. शिवाजी महाराज व संभाजी महाराजांच्या काळात विजापूरच्या आदिलशहाच्या बाजूने काम करणारा कासी तिमाजी हा या घराण्यातील कर्तबगार पुरुष होऊन गेला. तो धार्मिक वृत्तीचा म्हणून त्याला दियानतराव ही पदवी आदिलशाही दरबारातून मिळाली. (दियानत - धार्मिकता) शाहू गादीवर येईपर्यंत कऱ्हाडकर देशपांडेच प्रमुख होते. १ फेब्रुवारी १६७६ च्या पालीच्या महजरात या देशपांड्यांचा उल्लेख 'देशकुलकर्णी मजकूर (कऱ्हाड) व सरदेशमुखी महालानिहाय' असा आला आहे. कऱ्हाडात कऱ्हाडकर, वाईकर आणि कडेगावकर अशी तीन देशपांड्यांची घराणी मुसलमानी अंमलापासून आहेत.

या घराण्यातील रुद्राजी चंद्रो यांची कन्या म्हणजे समर्थ रामदासांची अनुग्रहित व एकनिष्ठ शिष्या अक्काबाई. त्यांनी रामदासांच्या मृत्यूनंतर सज्जनगडावर सतरा वर्षे व्यवस्था पाहिली. रामदासांचे बंधू श्रेष्ठ यांचे नातू गंगाधरस्वामी यांना जांबेतून आणवून गादीवर बसविले. अक्काबाईंची समाधी सज्जनगडावर आहे.

आदिलशाहीच्या आधीपासूनचे एक प्रसिध्द घराणे म्हणजे *डुबलांचे*. हे क्षत्रिय घराणे चालुक्य-साळुंखे यांचे. पालीच्या महजरात यांचे नाव महाजनांत सापडते. यांच्याकडे देशचौगुलेपणाचे पूर्वापार वतन होते. बटाणे व रामरामी (कुलकर्णी) यांनी ते बळकावले होते. छत्रपतींनी पुढे चौकशी करून ते डुबलांकडे परत दिले. शाहू छत्रपतींची पत्नी सकवारबाई यांचे व बाळोजी डुबल यांचे नाते होते. बाळोजी डुबल यांच्याकडे काही काळ मिरजेचा किल्ला होता. म्हसवडच्या सिध्दनाथ मंदिराचा सभामंडप, कमानी, दीपमाळ आणि जीर्णोध्दार बाळोजी डुबल यांनी केला होता. बाळोजीचा मृत्यू १७४६ च्या सुमारास झाला. त्याची तसेच त्याचा पुत्र शिवाजी व नातू नाथाजी यांच्या समाध्या कृष्णा नदीच्या काठी आहेत. हे घराणे म्हसवडच्या सिध्दनाथ मंदिराचे मानकरी आहेत.

*गिजरे* यांचे घराणे कऱ्हाडातील जुने असून त्याच्या अनेक शाखा आहेत. पैकी एका शाखेतील विश्वनाथभट हा छ. शिवाजी महाराजांचा तीर्थोपाध्याय होता.

छत्रपती शिवाजी महाराजांपासून प्रतापसिंह महाराजांपर्यंत *यादव* घराण्याकडे कऱ्हाडची देशमुखी असावी. हे देशमुख स्वत:ला देवगिरीच्या यादवांचे वंशज समजतात. तोरणा किल्ला घेण्याच्या आणि बांधण्याच्या कामी या घराण्याचा उपयोग शिवाजी महाराजांना झाला होता. यांचे वंशज हल्ली गोवाऱ्यास असतात. इ. स. ११६५ च्या सुमारास शिलाहारांच्या पूर्वी कऱ्हाडात सिंदांचे राज्य असावे. सध्या कऱ्हाडात व कऱ्हाड तालुक्यात शिंदे आडनावाचे मराठे आहेत. ते या सिंदांचे वंशज असणे शक्य आहे. सोमवार पेठेतील पाण्याची टाकी आहे तेथे आणि गुरूवार पेठेत असे या देशमुखांचे दोन वाडे होते.

३० जुलै १६९७ च्या रामचंद्र पंडित अमात्यांच्या सनदेवरून केलेल्या एका यादीत ज्या कऱ्हाडच्या ब्राह्मणांना सैदापूर ( यास आफळापूर व शिवापूर म्हणत.) हे गाव अग्रहार देण्यात आले. त्यामध्ये *गिजरे, ढवळीकर, गरूड* वगैरे ३३ स्मार्तांची *काळे,*

*टोणपे* वगैरे २१ वैष्णवांची आणि *जांभळे, सरडे* या सव्वाशे ब्राह्मणांची आडनावे आहेत.

इ. स. १३९६ ते १४०८ या काळातील दुर्गादेवीच्या दीर्घ दुष्काळानंतर विजयनगरहून दादो नरसिंह *काळे* याने कऱ्हाडास येऊन कऱ्हाड परगणा करून त्यात बावन गावे सामील केली. मुलखात कोणी वतनदार नव्हते. बेदरच्या (बहामनी राज्याच्या) सुलतान अहमदशहा वलींच्या तर्फे दादो नरसिंह काळे यांच्याकडे कऱ्हाड व परिसरातील बावन गावे मुलकी कारभारास होती.

जावली तालुक्यातील बामणोली गावातील शिवदेव चावरे यांचे अंताजी व यमाजी हे दोन मुलगे. परशुराम त्रिंबक पंतप्रतिनिधी यांच्या हाताखाली छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात नोकरीस होते. पंतप्रतिनिधींना सातारा येथे राहावे लागे, तसेच लढाईवर जावे लागे म्हणून त्यांच्या वतीने काम पाहण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी यमाजीस मुखत्यार म्हणून नेमले. त्यांना *मुतालिक* म्हणत. मुतालिक घराण्यातील बरीचशी मंडळी साताऱ्यास वास्तव्य करून राहिली. काहींचे वास्तव्य कऱ्हाडातही होते. कऱ्हाडास कृष्णेच्या घाटापासून जवळच मुतालिकांचा पूर्वाभिमुख वाडा होता. या घराण्यातील नारायणराव ऊर्फ बाळासाहेब कराड नगरपरिषदेचे अध्यक्ष होते. मुतालिकांनी कृष्णाबाईच्या नदीस लागून घाट बांधला आहे. मुतालिकांच्या कऱ्हाडातील वर नमूद केलेल्या वाड्यात काही काळ श्री शिवाजी विद्यालय, तसेच भावेबाईंची शाळा भरत असे. २००० साली या वाड्याच्या जागी श्री कृष्णाबाई उत्सव समितीचे सांस्कृतिक केंद्र व शिशु शिक्षण संस्था यांच्या इमारती उभारल्या आहेत. यमाजी शिवदेवाने (खंडोबाच्या) पालीस देवालयाचे एक महाद्वार बांधले.

आदिलशाही काळापासून *रामरामे, रामरामी ऊर्फ रामनामे* हे कऱ्हाडचे कुलकर्णी म्हणून प्रसिध्द आहेत. १६७२–७३ मध्ये या घराण्यातील पिलदेव रामरामी कुलकर्णी यांनी एक देवालय बांधले असल्याचा उल्लेख एका शिलालेखात आहे. यांच्याकडे डुबल व देशपांडे यांची वतने आली होती. या घराण्याचे वंशज सध्या शुक्रवार पेठेत राहतात.

सध्या हे घराणे धनी कुलकर्णी यांचे म्हणून ओळखले जाते.

*बटाणे* घराणे शिवछत्रपतींच्या वेळेपासून कऱ्हाडात असावे. यांच्याकडे काही काळ देशचौगुलेपणाचे वतन असावे. ते डुबलांनी भांडून परत घेतले. शिखर शिंगणापूर येथे प्रतिवर्षी चैत्रात बटाणे यांची दिंडी जाते, तिला मोठा मान आहे. खंडोबाच्या पालीसही बटाणे यांना पालखीचा मान आहे. हे घराणे लिंगायत असून कृष्णा नदीकाठी त्या घराण्यातील पुरूषांची शिवलिंगे आहेत.

अहमदनगरपासून तीन मैलांवर असलेल्या भिंगारे गावचे पाटील भिमाजी त्र्यंबक कुलकर्णी व जोशी यांना छत्रपती राजाराम महाराजांनी रेठरे बुद्रुक, गोंदी, खुबी, ही गावे १६९९ मध्ये इनाम दिली. त्यांच्यापैकी भीवराव रेठरेकर सेनापती दाभाडे यांच्याकडे फडणीस होते. एकदा बाळाजी विश्वनाथांवर प्राणसंकट कोसळले त्या वेळी भीवराव रेठरेकरांनी त्यांना रेठरे येथील वाड्यातील देवघरामागील भुयारात आश्रय देऊन संरक्षण केले. त्यामुळे रेठरेकर व बाळाजी विश्वनाथ यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. भीवराव रेठरेकरांचे पुत्र बाजीराव हे छत्रपती शाहू महाराजांच्या हुजरातीचे सरदार होते, आणि ते थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या प्रभावळीत होते. १७३४ मध्ये छत्रपतींच्या तक्ताचा रायगड पुन्हा स्वराज्यात दाखल करण्यामध्ये बाजी भीवराव रेठरेकरांचा मोठा वाटा होता.

वसईच्या मोहिमेत (१७३७-३९) तारापूरच्या हल्ल्यात बाजी भीवराव रेठरेकर लढता लढता पडले. त्या वेळी बाजी भीवरावांच्या आईचे सांत्वन करण्यासाठी बाजीराव पेशवे यांनी लिहिलेल्या पत्रात, "मीच तुमचा बाजीराव असा विवेक करून धीर धरावा " असा हृद्य मजकूर आहे. पानिपतावर (१७६१मध्ये) नारायण बापूजी रेठरेकर लढले आणि १७९५ च्या खर्ड्याच्या लढाईत त्र्यंबक गंगाधर रेठरेकर होते. पेशवाई नष्ट झाल्यावर बाजीरावांना ब्रह्मावर्तापर्यंत पोचविण्यासाठी त्र्यंबकराव रेठरेकर गेले होते. या रेठरेकरांचे वंशज सध्या कऱ्हाडातील स्थायिक झाले आहेत.

कऱ्हाडात *मुजावर, मुल्ला, मुतवल्ली, पटेल, काझी, खैरतखान, खतीब, पठाण, इनामदार* अशी जुनी सनदी मुस्लिम घराणी आहेत.

(१) मुस्लिम देवस्थानाची धार्मिक व्यवस्था पाहणारे ते *मुजावर* मौलालीच्या दर्ग्याचे, ख्वाजा खिजरच्या दर्ग्याचे, मंगळवारात करडीपीराचे व कोटाखाली राजे बक्सारचे अशी मुजावर घराणी आहेत. दर्ग्यातील मुजावर सय्यद वंशातील व ते मूळ कऱ्हाडचेच असावे.

(२) मशिदीची साफसफाई, दिवाबत्ती व बकरी कापणे हे काम *मुल्ला* करतात. जुम्मा मशिदीचे मुल्ला यांची नेमणूक सोळाव्या शतकात झाली असावी.

(३) दर्ग्याच्या व्यवस्थापकांना *मुतवल्ली* म्हणतात. विजापूरच्या आदिलशहाने सोळाव्या शतकात मीर फक्रुद्दिन अहमद यजदी याना अलीची कदमगाह, नबीचा रोजा, बारा इमाम , लंगरसाब यांची व्यवस्था पाहण्यासाठी पाठविले.

(४) कऱ्हाडातील *पटेल* पूर्वी गुरुवार पेठेतील सध्याच्या कागदी वाड्यात राहात. त्या गल्लीला पटेल गल्ली म्हणत. आता पटेल मंडळी शनिवार पेठेत राहतात.

(५) न्यायदान व धार्मिक विधी करणारे ते *काझी.* रविवार पेठेत काझीवाडा आहे. राजस्थानमधील नागोर गावच्या अली असगर या सय्यद घराण्यातील व्यक्तीची विजापूर दरबाराकडून कऱ्हाडचे काझी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. या घराण्यास लोक मानतात. सनदेप्रमाणे काझीचा धार्मिक विधी करणारे खाजामिया काझी हे शेवटचे काझी होत.

(६) आदिलशाहीतील वजीर दिलावरखान हबशी यांचा मुलगा *खैरतखान.* ते पाच हजारी मनसबदार होते. ( मृ. १६४८) यांचे मूळचे आडनाव मुल्लाच होय. हे घराणे सोमवार पेठेत राहते.

(७) *खतीब* लोकांची वस्ती गुरुवार पेठेत आहे. औरंगजेब बादशहाने त्यांना जुम्मा मशीद व इदगाहमध्ये खुदबा पढण्याची सनद दिली आहे. ( इ. स. १७०६) मूळ पुरूष शेख महमंद हुसेन व शेख महंमद अल्ली होय.

(८) मंगळवार पेठेतील *पठाण* हे सनदी घराणे आहे. वस्ताद हसन मुजावर यांचे आजोळ पठाण घराणे होय.

(९) घोगावच्या मुल्लांना कऱ्हाड येथे इनाम होते. म्हणून कऱ्हाडात त्यांना *इनामदार* नाव पडले. गुरूवार दर्ग्याजवळ यांचा वाडा आहे.

*****

४

# कऱ्हाडची नगरपरिषद

१८१८ मध्ये ब्रिटिशांचे राज्य भारतामध्ये सुरू झाले. आपले आसन बळकट करण्याच्या दृष्टीने रेल्वे, पोस्ट, जमिनी, मिळकतींची मोजणी, नकाशे अशा अनेक यंत्रणा त्यांनी भारतात राबविल्या, रुजविल्या. स्थानिक स्वराज्याचा उपक्रम हा त्यांपैकीच एक. मुंबई सरकारने १८५० साली नगरपरिषदांचा पहिला कायदा करून शहर सफाईसारख्या स्थानिक स्वरूपाच्या प्राथमिक बाबी शहरातील प्रमुख नागरिकांवर सोपविण्यास सुरुवात केली. लोकांच्या मागणीवरून त्यांच्या शहरात नगरपरिषद स्थापन केली जाई. त्यावेळच्या सातारा जिल्ह्यात आष्टा, इस्लामपूर, रहिमतपूर, सातारा, वाई इ. ठिकाणी नगरपरिषदा अशा पद्धतीने स्थापन झाल्या होत्या. कऱ्हाड हे शहर सातारा जिल्ह्यातील असले तरी ते प्रतिनिधींच्या जहागिरीत समाविष्ट होते. कऱ्हाडचे मध्यवर्ती स्थान लक्षात घेऊन ब्रिटिशांनी औंध प्रतिनिधींना काही गावांचा मोबदला देऊन कऱ्हाड आपल्या ताब्यात घेतले व कऱ्हाड येथे १५-९-१८५५ रोजी नगरपरिषद स्थापन केली.

शहराचे आरोग्य व स्थानिक सोयी सुविधा हे प्रश्न नागरिकांनी आपले आपण स्वावलंबनाने सोडवावेत आणि नागरी जीवन सुधारावे हा स्थानिक स्वराज्य संस्थांचा निर्मितीमागील एक उदात्त हेतू होता. लोकांचे सहकार्य हे राज्यसत्तेचे अधिष्ठान आहे. त्यामुळे लोकांच्या हाती कारभार सोपवत असतानाच हा प्रयोग अंगलट येऊ नये म्हणून ब्रिटिश सरकारने प्रथमपासून कमालीची सावधगिरी बाळगली होती त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रगती अत्यंत संथपणे झाली होती. हाती येणारी सत्ता, त्यामुळे हाताळता येणारी मत्ता व त्या लोभामुळे निर्माण होणारी अनिष्ट स्पर्धा, तीव्र मतभेद यामुळे स्थानिक स्वराज्याची

प्रगती खुंटली हेही तेवढेच खरे आहे. त्यामुळे 'खराट्याचे स्वराज्य', 'गटारगंगा' अशा शब्दांत स्थानिक स्वराज्याची संभावनाही केली गेली. ही संभावना अगदीच निराधार नाही, पण एकांगी आणि अपुऱ्या माहितीवर आधारित असण्याची शक्यता आहे. पण विधायक, दूरदृष्टीच्या, चिकित्सक, अभ्यासू मनोवृत्तीच्या नेतृत्वामुळे नगरपरिषद शहराच्या विकासासाठी आणि उत्कर्षासाठी मूलभूत सोयी–सुविधा निर्माण करू शकतात आणि त्यामुळे शहराचा चेहरा–मोहराही बदलू शकतात, हेही लक्षात घेणे आवश्यक आहे.

प्रतिकूल परिस्थितीतही साधनसामुग्री आणि तंत्रज्ञान तुटपुंजे असतानाही भविष्याचा वेध घेऊन ज्या मोजक्या नगरपरिषदांनी यशस्वी पावले टाकली त्या मोजक्या नगरपरिषदांत कराड नगरपरिषदेचा समावेश होतो. स्वच्छ पाणीपुरवठा, सांडपाण्याचा आणि मैल्याचा भुयारी गटारयोजनेअंतर्गत निचरा, रस्ता–रुंदी यासारख्या मूलभूत सोयींपासून वाचनालय, उद्यान, क्रीडांगण, रंगमंच अशासारख्या सांस्कृतिक उपक्रमांतर्गत अनेक गोष्टी कराड नगरपरिषदेच्या सुमारे दीडशे वर्षांच्या वाटचालीत होऊ शकल्या.

**नागरिकांना मताधिकार**

१८८४ च्या कायद्याने नागरिकांना मताचा अधिकार प्राप्त झाला. पण तो फक्त नगरपरिषदेच्या हद्दीतील पदवीधर, वकील, ऑनररी मॅजिस्ट्रेट आणि नगरपरिषदेस वार्षिक किमान दीड रूपया कर भरणारे एवढ्यांनाच होता. १८८५ मध्ये शहराची लोकसंख्या १०,७७८ होती, शहरात घरे २०९९ होती आणि एकूण मतदारांची लोकसंख्या होती फक्त २४६. १९२३ पासून वार्षिक ४ आणे प्रत्यक्ष कर देणाऱ्या नागरिकांना मतांचा अधिकार प्राप्त झाला. नगरपरिषद हद्दीतील अगर हद्दीबाहेरच्या दोन मैलांतील इमारतींचे वार्षिक किमान १२ रू. भाडे येत असेल अशा घरमालकांना मतदानाचा अधिकार १९३८ पासून मिळाला. त्यावेळी लोकसंख्या १७,९६६ होती आणि मतदार संख्या ३७८५ एवढी झाली. १९४९ च्या निवडणुकीपासून एका उमेदवारास एकापेक्षा अधिक मते देऊ नयेत असा निर्बंध घालण्यात आला. वयात आलेल्या प्रत्येक नागरिकाला मत देण्याचा हक्क १९५० च्या प्रौढ मतदान कायद्याने प्राप्त झाला. नगरपालिकेच्या १९५२ पासूनच्या निवडणुकांना तो लागू झाला.

## राखीव जागा

लोकनियुक्त नगरसेवकांच्या जागांपैकी स्त्रियांसाठी राखीव जागा १९२४ पासून होती. तरी एकही स्त्री निवडणुकीला उभी राहिली नव्हती. १९३८ पासून स्त्रियांसाठी राखीव जागा फेरपाळीने ठेवल्या जाऊ लागल्या. अनुसूचित जाती – जमातीसाठी राखीव जागा १९३८ पासून ठेवण्यात येऊ लागली. १९२६ सालांपासून अल्पसंख्य मुस्लीम समाजास निश्चित प्रतिनिधित्व मिळावे म्हणून स्वतंत्र प्रभाग (वार्ड) निर्माण करण्यात आला. १९४९ पासून मुस्लीमांसाठी वेगळा प्रभाग ठेवण्याची पद्धत रद्द झाली . १८५५ पासून १८८५ पर्यंत सर्वच नगरसेवक नामनिर्देशित असत. १८५५ मध्ये ही संख्या १/२, १९२० मध्ये १/३ व १९२३ पासून १/५ वर आली. १९३८ पासून सरकारनियुक्त नामनिर्देशित सभासदत्व पूर्ण बंद झाले . १९६७ – ६८ पासून लोकनियुक्त सभासदांच्या दहा टक्के व्यक्तींना स्वीकृत सदस्य म्हणून घेतले जाते.

नगरपरिषद स्थापनेवेळी सरकारने नेमलेल्या सभासदांची मुदत १८५५ ते १८५८ अशी तीन वर्षांची होती. पुढे १८५८ ते १८६७ (नऊ वर्षे), १८६७–१८७७ (दहा वर्षे), १८७७–१८८५ (आठ वर्षे) अशा वेगवेगळ्या कार्यकाळांसाठी सभासदांच्या नेमणुका झालेल्या दिसतात. १८८५ मध्ये पहिल्या निवडणुकीत सभासदांची निवड चार वर्षासाठी झाली. त्यानंतर १८८९, १८९२, १८९५, १८९८, १९०१, १९०४, १९०७, १९१०, १९१३ व १९१६ अशा दर तीन वर्षांनी नगरपालिकेच्या निवडणुका होत गेल्या. मात्र १ एप्रिल १९१६ रोजी निवडून आलेल्या बोर्डाची मुदत एका वर्षांसाठी वाढवून ती १९२० पर्यंत केली होती. पुन्हा १९२०, १९२३, १९२६, १९२९, १९३२, १९३५, १९३८ अशा दर तीन वर्षांनी निवडणुक होत गेल्या. १ नोव्हेंबर १९३८ रोजी अधिकारावर आलेले बोर्ड १९ डिसेंबर १९४० पासून सरकारने बरखास्त केले. १९४३ मध्ये पुन्हा निवडणुका तीन वर्षांसाठी झाल्या. १९४६, १९४९ व १९५२ मध्येही प्रत्येक बोर्डाचा कार्यकाळ तीन वर्षांचा होता. मात्र १९५४ मध्ये म्यु. बरोज् ॲक्टमध्ये झालेल्या दुरुस्तीमुळे १९५२ मध्ये अधिकारावर आलेल्या बोर्डाचा कार्यकाळ तीन वर्षांऐवजी चार वर्षांचा (१ डिसेंबर १९५६ पर्यंत ) झाला. त्यानंतरही डिसेंबर १९५७ अखेर त्याच बोर्डास मुदत वाढ मिळाली. १९५८ मध्ये निवडून आलेल्या बोर्डाची मुदत चार वर्षे राहिली.

१९६२ व १९६७ मधील निवडणुका फक्त पाच वर्षांच्या मुदतीसाठीच झाल्या. १९६७ मध्ये अधिकारावर आलेल्या बोर्डाची मुदत वरचेवर वाढत ते बोर्ड १९७४ अखेर होते. १९७४ मध्ये पाच वर्षांसाठी अधिकारावर आलेल्या बोर्डाचा कार्यकाळही वाढत १९८१ अखेर राहिला. १९८१ पासूनच प्रशासकीय कारकीर्दीनंतर १९८५ मध्ये पाच वर्षांसाठी निवडून आलेल्या बोर्डाला १९९१ अखेर मुदतवाढ मिळाली. १९९६ , २००१ व २००६ च्या निवडणुका प्रत्येकी पाच वर्षांसाठी झाल्या.

## नगराध्यक्ष निवड

१८५५ पासूनच नगरपरिषदेच्या कारभारावर जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण आहे. १८८५ पर्यंत जिल्हाधिकारीच समितीचे अध्यक्ष असत. १८८५ पासून सरकारने नगरसेवकांमधून अध्यक्ष नेमावयास सुरूवात केली १ एप्रिल १९०९ पासून नगरपरिषदेस स्वत:चा अध्यक्ष निवडण्याचा अधिकार मिळाला. नगरसेवकांतील आपापसातील मतभेदांमुळे १९१६ ते १९२० या हक्काला स्थगिती मिळाली. तर १९४० ते १९४३ या काळात प्रशासक नियुक्ती होती. १९१० पासून १९४६ पर्यंत नगराध्यक्षपदाची मुदत तीन वर्षांची होती. १९४६ पासून एकेका वर्षासाठी अध्यक्ष-उपाध्यक्षाची निवडणूक होऊ लागली. नगराध्यक्षांची निवड निवडून आलेल्या नगरसेवकांनीच आपल्यामधून करावयाची पद्धत आहे. १९७४ साली व त्यानंतर २००१ साली पुन्हा शहरातील सर्व मतदारांनी मिळून नगराध्यक्षांची निवडणूक त्यावेळच्या कायद्यातील दुरुस्तीप्रमाणे केली तो अपवाद. १९९६ पासून नगराध्यक्षाची निवड स्त्री, अनुसूचित जाती/ जमाती, सर्व साधारण यापैकी कोण आणि कोणत्या काळासाठी असेल ते चिठ्ठ्या (लॉट) टाकून ठरविले जाऊ लागले.

## समित्या

नगरपरिषदेच्या बहुतेक सर्व कारभार सर्वसाधारण समितीच्या कक्षेत येत असला तरी दैनंदिन कामांचे निर्णय व अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने १८६८ – ६९ पासून समितीने प्रतिवर्षी निवडावयाच्या व्यवस्थापन समितीची स्थापना झाली. १९४६ पासून या समितीस स्थायी समिती संबोधितात. नगरपरिषदेचे कामाचे स्वरूप व आवाका वाढत गेल्यामुळे दर वर्षी वेगवेगळ्या विषय समित्या निवडल्या जाऊ लागल्या. अशा विषय समित्यांना त्यांच्यातील विशिष्ट कामापुरते स्थायी समितीचे अधिकार मर्यादित होतात.

## सेवकवर्ग

नगरपरिषदेच्या प्रारंभीच्या काळात गावकामगार कुलकर्णीच नगरपरिषदेच्याही लिखाणाचे काम करीत. १८५६ मध्ये लिखाई व हिशोबासाठी कारकून म्हणून नेमण्यात आलेल्या तुकाराम भिकाजी कुलकर्णी, चरेगावकर यांनाच १८७६ मध्ये नगरपरिषदेत निर्माण केलेल्या सेक्रेटरी पदावर नेमण्यात आली. १९२१ पासून एक्झिक्युटिव्ह ऑफीसर व १९४६ मध्ये बरो म्युनिसिपालिटीचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे चीफ ऑफीसर पद निर्माण करण्यात आले. या पदावर अनंत सखाराम विद्वांस इंजिनिअर यांना बढती देण्यात आली. त्यांच्या निवृत्तीनंतर १९४७ ते १९७४ एवढा प्रदीर्घ काळ श्रीपाद रामचंद्र उर्फ अप्पासाहेब देशपांडे यांनी नगरपरिषदेच्या प्रशासनावर आपला ठसा उमटविला होता. १९७३ – ७४ पासून मुख्याधिकारी हा केवळ कऱ्हाड नगरपरिषदेचा सेवक न राहता तो शासकीय सेवक झाला. मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या सुमारे ५३२ सेवक वेगवेगळया विभागात कार्यरत असून नगरपरिषदेच्या एकूण उत्पनापैकी ३९% खर्च मनुष्य बळ व्यवस्थापनासाठी होत आहे.

## अर्थव्यवहार

**उत्पन्न –** कऱ्हाड नगर परिषदेच्या जकात, छापा (कापडावर शिक्के मारणे) व तपकीर खोती एवढेच अप्रत्यक्ष कर नगरपरिषदेकडे होते. १८७ पर्यंत नागरिकांवर कोणताही प्रत्यक्ष कर नगरपरिषदेने बसविला नव्हता. पहिल्या पाणी पुरवठा योजनेसाठी खर्चाची तरतूद करण्यासाठी १८ मे १८६८ रोजी नगर परिषदेने शहरातील घरांवर घरपट्टी बसविण्याचा निर्णय घेतला. १८९०–९१ मध्ये भंगीपट्टी, १८९५ मध्ये सार्वजनिक भंगीपट्टी, १९१५ मध्ये चाकपट्टी व दस्तुरी, १९१८ पासून पाणीपट्टी, १–४–१९४२ पासून प्रकाशपट्टी, मनोरंजनगृह (थिएटर) कर, १–९–१९४१ पासून हॉटेल परवाना, १९५१ पासून सायकलकर, १५–११–१९७७ पासून जलनि:स्सारण कर तसेच वृक्षकर, कोंडवाडा, विशेष शिक्षणकर इ. विविध कर सुरू करण्यात आले. जकात वसूल करण्याचा मक्ता लिलावाने दिला जाई. ही मक्त्याची पध्दत बंद करून नगरपरिषदेने १८७८ पासून स्वत:च जकात वसुलीस आरंभ केला. छापा म्हणून ओळखला जाणारा कर

१४ एप्रिल १८८७ पासून रद्द करण्यात आला. नगरपरिषदेने ४ ऑक्टोबर १९०९ च्या सर्वसाधारण सभेत 'नगरपरिषदेने जकात पूर्णत: बंद करावी'. असा ठराव बहुमताने करण्यात आला. कमिशनरची परवानगी न घेताच ५ नोव्हेंबर १९०९ पासून या ठरावाची अंमलबजावणीही सुरू केली. जकातीची नाकी उठवून नाकेदारही कमी केले. तथापि नगरपरिषदेने वाहनांवर चाकपट्टी इ. नवीन बसविलेल्या करांना संमती देण्यापूर्वी जकात परत बसविली पाहिजे अशी आग्रही भूमिका कमिशनर यांनी घेतल्यामुळे २२ एप्रिल १९१० पासून नगरपरिषदेने पुन्हा जकात घेण्यास सुरूवात केली.

कऱ्हाडात शेंगा, गूळ, हळद व अन्य शेतीमालाची आवक मोठ्या प्रमाणावर होत असे. तथापि सदरचा माल अखेरीस बाहेर जाणारा असल्यामुळे त्याच्यावर घेतलेल्या जकातीचा परतावा द्यावा लागे. यासाठी होणारा व्याप, खर्च, वेळ यांचा विचार करून नगरपरिषदेने जकातीऐवजी गाडीस ३ आणे प्रमाणे टर्मिनल टॅक्सची अंमलबजावणी १९२३ पासून सुरू झाली. नगरपरिषदेला टर्मिनल टॅक्स वसूल करता येणार नाही अशी भूमिका शासनाने घेतल्यामुळे शेतीमालावर १९२३ पासून घेण्यात येत असलेल्या टर्मिनल टॅक्सऐवजी नगरपरिषदेने जकातीचे प्रमाण कमी करून ते दर १ नोव्हेंबर १९५४ पासून अंमलात आणले. मध्यंतरी जकात वसुली मक्ते देऊन करावी असे आदेश शासनाने दिले. १९९४-९५ मध्ये प्रीतिसंगम कन्स्ट्रक्शन कंपनीस जकात वसुलीचा मक्ताही लिलाव करून देण्यात आला. पण पुन्हा १९९५ पासून हे काम नगरपरिषदेने स्वत:कडेच ठेवले. शासनाने १ मे १९९९ पासून नगर परिषदांकडील जकात पूर्णपणे बंद केली आहे.

सार्वजनिक संडास सफाईसाठी लागणारी साधने व भंगी नोकर यांच्या खर्चात बचत व्हावी म्हणून खाजगी संडास सफाईचे काम नगरपरिषदेतर्फे करावे आणि त्या कामासाठी येणाऱ्या खर्चाची तोंडमिळवणी होईल अशा रीतीने भंगीपट्टीची आकारणी खाजगी संडासांवर करावी असे नगरपरिषदेने ९ ऑक्टोबर १८८८ रोजी ठरविले. भंगीपट्टीची आकारणी संडास वापरणाऱ्या माणसांच्या संख्येवर करण्यात आली. खाजगी संडासांची संख्या कमी होती. त्यामुळे वापरदारांच्या संख्येऐवजी शहरातील सर्वच घरांवर सरसकट सार्वजनिक भंगीपट्टी बसविल्यास घराघरातून संडास बांधले

जातील व त्यामुळे शहराचे आरोग्यही सुधारेल या दृष्टीने १८९५-९६ पासून घरांच्या प्रतवारीवर सार्वजनिक भंगीपट्टी आकारण्यास सुरूवात झाली. १ एप्रिल १९८३ पासून भंगीपट्टी ऐवजी जलनि:स्सारण कर आकारण्यात येऊ लागला.

कृष्णा कॅनॉलचे पाणी नागरिकांना पिण्यासाठी पुरविण्याच्या योजनेच्या खर्चाची तरतूद करण्यासाठी १८ मे १८६८ रोजी शहरातील घरांवर घरपट्टी बसविण्याचा निर्णय नगर परिषदेने घेतला.१८७८-७९ पासून घरपट्टी ऐवजी कचरापट्टी आकारण्यात येऊ लागली.पण उत्पन्न कमी येते आहे हे लक्षात घेऊन प्रत्येक घराच्या किंमतीवर घरपट्टी आकारण्याचा निर्णय १७ ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. घराच्या किंमतीऐवजी घरभाड्याची रक्कम पायाभूत (रेंटल व्हॅल्युएशन बेसिस ) धरुन १९२० मध्ये घरपट्टीचे दरपत्रक तयार करण्यात आले. या प्रमाणे १९२३ - २४ पासून १९५१ - ५२ अखेर आकारणी होई.

नगरपरिषदेने वेळोवेळी बसविलेले वेगवेगळे कर रद्द करून त्याऐवजी स्थावर मिळकतीच्या घरभाड्यावर शे. २० प्रमाणे संकलित कर बसवावा अशी सरकारी सूचना नगर परिषदेने १९५१ मध्ये मान्य करून शेकडा १५ ५/८ प्रमाणे संकलित कर बसविण्यास१ एप्रिल १९५३ पासून सुरूवात झाली. दर चार वर्षांनी शहरातील सर्व मिळकतीचे पुनर्मूल्यांकन करण्यात येते. संकलित कराबरोबरच जलनि:स्सारण कर ७ टक्के, वृक्षकर १ टक्के, विशेष शिक्षण कर १ टक्के घेतला जातो. तसेच शिक्षण कर व रोजगार हमी करही आकारतात.

नगरपरिषदेची पाणीपुरवठ्याची मोठी योजना १९१८ मध्ये पूर्ण झाली, त्या योजनेसाठी घेतलेल्या कर्जाची फेड करणे व पाणीपुरवठ्यासाठी लागणारा खर्च भागविणे यासाठी १९१८-१९ पासून पाणीपट्टी आकारणी सुरू झाली.सुरूवातीस पाणीपट्टीचे दर खाजगी आणि सार्वजनिक पाणीपट्टी अशी दुहेरी आकारली जाई. १९५४ पासून मीटर पद्धतीने पाणीपुरवठा सुरू झाला. वेळोवेळी दर वाढत गेले. १ एप्रिल २००५ पासून घरगुती वापरासाठी मीटरप्रमाणे १००० लिटर्ससाठी ५ रू. ८५ पैसे किंवा १/२" जोडणीसाठी वार्षिक रू. ९६० या प्रमाणे आकारणी होत आहे.

नगरपरिषदेच्या विविध महसुली उत्पन्नाच्या बाबींमध्ये वरील करांखेरीज

हातगाडा परवाना फी (१-७-१९९० पासून), अन्नभेसळ प्रतिबंधक परवाना, तपकीर परवाना फी, टाऊनप्लॅनिंग वर्गणी, विकास निधी (१०-८-१९९२), दवाखाना नोंदणी फी यांचा समावेश होतो.

नगरपरिषदेच्या मालकीच्या मिळकती खाजगी किंवा सार्वजनिक कामासाठी ठराविक काळासाठी भाड्याने दिल्यामुळे मिळणारे उत्पन्न, फटाके स्टॉल भाडे, स्मृतिसदन, नाट्यगृह भाडे, सार्वजनिक बाजारपेठेत खुल्या जागेची परवाना फी, कत्तलखाना फी, पाणी जोडणी, मीटर भाडे, पाणीपुरवठा, नोटीस फी, वॉरंट फी, अतिक्रमण भाडे, ग्रंथालय वर्गणी, संकलित कर व पाणीपट्टी येणेवरील व्याज, संकलित कर अपील फी, नाव दाखल फॉर्म फी, बॅडमिंटन कोर्ट, टेबल टेनिस, स्टेडियम ग्राऊंडपासून नगरपरिषदेस उत्पन्न मिळते.

नगरपरिषदेस तिची कामे पार पाडण्यासाठीकर व दर यातून मिळणारे उत्पन्न मर्यादित असते.त्यामुळे प्रशासनासाठी येणारा खर्च व नगरविकासासाठी येणाऱ्या खर्चापोटी अनुदाने व अंशदाने प्राप्त होतात.

नगरपरिषदेकडील मोठ्या विकासकामांसाठी शासनाकडून किंवा जनतेकडूनही कर्जे घेऊन निधी उभा केला जातो.

## खर्च

नगरपरिषदेकडील खर्चांच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत. (अ) सामान्य प्रशासन व वसुली (ब) अग्निशमन, दिवाबत्ती, मोकाट जनावरांचा बंदोबस्त या सार्वजनिक सुरक्षिततेच्याबाबी (क) पाणीपुरवठा, साफसफाई, रूग्णालय-दवाखाने, जलनि:स्सारण, जन्ममृत्यू नोंदी, साथींचा प्रतिबंध, बाजारपेठा व कत्तलखाने, दफनभूमी-स्मशानभूमी, कोंडवाडे, पथिकाश्रम, सराई, सार्वजनिक सभागृहे, सार्वजनिक उद्याने, प्रायोगिक शेती, बांधकामे इ. सार्वजनिक सुविधांच्या बाबी, (ड) शिक्षण, ग्रंथालय, सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला, (इ) जमीन महसूल, स्थानिक स्वराज्य संस्थांची वर्गणी, नैसर्गिक आपत्ती मदत कामे यासाठी अंशदाने, वर्गण्या (फ) कर्जावरील व्याजे, घसारा, निवडणूक खर्च, मानपत्रे, सत्कार समारंभ, बेवारस प्रेतनिवारण इ. संकीर्ण खर्च. (ग) गाळयांची भाडी, पे अँड पार्क, जाहिरात इ.

| खर्चाच्या बाबी | १८५५-५६ | २००५-०६ |
|---|---|---|
| (अ) सामान्य प्रशासन व वसुली | ७२ | २,४५,२१,२१० |
| (ब) सार्वजनिक सुरक्षितता | ... | ६९,०८,४३० |
| (क) सार्वजनिक आरोग्य व सोयी | ११९ | १२,३५,६३,३७० |
| (ड) शिक्षण | ... | ४४,९८,५३० |
| (इ) अंशदाने | ... | २,०६,००० |
| (फ) संकीर्ण | ... | ४७,४२,५०२ |
| एकूण रूपये | १९१ | १६,४४,४०,०४२ |

| उत्पन्नबाब | १८५५-५६ | २००५-०६ |
|---|---|---|
| (अ) कर व दर | ११७० | ३,८५,२४,७०२ |
| (ब) विशेष अधिनियमांखाली वसुली | ७० | १६,९०,००० |
| (क) मिळकती व सेवापासून | ... | ५१,८७,७६५ |
| (ड) अनुदाने व अंशदाने | ३५० | १०,७७,७२,७२१ |
| (इ) संकीर्ण | ... | ८९,९४,१२८ |
| एकूण रूपये | १५९० | १६,२१,६९,३१६ |

## पहिली निवडणूक

नगरपरिषदेला स्थानिक स्वराज्य संस्था म्हणत असले तरी कराड नगरपरिषदेत नागरिकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी आले ते नगरपरिषदेच्या स्थापनेनंतर तीस वर्षांनी. १८८४ च्या नगरपरिषद कायद्याप्रमाणे कराड नगरपरिषदेची पहिली निवडणूक १८८५ मध्ये झाली. त्या वेळच्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण समितीने या निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी ३-२-१८८५ रोजी मनोहर ईश्वरा बटाणे, चाँदशा मनेशा काझी आणि तुकाराम सखाराम हिरवे या तिघांची एक उपसमिती निवडली. प्रत्येक प्रभागातून (वॉर्ड) एक याप्रमाणे सहा प्रभागांतून सहा सभासदांची निवड गुप्त मतदान पद्धतीने दि. १० जुलै १८८५ रोजी झाली. सकाळी ८ ते ११

या वेळात सोमवार प्रभागाचे व्यंकोबाच्या देवळात, गुरुवार प्रभागाचे चावडीत, शुक्रवार प्रभागाचे विठोबाच्या देवळात मतदान झाले. दुपारी ३ ते ६ या वेळात मंगळवार-बुधवार प्रभागाचे ज्योतिबाच्या देवळात, शनिवार प्रभागाचे नगरपरिषदेच्या दस्तुरी घरात आणि रविवार प्रभागाचे घाटे यांच्या लक्ष्मी-नारायणाच्या देवळात याप्रमाणे मतदान झाले. सहा जागांसाठी १४ उमेदवार उभे होते. तर एकूण मतदार २४६ होते, पैकी १५२ जणांनीच मतदान केले.या निवडणुकीतील गंमतीचा भाग म्हणजे निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी नेमलेल्या समितीचे एक सभासद चाँदशा मनेशा काझी हे उमेदवार म्हणून उभेही राहिले होते व ते निवडूनही आले. तसेच रामचंद्र विष्णू उर्फ भाऊसाहेब भागवत हे सोमवार, गुरुवार आणि रविवार या तीन प्रभागांतून उमेदवार म्हणूनही उभे होते आणि त्या पैकी दोन प्रभागात मतदान अधिकारी (पोलिंग ऑफिसर) म्हणूनही त्यांनी काम पाहिले. तेही निवडून आले. शुक्रवार आणि शनिवार या प्रभागात प्रत्येकी एकच उमेदवार असूनही तेथे मतदान का झाले कळत नाही. दुसऱ्या दिवशी दि. ११ जुलै १८८५ रोजी सर्वसाधारण समितीपुढे मतमोजणी झाली. तिचा तपशील पुढीलप्रमाणे

| प्रभाग | एकूण मते | मतदान | टक्केवारी | सर्वाधिक मतदान झालेला उमेदवार | मते |
|---|---|---|---|---|---|
| १ सोमवार | ९८ | ४४ | ४३% | रामचंद्र विष्णू भागवत | २५ |
| २ मंगळवार | ११ | ८ | ७५ % | रामकृष्ण श्रीधर पाठक | प्रत्येकी |
| बुधवार | | | | परमचंद आबाचंद गुजर | ४ |
| ३ गुरुवार | ६७ | ५२ | ७५ % | रामचंद्र विष्णू भागवत | ४८ |
| ४ शुक्रवार | २२ | १४ | ६३ % | चाँदशा मनेशा काझी | १४ |
| ५ शनिवार | १३ | १२ | ९२ % | विठ्ठल महिपत सुपनेकर | १२ |
| ६ रविवार | ३५ | २२ | ६२ % | नारो विठ्ठल घाटे | २० |

रामचंद्र विष्णू भागवत हे तीन प्रभागांत उभे होते. त्यांनी गुरुवारात ४८, सोमवारात २५ आणि रविवारात फक्त ३ मते मिळविली. त्यांनी प्रभाग ३ गुरुवारातून सभासद राहण्याची तयारी असल्याचे सांगितले त्यामुळे प्रभाग १

सोमवारातून दुसऱ्या क्रमांकाची मते ११ मिळविणारे विनायक नारायण देशपांडे हे निवडून आले असे जाहीर करण्यात आले. प्रभाग २ मध्ये समसमान मतदान झाल्यामुळे चिठ्ठ्या टाकण्यात आल्या व तेथे रामकृष्ण श्रीधर पाठक निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले. सोमवार प्रभागातून नारायण अनंत मुतालिक उभे होते त्यांना अवघी तीन मते पडली होती. तथापि सरकारने नामनिर्देशित सभासद म्हणून त्यांची नेमणूक केली आणि त्यांचीच सरकारने नगराध्यक्ष म्हणूनही नेमणूक केली.

## नगरसेवक

कराड नगरपरिषदेत प्रथम सर्व नगरसेवक सरकारनियुक्तच होते. १८८५ मध्ये कराड नगरपरिषदेची पहिली निवडणूक झाली. तथापि संपूर्ण लोकनियुक्त सभासदांचे पहिले बोर्ड १९३८ मध्ये अधिकारावर आले. कऱ्हाडातील सर्व नागरिकांचा मतदानात सहभाग १९५२ च्या निवडणुकीपासून आला.या सर्व नगरसेवकांमध्ये सातत्याने १९५२ ते १९९६ या काळात चाळीस वर्षांहून अधिक काळ सातत्याने निवडून येणारे पांडुरंग दादासाहेब पाटील हे एकमेव आहेत. त्या खालोखाल लोकनियुक्त व स्वीकृत सदस्य म्हणून इस्माईल इब्राहिम बागवान (तीस वर्षे) यांचे नाव घ्यावे लागेल. चाँदशा मनेशा काझी हे १८७८ पासून १९०७ पर्यंत चौतीस वर्षे सरकार नामनिर्देशित व लोकनियुक्त सदस्य होते. मानसिंग आबासाहेब पाटील हेही लोकनियुक्त व स्वीकृत सदस्य म्हणून १९७४ पासून सव्वीस वर्षे कार्यरत आहेत. नारायण रामचंद्र भागवत (१८९८ ते १९२३) लोकनियुक्त १५ व नामनिर्देशित १० वर्षे असे एकूण सतत २५ वर्षे, गणपतराव ज्ञानोबा बटाणे १९०७ पासून सतत २५ वर्षे लोकनियुक्त सभासद होते. त्या खालोखाल शंकराप्पा मल्लाप्पा संसुद्दी व अजीज यासीन पटेल (प्रत्येकी चोवीस वर्षे) यांची नोंद घ्यावी लागेल. बाबुराव चांगदेव थोरवडे (२३ वर्षे), विश्वनाथ बाबुराव बटाणे (२२ वर्षे), किसनलाल प्रेमराज (२१ वर्षे), रामचंद्र विष्णू भागवत (२१ वर्षे), अब्बास फरीदसाहेब मुतवल्ली (२१ वर्षे), युनूस अहमद कच्छी (२१ वर्षे), विनायक गजानन पावसकर (२१ वर्षे), कोंडो केशव सहस्रबुद्धे (२० वर्षे), नारायण रामचंद्र

भागवत (२० वर्षे), पन्नालाल गोपीलाल लाहोटी (२० वर्षे), रामविलास किसनलाल लाहोटी (२० वर्षे), चंद्रकांत काशिनाथ हिंगमिरे (२० वर्षे), यांनी दीर्घ काळ नगरसेवक म्हणून काम पाहिले.

महिलांसाठी राखीव जागा १९२४ पासून निर्माण झाली असली तरी १९३८ मध्ये प्रथमच त्या जागेवर गंगाबाई जनार्दन गुणे निवडून आल्या. आजवर वेगवेगळ्या ४३ महिलांनी वेळोवेळी नगरसेवक म्हणून सेवा केली. त्यापैकी फक्त एकच वेळ निवडून आलेल्या ३७ महिला आहेत. मंगला नारायण विंगकर (६ वर्षे), इंदिराबाई विश्वासराव पाटील (१० वर्षे), सुजाता संजय पवार (१० वर्षे), अर्चना अशोकराव पाटील या दोन वेळा निवडून आल्या तर यशोदा महादेव वाटवे (रंगुताई) आणि शारदा मुकुंदराव जाधव या तीन वेळा निवडून आल्या. महिलांमध्ये सर्वांत दीर्घकाळ (१६ वर्षे) नगरसेवक म्हणूनही शारदा जाधव यांचा निर्देश करावा लागेल. कराड नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदी १९४६-४७ मध्ये प्रथमच एका महिलेची निवड झाली. त्यावेळी वासंतिका (सुशीलाबाई) वसंत दातार उपाध्यक्ष झाल्या. १९९६ मध्ये नगराध्यक्षपद महिला राखीव झाले, त्यावेळी अर्चना अशोकराव पाटील यांची नगराध्यक्ष म्हणून निवड झाली. २००१ मध्ये नगराध्यक्षपदाची निवडणूक थेट नागरिकांतून झाली, त्यावेळी ते पद महिला राखीव होते. या निवडणुकीत शारदा मुकुंदराव जाधव या बहुमताने निवडून आल्या.

### नगराध्यक्ष

कऱ्हाडच्या नागरिकांतून नेमले गेलेले पहिले नगराध्यक्ष म्हणजे ***रावबहादूर नारायण अनंत मुतालिक*** हे होत. ते औंधच्या पंतप्रतिनिधींचे मुखत्यार होते. १८७७ पासून १८८९ पर्यंत सतत बारा वर्षे ते कराड नगरपरिषदेचे नामनिर्देशित सभासद होते. १-१०-१९८५ ते ३०-९-१९८९ या काळात त्यांनी कऱ्हाडचे नगराध्यक्षपद भूषविले. शहरातील प्राथमिक शाळा त्यांच्याच कारकीर्दीत नगरपरिषदेच्या ताब्यात आल्या.

कऱ्हाडच्या नागरिकांपैकी लोकनियुक्त सभासदांमधून प्रथमच ***रामचंद्र विष्णू उर्फ भाऊसाहेब भागवत*** यांची नगराध्यक्षपदी नेमणूक

झाली. (१-१०-१९८६ ते ३१-३-१९८९). भाऊसाहेब भागवत हे व्यवसायाने वकील, गाव मुनसफ व संस्कृतचे जाणकार. 'ज्ञानेश्वरी' चे विवेचन व 'भागवता' चे निरूपण करीत. हिंदू धर्माचे कट्टर अभिमानी होते. ते समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचे मामा. कऱ्हाड परिसरात त्यांनी राष्ट्रीय काँग्रेस प्रचाराचे कार्य केले. कऱ्हाडात १९०४ मध्ये शेतकरी सभा व १९०६ मध्ये शेती प्रदर्शन भरविण्यात त्यांचा पुढाकार होता. २७-४-१८६८ पासून ३०-६-१८८५ (१७ वर्षे) कराड नगरपरिषदेत नामनिर्देशित सभासद व १०-७-१८८५ पासून ३१-३-१८८९ (४ वर्षे) लोकनियुक्त सभासद अशी एकूण २१ वर्षे सलग नगरसेवक होते. १८६८-६९ मध्ये पहिल्या मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन म्हणून त्यांची निवड झाली. पुढे प्रतिवर्षी त्यांचीच निवड त्या पदावर होई. मध्यंतरी १८-१-१८८३ रोजी त्यांनी मॅनेजिंग कमिटीच्या अध्यक्षपदाचा राजिनामा दिला होता. पण त्यांचा दीर्घ अनुभव व त्यांनी केलेली जोखमीची कामे यामुळे त्यांचा राजिनामा मंजूर केला नाही. नगराध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक होईपर्यंत ते त्या पदावर होते. भाऊसाहेब भागवत यांच्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीत नगरपरिषदेनेच खाजगी संडास सफाईचे काम करावे व त्यासाठी भंगीपट्टी आकारावी असे ठरले. तसेच संडासातून निघणाऱ्या मैल्याचे खत करून त्याची विक्री करण्याची योजना सुरू झाली.

***भास्कर गोपाळ सावरकर*** यांची नगराध्यक्ष म्हणून १-४-१९८९ रोजी तीन वर्षांसाठी नेमणूक झाली होती. सार्वजनिक कामाची आवड असलेले सावरकर हे एक हुशार वकील होते. १८७७ ते १८८५ या काळात कराड नगरपरिषदेतच इन्स्पेक्टर म्हणून त्यांनी दरमहा १५ रु. पगारावर नोकरीही केली होती. त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात मोठी आशादायक झाली, पण सर्व सभासदांचे सहकार्य टिकवून काम करणे अशक्य आहे. असा अनुभव आल्यामुळे त्यांनी अवघ्या दोन महिन्यांच्या आतचं २५-५-१८८९ रोजी नगराध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

लोकनियुक्त सभासदांमधून नेमले गेलेले पहिले नगराध्यक्ष भाऊसाहेब भागवत यांचे सुपुत्र ***नारायण रामचंद्र उर्फ नानासाहेब भागवत*** ह्यांनी कऱ्हाडचे

नगराध्यक्षपद दोन वेळा भूषविले. ते बेंच मॅजिस्ट्रेट होते. १८९८ ते १९१०, १९१३ ते १९१६ अशी पंधरा वर्षे लोकनियुक्त व १९१० ते १९१३, १९१६ ते १९२३ अशी दहा वर्षे नामनिर्देशित असे एकूण २५ वर्षे ते नगरपरिषदेचे सभासद होते. या काळात १८९८ ते १९०४ (६ वर्षे) ते मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन आणि १९०४ ते १९०९ (५ वर्षे) उपाध्यक्ष होते. सरकारी ठराव क्र. १३१३ दि. १० मार्च १९०९ प्रमाणे नगरपरिषदांना स्वत:चा अध्यक्ष निवडण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. मात्र ही निवड एकूण सभासदांच्या दोन तृतीयांश बहुमताने झाली पाहिजे अशी अट घालण्यात आली होती. असे न झाल्यास सरकारकडून अध्यक्ष नेमला जाणार होता. त्याप्रमाणे कराड नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी १५ एप्रिल १९०९ रोजी झालेल्या सभेत नारायण रामचंद्र भागवत व मामलेदार यांच्यात निवडणूक होऊन भागवत निवडून आले, पण त्यांना दोन तृतीयांशापेक्षा मते कमी होती. त्यामुळे नगराध्यक्ष नेमणुकीचा अधिकार सरकारला मिळाला. सरकारने २९ जुलै १९०९ पासून नारायण रामचंद्र भागवत यांनाच अध्यक्ष म्हणून नेमून नगरपरिषदेतील बहुमताचा आदर राखला. ते ३१ मार्च १९१० अखेर नगराध्यक्ष होते.

नंतरच्या काळात १ एप्रिल १९१६ रोजी अस्तित्वात आलेल्या बोर्डात सभासदांतील मतभेदांमुळे रावसाहेब टी. सी. घैसास, मामलेदार यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी अध्यक्षपदाचा राजिनामा दिल्यामुळे त्या रिक्त पदावर १५-४-१९१८ रोजी सरकारने नारायण रामचंद्र भागवत यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक केली. ते त्या पदावर ३१ मार्च १९२० अखेर होते. नानासाहेब भागवत यांच्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीत जकात बंद करण्याचा निर्णय घेऊन कमिशनरची मंजुरी येण्यापूर्वीच त्याची अंमलबजावणी करण्यास आरंभही झाला. घरपट्टीच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने घराच्या किंमतीवर घरपट्टी आकारण्यात येऊ लागली. १९०९ मध्ये नगरपरिषदेच्या दवाखान्याच्या इमारतीत सोयीस्कर दुरुस्त्या करून एक पोस्टमार्टेम रूम बांधण्यात आली. नगरपरिषदेच्या पहिल्या पाणी पुरवठा योजनेसाठी सरकारकडून घेतलेल्या कर्जाची फेड करण्याकरिता व पाणीपुरवठ्याचा वार्षिक खर्च भागविण्याकरिता १९१८-१९ मध्ये पाणीपट्टी बसविण्यात आली.

कऱ्हाड शहरातील अनेक संस्थांच्या स्थापनेत आणि विकासात महत्त्वाचा भाग घेणारे ***लक्ष्मण महादेव उर्फ नानासाहेब देशपांडे*** यांनी १९१० ते १९१६ सतत सहा वर्षे कऱ्हाडचे नगराध्यक्षपदही भूषविले. केवळ मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतलेल्या या गृहस्थांनी रेठरे येथे शास्त्रशुद्ध शेती केली. कऱ्हाड मार्केट यार्डात अडतीचा व्यवसायही केला. ते राष्ट्रीय काँग्रेसचे सभासद होते. १९२६ ते १९३० तत्कालीन मुंबई विधानपरिषदेवर ते निवडून गेले होते. १९३० मध्ये गोलमेज परिषदेस वर्णाश्रम स्वराज्य संघाचे त्यांनी प्रतिनिधित्व केले. कऱ्हाडातील काड्याच्या पेट्यांचा कारखाना, कराड अर्बन को.-ऑपरेटिव्ह बँक, शिक्षण मंडळ, बँक ऑफ कराड इ. संस्थांचे ते संस्थापक व चिकित्सक मार्गदर्शक अध्यक्ष होते. तालुका लोकलबोर्ड, शेती उत्पन्न बाजार समिती यांवरही त्यांनी काम केले. रेठरे येथे साखर कारखाना काढण्याची त्यांनी प्रेरणा दिली.कऱ्हाड नगरपरिषदेत १९०७ ते १९१० (तीन वर्षे) ते नामनिर्देर्शित सभासद होते. १९१०-१९२०, १९२६-२८ व १९३८-४० अशी सुमारे १४ वर्षे ते लोकनियुक्त सभासद म्हणून निवडून येत. २६ एप्रिल १९१० ते ३१ मार्च १९१६ सतत सहा वर्षे ते नगराध्यक्ष होते. याच काळात कृष्णाजी सीताराम देशपांडे यांची उपाध्यक्ष म्हणून आणि विश्वनाथ ज्ञानोबा बटाणे यांची मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन म्हणून त्यांना उत्तम साथ मिळाली. लोकनियुक्त सभासदांच्या एकमुखी पाठिंब्यामुळेच कराड नगरपरिषदेची आर्थिक कुवत मर्यादित असूनही शुद्ध पाणीपुरवठ्याची महत्त्वाची योजना त्यांच्या काळात आखली गेली व बहुतांशी पूर्णही झाली. नानासाहेब देशपांडे यांच्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीतच जकातीचा पट सुधारण्यात आला (१९१३), चाकपट्टी व दस्तुरी घेण्यास सुरुवात झाली (१९१५), कऱ्हाडात सुरू झालेल्या काड्यापेट्यांच्या कारखान्यास संरक्षण मिळावे म्हणून नगरपरिषद हद्दीबाहेरून येणाऱ्या काड्यापेट्यांवर जकात वाढविण्यात आली (१९१३). शुद्ध चारित्र्य, धोरणीपणा, व्यवहारी दृष्टी असलेल्या या मितभाषी व्यक्तीने काळाची पावले ओळखून  कऱ्हाड शहराच्या प्रगतीसाठी काम केले.

दोन तृतीयांश बहुमताने आपला अध्यक्ष निवडण्याचा नगरपरिषदेचा हक्क सरकारने १९१८ मध्ये काढून घेतला होता, तो २३ मार्च १९२० च्या सरकारी

हुकमाने परत मिळाला होता. १ एप्रिल १९२० रोजी अस्तित्वात आलेल्या बोर्डामध्ये नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दडपण आणले गेले होते. त्या दडपणाला न जुमानता चार नामनिर्देशित सभासदांनी आणलेली उपसूचना फेटाळून लावून सर्व लोकनियुक्त सभासदांच्या दोन तृतीयांश मतांनी सीताराम गोपाळजी पाटील यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. कऱ्हाडच्या वतनदार पाटील घराण्यातील ***सीताराम गोपाळजी पाटील*** हे १९२० ते १९२३ या काळात कऱ्हाडचे नगराध्यक्ष होते. सीताराम गोपाळजी पाटील हे १ एप्रिल १९१६ पासून १३ वर्षे नगरपरिषदेवर लोकनियुक्त सभासद होते. नगरपरिषदेत सभासद म्हणून कार्यरत असतानाच २८ ऑगस्ट १९२९ रोजी त्यांचे निधन झाले. सीताराम गोपाळजी पाटील यांच्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीतच कराड नगरपरिषदेचे कार्यालय चावडीचौकातून स्थलांतरित होऊन रविवार पेठेतील पाण्याच्या टाकीखालील इमारतीत सुरू झाले (१९२१). शेंगा-शेंगदाण्याचा व्यापार कऱ्हाडात मोठ्या प्रमाणावर होता, पण या मालाच्या आयात-निर्यातीमुळे जकात वसुलीचा आणि रिफंडाचा अकारण व्याप होत असे, त्यासाठी जकातीऐवजी टर्मिनल टॅक्स बसविण्याचा निर्णय झाला (१९२१), १ मार्च १९२२ पासून ऑक्ट्रॉय इन्स्पेक्टरची नेमणूक करण्यात आली. शहराच्या सिटी सर्वेचे काम यांच्याच काळात झाले. कऱ्हाडात १९२१ साली स्थापन झालेल्या मद्यपान प्रतिबंधक मंडळास दरमहा वीस रु. नगरपरिषदेतर्फे देण्याचे ठरले. लो. टिळकांचे चिरस्थायी स्मारक कराडात 'शिक्षण मंडळ' च्या रूपाने उभे राहिले. सीताराम गोपाळजी पाटील हे त्या मंडळाच्या संस्थापक सभासदांपैकी एक होतेच. नगरपरिषदेने १८७८-७९ मध्ये सुरू केलेली म्युनिसिपल इंग्रजी शाळा सीताराम गोपाळजी पाटील यांच्याच कार्यकाळात शिक्षण मंडळाच्या ताब्यात देण्यात आली. सीताराम गोपाळजी पाटील हे कराड अर्बन को. ऑपरेटिव्ह बँकेचे १९२३-२४ साली संचालक होते.

***कृष्णाजी मारुतराव ऊर्फ भाऊसाहेब कळंबे*** यांचा एक उत्तम प्राथमिक शिक्षक म्हणून लौकिक होता. सातारा जिल्ह्यातील तरुणांना सशस्त्र क्रांतीची प्रेरणा देऊन त्यांनी क्रांतिकारकांची एक गुप्त संघटना उभी केली होती. कऱ्हाडात

डुबल आळीतील बाळनाथबुवांचा मठ हे त्यांच्या कार्याचे केंद्र होते. बहुजन समाजातील तरुण पिढीला सत्यशोधकीय विचार व संस्कार देण्यासाठी त्यांनी कऱ्हाडात 'विजयाश्रम' नावाची संस्था सुरू केली होती. ते उत्कृष्ट शिल्पकारही होते. तसेच ते 'शिक्षकांचा कैवारी' चे संपादक होते.९ एप्रिल १९२३ रोजी अस्तित्वात आलेल्या नगरपरिषदेच्या बोर्डावर नामनिर्देशित म्हणून भाऊसाहेब कळंबे यांची नेमणूक झाली. एवढेच नव्हे तर त्यांची नगराध्यक्षपदीदेखील एकमताने निवड झाली. नगराध्यक्षपदी असतानाच दुर्दैवाने त्यांचे २४ डिसेंबर १९२४ रोजी निधन झाले. त्यांच्या कारकिर्दीत शेंगा व शेंगदाणे या मालावर जकातीऐवजी टर्मिनल टॅक्स वसूल करण्यास सुरूवात झाली. रेंटल व्हॅल्युएशन बेसिसवर घरपट्टीची आकारणी याच वेळेपासून सुरू झाली. त्यांच्याच कार्यकाळात नगरपरिषदेकडील प्राथमिक शाळांचा ताबा जिल्हा लोकलबोर्डाकडे देण्याचा ठराव झाला.

भाऊसाहेब कळंबे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या नगराध्यक्षपदी ***शंकरराव राजाराम ढवळीकर*** यांची ४-१-१९२५ पासून उर्वरित काळासाठी निवड करण्यात आली. ते एक उत्तम वकील होते. त्यांनी नगरपरिषदेच्या इंग्रजी शाळेत अध्यापक म्हणूनही काम केले होते. सातारा जिल्हा लोकलबोर्डाचेही ते काही काळ सभासद होते. १ एप्रिल १९२० ते ३१ मार्च १९२६ या सहा वर्षांच्या काळात ते कराड नगरपरिषदेचे लोकनियुक्त सभासद होते. १९२० मध्ये ते मॅनेजिंग कमेटीचेही चेअरमन होते. यांच्याच कारकिर्दीत १ जून १९२५ पासून कऱ्हाड शहरातील प्राथमिक शाळा जिल्हा लोकलबोर्डाच्या ताब्यात गेल्या.

कऱ्हाडचे ***खानसाहेब अहमद कासमसाहेब कच्छी*** हे दक्षिण महाराष्ट्रातील मोठे कापडव्यावसायिक. कऱ्हाडात 'सरैया' आणि ओगलेवाडीत 'ताज' अशा त्यांच्या दोन कापडगिरण्या होत्या. १९३७ साली त्या वेळच्या मुंबई विधानसभेवर सातारा जिल्हा मुस्लिम मतदारसंघातून कच्छी यांची बिनविरोध निवड झाली होती.१९२६ पासून सलग बारा वर्षे ते कराड नगरपरिषदेचे लोकनियुक्त सभासद होते आणि नगराध्यक्ष म्हणूनही त्यांची सातत्याने निवड होत असे. १७ डिसेंबर १९२७ रोजी त्यांनी सभासदत्वाचा राजिनामा दिला.

त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत खानसाहेब कच्छी स्वत:च बिनविरोध निवडून आले. त्यामुळे त्यावेळी नगराध्यक्ष असलेल्या ***मारुतराव गोपाळ शिंदे*** यांनी राजिनामा दिला व पुन्हा कच्छी यांचीच अध्यक्ष म्हणून निवड झाली. सुमारे एक तपाच्या त्यांच्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात सर्वसाधारणपणे तेच तेच नगरसेवक निवडून येत गेले आणि उपाध्यक्ष म्हणून किसनलाल प्रेमराज यांची त्यांना समर्थ साथ सातत्याने लाभली. त्यामुळे नगरपरिषदेच्या कारभारात एकसूत्रीपणा राहिला. ८ जुलै १९३८ रोजी खानसाेा कच्छी यांचे निधन झाले. तथापि त्यांच्या रिक्त झालेल्या जागेच्या उर्वरित काळासाठी निवडणूक झाली नाही. खानसाहेब कच्छी यांच्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीत नगरपरिषदेच्या दवाखान्याची, तसेच भाजी मंडईची (गोल इमारत) या इमारती झाल्या. कऱ्हाड रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या कृष्णेवरील पुलाचे बांधकाम त्यांच्याच पाठपुराव्याने सुरू झाले. कोटाखाली किसनलाल लाहोटी यांची धर्मशाळा नगरपरिषदेकडे त्यांच्याच कार्यकाळात आली. कराड इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीच्या सहकार्याने  कऱ्हाडातील प्रमुख रस्त्यांवर विजेचे दिवे लावण्यात आले. शुद्ध खादीवरील जकात माफ करण्यात आली. प्लेगच्या साथीला आळा घालण्यासाठी प्रतिबंधक उपाय योजण्यात आले. आग विझविण्यासाठी आधुनिक फायर-फायटर मोटार खरेदी करण्यात आली. नगरपरिषदेच्या भंगी नोकरांसाठी दोन चाळी बांधण्यात आल्या. १९२७ मध्ये महात्मा गांधी कऱ्हाडात आले असताना कराड नगरपरिषदेने त्यांचा सत्कार करून त्यांना मानपत्र अर्पण केले. तत्कालीन मुंबई इलाख्याचे गव्हर्नर फ्रेडरिक साईक्स यांना मानपत्र देण्याचा समारंभ आणि स्वातंत्र्यप्रेमी कऱ्हाडकर नागरिकांनी गव्हर्नरना काळी निशाणे दाखवून केलेला उत्स्फूर्त निषेध या घटना कच्छी यांच्याच कार्यकाळात झाल्या. खानसाहेब कच्छी हे दानशूर होते, मुस्लीम बांधवांच्या शिक्षणासाठी त्यांनी कासमभाई बोर्डिंग व यतीमखाना सुरू केला. लोकांना आणि जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून कऱ्हाडात ठिकठिकाणी त्यांनी टाक्या बांधल्या. कऱ्हाडातील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचेही ते संस्थापक होते.

खानसाहेब कच्छी यांचे एक विश्वासू सहकारी ***मारुतराव गोपाळराव***

***शिंदे*** १–४–१९२६ पासून ३१–३–१९३२ अखेर सहा वर्षे लोकनियुक्त नगरसेवक होते. या काळात ते मॅनेजिंग कमिटीचे चेअरमनही होते. खानसाहेब कच्छी यांचा सभासदत्वाचा राजिनामा व पोटनिवडणुकीने पुनरागमन या दरम्यानच्या काळात अवघ्या दोन महिन्यांपुरते (२३–१२–१९२७ ते २१–२–१९२८) मारुतराव शिंदे यांच्याकडे कऱ्हाडचे नगराध्यक्षपद होते, ते त्यांनी निष्ठापूर्वक सांभाळले व खानसाहेब कच्छी यांच्या पुनरागमनानंतर शिंदे यांनी नगराध्यक्षपदाचा राजिनामा दिला.

१९२० पासून १९४६ अखेर सोळा वर्षे कराड नगरपरिषदेचे लोकनियुक्त सदस्य असलेले ***राऊ बाळा कदम*** हे काही काळ मॅनेजिंग कमेटीचेही चेअरमन होते. १–११–१९३८ रोजी ते कऱ्हाडचे नगराध्यक्ष झाले. यांच्याच कार्यकाळात सरकारतर्फे नगरपरिषदेच्या कारभारावर आक्षेप घेण्यात येऊन नगरपरिषदेचा कारभार १९–१२–१९४० रोजी प्रशासकांकडे सोपविण्यात आला. १८ जानेवारी १९४३ रोजी प्रशासकीय कारकीर्द संपून नवे लोकनियुक्त बोर्ड अधिकारावर आले.

***सदाशिव कृष्ण बहुलेकर*** हे कऱ्हाडातील प्रसिद्ध वकील आणि साहित्यिक होते. कऱ्हाडात १९४१ मध्ये झालेल्या दक्षिण महाराष्ट्र मराठी साहित्य संमेलनाचे ते कार्याध्यक्ष होते. ते १९३८ पासून कराड नगरपरिषदेचे लोकनियुक्त सभासद होते. ते १९ जानेवारी १९४३ पासून नगराध्यक्ष होते. २० फेब्रुवारी १९४६ रोजी त्यांनी नगराध्यक्षपदाचा राजिनामा दिला. कऱ्हाड शहराची लोकसंख्या १७ हजारांवर आणि नगरपरिषदेचे वार्षिक उत्पन्न दीड लाख रु.वर गेल्यामुळे कऱ्हाड नगरपरिषदेस 'बरो म्युनिसिपालिटी' चा दर्जा मिळावा यासाठी त्यांनी ३१ जुलै १९४४ रोजी ठराव करून, लक्ष घालून खटपट केली. त्यांच्या खटपटीस यश येऊन कराड नगरपरिषद १ ऑगस्ट १९४६ पासून 'बरो म्युनिसिपालिटी' झाली.राऊ बाळा कदम यांची २१ फेब्रुवारी १९४६ पासून नगराध्यक्षपदावर दुसऱ्यांदा निवड झाली होती.

बरो म्युनिसिपालिटी दर्जा मिळाल्याने १९४६ पासून नगरपरिषदेच्या अध्यक्ष–उपाध्यक्षांची निवड प्रतिवर्षी होऊ लागली. ***शिवराव रामराव चौगुले*** हे कऱ्हाडातील ख्यातनाम फौजदारी वकील होते. कऱ्हाडच्या सातारा जिल्हा

को. ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँकेचे ते काही काळ संचालकही होते. कऱ्हाडच्या बालसुधार केंद्राचे ते संचालक होते. १-८-१९४६ ते ३१-१०-१९४९ या काळात चौगुले हे लोकनियुक्त सभासद होते. नगरपरिषदेस 'बरो' दर्जा प्राप्त झाल्यावर पहिले नगराध्यक्ष म्हणून चौगुले यांची पहिल्या वर्षासाठी (१-८-१९४६ ते १३-९-१९४७) निवड झाली. यांच्या कार्यकाळात बुधवार पेठेत सध्या यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन आहे त्या परिसरात बाग करण्यासाठी प्रशस्त जागा नगरपरिषदेस मिळाली. पुढे येथेच 'शिवाजी उद्यान' झाले.

१९४७-४८ सालासाठी १४-९-४७ पासून ***गणपतराव बळवंतराव चव्हाण*** यांची नगराध्यक्षपदी निवड झाली. भाऊसाहेब कळंबे यांच्या 'विजयाश्रमा'तून त्यांना महात्मा फुले यांच्या विचारांची शिकवण मिळाली होती. ते १९४३ पासून नगरपरिषदेचे लोकनियुक्त सभासद होते.नगराध्यक्षपदी असतानाच त्यांचे १५ डिसेंबर १९४७ रोजी निधन झाले. त्यांच्या अध्यक्षपदाच्या उर्वरित मुदतीसाठी (८-१-१९४८ ते ६-१०-१९४८) ***गजाननराव विश्वनाथ उमराणी*** यांची नगराध्यक्षपदी निवड झाली. कराडच्या सामाजिक, शैक्षणिक कार्यात त्यांचा सहभाग असे. ते शिक्षण मंडळाचे संचालकही होते. त्यांच्या कार्यकाळात नगरपरिषदेच्या सेवकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली. गजाननराव उमराणी १९४६ ते १९५२ सहा वर्षे लोकनियुक्त सभासद होते.

१९४८-४९ सालासाठी ( ७-१०-१९४८ ते ३१-१०-१९४९ ) नगराध्यक्षपदी ***पन्नालाल गोपीलाल लाहोटी*** यांची निवड झाली. ते कऱ्हाडातील एक प्रमुख कापड व्यापारी होते. कऱ्हाडातील सार्वजनिक कार्यात ते आस्थेवाईकपणे भाग घेत. घाटावरील सिद्धेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करून प्रतिवर्षी तेथे महाशिवरात्रीचा उत्सव त्यांनी सुरू केला. ते वीस वर्षे नगरसेवक होते व काही काळ उपाध्यक्षही होते. त्यांच्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात नगरपरिषदेने एक नवी अग्निशामक गाडी खरेदी केली. शहरास शॉप ॲक्ट लागू झाल्याने नगरपरिषदेने शॉप इन्स्पेक्टरची नेमणूक केली. तसेच बुधवार पेठेत हरिजन क्वार्टर्स बांधल्या.

***आत्माराम नारायण जाधव*** हे स्वातंत्र्य चळवळीतील एक खंदे लढाऊ सैनिक. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी अडत दुकान चालविले, तसेच भारत

आयर्न अँड मेटल वर्क्स हा बिडाच्या वस्तू तयार करण्याचा कारखानाही चालविला. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे ते संचालक होते. १९४९ ते १९५२ या काळात कऱ्हाड नगरपरिषदेचे लोकनियुक्त सभासद होते. १ नोव्हेंबर १९४९ ते ३१-१०-१९५० या वर्षासाठी त्यांची नगराध्यक्षपदी निवड झाली. सोमवार पेठेतील 'पाण्याची टाकी' आणि 'शिवाजी उद्यान' या दोन महत्त्वाच्या बाबी त्यांच्या कार्यकाळात झाल्या.

१ नोव्हेंबर १९५० ते ३१ ऑक्टोबर १९५१ या कालखंडासाठी कऱ्हाडचे नगराध्यक्ष म्हणून ***रामविलास किसनलाल लाहोटी*** यांची निवड झाली. लाहोटी परिवाराचा वडिलार्जित कापड व्यापार हा व्यवसाय होताच. रामविलास लाहोटी यांनी कऱ्हाडातील पहिला बर्फाचा कारखानाही सुरू केला. समाजसेवेचा आणि औदार्याचाही त्यांना वारसा लाभला होता. ते श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. गोरक्षण, सोशल क्लब, हनुमान व्यायाम मंडळ, मैदानी मर्दानी सामना समिती अशा विविध सामाजिक संस्थांत ते पदाधिकारी होते. कऱ्हाड नगरपरिषदेतही १९४९ पासून सुमारे वीस वर्षे ते लोकनियुक्त सभासद होते. लाहोटी यांच्या कार्यकाळात शिवाजी उद्यानात रेडिओ हाऊस बांधण्यात आले. कऱ्हाडात झालेल्या शेती विकास प्रदर्शनास नगरपरिषदेने आर्थिक सहाय्य केले. नगरपरिषदेच्या रस्त्यावरील अतिक्रमणांची मोजदाद करून ती काढण्यासाठी सरकारकडून अतिक्रमण निवारण अधिकारी मिळाला. जकातीची आकारणी मालाच्या वजनाऐवजी मालाच्या किंमतीवर होऊ लागली.

आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा गोरगरिबांना उपयोग व्हावा यासाठी कऱ्हाडात डॉ. भडकमकर धर्मार्थ रुग्णालय स्थापन करणाऱ्या ***डॉ. श्रीकृष्ण महादेव कुलकर्णी*** यांना सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात काम करण्याची हौस होती. ते कराड अर्बन को. ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व काही काळ उपाध्यक्षही होते. दैनिक 'सकाळ'चे बातमीदार म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. १९४९ पासून १९५६ पर्यंत ते कराड नगरपरिषदेचे लोकनियुक्त सदस्य होते. १-११-१९५१ ते ३०-११-१९५२ या काळासाठी त्यांची नगराध्यक्ष म्हणून निवड झाली होती. नगरपरिषदेच्या दवाखान्यात आधुनिक वैद्यकीय साधनांची भर, रुग्णोपयोगी वस्तू संग्रहाचा नागरिकांना अल्प मोबदल्यात वापर,

'बालसंगोपन केंद्र' आणि कऱ्हाडच्या सार्वजनिक वाचनालयाचे नगरपरिषदेकडे हस्तांतर इ. महत्त्वाची कामे डॉ. कुलकर्णी यांच्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात झाली.

***प्रभाकर लक्ष्मण उर्फ शंकरराव करंबेळकर*** हे कुशल शिक्षक म्हणून लोकप्रिय होतेच, पण कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे माजी अध्यक्ष, दीर्घकाळ संचालक, रोटरी क्लब, सोशल क्लब, श्री कृष्णाबाई उत्सव समिती अशा कऱ्हाडातीलच्या नानाविध उपक्रमांमुळे ते कऱ्हाडचे 'सार्वजनिक काका' म्हणून ओळखले जात. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या स्थापनेत आणि विकासातही त्यांचा मोठा वाटा होता. कऱ्हाड येथे १९७५ साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे संयोजन त्यांनी अत्यंत यशस्वीपणे केले. १९५२ पासून १९७८ अखेर कराड नगरपरिषदेचे लोकनियुक्त सभासद तसेच स्वीकृत सभासद म्हणून त्यांची निवड झाली. १ डिसेंबर १९५२ ते २० डिसेंबर १९५३ अखेर ते कऱ्हाडचे नगराध्यक्ष होते. करंबेळकर यांच्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात १ एप्रिल १९५३ पासून मिळकतींच्या रेंटल व्हॅल्युएशनच्या १५ $^{५}/_{८}$ टक्क्यांप्रमाणे संकलित कर आकारण्यास तसेच नगरपरिषदेच्या मास्टर प्लॅनमधील आखणीप्रमाणे रस्तारुंदीच्या कामास आरंभ झाला. यांच्या कार्यकाळात पं. जवाहरलाल नेहरूंना मानपत्र देण्यात आले (३०-४-१९५३).

कराड नगरपरिषदेचा शतसांवत्सरिक महोत्सव ***आब्बास फरीदसाहेब मुतवल्ली*** यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत (१०-१-१९५५ ते २९-१-१९५६) दिमाखदारपणे पार पडला. मुतवल्ली हे नगरपरिषदेचे लोकनियुक्त सभासद १९४६ पासून १९६७ पर्यंत सुमारे २१ वर्षे सातत्याने होते. त्यांनी प्रथम किरकोळ व नंतर घाऊक प्रमाणात छत्र्यांचा व्यवसाय केला. पुढे ते हार्डवेअरचे मोठे व्यापारी म्हणून प्रसिद्धीस आले. मुस्लीम बोर्डींग, पीर मूर्तजा अल्ली ट्रस्ट तसेच शाही कब्रस्तान ट्रस्ट या संस्थांचे ते पदाधिकारी होते.

***पांडुरंग दादासाहेब पाटील*** (पी. डी. पाटील) यांनी १९५२ साली लोकनियुक्त सभासद म्हणून कराड नगरपरिषदेत प्रवेश केला व पुढच्याच वर्षी म्हणजे २० डिसेंबर १९५३ रोजी ते नगराध्यक्ष म्हणून निवडून आले.

१० जानेवारी १९५५ ते २९ जानेवारी १९५६ एवढा व प्रशासकीय कारकीर्दीचा कालखंड (१९८१-१९८५) वगळता १६ डिसेंबर १९९६ अखेर जवळ जवळ चाळीस वर्षे त्यांनी कऱ्हाडचे नगराध्यक्षपद भूषविले. १९७४ ते १९७९ या काळात प्रथमच 'नागरिकांतून नगराध्यक्षांची थेट निवडणूक' करण्याचा प्रयोग केला. त्यावेळीही पी. डी. पाटील यांचीच नगराध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यांची अभ्यासू चिकित्सक वृत्ती, विधायक दूरदृष्टी, समन्वयी भूमिका आणि कऱ्हाड शहराविषयीची आत्मीयता यामुळेच ते शक्य झाले. त्यांच्या नगराध्यक्षपदाच्या प्रदीर्घ कालखंडात त्यांनी अनेक महत्त्वाची कामे केली. कऱ्हाड शहरातील रस्ता रुंदीचा आराखडा सामंजस्याने, पाठपुराव्याने व त्यामुळे कमी खर्चात अंमलात आणण्याचे काम त्यांनी प्राधान्याने केले. त्यामुळेच महाराष्ट्रातील अपवादात्मक ठिकाणीच झालेली भुयारी गटार योजना कऱ्हाडसारख्या तालुक्याच्या गावी होऊ शकली. स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठ्यासाठी सुधारित पाणीपुरवठा योजना अंमलात आणली. स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने या मूलभूत बाबींबरोबरच ग्रंथालय, प्राथमिक शाळांसाठी इमारती, प्रीतिसंगम उद्यान, नाट्यगृह, शिवाजी क्रीडा संकुल अशा विविध उपक्रमांमुळे कऱ्हाड शहराचा कायापालट झाला. पी. डी. पाटील हे एक यशस्वी वकील, प्रगतशील शेतकरी असून त्यांनी नगरपरिषदेतील या कामांबरोबरच कऱ्हाडच्या शैक्षणिक क्षेत्रात, सहकार क्षेत्रात, सांस्कृतिक कार्यक्षेत्रात बहुमोल कामगिरी बजाविली आहे. विधानपरिषदेवर (१९६०-१९६३) आणि विधानसभेतही (१९६३-१९६७, १९८०-१९८५, १९९५-२०००) कऱ्हाडचे प्रतिनिधित्व आमदार म्हणून केले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, श्री शिवाजी शिक्षण संस्था, सह्याद्रि सहकारी साखर कारखाना, सह्याद्रि सहकारी बँक, प्रीतिसंगम सहकारी पाणी पुरवठा संघ, कृष्णा-कोयना पाणी पुरवठा संघ, कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट, सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्ट, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, शेती उत्पन्न बाजार समिती, महाराष्ट्र वाङ्मय मंडळ अशा अनेक संस्थांमध्ये त्यांनी पदाधिकारी म्हणून काम केले. पी. डी. पाटील यांना आपल्या अध्यक्षपदाच्या आरंभीच्या काळात नगरसेवकांतील अंतर्गत मतभेद व गटतट याबरोबरच संयुक्त महाराष्ट्र चळवळीसारख्या आंदोलनामुळे निर्माण

झालेल्या संघर्षपूर्ण वातावरणात काम करावे लागले. तथापि राजकीय पक्षच नव्हे तर जात-पात-धर्म इ. गोष्टी बाजूला ठेवून 'नागरी प्रश्नासाठी नगरपरिषद' या भूमिकेतून  निवडून आलेल्या सर्व लोकप्रतिनिधींना त्यांनी सामावून घेतले, आणि शहराच्या विकासाची कामे केली. त्यामुळेच १९९१ मध्ये नगरपरिषदेत नगरविकास आघाडीच्या रूपाने पी. डी. पाटील यांच्या विरोधात सक्षम गट अधिकृतपणे उभा राहिला असला तरी पी. डी. पाटील यांच्या प्रदीर्घ अध्यक्षीय कारकीर्दीत झालेल्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी १४ सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या नगरपरिषदेच्या विशेष सभेत मांडलेल्या ठरावास नगरविकास आघाडीचे प्रमुख डॉ. दत्तात्रय शिवराम एरम यांनी मन:पूर्वक अनुमोदन दिले होते. १ जुलै १९९५ रोजी पी. डी. पाटील यांना त्यांच्या ७८ व्या वाढदिवसाविषयी कराड नगरपरिषदेच्यावतीने मानपत्रही प्रदान करण्यात आले होते.

१९९६ मध्ये नगराध्यक्षपदासाठी सोडत पद्धतीने आरक्षणाची पद्धत सुरू झाली. कऱ्हाडच्या नगराध्यक्षपदाची जागा महिलांसाठी राखीव ठरली. सौ. अर्चना अशोकराव पाटील आणि सौ. शारदा मुकुंदराव जाधव या दोन उमेदवार होत्या. पैकी सौ. शारदा मुकुंदराव जाधव यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्यामुळे ***सौ. अर्चना अशोकराव पाटील*** बिनविरोध निवडून आल्या. (१७ डिसेंबर १९९६) नगरसेवकांमधून निवडल्या गेलेल्या त्या पहिल्या महिला नगराध्यक्ष होत्या. त्यांच्याच कार्यकाळात भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव समारंभपूर्वक वैशिष्ट्यपूर्ण रीतीने साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येस मशाल मिरवणूक, मध्यरात्रीस ध्वजवंदन, स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार, स्मरणिका, स्पर्धा  इ. उपक्रम करण्यात आले. कराड नगरपरिषदेच्या विद्यमाने राज्य कब्बड्डी स्पर्धा प्रतिवर्षी घेऊन पुरुषांसाठी नगराध्यक्ष फिरता चषक व महिलांसाठी सौ. वेणुताई यशवंतराव चव्हाण फिरता चषक देण्याचे ठरले. आरोग्यदिनानिमित्त (७-४-१९९७) 'निरोगी व स्वच्छ, सुंदर कराड' ही पुस्तिका प्रकाशित करण्यात आली.

१७ डिसेंबर १९९७ ते ४ सप्टेंबर १९९८ या काळात ***सौ. बाळूताई भीमराव सूर्यवंशी*** नगराध्यक्ष होत्या. नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी

जनसंपर्क अधिकारी यांच्याच कार्यकाळात नेमण्यात आला.

१५ सप्टेंबर १९९८ रोजी नगराध्यक्षपदाच्या निवडीसाठी झालेल्या सभेत मतदान झाले. पण न्यायालयाच्या स्थगितीमुळे निर्णय राखून ठेवण्यात आला होता. ती स्थगिती उठविल्यामुळे २१ सप्टेंबर १९९८ रोजी ***अशोक शिवराम भोसले*** हे निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले. श्री भोसले यांच्या नगराध्यक्षपदाच्या अत्यल्प कार्यकाळात (१५-९-१९९८ ते १७-१२-१९९८) नगरपरिषदेच्या सेवक संघटनांनी केलेल्या मागणीप्रमाणे रोजंदार कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्यासंबंधात कार्यवाही सुरू झाली. शहरातील त्रिशंकू क्षेत्रास नगरपरिषदेच्या हद्दीत घेण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे करण्यात आला.

***जयवंतराव ज्ञानदेव जाधव*** हे नगराध्यक्ष म्हणून १७ डिसेंबर १९९८ रोजी निवडून आले. यांच्या कार्यकालातील महत्त्वाची बाब म्हणजे कराड नगरपरिषदेच्या दैनंदिन कारभारात संगणकाचा वापर करण्याच्या दृष्टीने अधिकारी-कर्मचाऱ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यास आरंभ झाला. कऱ्हाड शहराचा सुधारित विकास आराखडा, ट्रान्सपोर्ट सेंटरच्या गोडाऊनसाठी बांधलेल्या गाळ्यांचे सत्र न्यायालयासाठी हस्तांतरण, लिबर्टी क्रीडा मैदानावर अद्ययावत व्यायामशाळा व सभागृह, सुपर मार्केट, स्वयंचलित नियंत्रक दिवे, भोई समाजासाठी समाजमंदिर, आझाद चौक ते चावडीचौक रस्ता रुंदीकरणाच्या दृष्टीने नगरपरिषद, संबंधित व्यापारी आणि जुम्मा मशिदीचे विश्वस्त यांच्यात समन्वय घालण्याच्या दृष्टीने प्रयत्न, जकातकर पूर्ववत बसविण्याची मागणी, कृष्णा-कोयना नद्यांच्या काठावर संरक्षक भिंत उभारण्याची योजना, शहरातील बेकायदा खोकीधारकांचे सर्वेक्षण करण्याची योजना, वामनराव पै यांना मानपत्र इ. महत्त्वाच्या बाबी जाधव यांच्या कार्यकाळात झाल्या. दुर्दैवाने त्यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच, नगरपरिषदेच्या कार्यालयातून बाहेर पडत असताना जयवंतराव जाधव यांची हत्या झाली.

कै. जयवंतराव जाधव यांच्या उर्वरित कार्यकालासाठी ***जयवंतराव आत्माराम पाटील*** यांची नगराध्यक्ष म्हणून निवड झाली. या अल्पावधीत चावडी चौकापासून आझाद चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याचे दीर्घकाळ प्रलंबित असलेले मनोऱ्यासमोरील रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले. कोयना पूल ते कृष्णापूल या रस्त्यावरील

खोक्यांचे अतिक्रमण काढून त्यांचे पुनर्वसन करण्यात आले. नगरपरिषदेच्या कामकाजाचे संगणकीकरण करण्याचे ठरले. नगरपरिषदेचे जुने रेकॉर्ड भाजी मंडईच्या गोल इमारतीत होते, ते सध्याच्या प्रशासकीय इमारतीत मोबाईल स्टोअर सिस्टिममध्ये हलविण्यात आले, अशी महत्त्वाची कामे झाली.

२००१ मध्ये 'नागरिकांमधून नगराध्यक्षांची थेट निवड' हा प्रयोग शासनाने पुन्हा सुरू केला. कराड नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद या वेळी महिलांसाठी राखीव झाले. या पदावर ***सौ. शारदा मुकुंदराव जाधव*** यांची बहुमताने निवड झाली. त्या १९८५ ते १९९१ व १९९६ ते २००१ या काळात नगरपरिषदेवर लोकनियुक्त सभासद होत्याच. त्या काळात सलग पाच वर्षे महिला व बालकल्याण समितीच्या त्या सभापती होत्या. नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळावरही त्या सहा वर्षे उपसभापती होत्या. शनिवार पेठ पोपटभाई पेट्रोल पंप ते टाऊन हॉल पर्यंतचा रस्ता, तसेच जिव्हेश्वर मंदिर ते पाटण कॉलनी पर्यंतचा रस्ता ही कामे केली. पोपटभाई पेट्रोल पंपाशेजारून जाणाऱ्या रस्त्याच्या कामाचा पाठपुरावा करून रस्त्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून शहरात येण्यास व शहरातून बाहेर जाण्यास पर्यायी रस्ता उपलब्ध करुन दिला. शनिवार पेठ गार्डेकर बोळ ते कोयनेश्वर मंदिरापर्यंत नवीन रस्ता करण्यात आला आहे. शहरात ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्यात येऊन त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी सामाजिक संस्थांवर सोपविण्यात आली. शहरातील रस्त्यांवरील दिव्यांना टायमर बसविण्यात आले. त्यांची देखभाल करण्यासाठी कंत्राटी पद्धतीचा अवलंब करण्यात आला. त्यामुळे वीज खर्चात कपात झाली.यशवंतराव चव्हाण स्मृतिसदनातील बागेमध्ये लहान मुलांसाठी खेळणी बसविण्यात आली. प्रीतिसंगम उद्यानात अद्ययावत ध्वनिक्षेपित माध्यमातून संगीत ऐकविण्याची योजना केली, तसेच नयनरम्य कारंजेही उभे करण्यात आले. जैविक कचरा निर्मूलन प्रकल्प महाराष्ट्रात कराड नगरपरिषदेनेच प्रथम उभा केला. शहरात घरटी दोन प्लॅस्टिक बकेटस् देऊन त्यात जमा होणारा ओला व सुका कचरा गोळा करण्यासाठी घंटागाड्यांची व्यवस्था केली. रस्त्यांच्या पदपथांलगत एकूण ४४ ठिकाणी लिटल बीन्स बसविण्यात आले. शहरातील काही कचरा कोंडाळ्यांच्या

जागी फुलांचे ताटवे तयार करण्यात आले. कचरा गोळा करण्यासाठी नवीन डंपर प्लेसर वाहन व वीस कंटेनर यांची सुविधाही केली. स्वच्छता अभियानाची माहिती देण्यासाठी 'स्वच्छता दूत' गट स्थापन करण्यात आले. शहरातील कचऱ्याचे निर्मूलन करण्यासाठी अद्ययावत गांडूळ खत प्रकल्पही उभारला. सार्वजनिक ठिकाणी फायबर बनावटीच्या मुताऱ्या स्त्री-पुरुषांकरिता जिल्ह्यात प्रथमच कऱ्हाडात उभ्या केल्या. वाढीव भागातील रस्ते सफाई करण्यासाठी रोड स्वीपर्स मशिनचा वापर सुरू केला. साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक जंतुनाशके फवारण्यासाठी आधुनिक यंत्रसामुग्री (पेट्रोल स्प्रे पंप) खरेदी करून वापरण्यात येऊ लागली. लायन्स क्लबच्या रामविलास लाहोटी आय हॉस्पिटलसाठी नगरपरिषदेची इमारत नाममात्र भाड्याने दिली. शनिवार पेठेतील कार्वेनाक्यावरील पाण्याची टाकी दुरुस्त करून मजबूत करण्यात आली आहे. नवीन वॉटरवर्क्समध्ये अद्ययावत फ्लो-मीटर बसविण्यात आल्याने रॉ वॉटर बिलाच्या रकमेत कपात झाली आहे. यशवंतराव चव्हाण स्मृतिसदनामध्ये अद्ययावत ध्वनियंत्रणा बसविण्यात आली आहे. शहरातील बास्केट बॉल खेळाडूंसाठी शिवाजी स्टेडियमलगत बास्केट बॉल ग्राऊंड तयार करण्यात आले आहे. जुन्या भाजी मंडईच्या जागी अत्याधुनिक भाजीमंडई उभारण्याचे काम सुरू आहे. सुपर मार्केट ५ वा टप्पा बांधून पूर्ण करून सुपरमार्केट क्र. १ व ३ वर नवीन मजला उभारण्यात आला आहे. शनिवार पेठ कार्वे नाका पाण्याच्या टाकीभोवती नगरपरिषदेच्या जागेत नवीन शॉपिंग सेंटर बांधले आहे. गेली वीस वर्षे वापराविना पडून राहिलेल्या धर्मवीर संभाजी भाजी मंडईत स्थानिक सामाजिक संस्थांच्या सहकार्याने व्यवहारास चालना दिली. केंद्र शासनाच्या साडेतीन कोटी रुपयांच्या एकात्मिक शहर विकास योजनेतून नगरपरिषद विस्तारित कार्यालयीन इमारत, अद्ययावत भाजी मंडई ही कामे केली. सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत एकूण ४७१ दारिद्र्यरेषेखालील लाभार्थींना १५ टक्के प्रमाणे नऊ लाख चौऱ्यांयशी हजार रुपये एवढे अनुदान वितरित केले. शहरात ४५ महिला बचत गट स्थापन करुन त्यांना नगरपरिषदेतर्फे २,६२,००० रु. चा फिरता निधी दिलेला आहे.

दारिद्र्यरेषेखालील महिलांचा एकत्रित गट स्थापन करून समाजविकास संस्था स्थापन करण्यांत आली. या महिलांच्या बचत गटाने तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरवून त्यांना बाजारपेठ मिळवून दिली, तसेच त्यांच्या वस्तुविक्रीसाठी कायमस्वरूपी विक्रीकेंद्राची सुरुवात केली आहे. नगरपरिषदेची कामे गतिमान होण्यासाठी नगरपरिषदेकडील कर्मचाऱ्यांना संगणकाचे प्रशिक्षण दिले. कायम आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना दरमहा रु. १०० मेडिकल अलौंन्स चालू केला आहे. नगरपरिषद रेकॉर्ड विभागात मोबाईल शिडी बसवून रेकॉर्ड रूम अद्ययावत करून घेण्यात आली आहे.

स्मशानभूमीत दहनविधीसाठी दोन नवीन आर. सी. सी. शेडस् बांधल्या असून प्रवेशद्वार व आणखी काही शेडस् बांधण्याचे काम हाती घेतले होते. नगरपरिषद मालकीच्या मिळकती, व्हेजिटेबल अँड जनरल मार्केट, हुतात्मा स्मारक, शिवाजी स्टेडियम, ट्रान्स्पोर्ट इमारत, महाराष्ट्र हायस्कूल पूर्वेकडील बाजूस, स्मशानभूमीच्या पूर्वबाजूस, पंपिंग स्टेशन क्र.२, नवीन वॉटर वर्क्स यांना सरंक्षक भिंती बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. सौ. शारदा जाधव यांच्या कार्यकाळातत्यांनी केलेल्याकामाबद्दल कराड नगरपरिषदेस १) संकलित कर वसुली, पाणीपट्टी वसुली, सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना उद्दिष्टपूर्ती यासाठी २००१-२००२ चा प्रथम क्रमांक. २) संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानामध्ये विभागीय पातळीवर २००३-०४, २००४-०५, २००५-०६ सलग तीन वर्षे प्रथम क्रमांक, २००३-०४ साठी विभागीय प्रथम क्रमांक पारितोषिक रु. दहा लाखाचे २००५-०६ या वर्षी जिल्हा स्तरीय प्रथम क्रमांकाचे रु. तीन लाखाचे पारितोषिक. ३) संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानाचे 'घनकचरा व्यवस्थापनासाठी'चे साठीचे शासनाचे विशेष पारितोषिक रु. पाच लाख. ४) नगरपरिषद वाचनालयास सन २००५-०६ साठी शासनाचे पाच लाख रुपयांचे विशेष अनुदान याप्रमाणे यश प्राप्त झाले आहे. सौ. शारदा जाधव यांना त्यांनी केलेल्या गौरवास्पद कामगिरीबद्दल स्व. प्रेमलाताई चव्हाण आदर्श महिला पुरस्कार, महाराष्ट्र जर्नालिस्ट फौंडेशन पुणे विभागातर्फे आदर्श महिला पुरस्कार तसेच इमेज वेलफेअर अचिव्हर्स फोरमचा पुरस्कार असे

वैयक्तिक पुरस्कार मिळाले आहेत.

२००६ – ११ या कालखंडासाठी नगरपरिषदेची निवडणूक नोव्हेंबर २००६ मध्ये झाल्यावर नगराध्यक्षपद पहिल्या अडीच वर्षांसाठी नागरिकातील मागास (ओबीसी) वर्गासाठी झाले त्या पदावर **सुषमा लोखंडे** यांची निवड झाली. त्यानी ऑगस्ट २००८ मध्ये राजीनामा दिल्यामुळे उर्वरित काळासाठी त्या जागी **रामचंद्र विष्णू कोळी** यांची निवड झाली. दि १८ जून २००९ पासून राहिलेल्या कालखंडासाठी हे पद 'सर्वसाधारण महिलां'साठी राखीव आहे.

## कराड नगर परिषद शिक्षण मंडळ

कराड नगर परिषदेचे स्वतंत्र शिक्षण मंडळ १० एप्रिल १९७७ रोजी स्थापन झाल्यावर राजपत्रातील प्रसिध्दीनंतर मंडळाची पहिली बैठक १३ मार्च १९७८ रोजी झाली. त्या वेळचे नगराध्यक्ष पांडुरंग दादासाहेब पाटील हेच न. प. शिक्षण मंडळाचे पहिले सभापती होते. त्यानंतर मंदाकिनी श्रीपाद देशपांडे (११-११-१९८० ते २६-१-१९८६), दीपक शंकर पेंढारकर ( २७-१-१९८६ ते ५-८-१९८८), अनुराधा अधिकराव पाटील ( ६-८-१९८८ ते २२-६-१९९२), शारदा नारायण गंधे ( २३-६-१९९२ ते १५-६-१९९७), सुभाष रामचंद्र जोशी ( १६-६-१९९७ ते २२-१२-२००२) यांनी सभापतीपद भूषविले. २३-१२-२००२ ते २००६ पासून आनंद अच्युतराव पालकर हे सभापती होते.

शिक्षण मंडळाचे उपसभापती म्हणून भगवान बापू कांबळे ( १९७८-१९८६), शारदा मुकुंदराव जाधव ( १९८६-१९९२), बेबीताई मनोहर थोरवडे ( १९९२-१९९७), नारायण ज्ञानोबा शिंदे ( १९९७-२००२), धनंजय विनायक कांबळे (२००२ - २००६)यांची निवड झाली होती.

शिक्षण मंडळावर सभासद म्हणून वर उल्लेखिलेल्या व्यक्तीखेरीज प्र. ल. करंबळेकर ( १९७८-७९), युनुस अहंमद कच्छी ( १९७८-८६, १९९७-२००२), महादेव विनायक खंडकर ( १९७९-८६), प्रतापराव ज्ञानोबा चव्हाण ( १९७९-८६), बाबासाहेब सिकंदर

पटेल ( १९७९-८६, १९८६-९२), श्रीनिवास रामगोपाल लद्दड ( १९७९-८६), चंद्रकांत काशीनाथ हिंगमिरे ( १९७९-८६), दिनकर शंकर भोसले ( १९८६-९२), कमलाकर सदाशिव कांबळे (१९८६-९२), बाबासाहेब रामचंद्र भोसले ( १९८६-९२), नंदकुमार लक्ष्मणराव बटाणे ( १९८६-९२), माधवराव शामराव पवार (१९८६-९२), वीणा सुरेश मोघे ( १९८६-९२), ज्योती प्रकाश सप्रे ( १९९२-९७), अरिफ गुलाब बागवान ( (१९९२-९७), फारूक इनातुल्ला पटवेकर ( १९९२-९७), नितीन कृष्णराव चव्हाण (१९९२-९७), अलका हंबीरराव पाटील ( १९९२-९७), विद्या विनायक पावसकर ( १९९२-९७), प्रकाश पांडुरंग शिंदे ( १९९२-९७), चंद्रकांत तानाजी जिरंगे ( १९९२-९७), दिलीप लाला कांबळे ( १९९७-२००२), रमेश रंगराव जाधव ( १९९७-२००२), जयश्री रामदास मुळे ( १९९७-२००२), विद्याधर पुरुषोत्तम गोखले ( १९९७-२००२), बाळासाहेब केशवराव मोहिते (१९९७ - २००२) संभाजी शंकर सुर्वे (१९९७-२००२) यांची निवड झाली होती. अनुराधा अधिकराव पाटील ( १९८६ - ९२), दीपक शंकर पेंढारकर ( १९८६ - ९२, १९९२ - ९७), हे या काळात सभासद होते. २३ डिसेंबर २००२ पासून अंमलात आलेल्या शिक्षण मंडळावर सभापती - उपसभापती खेरीज नारायणराव ज्ञानोबा शिंदे ( १९७९ पासून ) फारूक इनायतुल्ला पटवेकर ( १९९२-९७ व २००२ पासून) अमृत दिगंबर देशपांडे ( १९९७ पासून) हे जुने अनुभवी सभासद आणि अशोक शिवराम भोसले, अरूण सोपानराव जाधव, विनायक शिवलिंग विभूते, कुसुम कृष्णा पवार, अलताफ अब्दुलगणी शिकलगार, सुभाष पांडुरंग पाटील, विलास किसन कुंभार हे सभासद होते.

*****

५

# व्यापार व अर्थव्यवहार

कऱ्हाड शहराचे जुने नाव ''करहाट'' किंवा ''करहाटक''. या नावातील हाट (म्हणजे बाजार) हा शब्द कऱ्हाडचे व्यापारी महत्त्व सूचित करतो. इ. स. पूर्व ३०० ते २०० या काळातील कुड्याच्या लेण्यांत कऱ्हाडच्या (करहाकडचा) महिक या दानशूर व्यापाऱ्याचा उल्लेख आहे. (लेखांक१८). महिक हा लोखंडाचा व्यापारी होता. सातवाहनांची राजधानी पैठण, तसेच कल्याण, उज्जैनी ही शहरे कऱ्हाडशी व्यापारी मार्गांनी जोडलेली होती. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाने १९४८ साली कऱ्हाडात उत्खनन केले, त्यावेळी सापडलेल्या रोमन नाण्यांवरून या शहराचे रोमशी व्यापारी संबंध असावेत असा तर्क काढता येतो.

चौदाव्या शतकात कऱ्हाड शहर हे दाभोळमार्गे परदेशी आयात-निर्यातीचे एक प्रमुख व्यापारी केंद्र होते. पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात कऱ्हाडात शहा सद्रुद्दिन हा आयात निर्यातीचा धंदा करीत असे. इ. स. १४९१ मध्ये त्याची मालवाहू गलबते वादळात सापडली. तेव्हा ती सुखरूप रहावीत यासाठी तो नवस बोलला होता. त्याप्रमाणे गलबते सुखरूप पोचली म्हणून त्याने कऱ्हाडात दर्ग्यातील अलीची कदमगाह या इमारतीवर घुमट बांधला आहे. १ जून १७४१ रोजी रत्नाकर विठ्ठल याने आपल्या कारकुनास कऱ्हाडच्या बाजारातून ''खाराखिरी करून'' हरभरे खरेदी करून विश्वनाथ वैद्य यांजकडे पाठविण्याबद्दल एक पत्र उपलब्ध आहे. (वैद्य दप्तरातून निवडलेले कागद खंड ३ पत्र क्र. ३७ )

कऱ्हाड हे शहर सध्याच्या पुणे - बेंगलोर ( राष्ट्रीय महामार्ग क्र. ४) या

हमरस्त्यावर आहे. हा रस्ता अठराव्या शतकाच्या पूर्वार्धापासून आहे. आता तो चौपदरी झाला आहे. गावाबाहेरून परस्पर वाहतुकीसाठी उड्डाणपूलही झाला आहे. गुहागर-विजापूर हा राज्यमार्गही कऱ्हाड शहरातून जातो. या खेरीज कऱ्हाड - मसूर - कोरेगाव, कऱ्हाड - शामगाव खिंडमार्गे पुसेसावळी, मायणी, कऱ्हाड-कार्वे- तासगाव, कऱ्हाड-उंडाळे, घोगाव, येळगाव, येवती, कऱ्हाड कोळेवाडी-ढेबेवाडी असे रस्ते आता झाले आहेत.

कऱ्हाडच्या तिन्ही बाजूंना नद्या वाहत असल्यामुळे पुलांच्या अभावी जून मध्यापासून नोव्हेंबरअखेरच्या चार महिन्यांत लाकडी नावांनी किंवा लोखंडी काहिलीने गोटे, सैदापूर, कार्वे या भागाकडे जावे लागे. तोपर्यंत दाभोळ वेशीसमोरील उताराने, कृष्णा घाटासमोरील मसूर उताराने किंवा गोळेश्वर उताराने जावे लागे. इ. स. १८४० पूर्वी वाहतुकीसाठी बैलगाड्यांचा वापर करण्यासारखे रस्ते नव्हते तोपर्यंत प्रामुख्याने मालाची वाहतूक बैलांच्या किंवा खेचरांच्या पाठीवरून लमाण करीत. प्रवासी वाहतूकही बैलगाड्या, घोडी, टांगे किंवा मेणा -पालखी यांच्या सहाय्याने होई. सामान्य माणसे पायीच प्रवास करीत.

१८६४ मध्ये कुंभार्लीचा घाट झाल्यानंतर पाटणमार्गे चिपळूणकडे जाता येऊ लागले. तोपर्यंत कऱ्हाडातून कोकणात जाण्यासाठी फोंडा घाटातून जावे लागे. १८७१-७२ मध्ये कोयना नदीवर पूल झाल्यावर १८८३ मध्ये पुणे-बेळगाव हा पक्का रस्ता झाला.

दरम्यान पुणे-मिरज अशा रेल्वे रस्त्याची आखणी झाली. हा मीटर गेज मार्ग सदर्न मराठा रेल्वे कंपनीने हाती घेतला होता. कृष्णा व तिच्या उपनद्यांवर ठिकठिकाणी पूल बांधावे लागू नयेत यासाठी कृष्णा नदीच्या डाव्या बाजूने हा मार्ग काढल्यामुळे कऱ्हाडचे रेल्वे स्टेशन कऱ्हाडपासून पूर्वेस पाच कि.मी.अंतरावर घेण्यात आले. कऱ्हाड स्टेशन हे पाण्याचे स्टेशन असल्यामुळे कोळशाच्या वाफेवर चालणारी इंजिने होती, तोपर्यंत या स्टेशनवर बराच वेळ गाड्या थांबत. १८८६ साली सुरू झालेल्या या मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर होण्यास १९७० साल उजाडले. ब्रॉडगेजमुळे भारतातील प्रमुख ठिकाणी जाण्यास रेल्वेचा उपयोग होऊ लागला. सध्या रोज पंधरा गाड्यांची ये-जा

होते, दरमहा सुमारे २००० मे. टन माल वाहतूक, १.७५ कोटी रूपये उत्पन्न, ५० लाख रूपये प्रवासी भाडे उत्पन्न मिळते. आता प्रशस्त प्लॅटफॉर्म, संगणकीकृत आरक्षण इ. अनेक सुविधा कऱ्हाड स्टेशनवर उपलब्ध झाल्या आहेत.

कऱ्हाडच्या रेल्वे स्टेशनवर जाण्यासाठी पावसाळा सोडून एरवी सध्याच्या कृष्णा पुलाच्या पूर्वेस फरशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कॉजवेचा उपयोग केला जाई. पाऊसकाळात कमळेश्वर मंदिरापासून नावेने पलीकडे जाता येई. त्यामुळे पावसाळा सुरू होण्यापूर्वी टांगे, छकडे इ. वाहने नदीपलीकडे नेऊन ठेवलेली असत.मालवाहतूकही नावांच्या सहाय्याने होई. नावा लोकलबोर्डाच्या असत आणि त्या चालविण्याचा मक्ता दिला जाई. १९३९ मध्ये कृष्णेचा पूल झाल्यानंतर या नावा बंद झाल्या. पूल झाल्यानंतर कऱ्हाडातून स्टेशनवर जाण्यासाठी टांग्यांचा, बागवानांच्या 'फीडर सर्व्हिस' नावाने ओळखल्या जाणाऱ्या मोटारींचा वापर होई. स्वातंत्र्योत्तर काळात एस.टी.ने फीडर सर्व्हिसची जागा घेतली. गेल्या वीस वर्षांत टांग्यांऐवजी रिक्षा धावू लागल्या आहेत. १९६२ मध्ये कार्वे येथे कृष्णा नदीवर पूल होईपर्यंत कऱ्हाड – कार्वे प्रवास नावेनेच करावा लागे.

गावातल्या गावात इकडून तिकडे जाण्यासाठी वाहनाने जाण्याची पध्दतच नव्हती. फार झाले तर सायकलींचा वापर होई. रेल्वे स्टेशनवर जाण्यासाठी ( किंवा दवाखान्यात बाळंतपणासाठी गरोदर बाईला घेऊन जाण्यासाठी ) सामान, मुले बाळे असतील तरच स्टॅंडवर जाण्यासाठी टांग्यांचा वापर होई. रस्ते चढ–उताराचे, बोळाचे त्यामुळे टांगेवाला बऱ्याच ठिकाणी खाली उतरून चालत असे. घोड्यांची आणि टांग्यांचीही अवस्था अपवाद वगळता दयनीय असे. वर्षातून एकदा पासिंगच्या निमित्ताने टांग्यांना रंगरंगोटी होई आणि घोडी सजविली जात. तथापि आपल्या सेवाभावी वागणुकीने आणि आपुलकीने शिराज इनामदारसारख्या टांगेवाल्यांचे नाव अजूनही जुन्या पिढीच्या तोंडी येते. आता रिक्षांमधून स्थानिक वाहतूक मोठ्या प्रमाणावर होते. १९९७ मध्ये केलेल्या एका पाहणीनुसार कऱ्हाडमध्ये ७२३५ मोटारसायकली, ३४११ स्कूटर्स, ६१६८ मोपेडस्, १०६७ कार्स,११०३ जीप्स, ५६ स्टेशन वॅगन्स, ८४ टॅक्सी, १०८२ रिक्षा, ९३१

ट्रक्स, १३९ तीन चाकी, २६७१ ट्रॅक्टर्स आणि २४ क्रेन व इतर वाहने होती. २००७ मध्ये ७३८९७ मोटारसायकली, ४९६२ स्कूटर्स, १०३५१ मोपेडस, २५३२ रीक्षा, ५५६६ कार्स, ३१५० जीप, २२ मेटॅडोर, ६०२ टॅक्सी, १० बस, १७६० ट्रक्स, ८२ टँकर्स, १२ ॲम्बुलन्स, ५१०० ट्रॅक्टर्स अशी नोंद आहे.

कोयना धरण झाल्यामुळे महत्त्वाच्या व्यक्तींची वर्दळ वाढली. कऱ्हाडच्या पश्चिमेस १९६२ मध्ये मंजुरी मिळालेला मुंढे येथे एक छोटा विमानतळ १९६५ मध्ये सुरू झाला. महत्त्वाच्या व्यक्तींपुरता व तोही दिवसाच एवढाच मर्यादित त्याचा उपयोग होतो. चोवीस तास म्हणजे रात्रंदिवस विमान उतरविण्याची व उड्डाणांची सोय करण्याच्या दृष्टीने हा विमानतळ सुधारण्याचा प्रस्ताव मंजूर झाला असून १२८० मीटर लांबीच्या धावपट्टीवर दोन्ही बाजूंना संरक्षण भिंत, भिंतीवर तारेचे कुंपण, धावपट्टीवर ३९ विद्युत दिवे, रात्रीच्या वेळी सुमारे ४ किमी अंतरावरून नाईट लँडिंगची सिग्नल यंत्रणा इ. कामे झाली आहेत.

कऱ्हाडात परगावाहून येणाऱ्या बैलगाड्यांसाठी शनिवार पेठेतील मरीआईच्या देवळापाशी नगरपरिषदेने १८५९ मध्ये जागा दिली. पहिल्या महायुध्दानंतर मोटार गाड्यांचा वापर सुरू झाल्यावर चावडी चौकात प्रवासी वाहतुकीसाठी(सर्व्हिस मोटारी) गाड्या उभ्या राहत. बळवंतराव जाधव, बटाणे, मसूरकर देशपांडे या स्थानिक आणि पानाचंद, हनुमान इ. परगावच्या प्रवासी वाहतूक कंपन्या सुरू झाल्या. पुणे – मुंबई, चिपळूणकडे जाणाऱ्या गाड्या फक्त दिवसाच जात. कात्रज, खंडाळा (खंबाटकी), कुंभार्ली घाटातून मोटारींना रात्री जाण्यास मनाई असे. बळवंतराव जाधवांचे ट्रान्सपोर्ट ऑफिस मंगळवार पेठेत सध्या कन्याशाळा आहे त्या जागेत होते. ( त्या जागेस 'बाळा जाधवांचा तबेला' म्हणत.) पुढे मुख्य पोस्ट कार्यालयाजवळ सध्या केंद्र शाळा आहे, तेथे वाहने उभी राहत. पुढे त्या जागेला जुना स्टँड म्हटले जाई. कारण त्यानंतर राजमहाल टॉकीजच्या पश्चिमेकडील परिसरात नवा स्टँड सुरू झाला. या स्टँडवर वेगवेगळ्या वाहतूक कंपन्यांची ऑफिसे होती. त्यांचे एजंट ओरडून सीटा गोळा करीत. एस. टी. सुरू झाल्यानंतर

सध्याच्या जागेत स्टँड उभारण्यात आला. आता प्रवासी वाहतूक एवढी वाढली आहे की काही गाड्या कोल्हापूर नाक्यावरून परस्पर जातात तरीही तो स्टँड अपुरा वाटू लागला आहे. या शिवाय स्टँडबाहेरही खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या अधिकृत - अनधिकृत गाड्या असतात त्या वेगळ्याच.

कऱ्हाड-सातारा रस्त्यावर तासवडे येथे व पाटण रस्त्यावर विजयनगर येथे हल्ली पथकर द्यावा लागतो. पूर्वी कुंभार्ली घाटाचे काम झाल्यावर १८६४ च्या सुमारास केसे येथे, बेळगाव-पुणे रस्त्यावर कोयना पुलाजवळ आणि कऱ्हाड विजापूर रस्त्यावर सुर्ली येथे पथकर वसुलीची नाकी होती.

१९४७ मध्ये प्रवासी वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण झाले. जानेवारी १९५३ मध्ये कऱ्हाडास एस. टी.चे आगार सुरू झाले. १९५९ मध्ये कऱ्हाड डेपो, वर्कशॉप सुरू झाले. आता राज्यातील सर्व ठिकाणी जाण्यासाठी भरपूर गाड्या उपलब्ध असतात. शिवाय खाजगी कंपन्यांच्या गाड्याही स्पर्धापूर्ण सेवा देत आहेत.

माल वाहतूक रेल्वे आणि खाजगी माल वाहतूक कंपन्या यांच्या माध्यमातून केली जाते. रेल्वेने येणारा माल सोडवून घेऊन व्यापाऱ्यांना देण्याचा व्यवसाय करणारे दलाल किंवा कार्टिंग एजंट असत. १९२१ मध्ये बाबुराव घोरपडे कार्टिंग एजंटचे काम पाहत. नंतर आपटे, आगरकर, मेहेंदळे, दातार इ. मंडळी कार्टिंग एजंट म्हणून काम करत.

मालवाहतुकीच्या व्यवसायात कऱ्हाडात जवळजवळ ५० ट्रान्स्पोर्ट एजन्सीज असून पैकी 'समर्थ', 'लक्ष्मी', 'भारत', 'अजंठा' या जुन्या ट्रान्स्पोर्ट एजन्सी आहेत. १९५६ च्या सुमारास मालवाहू मोटारमाल असोसिएशन स्थापन झाली. सुमारे ३००० ट्रक्स व ७००-८०० छोटी वाहने यांच्या माध्यमातून भारतात कोठेही माल वाहून नेण्याची सोय झाली आहे. त्या अनुषंगाने पेट्रोल पंप, वे-ब्रिज आणि क्रेन्स तसेच वाहन विक्री, दुरूस्ती, स्पेअरपार्टस् विक्री आणि सर्व्हिसिंग सेंटर्सही मुबलक झाली आहेत. कऱ्हाडातील सर्वात जुना पेट्रोल पंप १९१२ च्या सुमारास देसाई आणि कंपनीचा होता. तो पुढे 'कालिदास ॲन्ड सन्स' चालवत. आता तोच मधुअण्णा कुलकर्णी यांचा "संगम पेट्रोल पंप". म्हणून ओळखला जातो.

याच ठिकाणी १९६२ मध्ये कराडातील पहिली एल. पी. जी. गॅस एजन्सी सुरू झाली.

पुणे ते बेंगलोर दरम्यान कऱ्हाड येथे मोबाईल क्रेनची सुविधा अजंठा ट्रान्सपोर्ट येथे १९६८ मध्ये प्रथमच उपलब्ध झाली. कऱ्हाडमध्ये वेईंग ब्रीज ही त्यांनीच प्रथम आणला.

**टपाल व्यवस्था**

सार्वजनिक टपाल व्यवस्था ब्रिटिश अमदानीत १८५४ मध्ये सार्वत्रिक झाली. १८८५च्या सुमारास कऱ्हाड येथे फक्त एक सब पोस्ट ऑफिस होते.त्या काळी रेल्वे फक्त पुण्यापर्यंतच असल्यामुळे टपालाची वाहतूक एका गावाहून दुसऱ्या गावास टांग्याने होत असे. तारेची( टेलिग्राफ) सोय कऱ्हाडात नव्हती. सध्या (२००५) कराडात एक मुख्य पोस्ट ऑफिस असून टिळक पथ, वांकर बिल्डिंग, मार्केट यार्ड, मंगळवार पेठ, आर एम एस बिरोबा कॉम्प्लेक्स, मलकापूर, विद्यानगर, ओगलेवाडी येथे सब पोस्ट ऑफिसेस आहेत. याखेरीज खाजगी कुरियर्स ( अंगडिया) सुमारे २५ आहेत.

**दूरध्वनी**

कऱ्हाडात १९४९ मध्ये टेलिफोन एक्स्चेंज सुरू झाले. त्यावेळी गावात ५० ग्राहकांची सोय झाली. त्यापूर्वी कितीतरी वर्षे आधी म्हणजे १९२९ मध्येच आण्णाप्पा नारायण कल्याणी यांनी कोळे, पोतले मळा, कऱ्हाड व कऱ्हाड स्टेशन दुकान या चारी ठिकाणी स्वतंत्र ट्रंक टेलिफोनची व्यवस्था करून घेतली होती. सातारा जिल्ह्यातील ही पहिली टेलिफोन सुविधा होती. १९५४ मध्ये कऱ्हाडात १०० ग्राहकांसाठी आणि जानेवारी १९५९ मध्ये २०० ग्राहकांसाठी टेलिफोन सुरू झाले. सध्या सुमारे १२००० फोन असावेत. मोबाईलचा वापरही मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे.

**व्यापार**

कऱ्हाडच्या परिसरातील शे-सव्वाशे खेड्यांचा संबंध लक्षात घेऊन व्यापारउदिमासाठी छोटे मोठे व्यापारी कऱ्हाडात येऊ लागले. त्या आधीच्या काळात मारवाडी, वाणी, कासार, शिंपी ही मंडळी आपापला विक्रीचा माल

घोड्यावर वा बैलावर लादून किंवा स्वत:च्या डोक्यावर घेऊन घरोघर जाऊन विक्री करीत किंवा आठवड्याच्या बाजारात बसून विक्री केली जाई. १८५५ च्या सुमारास कऱ्हाडचा साप्ताहिक बाजार दर रविवारी मनोऱ्यासमोरील रस्त्यावर भरत असे. मनोऱ्यांच्या दोन्ही बाजूंस दगडी बांधकामाच्या कमानीवजा अकरा खोल्या होत्या.(त्यांना 'मळग्या' म्हणत) तेथे व्यापारी आपली दुकाने थाटत. तेव्हापासूनच हा भाग पेठ म्हणून ओळखला जातो. रहदारीला अडथळा येऊ लागल्यामुळे या बाजाराची जागा २२ नोव्हेंबर १८५५ रोजी रविवार पेठेतील शिंपी गल्लीत हलविण्यात आली. तीही गैरसोयीची वाटल्यामुळे बाजाराची जागा ६ एप्रिल १८५६ पासून मंगळवार पेठेत हलविली. ३ मे १८५७ पासून कऱ्हाडात आठवड्यातून दोनदा, रविवारी व गुरुवारी बाजार भरू लागला. १८६४ पासून मनोऱ्यांच्या पश्चिमेस आणि दर्ग्याच्या दक्षिणेकडील बाजूस म्हणजे सध्याच्या मंडईत बाजार भरतो.

यात्रांच्या निमित्तानेही व्यापार मोठ्या प्रमाणावर होई. कऱ्हाडजवळ पाल (खंडोबाची) आणि कोळे येथे जत्रा असतात. १८८२ मध्ये पालीस पन्नास हजार लोक जमले आणि ८००० रू. ची विक्री झाली होती तर कोळे येथे ५००० लोक जमले होते व विक्री रू. ३००० च्या घरात होती.

१८८४ मध्ये कऱ्हाडास सुमारे ४०० व्यापारी होते. त्यांच्यापैकी ब्राह्मण व्यापारी सावकारी करीत. मारवाडी व्यापारी कापडाचा व्यापार करीत तर वाणी-तेली शेतकऱ्यांकडून गूळ, हळद, मिरची, भुईमूग, तंबाखू, तेल इ. रोखीने खरेदी करून कोकणात पाठवीत. त्या बदल्यात कोकणातून मीठ, नारळ, मसाल्याचे पदार्थ,खजूर इ. आणून येथे विकत.साळी व मुसलमान व्यापारी मुंबईहून सूत आणून त्याची पागोटी, उपरणी, पंचे तयार करून विकत तर कोष्टी पासोड्या आणि सुती कापड तयार करून विकत. (सातारा जिल्हा गॅझेटियर १८८५ पृ.२१३-२१८)

१८८५ च्या सुमारास राजारामशेठ लाहोटी यांनी आपली पेढी सुरू करून कऱ्हाडातील कापड व्यापाराचा श्रीगणेशा केला तर सराफी धंद्याची सुरुवात गोविंद बाबाजी बिजुटकर यांनी १८९५ मध्ये केली.१८९२ मध्ये रॅले आणि कंपनीने कऱ्हाडात भुईमूग शेंगाची वखार सुरू केली. १९०५ मध्ये आण्णाप्पा

नारायण कल्याणी यांची वखार  कराडात सुरू झाली. १८९७ साली मोठा दुष्काळ पडला, त्यावेळी गोरगरिबांना स्वस्त धान्य मिळावे अशी विनंती पै. हसन मुजावर यांनी व्यापाऱ्यांना केली. तलकचंद गुजर, ज्ञानोबा बटाणे, भगवान गुजर आणि कं, रामदास घेवारी हे त्यावेळी धान्य व्यापारी होते.

कऱ्हाडात  छपाईसाठी १८८४ पासून शिळा प्रेसची  सोय असावी. तेव्हा  कऱ्हाडात साप्ताहिके शिळाप्रेसवर निघत. १८९८ च्या सुमारास स्वत:चा सुमन्त  छापखाना सुरू करणारे पांडुरंग बळवंत कोल्हापुरे. यांचे  नाव त्या  व्यवसायातील जुन्या पिढीतील माणसे काढतात. त्यांचे चिरंजीव डॉ. नारायण पांडुरंग कोल्हापुरे यांनी श्री लक्ष्मी  छापखाना काढला. रविवार पेठेत लिंगायत बोर्डिंगजवळचा  हा छापखाना आजही पांढरपट्टे चालवितात. सोमवार  पेठेत सध्याच्या जनकल्याण पतसंस्थेच्या समोरील बाजूस बी.एन. कुलकर्णी यांचा श्री भुवनेश्वरी छापखाना होता. पुढे त्याचे स्थलांतर ओगलेवाडीस झाले. तो छापखाना तमाण्णा विंगकर चालवीत. नंतर त्यांनी  स्वत:चा लक्ष्मीनारायण  प्रेस कऱ्हाडात सुरू केला. लोकमान्य छापखाना रामचंद्र गणेश गिजरे यांनी सुरू केला, तो १९२१ च्या सुमारास. त्यांचे कुटुंबीय आजही तो चालवत आहेत. याच छापखान्यातर्फे १९२१ पासून तयार करण्यात येणारी 'श्री लोकमान्य रोजनिशी' आजही लोकप्रिय आहे. कालमानानुसार आधुनिक अद्यावत  तंत्रज्ञानाने  छपाई  करणारी बरीच मुद्रणालये आता कऱ्हाडात आहेत.

१९१० पासून कापड वगैरे मालाची आयात कऱ्हाडात मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याचे दिसते. गणपत नारायण कोपर्डे यांचे दुकान १९१० मध्ये सुरू झाले. १९२०  च्या सुमारास कासम हाशम कच्छी यांनी  कऱ्हाडात  घाऊक कापड व्यापाराची सुरुवात केली.सूत निर्यात क्षेत्रात उज्ज्वल रामविलास लाहोटी यांनी नाव मिळविले आहे. तांब्या पितळेच्या  भांड्यांचे दुकान तुकाराम केशव मोहिरे यांनी १९१७ त सुरू  केले. गणपतराव ज्ञानोबा बटाणे यांनी आपल्या दुकानात स्टेशनरी, आयुर्वेदिक औषधे विकावयास प्रारंभ केला. चावडी चौकात औषधाचे म्हणून ''कॅश केमिस्ट''  दुकान १९२० मध्ये शंकर बापूजी जोशी यांनी सुरू  केले,  ते आता त्यांची नातसून सौ. दीपा चालवते. या दुकानामुळेच

औषधांचे दुकान या अर्थाने " कॅश केमिस्ट" हा शब्द जुन्या कऱ्हाडकरांच्या तोंडी रुळला होता.

१९१० च्या दरम्यान माधव रामचंद्र पावनगडकर यांनी कऱ्हाडातील पहिली सोडा वॉटर फॅक्टरी सुरू केली. मनोऱ्याजवळ चावडीमनी यांचे, जुन्या स्टँडवर शंकरराव साने यांचे, गावात भाऊकाका गरूड यांचे अशी सोडा वॉटरची दुकाने होती. या दुकानात भाजीपाला, स्टेशनरी, अत्तर गुलाब अशी विविधताही होती, तसेच तेथे गॅसबत्त्याही भाड्याने मिळत. पण चव्हाणांच्या महाराष्ट्र सोडा वॉटर फॅक्टरीमध्ये मिळणारा पाचक (डायजेस्टिव्ह)सोडा "झिंगाबाईचा सोडा" अजूनही त्याच नावाने ओळखला जातो.

प्रथम चावडीचौकात बळवंतराव पुरोहितांचे आणि नंतर स्टँडची जागा बदलल्यामुळे पाटण कॉलनीला लागून करमरकरांचे एक हॉटेल बरीच वर्षे होते. पण चावडी चौकात १९२५ मध्ये आनंदराव उडपी यांचे "बॉम्बे रेस्टॉरंट" सुरू झाले.१९२८ मध्ये रामभाऊ उडपी कऱ्हाडात आले. त्यांनी या हॉटेलमध्ये सुरू केलेली आंबोळी इतक्या वर्षानंतरही नाव राखून आहे. लोक तिला गंमतीने "रामबोळी" म्हणत. अशी आंबोळी कऱ्हाडबाहेर कोठेही मिळत नाही असे म्हणतात.कऱ्हाडात आता दोनएकशे उपहारगृहे असून गावाबाहेर हमरस्त्यावर पाचपंचवीस धाबे खवय्यांची सोय करतात.आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज असे निवास – भोजनगृह १९७४ मध्ये 'संगम' या हॉटेलरूपाने उभे राहिले. आता तशीच सात आठ हॉटेल्स कऱ्हाड गावालगत सुरू झाली आहेत.

य. रा. गुप्ते यांच्या "कऱ्हाड" या पुस्तकात " १९२९ मध्ये कऱ्हाडात तीन फोटोग्राफरची दुकाने,चार छापखाने असून कच्छी लोकांचा व्यापारात हातखंडा असून पत्र्याचा, सुताचा आणि किराणा जिनसांचा व्यापार मुख्यत्वे ते करतात. (पृ.४९)" अशी माहिती दिली आहे.

सुप्रसिध्द शास्त्रज्ञ वसंतराव गोवारीकरांचे वडील हे पीडब्ल्यूडीमध्ये इंजिनियर होते. निवृत्तीनंतर त्यांनी फोटोग्राफीचा व्यवसाय सुरू केला. "कॅश केमिस्ट" या चावडीचौकातील औषधाच्या दुकानातच त्यांचा स्टुडिओ होता. पुढे त्यांनी कोल्हापुरास स्थलांतर केले. आशुतोष व अविनाश हे महाराष्ट्रातील

सुप्रसिध्द छायाचित्रकार गोवारीकर बंधू हे त्यांच्यापैकीच. गणपतराव फडके हे ड्रॉईंग टिचर होते. सोमवार पेठेत खैरतखानाच्या बोळासमोर खेरांच्या वाड्यात त्यांचा स्टुडिओ होता. पुढे त्यांचे चिरंजीव कमलाकर व नातू संजय यांनी तो व्यवसाय आजही चालविला आहे. रामकृष्ण गोविंद पोतनीस हेही फोटोग्राफीचा व्यवसाय करीत. ते पुढे पुण्यास गेले. गोवारीकर आणि फडके यांच्याकडून शिक्षण व अनुभव घेऊन वसंतराव श्रोत्री यांनी स्वत:च्या शुक्रवारातील घरातच स्टुडिओ काढला. आता त्यांचे चिरंजीव रवी, सारंग व सुनील तो व्यवसाय पाहतात.

देशसेवेचा एक भाग आणि पोटाची सोय अशा दुहेरी हेतूने वृत्तपत्र वितरणाचा उद्योग भाऊकाका गरूड आणि नारायणराव पोतनीस यांनी स्वीकारला. त्यांचा वारसा आज त्यांची तिसरी पिढी चालवत आहे. आज या व्यवसायातही बरीच मंडळी आहेत. कोटाखाली मुजावरांची जळाऊ लाकडांची वखार (१९२३), स्टेशनरी आणि शालेय पाठ्यपुस्तकांची विक्री करणारी मारूतराव आराणके मास्तरांची "पाटील आणि कंपनी"( १९३०), दादा निगडीकर यांनी सुरू केलेले चहाचे दुकान (१९३२), दत्तोपंत शाळीग्राम यांनी सुरू केलेला यांत्रिक धुलाईचा ( इ. एम. पॉवर लाँड्री) व्यवसाय(१९३४), बाळासाहेब दिवेकर यांचा बेकरीचा व्यवसाय (१९३४), मथुरादास सामाणी यांनी तयार कपड्यांची विक्री करण्यासाठी सुरू केलेले "विजयसिंह अपटुडेट क्लॉथ स्टोअर्स" (१९३८), इनामदारांचे 'मनोहर क्लॉथ स्टोअर्स' (१९४०), सीझनप्रमाणे सर्व सामान विकणारे श्रीकृष्ण कणीराम लाहोटी इ. दुकाने आजही कऱ्हाडकरांची सेवा करीत आहेत. वासुदेवराव परांजपे यांचे शिवणयंत्र विक्रीचे दुकान (१९२५), किशाबापू आठल्ये यांचे आनंद कॅप मार्ट व शास्त्रोक्त शिवणकला मंदिर (१९३६), टोपीवाले कलबुर्गी, जो. द. डोंगरकर यांचे शिलाईचे दुकान, टिंबरमर्चंट कोपर्डेकरांची वखार हे व्यवसाय आता बंद आहेत.

१९३५ ते १९४५ च्या दरम्यान शनिवार पेठेत दत्त चौकात विनायक बाळकृष्ण हर्डीकर यांचे रेडिओ व ग्रामोफोन विक्री दुरूस्तीचे छोटे दुकान होते. त्याच सुमारास शंकरराव राजाराम बेलापुरे यांनी मनोऱ्यानजिक ग्रामोफोन

रेकॉर्डस् व रेडिओ विक्रीचे दुकान पाच सात वर्षे चालविले. ते एचएमव्ही, कोलंबिया, ट्वीन या कंपन्यांचे एजंट होते. १९४५-४६ च्या आसपास साताऱ्याहून येऊन गाडेकर यांनी कऱ्हाडात रेडिओ विक्री दुरुस्तीचा व्यवसाय केला. माधवराव बिजुटकर यांनी १९४७ मध्ये प्रथम भागीदारीत आणि नंतर १९४८-४९ मध्ये स्वतंत्रपणे "प्रकाश इलेक्ट्रिक आणि जनरल स्टोअर्स" मनोऱ्याजवळ सुरू केले. "फिलीप्स" या नामवंत कंपनीचे अधिकृत विक्रेते म्हणून त्यांनी जवळ जवळ पन्नास वर्षे काम पाहिले आणि फिलिप्स डीलर्स असोसिएशनच्या मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांची निवड झाली होती. वैद्यकीय व्यवसायामुळे आणि शैक्षणिक केंद्र असल्यामुळे कऱ्हाडात औषधांची आणि स्टेशनरीची व क्रमिक पुस्तकांची दुकाने बरीच आहेत. तथापि साहित्यप्रेमी रसिकांना निवडक ललित वाङ्मय मात्र एखाद्याच 'दिलखुष बुक स्टॉल ' मध्ये सहज उपलब्ध होते.

केशभूषकारांचा व्यवसाय हा तसा पारंपरिक. कऱ्हाडात सोमवार पेठेतील व्यंकोबाच्या देवळासमोरील कट्ट्यावर सकाळी नाभिक आपली धोकटी घेऊन बसत. वर्दी मिळेल त्या घरी जात. एकनाथ वास्के यांनी १९३८ च्या सुमारास खुर्च्या, आरसे आणि त्या वेळचा अद्ययावत सरंजाम घेऊन 'ए वन कुशल केश कर्तन केंद्र' नावाचे सलून सुरू केले. आता कऱ्हाडात वातानुकूलित सलून्सही सुरू झाली आहेत. कऱ्हाडात स्त्रियांसाठी सुशोभनगृह (ब्युटी पार्लर्स) ची सुरुवात सुलभा सूर्यवंशी यांनी १९८७ मध्ये केली.

१९४२ नंतर महायुध्दाच्या परिणामी जीवनावश्यक तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, साखर, रॉकेल, कापड यांच्या खुल्या बाजारातील विक्रीवर बंदी आली आणि रेशनिंगची (शिधा वाटप) दुकाने उघडण्यात आली. १९४८ पासून १९५४ पर्यंत हे नियंत्रण कमी कमी होत गेले, पण पुन्हा १९५६ मध्ये किंमतीवर नियंत्रणे आणण्यासाठी रास्त भाव दुकाने सुरू झाली आहेत.

शेतकऱ्यांच्या शेती मालाची किफायतशीर विक्री करुन देणे आणि शेतीच्या वाढीसाठी शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, अवजारे उपलब्ध करून देण्यासाठी 'कराड सहकारी खरेदी विक्री सोसायटी' ही संस्था १९३७ पासून कार्यरत आहे.

१९४४ मध्ये १ जानेवारीस कऱ्हाडात मार्केट कमिटीची स्थापना झाली. त्यावेळी मार्केट यार्ड जुन्या कोयना पुलापासून सध्याच्या संगम हॉटेलपर्यंतच्या परिसरात होते. कार्वे-गोळेश्वर रस्त्यावर सुमारे पंचवीस एकरांत सध्याच्या जागी मार्केट यार्ड १९५० साली स्थलांतरित झाले. कराडात भुईमूग, शेंगा, गूळ, हळद इ. ची उलाढाल मोठ्या प्रमाणात होई. १९५७-५८ मध्ये कराड मार्केट यार्डातील उलाढालीची आकडेवारी उपलब्ध आहे. ती अशी : शेंगा ( २७७२५६ बं. मण, किंमत रू. ४१,८०,३०७), गूळ ( २५०८२४ बं. मण किंमत रू. ३७,७०,६५१), हळद ( ९६,६५७ बं. मण किंमत रू. १५,८०,१७४), ज्वारी (३५५४०६ बं. मण किंमत रू.४८,२२,५४२). याच काळात विक्री कर खात्याकडील नोंदींप्रमाणे कऱ्हाडात ९३ अन्नधान्याची, ७८ कापडाची, २ बिल्डिंग मटेरियलची, ५ वाहतूक व्यवसायाची, १ मशिनरीचे, ८ औद्योगिक वस्तूंचे आणि १५ इतर अशी २०२ दुकाने होती आणि ३१ मार्च १९५७ रोजी संपलेल्या वर्षात त्यांत सुमारे पावणेतीन कोटी रू.ची उलाढाल झाली होती.

१९४७ मध्ये कराड तालुका शेती माल बाजार समितीची पहिली निवडणूक झाली. शामराव बाळकृष्ण पाटील ( उंडाळकर ) शेतकरी प्रतिनिधी म्हणून पहिल्या क्रमांकाने निवडून आले. त्यांचीच या समितीचे पहिले अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली होती. त्यांच्या निधनानंतर कऱ्हाडच्या मार्केट यार्डला 'शामराव पाटील मार्केट यार्ड' असे नाव देण्यात आले आहे. पूर्वी येथे हळदीचा व्यापार होई, पण अलीकडे तो सांगली येथे स्थलांतरित झाला आहे. कोयना नदीच्या काठी व्यापाऱ्यांची हळदीची पेवे असत. भुईमूग शेंगांची आवकही पूर्वीच्या प्रमाणात होत नाही. कऱ्हाड ही गुळाची निर्यात करणारी मोठी बाजारपेठ आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वीपासून येथील गूळ राजापूर बंदरातून रवाना होई. अलीकडे सहकारी साखर कारखाने झाल्यामुळे पूर्वीपेक्षा गुऱ्हाळघरे कमी झाली असली तरी केसे, तांबवे, सुपने, येरवळे, सवादे इ. ठिकाणी आजही उत्तम रवाळ आणि रसदार गूळ तयार होतो. मुंबई, राजस्थान, गुजरात तसेच कुवेत, दुबई येथील आंतराष्ट्रीय बाजारातही या गुळाला मागणी आहे. येथे

कोल्हापूरच्या बरोबरीने गुळाचे सौदे होतात. २००५ साली ८,८२,१३५ रवे विक्री होऊन सुमारे ४७ कोटी रुपयांची उलाढाल झाली. या परिसरात गेल्या दहा बारा वर्षांत टोमॅटोचे उत्पादन होते. तो माल मुंबई, बेळगाव, अहमदाबादकडे जातो. २००६ – ०७ मध्ये सुमारे एक हजार एकरांतून २५००० टन विक्री झाली.

कऱ्हाडात जनावरांचा बाजार दर गुरुवारी भरतो. आठवड्यात सुमारे २००–३०० व्यवहार होतात. सातारा व सांगली जिल्हयातील हा एकमेव मोठा बाजार असावा. येथील शामराव पाटील मार्केट यार्डात वर्षभरात सुमारे दहा बारा कोटी रुपयांची उलाढाल होते.

१९४८ मध्ये कऱ्हाड शहराला शॉप अॅक्ट लागू झाला. त्या वेळी कऱ्हाडात सर्व तऱ्हेची सुमारे ७२३ दुकाने होती. १९६७ मध्ये कराड अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने कऱ्हाडातील व्यापारी पेठेची स्थूलमानाने पहाणी केली होती त्यावेळी कऱ्हाडात किराणा दुकाने ( ठोक व किरकोळ ) २२१, कापड १०१, सराफ सोनार ५०, लोखंडी माल ४३, स्टेशनरी ३८, सायकली ५०, स्टील तांब्या पितळेची भांडी ३०, रेडिओ इलेक्ट्रिक १४, सोडा लेमन २१, बांगड्या १२, घड्याळे विक्री दुरूस्ती ११, बेकरी १५, औषधे १६, फळफळावळ ३६, फोटोग्राफर्स ९, चहा ९, डेअरी ८, वृत्तपत्रे ३, अशी नोंद आढळते.

"एका छताखाली सर्व काही" ही डिपार्टमेंटल स्टोअर्सची कल्पना प्रामुख्याने सहकारी तत्त्वावर १९८६ च्या सुमारास झाली. कऱ्हाडात "अर्बन बझार" (१९९१), "जनता बाजार" " कृष्णा सरिता बाजार" "रयत बाजार" इ.बझार कराडात सुरू झाले. त्या प्रमाणे खाजगी क्षेत्रातील 'गोदरेज आधार', 'मोर' ही डिपार्टमेंटल स्टोअर्स पण सुरू झाली आहेत. येथे मिलिटरी कँटीनही आहे. भेसळ प्रतिबंधक कायद्याप्रमाणे कराड नगरपरिषदेकडे घाऊक विक्रेते ३१०, किरकोळ विक्रेते ३२१, हॉटेल व खानावळी ३७५, फिरते विक्रेते ३०९ असे एकूण १२२५ परवानाधारक २००५–०६ मध्ये होते

**ग्राहक संस्था**

१९८६ साली ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. पण १९७३

साली महाराष्ट्रात दुष्काळसदृश  परिस्थिती निर्माण झाली. स्वस्त व रास्त दराच्या धान्य  दुकानांतूनही  जीवनोपयोगी  वस्तू  उपलब्ध  होत नव्हत्या. त्यावेळी अविनाश भडकमकर, हृदयनाथ कुलकर्णी, पंडित ओंडकर, अल्बर्ट डिसूझा  अशा  तरूण  मंडळींनी  कऱ्हाडात ग्राहक  संघटना  स्थापन केली. पु. पां.( बाबुराव )  गोखले,  नाथ चव्हाण, बाबुराव  कोतवाल  यांचे त्यांना  मार्गदर्शन  होते. यशवंतराव चव्हाणांनी या संघटनेला सदिच्छा दिल्या होत्या. या संघटनेने सामंजस्याने व  सनदशीर मार्गाने व्यापाऱ्यांत वचक निर्माण केला होता. या संघटनेच्या प्रयत्नांतून  काही सहकारी ग्राहक भांडारेही निर्माण झाली. पुढे १९७५ च्या आणीबाणीत ही संघटना  विस्कळीत झाली. सध्या सरकारमान्य ग्राहक संघ किंवा ग्राहक  पंचायतीचे काम ग्राहक संरक्षण कायद्याचे पाठबळ लाभूनही चालते, त्यापेक्षा प्रभावीपणे हे काम चालत असे.

कऱ्हाडातील व्यापाऱ्यांच्या संघटनांपैकी सर्वात जुनी संघटना सराफांची. ती  १९३५ मध्ये स्थापन झाली असली तरी तिची नोंदणी १९५२ मध्ये झाली. १९५६ मध्ये कापड  व्यापारी संघटना व १९५८ मध्ये किराणा –  भुसार व्यापारी असोसिएशन सुरू  झाली. २००० मध्ये कऱ्हाड कापड व्यापारी संघटना सुरू झाली. त्यापूर्वी किरकोळ, घाऊक व तयार कपड्यांचे  अशा तीन वेगवेगळ्या व्यापारी संघटना होत्या. १९९१ साली सातारा जिल्हा हमाल पंचायत तसेच माथाडी कामगार संघटना अरूण शेळके यांनी उभी केली.

**सावकारी**

पूर्वीच्या काळी आर्थिक  व्यवहार सावकारांमार्फत होत. व्यापारी देणी–येणी  व्यवहार  हुंड्यांच्या स्वरूपात  चाले. कमळेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करणारे परशुराम नाईक अनगळ (१७३९–१७५४) तसेच नरसोबा नाईक वाघमारे (१७७७) हे कऱ्हाडातील जुन्या पिढीतील सावकार होते. १८८४ च्या गॅझेटियरमध्ये तत्कालीन ब्राह्मण व्यापारी प्रामुख्याने सावकारी करीत असे म्हटले आहे. कऱ्हाडातील  शिराळकर, शिखरे,  किरपेकर, घाटे, पटवर्धन, चिकुर्डेकर, अराणके, काळे अशी जुनी सावकारी घराणी होती. गोपाळनाईक विश्वनाथ तांबवेकर हे पेशव्यांचे व बडोद्याच्या गायकवाडांचे सावकार व

त्यांनी सराफीच्या धंद्यावर खूप धनसंचय केला व त्यातून देवस्थान धर्मादाय यासाठी खर्च केला. त्यांचे वंशज डाकोर (गुजराथ) येथे असतात. पांडुअण्णा शिराळकर यांनीही अनेक संस्था व उपक्रम यांना उदारपणे मदत केली.

**बँकींग**

सहकारी चळवळीच्या सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रात सुरू झालेल्या मोजक्या नागरी सहकारी बँकांपैकी कराड अर्बन को ऑपरेटिव्ह बँक ही एक. या बँकेची स्थापना २४ जानेवारी १९१७ रोजी झाली. ४० सभासद आणि ४७५ रू. भागभांडवलावर सुरू झालेल्या या बँकेचे कार्यक्षेत्र कऱ्हाडपुरतेच मर्यादित असल्यामुळे तसेच संचालकांपैकी बुहतेक सर्वांचा सहभाग स्वातंत्र्य चळवळीत असल्यामुळे पहिल्या पंचविशीतील बँकेच्या संख्यात्मक प्रगतीला मर्यादा असली तरी पांडुआण्णा शिराळकरांचे मार्गदर्शन, पांडुतात्या भाटे यांची चिकित्सक बुध्दी आणि ल. म. (नानासाहेब) देशपांडे यांची दूरदृष्टी व कार्यकुशलता यामुळे १९४५ च्या सरकारी अहवालात 'ही बँक व्यवहारी व उपयुक्त कामगिरीचा आदर्श' ठरली होती. स्वातंत्र्योत्तर काळात पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले यांचा लोकसंग्रह व व्यासंग यामुळे बँक लोकाभिमुख झाली. वि. कृ. (भय्यासाहेब) तांबवेकर यांनी 'सर्वेषाम् अविरोधेन' या वृत्तीने बावीस वर्षे बँकेचे नेतृत्व केले. नानासाहेब बुधकर, प्र. ल. (शंकरराव) करंबेळकर, कृ. गो. सरडे, त्र्यं. वा. घाटे, व. दा. वराडकर यांनी त्यांना लाभलेल्या अल्पकालीन कारकीर्दीत पूर्वसूरींच्या धोरणाचाच पाठपुरावा केला. या सर्व काळात ग. ज्ञा. ( भाऊसाहेब) बटाणे, सीताराम गोपाळजी पाटील, बुवाशा काझी, विनायकराव फणसळकर, बद्रीनारायण बन्सीलाल लाहोटी, बंडोबा तुकाराम मोहिरे, नारायणराव घाडगे, बाबुराव घाटे, बच्चुभाई पटेल, यशवंतराव (तात्या) मोहिते, बाबुराव वराडकर यांचे अनुभवाधिष्ठित सहकार्य बँकेला लाभले.

१९८२ पर्यंत कार्यक्षेत्र सातारा जिल्हा झाले आणि कऱ्हाडबाहेर मसूर, सातारा आणि उंब्रज एवढ्या तीनच शाखा निघाल्या होत्या.

तशात एका धूर्त, मतलबी व्यापाऱ्याने सेवकांशी संगनमत करून केलेल्या गैरव्यवहारामध्ये रिझर्व्ह बँकेने १९८२ मध्ये कराड अर्बन बँकेला आजारी ठरविले. अशा प्रतिकूल परिस्थितीत डॉ. द. शि. एरम यांच्याकडे १९८४ मध्ये बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आली. कायदा आणि व्यवहार यांची सांगड घालून अल्पावधीतच नियोजनबध्द प्रगती साधून त्यानी सभासदांचा आणि ग्राहकांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या कार्यकालात बँकेची क्षितिजे विस्तारित गेली. सातारा, सांगली, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी, मुंबई या जिल्ह्यांत शाखा सुरू झाल्या आणि २००० मध्ये बँकेने शेड्यूल्ड दर्जा संपादन केला. डॉ. एरम यांच्या विस्तारीकरणाच्या धोरणाला सुभाषराव जोशी यांच्या कारकीर्दीत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, संपूर्ण व्यवहारांचे संगणकीकरण, बदलत्या काळानुसार दूरदृष्टीचे नियोजन व मुख्यतः पूर्णपणे व्यावसायिक दृष्टिकोन यांची जोड मिळाली. २००३ पासून या बँकेची सूत्रे डॉ. सुभाष शिवराम एरम यांच्याकडे आहेत. १९४० मध्ये कराड तालुका खरेदी विक्री संघ आर्थिक अडचणीत आला. त्यावेळी कराड अर्बन बँकेने तो चालवावयास घेऊन नफ्यात आणून सहकारांतर्गत सहकार साधला. त्याच भूमिकेतून २००७ मध्ये सांगलीची श्री पार्श्वनाथ सहकारी बँक आपल्या बँकेत विलीन करून घेऊन अडचणीत सापडलेल्या सहकारी क्षेत्राला दिलासा दिला. असे विलीनीकरण करून घेणारी पश्चिम महाराष्ट्रातील तालुका पातळीवरील ही एकमेव बँक आहे. ३१ मार्च २००८ रोजी या बँकेच्या ४८ शाखा कार्यरत असून ३३४३४ सभासद, १९.३० लाख रु. भागभांडवल, ७१९.३७ कोटी रु. ठेवी, ४५५.११ कोटी रु कर्जे आणि एनपीए अवघा २.३७ % अशी बँकेची आर्थिक स्थिती आहे.

संगणकीकरण, अकार्यक्षम कर्जासाठी (एनपीए) तरतूद , समवर्ती लेखापरीक्षण इ. रिझर्व्ह बँकेची धोरणे नागरी सहकारी बँकांना लागू

होण्यापूर्वीच या बँकेत अमलातही आलेली होती. बँकेच्या मुंबई शाखेत गुंतवणुकीस उपयुक्त एनडीएस सिस्टिम कार्यान्वित झाली असून सर्व शाखांना जोडणारी कोअर बँकिंग प्रणाली येथे लवकरच सुरू होत आहे. सेवकांसाठी स्वत:चे प्रशिक्षणही संशोधन केंद्रही या बँकेने १९९८ मध्ये सुरू केले आहे. काईटसारखी औद्योगिक प्रदर्शने आयोजित करून बँकेने उद्योगधंद्यांना प्रेरणा दिली आहे. ग्राहकांचे मेळावे आणि चर्चासत्रे भरवून त्यांना प्रशिक्षित करण्यात बँकेने पुढाकर घेतला आहे. सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची संघटना उभी करण्यात या बँकेचा मोठा वाटा होता. परिसरातील नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था यांनाही या बँकेने आपल्या सर्व क्षमतांचा लाभ उपलब्ध करून दिला आहे.

कराड अर्बन बँकेचे गुरूवार पेठेतील सभागृह तसेच नवीन मुख्यालयातील पार्किग प्लेस व लगतच्या लॉनवरील भीमराव जाधव खुले सभागृह ही कऱ्हाडच्या सांस्कृतिक व सार्वजनिक जीवनातील उपक्रमांची केंद्रे आहेत. कऱ्हाडात १९७५ व २००३ मध्ये झालेल्या मराठी नाट्यसंमेलनाचे अध्वर्यू या बँकेचे अध्यक्षच होते. बाबुराव गोखले पुण्यतिथी, डॉ. एरम पुण्यतिथी, रणजी ट्रॉफी सामने, श्री कृष्णाबाई उत्सव, सामजिक कृतज्ञता न्यास इ. सारख्या उपक्रमांत बँकेचे मोठे योगदान आहे. कऱ्हाडातील मूकबधीर विद्यालय, महिला उद्योग, अर्बन बझार या संस्थांच्या यशामागे बँकेचे पाठबळ आहे.

१९८४ नंतरच्या बँकेच्या गतिमान विकासात विद्याधर गोखले, वसंतराव वराडकर, श्रीनिवास लद्दड, डॉ. कमल हावले, सी. व्ही. दोशी, रमेश सचदेव, आनंदराव पालकर, विठ्ठलराव शिखरे, राजकुंवर चव्हाण, विठ्ठलराव जाधव, प्रकाशराव चव्हाण, दिलीपराव जाधव यांची प्रामुख्याने साथ मिळाली. त्यावरूनया बँकेच्या संचालक मंडळावर निवडून आलेल्या व्यक्ती वेगवेगळ्या आर्थिक, सामाजिक स्तरांतील, वेगवेगळ्या राजकीय विचारसरणीच्या आणि वेगवेगळ्या वयाच्या असल्या आणि त्यांपैकी प्रत्येकाने आपापल्या व्यवसायात कर्तबगारीने नाव मिळविले असले

अथवा इतर संस्थांतून आपल्या कर्तृत्वाने उच्चपद भूषविले असले तरी बँकेच्या दैनंदिन कारभारात बँकेचे हित, बँकेचा व्यवसाय यालाच त्या प्राधान्य देत असल्यामुळे संचालक मंडळ एकसंध राहिले हेही बँकेच्या यशाचे गमक आहे. १९९४ पासून या संचालक मंडळाच्या निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत.

सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांत फार पूर्वीपासून सहकाराचे मोठे जाळे आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा कणाच या भागात आहे. तथापि अलीकडच्या खाजगीकरण, औद्योगिकरण आणि जागतिकीकरणाच्या नव्या पर्वात या भागातील अनेक संस्था डळमळीत झाल्या आहेत. काही मोडूनही पडल्या आहेत. मात्र काळाची पावले ओळखून आपल्या कार्यपध्दतीत वेळच्या वेळी बदल करत आल्यामुळे 'कराड अर्बन को ऑप बँक' ही मात्र दीपस्तंभाप्रमाणे खंबीरपणे उभी राहू शकली आहे.

शतकपूर्तीकडे वाटचाल करणाऱ्या या बँकेने सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून पण राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त राहत केवळ व्यावसायिक दृष्टिकोन बाळगून नियोजनबध्द वाटचाल केली. त्यामुळेच 'सकल जनांसी आधारू' हे बँकेचे बोधवाक्य यथार्थ ठरले आहे.

शेती सुधारणा करण्यासाठी जमिनीच्या तारणावर शेतकऱ्यांना कर्ज मिळावे या उद्देशाने १९३५ साली सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि. ही रावसाहेब आण्णाप्पा नारायण कल्याणी यांनी पुढाकार घेऊन स्थापन केली. बँकेचे मुख्य कार्यालय कऱ्हाड येथे होते. स्थापनेपासून सतत १८ वर्षे रावसाहेब कल्याणी अध्यक्ष होते. त्यानंतर नीळकंठराव कल्याणी बँकेचे अध्यक्ष झाले. स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांसाठी सहकारी चळवळीच्या माध्यमातून विविध उपक्रम झाले असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळात दूरदृष्टीने या संस्थेने केलेल्या कार्याचे महत्त्व असाधारण आहे. आता या बँकेची जागा महाराष्ट्र राज्य कृषी ग्रामीण विकास बँकेने घेतली आहे.

सातारा स्वदेशी कमर्शियल बँकेची शाखा कऱ्हाडात १९३७ मध्ये निघाली. सातारा स्वदेशी ही बँक युनायटेड वेस्टर्न बँकेमध्ये १९६१ मध्ये विलीन झाली पण ही बँकसुध्दा आय. डी. बी. आय. बँकेत २००६ मध्ये विलीन

झाली आहे. १९४३ मध्ये कॅनरा इंडस्ट्रियल अँड बँकिंग सिंडिकेट लि. या बँकेची शाखा कऱ्हाडात निघाली. ती त्यापूर्वी 'महाराष्ट्र अपेक्स बँके'ची शाखा होती. १९६४ मध्ये तिचे 'सिंडिकेट बँक'असे नामांतर करण्यात आले.

मर्यादित जबाबदारी तत्त्वावरील (जॉईंट स्टॉक) 'बँक ऑफ कराड'ही संस्था लक्ष्मण महादेव ऊर्फ नानासाहेब देशपांडे यांच्या पुढाकाराने कऱ्हाडात १२ मार्च १९४६ रोजी सुरू झाली. गोपाळनाईक काळे, पांडुअण्णा शिराळकर, सोनोपंत शिराळकर, माधवराव परांजपे (पलूस), अण्णासाहेब पटवर्धन, काकासाहेब आराणके ही सावकार मंडळी, मुंबईचे डी. एच. वखारिया हे जनरल मर्चंट, त्यावेळी पुण्याचे (पण मूळ कराडकर) एस. व्ही. सुपनेकर-कुलकर्णी ॲन्ड सन्स चे काकासाहेब सुपनेकर, सांगलीचे धनी वेलणकर, शंकरराव ओगले हे उद्योजक तसेच डॉ. व्ही. जी. देशपांडे आणि ना. वा. गोगटे वकील हे या संस्थेचे प्रवर्तक होते. ल. म. उर्फ नानासाहेब देशपांडे (१९४५ ते १९५७) या बँकेचे अध्यक्ष होते. त्यांच्यानंतर ना.बा. बुधकर, डॉ. ग. शं. दातार यांनी बँकेचे अध्यक्षपद भूषविले. प्रारंभी सातारा-सांगली जिल्ह्यांमध्येच या बँकेच्या शाखा होत्या. तथापि १९६२-६३ मध्ये मुंबईची प्रेसिडेंन्सी इंडस्ट्रियल बँक या बँकेत विलीन झाल्यापासून बँकेचे कार्यक्षेत्र विस्तारीत होत गेले. ९६५ मध्ये कोल्हापूरची कमर्शियल बँक या बँकेत विलीन झाली. १९६८ मध्ये बँकेला शेड्यूल्ड दर्जा प्राप्त झाला. १९७२ मध्ये या बँकेचा रौप्यमहोत्सव झाला. त्यावेळी या बँकेचे भाग भांडवल ५.४५ लाख रू., गंगाजळी ५ लाख रू., ठेवी ३७५ लाख रू., गुंतवणूक १६१ लाख रू., खेळते भांडवल ४२४ लाख रू. व शाखा १२ होत्या . बँकेच्या ४८ शाखा होत्या. १९९२ साली रोखे घोटाळ्याच्या संदर्भात ही बँक दिवाळखोर ठरली आणि तिचे विलीनीकरण 'बँक ऑफ इंडिया'त करण्यात आले. रोखे घोटाळ्याबाबत संबंधितांना शिक्षा होण्यास २००८ साल उजाडले.

'बँक ऑफ कराड'च्या दिवाळखोरीमुळे व अन्यही कारणांनी रिझर्व्ह बँकेने बँकिंग व्यवसायावर कडक निर्बंध व बँक कार्यपध्दती पारदर्शी होण्यासाठी नवीन धोरणांची अंमलबजावणी सुरू केली.

१९४९ मध्ये सांगली बँक लि. सांगलीची शाखा कऱ्हाडात सुरू झाली.

ती आता आय. सी. आय. सी. आय. या बँकेची शाखा म्हणून काम करते. कऱ्हाडात बाँबे प्रॉव्हिन्शियल बँकेचीही शाखा १९२६ पासून होती. जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या शाखा सुरू झाल्यावर ही बंद झाली.

जिल्हावार मध्यवर्ती सहकारी बँका सुरू करण्याचे धोरण ठरल्यानंतर यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्रात सर्व प्रथम 'सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके'ची स्थापना १९४९ मध्ये झाली. या संस्थेचे पहिले अध्यक्ष बाळासाहेब देसाई होते. या संस्थेचे अध्यक्षपद सतत १८ वर्षे कऱ्हाडच्या रघुनाथराव दौलतराव (आर. डी.) पाटील यांनी भूषविले होते. पुढे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदावरही त्यांची निवड झाली होती. कऱ्हाडचे व्यंकटराव ज्ञा. भोसले (आप्पा) हे या बँकेचे दीर्घकाळ यशस्वी व्यवस्थापक होते.

१९४३ पूर्वी साताऱ्याच्या नामदेव को - ऑप. बँकेची शाखा कऱ्हाडात होती असे सांगतात. १९६० पासून कऱ्हाड शहर परिसराचा झपाट्याने विकास होत होता. नवीन उद्योग- व्यापार वाढू लागले होते. त्यावेळी कऱ्हाडात फक्त एकच नागरी सहकारी बँक होती. त्या काळातील त्या बँकेच्या मर्यादा लक्षात घेता नवीन बँकेला संधी होती. गौरीहर एकनाथ सिंहासने, माधवराव जाधव यांनी नीळकंठराव कल्याणी, शंकरलाल भट्टड, रामकृष्ण पांडुरंग खुंटाळे, पांडुरंग सखाराम मोटे, डॉ. गो. ना. दातार, गोविंद गोपाळ कुलकर्णी (निगडीकर) इ. उद्योजक व्यापाऱ्यांचे सक्रिय सहकार्य घेऊन २९ ऑक्टोबर १९६२ रोजी कराड जनता सहकारी बँक लि. कराड स्थापन केली. अल्पावधीतच या बँकेनेही प्रगतीची पावले टाकली. १९९४ मध्ये मुंबईतील भावसार को-ऑप. बँक या बँकेत विलीन झाली. त्यामुळे बँकेचे कार्यक्षेत्र विस्तारीत झाले. १९८९ पासून विलासराव पाटील (वाठारकर) यांच्या नेतृत्वाखाली बँकेने आपला पसारा वाढविला आहे. ३१ मार्च २००६ रोजी बँकेच्या ३१ शाखा , सभासद २९६२३, भाग भांडवल ४ कोटी ९८ लाख रु., ठेवी ३०८.०८ कोटी रु., कर्जे २०९.७६ कोटी रु. अशी आर्थिक स्थिती आहे. राजेश विलासराव पाटील सध्या अध्यक्ष आहेत.

कृष्णा सहकारी साखर कारखान्याशी संबंधित शेतकऱ्यांना गरजेनुसार

व शेती विकासासाठी कर्जपुरवठा करता यावा, ग्रामीण भागात बँकिंगच्या सोयी उपलब्ध करून द्याव्या अशा उद्देशाने कृष्णा सहकारी बँकेची स्थापना १९७१ मध्ये जयवंतराव भोसले यांनी रेठरे बुद्रुक येथे केली होती. अलीकडेच तिचे मुख्य कार्यालय मलकापूर (कऱ्हाड) येथे आणण्यात आले असून पुणे, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांत कार्यक्षेत्र पसरले आहे. या बँकेच्या एकूण १७ शाखा, रू.१४०.३४ लाख भाग भांडवल, रू.९२५७.२० लाख ठेवी, रु.४६४५.१० लाख कर्जे अशी दि.३१-३-२००५ ची आर्थिक स्थिती आहे. सध्या अतुल भोसले अध्यक्ष आहेत.

कऱ्हाडमध्ये महिलांनी महिलांसाठी चालविलेली 'प्रीतिसंगम महिला सहकारी बँक' २ ऑगस्ट १९७३ पासून सुरू झाली. चावडी चौकातील महिला मंडळाच्या इमारतीत या बँकेचे काम चाले. बाबुराव कोतवाल यांच्या प्रेरणा प्रोत्साहनाने निघालेल्या या बँकेच्या अध्यक्ष होत्या, इंदुमती गुंडोपंत बेलापुरे . त्यांच्याबरोबर विनया गोखले, प्रभावती कोतवाल, लीला काळे, उषा दिवेकर, ताराबाई थोरात, रूक्मिणीबाई लाहोटी, विजयालक्ष्मी मुळीक, यमुनाबाई चव्हाण, कांताबेन शहा, मालती आठवले इ. महिला होत्या. पहिल्या पाच वर्षांतच कर्जव्यवहारातील अनियमितपणा व अन्य कारणांमुळे संचालक मंडळ बरखास्त होऊन १९७९ मध्ये प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली. १९८० मध्ये बँकेच्या नावातील "महिला" शब्द काढून टाकण्यात आला. १९८३ मध्ये प्रथमच सर्व संचालकांची निवडणूक झाली. १९९१ मध्ये अमर्याद व नियमबाह्य कर्जामुळे बँकेची स्थिती "आजारी"म्हणून घोषित करण्यात आली. संचालक मंडळाने प्रयत्नपूर्वक अनियमित कर्जाची वसुली केल्यामुळे रिझर्व्ह बँकेने २००३ मध्ये सदर बँक सक्षम असल्याचे जाहीर केले. शनिवार पेठेत बिरोबा मंदिरासमोर या बँकेची एकमेव शाखा स्वत:च्या वास्तूत कार्यरत असून ३१-३-२००६ रोजी या बँकेच्या ठेवी ५.२६ कोटी रू., कर्जे, ३.६२ कोटी रू., भागभांडवल ३७.३ लाख रू., व सभासद ७१०८ अशी आर्थिक स्थिती आहे. सध्या भास्कर दत्तात्रय कुलकर्णी (धनी) हे बँकेचे अध्यक्ष आहेत.

विलासराव पाटील ( उंडाळकर) यांच्या प्रोत्साहनाने कोयना सहकारी

बँक दि. २१ रोजी ऑक्टोबर १९९६ रोजी सुरू झाली. या बँकेचे मुख्य कार्यालय कऱ्हाड येथे असून सातारा-पुणे-सांगली या जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात बँकेच्या शाखा आहेत. बँकेची सभासद संख्या २९१० असून उदयसिंह पाटील हे सध्या अध्यक्ष आहेत. ३१-३-२००६ रोजी भागभांडवल १.५३ कोटी रू., ठेवी २९ कोटी कर्जे १७ कोटी अशी बँकेची आर्थिक स्थिती आहे.

पी. डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सह्याद्री सहकारी बँकेचे कामकाज दि.२१ मार्च १९९६ रोजी सुरू झाले. या बँकेच्या सध्या ४ शाखा असून सभासद संख्या ६७६० आहे.भाग भांडवल १.८९ कोटी रू., ठेवी ३७.८८ कोटी रू.व कर्जे २१.८३ कोटी रू.आहेत.

या खेरीज सध्या कऱ्हाडात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या दोन शाखा, बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, देना बँक, विजया बँक, कॅनरा बँक, बँक ऑफ बडोदा, युनियन बँक इ.राष्ट्रीयीकृत व एच.डी.एफ.सी., फेडरल बँक या बँकांच्या शाखा आहेत. परगावी मुख्य शाखा असणाऱ्या इचलकरंजी जनता, वाई अर्बन, विटा मर्चंटस्, राजारामबापू, भारती, पार्श्वनाथ (कोल्हापूर), पाटण अर्बन, जिजामाता महिला, चौंडेश्वरी, मालोजीराजे, रयतसेवक, सैनिक, एस. टी. इ. सहकारी बँकांच्या शाखा कऱ्हाडात आहेत. बँकांखेरीज आधुनिक गृहनिर्माण वित्तीय कॉर्पोरेशन, चोलमंडलम्, सेंच्युरियन बँक, गृह फायनान्स, आय आय सी आय, कल्याणी फायनान्शियल, शांतिलाल फायनान्स अशा वित्तीय संस्थाही कार्यरत आहेत. शेअर्स खरेदी विक्रीचा व्यवसायही अलीकडे मोठ्या प्रमाणात होतो.

पूर्वी पगारदार सेवकांसाठी त्यांच्या सहकारी पतसंस्था होत्या, त्यांत नगरपरिषद सेवकांची, प्राथमिक शिक्षकांची या जुन्या पतसंस्था होत्या. बाजारकरी लो-इन्कम-क्रेडिट सोसायटी १९७२ मध्ये सुरू झाली. आता कऱ्हाडात सुमारे पाऊणशे सहकारी पतसंस्थांच्या शाखा आहेत. त्यापैकी कराड मर्चंट, पार्श्वनाथ, जनकल्याण, संजीवनी , कालिकादेवी अशा काही प्रमुख पतसंस्था आहेत. जनकल्याण पतसंस्थेकडे फलटणच्या यशवंत नागरी बँकेचे प्रशासन आले आहे.

**विमा**

कऱ्हाडात १९३८ मध्ये बाळकृष्ण अनंत सुपनेकर हे नवभारत इन्शुरन्स कंपनीचे एजंट होते. कऱ्हाडचे कृष्णराव सरडे आणि नारायणराव घाडगे या दोघांनी सरडे-घाडगे अशा फर्मच्या नावाने अहमदाबाद येथील वॉर्डन इन्शुरन्स कंपनीची एजन्सी घेतली होती. त्या काळात लोकांना विम्याच्या मृत्यूशी संबंध आहे अशी धास्ती वाटे. त्यामुळे त्यांना विमा उतरविण्याची कल्पना पटवून देणेही अवघड जाई. अशा प्रतिकूल वातावरणात सरडे-घाडगे यांनी विक्रमी काम केले. त्यामुळे त्यांना १९३९ मध्ये अखिल भारतीय ट्रॉफी मिळाली. कंपनीने सरडे यांना पुणे शाखेचे इन्स्पेक्टर म्हणून नेमले. तेथे अनुभवाबरोबर आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांनी कलकत्याचे शाखा व्यवस्थापक कात्रे यांच्या सहकार्याने स्वत:ची विमा कंपनीच काढावयाचे ठरविले होते.पण दुसऱ्या महायुध्दाचे वारे वाहू लागल्यामुळे त्यांना आपले मनसुबे गुंडाळून ठेवावे लागले होते. मात्र पांडुरंग गणेश ऊर्फ तात्यासाहेब भाटे यांनी त्यापूर्वी कऱ्हाड मध्ये महाराष्ट्र प्रॉव्हिडंड इन्शुरन्स कंपनी या नावाची एक विमा कंपनी चालविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता.(१९३६) 'एक वेळ १३ रू. ८ आणे भरून ५००० रू. मिळवा' अशी 'कल्पतरू बाँड' नावाची या कंपनीची योजना होती.

साताऱ्यास वेस्टर्न इंडिया इन्शुरन्स कंपनी होती. त्या कंपनीचे अनेक विमा प्रतिनिधी कऱ्हाडात होते. १९५६ मध्ये विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण होऊन भारतीय आयुर्विमा महामंडळ स्थापन झाले. या मंडळाचे एक विकास केंद्र कऱ्हाड शहरात १९६८ मध्ये जी. जी. कुलकर्णी उपशाखाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. अल्पावधीतच १९७४ मध्ये कऱ्हाडात आयुर्विमा महामंडळाची शाखा सुरू झाली. या शाखेच्या विकास वाटचालीत नारायणराव घाडगे, पां. वि. कुलकणी, अ. वा. ढवळे या विकास अधिकाऱ्यांचा आणि डॉ. डी. जी. देशपांडे, एम. के. माने, डॉ. भातखंडे, कारंजकर या विमा प्रतिनिधींचा मोठा वाटा होता. १९७४ मध्ये त्यापूर्वी पंचवीस वर्षाहून अधिक काळ विमा प्रतिनिधी म्हणून ज्यांनी काम केले त्यांचा सत्कार करण्यात आला होता. त्यात कऱ्हाडच्या डॉ. डी. जी. देशपांडे,सदाशिवराव परांजपे आणि कृष्णराव सरडे यांचा समावेश होता. आज आयुर्विमा महामंडळाची कऱ्हाड शाखा गुजरात,

महाराष्ट्र व गोवा या पश्चिम क्षेत्रात अग्रणी शाखा असून २००६ मार्च अखेरीस २६३८२ विमा पॉलिसी पूर्ण करून शाखेच्या इतिहासात सर्वाधिक पॉलिसी करण्याचा विक्रम केला आहे. कऱ्हाड शाखा भारतातील सर्व शाखांशी WAN / MAN ने जोडली आहे. शाखेत ६५ सेवक, १७ विकास अधिकारी आणि ८२५ विमा प्रतिनिधी आहेत. २००५-०६ मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्यांमध्ये विकास अधिकारी एस. आर. कुलकर्णी यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्याखेरीज विकास अधिकारी ए.टी. भिसे, पी. व्ही. देशपांडे यांनी व विमा प्रतिनिधींत रवींद्र वाळके यांनी मानांकन संपादन केले आहे. प्रकाश जाधव अमेरिकेस होणाऱ्या विमा परिषदेस जाण्यास पात्र झाले आहेत. त्यांनी हा बहुमान यापूर्वी पाच वेळा मिळविला आहे. कऱ्हाड नगरपरिषदेच्या पहिल्या भूमिगत गटार योजनेसाठी तसेच नुकत्याच झालेल्या विस्तारित गटार योजनेसाठीही आयुर्विमा महामंडळाने पन्नास टक्के भरीव कर्जसाह्य केले आहे. कऱ्हाड शाखेतून सुमारे एक लाखाच्या वर विमेदारांना सेवा दिली जाते. त्यापैकी सुमारे २५% हिस्सा कऱ्हाड शहरातील विमेदारांचा आहे.

कऱ्हाडात सध्या ओरिएंटल, न्यू इंडिया आणि युनायटेड इंडिया या जनरल इन्शुअरन्स कंपन्यांच्या शाखा कार्यरत आहेत.

**लेखापरीक्षक आणि करसल्लागार**

व्यापार व अर्थव्यवहाराच्या अनुषंगाने लेखापरीक्षक आणि कर सल्लागार आणि म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती, पुणे, कोल्हापूर, सातारा येथून कऱ्हाडात येत. कऱ्हाडातील पहिले चार्टर्ड अकौंटंट विद्याधर लाटकर. त्यांनी १९५५ मध्ये येथे आपला व्यवसाय सुरु केला. सध्या कऱ्हाडात ९-१० चार्टर्ड अकौंटंटस् असून कर-सल्लागार म्हणून १५ व्यक्ती कार्यरत आहेत. सातारा जिल्ह्यातील प्राप्तिकर दात्यांपैकी सुमारे २० टक्के करदाते (सुमारे ६३०००) कऱ्हाडातील आहेत.

*****

## उद्योगधंदे

कोणत्याही शहराच्या औद्योगिक प्रगतीला विशिष्ट भौगोलिक परिस्थिती आणि काही मूलभूत गोष्टींची आवश्यकता असते. पश्चिम महाराष्ट्रातील शेती विकसित अशा तीन जिल्ह्यांचा संपर्क, राष्ट्रीय महामार्गाची समीपता, देशातील प्रमुख रेल्वेमार्गावरील (मुंबई – बंगळूर) स्थान, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कोकण व देश (घाट) यांना साधणारा दुवा अशा अनेक कारणांमुळे कऱ्हाडचे महत्त्व अबाधित आहे. कच्च्या मालाची उपलब्धता, कष्टाळू कामगार, प्रशिक्षणासाठी तंत्रनिकेतने, वीज, पाणी, भांडवल पुरवठा करणाऱ्या संस्था, दळणवळणाच्या सोयी–सुविधा आता कऱ्हाडात उपलब्ध आहेत.

मात्र विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत तरी कऱ्हाड शहर औद्योगिकदृष्ट्या मागासलेलेच होते. सोन्या–चांदीचे दागिने, तांब्या–पितळेची भांडी, लोखंडी हत्यारे, पादत्राणे, मातीची भांडी बनविणे, सुतारकी, विणकाम, रंगणी अशा तऱ्हेचे पिढीजात कारागिरी व्यवसाय होते. तसेच हातमागावर सुती कापड तयार करणे, शेंगापासून तेल काढणे असे लघुउद्योग अस्तित्वात होते. १८२७ मध्ये कऱ्हाडात २०० विणकर, १०० तेली, २५ सणगर (घोंगडी विणणारे) व ३० कागदी (कागद बनविणारे) होते. (गॅझेटियर १८८५). कागदी लोकांचा कागद लाटून बनविण्याचा धंदा होता. शनिवार पेठेत लल्लुभाईच्या चाळीच्या परिसरात कागदी टेक होते, तेथे कागद बनविले जात.

खऱ्या अर्थाने कऱ्हाडातील उद्योगसृष्टीला आरंभ झाला तो, लो. टिळकाच्या चतु:सूत्रीतील 'स्वदेशी'च्या कल्पनेतून उभारल्या गेलेल्या काड्यापेट्यांच्या कारखान्याने. पांडुअण्णा शिराळकर, काकासाहेब बहुलेकर,

नानासाहेब देशपांडे प्रभृतींनी साताऱ्याच्या दादासाहेब करंदीकर आणि रावसाहेब काळे यांच्या सल्ल्याने १९०६ च्या जूनमध्ये 'डेक्कन मॅच मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' या नावाने हा कारखाना पंतांच्या कोटात सध्या महाराष्ट्र हायस्कूल आहे त्या जागी असलेल्या औंधच्या महाराजांच्या वाड्यात सुरू केला. त्याचे उद्‌घाटन तत्कालीन जिल्हाधिकारी आॅर्थर यांच्या हस्ते झाले. सह्याद्रीच्या जंगलात उपलब्ध असणारे शेवरीचे लाकूड वापरून साध्या व रंगीत काड्यापेट्या तयार होत. काखेत सिंहाचा छावा घेऊन हातातील छडी समोरच्या सिंहावर उगारतो आहे अशा बाल भरताचे (सर्वदमनाचे) चित्र काड्यापेटीवर असे. १९१२ पासून कराड नगरपरिषदेने हद्दीबाहेरून आयात होणाऱ्या काड्यापेटीवरील जकात पन्नास ग्रोस पेटीला चार रुपये एवढी वाढविली तर वाई नगरपरिषदेने या कारखान्याच्या मालावर कर माफ केला. याच वर्षी औंधच्या प्रतिनिधींनी व कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींनी आपल्या प्रजाजनांनी आणि व्यापाऱ्यांनी कऱ्हाडच्या या काड्यापेट्याच वापराव्यात असा आदेशही काढला होता. पण काड्यापेट्यांवरील चित्र इंग्रज सरकारविरूध्द आहे म्हणून सरकारची नाराजी झाली, रेल्वेने सवलती बंद केल्या, जंगलातील लाकडाच्या सवलती बंद झाल्या, यातच भर म्हणून की काय मध्यंतरी या कारखान्याला आगही लागली. परदेशी मालाशी टक्कर देताना टिकाव न लागल्यामुळे कारखाना १९१४ साली बंद पडला. अनेक अंगांनी खटपट करूनही १९२४ साली पुनरुज्जीवन झालेला हा कारखाना १९२७ नंतर बंद पडला.

काळाच्या पुढे पाहणारी एक व्यक्ती या काड्यापेट्यांच्या कारखान्याच्या निमित्तानेच कऱ्हाडात आली. ती व्यक्ती म्हणजे हणमंत वामन फडके (१८८० ते १९३५). बडोद्याच्या कलाभुवन या तांत्रिक शिक्षण संस्थेत शिकत असतानाच फडके यांनी फटाके तयार करण्याच्या यंत्राचा आराखडा (डिझाईन) तयार केला होता. त्याबद्दल त्या वेळच्या 'केसरी' (पुणे) त त्यांचे कौतुकही झाले होते. मध्य प्रांतातील प्रतिष्ठेची नोकरी डावलून ते गावाच्या ओढीने कऱ्हाडास आले. कऱ्हाडच्या काड्यापेट्यांच्या कारखान्यात नोकरी करीत असताना फडके यांनी काड्यापेटी भरण्याचे आणि पेटीच्या बाजूस लेप देण्याचे अशी

दोन यंत्रे स्वत: आराखडा करून तयार केली. त्यामुळे यंत्र आयात करण्याचा कारखान्याचा खर्च वाचला. काड्यापेट्यांच्या कारखान्यात असतानाच फडके यांनी भुईमुगाच्या शेंगा फोडण्याची यंत्रे तयार केली. याच यंत्रात सुधारणा करून १९२६ मध्ये ताशी ४० ते ७५ पिशव्या दाणे निघणारे यंत्र तयार केले. याच सुमारास कोळशाच्या भुकटीवर हवेचा दाब दिल्यावर ज्वलन होऊन गॅस निर्माण करणारे इंजिन फडके यांनी तयार केले होते. विड्या तयार करण्याचे एक स्वयंचलित यंत्र फडके यांनी तयार केले होते, पण अशा यंत्रामुळे सामान्यत: गरीब विधवा स्त्रियांचा रोजगार जाऊन त्या गैरमार्गाला लागतील म्हणून त्यांनी त्या यंत्राचा पाठपुरावा केला नाही.

हणमंतराव फडके यांनी कऱ्हाडात १९२१ मध्ये विव्हिंग मिल उभारली. पर्न वाईंडिंग, ड्रम वाईंडिंग, सायझिंग यासारखी यंत्रे त्यांनी स्वत: तयार केली होती. बैलांच्या सहाय्याने चालवता येतील असे गवत कापण्याचे एक व लहान कालव्यांतून गाळ काढण्याचे एक अशी दोन यंत्रे फडके यांनी यशस्वीरीत्या तयार केली. स्थानिक उपलब्धतेचा जास्तीत जास्त वापर करून खर्च वाचवावा आणि तत्कालीन बहुसंख्य अशिक्षित जनतेला यंत्राच्या तांत्रिक बाजू सहज माहिती व्हाव्यात म्हणून रोजच्याच कामाचे यांत्रिकीकरण करून ते समजून घेता यावे अशी फडके यांची दृष्टी होती. अर्थात त्या मागे लोकमान्य टिळकांची 'स्वदेशी' ची विचारधारा होती. फडके यांनी 'हरिकेन' या परदेशी कंदिलासारखाच प्रकाश देणारा पण केरोसिन या परदेशी द्रव्याचा वापर टाळून गोड्या तेलावर चालणारा एक कंदीलही तयार केला होता. १९३१ साली त्यांनी 'फडके इंडस्ट्रियल वर्क्स' या नावाने एक फौंड्री सुरू केली. (तेथे आता सध्याच्या मंडईच्या पूर्वेस श्री चेंबर्स नावाची इमारत आहे.) या कारखान्यात लोखंडी नांगर तयार होत. हाडाची भुकटी करणारे बोन क्रशर, गव्हले तयार करण्याचे यंत्र, भुईमुगाच्या शेंगांची चाळणी करणारे यंत्र अशी त्या काळी कल्पनेतही न येणारी यंत्रे फडके यांनी बनविली होती. १९३४ साली गुरूनाथ प्रभाकर ओगले यांच्या मदतीने पवनचक्की (विंड मिल)तयार करण्याचा प्रयत्न केला होता. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांना सध्या आलेले महत्त्व लक्षात घेता हा फडके-ओगले यांचा प्रयत्न त्यांची दूरदृष्टीच

सिध्द करतो. काळाच्या पुढे धावणाऱ्या अशा व्यक्तींना समजून घेण्याची दृष्टी अथवा कुवत नसल्यामुळे अपयशाचा शिक्काच त्यांच्या कपाळी बसतो. फडके – ओगले यांचेही तसेच झाले.

महाराष्ट्रातील काच उद्योगाचे आद्य प्रवर्तक श्रीपाद प्रभाकर ओगले. तळेगावच्या पैसा फंड फॅक्टरीत शिक्षण घेतल्यावर त्यांनी प्रथम किर्लोस्करवाडीस १९१३ मध्ये पहिली काच फुंकली व कर्मवीर भाऊराव पाटील या वर्गबंधूने या काचेला पहिला बाजारही मिळवून दिला व त्यानंतर कऱ्हाड रेल्वे स्टेशनजवळील माळावर 'ओगले ग्लास वर्क्स' हा स्वत:चा कारखाना २५-११-१९१६ रोजी सुरू केला. औंधच्या पंतप्रतिनिधींनी संस्थानाची १४ एकर १९ गुंठे जागा या कारखान्यास दीर्घ भाडेकराराने देऊन उत्तेजन दिले. ब्लो बँड ब्लो (माऊथ ब्लोईंग) म्हणजे नळीने फुंकून काचेच्या रसाला विशिष्ट आकार दिला जाई. १९२३ मध्ये गुरुनाथ प्रभाकर ओगले यांनी या कारखान्यात 'प्रभाकर' कंदिलांच्या उत्पादनास सुरुवात केली. भारतातील कंदील उत्पादन करणारा हा पहिला आणि एकमेव कारखाना. या कंदिलाची गुणवत्ता एवढ्या उच्च दर्जाची होती की कंदिलाची भारतीय प्रमाण निकष (आयएसआय) ठरविताना सरकारने प्रभाकर कंदीलच मानदंड म्हणून घेतला होता. युध्दकाळात ब्रिटिश सरकारच्या लष्करास या कारखान्याने कंदील पुरविले.

१९२६ मध्ये या कारखान्यात व्यंकटराव ओगले या कलादृष्टी असलेल्या व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली इनॅमल प्लँट सुरू करण्यात आला. प्राथमिक शाळेत वापरल्या जाणाऱ्या स्लेट पाट्यांना पर्याय अशी माईल्ड स्टीलची 'अभंग' पाटी येथे तयार होई. येथे निरनिराळ्या ठिकाणी वापरण्यासाठी इनॅमल बोर्डस् ( साईन बोर्डस् ) तयार करून दिले जात. रेल्वेसाठी इनॅमलच्या वस्तू बनविणारे ओगले हे एकमेव उत्पादक होते. विद्युत उद्योगासाठी लागणाऱ्या इनॅमलच्या विविध छटाही ते निर्माण करीत असत. 'फिलीप्स' कंपनीलाही ते काचेच्या वस्तू पुरवीत असत. १९६०-७० च्या काळात ओगले यांनी इलेक्ट्रिक मोटर्स व त्यानंतर पंप तयार करण्यास सुरुवात केली. ओगले यांनी वॉशिंग मशिन्स तयार करण्याचा प्रयत्न केला होता. वातीच्या स्टोव्हचा पूर्वावतार

असा रॉकेलवर चालणारा प्रेशर स्टोव्हसारखा सेफ्टी स्टोव्ह ओगले यांनीच प्रथम तयार केला होता. तसेच एव्हरसील्व्हर भांड्यांचे उत्पादन काही काळ या कारखान्यात होई. पारदर्शक व स्वच्छ काचेच्या संसारोपयोगी आणि प्रदर्शनीय अशा विविध वस्तू या कारखान्यात होत. ओगले यांनी काचेवरील कोरीव कामाची प्रथम सुरुवात केली. औद्योगिक जगतात दर्जेदार माल, गुणवत्ता यामुळे 'ओगले' हे नाव प्रतिष्ठेचे झाले होते. २२०० कामगारांमार्फत प्रतिवर्षी ७५००० डझन कंदील, ४२००० स्टोव्ह, १०६५००० एनॅमल भांडी, १६००० इलेक्ट्रीक मोटर्स, १८००० मे. टन काच एवढी उत्पादन क्षमता असलेला, लष्कर, रेल्वे, एअर इंडिया असे प्रमुख ग्राहक असलेला हा कारखाना होता. नागपूर, म्हैसूर, त्रावणकोर येथे या कारखान्याच्या शाखा होत्या.

अशा या प्रतिष्ठित कंपनीची आर्थिक स्थिती १९७४ पासून घसरत गेली. जादा उत्पादन खर्च, कामगारांची अवाजवी संख्या, आर्थिक नियोजनाचा व अंतर्गत नियंत्रणाचा अभाव अशा किंवा अनुषंगिक कारणामुळे १९८० साली हा कारखाना बंद पडला. जुलै १९८१ मध्ये भंडारी पोरवाल इंजिनिअरिंग कंपनीने हा कारखाना भाडेपट्ट्यावर चालविण्याचा प्रयत्न केला, तोही अयशस्वी ठरला आणि एप्रिल १९८५ पासून हा कारखाना पूर्णपणे बंद पडला. कारखाना बंद पडणे हे कऱ्हाड व पंचक्रोशीवरील मोठे आर्थिक अरिष्टच ठरले.

कऱ्हाडात सरदार भाऊसाहेब पाटणकर यांच्या पुढाकाराने १९३३ मध्ये 'कराड इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी' सुरू झाली. विद्युतनिर्मितीला सुरूवात झाली तरी कऱ्हाडात औद्योगिकीकरणाची गती मात्र अतिशय थंड होती. विनायक बाळकृष्ण हर्डीकर यांनी १९३५ मध्ये एक रेडिओ सेट तयार केला पण तेवढाच एक.

लोकमान्य टिळकांच्या 'स्वदेशी' च्या तत्त्वज्ञानाने देशभक्तीचा एक भाग म्हणून शंकरराव साने यांनी 'लोकमान्य' छाप निळ्या काळ्या शाईच्या पुड्या तयार करण्याचा कारखाना 'राष्ट्रीय कलाभुवन' नावाने १९१७-२० च्या सुमारास सुरू केला. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांपासून कचेऱ्यांपर्यंत सर्वांना उपयुक्त आणि आवश्यक असलेल्या या शाईपावडरला मागणीही चांगली होती. सुमारे तीन तपे तरी हा उद्योग चालू होता.

१९२५-३० च्या सुमारास अण्णासाहेब पंत व पोपटराव पाठक य
ओगलेवाडी येथे 'औंध सोप वर्क्स' हा साबण तयार करण्याचा कारख
काढला. तेथे 'वॉशेक्स' हा धुण्याचा आणि 'ट्रान्सपरंट' ( ग्लिस
पासून तयार केलेला) अंगाचा सुवासिक साबण तयार केला जाई. कऱ्हा
नाबर आणि कृष्णराव सरडे यांनी (१९४१) 'माणिक सोप वर्क्स'
केले. त्या कंपनीचा काळा बार आणि २० नंबर बार प्रसिध्द होते. मा
यार्डमध्ये पटेल सोप फॅक्टरी आहे.

कऱ्हाडात १९३४ साली सरैया मिल व १९४३ मध्ये ओगलेवाडीत
टेक्स्टाईल मिल या दोन कापड गिरण्या खानसाहेब हाजी अहमद कासमस
कच्छी यांनी सुरू केल्या. या गिरण्या १९४८ पर्यंत चालू होत्या. आगा
शेतकरी विणकरी सूतगिरणी सहकारी तत्त्वावर चालविण्याचा प्रयोगही झा
सध्या तासवडे येथील औद्योगिक वसाहतीत औद्योगिक सुती कापडाचे दर्जे
उत्पादन करणारी अजंठा युनिव्हर्सल फॅब्रिक्स आणि ठाकरसी ग्रुपची हिंदुस्
स्पिनिंग मिल्स अशा दोन कापड गिरण्या आहेत. सुभाषराव जोशी यां
अजंठा युनिव्हर्सल फॅब्रिक्स या कारखान्यात तंबू, ताडपत्र्या, रोड लॅमिने
इ. प्रकारचे औद्योगिक कापड तयार केले जाते.

१९३५-४० च्या सुमारास वामनराव लांजेकर यांनी शेंगाच्या फोलपटाप
बाहुल्या व खेळणी तयार करण्याचा कारखाना सुरू केला. आज बार्बी
पाश्चात्य पोषाखातील बाहुल्यांनी हैदोस घातला आहे पण लांजेकरांच्या बाहु
चक्क भारतीय वेषभूषेत असत आणि त्यांची निर्यात चीन, जपानमध्ये म्ह
खेळण्यांच्या माहेरघरातच होत असे.

भुईमुगाच्या शेंगा आणि अन्य गळीत धान्यापासून तेल काढण्याचा उ
पूर्वी तेली मंडळी घरगुती प्रमाणात करीत. शनिवार पेठेत व गुरुवार पे
प्रामुख्याने त्यांचे तेलघाणे होते. शनिवार पेठेत वाईकरांची ऑईल मिल १९
ते १९५४ होती. १९४० च्या सुमारास मंगलजी भाई खोजांनी 'गुलाब ऑ
मिल' सुरू केली. शिराळकर, देशपांडे यांनी काढलेल्या तेलाच्या गिरण्या
झाल्या. सध्या घेवारी, जय महावीर, पटेल, सुपनेकर अशा ऑईल मि
चालू आहेत. पूर्वी ऊस करणारी शेतकरी मंडळी गुऱ्हाळे करीत. येथे उ

दर्जाचा गूळ तयार होतो. मध्यंतरी सहकारी साखर कारखान्यांमुळे गुळाचे उत्पादन कमी झाले होते, आता पुन्हा शेतकरी गूळ उत्पादन करू लागला आहे.

सांगलीतील टॉफी- चॉकलेट व्यवसायातील एक तज्ज्ञ भावे यांच्या मदतीने कऱ्हाडच्या कृष्णराव सरडे, बाबासाहेब विद्वांस , आराणके मास्तर, विठ्ठलराव शिराळकर इ. नी १९४३ मध्ये 'नॅशनल प्रॉडक्टस्' ही पोपट छाप चॉकेलेटची फॅक्टरी कऱ्हाडात सुरू केली. त्या काळात साखरेवर नियंत्रण असल्यामुळे चॉकलेटमध्ये गुळाचाही वापर केला जाई. १९४७ साली पहिल्या स्वातंत्र्यदिनास सातारा जिल्ह्यातील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना खाऊवाटपाचे कंत्राट याच कारखान्याला मिळाले होते. १९४५-५० च्या दरम्यान विनायकराव बहुलेकर यांनी ओगलेवाडीस 'लिलीव्हाईट' नावाचा गोळ्या चॉकलेट इ. चा कारखाना काढला होता. कऱ्हाडमध्ये बाळासाहेब दिवेकर यांच्या वडिलांनी १९३५ च्या सुमारास बेकरी सुरू केली. दिवेकरांची 'पिळाची खारी' ही खासियत होती.

१९४६ मध्ये रामबिलास लाहोटी, माधवराव बिजुटकर आणि शिवरामपंत उमराणी यांनी 'कराड आईस मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' हा कऱ्हाडातील पहिला बर्फाचा कारखाना सुरू केला. सुमारे दहा वर्षे हा कारखाना चालला. सध्या मोहन जगताप यांचा 'कृष्णा', गनीभाई कागदी यांचा 'मिनाज'(१९८२) आणि तासवडे येथे 'संजय आईस फॅक्टरी' असे बर्फाचे कारखाने आहेत.

पां. वि. गोडबोले आणि त्यांच्या इतर सहा तरूण सहकारी अभियंत्यांनी सप्तर्षी या नावाने एकत्र येऊन कऱ्हाडात स्टीलच्या बोटी तयार कण्याचा कारखाना सुरू केला. हा कारखाना पुढे शिरवडे येथे स्थलांतरित झाला.

औंधच्या प्रतिनिधींनी ओगलेवाडी येथे ओगले ग्लास वर्क्स कारखाना सुरू करण्यासाठी सहाय्य केले. त्याचप्रमाणे सैदापूरच्या माळावर नवनवे उद्योग निघावेत अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे त्या परिसराला उद्यमनगर असे नावही दिले होते. या उद्यमनगरात मॉडर्न इंडस्ट्रीज ही फौंड्री, लांजेकरांचे तांब्या पितळेचे कारखाने, ऑईल मिल असे काही उद्योग उभारले गेले पण तेथे उद्योगनगरी उभी राहू शकली नाही. आज विद्यानगर म्हणून ओळखला

जाणारा भाग म्हणजे औंधकरांचे उद्यमनगर !

१९४५-४६ च्या सुमारास किर्लोस्करवाडीच्या कारखान्यातून बाहेर पडलेल्या देवस्थळी, शामराव भिरंगी, शाळगावकर, पी. डी. दीक्षित आणि विजापुरे टाईपसाठी प्रसिध्द असलेले गणपतराव विजापुरे या मंडळींनी मॉडर्न इंडस्ट्रीज हा कारखाना सैदापूरच्या माळावर सुरू केला. या कारखान्यात नांगर बनवीत. पाल येथे झालेल्या शेतकी प्रदर्शनात मॉडर्न इंडस्ट्रीजच्या उत्पादनाचा जिल्हाधिकाऱ्यांनी गौरव केला होता. हा कारखाना सुमारे दहा वर्षे चालला होता.

१९४८ मध्ये गौरीहर एकनाथ सिंहासने व त्यांच्या चिरंजीवांनी पितळ व तांबे या धातूंची हॉट रोलिंग मिल चालू केली. दक्षिण महाराष्ट्रातील अशा प्रकारची 'हिंद मेटल वर्क्स' ही पहिलीच फॅक्टरी होती. पुढे ती लांजेकर कुटुंबीयांनी चालवावयास घेतली. ही फॅक्टरी १९८७ पर्यंत चालू होती. त्यांनी कोल्ड रोलिंग मिल चालू करण्याचाही प्रयत्न केला. काळाबरोबर राहण्यासाठी लांजेकरांनी 'लांजेकर सेल्स कार्पोरेशन' या नावाने नॉन फेरस धातूंचे काम करणारी फॅक्टरी चालू केली. परिसरातील उद्योगांना लांजेकर कच्ची कास्टिंग्ज आणि यंत्रांचे सुटे भाग पुरवीत असत. लांजेकरांनीच बनवडी येथे लॅपीज मेटॅलिक्स नावाने वाहने व यंत्रे यांचे नॉन फेरस धातूंचे भाग तयार करणारी फॅक्टरी काढली होती. १९९५-९६ पासून येथे ॲल्युमिनियम प्रेशर डायकास्टिंगही चालू आहे.

ओगलेवाडीचे दामुअण्णा म्हैसकर हे धातूच्या जोडकामात ( वेल्डिंग ) तज्ज्ञ होते. ओगले ग्लास वर्क्ससाठी टंगस्टन कार्बाईड टूल्स, वॉशिंग मशिन्स आणि काच उद्योगासाठी लागणारी यंत्रे म्हैसकरांची डी. एन. म्हैसकर ॲन्ड कंपनी तयार करीत असे. १९६०-६२ च्या सुमारास हा कारखाना बंद पडला.

के. एन. दातार यांनी 'द स्टेट इंजिनियरिंग कार्पोरेशन' या नावाने सर्व प्रकारांची दुरुस्ती व धातू जोडकाम करणारे कऱ्हाडातील पहिले वर्कशॉप १९४७ पासून सुमारे पन्नास वर्षे चालविले होते. कऱ्हाडात हाजी अझीझ अत्तार यांनी 'अत्तार बिडी वर्क्स' हा कारखाना रविवार पेठेत सुरू केला होता. पुण्याला त्याची शाखाही होती. दोन्ही ठिकाणी १००-१०० कामगार

होते. पण स्पर्धेमुळे १९५६ मध्ये हा कारखाना बंद पडला.

कऱ्हाडातील एक प्राथमिक शिक्षक बाळकृष्ण भाऊ जोशी यांनी पुण्यास 'ज्ञानविलास प्रेस' आणि 'प्रकाश टाईप फौंड्री' हे उद्योग सुरू केले. कऱ्हाडातील शंकरराव ओगले, ना. वा. गोगटे, सदाशिवराव पाध्ये, बाबासाहेब विद्वांस इ. मंडळींनी कऱ्हाडच्याच धुलाई व्यवसायातील द. म. शाळीग्राम, भावे इ. च्या सहाय्याने 'हिंदुस्थान लाँड्री मिल्स' हा पूर्णपणे आधुनिक यंत्र सहाय्याने धुणे, वाळवणे, इस्त्री करणे यांचा कारखाना पुण्यात १९४६–४७ च्या दरम्यान सुरू केला होता. दुर्दैवाने पाच सात वर्षांतच तो बंद करावा लागला.

१९५०–५२ मध्ये व्यंकटराव ओगले यांनी ओगलेवाडीस 'हँडमेड पेपर्स लि.' कंपनी सुरू केला. तेथे केवळ लिखाणाचाच नव्हे तर वॉटरमार्क असणारा बाँड व डाक्युमेंट कागदही तयार केला जाई परंतु तीव्र स्पर्धेमुळे हा कारखाना नोव्हेंबर १९६५ मध्ये बंद करावा लागला.

१९५२ मध्ये कऱ्हाडच्या सुलतान मिस्त्री यांनी ऊर्जेवर चालणारे पहिले कांडप यंत्र तयार केले. त्यावेळी फारसा प्रतिसाद मिळाला नसला तरी आज तशा यंत्रांचा सर्रास वापर होताना पाहिल्यावर सुलतान मिस्त्री यांच्या कल्पकतेचे कौतुक वाटते.

१९६१ च्या सुमारास यशवंतराव चव्हाण यांनी ओगलेवाडीस लागून असलेल्या पार्ले–बनवडी भागात इंडस्ट्रीयल इस्टेटची स्थापना केली. सुरुवातीस या वसाहतीत उद्योग सुरू करण्यास अत्यल्प प्रतिसाद मिळाला. मात्र नीळकंठराव कल्याणी, बा. म. गोगटे या आज भारतातील अग्रगण्य उद्योगपतींच्या महान यशाची मुहूर्तमेढ याच वसाहतीत रोवली गेली.

मुकुंदराव ओगले यांनी १९५७ मध्ये 'डेलस्टार' कंपनी सुरू केली. येथे प्रथम डेल्टा स्टार्टर तयार करीत. त्यांना मागणीही चांगली होती. पण ते उत्पादन बंद पडले. घरगुती व औद्योगिक वापरासाठी व्हॅक्युम क्लिनर्स, डस्ट कलेक्टर्स हे या कंपनीचे वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन. त्याबद्दल मुकुंदराव ओगले यांना 'पारखे पारितोषिक' ही मिळाले होते. मध्यंतरी ही कंपनी बंद पडली होती. ती सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत. मुकुंदराव ओगले

यांनीच दूध काढण्याची यंत्रे आणि गॅसच्या शेगड्या बनविणारा 'व्हॅक्युफ्लो इंडस्ट्रीज' नावाचा कारखाना सुरू केला होता. आता हा कारखाना अल्फा डी लाव्हल कंपनीने विकत घेऊन तासवडे येथील औद्योगिक वसातीत 'डे-लाव्हल' नावाने चालू ठेवला आहे.

द. म. शाळीग्राम यांनी कराडात १९३४ साली हातधुलाईची लाँड्री सुरू केली. १९३७ मध्ये त्यांनी त्या धंद्याला यंत्राची जोड दिली. त्यांनी पुढे 'लाँड्री – तंत्र, मंत्र, यंत्र' हे पुस्तकही लिहिले. त्यांनी व त्यांचे जावई श्रीकृष्ण ऊर्फ विलासराव कुलकर्णी यांनी धुलाई प्रक्रिया आणि धुलाईची यंत्रे याबाबत संशोधन करून वॉशिंग मशिन हैड्रो एक्स्ट्रॅक्टर व वॉटर हीटर ही धुलाई धंद्यासाठी लागणारी वेगवेगळ्या क्षमतेची यंत्रे विकसित केली. 'अतुल इंजिनिअर्स अँड फॅब्रिकेटर्स' या ओगलेवाडी औद्योगिक वसाहतीतील त्यांच्या कारखान्यातील यंत्रे 'शाकुको' नावाने प्रसिध्द आहेत.

तांबवेकर बंधूंनी १९७६ साली कोयना पेंटस्, डेक्कन पेंटस् हे रंगांचे कारखाने काढले. इलेक्ट्रोस्टिक पेंटस् हे त्यांचे वैशिष्ट्य होते. याखेरीज प्रीसीजन काम्पोनन्टस्, कलबुर्गी उद्योग, परफेक्ट प्रेसिंग, पाटील इंजिनिअरिंग इ. उद्योग या परिसरात आहेत. हेमचंद्र राव यांनी इन्व्हर्टर व यु. पी. एस. (वीजपुरवठा अखंडित चालण्यासाठी लागणारी उपकरणे) यांचे उत्पादन सुरू केले (२००५).

पार्ले-बनवडी येथील औद्योगिक वसाहतीत पाटणकरांनी सुरू केलेले 'हिंदुस्थान गिअर्स' हा गिअर्स तयार करणारा कारखाना व 'सुल्पा फौंड्री' असे दोन कारखाने होते. सध्या हे दोन्ही बंद आहेत. 'वनिता इंडस्ट्रीज' ही गुणवत्तापूर्ण कास्टिंग्ज तयार करणारी कंपनी आहे. येथील कास्टिंग्ज निर्यातही होत. स्टीलच्या खिडक्या, रोलिंग शटर्स, लाँड्री मशिन संच, स्पन पाईप यंत्रसामग्री साखर व सिमेंट यांच्या प्लँटची यंत्रसामग्री तयार करणारा 'हिंदुस्थान स्ट्रक्चरल' हा कारखाना आनंद म्हैसकर आणि प्रतापराव कोटणीस यांनी १९६२ मध्ये ओगलेवाडीस सुरू केला. किर्लोस्कर ब्रदर्स आणि वालचंदनगर इंडस्ट्रीज हे या कंपनीचे मुख्य ग्राहक आहेत.

ओगले ग्लास वर्क्समधून दीर्घकाळ अनुभव घेतलेल्या गजाभाऊ गोखले

यांनी १९६० साली स्वत:चा 'गोखले इंडस्ट्रीज' हा कारखाना सुरू केला. सध्या तो रमेश गोखले पहतात. ओगले, किर्लोस्कर इ. कारखान्यांना लागणारे मोल्डस् ते बनवतात. त्यांचे बंधू अरविंद गोखले यांनी डायप्लास्ट कंपनी (१९८३) काढून त्याला प्लास्टिकच्या उत्पादनाची जोड दिली. १९८४ मध्ये गोखले बेकेलाईट ही कंपनी रमेश गोखले यांनी सुरू केली. यंत्राचे पार्टस् तसेच विविध प्रकारचे ब्रश ते तयार करतात. स्वयंचलित पिस्टन व लायनर्स तयार करणारा 'भारत लायनर्स' हा कारखाना १९६० मध्ये सुरू झाला. या उत्पादनांना चांगली मागणी होती तरी कारखाना लवकर बंद पडला. १९६५ च्या सुमारास ओगलेवाडी येथे बेळगावचे उद्योगपती बा. म. गोगटे (हे मूळचे टेंभूचे ) यांनी माईल्ड स्टीलचे रॉड व रबर तयार करण्याचा प्रयत्न केला. कऱ्हाडच्या औद्योगिक विकासाला चालना मिळाली ती १९६८ च्या दरम्यान कऱ्हाडात आलेल्या किर्लोस्कर हर्मेटिक कॉम्प्रेसर डिव्हिजनमुळे.१९६५ दरम्यान किर्लोस्कर कंपनीने अगाशिव डोंगराच्या पायथ्याशी १०० एकर जमीन खरेदी केली होती. ही किर्लोस्करवाडीच्या किर्लोस्कर ब्रदर्स लि. ची एक शाखा. अमेरिकेतील कोपलँड कार्पोरेशन या कंपनीशी भागीदारी झाल्यामुळे १९९३ पासून ही कंपनी किर्लोस्कर कोपलँड नावाने ओळखली जाई. या कंपनीस १९८९ मध्ये ७२००० कॉंप्रेसर्सची मागणी रशियामधून आली. तेव्हापासून निरनिराळ्या देशात येथील उत्पादन निर्यात होत असते. कंपनीत अनेक हुशार व कर्तबगार अभियंते असल्यामुळे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रकल्प दिले जातात. रोजगार मिळण्याची शक्यता असते. या कंपनीवर अवलंबून असणारे दीडशे लघुउद्योग या परिसरात सुरू झाले. कोयना औद्योगिक वसाहत व चचेगाव येथील उद्योग व्यवसाय हे त्याचीच साक्ष आहेत. किर्लोस्कर कोपलँड मुळे कऱ्हाडचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकले. या कारखान्याची एक शाखा अतीत येथे निघाली आहे. ही कंपनी २००६ मध्ये 'इमर्सन क्लायमेट टेक्नॉलॉजी' या विदेशी कंपनीच्या मालकीची झाली आहे.

आर. जी. शेंडे आणि एम. बी. जोशी यांनी किर्लोस्कर कंपनीत अनुभव संपादन करून स्वत:ची श्री रेफ्रिजरेशन ही कंपनी १९९० मध्ये सुरू

केली. प्रारंभी घरगुती शीतकरण व वातानुकूल यंत्रे तयार करणाऱ्या या कंपनीत आज दूध शीतकरण उद्योग, छपाई उद्योग यासाठी लागणारी यंत्रे व त्यांच्या तपासणीसाठी लागणारी व आतापर्यंत आयात कराव्या लागणाऱ्या उत्पादनासाठी पर्यायी उत्पादने निर्माण केली जातात. जागतिक दर्जाच्या स्पर्धकांबरोबर स्पर्धा असूनही या कंपनीने गुणवत्तेने स्वत:चा वेगळा ठसा उमटविला आहे. १९९२ मध्ये शासनाचे सर्वोत्कृष्ट लघुउद्योगाचे प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

गुणे, मोरब तसेच राजा पेंढारकर इ. उत्साही व कर्तबगार उद्योजकांनी १९८१-८२ मध्ये क्वाड्रोमेटिक एंटरप्रायझेस हा कारखाना पंतांच्या कोटात सुरू केला. प्रामुख्याने गरजू महिलांना रोजगार पुरविण्याच्या दृष्टीने प्रारंभीच्या काळात ॲल्युमिनियम डायकास्ट कनेक्टिंग रॉडस्‌चे मशिनिंग आणि मोटार वायडिंग ही कामे केली जात. १९९२ पासून किर्लोस्कर ब्रदर्स च्या परिसरात कारखान्याचे स्थलांतर होऊन कालानुरूप नवीन उत्पादन तेथे होऊ लागले. २००१ पासून किर्लोस्कर कोपलँडसाठी कारखान्याने हायड्रॉलिक प्रॉडक्ट मॅन्युफॅक्चरिंग सुरू केले. आता तेथे ऑटोमोबाईल किंवा कन्स्ट्रक्शन यांच्यासाठी हायड्रॉलिक उत्पादने केली जातात. आता २००४ पासून क्वाड्रोमेटिक इंजिनिअरिंग प्रा. लि. हा किर्लोस्कर समूहातील कारखाना म्हणून ओळखला जातो.

कोयना नदीवर १९७४ मध्ये नवीन पूल सुरू झाल्यामुळे वाहतूक शहराच्या बाहेरून होऊ लागली. पूर्वीच्या मार्गावर ६०-७० मोटार रिपेअरिंगचा धंदा करणारे उद्योग होते. त्यांच्यावर बेकारीची पाळी येऊ घातली होती. म्हणून कराड इंजिनियरिंग असोसिएशनने पुढाकार घेऊन 'कोयना औद्योगिक सहकारी वसाहत' ही संस्था १९७६ मध्ये स्थापन केली. सुमारे साडेसहा एकराच्या या जागेत सुमारे ५० लघुउद्योजकांनी आपले उद्योग उभारले आहेत. येथे वसाहतीच्या फॅसिलिटी सेंटरसाठी इमारत आहे

जगन्नाथ रामचंद्र ऊर्फ दादा यादव यांनी रॉकेट लॅबोरेटरीज नावाने उद्योग क्षेत्रात पदार्पण केले. त्यांच्या उत्पादनाला पारखे पारितोषिक मिळाले होते. ऊसाच्या पाचटाचे तुकडे करणारे कोयते व अन्य सामग्री तयार करणारा

कारखाना त्यांनी 'रॉकेट इंडस्ट्रीज' म्हणून सुरू केला. यादव यांनी माया इंडस्ट्रीज ॲग्रोटेक इंडस्ट्रीज असे कारखाने उभारले असून तेथे साखर कारखान्यांना उपयुक्त अशा यंत्रांची निर्मिती केली.

१९६५ च्या सुमारास सुधीर विठ्ठल शिराळकर यांनी 'व्हेस्पा इलेक्ट्रोप्लेटर्स' हा इलेक्ट्रोप्लेटिंगचा व्यवसाय सुरू केला. सातारा जिल्ह्यात असे तंत्रज्ञान असणारा हा एकमेव कारखाना होता. या कारखान्याची वाढ हळूहळू करीत १९८० मध्ये त्यांनी दुचाकी वाहनांच्या भागांना इलेक्ट्रोप्लेटिंग करून देण्याचे काम 'संपदा एंटरप्रायझेस' नावाने केले. १९८३ मध्ये विनायक शिराळकर यांच्या सहाय्याने 'शिराळकर असोसिएटस्' हा ट्युब्युलर फर्निचर करण्याचा उद्योग त्यांनी सुरू केला. १९९२-९३ पासून घरगुती व हेल्थ कल्बसाठी व्यायामाची साधने बनविणारा 'संपदा एक्झर' हा कारखाना सुरू केला असून त्याच्या उत्पादनास केवळ देशातच नव्हे तर परदेशातही चांगली मागणी आहे.

गुणवंतराव जाधव यांनी १९८० मध्ये जे. के. इंडस्ट्रीज सुरू केली. या अत्याधुनिक कारखान्यात किर्लोस्कर ब्रदर्सना निर्यातीसाठी लागणारे इम्पिलियर, पंप पार्ट तसेच साखर कारखान्यांना लागणारे मिल बेरिंग तयार होतात. जाधव यांनीच नांदलापूर येथे एस. सी. इंडस्ट्रीज हा किर्लोस्कर काँप्रेसरची दुरुस्ती करणारा दुसरा कारखाना १९८४ मध्ये सुरू केला. हवा व आवाज यांचे प्रदूषण रोखण्यासाठी कारखान्याच्या सभोवती बागेची रचना केली आहे. उत्कृष्ट व्यवस्थापन व गुणवत्ता यासाठी गुणवंतराव जाधव यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

विनायक पावसकर यांच्या अजय ऑप्टिकल या उद्योगात पाचशे प्रकारच्या चष्म्यांच्या काचा तसेच गॉगल्स तयार केल्या जातात. माणिकराव जगदाळे यांनी माणिक बॅग्ज हा उद्योग १९७८ मध्ये सुरू केला. नायलॉन, प्लॅस्टिकच्या पिशव्यापासून स्कूल बॅग्ज, ऑफिस बॅग्ज, प्रवासी बॅग्ज असे उत्पादन येथे केले जाते. १९८४ मध्ये आनंदराव वंजारी यांनी परफेक्ट इंजिनिअरिंग हा उद्योग हजारमाची सदाशिवगड येथे सुरू केला.

औंधच्या पंतप्रतिनिधींनी उत्तेजन दिल्यामुळे कुंडल येथे तांबट काम

करणारे कृष्णा हरी ठोंबरे यांनी सैदापूर येथे शोभेची दारू व त्याच्या विविध वस्तू करण्याचा उद्योग सुरू केला. ठोंबरे यांची चौथी पिढी आज हा व्यवसाय कऱ्हाडात करते.

ऑफसेट छपाईसाठी लागणाऱ्या 'ओरियन लिथो कोट' या रसायनाचे उत्पादन 'ओरियन फोटो सेन्सेटिव्ह' या प्रदीप सखदेव व पद्मजा सखदेव यांनी १९८८ मध्ये सुरू केलेल्या कारखान्यात होते. असे उत्पादन करणाऱ्या अन्य उद्योगांचे कोलॅबरेशन अमेरिकेतील उद्योगांशी आहे. पण सखदेवांचे हे उत्पादन शंभर टक्के भारतीय आहे. या उत्पादनास पारखे पारितोषिक १९९१–९२ मध्ये मिळाले आहे.

१९८४ मध्ये युनूस कच्छी यांनी मिनार केमिकल्स नावाचा कारखाना उभा करून तेथे ऑक्झालिक ॲसिडचे उत्पादन सुरू केले. सध्या तो कारखाना मुंबईचे सोहेल खतीब यांच्या मालकीचा असून त्याची दैनंदिन उत्पादन क्षमता पाच टनाची आहे.

इमारतींच्या बांधकामासाठी भारत कन्स्ट्रक्शन्स, अलाईड भारत कन्स्ट्रक्शन्स अशा कंपन्या निघाल्या होत्या. अलीकडे नवनवीन तरूण बांधकाम व्यावसायिक पुढे आले असून त्यामुळे वीट व वाळू व्यवसायालाही महत्त्व आले आहे. कऱ्हाडला नदीकाठीच्या गाळाचा उपयोग करून अनेक लहान मोठ्या वीटभट्ट्या उभ्या राहिल्या आहेत. कऱ्हाड हे भाजीव वीट उत्पादनाचे मोठे केंद्र आहे. १९५१ मध्ये कऱ्हाडातील एक वीट भट्टी फॅक्टरी ॲक्टखाली नोंदलेली होती. कऱ्हाडात सध्या सुमारे २५ वीटभट्ट्या आहेत. विटांप्रमाणे सिमेंट टाईल्स तयार करणारे कारखाने देखील चार पाच निघाले आहेत. इमारत बांधकामासाठी व नंतर वापरासाठी लागणाऱ्या पाण्याची गरज भागविण्यासाठी १९८३ मध्ये न्यू बोअरिंग वर्क्स व १९९८ पासून शंकरराव काशीद यांचे एन जे इंडस्ट्रीज बोअरिंगची कामे करतात.

१९९६ मध्ये महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) तासवडे येथे माजी उद्योग राज्यमंत्री शामराव अष्टेकर यांच्या प्रयत्नाने सुरू झाली. येथे सुमारे ७०० एकर जागा असून हिंदुस्थान स्पिनिंग मिल, लाव्हल डेव्हलपमेंट प्रकल्प, संजीवनी (मिनरल

वॉटर), सॅगॉन, हिंदुस्थान पेंटस्, ओऑसिस अल्कोहोल, शेती अवजारे निर्माण करणारा फार्म किंग, संतोष मिल्क, चितळे मिल्क, वाईकर बंधूचे हिंदुस्थान पेंटस् इ. उद्योग येथे चालू आहेत.

सहकारी तत्त्वावर सुरू झालेला कऱ्हाडातील पहिला उद्योग म्हणजे माजी सैनिकांनी १९४७ मध्ये अच्युत बाळाजी कुलकर्णी यांच्या पुढाकाराने सुरू केलेले 'एक्स सर्व्हिसमेन कराड को-ऑपरेटिव्ह वर्कशॉप लि.' हा होय. येथे हातमाग, अंबर चरखा, नूतन तेल घाणी इ. उत्पादन होत असे. तथापि समाज परिवर्तनाची मोठी शक्ती म्हणून सहकारी तत्त्वाचा उपयोग करून निघालेला पहिला मोठा उद्योग म्हणजे रेठरे येथील कृष्णा सहकारी साखर कारखाना. १९५५ मध्ये सुरू झालेला, यशवंतराव मोहिते यांनी स्थापन केलेला आणि जयवंतराव भोसले यांनी वाढविलेला हा कारखाना भारतातील सहकारी साखर कारखान्यात अग्रगण्य आहे. येथे स्थानिक शेतकऱ्यांचा साखर कारखाना काढावा यासाठी ल. म. ऊर्फ नानासाहेब देशपांडे यांनी १९४७ मध्ये कृषिखात्याच्या उपसंचालनालयाकडे मागणी केली होती. कऱ्हाडच्या परिसरातील शेतकऱ्यांना कृष्णा कारखान्याचे वरदान लाभले. दीड टन ऊसाची एका खेपेत वाहतूक करणाऱ्या नव्या गाड्या उत्पादन करणारा कृष्णा सहकारी कृषी उद्योगसंघ, मयूर सहकारी कुक्कुट पालन संघ, छपाईची कामे करणारा ग्रामीण विश्वस्त संघ, काकवीपासून मद्यार्क आणि ॲसिटोनसारखी औद्योगिक महत्त्वाची रसायने बनविणारे कारखाने इ. प्रकल्प 'कृष्णा' च्या माध्यमातून उभे राहिले, वाढले. त्यानंतरच्या काळात उच्चतम तांत्रिक क्षमता पुरस्कार संपादन करणारा (१९८८-८९) पी. डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेला 'सह्याद्रि सहकारी साखर कारखाना' (स्थापना १९६९), विलासराव पाटील उंडाळकर आणि जयसिंगराव पाटील यांच्या नेतृत्वाने उभारला गेलेला 'रयत', भिंगारदेवे यांचा 'खंडोबा प्रसन्न' हे सहकारी साखर कारखाने उभे राहिले. मुंढे येथे दोशी- केनिया यांनी चालू केलेला 'डायमंड शुगर वर्क्स' ह्या खाजगी खांडसरी साखर कारखान्याची नोंद येथे घेतली पाहिजे. साखर कारखान्याच्या माध्यमातून कार्यक्षेत्रात उपसा जलसिंचन योजना होऊन बरेच शेतकरी बागाईतदार झाले.

१९३८ मध्ये विनायकराव हर्डीकर यांनी क्रीम काढून सेपरेट मिल्क विक्रीचा तसेच १९४५ मध्ये अनंत शामाचार्य घळसासी यांनी पाश्चराईज्ड दूध विक्रीचा उद्योग केला. त्यांना म्हणावे तसे यश आले नाही. वाळवेकर, उमराणी, हणमंतराव वाघ, सावंत, खोत इ. नी ग्रामीण परिसरातून दूध संकलित करून विक्री करण्याचा उद्योग केला, पण त्याला मर्यादा होती. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतीपूरक दूध व्यवसाय सहकारी तत्त्वावर रघुनाथराव पाटील यांनी सुरू केला. त्यांनी 'कोयना दूध उत्पादक व प्रक्रिया संघ' १९५७ मध्ये खोडशी येथे सुरू केला. २००४-०५ मध्ये १,९३,८८,५१५ लिटर दूध संकलन झाले. दूध आणि दुग्धजन्य उत्पादने अद्यावत यंत्रसामग्रीच्या सहाय्याने करून या संघाने दुधाच्या बाजारपेठेत मोठे नाव कमावले असून सामान्य माध्यमामार्फत सामान्य माणूस काय करू शकतो याचे हे उदाहरण आहे. जखणाईदेवी, कृष्णाई, प्रियदर्शिनी, जनता अशा सहकारी तत्त्वावरील दूध व्यावसायिक संस्था निघाल्या. राजारामबापू दूध संघाने आपली शाखा येथे सुरू केली आहे.

सुभाषराव जोशी आणि भीमराव जाधव यांनी १९८३ मध्ये कुक्कुटपालन व्यवसाय सुरू केला. त्यांच्या पोल्ट्रीत त्यांनी पक्ष्यांना पाणी पाजण्याची, खाद्य देण्याची तसेच पक्ष्यांची वाहतूक करण्यासाठी स्वयंचलित प्रणाली तयार केली आहे. या व्यवसायात उंदरांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात होतो. म्हणून सुभाषराव जोशी यांनी 'उंदिर प्रतिबंधक कुक्कुटघरे' संशोधनपूर्वक विकसित केली.तिचा वापर केला, त्याच विषयावर त्यांनी लिहिलेला प्रबंध इंग्लंडहून प्रसिद्ध होणाऱ्या 'वर्ल्ड पोल्ट्री' नियतकालिकात प्रकाशित झाला. सुभाषराव जोशी 'राष्ट्रीय अंडी समन्वय समितीचे' पदाधिकारी आहेत.

१९४५ च्या दरम्यान ओगलेवाडीस 'इंडियन ह्यूम पाईप' हा सिमेंट स्पन पाईप करण्याचा कारखाना निघाला. १९६४ मध्ये राजाभाऊ कोटणीस यांनी 'कोयना सिमेंट वस्तू निर्मिती सहकारी संस्था' हा उद्योग सुरू केला. पाणीपुरवठ्याच्या अनेक योजना या कारखान्याच्या माध्यमातून झाल्या. राजाभाऊ कोटणीस यांनी कुपवाड (सांगली) येथे 'कृष्णा' हा सिमेंट उत्पादनाचा कारखाना सुरू केला होता. १९३७ मध्ये स्थापन झालेल्या कराड

तालुका सहकारी खरेदी विक्री संघाने 'कोयना' या दाणेदार मिश्रखताचे उत्पादन करणारा कारखाना १९६४ मध्ये सुरू केला.

१९०६ च्या गोकुळाष्टमीस सोमवार पेठेतील जुन्या मामलेदार कचेरीत (सध्या तेथे पाण्याची टाकी आहे) शेतकऱ्यांच्या व गावकऱ्यांच्या उत्पादनांचे प्रदर्शन दहा दिवस भरविले होते.

१९ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर १९४१ असे चार दिवस कराड नगर परिषदेने सातारा जिल्हा औद्योगिक व शेतकी प्रदर्शन भरवून एक अभिनव व उपयुक्त प्रयोग केला. हे प्रदर्शन चांगलेच यशस्वी झाले. त्यासाठी नगर परिषदेने रु.११७-६-६ ची बक्षिसे वाटली अशी नोंद आहे.

कार्वे येथील संभाजीराव थोरात यांनी १९५० साली टिळक हायस्कूल कऱ्हाडच्या क्रीडांगणावर 'शेती प्रदर्शन' भरविले होते. या प्रदर्शनात कऱ्हाडच्या सुलतान मेस्त्री यांचा मिरच्या कुटण्याचा डंख, शेंगा फोडण्याची, कणसे सोलण्याची, कडबा कापण्याची यंत्रे या प्रदर्शनात होतीच, त्याबरोबर वॉशिंग मशिनही होते. मंडईजवळ त्यावेळी असलेल्या आझाद इंडस्ट्रीजचे सिमेंट पाईपचे उत्पादन आणि सिमेंटमध्ये केलेला म. गांधींचा पुतळा हेही या प्रदर्शनातील आकर्षण होते. कुक्कुटपालन, ससेपालन हे शेतीपूरक व्यवसाय कसे करता येतील हे या प्रदर्शनात दाखविले जात होते.

कराड अर्बन को - ऑपरेटिव्ह बँकेने त्यांच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने १५ फेब्रुवारी १९६७ रोजी गुरूवार पेठेत शिराळकर हॉलमध्ये आणि महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँकांच्या अधिवेशनानिमित्त २४ ते २६ मे १९७५ रोजी श्री शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात औद्योगिक प्रदर्शने भरविली होती. बँकेचे माजी अध्यक्ष कृष्णराव सरडे यांनी त्या निमित्ताने कऱ्हाड परिसरातील उद्योगधंद्याचे सर्वेक्षणही केले. याच बँकेने कराड इंजिनियरिंग असोसिएशनच्या सहकार्याने २७ ते ३१ डिसेंबर १९८५ व २५ ते २९ नोव्हेंबर १९८८ मध्ये 'KAITE' (कराड ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रियल ट्रेड एक्झिबिशन ) या नावाने नगरपरिषदेच्या शिवाजी स्टेडियमवर भव्य प्रदर्शने आयोजित करून उद्योगधंद्यांना प्रोत्साहन दिले. या वेळी तर महाराष्ट्र राज्याचे उद्योग राज्यमंत्री (कऱ्हाडच्याच) शामराव अष्टेकर यांचे

प्रोत्साहन लाभले होते. मर्चंट प्रतिष्ठान तर्फे १९९९ मध्ये महाराष्ट्र महिला उद्योजक परिषद व त्यानिमित्त प्रदर्शन भरविण्यात आले होते.

कऱ्हाडात २००३ पासून 'यशवंत कृषी प्रदर्शन' यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीस प्रतिवर्षी भरविले जात आहे. शेतीच्या अनुषंगाने उद्योगांचे स्टॉल्स तेथे असतात.

१९६७ मध्ये कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने बँकेने भरविलेल्या औद्योगिक प्रदर्शनाची फलनिष्पत्ती म्हणजे कराड इंजिनियरिंग असोसिएशनची स्थापना. असोसिएशला प्रत्यक्ष रूप आले ते नोव्हेंबर १९७३ मध्ये.राजाभाऊ कोटणीस, ज. रा. ऊर्फ दादा यादव, संस्थापक अध्यक्ष गुणवंतराव जाधव, व्ही. जी. लेले, रामभाऊ सावंत, पी. पी. जगताप, जे. डी. खोत, व्ही. डी. जाधव, सुधीर शिराळकर, दादा शिंदे, सुरेश आराणके, प्रतापराव कोटणीस, के.एन. ( काका ) दातार, प्रतापराव डुबल, मुकुंदराव ओगले, हेमचंद्र गुणे यांचा या कामी पुढाकार होता. या असोसिएशनची नोंदणी १९८४ मध्ये करण्यात आली. लघुउद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी असोसिएशन प्रयत्नशील असते. कऱ्हाडला सातत्याने वेगवेगळी लहान मोठी उद्योगांची प्रदर्शने भरविण्याची कायम स्वरूपी व्यवस्था व्हावी अशी कराड इंजिनिअरिंग असोसिएशनची कल्पना होती.

बांधकामाचा दर्जा उच्च राखण्याबरोबरच बांधकामाचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने नवीन तंत्रज्ञानाची, माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी १९९२ साली कराड आर्किटेक्टस् अँड इंजिनियर्स असोसिएशन स्थापन झाली. या संस्थेचे अध्यक्ष दिलीप जानुगडे आहेत. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट' चे उपकेंद्र कऱ्हाडात १३ मार्च २००४ रोजी सुरू झाले. त्याचे अध्यक्ष आर्किटेक्ट सारंग बेलापुरे आहेत.

कऱ्हाडातील आगपेट्यांच्या कारखान्यास उत्तेजन देण्यासाठी १९१२ साली कराड नगर परिषदेने बाहेरून आयात होणाऱ्या काड्यापेट्यांवर जकातीचे दर वाढविले. तसेच कऱ्हाड हद्दीत नवीन होणाऱ्या कारखान्यांना कच्चा माल, यंत्र सामुग्री, बांधकाम साहित्य यावर जकात माफ करण्याचा निर्णय १९६१ व १९६३ मध्ये घेण्यात आला होता. मध्यवर्ती नियोजन मंडळाने औद्योगिकदृष्ट्या

मागास जिल्ह्याच्या यादी मध्ये सातारा जिल्ह्याचा समावेश केला नाही. तो करावा अशी मागणी नगर परिषदेने २५-१०-१९७६ रोजी केली होती. तसेच २ जानेवारी १९८१ रोजी कराड परिसरात एमआयडीसी क्षेत्र मंजूर करावे अशी विनंती नगर परिषदेने केली होती .

१९२६ साली कामगार संघटनांचा कायदा झाला. हा कायदा औंध संस्थानात लागू करताना 'युनियनमध्ये बाहेरचे, कामगारांशिवायचे कार्यकर्ते असावेत' हे कलम वगळण्याचा प्रयत्न चालू होता. भाई व्ही. डी. चितळे यांनी आप्पासाहेब पंत यांची गाठ घेऊन ती तरतूद कायम ठेवण्यास भाग पाडले होते. तथापि औंध संस्थानने साम्यवादी विचारसरणीच्या भाई व्ही. डी. चितळे यांच्या कामगार युनियनला मान्यता न देता इंटकप्रणित कामगार संघटनेला मान्यता दिली ( १९३७). ओगले ग्लास वर्क्समध्ये १९५२ साली झालेला संप अवघ्या चार तासांत संपला होता. १९५३-५६ या काळात हँडमेड पेपर कारखान्यात तेरा वेळा संप झाला. ओगले ग्लास वर्क्स, डेलस्टार इ. ठिकाणी कामगारांनी जुनी येणी मिळण्यासाठी विशेषत: ते कारखाने सुरू व्हावेत यासाठी संप, निदर्शने या मार्गांनी असंतोष व्यक्त केला तरी त्या असंतोषाने उग्र स्वरूप कधीच धारण केले नाही.

गोव्यात मँगेनीजची खाण, गोगटे स्टील, गोगटे पेपर्स इ. कारखाने काढणारे बा. म. ऊर्फ रावसाहेब गोगटे, पुण्यातील सदर्न नीटींगचे सुपनेकर व युनायटेड होजिअरीचे आळतेकर, हेवी फोर्जिंग, क्रँक शाफ्टस्, सेनादलाला आणि रेल्वेला उपयोगी पडणारी उत्पादने करण्यासाठी भारत फोर्ज, कल्याणी स्टील, कल्याणी शार्प, कल्याणी ब्रेक आणि सहयोगी संस्थांचे जाळे निर्माण करणारे डॉ. नीळकंठराव कल्याणी, कोल्हापुरात ॲडको इंडस्ट्रीज हा उद्योग समूह स्थापणारे दिगंबर गोपाळ आराणके तसेच संरक्षण क्षेत्रासाठी खास संगणक बनविणारे पृथ्वीराज चव्हाण, थरमॅक्स कं. पुणेचे उपाध्यक्ष डॉ. नरेंद्र जोशी, ओकासा फार्मा लि. चे व्ही. जी. खिरे हे सर्व यशस्वी उद्योगपती कऱ्हाडचे सुपुत्र आहेत,

जगातील ९४६ अब्जाधीशांमध्ये ३६ भारतीय असून त्यांमध्ये ४५८ व्या क्रमांकावर आता पुणेकर झालेले कऱ्हाडचे बाबा कल्याणी आहेत. त्यांची

भारत फोर्ज ही कंपनी जगातील सर्वात मोठी फोर्जिंग कंपनी आहे.

कृष्णा कोयनांनी सुपीक बनविलेल्या परिसरात शेती हाच मुख्य व्यवसाय असणे स्वाभाविक होते. या शेती उत्पादनाशी संबंधित तेल गिरण्या आणि साखर कारखाने मोठ्या प्रमाणात निघावयास हवे होते. कराड परिसरात साखर कारखाने निघाले, पण त्या कारखान्यांच्या अनुषंगाने त्यांना लागणारी यंत्रसामग्री, पोती इ. चे उत्पादन होणारे छोटे कारखाने उभे राहिले नाहीत. अपवाद रॉकेट इंडस्ट्रीजचा. तसेच कारखान्यांच्या पसाऱ्यास आवश्यक अशी मोकळी जागा मिळणे ही देखील एक अडचण आहेच.

कऱ्हाडच्या औद्योगिक क्षेत्रातील गेल्या शतकातील वाटचालीचा मागोवा घेताना येथे अनेक उद्योग अल्प काळ चालले आणि बंद झाले असे आढळते. भविष्यकाळाचा वेध घेऊन प्रयत्न करणारी संशोधक वृत्ती आणि उद्योगधंद्यासाठी आवश्यक अशा सर्व सुविधांची अनुकूलता लाभूनदेखील अपवादात्मक उद्योग वगळले तर कऱ्हाडात एकही मोठा उद्योग उभा राहू शकला नाही. औद्योगिक क्षेत्रात कऱ्हाड मागे पडले अशीच नोंद खेदाने करावी लागेल. मग तांत्रिक मार्गदर्शनाचा अपुरेपणा, आर्थिक पाठबळाची उणीव, स्थानिक संस्थांच्या प्रोत्साहनाचा अभाव.... कारण कोणतेही असेल कराडच्या शहरीपणाला यंत्राचा झपाटा मानवला नाही, हे खरे !

*****

७

# सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सुविधा

शहरात स्वच्छता राखणे हे नगरपरिषदेचे एक महत्त्वाचे काम. नगरपरिषदेच्या आरंभीच्या काळात रस्ते सफाईच्या कामासाठी चार भंगी होते. जरुरीप्रमाणे त्यात भर पडत आता (२००५) सुमारे साठ नोकर सफाई कामासाठी आहेत. मनुष्यबळाने आठ तासांत सुमारे पावणेचार हजार घनमीटर कचरा उचलला जातो. शिवाय कामगारांच्या आरोग्याची जोखीम असतेच. म्हणून कऱ्हाड नगरपरिषदेने आठ तासांत १,३६,००० घनमीटर कचरा उचलू शकणाऱ्या यांत्रिक झाडूचा वापर प्रयोगादाखल सुरू केला आहे. सध्या शहरातून रोज सरासरी अठरा टन कचरा डंपिंग ग्राऊंडमध्ये जमा केला जातो. कचरा टाकण्यासाठी ठिकठिकाणी कोंडाळी असतातच शिवाय नऊ स्वयंचलित घंटागाड्या द्वारा घरोघरी फिरून कचरा गोळा केला जातो. पूर्वी कचरा गावाबाहेरील खड्ड्यात टाकून त्यापासून शास्त्रोक्त पद्धतीने दरसाल सुमारे १३०० टन कंपोस्ट खत तयार केले जाई. आता घनकचरा व ओला कचरा वेगळा करून निव्वळ कुजणाऱ्या कचऱ्यातून गांडूळ खत तयार करून विकले जाते. कऱ्हाड हॉस्पिटल असोसिएशनमार्फत जैव वैद्यकीय कचरा स्वतंत्रपणे वेगवेगळ्या हॉस्पिटलमधून गोळा केला जातो. इन्सिनेटरमार्फत शास्त्रीय पद्धतीने नाश केला जातो. कऱ्हाडातील जैविक घनकचऱ्याचा प्रकल्प महाराष्ट्रात तालुका पातळीवरील एकमेव प्रकल्प असावा.

नगरपरिषद स्थापन होण्याआधी शहरातील१८६१ घरांपैकी फक्त १८६ घरांत खाजगी संडास होते. घरमालक आपल्या संडासांची सफाई

स्वखर्चाने भंगी लोकांकडून परस्पर करून घेत. इतर लोक शहरातील मोकळ्या जागांचा उपयोग संडाससारखा करीत. लहान मुलांना घराबाहेरच रस्त्याच्या कडेस संडासास बसवत. सार्वजनिक आरोग्यास ही व्यवस्था धोक्याची म्हणून १८९० – ९१ पासून नगरपरिषदेने ती व्यवस्था स्वत:कडे घेतली .सांडपाण्याचा निचरा होईल, फ्लशिंग संडासची सुधारणा होईल इ. हेतूने नगरपरिषदेने १९२० पूर्वीच भुयारी गटार योजनेची मागणी केली होती. प्रत्यक्षात नगरपरिषदेने या योजनेस१९६५ मध्ये हात घातला. ही योजना हा शहरसुधारणेचा सर्वांत मोठा टप्पा होता. योजनेचे काम १९७४ मध्ये पूर्ण झाले. पुरवणी योजनाही १९९६ मध्ये अमलात आली. ३१ डिसेंबर १९८० पासून नगरपरिषदेने खाजगी संडास सफाई सेवा देण्याचे पूर्णपणे बंद केले आहे. २००५ मध्ये शहरातील ८६९४ घरांपैकी ८१ टक्के घरांना वैयक्तिक शौचालये आहेत. मुंबई, पुणे, नागपूर ही मोठी शहरे सोडल्यास अशी भुयारी गटार योजना महाराष्ट्रात केवळ कऱ्हाड शहरातच सर्व प्रथम आकारास आली. या योजनेमुळे शहरातील स्वच्छता व आरोग्यात आमूलाग्र बदल झाला. शहरातील मैलापाण्याचा उपसा चार केंद्रात पंपिंग करून शहराबाहेरील मलशुद्धीकरण केंद्रात निचरा करण्यासाठी नेले जाते. तेथे प्रक्रिया झालेले पाणी शेतीसाठी पुरविले जाते.

१८६६ मध्ये नगरपरिषदेने शहराच्या चार बाजूंना आडोसे उभे करून सार्वजनिक संडासांची सोय केली होती. २००५ मध्ये शहरातील रहिवासी क्षेत्रांत २५०, बाजार, बस स्टेशन इ. सार्वजनिक ठिकाणी ६० व झोपडपट्टीत ९५ असे एकूण ४०५ सार्वजनिक संडास आहेत. शहरात वेगवेगळ्या ठिकाणी पुरुषांसाठी ८१ व स्त्रियांसाठी १३ अशा एकूण ९४ सार्वजनिक मुताऱ्या आहेत. याशिवाय 'पैसे द्या व वापरा' या तत्त्वावर शौचालये व स्नानगृहेही नगरपरिषदेने चालू केली आहेत.

१८५९ साली कऱ्हाड परिसरात कॉलऱ्याची (हिला 'महामारी' असेही म्हणत.) साथ सुरू झाली. १८७५ ते १८७७, १८८२, १८८५, १८९६ ते १९०७, १९४१, १९५० या काळात कॉलऱ्याची साथ कऱ्हाडात झाल्याची नोंद आहे.

कॉलऱ्याच्या जोडीस प्लेगचीही साथ असे. ५ जुलै १८९७ रोजी कऱ्हाडात प्लेगची पहिली लागण झाली. १४६७ लागण व १११७ मृत्यू अवघ्या सहा महिन्यांत झाले. त्यामुळे नागरिकांत कमालीची घबराट पसरली. असंख्य लोक घरदार सोडून गेले. अंत्यविधीसही माणूस मिळेना. १८९८, १८९९ मध्ये तशीच स्थिती पुन्हा निर्माण झाली. सुमारे १३५ लोक मरण पावले. १९१५ ते १९१८ या चार वर्षांत प्लेगने पुन्हा ठाण मांडले आणि ७८९ लोकांचा बळी घेतला. १९२५-२६ सालात प्लेगचे पुनरागमन झाले. दोन वर्षांत २०४ लोक मृत्यू पावले. १९२७ ते १९२९ या काळातही तशीच पुनरावृत्ती झाली. प्लेगची (शेवटची म्हणावी लागेल अशी) साथ १९४५ मध्ये आली आणि १०० लोक या साथीस बळी पडले. चावडी चौकात रोज एका पाटीवर लागण व मृत्यूचे आकडे लिहिलेले असत.

१८५९ मध्ये प्रथम कॉलऱ्याची साथ आली, त्यावेळी साताऱ्याहून डॉ. बाबुराव इच्छाराम यांना आणले होते. १८७५ ते १८७७ काळात नगरपालिकेच्या दवाखान्यातील सेवक वर्गाने जिवापाड मेहनत केली. म्हणून त्यांना नगरपालिकेने बक्षिसी म्हणून ७० रु. वाटले. १८९७ ते १८९९ या काळात प्लेगशी सामना करण्यासाठी नगरपरिषदेने तहसिलदार कचेरीच्या पिछाडीस, प्लेगने लागण झालेल्या लोकांसाठी दहा झोपड्या बांधल्या, रोग्यांची शुश्रूषा करण्यासाठी खास सॅनिटरी कँप मागविला. प्रेते हलविण्यासाठी चार स्वतंत्र नोकर व बैलगाड्यांची व्यवस्था केली. विशेष म्हणजे शहरात स्वच्छता राखण्यासाठी जादा पोलिस मागविले. गाव सोडून गेलेल्या लोकांच्या घरांच्या राखणीसाठी रखवालदार नेमले होते. नागरिकांनीही या काळात स्वयंसेवक म्हणून उल्लेखनीय काम केले. शिवाय नगरपरिषदेचे सभासद माधव रामचंद्र सप्रे आणि नारायण रामचंद्र भागवत यांनीही प्रामुख्याने खूप परिश्रम घेतले. सायनोगॅसिंग, उंदिर पकडणे, मारणे, डी.डी.टी. ने घरे धुणे, गटारांतून पावडर, फिनेल टाकणे या गोष्टी प्रतिबंधक लस टोचण्याच्या मोहिमेबरोबरच दक्षतेने केल्या जात. अशी बारकाईने काळजी नगरपरिषद करत असल्यामुळे १९३३, १९४१ व १९५० मध्ये झालेल्या साथी अल्पावधीतच आटोक्यात येऊ शकल्या. सार्वजनिक

आरोग्याबाबत मार्गदर्शन व देखरेख करण्यासाठी १९४१ पासून पात्रतासिद्ध सॅनिटरी इन्स्पेक्टर नेमण्यात नगरपरिषदेने आरंभ केला होताच.

देवीच्या साथीही वारंवार येत असत. त्यावर प्रतिबंधक उपाय म्हणून मुलांना लहानपणीच देवी काढणे जरुरीचे असते. हे काम कायम व सतत चालावे यासाठी नगरपरिषदेने १ फेब्रुवारी १८६४ पासून व्हॅक्सिनेटरची नेमणूक केली होती. नारायण भाऊ हे नगरपालिकेचे पहिले व्हॅक्सिनेटर होते.

२ जून १९५७ ते १० सप्टेंबर १९५७ या काळात कऱ्हाड शहरात एनफ्ल्युएंझाची साथ होती. त्या साथीचा बंदोबस्त करण्यासाठी नगरपरिषदेने सेग्रेगेशन कँप सुरू केला. त्यात ११६ रोगी होते. दोन जादा डॉक्टरांची तात्पुरती नेमणूक नगरपरिषदेने केली. स्थानिक मेडिकल असोसिएशनचीही मदत घेतली. रोग्यांची वाहतूक करण्यासाठी दोन गाड्यांची व्यवस्था केली. एकूण ६५५० रोग्यांवर उपचार करण्यात आले. नगरपरिषदेचा यासाठी एकूण खर्च रुपये ८८८७ झाला. मार्च १९५९ मध्ये पुन्हा एनफ्ल्युएंझाची साथ सुरू झाली. त्यावेळी देखील सेग्रेगेशन कँप, औषधोपचार केंद्रे उघडून साथ वेळीच आटोक्यात आणली.

ऑक्टोबर १९६१ मध्ये कऱ्हाड शहरात व आसपास कॉलऱ्याची साथ उद्भवली. तात्पुरत्या नोकरवर्गाची नेमणूक करून तात्काळ प्रतिबंधक उपाय करण्यात आले.

या परिसरात १९८७ मध्ये एडस्‌चा पहिला रुग्ण आढळला. १९९३ मध्ये शहरात काविळीच्या साथीचा प्रादुर्भाव सुमारे दीड महिना होता. शहरातील ८ जणांचा काविळीने मृत्यू झाला. नगरपरिषदेने मार्च १९९३ मध्येच परिसर विभागास जलशुद्धीकरण केंद्रातील परिसर अभियांत्रिकी विभागाची गैरव्यवस्था व पाणी शुद्धीकरणाबाबत कर्मचाऱ्यांनी केलेला हलगर्जीपणा यामुळेच काविळीचा प्रादुर्भाव झाला असावा असे कळविले होते. शुक्रवार पेठेतील वॉटरवर्क्समधील पाणी उपसण्याचे केंद्रच बंद करण्यात आले.

नवजात बालकांसाठी डीटीपी, पोलिओ, गोवर, बी.सी.जी., टीटी, डीटी इ. सार्वजनिक लसीकरणाचा कार्यक्रम अंगणवाड्या, स्वयंसेवी संस्था

आणि खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या सहाय्याने सातत्याने अंमलात आणला जातो. कार्वे नाका, कॉटेज हॉस्पिटल, कऱ्हाड नर्सिंग होम आणि ताटे हॉस्पिटल या ठिकाणी आठवड्यातून एकदा अनुक्रमे सोमवार, मंगळवार, गुरुवार आणि शुक्रवार या दिवशी लसीकरणाची सुविधा पुरविली जाते. दर बुधवारी गरोदर मातांची तपासणी करण्यात येते. डासांचा व ढेकणांचा उपद्रव टाळण्यासाठी वेळोवेळी जंतुनाशक फवारणी केली जाते. पिण्याचे पाणी शुद्ध असल्याबद्दल नियमित तपासणी करून खात्री केली जाते. डास उत्पत्तिस्थानात एकूण १३ ठिकाणी गप्पी मासे सोडले असून पशुवैद्यकीय दवाखान्याजवळील पाण्याची टाकी आणि पाटण कॉलनीजवळील नदीकाठची विहीर येथे गप्पी मासे पैदास केंद्रे आहेत. मलेरिया, कुष्टरोग याबाबत घरोघरी जाऊन पाहणी केली जाते. पल्स पोलिओ, क्षयरोग, कुष्टरोग, एडस इ. बाबत नगरपरिषद, कॉटेज हॉस्पिटल, स्वयंसेवी संस्था, शालेय विद्यार्थी यांच्या सहकार्याने जनजागरण केले जाते.

पूर्वदक्षता आणि प्रतिबंधक उपाय योजना वेळीच केली जात असल्यामुळे सुदैवाने गेल्या बारा वर्षांत सार्वजनिक साथीचा प्रादुर्भाव झाला नाही.हवा, पाणी दूषित करणारे कारखाने औद्योगिक वसाहती, क्वारी (खाणी) शहरात नाहीत. नदीकडे जाणारे दूषित पाणी अडवून सांडपाणी भुयारी गटार योजनेस जोडले आहे. मैलायुक्त पाणी व मैला यावर प्रक्रिया करून शेतीस पाणीपुरवठा केला जातो. हॉस्पिटलातील कचऱ्यासाठी शहराबाहेर इन्सिनेटर बसविला आहे. नदीचे पाणी दूषित होऊ नये म्हणून गणेशमूर्ती दान योजना, निर्माल्य कलश असे उपक्रम सामाजिक संस्थांच्या सहकार्याने अंमलात आणले आहेत.

अशा रीतीने शहरातील नागरिकांच्या स्वास्थ्यरक्षणासाठी कराड नगरपरिषदेने आपल्या आरंभापासूनच काळजी केली. मार्च १८६५ मध्ये नगरपलिकेची शनिवार पेठेत (सध्या जेथे यशवंत हायस्कूल आहे तेथे) धर्मशाळा होती. त्या इमारतीतच दवाखाना सुरू झाला. रामचंद्र दाजी हे या दवाखान्याचे पहिले डॉक्टर येथे सुमारे एक तप (१८७८ पर्यंत) होते. १८८४ च्या सुमारास ५५८५ रूग्ण होते. त्यांच्यावर उपचारासाठी १३००

रू. खर्च आला. मलेरिया, जंत, नारू, त्वचारोग हे प्रमुख रोग होते, अशी नोंद बॉंबे गॅझेटियर, सातारा जिल्हा १८८४ मध्ये आढळते. १९२७ मध्ये ६३ आत राहणाऱ्या व १०३१५ बाहेर राहणाऱ्या रोग्यांवर औषधोपचार करण्यात आले. (कऱ्हाड य.रा.गुप्ते १९२९.)

कऱ्हाडच्या आरोग्याविषयीचा आढावा घेत असताना कऱ्हाडात २९ ऑक्टोबर १९२४ रोजी स्थापन झालेल्या आरोग्य मंडळ या संस्थेच्या अल्पकालीनच पण महत्त्वपूर्ण कामगिरीची नोंद घेणे आवश्यक आहे. (या संस्थेचा पहिल्या सव्वा वर्षांचा छापील अहवाल उपलब्ध आहे. या संस्थेचे पुढे काय झाले याची माहिती मिळत नाही.) नागरिक आणि नगरपरिषद यांच्यात एकदिल सहकारिता नसली की आरोग्याने काढता पाय घेतलाच. म्हणून सतत तीन वर्षे प्लेगच्या साथीत आलेला अनुभव जमेला धरून कऱ्हाडातील श्रीकृष्ण क्लब, या संस्थेच्या काही सभासदांनी पुढाकार घेऊन ही संस्था सुरू केली होती. संस्थेचे अध्यक्ष किसनलाल प्रेमराज मारवाडी होते तर उपाध्यक्षांमध्ये बळवंत महादेव जाधव, रामचंद्र कृष्णाजी दुसाने, बाळकृष्ण लक्ष्मण थोरवडे, शामराव गोविंद बिजुटकर यांचा समावेश होता. संस्थेचे वाचस्पती व चिटणीस सि. य. ऊर्फ भाऊकाका गरूड होते. पहिल्या सव्वा वर्षात आठवड्यास एक याप्रमाणे नियमितपणे ६६ फेऱ्या मारून शहरातील विविध भागांची पाहणी, तपासणी करून नगरपरिषदेकडे मंडळाने ९० अहवाल पाठविले.

दारिद्र्य आणि अज्ञान यामुळे आरोग्याशी छत्तीसाचा आकडा असलेल्या तथाकथित अस्पृश्य समाजास स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिल्यावर महारबंधूंनी आपल्या जातगंगेच्या देवळाभोवती जागा आरशासारखी स्वच्छ केली, असा विशेष निर्देश या अहवालात आहे. खालच्या व वरच्या महारवाड्यात पाण्याच्या चाव्या व कंदील, मांगवाड्यासाठी सोयीस्कर नळ आणि चांभारवाड्यातील तांबटतालमीसमोरील दुर्गंधी रंकाळ्याचा नायनाट ही अस्पृश्य

मंडळींकडून अर्ज करवून घेऊन तडीस नेलेली आरोग्य मंडळाच्या हातची कामे होती. ''याशिवाय लोणार आळीतील चावी, सोमवारातील कुंभारवाड्यास मिळालेला कंदील व चावी, मंडईनजीक कसाईखान्यालगतच्या वैतरणीची आटणी, गावाचा रोज उपसलेला गाळ श्री कृष्णाबाईच्या संगमाकडे पडत असे, त्याची हद्दपारी, गावात लागलेल्या फायरप्लगच्या पाट्या, ढोरआळीच्या खालच्या रस्त्यावर वाहणाऱ्या गटारगंगेचा बंदोबस्त, कोटाखाली मोटारी धुण्याच्या वहिवाटीमुळे माजत असलेल्या चिखलचेंद्याचे उच्चाटन, व्यंकोबाच्या देवळाकडील, सात सैदाकडील, कोळेवाडीकरांच्या बोळातील तसेच अन्यत्र अरुंद असलेल्या गटारांची फेरपाळीने सारखी उपस, डुबल मारूतीनजीकच्या अगर मांगवाड्याजवळच्या सार्वजनिक शौचकूपांच्या तंदुरूस्तीची सोय, शहरात वाढलेली कंदिलांची संख्या, निवडुंग डंगाच्या अर्ध्याअधिक रानाला मिळालेला अर्धचंद्र, गावातील फिरतीच्या रस्त्यांची वरचेवर होणारी झाडलोट, बारक्यासारक्या बोळांची सुध्दा झालेली दुरूस्ती, मुख्य मुख्य सडकांची काळजीपूर्वक व शास्त्रीय डागडुजी, विशेषत: नालबंदाच्या डबीपासून कोटाखालपर्यंत आणि चावडीपासून दर्ग्यापर्यंत रस्त्यांची झालेली भरीव चढण, प्लेगच्या काळात घरे सारविण्यासाठी फुकट देऊ केलेली लस अशा कितीतरी गोष्टी आरोग्य मंडळाची कमाई म्हणता येईल.''

आरोग्य मंडळाच्या या कार्याला तत्कालीन नगराध्यक्ष शंकरराव राजाराम ढवळीकर, मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन सीताराम गोपाळ पाटील, नगरसेवक पांडुरंग गणेश भाटे, कार्याधिकारी भिडे यांचे सहकार्य लाभले. मोठ्या काळजीने अंथरूणाएवढे पाय पसरून खुटखुटीत काम केल्यामुळे गावातील रस्त्यांना १९२६ सालातील व्यावहारिक तरी स्वरूप ज्यांच्यामुळे आले त्या नगरपरिषदेच्या लक्ष्मणराव घोरपडे मेस्त्रींचादेखील या अहवालात आवर्जून उल्लेख केला आहे.

आरोग्य मंडळाच्या पाहणीत प्रामुख्याने गटारे, सांडपाणी, शौचकूप, पडिक जागा यांच्या तपासण्या केल्या गेल्या. त्यातून फायर प्लग,

व्हॉल्व, एअरटाक्या, कंदिल, पडावयास लागलेल्या चांद्या, बाजारातील नासका माल, कुंभारतळ्यात टाकलेला मैला, मंडईतील उसाच्या रसाच्या दुकानाची मांडणी, वाळवंटातील खळग्यापासून त्रास, सार्वजनिक चाव्यांसाठी दगडी स्टँड इ. बाबींचा नगरपरिषदेकडे अहवाल पाठवून कामे करवून घेण्यास आरोग्य मंडळाला यश आले. फरशीच्या मोरीस पाण्याच्या साठवणीसाठी फळ्या बसविण्याचे कामही मंडळाच्या पाठपुराव्यामुळे झाले. मात्र गावात येणाऱ्या दुधातील भेसळ, सार्वजनिक पायखान्यांची व्यवस्था, विजापूर रस्त्यावरील निवडुंगाची सप्पा खच्ची, नदीच्या पाणवठ्यावर गुरांच्या पाणी पिण्याची धुण्याची सोयीवार विभागणी, गावात दवाखान्याची सोय, पडिक जागांना कुंपणे इ. गोष्टी आवश्यक असूनही अंमलात आल्या नाहीत असेही या अहवालात नमूद केले आहे.

य. रा. गुप्ते यांच्या 'कऱ्हाड' पुस्तकात '१९२७ मध्ये कऱ्हाडात १ सरकारी डॉक्टर, ५ आयुर्वेदिक वैद्य आणि ७ इंग्रजी (ॲलोपथी) डॉक्टर होते. असा उल्लेख आहे. यापैकी कासेगावकर, घळसासी, दिवेकर, वामनराव नवाथे आणि उमराणी हे आयुर्वेदिक वैद्य होते. पांडुरंग रामचंद्र ऊर्फ बळवंत (काका) कासेगावकर (१८८३-१९६५) हे शुध्द आयुर्वेदाचे अधिकारी होते. कऱ्हाडात महाराष्ट्र प्रांतिक आयुर्वेदिक वैद्यांची व हकिमांची परिषद १९३८ मध्ये भरविण्यात त्यांचा पुढाकार होता. केशव गोविंद दिवेकर (१८९५-१९७६) यांनी १९२५ पासून सुमारे पन्नास वर्षे वैद्यकीय व्यवसाय तर केलाच पण कऱ्हाडच्या सार्वजनिक कार्यात रस घेतला. यशवंतराव चव्हाण यांच्या 'कृष्णाकाठ' मध्ये चावडी चौकातील शिराळकर वाड्यासमोरील दिवेकर वैद्यांचा दवाखाना ही सार्वजनिक कार्यकर्त्यांची बैठक असल्याचा निर्देश आहे.

ओगले कारखान्याचे संस्थापकांचे वडील प्रभाकर बाळाजी ओगले (१८५३-१९३५) व्यवसायाने शिक्षक म्हणून निवृत्त झाले. तरी परांडेकर वैद्यांकडून मार्गदर्शन घेऊन ते औषधोपचारही करीत. त्यांचा 'चिकित्सा प्रभाकर' हा ग्रंथ प्रसिध्द आहे. शामाचार्य नानाचार्य घळसासी हे १९२६-३१ या काळात नगरसेवकही होते. शामाचार्यांचे चिरंजीव अनंताचार्य घळसासी

आणि कासेगावकर काकांचे चिरंजीव लक्ष्मणराव कासेगावकर यांनी वडिलांच्या वैद्यकीय व्यवसायाची परंपरा समर्थपणे चालविली. अनंताचार्य १९५० नंतर व्यवसायासाठी मुंबईत गेले. लक्ष्मणराव स्वातंत्र्यसैनिक होते. भूमिगत चळवळीच्या काळापासून ते धन्वंतरी नावाने ओळखले जात. पुढील काळात पूर्वीच्या पठडीतील वैद्य मंडळींत जनार्दन नरसिंह टोणपे, बाळासाहेब करमळकर, रेमणे, गजानन केशव पंडित यांची नोंद घ्यावी लागेल. पंडितांना पुण्याचा आयुर्वेद संशोधन संस्थेचा वैद्य खडीवाले पुरस्कार प्राप्त झाला होता. त्यांनी 'आयुर्वेद निदान चिकित्सानुभव' हे पुस्तक लिहिले आहे.

कऱ्हाडात पहिले एम.बी.बी.एस. डॉक्टर आले ते कुरूंदवाडचे गो. ना. दातार. १९२६ साली त्यांनी कऱ्हाडात दवाखाना सुरू केला. पुढे ते युध्दकाळात लष्करी सेवेत गेले. त्यांच्याबरोबर पुढे उद्योगपती झालेल्या रावसाहेब गोगटे यांचे वडील कऱ्हाडात १९३३ पर्यंत व्यवसाय करीत होते. डॉ. टी. व्ही. देशपांडे हे १९४१ पर्यंत सरकारी नोकरीत आफ्रिकेत होते. त्याशिवाय डॉ. शामराव वाचासुंदर, डॉ. श्री. य. ऊर्फ बापूराव देशपांडे, डॉ. ना. पां. कोल्हापुरे, डॉ. जे. आर. गुणे ही त्या काळी एल.सी.पी.एस. झालेली मंडळी कार्यरत होती. त्यानंतर १९३५ च्या सुमारास डॉ. व्ही. जी. देशपांडे आणि डॉ. जी. के. कुलकर्णी (नेर्लेकर), १९४० मध्ये डॉ. वाय. जी. खांडेकर, मंगेशराव कंटक, कऱ्हाडचे पहिले डेंटिस्ट डॉ. डी. जी. देशपांडे डॉ. वा. रा. जोशी (गारवडेकर), डॉ. एस. एम. कुलकर्णी, डॉ. द. वि. पेंढारकर, १९४६च्या दरम्यान डॉ. अलेक्झांडर, डॉ. अ. ल. वाळिंबे, डॉ. व्ही. आर. पाटील, १९५३ मध्ये डॉ. जी. एस. दातार आणि १९६१ मध्ये डॉ. द. शि. एरम, डॉ. ध. बा. हावले, डॉ. सौ. कमल हावले यांनी कऱ्हाडात येऊन आपल्या वैद्यकीय व्यवसायास आरंभ केला.

१९५५ च्या सुमारास कऱ्हाड शहरातील डॉक्टर मंडळींनी एकत्र येऊन इंडियन मेडिकल असोसिएशनची स्थापना केली. १९६८ साली एकूण १८ ते २० वैद्यकीय व्यावसायिकांची नोंद आढळते.

डॉ. एस. एम. कुलकर्णी यांनी १९४३-४४ च्या दरम्यान कऱ्हाडात आपले गुरू डॉ. रामकृष्ण हरी भडकमकर यांच्या नावाने धर्मार्थ रूग्णालय सुरू केले. १९६४ मध्ये डॉ. व्ही. जी. देशपांडे यांनी पुढाकार घेऊन

सहकारी तत्त्वावर नर्सिंग होम सुरू केले. स्थानिक डॉक्टरांना आपल्या रुग्णांना ठेवण्याची सोय झाली. त्याचप्रमाणे मिरज, पुण्याचे विशेषज्ञ डॉक्टर्स अभ्यागत डॉक्टर म्हणून ठराविक दिवशी तेथे येण्यास सुरूवात झाल्याने स्थानिक रूग्णांचीही सोय झाली. या हॉस्पिटलमधील बालरूग्णांचा विशेष अतिदक्षता विभाग आता चैतन्य बालरूग्णालय व वैद्यकीय संशोधन केंद्र या नावाने नवीन स्वतंत्र व सुसज्ज वास्तूत अत्याधुनिक सुविधांसह सुरू होत आहे, डॉ. अरविंद वाळिंबे, डॉ. गिरीश जोग, डॉ. अनिल लाहोटी, डॉ. राजीव बहुलेकर, डॉ. राजेश गरगटे, डॉ. चंद्रशेखर औंधकर, डॉ. शशी रानडे, डॉ. क्षमा जाधव, डॉ. भरत मोरे, डॉ. सुनील लावंड, डॉ. किरण गरूड, डॉ. दिलीप मोहोळकर, डॉ. सुलभा ब्रह्मनाळकर या बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांनी हे रुग्णालय उभे केले आहे.

शासनाने १९५८-५९ च्या दरम्यान कऱ्हाड परिसरात इंदोली, मसूर, वडगाव, उंडाळे, मल्हारपेठ अशा पाच ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू केली. ग्रामीण भागासाठी या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे त्यापुढील इलाजासाठी किंवा सोयींसाठी कऱ्हाड शहरासाठी व तालुक्यासाठी कुटीर रूग्णालय सुरू करण्याचे शासनाने ठरविले. शहराच्या पूर्वेस खेळाच्या मैदानासाठी राखून ठेवलेली ८ एकर २२ गुंठे जागा यासाठी देण्यात आली. कराड नगरपरिषदेनेही आपला दवाखाना या रूग्णालयात विलीन करून वार्षिक अनुदानाची तरतूद केली.

१ फेब्रुवारी १९६१ रोजी सुरू झालेल्या कुटीर रूग्णालयात सुरुवातीस १० पुरूष, १० स्त्री व ५ प्रसूति व्यवस्थेसाठी अशा २५ खाटांची सोय होती. द्वितीय श्रेणीचा एक आरोग्य अधिकारी आणि एक महिला आरोग्य अधिकारी यांची नेमणूक झाली. १९६७ मध्ये डॉ. चिंचणकर या एम. एस. सर्जनची कुटीर रूग्णालयात नेमणूक झाली. त्यांनी तेथे शस्त्रक्रियेच्या सोयी, लॅबोरेटरी, एक्स-रे, भूलतज्ज्ञ, रक्तपेढी सेवा या सर्व बाबी उपलब्ध करून देण्यासाठी खटपट केली. १९६७ मध्ये कोयनेस झालेल्या भूकंपाच्या नैसर्गिक आपत्तीवेळी पाचशे-सातशे रुग्णांवर प्राथमिक उपचार येथे करण्यात आले. डॉ. चिंचणकरांनंतर डॉ. ताटे इ. तज्ज्ञ मंडळी कुटीर रुग्णालयात शासकीय सेवेमुळे आली व

पुढे त्यांनी कऱ्हाडातच आपले खाजगी व्यवसाय सुरू केले. नागरिकांच्या आरोग्यविषयक वाढत्या समस्या सोडविण्यासाठी एक्स-रे, सोनाग्राफी इ. साधने आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात कुटीर रुग्णालयाचे रूपांतर २०००मध्ये करण्यात आले असून या उपजिल्हा रुग्णालयाचे नामकरण 'सौ. वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालय' असे करण्यात आले आहे.

१९७०-७२ पासून शहरातील वैद्यकीय गरजा वाढत चालल्या आणि तज्ज्ञ व्यावसायिकही कऱ्हाडात व्यवसायासाठी येऊ लागले. त्यामध्ये डॉ. पुराणिक, डॉ. अशोक गुजर, डॉ. मोहन कंटक, डॉ. वाळिंबे, डॉ. बहुलेकर, डॉ. गरगटे, डॉ. चितळे, डॉ. फाटक इ. प्रातिनिधिक नावे घेता येतील. डॉ. सुभाष एरम, डॉ. जयंत दातार ही नवीन पिढीही नवीन ज्ञानतंत्रासह रूग्णसेवेस उपलब्ध झाली. डॉ. सुभाष एरम यांनी शारदा क्लिनिकमध्ये १९७८ पासून आपल्या वैद्यकीय सेवेस आरंभ केला. टोकियो वैद्यकीय विद्यापीठाच्या इन्फर्मेशन लॅप्रोस्कोपिक सर्जरी या विषयावरील जपानी ग्रंथाचे त्यांनी इंग्रजीमध्ये भाषांतर केले. १९९६ पासून फ्युजिनॉन जपान येथे ते मेडिकल कन्सल्टंट म्हणून कार्यरत आहेत. वंध्यत्वावर आधुनिक तंत्रज्ञानाने उपचार करण्याची सोय डॉ. सुहास देशपांडे व डॉ. सौ. प्रिया देशपांडे यांच्या एकोपा रुग्णालयात, तसेच डॉ. सुप्रिया पुराणिक व डॉ. कमलेश शहा यांच्या अंकुर फर्टिलिटी क्लिनिक मध्ये उपलब्ध आहे. कर्करोगावर वेदनाशमन व परिहारसेवा डॉ. रानडे यांच्या रुग्णालयात मिळू शकते. आयुर्वेदिकचिकित्सा व उपचारांकरीता वैद्य वाचासुंदर, श्रीपाद कुलकर्णी यांचे नाव घेतले जाते.

ग्रामीण भागातील रूग्ण अद्ययावत वैद्यकीय सेवेपासून वंचित राहू नयेत म्हणून कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून जयवंतराव भोसले यांनी १९८२ मध्ये कृष्णा रूग्णालय सुरू केले. वैद्यकीय शास्त्राच्या विविध शाखांतील व्यावसायिक अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर्स, अत्याधुनिक तांत्रिक उपचार साधने, तत्पर सेवा आणि स्वच्छता यामुळे कृष्णा रुग्णालयाचे नाव अल्पावधीतच झाले. कृष्णा रुग्णालयाची स्थापना हा कऱ्हाडच्या वैद्यकीय सेवेच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे. या रुग्णालयामुळे

आणि त्याला जोडून सुरू झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयामुळे कितीतरी अनुभवी व विविध शाखातील विशेषज्ञ डॉक्टरांचा लाभ कऱ्हाड शहराला झाला. वैयक्तिक भागीदारीत किंवा विश्वस्त स्वरूपात वेगवेगळ्या सोयी–सुविधा पुरविणारी रूग्णालयेही कऱ्हाडात उभी राहू लागली.

डॉ. ए. जी. चितळे, डॉ. अविनाश गरगटे, डॉ. अजय ब्रह्मनाळकर, डॉ. प्रकाश सप्रे, डॉ. पी. जी. पाठक, डॉ. क्षीरसागर, डॉ. एस. पी. जोशी यांनी 'श्री इन्टेसिव्ह रूग्णालय' १९९५ मध्ये सुरू केले. येथेही परगावचे तज्ञ डॉक्टर्स ठराविक दिवशी येतात. तसेच पुण्याच्या रुबी रूग्णालयाच्या सहकार्याने 'श्री' हॉस्पिटलमध्ये सिटी स्कॅनची सोय झाली आहे. आता डॉ. अविनाश पाटील, डॉ . संजय पवार, डॉ. दिलीप पाटील, डॉ. देवधर, डॉ. सौ. ममता काळे यांचे सिद्धिविनायक, डॉ. परेश पाटील (वाठारकार ) यांचे सिटी, ही खाजगी हॉस्पिटल्स सुरू झाली आहेत.

लायन्स क्लब कऱ्हाडच्या सामाजिक कार्यांतर्गत उपक्रम म्हणून ' शेठ रामविलास लाहोटी नेत्र रूग्णालय' डॉ. अनिल लाहोटी, डॉ. प्रीतम देशपांडे, डॉ. धनंजय चव्हाण, डॉ. राजगुरू यांच्या पुढाकाराने उभे राहिले आहे.

कऱ्हाडातील वैद्यकीय व्यावसायिकांच्या सहकार्याने रोटरी क्लब, लायन्स क्लब इ. स्वयंसेवी संघटनांनी अस्थिअपंग, नेत्रशस्त्रक्रिया, नाक–कान–घसा, सर्वोपचार इ. शिबिरे, पोलिओ, ट्रिपल लसीकरणाच्या सुविधा, रूग्णवाहिका, रक्तपेढी या उपक्रमाबरोबरच नागरिकांना अल्प मोबदल्यात रूग्णोपयोगी साहित्य पुरविण्यासाठी कराड नगरपरिषदेच्या दवाखान्यातील आणि कराड अर्बन को–ऑप. बँकेने पांडुअण्णा शिराळकर यांच्या देणगीतून उभा केलेला रुग्णोपयोगी वस्तुसंग्रह, डॉ. प्रकाश व डॉ. सौ. शीतल कुलकर्णी यांच्या कुलकर्णी चॅरिटेबल ट्रस्ट ची कामगारांसाठी एड्स जागृती मोहीम या सामाजिक बांधिलकीतून केलेल्या प्रयोगांची नोंद घेतली पाहिजे.

एका पाहणीत कऱ्हाडात एडस् बाधित रुग्णांची संख्या तुलनेने सर्वांत अधिक असल्याचे आढळते. डॉ. धनंजय चव्हाण यांनीही एडस जनजागरणाचे

काम केले आहे. प्रा.डॉ. माणिक माने यांनी 'एडस समस्या व सामाजिक जाणीव' या विषयावर संशोधन केले असून सक्ती व कायद्याच्या बडग्यापेक्षा सामाजिक नियंत्रण एडस रोखण्यास प्रभावी होत. जून १९६२ मध्ये महाराष्ट्र राज्य क्षयरोग निरोधक संघटनेची कऱ्हाड शाखा सुरू झाली.

मूळ कऱ्हाडचे पण व्यवसायपरत्वे अन्यत्र गेलेल्या डॉ. ए. एम. (बाळासाहेब) देशपांडे कोळेवाडीकर (भूलतज्ज्ञ), डॉ. हणमंत वरूडकर ( छाती विकार, दमा तज्ज्ञ), डॉ. अशोक दातार (इएनटी), डॉ. माधव गोगटे (इएनटी), डॉ. उदय पाठक, डॉ. शरद चिरमुले, डॉ. उमा दीक्षित (दंत तज्ज्ञ), डॉ. मोहिरे (मेंदू तज्ज्ञ), डॉ. अमीर खोजा (चेस्टमेडिसीन) तसेच परदेशस्थ झालेले डॉ. सदाशिव माधव किरपेकर, डॉ. प्रसाद श्रीकृष्ण कुलकर्णी (नेत्रतज्ज्ञ) इ. नी आपल्या ज्ञानकौशल्यामुळे वैद्यकीय व्यवसायक्षेत्रात नाव मिळविले आहे याचा अभिमान वाटतो. नारायण कृष्ण घळसासी यांनी पुणे येथे आयुर्वेदिक वैद्य म्हणून व्यवसाय केला व त्यांना 'गुणे वनौषधी पुरस्कार' मिळाला. कऱ्हाडातील मूळचे चित्रकला शिक्षक, फोटोग्राफर व नंतर डॉक्टर झालेले गणेश विनायक फडके यांनी इंजेक्शन न देता मालीश करून दातामागील नसा बधीर करून वेदनेवाचून दात काढण्याचा उपक्रम केला होता. (सकाळ, पुणे ३-३-१९५५)

वेश्या ही सामाजिक गरज आहे पण त्यांना कायमच तिरस्काराचे जीवन जगावे लागते. अशा वेश्यांच्या मुलांसाठी पुणे येथे घर (नीहार) उभारणाऱ्या (मूळ कऱ्हाडच्या) विजया लवाटे यांचे १९७९ पासून झालेले कार्य प्रशंसनीय आहे.

कऱ्हाडात सध्या सुमारे १३५ खाजगी दवाखाने असून कऱ्हाडच्या रुग्णालयातून सुमारे ९४० खाटांची सोय आहे. वैद्यकीय व्यवसाय करणारांमध्ये ५० जनरल प्रॅक्टिशनर्स, १६ फिजिशियन्स, ३० जनरल सर्जन्स, २६ स्त्रीरोगतज्ज्ञ, १५ बालरोगतज्ज्ञ, ११ नाक-कान-घसा तज्ज्ञ , ९ अस्थिरोगतज्ज्ञ, १३ नेत्रतज्ज्ञ, १९ दंतवैद्य, ४ त्वचारोगतज्ज्ञ, २ छातीरोगतज्ज्ञ, १ हृद्रोग विशेष शल्य चिकित्सक, १४ भूलतज्ज्ञ, ३ मनोविकारतज्ज्ञ, याशिवाय ३ आयुर्वेदिक विशेषतज्ज्ञ, ६१ आयुर्वेदिक डॉक्टर्स. ३ आयुर्वेदिक स्त्रीरोग तज्ज्ञ, तसेच

५० होमिओपथिक डॉक्टर्स अशी वर्गवारी सांगता येईल. दर्जेदार उपचार सुविधा, अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर, वेगवेगळ्या शाखांतील कुशल व अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता यामुळे कऱ्हाड हे दक्षिण महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे वैद्यकीय केंद्र बनले आहे.

*****

८

# कायदा व सुव्यवस्था

ब्रिटिश राजवट येण्यापूर्वीच्या काळात महाराष्ट्रात व्यवहारनिर्णय देण्यासाठी गोतसभा किंवा जात पंचायत, देशक (देशमुख-देशपांडे इ. वतनदार), राजमुद्रा धारण करणारा न्यायाधीश आणि अखेरचा टप्पा म्हणजे राजा अशी व्यवस्था होती. धार्मिक बाबतीतील निर्णयासाठी कऱ्हाड, वाई, माहुली, नाशिक, पैठण, करवीर इ. क्षेत्रांतील स्मृतिशास्त्रनिपुण ब्राम्हणांकडून निर्णय घेतला जाई. आचारधर्मातील विधिनिषेध आज्ञांचे उल्लंघन केल्याबद्दल कोणते प्रायश्चित घ्यावे याचाही निर्णय या क्षेत्रांतील धर्मपरिषद (धर्मसंसद) या सभा करत. संकेश्वर मठाचा व कऱ्हाडातील गिजरे घराण्याचा पत्रव्यवहार 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' (खंड २१-२३ सं.वि.का.राजवाडे) या ग्रंथात आहे. सक्तीने धर्मांतर झाले असल्यास प्रायश्चित घेऊन स्वधर्मात येता येते. बलात्कार झाला आहे अशा समजुतीने वाळीत टाकलेल्या स्त्रीला तिने 'दिव्य' करून निर्दोषत्व सिध्द केल्यास शुध्दिपत्र देता येईल असे निवाडे कऱ्हाडच्या धर्माधिकाऱ्यांनी दिले आहेत. रघुनाथ पंडितराव, संभाजीराजे आंग्रे सरखेल (१७३४), श्रीनिवास परशुराम प्रतिनिधी (१७४५), शंकराचार्य अभिनव विद्याशंकर भारती (१७८६) यांनी कऱ्हाड क्षेत्राकडे पाठविलेली प्रकरणे व त्यांचे निर्णय उपलब्ध आहेत. 'विधवाविवाह सशास्त्र की अशास्त्र' याबद्दल संकेश्वर स्वामी शंकराचार्य यांच्यापुढे १८६८ मध्ये वाद झाला, त्यात नारायणाचार्य गजेंद्रगडकर विधवाविवाह अशास्त्र मानणारे, त्यांना अनेक ग्रंथांचा आधार अभ्यासचिकित्सापूर्वक पुरविला तो कऱ्हाडच्या विठोबा अण्णा दप्तरदारांनी. या वादात सरपंच होते कऱ्हाडकर, महामहोमध्याय गोपाळाचार्य

अण्णा घळसासी. १८८४ मध्ये मद्रासला झालेल्या याच विषयावरील वादातही तेच सरपंच होते. व्यवहारनिर्णय किंवा धर्मनिर्णय याखेरील व्यापाऱ्या-व्यापाऱ्यातील वादांचे निर्णय शेटे-महाजनांच्या सभेत होत. अगदी मुसलमानी राजवटीत कऱ्हाडजवळच्या मसूरच्या जगदाळे यांच्यात आणि बापाजी नावाच्या मुसलमान गृहस्थात वाद होऊन जगदाळे यांनी परगण्याच्या दिवाणाकडे फिर्याद केली तेव्हा त्यांनी पैठणच्या विद्‍वान ब्राम्हणांकडून निर्णय करवून घेतला होता. (इ.स. १६०४).

'सध्याच्या तहसीलदार कचेरीजवळ काळा चबुतरा होता. खालील बाजूस कळंबाचे झाड होते, तेथे आदिलशाहीत न्याय होत असे', अशी 'कऱ्हाड' (लेखक य.रा.गुप्ते १९२९ पृ.१९) मध्ये नोंद आहे.

ब्रिटिश राजवटीच्या आगमनानंतरही सातारा जिल्ह्यात छत्रपती भोसल्यांचे राज्य होते. अप्पासाहेब छत्रपतींनी (१८३९-१८४८) कर्नल ओव्हन्स यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायपध्दती ठरवून दिली होती. किरकोळ खटले महसूलअधिकाऱ्यांकडे सोपविले जात. अधिक महत्त्वाची प्रकरणे सोडविण्यासाठी 'अमीन आणि न्यायाधीशांची' नेमणूक केलेली असे. त्यांच्या निर्णयावर राजाकडे अपील करण्याची तरतूद होती. कऱ्हाड आणि वाळवे या तालुक्यांसाठी 'अमीन' न्यायालय रू.३०० व त्यावरील वादांसाठी कऱ्हाडात होते. रू.२५ ते ३०० व त्यावरील वादांसाठी कऱ्हाड तालुक्यातील खटले कऱ्हाडच्या 'न्यायाधीशा' पुढे चालत. रू. २५ पर्यंतचे दावे कऱ्हाडच्या मामलेदारापुढे जात. १८४८ मध्ये कऱ्हाड, तारगाव आणि वाळवे या त्या वेळच्या तालुक्यांसाठी रू. १०,००० पेक्षा कमी रकमांच्या दाव्यांसाठी कऱ्हाडात सदर अमीन असत. त्यांचा पगार द.म. रू. ३५० होता.

इ.स. १८७० मध्ये कऱ्हाडात सबजज्ज नेमण्यात आले. त्यावेळी सध्याच्या तहसीलदार कचेरीतील एका लहानशा खोलीत व शेजारच्या इमारतीत न्यायालयाचे कामकाज चालत असे. कामकाजात वाढ होऊ लागल्यामुळे नंतर मुख्य पोस्ट ऑफिससमोर न्यायालयासाठी भव्य व उंच इमारत बांधण्यात आली. या इमारतीत न्यायाधीशांसाठी कापडी पडद्यांसारखे पंखे टांगलेले असत. ते दोरीने ओढून वारा घालण्यासाटी एक माणूस

बसवत. १५ ऑगस्ट १९५४ रोजी या इमारतीत वीजेची जोडणी झाली. आता दिसते ती आर.सी.सी इमारत १९७० च्या दरम्यान बांधण्यात आली.

ब्रिटिश राजवट सुरू झाली त्या प्रारंभीच्या काळात शहरातील विशेष महत्त्वाच्या विश्वासार्ह व्यक्तींकडे विशिष्ट रकमेपर्यंत दंड करण्याचे, खटले चालविण्याचे अधिकार असत. त्यांना गावमुन्सफ म्हणत. रामचंद्र विष्णू ऊर्फ भाऊसाहेब भागवत, आण्णाप्पा नारायण कल्याणी हे गावमुन्सफ होते. जुन्या पिढीतील वकील मंडळी पुणेरी पगडी, लांब काळा कोट, धोतर, पुणेरी जोडे अशा पेहरावात न्यायालायात जात.

महसुली न्यायव्यवस्थेत तहसीलदार (मामलेदार) पूर्वीपासून कार्यरत होते. अलीकडे उपविभागीय अधिकारी (प्रांत) यांचे स्वतंत्र कार्यालयही कऱ्हाडात झाले आहे. कुळकायदा, शेतीकर्जमुक्ती कायदा याखालील खटले महसुली अधिकाऱ्यांपुढे चालतात. अलीकडे असे खटले बरेचसे संपुष्टात आले आहेत.

कऱ्हाडात सुरु वातीस दिवाणी न्यायाधीश कनिष्ट स्तर तथा न्यायदंडाधिकारी वर्ग १ असे न्यायालय होते. प्रारंभी एखादे न्यायाधीश असत व कामाच्या प्रमाणात अधिक न्यायाधीश नेमले जात. काही वेळा कऱ्हाडच्या न्यायाधीशांकडे जवळच्या पाटण तालुक्यातील कामाचाही अतिरिक्त कार्यभार असे.

कऱ्हाडात २००० मध्ये सातारा जिल्हा न्यायालयाचे उपदालन असणारे अतिरिक्त जिल्हा न्यायालय मार्केट यार्ड परिसरातील नगरपरिषदेच्या ट्रान्सपोर्ट सेंटरच्या जागेत सुरू झाले आहे. १९९० पासून कऱ्हाडच्या वकील मंडळींनी त्यासाठी प्रयत्न केला होता. आता कऱ्हाड-पाटण तालुक्यातील लोकांना अपिलाच्या कामासाठी साताऱ्यास जावे लागत नाही. सध्या कऱ्हाडात जिल्हा न्यायालय व इतर ४ न्यायालये, तालुका स्तरावरील न्यायालये यांत एकूण आठ ते नऊ न्यायाधीश कार्यरत आहेत. याशिवाय तालुका गट विकास अधिकारी व अन्य अधिकारी, विधिज्ञ, सामाजिक सेवा संस्था यांच्या सहकार्याने दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या अध्यक्षतेखाली मोफत विधिसेवा केंद्र कार्यरत असून वेळोवेळी लोकअदालती भरविल्या जातात. न्याय संकल्पना जाणीव जागृतीसाठी शिबिरे, कार्यशाळा यांचे आयोजन

केले जाते. न्यायालयातील कामकाजातही संगणकादी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे. २००७ मध्ये कऱ्हाडात दुसरे अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय सुरू झाले आहे.

न्यायव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग म्हणजे विधिज्ञ व्यावसायिक. कऱ्हाड व लगतच्या पाटण, विटा व इस्लामपूर या तालुक्यातील वकिलांनी कऱ्हाडात उत्तम व्यवसाय करून लौकिक संपादन केला आहे. अगदी प्रारंभीच्या काळात कऱ्हाडात हाताच्या बोटावर मोजण्याएवढे वकील असतील. मुंबई हायकोर्टाची स्थापना झाल्यानंतर डिस्ट्रिक्ट प्लीडर किंवा हायकोर्ट प्लीडर ही परीक्षा देऊन मॅट्रिक झालेल्या व्यक्ती वकिली करीत. आता सर्व वकील एखाद्या विद्याशाखेचे पदवीधर आणि कायद्याचे पदवीधर तरी असतातच. मधल्या काळात वकिलांची संख्या घटली होती. कऱ्हाड न्यायालयात कऱ्हाडचेच वकील दोनशे- सव्वा दोनशे असतील.

कऱ्हाडातील वकिलांची संघटना (बार असोसिएशन) १९३० साली स्थापन झाली. ही संघटना जोमाने कार्यरत असून न्यायशाखांपैकी सहकार न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, कामगार न्यायालय इ. न्यायालये कऱ्हाडमध्ये सुरू व्हावीत असा प्रयत्न सध्याचे बार असोसिएशन करीत आहे. पाटण तालुका वकील संघटनेचेही मौलिक सहकार्य कऱ्हाड वकिल संघटनेस आहे. कऱ्हाड वकील संघटनेने व्यवसायास उपयुक्त असे स्वतंत्र ग्रंथालय उभे केले आहे.

कऱ्हाड न्यायालयात वकिली करणारांमधून वसंतराव न्हावकर, अनंतराव शिराळकर, बी.जी.मोरे, जयप्रकाश पाटील, घाटे, डी.के.मुल्ला, राजश्री पंढरपुरे, हारूण मुल्ला, संजय यादव, इ. न्यायाधीश झाले. सदानंद चिंगळे यांनीही दोन अडीच वर्षे न्यायाधीश म्हणून सेवा केली व पुन्हा कऱ्हाडात दिवाणी कामातील अग्रणी म्हणून व्यवसाय करीत आहेत, त्यांची पुन्हा जिल्हा न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली होती, पण व्यवसायाच्या प्रेमामुळे ते नोकरीवर गेले नाहीत. ॲड. धुमाळ हेही दिवाणी न्यायाधीशपदावरून राजिनामा देऊन पुन्हा व्यावसायिक झाले आहेत. शालिनी फणसळकर - जोशी या सध्या पुणे येथील कौटुंबिक न्यायालयात जिल्हा न्यायाधीशपदावर

आहेत. महाराष्ट्र शासनातर्फे इंग्लडमधील कायदापरिषदेत त्यांनी प्रतिनिधित्व केले आहे. बाल गुन्हेगारी कायद्याच्या विशेष संशोधनात्मक अभ्यासाने त्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. महाराष्ट्रभर गाजलेल्या कोठेवाडी सामूहिक बलात्कार खटल्याचा निकाल त्यांनी दिला होता. संभाजीराव मोहिते, प्रकाशराव चव्हाण, सदानंद चिंगळे, आत्माराम वाय्. पाटील, उषा भेदा, राजेंद्र शहा, विजय ए पाटील, अशोक मोहिते हे सध्या कऱ्हाडात नोटरी म्हणून कार्यरत आहेत. सौ. उषा भेदा पंचायत समितीच्या समुपदेशन केंद्रात शहर पोलीस ठाण्याच्या महिला दक्षता समितीवर असून हिंदू विवाह कायद्यातील प्रलंबित तक्रारी, परित्यक्त महिलांचे प्रश्न समुपदेशन मार्गाने सोडविण्याचा त्या प्रयत्न करतात. १९०८ साली वास्तव्यासाठी आलेले सदाशिव खंडो ऊर्फ आप्पासाहेब अळतेकर हे कऱ्हाडातील पहिले बी. ए. एल. एल. बी. वकील. कऱ्हाडच्या वकील मंडळीत शंकरराव ढवळीकर, गणपतराव आळतेकर, पांडुतात्या भाटे, वामनराव फडके, बाबुराव गोगटे, विनायकराव फणसळकर, बापूसाहेब वाघमारे, जोगळेकर, कुर्लेकर, तावरे, राघुअण्णा धोपाटे, आवळीकर या जुन्या पिढीतील ठळक वकिलांच्या उल्लेख करता येईल. अनंतराव शिराळकर, अच्युतराव फडके, एन.के. चिंगळे, आनंदराव चव्हाण, आर.एम. पाटील, बाबासाहेब चौगुले, नानासाहेब बुधकर, केशवराव पवार, टी.डी. यादव, डी.पी. यादव, डी.बी.चव्हाण, टी.व्ही.घाटे, डी.एम.पाटील एम.ए.आवटे, डी.डी. जाधव असे नंतरच्या काळातील वकील त्यांच्या खास शैलीमुळे विशेष उल्लेखनीय आहेत. बदलत्या काळानुसार अलीकडे न्यायशाखेच्या वेगवेगळ्या स्वतंत्र शाखांचे काम करणारे वकील आहेत. त्यांच्यामध्ये आर.के.पवार, एम.ए.पाटील, ए.ए.मुल्ला, ए.टी.घाटे, सदानंद चिंगळे, व्ही.के. पाटील, एस.आर.निकम, सी.बी.कदम,, डी.बी.जाधव, डी.एस.पाटील, असे ज्येष्ठ व त्यांच्यासमवेत बहुलेकर, विजय पाटील, प्रकाश चव्हाण, यु.एस. पाटील, कळसे, मोहन यादव, एम.बी.जगताप, ढेरे, के.बी.लोहाना, आय.एस.शेख, इ. वकील आपल्या खुमासदार शैलीने वकिली व्यवसाय करत आहेत. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात स्वत: स्वातंत्र्यसैनिक असलेल्या अनंतराव शिराळकर

यांनी तसेच रा. स. ढवळे यांनी स्वातंत्र्यसैनिकांचे खटले विनामोबदला चालविले होते.

कऱ्हाडातील वकील मंडळींचा भारतीय स्वातंत्र्याच्या त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्र, गोवा विमोचन अशा आंदोलनात मौलिक सहभाग होताच, विधानसभांत आणि लोकसभांतही कराडातील वकील निवडून गेले होते. कऱ्हाडच्या नगरपरिषदेच्या कारभारात तसेच कराडच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांत, संस्थांच्या संस्थांपनांत, संवर्धनात आणि संचालनात कराडची वकील मंडळी अग्रगण्य होती आणि आहेत. (संबधित प्रकरणातून त्यांचा नामनिर्देश असल्यामुळे येथे पुनरुक्ती टाळली आहे.)

वि. स. पागे, व्यंकटराव पवार , यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, दादासाहेब जगताप, पी. डी. पाटील यांनी काही काळ कऱ्हाडात वकिली केली.

कऱ्हाडात आलेले दोन न्यायाधीश ए. आर. महाजन आणि बी. जे. चोरपगार यांच्यावर भ्रष्टाचार, गैरव्यवहार व अनैतिक वर्तन या संबधीचे आरोप करणारे निवेदन कराड बार असोसिएशनने मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडे १० ऑगस्ट १९९० रोजी दिले. न्या. दाभोळकर यांनी प्रकरणांची चौकशी केली. दोघेही दोषी ठरले व त्यांच्या हकालपट्टीचा आदेश निघाला (१-१-१९९३)

कऱ्हाडात १३ जुलै १९३० रोजी तत्कालीन गव्हर्नरांना काळी निशाणे दाखविली, त्याची नोंद 'राजकीय इतिहासा' च्या भागात घेतलीच आहे. त्या दिवशी झालेल्या गर्दीचा फायदा घेऊन रस्त्यांत उभारलेल्या सहा स्वागत कमानी कोणीतरी मोडल्या, कोणी रस्त्यांच्या कडेला असलेल्या नगरपरिषदेचे तेरा कंदील फोडले, मानपत्र देणाऱ्या नगरसेवकांच्या घरावर कोणी दगडफेकही केली पण त्याबद्दल आरोपी म्हणून पांडुअण्णा शिराळकर, बाबुराव गोखले, राघुअण्णा धोपाटे, गुलाब पैलवान, तुकाराम पतकी पैलवान, नरसोपंत धोपाटे, बाबुराव अष्टेकर, मोहनलाल शर्मा, रामचंद्र शर्मा, मारुतराव महाडिक, सदाशिव वैद्य, मार्तंड झारी , दादोबा कालेकर या तेरा प्रतिष्ठित व्यक्तींना इंडियन पीनल कोडच्या १४७,१४९,४२७,३८०,३४,३३७,११४, इत्यादी

कलमांखाली फिर्याद दाखल करून २१ सप्टेंबर १९३० रोजी पकडण्यात आले. कऱ्हाड कोर्टाने आरोपींना जामीनावर सोडण्याचे नाकारले तेव्हा साताऱ्यास अपील होऊन प्रत्येकी २०० रू. चा जामीन व २०० रू. चा जातमुचलका घेऊन ६ ऑक्टोबर १९३० रोजी आरोपींना सोडण्यात आले. आरोपींतर्फे विनायकराव फणसळकर, व्यंकटराव सखदेव, पांडुतात्या भाटे, साताऱ्याचे वाग्भट देशपांडे, न. गं. जोशी, दाभोळकर, दादासाहेब करंदीकर हे वकील होते. सरकारतर्फे २६ साक्षी झाल्या. दादासाहेब करंदीकरांच्या फेरतपासणीत त्या साक्षीदारांची फेफे उडाली. तेव्हा मॅजिस्टेटही म्हणाले, 'अरे निदान खरे भासेल असे तरी काही सांगा.' गांधी – आयर्विन करार झाल्यामुळे सरकारने ५ माचे १९३१ रोजी खटलाच काढून घेतला. हा खटला त्या काळी महाराष्ट्रात 'गव्हर्नरांचा खटला' म्हणून गाजला होता .

पूर्वीची कोणतीही वहिवाट नसताना कऱ्हाडातील घाटावरून मुसलमानांनी ताबुताच्या गाडयांसह मिरवणूक नेली. (१९३९). पूर्वी कधी नसे असा विशेष पोलीस बंदाबस्त त्या वर्षी ताबूताच्या मिरवणुकीसाठी प्रथमच ठेवला होता. या आक्रमणाविरूद्ध काही हिंदूधर्मीयांनी कऱ्हाडातील शेकडो हिंदूंच्या सह्यांचा एक अर्ज साताऱ्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व मुंबई प्रांताचे गव्हर्नर यांच्याकडे पाठविला. साताऱ्याच्या जिल्हा मॅजिस्ट्रेट यांनी 'घाटावरून ताबूतांची मिरवणूक गाड्यांवरून नेऊ नये' असा हुकूम दिला. त्यामुळे पुढील वर्षी घाटापर्यंत ताबूत गाड्यांतून नेले, पुढे घाटावरून नेताना ताबूत खांद्यावर घेतले. तेव्हा त्याबाबत हिंदूंनी फिरून दाद सरकारकडून मागितली असता या बाबतीत हिंदूंचा काही हक्क असला तर तो हिंदूंनी दिवाणी न्यायालयातून शाबीत करून घ्यावा असे उत्तर देण्यात आहे. त्यामुळे हिंदूंनी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला. या दाव्याचे काम कित्येक महिने कऱ्हाड येथे चालले, कऱ्हाड येथील हिंदुमहासभेचे अध्यक्ष शंकरराव जोशी, नानासाहेब बुधकर, विष्णू गणेश जोशी, लक्ष्मणराव देशपांडे, वामनराव फडके, भाऊकाका गरूड, पांडुअण्णा शिराळकर, केशवराव जोशी प्रभृती हिंदुत्वनिष्ठ पुढाऱ्यांनी या दाव्यासाटी चिकाटीने परिश्रम घेतले. अखेर न्यायाधीश सिक्वेरा यांनी हिंदूची बाजू न्यायाची आहे. कऱ्हाड येथील

कृष्णा घाट हा हिंदूंचाच आहे. मुसलमानांचा त्यावर कोणत्याच प्रकारचा संबंध नाही, मुसलमानांची वहिवाट नाही. मुसलमानांनी घाटावरून ताबूताची मिरवणूक नेऊन हिंदूंवर अकारण अन्याय केला असून त्यांनी घाटावर आक्रमण केल्याबद्दल त्यांना नाममात्र एक रुपया दंडाची शिक्षा केली. 'ताबूताचा वाद' म्हणून गाजलेल्या या खटल्यात हिंदू समाजातर्फे गणपतराव आळतेकर, केशवराव जोशी आणि मुसलमान  समाजातर्फे ताहेर अब्दुल इनामदार हे वकील होते.

आपल्या मुलाला एडस् झाल्याची माहिती मुलीच्या व तिच्या घरच्या लोकांपासून लपवून त्याचे (१९९७) मध्ये लग्न लावून फसविल्याबद्दल वैशाली संजय शिंदे या तरुणीने सासू - सासरे - दीर - नणंद यांच्याविरूद्ध २००१ मध्ये दावा करुन त्यांना शिक्षा घडविली. अशा प्रकारचा दावा राज्यातील एकमेव असावा. वैशालीलाही एडस्‌ची बाधा झाली पण तिने या दुर्धर रोगाने खचून न जाता एडस्‌बाबत जन- जागरणाचे कार्य हाती घेतले.

स्वातंत्र्यपूर्व काळात नैतिक धाकही होता आणि पोलिसांचा दराराही होता. तरीही साहसी वृत्तीच्या बेडर तरुणांनी परकीय राज्यकर्त्यांच्या जुलुमशाहीला न जुमानता पोस्टाच्या थैल्या लुटल्या, शस्त्रास्त्रांच्या चोऱ्या केल्या, रेल्वेमार्ग खिळखिळे केले, तारेची यंत्रणा विस्कळीत केली इ. पण हे तथाकथित 'गुन्हे' हा स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग होता, त्यांत व्यक्तिगत स्वार्थाचा लवलेशही नव्हता. अर्थात काही गुन्हेगारांनी याचा फायदा घेतलाच नसेल असे नाही पण तो अपवादात्मक. कऱ्हाडलगतच्या वाळवे- शिराळ्याची प्रसिद्धी एकेकाळी खून- मारामाऱ्यांसाठी होती, तिचाही परिणाम असू शकेल. स्वातंत्र्योत्तर काळात युवकांच्या साहसाला, लढावु वृत्तीला 'मैदानी मर्दानी सामना समिती' च्या माध्यमातून क्रीडांगणावर प्रकट होण्याची संधी दिली. किंवा गांधीवधोत्तर झालेल्या जाळपोळीला, सीमावादामुळे  झालेल्या भाषिक दंगलीवेळी प्रक्षुब्ध हिंसक जमावाला आवर घालण्यासाठी  लढाऊ वृत्ती रस्त्यावर उतरली, कोयनेचा भूकंप झाला, अशा वेळी आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठी ही लढाऊ  वृत्ती कारुण्याची मूर्ती होऊन अवतरली. पुण्यास कर्वे नावाच्या एका श्रीमंत विधवेचा खून एका प्रतिष्ठित  डॉक्टराने केल्याचा वास येताच त्याचा छडा लावण्यासाठी कऱ्हाडच्या डॉ. गो.ना. दातार यांनी पाठपुरावा

केला अशी ज्या कऱ्हाडच्या इतिहासात नोंद आहे. त्याच कऱ्हाडची संभावना १९८० नंतर एक अति संवेदनशील शहर म्हणून व्हावी, मटका, दारू, बनावट नोटा, पत्त्यांचे जुगारअड्डे, नोकरीचे आमिष दाखवून बेरोजगार तरुणांची फसवणूक यासारख्या अवैध व्यवसायांना ऊत यावा, रॅगिंग, वर्गप्रतिनिधींच्या निवडणुका यामुळे केवळ संबधित महाविद्यालयाच्या परिसरातच नव्हे तर संपूर्ण शहरातील वातावरण अस्वस्थ व्हावे, नगरपरिषदेच्या दारातच नगराध्यक्षांचाच खून व्हावा, गुरख्यासारख्या खाजगी पहारेकऱ्याला आपल्या जिवाला मुकावे लागावे, पत्नीचा किंवा पुतण्याचा खून करण्यात काही वाटू नये अशा गुन्ह्यांची संख्या वाढावी, गुंडांच्या टोळ्या निर्माण व्हाव्यात आणि त्यांच्या टोळीयुध्दामुळे सामान्य माणसांची झोप उडावी यासारखे दुर्दैव नाही. वाढती लोकसंख्या, शिक्षणाचा प्रसार आणि त्यामुळे वाढलेली बेरोजगारी यामुळे युवकांचा कल अवैध व्यवसांयाकढे वाढला असला तरी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना प्रतिष्ठितांचे आणि लोकप्रतिनिधींचेही संरक्षण लाभत असल्यामुळे तसेच या व्यवसायांना नि व्यसनांनाही सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होताना दिसत असल्यामुळे व्यसनाधीनता, गुंडगिरी आणि गुन्हेगारी प्रवृत्ती यांना उधाण आले. अर्थात साऱ्या देशभराचेच हे चित्र आहे, मग कऱ्हाडनेच त्याला अपवाद का असावे असेही कोणी म्हणतील. पूर्वी कऱ्हाड शहर व तालुक्यासाठी एकच पोलीस ठाणे होते. १९७६ मध्ये वेगळे शहर पोलीस ठाणे निर्माण झाले. या ठाण्यावर शहरासह लगतच्या एकवीस गावांची जबाबदारी आहे. कऱ्हाडचे विशिष्ट भौगोलिक स्थान, अरुंद व मर्यादित रस्ते, प्रतिवर्षी होणारे उत्सव समारंभ व मिरवणुका, खंडोबा, नाईकबा, यांच्या यात्रांसाठी बाहेरून येणाऱ्या भक्त भाविकांची गर्दी, सातत्याने होणारे मंत्र्यांचे दौरे, राजकीय-सामाजिक हेतूने होणारी निदर्शने, मोर्चे आणि उपोषणे यांमुळे कराव्या लागणाऱ्या बंदोबस्तांच्या मानाने सुमारे बारा अधिकारी आणि सव्वाशे कर्मचारी ही संख्या अपुरी आहे. हेही एक कारण असावे.

कायदा व न्याय यांच्या जोडीस सार्वजनिक - सामाजिक सुरक्षितता म्हणजेच गुन्हेगारी, तिचे स्वरूप आणि तदनुषंगिक पोलीसयंत्रणा, त्या यंत्रणेस सहाय्यभूत होणाऱ्या गृहरक्षक (होमगार्ड) दलासारख्या संघटना, नागरिक

पोलीस योजना  पोलीस कल्याण योजना, गुन्हेगारांच्या – कैद्यांच्या पुनर्वसनाचे उपक्रम, माधवराव जाधव बालसुधार केंद्र (रिमांड होम), आशाकिरण स्त्री संरक्षक गृह यांच्या माध्यमांतून होत असलेल्या प्रयत्नांची नोंद घेतली पाहिजे.

*****

९

# शिक्षण व संशोधन

कऱ्हाडातील शिक्षणक्षेत्राचा मागोवा घेताना इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत जावे लागते. त्या काळात कऱ्हाड परिसरात बौध्द धर्माचे प्राबल्य असावे. मगध विश्वविद्यालयाची एक शाखा आगाशिवाच्या लेण्यामध्ये असावी. कऱ्हाड शहर 'बहुभट विद्योत्कट'आहे. असा उल्लेख श्रवणबेळगोळ (कर्नाटक) येथे पाचव्या शतकामध्ये उभारलेल्या स्तंभावर आहे. पंचवीस वर्षे फलटण येथे संसार केल्यावर द्वारकेत विरक्त झालेल्या आणि एलिचपूरला कामाख्येने भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला असता देहान्त प्रायश्चित पत्करणारा तेराव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील वेदान्तविशारद चक्रपाणी राजनायक हा कऱ्हाडकर होता. मराठ्यांच्या वैभवशाली साम्राज्यात ग्वाल्हेरात शिंद्यांच्या आश्रयास असलेल्या गोपाळाचार्य अण्णा घळसासी कऱ्हाडकरांची व्याकरणशास्त्रातील उपस्थिती फार तीव्र होती. छत्रपती शाहू महाराजांच्या पदरचे अधिकारी नैय्यायिक कृष्णाचार्य यांनी वज्रकंटकशास्त्री काशीकर यांच्यावर वादात विजय मिळविला याचे स्मारकच जणू छत्रपतींनी आचार्यांना कालगाव हे गाव इनाम देऊन उभारले आहे (साहित्यिक कऱ्हाड पृ. १५). वेदान्तावरील अधिकारी पुरुष म्हणून इंदोलीकर वामन परशुराम फणसळकर यांची ख्याती होती. त्यामुळे येथे विद्वानांची मोठी परंपरा असली पाहिजे व त्यांच्या अध्ययन-अध्यापनाच्या सोयीही असल्या पाहिजेत. पण अशा सोयी सुविधांचे उल्लेख फारसे आढळत नाहीत.

१९०८-०९ च्या पूर्वीपासून सोमवार पेठेतील भैरोबा मंदिराच्या माडीवर एक वेदपाठशाळाहोती. वाईचे नीळकंठशास्त्री लेले तेथे शिकवत. सोनबा उमराणी, गणपतराव आळतेकर व त्यांचे बंधू अनंतराव, भाऊकाका गरूड

यांनी तेथे नित्यकर्माचे पाठ घेतले. दशग्रंथावरील प्रभुत्वासाठी प्रसिध्द असलेल्या दामाचार्य आरे यांची स्वत:ची एक पाठशाळा होती. चिंतामणभट साने, श्रीपादभट साने, गणेशभट (अप्पा) साने, वासुदेवशास्त्री गिजरे, शंकरदीक्षित गिजरे, दत्तंभट गिजरे, नारायण भैरव ऊर्फ नाना आराणके, लक्ष्मण दीक्षित (ऊर्फ सोनबा) उमराणी, आबा दीक्षित अटकेकर, शंभूनाना नवाथे, कृष्णंभट जोशी (आरळेकर), विनायक रामचंद्र मारूलकर इ. मंडळींनी वरील पाठशाळांमधून अध्ययन केले होते. भैरवभट गिजरे यांनी 'गायत्री भाष्य' हा ग्रंथ १९०९ मध्ये छापून प्रसिध्द केला होता. त्या ग्रंथाच्या विक्रीतून येणारी रक्कम वेदपाठशाळेस देण्यात यावी असे त्यांनी लिहून ठेवले होते. लक्ष्मण दीक्षित ऊर्फ सोनबा उमराणी यांनी १९३०च्या दरम्यान स्वत:च्या घरी वेदपाठशाळा सुरू केली. रामाचार्य आरे, राघवेंद्राचार्य घळसासी, हरिअण्णा गिजरे, शंकरदीक्षित उमराणी, विठ्ठलराव पटवर्धन, अप्पादीक्षित साने, शंकरदीक्षित मारूलकर, दिगंबरदीक्षित ढवळीकर, वासुदेवशास्त्री घळसासी, गंगाधरशास्त्री (पिलोबा) बलकुंदीकर, दिनकरदीक्षित परांजपे, गोपाळदीक्षित अराणके, नानाबुवा देव, सुरेश दीक्षित ऊर्फ प्रभाकर शास्त्री गिजरे ही सोनबा दीक्षित उमराणी यांची शिष्यमंडळी. त्यांच्यापैकी हरिअण्णा व त्यांचे चिरंजीव प्रभाकर शास्त्री गिजरे यांनी बऱ्यापैकी नाव मिळविले. त्यांनी १९६९ पासून घाटावरील बैरागी राम मंदिरात वेदपाठशाळा चालविली होती. १९९९ मध्ये कऱ्हाडात स्थापन झालेल्या 'वेदशास्त्र विद्या संवर्धन मंडळाने' २००१ पासून स्वत:ची वेदपाठशाळा सुरू केली असून तेथे वीस एक विद्यार्थी अध्ययन करतात. संस्कृत भाषा आणि व्याकरण यांचे शिक्षण देणारी सखारामशास्त्री घळसासी यांची पाठशाळा होती (स्थापना १९२२) पुढे चाफळहून कऱ्हाडात आलेले बाळकृष्णशास्त्री भागवत व त्यांच्या शांतारामशास्त्री, वामनशास्त्री आणि वासुदेवशास्त्री या तिघा मुलांनी संस्कृत अध्यापनात रस घेतला. पैकी वामनराव भागवत यांचा पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या संवर्धनात सक्रिय सहभाग होता.

कऱ्हाडात मुसलमानी अमदानीपासून मशिदींच्या आश्रयाने मदरसे होते. तेथे धार्मिक शिकवण, नमाज पढविले जात. त्यासाठी चांगले मौलवी, हाफीज करी यांची नेमणूक केली जाई. त्यामध्ये कऱ्हाडचे मौलाना मोहंमद इब्राहिम

व मौलाना निजामुद्दिन यांचा विशेष उल्लेख केला जातो. १९४९-५० मध्ये अरबी भाषेचे आणि 'कुरआन शरीफ' या धर्मग्रंथाचे शास्त्रोक्त शिक्षण देण्यासाठी मदरसा हुसैनिया-इनफिया' ही संस्था कऱ्हाडात स्थापन झाली. मौ. हाफीज महंमद शफी हे तेथे शिकवीत. १९५४-५५ मध्ये तेथे १११ मुले-मुली शिक्षण घेत होती.

बहुजनसमाजातील तरुण पिढीला सत्यशोधकीय विचार व संस्कार देण्याच्या हेतूने डुबल गल्लीत भाऊसाहेब कळंबे मास्तर यांनी 'विजयाश्रम' नावाची एक संस्था सुरू केली होती.

शेणोली येथील ूळचंदभाई यांच्या सल्ल्याने आणि पांडुअण्णा शिराळकर यांच्यासारख्या धनिकांच्या आधाराने यशवंतराव चव्हाण आणि त्यांचे काही मित्र यांनी कऱ्हाडात महार वस्तीत 'नाईट स्कूल' (रात्रीच्या शाळा) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या हस्ते उद्‌घाटन करून उत्साहाने सुरू केली होती. पण त्यांचा हा प्रयोग दोन तीन महिने चालल्यानंतर आपोआप कमी होत गेला.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग म्हणून हिंदी या राष्ट्रभाषेचा प्रचार व प्रसार कऱ्हाडातही केला जाई. पु. पां. गोखले यांनी कारावासात असताना आपल्या सहकाऱ्यांना हिंदीचे शिक्षण दिले. त्यांनी कऱ्हाडात हिंदी परीक्षांचे केंद्रही चालविले. १९३८ पासून कऱ्हाडात 'राष्ट्रभाषा विद्यालय ' ही संस्था सुरू झाली. भय्याशास्त्री वाटवे, बा. वा. घाटे, मु. शं. देशपांडे, रा. द. मोकाशी, रा. ग. कुलकर्णी ( ऐतवडेकर), उद्धवराव कुलकर्णी यांचा त्यात सहभाग होता. द. पां. आफळे हेही हिंदीचे वर्ग घेत असत. राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा या संस्थेच्या परीक्षांचे वर्ग यु. चाँ. बागवान, संदे, चंद्रकांत श्रोत्री, नि. अ. मुल्ला, महाराष्ट्र हायस्कूलमध्ये चालवत. कऱ्हाडास महाराष्ट्र राज्यभाषा संस्थेच्या परीक्षांचे वर्ग, त्यासाठी ग्रंथालय व अभ्यासिका यासाठी गावात मध्यवस्तीत दुमजली इमारत सुमारे १० - १२ हजार रूपयांत घेण्याचे ठरले होते, पण स्थानिक मतभेदांमुळे हा बेत तडीस गेला नाही.

**बालवाड्या :**

कऱ्हाडातील पहिली बालवाडी ( माँटेसरी शाळा) बनुबाई हवालदार या सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षिका व शिक्षणाधिकारी यांनी १ एप्रिल १९४८ रोजी 'बालक मंदिर' या नावाने सुरू केली. याच वर्षी १५ जुलै १९४८ रोजी वसुंधरा परांजपे ( म्हणजेच प्रमिला भावे ) व अनसूया (ताई ) अंबर्डेकर यांनी शिशु शिक्षण संस्थेची 'आदर्श शिशु विहार' ही बालवाडी सुरू केली. ही शाळा 'भावेबाईंची शाळा' म्हणूनच ओळखली जाई. सध्या तिचे नामकरण 'अनसूया काशीनाथ पालकर आदर्श शिशु विहार' असे केले आहे. १९४९ मध्ये प्रेमलाकाकी चव्हाण यांनी एक बालवाडी सुरू केली. २२ ऑगस्ट १९५२ रोजी ग्रामोपाध्ये यांनी नगरपरिषदेच्या हरिजन क्वार्टर्समध्ये 'बालमोहन विद्यालय' सुरू केले. १९७८ मध्ये अरिफ गुलाब बागवान यांनी शाहिन एज्युकेशन सोसायटी स्थापन करून माँटेसरीचे वर्ग सुरू केले. १९९६ मध्ये मलकापूर येथे २००३ मध्ये आगाशिवनगरमध्ये तर २००१ मध्ये वत्सलानगर येथे बालवाड्या सुरू झाल्या आहेत.

शिक्षणाचा पाया मजबूत करण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने १९८३ मध्ये प्रथम ४ बालवाड्या, १९८५ मध्ये आणखी १२ बालवाड्या असे करीत २००५-०६ मध्ये नगरपरिषदेच्या २१ बालवाड्या झाल्या असून त्यांत पटावर ७०४ मुले आहेत. या बालवाड्या प्राथमिक शाळांच्या इमारतीतच भरतात.

**प्राथमिक शिक्षण**

कऱ्हाड शहरात नगरपरिषद स्थापन होण्यापूर्वी १ ऑगस्ट १८५४ रोजी काही शिक्षणप्रेमी नागरिकांनी प्राथमिक शाळा सुरू केली होती. ही शाळा देसाई गुरुजींची म्हणून ओळखली जाई. नगरपरिषदेच्या स्थापनेबरोबरच शहरातील प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी नगरपरिषदेकडे आली. त्यामुळे मे १८५६ मध्ये त्या प्राथमिक शाळेच्या इमारत दुरुस्तीसाठी नगरपरिषद निधीतून ७८ रु. ८ पै. आणि नागरिकांच्या वर्गणीतून ३७ रु. ८ आणे खर्च

झाले. हीच शाळा पुढे शाळा नं. १ म्हणून ओळखली जाई. या शाळेचे 'स्कूलमास्तर' गणेश नारायण रोंघे होते. त्यांनी नगरपरिषदेकडे खुर्च्या, बुककेसेस, मुलांना बसायला बाके, मेज, जाजम, तक्क्या, स्टुले इ. वस्तु खरेदीसाठी ६१ रु. ८ आणे ची मागणी केली व नगरपरिषदेनेही ती मंजूर केली. ही शाळा १८९६ पर्यंत कोठे भरत असे याची माहिती उपलब्ध नाही. मुलींची शाळा (पुढे ४ नंबरची म्हणून ओळखली जाणारी) १ मे १८६९ रोजी, मराठी शाळा नं. २ मंडईमध्ये नगरपरिषदेच्या इमारतीत १ एप्रिल १८७३ रोजी आणि हिंदुस्थानी शाळा (पुढे ५ नंबरची म्हणून ओळखली जाणारी) ६ जून १८७२ रोजी अशा शाळा सुरू झाल्या."१८८२-८३ मध्ये कऱ्हाडास सहा सरकारी शाळा होत्या. त्यांत ५५६ विद्यार्थी होते व त्यांची उपस्थिती सरासरी ४१२ होती. प्रत्येक विद्यार्थ्यामागे सरासरी वार्षिक खर्च ४ रु. १२ आणे येत असे. या सहा शाळांपैकी एक दुय्यम अँग्लो-व्हर्नाक्युलर शाळा होती. या शाळेत पटावर २० मुले होती व सरासरी उपस्थिती १६ असे. मुलींच्या शाळेत १२६ मुली तर हिंदुस्थानी शाळेत ५३ मुले होती." अशी नोंद बाँबे प्रेसिडेन्सी गॅझेटियर सातारा डिस्ट्रिक्ट १८८४ मध्ये (पृ. ४१३ वर) आढळते.

शहरातील प्राथमिक शिक्षणाचा ताबा १८८५ पर्यंत सरकारकडेच होता. १८८५ पर्यंत कऱ्हाडात प्राथमिक शाळांची संख्या पाच झाली असली तरी प्राथमिक शिक्षणाची प्रगती समाधानकारक होत नाही. म्हणून नगरपरिषदेने त्या शाळा आपल्या ताब्यात मिळाव्यात म्हणून सरकारकडे मागणी केली. मराठी शाळा नं. १ ( २१२ मुले, ८ शिक्षक), मराठी शाळा नं. २ (८८ मुले, ३ शिक्षक), मराठी शाळा नं. ३ (९६ मुले ३ शिक्षक), मुलींची शाळा नं. ४ (६७ मुली, ३ शिक्षक) आणि हिंदुस्थानी शाळा नं. ५ (३५ मुले, २ शिक्षक) अशा पाचही शाळा नगरपरिषदेच्या ताब्यात आल्या. १८९५ साली हरिजन मुलांची पहिली शाळा चर्चच्या आवारात सुरू झाली. त्या शाळेचे पहिले शिक्षक कृष्णाजी हरीबा वायदंडे होते.

सोमवार पेठेत सध्या जेथे पाण्याची टाकी आहे तेथे कऱ्हाड तालुक्याची मामलेदार (तहसिलदार) कचेरी जून १८९६ पर्यंत होती, तिचे स्थलांतर

झाल्यामुळे रिकाम्या झालेल्या इमारतीची शाळेसाठी नगरपरिषदेने मागणी केली. ११ जुलै १८९६ पासून तेथे शाळा नं. १ भरू लागली. १ ऑगस्ट १९०६ रोजी बुधवार पेठेत हरिजन विद्यार्थ्यांसाठी शाळा नं. ८ व १ मे १९०९ रोजी मुलींची उर्दू शाळा नं. ६ सुरू करण्यात आल्या.

## जिल्हा लोकल बोर्डाकडे प्राथमिक शाळा

१ जून १९२५ पासून शहरातील सर्व प्राथमिक शाळा लोकल बोर्डाच्या ताब्यात गेल्या. नगरपरिषद लोकल बोर्डास वार्षिक अनुदान देई. १९२५-२६ मध्ये ही रक्कम ८५६१ रु. १ आणि २ पै. इतकी होती. १९२७ मध्ये सातवीपर्यंत शिक्षण देणाऱ्या दोन शाळा होत्या. त्यात ९३९ मुले व ३२ शिक्षक होते.हरिजनांसाठी सुरू केलेल्या शाळेत २७ मुले व १ शिक्षक होते. मुलींच्या शाळेत ४२९ मुली व १४ शिक्षिका होत्या. दोन उर्दू शाळा असून त्यांत मुलांच्या शाळेत २०० मुले व ८ शिक्षक आणि मुलींच्या शाळेत ९५ मुली व २ शिक्षिका होत्या. ('कऱ्हाड' य. रा. गुप्ते १९२९).

शहराच्या तळभागातील विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून जिल्हा लोकलबोर्डाने २० ऑक्टोबर १९३० रोजी मराठी शाळा नं. ७ सुरू केली. १९४२ साली मुलींची दुसरी शाळा (शाळा नं. ३) शुक्रवार पेठेत भाड्याच्या इमारतीत उघडण्यात आली. मुलींच्या उर्दू शाळा नं.६ मध्ये १९४४ पासून इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंतचे वर्गही सुरू करण्यात आले.१९४७ पासून शाळा नं १ चे रूपांतर 'क्राफ्ट स्कूल' मध्ये झाले. तेथे सूतकाम, विणकाम शिकविले जाई. मंडईतील जागा अपुरी पडू लागल्यामुळे शाळा नं. २ शुक्रवार व शनिवार पेठेतील भाड्याच्या इमारतींत हलविण्यात आली. १९५१ पासून या शाळेत कार्डबोर्ड व लाकूडकाम या मूलोद्योगाचे शिक्षण दिले जाई. उर्दू शाळा नं. ५ जुम्मा मशिद व मंडईतील भाड्याच्या इमारतीत भरत असे. उर्दू शाळेची भागशाळा म्हणून म्युनि. दवाखान्यासमोर काही वर्ग घेतले जात. १९५५ मध्ये कऱ्हाडातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडील (जिल्हा स्कूल बोर्डाच्या) प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची स्थिती पुढील प्रमाणे होती.

| शाळा नं. | मुले | मुली | एकूण विद्यार्थी | शिक्षक |
|---|---|---|---|---|
| १ | ५०४ | .... | ५०४ | १६ |
| २ | ७०० | .... | ७०० | उ. ना. |
| ३ | .... | ४३५ | ४३५ | ११ |
| ४ | .... | ५२५ | ५२५ | १५ |
| ५ | ४४८ | .... | ४४८ | १२ |
| ६ | .... | ४०० | ४०० | १२ |
| ७ | ६७५ | .... | ६७५ | १० |
| ८ | ५१ | १४ | ६५ | उ. ना. |
| एकूण | २३७८ | १३७४ | ३७५२ | |

(उ. ना. = उपलब्ध नाही)

या सर्व शाळांत इयत्ता १ ली ते सातवी पर्यंतचे शिक्षण देण्याची सोय होती. १९६२ मध्ये प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे गेले.

दरम्यानच्या काळात बहुतेक सर्व प्राथमिक शाळा भाड्याच्या इमारतींत भरत. या इमारती शाळांसाठी म्हणून बांधलेल्या नसल्यामुळे गैरसोयीच्या असत. त्यांची देखभाल दुरुस्ती वेळेवर होत नसे. १९३६ पासून कऱ्हाडात काही खाजगी प्राथमिक शाळाही सुरू झाल्या. तसेच फी देऊ शकणारे पालक पाचवीपासूनच आपल्या पाल्यांना हायस्कूलमध्ये घालू लागले. त्यामुळे स्कूलबोर्डाच्या शाळांत प्रामुख्याने आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातील मुलांचा भरणा असे. आपल्या गावातील या मुलांसाठी नगरपरिषदेवर कोणतीही जबाबदारी नसूनही प्राथमिक शाळांच्या इमारती बांधण्याचे नगरपरिषदेने २४ जुलै १९६० रोजी ठरविले आणि १९६५ ते १९९३ या काळात क्रीडांगण, स्वच्छतागृहांसह ११८ खोल्यांच्या एकूण ९ इमारती झाल्या.

जिल्हा परिषदेकडून नगरपरिषदेकडे प्राथमिक शाळा याव्यात असा प्रयत्न नगरपरिषदेने १९७२ पासून केला. २७ जुलै १९७६ रोजी प्राथमिक शिक्षणाचा

ताबा पुन्हा नगरपरिषदेकडे आला. नगरपरिषदेने त्यासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ स्थापन केले. कराड नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळांची संख्या ९ होती. या शाळांत ३४७५ विद्यार्थी व ७७ शिक्षक होते. १९७९–८० साली नगरपरिषदेच्या ११ शाळांत ३७६२ विद्यार्थी व ७४ शिक्षक होते. १८ मार्च १९८० रोजी शिक्षण मंडळ सदस्य सभेने नगरपरिषद कार्यक्षेत्रातील सर्व प्राथमिक शाळा इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. त्यामुळे प्राथमिक शाळांकडील ५ वी ते ७ वी चे वर्ग बंद झाले होते . तथापि १८ जून २००३ रोजी शिक्षण मंडळ सदस्य सभेने आपल्या धोरणाचा पुनर्विचार करून पुन्हा नव्याने इयत्ता ५ वी चे वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे २००४–२००५ पासून शाळा क्र. १२ मध्ये इयत्ता ५ वी चा वर्ग सुरू करण्यात आला आहे. इ. स. २००५–२००६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण मंडळाच्या १० प्राथमिक शाळा असून त्यांत २७६० विद्यार्थी व ६८ शिक्षक आहेत.

शालेय पोषण आहार या योजनेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना शाळांत दुपारचे अन्न शिजवून दिले जाते. सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलने, विविध स्पर्धा यातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साधता येतो. बौध्दिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी जादा तासिकांचे नियोजन करून वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते. गणवेष वाटप, दत्तक पालक योजना, सावित्रीबाई फुले दत्तक योजना यांचा लाभ संबंधित मुलामुलींना दिला जातो. पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षांना बसण्यासाठी प्रोत्साहनात्मक प्रयत्न केले जातात. १९७५ पासून मार्गदर्शक शिक्षकांना आणि गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अदमणे गुरूजी यांच्या स्मरणार्थ असलेल्या ठेवीच्या व्याज रकमेतून रोख बक्षिसे दिली जातात. जुन्या पिढीतील क्रांतिकारक, विद्यार्थ्यांना राष्ट्रीयत्वाचे बाळकडू पाजणारे प्राथमिक शिक्षक आणि काही काळ कऱ्हाडचे नगराध्यक्ष असलेल्या कृष्णाजी मारूतराव कळंबे गुरुजी यांच्या नावाने १९९७ पासून प्रतिवर्षी नगरपालिका शिक्षण मंडळाने कऱ्हाडातील आदर्श प्राथमिक शिक्षकास पुरस्कार दिला जातो. २००६ पासून नगरपरिषदेच्या सर्व शाळांतून ३० विद्यार्थ्यांची टॅलेंट बॅचसाठी निवड करून माहिती तंत्रज्ञानाच्या व स्पर्धात्मक युगात प्रगती करण्याच्या दृष्टीने त्यांना

विशेष मार्गदर्शन करण्यात येते. नगरपरिषदेच्या शाळा या खाजगी शाळांच्या बरोबरीच्या व्हाव्यात या दृष्टीने कराड नगर परिषद शिक्षण मंडळ 'आदर्श शाळा', 'बुध्दिवानांची तुकडी' ( टॅलेंट बॅच ) संगणक प्रशिक्षण, अद्यावत विज्ञान प्रयोगशाळा इ. उपक्रम करीत आहे.

खाजगी संस्थांच्या प्राथमिक शाळादेखील नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या अखत्यारीत येतात. अशा खाजगी प्राथमिक शाळा ८ असून त्यापैकी २ इंग्रजी माध्यमाच्या, १ उर्दू माध्यमाची व उरलेल्या ५ मराठी माध्यमाच्या आहेत. २००५-०६ या शैक्षणिक वर्षांत खाजगी प्राथमिक शाळांत सुमारे ३५३० विद्यार्थी असून ६६ शिक्षक आहेत. सर्व खाजगी प्राथमिक शाळांत पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध असून त्यामध्ये एकूण १४०६ मुले आहेत.

कऱ्हाडातील पहिली खाजगी प्राथमिक शाळा १९३६ मध्ये विनायकराव फणसळकर वकील यांनी पुढाकार घेऊन 'नूतन मराठी शाळा'या नावाने सुरू केली. या शाळेत मराठी चौथीपर्यंतचे वर्ग आहेत. रामचंद्र गोविंद बापट हे सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षण या शाळेचे पहिले मुख्याध्यापक होते. ही शाळा १५-८-१९४३ रोजी शिक्षणमंडळाच्या ताब्यात देण्यात आली. १९४९ मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा सुरू झाली. तिचे पहिले मुख्याध्यापक हरिभाऊ इनामदार होते. १९५३ मध्ये बनुताई हवालदार यांनी 'जिजामाता शाळा' सुरू केली. १९८० पासून शिशु शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा 'आदर्श किशोर शाळा'या नावाने चालू झाली, तिचे नामकरण आता काशीनाथ नारायण पालकर प्राथमिक विभाग असे झाले आहे. याशिवाय 'आदर्श प्राथमिक विद्यालय मलकापूर' (१९९६), आगाशिवनगर (२००३) 'बाल विद्यालय ओगलेवाडी' शिक्षण मंडळाची प्राथमिक शाळा, 'स. गा. म. प्राथमिक विद्यामंदिर विद्यानगर,' भारतीय शिक्षण संस्था इ. खाजगी प्राथमिक शाळा कऱ्हाडात आहेत. होली फॅमिली, प्रीतिसंगम, जाणीव जागृती इ. इंग्रजी माध्यमांच्या खाजगी प्राथमिक शाळा आहेत.

मोमीन मोहल्ल्यात १९३० ते १९५१ या काळात 'उर्दू ग्रँट स्कूल'या नावाची पहिली ते चौथीपर्यंत वर्ग असणारी उर्दू प्राथमिक शाळा उमेजबी उस्मान मोमीन व नूरबी अहमद मोमीन या चालवत. उर्दू शाळा नं. ५ व ६

या नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळांची प्रगती खुंटत जाऊन १९९८ मध्ये त्या शाळा बंद करण्यात आल्या. शनिवारात निसार खतीब या शिक्षकाच्या प्रयत्नाने एक उर्दू प्राथमिक शाळा चालू असल्याचे समजते.१९७८ मध्ये स्थापन झालेल्या शाहीन एज्युकेशन सोसायटीने १९८८ पासून पहिली, दुसरी या क्रमाने १९९४ पर्यंत इयत्ता सातवीपर्यंतचे वर्ग सुरू केले. या शाळेचे वर्ग प्रथम जुम्मा मशिदीत व १९९८ पासून रविवार पेठेतील नगरपरिषदेच्या इमारतीत भरतात.

## माध्यमिक शाळा

शहरात इंग्रजी शिक्षणाची सोय व्हावी यासाठी नागरिकांचे प्रयत्न चालू होतेच. या बाबतीत नगरपरिषदेने पुढाकार घ्यावा अशी सूचना एज्युकेशनल इनस्पेक्टर यांनी १८ ऑगस्ट १८७५ च्या पत्राने केली होती. त्याप्रमाणे नगरपरिषदेने इंग्रजी शिक्षणासाठी दरमहा १५ रु. प्रमाणे मदत करण्याचा ठराव केला. या मदतीतून शाळा नं. १ मध्येच सन १८७८–७९ पासून इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या तीन इयत्ता सुरू झाल्या. शाळा नं. १ मध्येच सुरू केलेल्या इंग्रजी शाळेचे वर्ग इयत्ता ५ वी पर्यंत (सध्याची नववी) चे वर्ग जानेवारी १९०९ पासून झाले. त्या शाळेवर एका पदवीधर शिक्षकाची नेमणूक केली होती. शाळेत खोडशी गावाची जोसकी करणारे वासुदेवराव जोशी (इंग्रजी पहिलीस तर्खडकरांची तीन भाषांतरे), गोविंद दत्तात्रय मेहेंदळे (गणित व इंग्रजी), निवृत्त फौजदार दत्तात्रय धुंडिराज माटे (वेबस्टरच्या डिक्शनरीवरून इंग्रजी उच्चार शिकवणारे), पुढे 'केसरी' चे संपादक झालेले वासुदेव कृष्ण भावे(१९१० – १२), नामदार गोखल्याचे वर्गमित्र असलेले काशिनाथ रामचंद्र जोशी (रुईकर) (बीजगणित, मराठी, संस्कृत), कऱ्हाडातील जुने फोटोग्राफर गणपतराव फडके (चित्रकला), वक्तशीरपणासाठी प्रसिद्ध असणारे प्र. श्री. (आबा) शेणोलीकर (बीजगणित, भूमिती, संस्कृत) असे नावाजलेले शिक्षक होते. रहिमतपूरचे महादेव हरी दुवेदी (इंग्रजी, संस्कृत) हे येथे नोकरी करीत बी. ए. झाले. ते म्युनिसिपल इंग्लिश स्कूलचे व म्यु. इं. स्कूल. टिळक हायस्कूलमध्ये रूपांतरीत झाल्यावरही टिळक हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. या शाळेच्या विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी गावाबाहेर निमजग्याच्या माळावर जावे

लागे. फूटबॉल व देशी खेळ हे त्या वेळचे खेळ. हे मैदान लांब पडे म्हणून बहुतेक मुले कृष्णेच्या वाळवंटातच खेळण्यासाठी जात.

१९२० साली लो. टिळकांच्या निधनानंतर कऱ्हाडात झालेल्या शोकसभेत इंग्रजी शाळा काढून टिळकांचे स्मारक करावे असा ठराव होऊन त्यासाठी सदाशिव खंडो आळतेकर, लक्ष्मण महादेव देशपांडे, पांडुअण्णा शिराळकर, गोपाळ वामन फडके, किसनलाल प्रेमराजलाहोटी, कृ. गो. बहुलेकर, सीताराम गोपाळजी पाटील, स. गो. ढवळे, महंमद याकूब मौलवी,पां. रा. कुलकर्णी, ल. म. घोडके, अशा समाजातील विविध क्षेत्रातील राष्ट्रीय वृत्तीच्या मंडळींनी शिक्षण मंडळ, कऱ्हाडची स्थापनाही केली. या शिक्षण मंडळाच्या विनंतीवरून नगरपालिकेने दि. २७ मार्च १९२१ रोजी ठराव करून आपली इंग्रजी शाळा शिक्षण मंडळाच्या ताब्यात १ एप्रिल १९२१ रोजी दिली. तीच शाळा 'टिळक हायस्कूल, कऱ्हाड' या नावाने चालू आहे. नगरपरिषदेने त्यासाठी घातलेल्या अटींनुसार शिक्षण मंडळ, कऱ्हाडने २० एप्रिल १९२२ पर्यंत दहा खोल्यांची इमारत बांधून तयार केली आणि १९२३ मध्ये टिळक हायस्कूलची पहिली तुकडी मॅट्रिकच्या परीक्षेस बसली. ही शाळा प्रारंभी सोमवार पेठेतील पाण्याच्या टाकीजवळ काळ्यांच्या वाड्यात भरत असे. (हा वाडा म्हणजेच आळतेकरांचा वाडा, ती जागा आता पोरवाल यांनी घेतली आहे.) १९२३ पासून टिळक हायस्कूल मंगळवार पेठेतील सध्याच्या जागेत स्वत:च्या इमारतीत भरू लागले. या शाळेचे पहिले मुख्याध्यापक द. पां. पाठक होते. केवळ एक हायस्कूल, २७० विद्यार्थी आणि १० शिक्षक असलेल्या या संस्थेचा विस्तार १७ शाळा, १०००० विद्यार्थी व विद्यार्थिनी आणि ३०० शिक्षक एवढा झाला आहे. टिळक हायस्कूलखेरीज शेठ रामविलास लाहोटी कन्या प्रशाला, आत्माराम विद्यामंदिर, ओगलेवाडी (१९६०), इंग्रजी माध्यमाची शाळा (एस एम एस १९८१), आटके येथील इंग्रजी माध्यमाची शाळा अशा शिक्षण मंडळाच्या माध्यमिक शाळा आहेत. डॉ. रा. गो. प्रभुणे यांच्या उपक्रमशील नेतृत्वाखाली या संस्थेचा विकास विस्तार झपाट्याने चालू आहे.

कऱ्हाडात कापरे वकिलांची एक इंग्रजी शाळा होती. गोविंद पांडुरंग देव हे केवळ मॅट्रीकपर्यंत शिकलेले गृहस्थ. त्यांनी सुरुवातीस कच्छी चौकात

एका वर्षात तीन इयत्ताचे (स्पेशल क्लास) वर्ग सुरू केले. त्यातूनच त्यांनी महाराष्ट्र ए. व्ही. स्कूल नावाची माध्यमिक शाळा १९३० मध्ये सुरू केली. पुढे या शाळेसाठी १९३७ मध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संघटित करून त्या संस्थेची धुरा किसनलाल प्रेमराज, सय्यद दादामिया, आण्णाप्पा कल्याणी या मंडळीकडे सोपविण्यात आली. तरीपण संस्थापक या नात्याने दैनंदिन कारभाराची सूत्रे देवांकडेच होती. उत्तम शिक्षकसंच होता. शाळेसाठी औंधच्या राजाकडून पंतांच्या कोटातील वाडा मिळाला होता. १९४२ पासून ११ वी चा वर्गही सुरू झाला. या शाळेची एक शाखा सैदापुरात भरत असे. मॅट्रीकच्या वर्गापर्यंत सर्व वर्गात विद्यार्थी संख्याही चांगली होती. पण शिक्षणसंस्थेचा मूळ गाभा शिक्षक आहे, त्या शिक्षकाला काही सन्मान आहे, स्वत्व आहे, स्वाभिमान आहे. तो एक माणूस आहे, त्याचे काहीतरी देणे आहे यासंबंधी एक मूलभूत प्रश्न या संस्थेत निर्माण झाला. शिक्षक व संस्थाचालक यांच्यामध्ये उभ्या राहिलेल्या संघर्षात यशवंतराव चव्हाण आणि पु. पां. गोखले यांना लवाद नेमले होते. त्यांना शिक्षकांची बाजू न्याय्य वाटली. शंकरराव करंबेळकर आणि त्यांचे सहकारी शिक्षक रा. पां. वैशंपायन, पंडित सप्रे, द. रा. सूर्यवंशी, पां. श्री. सोनटक्के, कृ. दा. आरे, य. ल. जोशी, बी. बी. कुलकर्णी (सवादेकर) हे निर्धाराने उभे राहिले. विद्यार्थ्यांनीही त्यांना साथ दिली आणि १९४५च्या गुढीपाडव्यास (१३ एप्रिल) इंग्रजी ६ वी पर्यंत (१० वी) हायस्कूल काढण्याचा संकल्प करून श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. यशवंतराव चव्हाण, पु. पां. गोखले, रामविलास लाहोटी, महंमद अयुब अरब, गौरीहर एकनाथ सिंहासने, हरिभाऊ लाड, गंगाराम दलुचंद शहा, राजाराम हणमंत पाटील, गंगाधर पागे, नारायणराव घाडगे हे कऱ्हाडातील विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते संस्थेचे प्रवर्तक झाले. ही शाळा सध्या सोमवार पेठेत जेथे कृष्णाबाई उत्सव समितीचे प्रीतिसंगम कार्यालय आहे तेथे असलेल्या मुतालिकांच्या वाड्यात भरत असे. या संस्थेचा विकास झपाट्याने झाला आणि आज कऱ्हाड, मसूर, कार्वे, किवळ इ. ठिकाणी पाचसहा माध्यमिक शाळा व दोन महाविद्यालये आहेत. पाटण, सुरूर, इंदोली आणि कोयनानगर

येथील संस्थेच्या शाळा होत्या त्या स्थानिक संस्थांकडे सुपूर्द केल्या. सायं प्रशाला (नाईट हायस्कूल)१९५९ ते १९७५ पर्यंत चालली होती. योगायोगाची गोष्ट म्हणजे ज्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीतून श्री शिवाजी शिक्षण संस्था निर्माण झाली होती ती महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आपल्या महाराष्ट्र हायस्कूलसह श्री शिवाजी शिक्षण संस्थेत १९६७ मध्ये विलीन झाली.

डॉ. बापूजी साळुंखे यांनी १९५४ मध्ये कऱ्हाडच्या मुरलीधर मंदिरात विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या स्थापनेचा संकल्प सोडला होता. 'ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार' हे ध्येय बाळगून महाराष्ट्रभर शिक्षण संस्थांचे जाळे पसरलेल्या विवेकानंद शिक्षण संस्थेचे संत तुकाराम हायस्कूल कऱ्हाड मध्ये सुरू झाले.

रयत शिक्षण संस्थेत अध्ययन-अध्यापन करून अनुभव संपादन केलेल्या व विवेकानंद शिक्षण संस्थेच्या स्थापनेत महत्त्वाचा वाटा असलेल्या काकडे गुरूजींनी कऱ्हाडात स्वत:चे यशवंत हायस्कूल सुरू केले. त्या हायस्कूलसाठी त्यांनी नगरपरिषदेच्या दवाखान्याची जागाही संपादन केली, पुढे त्यांनी आपले हे हायस्कूल रयत शिक्षण संस्थेच्या ताब्यात दिले. रयत शिक्षण संस्थेने यशवंत हायस्कूलच्या जोडीस केशवराव पवार इंग्लिश मिडियम स्कूल सुरू केले आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात महत्त्वाचे योगदान असलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा शुभारंभ कऱ्हाड परिसरातील काले गावी झाला असला तरी कऱ्हाडात रयत शिक्षण संस्थेने १९५४ मध्ये स.गा.म.महाविद्यालयाच्या रूपानेच प्रथम पाऊल टाकले.

'भावे बाईंची शाळा' म्हणून ओळखल्या जाणा-या शिशु शिक्षण संस्थेची सूत्रे दिगंबर काशीनाथ पालकर यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी शिक्षण संस्थेच्या विस्तारात लक्ष घातले. या संस्थेची दिगंबर काशीनाथ पालकर माध्यमिक शाळा २००० साली सुरू झाली. २००३ पासून डी.के. पालकर इंग्लिश मिडियम स्कूलही त्यांनी सुरू केले.

मलकापूर येथे मळाईदेवी शिक्षण संस्थेची आनंदराव चव्हाण माध्यमिक शाळा (१९८१) , रोटरी शिक्षण संस्था कराडची माध्यमिक शाळा , प्रेरणा विद्यानिकेतन विद्यानगर, द.शि.एरम हायस्कूल, गजानन हौसिंग सोसायटी, सिध्देश्वर विद्यालय कोपर्डे, यशवंतराव हायस्कूल शिरवडे, न्यू इंग्लिश स्कूल

ओगलेवाडी, प्रीतिसंगम विद्यामंदिर गोटे, शासकीय तांत्रिक विद्यालय, विद्यानगर अशा माध्यमिक शाळा कार्यरत आहेत.

इंग्रजी माध्यमातील शिक्षणाची सुविधा 'होली फॅमिली स्कूल' मुळे सुरू झाली. प्रारंभी या शाळेचे वर्ग सोमवार पेठेतील मुतालिक वाड्यात भरत. आता विद्यानगर मध्ये या संस्थेचे स्वत:चे भव्य संकुल उभे आहे. मलकापूर येथे कृष्णा हॉस्पिटलच्या परिसरात कृष्णा इंग्लिश मिडियम स्कूल १९८५ मध्ये सुरू झाले. या शाळेत बालवाडी ते बारावी (विज्ञान) पर्यंत संगणक विषयासुध्दा सर्व शिक्षण दिले जाते. सध्या तेथे १२५० विद्यार्थी शिकतात. कऱ्हाडात शिवाजीनगर मध्ये जनता, मार्केटयार्डमध्ये कल्याणी, मलकापुरात अभिनव अशा इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत.

कऱ्हाड तसेच गोटे, मसूर येथील उर्दू प्राथमिक शिक्षण घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांसाठी ॲड. ए.ए. मुल्ला यांनी पुढाकार घेऊन १९६४ मध्ये मुस्लिम एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेची न्यू इंग्लिश स्कूल ही उर्दू माध्यमाची शाळा मंगळवार पेठेत कासमभाई पटवेकर यांच्या घरात ८ वीच्या वर्गाने झाली (१९६५) पुढे ही शाळा शुक्रवार पेठेत कासमभाई बोर्डिंगमध्ये असे स्थलांतर करीत १९६८ मध्ये मार्केट यार्ड परिसरातील स्वत:च्या जागेत गेली. १९७३ पासून या शाळेस ५ वी ते ७ वी च्या वर्गांचीही जोड देण्यात आली. आता या शाळेचे नाव 'हुसेन कासम दाणेकरी अँग्लो उर्दू स्कूल' असे असून ५ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गातून सुमारे २०० विद्यार्थी येथे शिकत आहेत.

## उच्च माध्यमिक विद्यालय (कनिष्ठ महाविद्यालय)

१०+२+३ अशी शैक्षणिक व्यवस्था झाल्यापासून ११ वी १२ वी चे विविध विद्या शाखांचे वर्ग महाविद्यालयांनी सुरू केले. काही माध्यमिक शाळांनीही कनिष्ट महाविद्यालयाचे वर्ग सुरू केले. वाणिज्य-विज्ञान शास्त्रांचे, मलकापूर येथे आनंदराव चव्हाण विद्यालय, तर विठामाता विद्यालयात कला-वाणिज्य शाखा २००० पासून सुरू आहेत.

## स्त्री शिक्षण

मुलींसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय १८६९ पासून होती. १९३६ साली सुरू

झालेल्या नूतन मराठी शाळा या प्राथमिक शाळेत मुला-मुलींचे संमिश्र वर्ग प्रथमच भरविण्यात आले. तरीही मुलींच्या माध्यमिक शिक्षणाबाबत उदासीनताच होती. पालकांच्या इच्छेमुळे मुलींना माध्यमिक शिक्षणाची खाजगी शिकवणी वर्गाच्या माध्यमातून पु.पां.(बाबुराव) गोखले, सरस्वती बाई मारूलकर, विश्वनाथ गोपाळराव देशपांडे (कोळेवाडीकर), राजाकाका कुलकर्णी यांनी १९३७ च्या दरम्यान प्रयत्न केले होते. मुलींसाठी वेगळे हायस्कूल काढावे असा प्रयत्न शंकरराव करंबेळकर, आर. पी. कुलकर्णी, पंडितराव सप्रे यांनीही केला होता असे सांगतात. सुधाताई ढवळे या उच्चशिक्षित विदुषीच्या प्रयत्नाने मुलींची माध्यमिक शाळा ही कल्पना प्रत्यक्षात आली. शिक्षण मंडळाने १ जून १९४० रोजी सोमवार पेठेत सध्या जेथे कराड मर्चंट पतसंस्थेची इमारत आहे तेथे त्यावेळी असलेल्या सुपनेकर वाड्यात कन्याशाळा सुरू केली. इंग्रजी १ ते ४ (सध्याच्या भाषेत ५ वी ते ८ वी) व स्पेशल क्लास अशा पाच वर्गात ६७ विद्यार्थिनी सुरुवातीस होत्या. इंग्रजी ५ वी (म्हणजे ९ वी) चा वर्ग १९४३ मध्ये तर जून १९४८ मध्ये इंग्रजी ७ वी (म्हणजे११ वी) चा वर्ग सुरू झाला. १९४९ मध्ये या शाळेची माध्यमिक शालान्त परीक्षेची पहिली तुकडी बाहेर पडली. दरम्यान ही शाळा कोटातील ढवळेवाड्यात भरत असे. जून १९५३ पासून ही शाळा मंगळवारातील सध्याच्या जागी भरू लागली. अलीकडे या शाळेचे नामकरण 'शेठ रामविलास किसनलाल लाहोटी कन्याप्रशाला' असे झाले आहे. १९४० नंतर इतर माध्यमिक शाळांत मुलामुलींचे संमिश्र वर्गही भरू लागले. १९६२ मध्ये श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे विठामाता विद्यालय, १९८४ मध्ये मळाईदेवी शिक्षण संस्थेचे प्रेमलाकाकी चव्हाण विद्यालय, शास्त्रीनगरमध्ये हौसाई कन्याशाळा, कन्या प्रशाला ओगलेवाडी अशा केवळ मुलींच्या माध्यमिक शाळाही सुरू झाल्या.

सातारा जिल्ह्यात केवळ मुलींसाठी असे पहिले महाविद्यालय कराडच्या शिक्षण मंडळाने 'महिला महाविद्यालय' नावाने सुरू केले. (१९८६). हे महाविद्यालय नावारूपाला आणण्यात प्राचार्य अल्बर्ट रेमेत डिसूझा यांचा मोठा वाटा आहे.

### खाजगी शिकवण्या

कऱ्हाडात काही धनिक मंडळींच्या पाल्यांसाठी फक्त शाळेतील शिक्षक किरकोळ शिकवण्या करत.  खाजगी शिक्षणवर्ग पूर्वी अपवादानेच असत. पु.पां.गोखले हे खाजगी वर्ग घेत.  दाभोळकरांचे 'स्वाध्याय' वर्ग मनोऱ्याजवळ १९५२-५५ च्या सुमारास  होते.  स्वतंत्र व्यवसाय म्हणून कोचिंग क्लास कऱ्हाडात सुरू करणारांमध्ये रतिलाल शहा (१९६३), मोहन जोशी यांचे नाव घ्यावे लागेल. संस्कृत विषय शिकवण्याचे वर्ग सौ. विनया गोखले यांनीच प्रथम १९८८ मध्ये सुरू केले.  आता खाजगी शिकवणी वर्ग उदंड झाले आहेत, काही वर्ग म्हणजे प्रतिशाळा /महाविद्यालये झाले आहेत.

### उच्च शिक्षण

१९५३ पर्यंत कऱ्हाडात माध्यमिक शाळांना परीक्षेचे केंद्रही नव्हते. बहुतेक सर्व विद्यार्थी सातारा केंद्रातून परीक्षेस बसत.  त्यावेळी मुंबई राज्याचे (गुजरात, पश्चिम महाराष्ट्र व कर्नाटक) एकच परीक्षा मंडळ होते.  १९५३ मार्चच्या शालान्त परीक्षेत कऱ्हाडच्या एकाच, टिळक  हायस्कूलचे  दोन विद्यार्थी मधुसूदन रामचंद्र कोल्हटकर आणि शशिकांत पांडुरंग वळवडे यांनी अनुक्रमे पहिला व दहावा कमांक मिळवून साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष कऱ्हाडकडे वेधवून घेतले.

कऱ्हाडास माध्यमिक शालान्त परीक्षेचे केंद्र १९५४ मध्ये सुरू झाले. या वर्षीच कऱ्हाडास सुरू व्हावयाच्या रयत शिक्षण संस्थेच्या सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य रा. कृ. कणबरकर हे कऱ्हाड केंद्राचे मुख्य संचालक होते. कऱ्हाडात उच्च शिक्षणाची विविध दालने खुली होणार होती, त्याची ही सुरुवात होती. त्यावेळी सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात फक्त कला शाखेचे वर्ग सुरू झाले होते. १९५७ मध्ये महाराष्ट्र शासनाने कऱ्हाडात 'तंत्रनिकेतन' (पॉलिटेक्निक) सुरू केले. या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य होते कऱ्हाडचे सुपुत्र प्रा. गोविंदराव सप्रे. (हे पुढे तांत्रिक शिक्षणाचे संचालक म्हणून निवृत्त झाले). त्या वेळी यशवंतराव चव्हाण मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. शास्त्र शिक्षण देणारे महाविद्यालय ही

काळाची गरज आहे हे लक्षात घेऊन त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उच्च शिक्षण मंडळ आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मंडळ असे दोन विभाग करून १९५८ मध्ये कऱ्हाडात केवळ शास्त्र या विद्याशाखेचे शिक्षण देणारे सायन्स कॉलेज सुरू केले. सुरुवातीस सायन्स कॉलेजचे वर्ग नगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत भरत. या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य प्रा. डॉ. कापडणीस होते. अल्पावधीतच संस्थेने सायन्स कॉलेजसाठी सैदापूर भागात जागा घेऊन इमारत उभी केली. या इमारतीच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद आले होते. त्यावेळी यशवंतराव चव्हाण म्हणाले की, "पुण्यामुंबईसारख्या ठिकाणी गेले म्हणजेच उच्च शिक्षण चांगले मिळू शकते, असे म्हणणे बरोबर नाही. कऱ्हाडसारख्या ठिकाणीही ते मिळविता येते व तेही गरिबाच्या मुलांना स्वस्तात मिळविता येते हे दाखवून देण्यासाठी आम्ही हे कॉलेज काढले आहे" तथापि सुरुवातीच्या काळात पुण्याच्या काही प्रतिष्ठित पत्रकारांनी "शासकीय शिक्षण देणारी ही कॉलेजे सुशिक्षित बेकारांची संख्या वाढवीत आहेत"अशी टीका "पुण्याचे पाणी कऱ्हाडात" या शीर्षकाखाली केली होती.

सायन्स कॉलेज समोरील बाजूस 'शासकीय तंत्रनिकेतन' संस्थेची इमारत झाली. त्या इमारतीच्या उद्घाटनासाठी इंदिरा गांधी आल्या होत्या. तंत्रनिकेतनाच्या जोडीला अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) महाविद्यालय व तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण संस्था सुरू झाल्या. सायन्स कॉलेजमध्ये कला-वाणिज्य विद्याशाखा सुरू होऊन त्या शास्त्रांसाठी स्वतंत्र 'कऱ्हाड कला-वाणिज्य महाविद्यालय' काढण्यात आले. (१९७०) स.गा.म.महाविद्यालयातही यथाक्रम कला शाखेबरोबरच शास्त्र व वाणिज्य विद्याशाखांचे वर्ग सुरू झाले. एके काळी सैदापूरचा हा परिसर 'उद्यमनगर' म्हणून ओळखला जाई. विविध विद्याशाखांच्या सुविधा येथे उपलब्ध होऊ लागल्यामुळे या भागाचे 'विद्यानगर' असे सार्थ नामकरण झाले. 'सायन्स कॉलेज'चे 'यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज' व 'कऱ्हाड महाविद्यालयाचे' 'वेणुताई चव्हाण कॉलेज' असे नामान्तर झाले आहे.

गावातही विवेकानंद शिक्षण संस्थेने कमला नेहरू ज्यु. कॉलेज ऑफ

एज्युकेशन होतेच. आता बापूजी साळुंखे कला-वाणिज्य महाविद्यालय, बापूजी साळुंखे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, विवेकानंद चित्रकला महाविद्यालय अशा वेगवेगळ्या विद्याशाखांच्या महाविद्यालयांचे संकुलच पंताच्या कोटात झाले.

१९८४ मध्ये मलकापुरात 'कृष्णा वैद्यकीय महाविद्यालय' सुरू झाले. सुरूवातीस १०० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालयात आता १५० विद्यार्थी प्रतिवर्षी प्रवेश घेऊ शकतात. येथे पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाचीही सोय झाली आहे. या महाविद्यालयास इंडियन मेडिकल कौन्सिलची मान्यता असून २००५ पासून या संस्थेस अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झाला आहे. १९८३ मध्ये डी.एम.एल.टी. अभ्यासक्रम, २००३ मध्ये कृष्णा भौतिकोपचार महाविद्यालय, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अशा विविध वैद्यकीय अभ्यासक्रमांचे हे केंद्र झाले आहे. भारती विद्यापीठाने 'यशवंतराव मोहिते कॉलेज ऑफ बिझनेस मॅनेजमेंट' तसेच 'यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालय' मलकापूर मध्ये सुरू केली आहेत.

रेठरे येथे 'कृषीमहाविद्यालय' तसेच 'यशोदीप' आणि 'रंगराव माने ट्रस्टचे चंद्रभागा कृषी शिक्षण संशोधन केंद्र (वाघेरी) येथे कृषिविषय अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. राजमाची सदाशिवगड येथे मोकाशी कॉलेज ऑफ फूड सायन्स टेक्नॉलॉजी (२००४) सुरू झाले आहे. कऱ्हाडात' प्रेमलाताई चव्हाण तंत्रनिकेतन', घोगाव येथे' संतकृपा औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय', 'वत्सला दिगंबर पालकर बालवाडी शिक्षणवर्ग', बँकिंग व तदनुषंगिक अभ्यासक्रमांसाठी मार्गदर्शन करणारे कऱ्हाड अर्बन बॅंक सेवक प्रशिक्षण संशोधन केंद्र. शिक्षण मंडळ कऱ्हाडचे शिवण वर्ग, पुण्यश्लोक पार्वतीबाई गोसावी माहिती तंत्रज्ञान संगणक केंद्र, शिवपार्वती प्रतिष्ठान नाशिकच्या वतीने सुरू असलेले ज्योतिष महाविद्यालय, मळाईदेवी शिक्षण संस्थेचे जी.डी.सी.ए.मार्गदर्शन वर्ग, प्रा. उमर्जीकर, जीवन पवार यांचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कऱ्हाड केंद्राचे ग्रंथपाल प्रशिक्षण वर्ग, संगणकाविषयीचे वर्ग, श्रीसाईसम्राट संस्थेचे एअरहोस्टेस, पर्यटन हॉटेल व्यवस्थापन असे विविध उपक्रम चालू आहेत.

## शिक्षक पुरस्कार

राज्य व केंद्र सरकारतर्फे प्रतिवर्षी आदर्श शिक्षकांना पुरस्कार दिला जातो. त्यामध्ये भा.म. पागनीस, रा.गो. प्रभुणे, बा.का.मालेकर यांनी राष्ट्रीय पुरस्कार संपादन केले असून राज्य पुरस्कार संपादन करणारांत र.पु.कुलकर्णी(१९७३), ना.वा.जोशी(१९७१), बी.बी.रायवाड, र.पां.फडणीस, वा.मो.कोळेकर, ना.ज्ञा.शिंदे(१९८४), द.न.गोखले , हे आहेत. जन्नतबी बागवान व लीलावती जगन्नाथ पवार या प्राथमिक शिक्षिकांनीही १९६४ व १९७२ मध्ये राष्ट्रीय पुरस्कार मिळविले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या संगीत शिक्षकांसाठी दिल्या जाणाऱ्या पहिल्या पुरस्काराचे मानकरी (१९८०) कऱ्हाडचे बबनराव नावडीकर होते. नगरपालिका शिक्षण मंडळाचे शिक्षक वसंतराव बाबुराव लाड यांना १९८५-८६ चा व गोरखनाथ मारूती जाधव यांना १९८९-९० चा प्राथमिक शिक्षकांसाठी असलेला राज्यपुरस्कार प्राप्त झाला.

माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेची अधिवेशने पाचगणी व कऱ्हाड येथे अनुक्रमे १९६० व १९६१ मध्ये झाली. त्यांचे स्वागताध्यक्ष अनुक्रमे कऱ्हाडचे पां.न.वळवडे व प्र.ल.करंबेळकर होते. १९६५ मध्ये नाशिक येथे झालेल्या मुख्याध्यापक परिषदेचे आणि १९६२ मध्ये अहमदनगर येथील माध्यमिक शिक्षक परिषदेचे अशी अध्यक्षस्थाने कऱ्हाडच्या प्र.ल.करंबेळकर यांनी भूषविली होती . महाराष्ट्र राज्य पातळीवरील प्राथमिक शिक्षकांचे अधिवेशन २००२ मध्ये कऱ्हाडात झाले होते. कऱ्हाडात २००३ मध्ये शैक्षणिक चिंतन परिषद तसेच महाराष्ट्र शैक्षणिक प्रशासन व व्यवस्थापन परिषद असे उपक्रम यशस्वीपणे पार पडले.

डॉ. आंबेडकर तांत्रिक विद्यापीठाचे पहिले कुलगुरू (१९९२ - १९९९) डॉ. विनायक रामचंद्र देशपांडे , पुणे येथे आपटे प्रशाला या लौक्कि मिळविलेल्या प्रशालेचे संस्थापक मुख्याध्यापक पु. ग. (भय्या) वैद्य, भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शिवाजीराव कदम हे सर्व कऱ्हाडचे सुपुत्र आहेत.

## मूकबधिर विद्यालय

१९७७-७८ मध्ये कऱ्हाडच्या लॉयन्स क्लबने पुण्याचे कान, नाक,

घसा, विशेषज्ञ डॉ. टेपन यांच्या नेतृत्वाखाली कऱ्हाडात बहिरेपणावरील चिकित्सा व शस्त्रक्रिया यांचे मोफत शिबिर भरविले होते. त्यावेळी डॉ.द.शि.एरम लॉयन्स इंटरनॅशनलमध्ये रिजनल डेप्युटी गव्हर्नर होते. त्यांना मूकबधिर मुलांसाठी काही तरी करावयास पाहिजे असे या शिबिरानिमित्ताने वाटले. त्यातूनच मूकबधिर विद्यालयाची कल्पना निघाली. डॉ. एरम, सुभाषराव जोशी, रमेश सचदेव, अशोक देसाई या लॉयन्सच्या सभासदांनी पुढाकार घेऊन नगरपरिषदेच्या शाळा नं.२ (बोरीचे परडे) मध्ये दोन खोल्यांत १६ विद्यार्थी घेऊन १९८३ मध्ये मूकबधिर विद्यालय सुरू केले. १९८५ मध्ये 'वृध्दाश्रम' आणि 'मूकबधिर विद्यालय' या दोन्ही संस्थांच्या व्यवस्थापनासाठी लायन्स अपंग सहाय्य संस्था स्थापन करण्यात आली. विद्यानगरमध्ये संस्थेची स्वत:ची इमारत उभी राहिली. मुलांना इयत्ता दहावीपर्यंतचे औपचारिक शिक्षण दिले जात होतेच, पण त्या जोडीला त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी इलेक्ट्रिक मोटार रिवायडिंग सारखे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येऊ लागले. आता गजानन हौसिंग सोसायटीत तीन एकरांच्या परिसरात हे विद्यालय उभे असून तेथे १३० विद्यार्थी शिकत आहेत. मूकबधिरांना आवश्यक त्या श्रवणसाधनांच्या जोडीला त्यांचे उच्चार सुधारण्यासाठीही लागणारी साधने येथे आहेत. शिलाईकाम, पुस्तकबांधणी, फाईल निर्मिती, स्क्रीन प्रिंटिंग, ऑफसेट छपाई, कुक्कुटपालन इ. व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित केले जाते. मूकबधिर विद्यार्थ्यांच्या जोडीला सर्वसाधारण विद्यार्थ्यांसाठीही पूर्वप्राथमिक (मराठी व इंग्रजी माध्यम) आणि प्राथमिक विद्यालय ही १९९९ पासून सुरू करण्यात आले आहे. डॉ. द.शि.एरम यांच्या पुण्यस्मरणार्थ या शैक्षणिक संकुलास आता डॉ.द.शि.एरम यांचे नाव देण्यात आले आहे.

## मतिमंद मुलांची शाळा

सुप्रसिद्ध समाजसेवक डॉ. बाबा आमटे यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या बाळ देवधरांनी १९८३ मध्ये मतिमंद मुलांच्या ८० पालकांचा मेळावा घेतला. त्यातून मतिमंद मुलांची शाळा सुरू करावी असे ठरले. व एकोपा

मंगल कार्यालयात ८ मुले घेऊन शाळेला सुरुवात झाली. या शाळेसाठी १९८७ मध्ये संजीवनी इन्स्टिट्यूट ही संस्था स्थापन करण्यात आली. १९९२ पासून ही शाळा कराड नगरपरिषदेच्या सोमवार पेठेतील पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या इमारतीत भरते. ६ ते १८ वयोगटातील सुमारे ६० विद्यार्थी सध्या या शाळेत आहेत. विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक वय, पालकांच्या अपेक्षा यांचा विचार करून वैयक्तिक अभ्यासक्रम ठरविला जातो. खास प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक केलेली आहे.या संस्थेचा दुसरा प्रकल्प मतिमंदांचे व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र हा असून तेथे १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांना पिशव्या शिवणे, राख्या, बेंचेस, फुले, मेणबत्त्या बनविणे, उदबत्ती वळणे, घरगुती पिठाची गिरणी चालविणे, फायली करणे, स्क्रीन प्रिंटिंग, सुतारकाम इ. शिक्षण दिले जाते. फाईल पॅकिंग व स्क्रीन प्रिंटिंगचे पुरेसे प्रशिक्षण घेतलेल्या प्रौढ मतिमंदांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविण्याच्या हेतूने २००५ पासून मतिमंदाची संरक्षित कार्यशाळा सुरू करण्यात आली असून तेथे सध्या ६ विद्यार्थी आहेत.

**अर्धनिवासी गुरुकुल शाळा**

आजच्या औपचारिक शालेय शिक्षणाच्या मर्यादा लक्षात घेता व्यक्तिमत्त्व विकास हा शिक्षणाचा मूळ उद्देश सफल होत नाही. यावर उपाय म्हणून शिक्षण मंडळ, कऱ्हाडने निगडी-पुणे येथील ज्ञानप्रबोधिनीच्या धर्तीवर २००० पासून अर्धनिवासी गुरूकुल सुरू केले असून त्यात संस्थेच्या टिळक हायस्कूल, रा.कि.लाहोटी, कन्या प्रशाला, आत्माराम विद्यामंदिर या शाळांतील ५ वी ते १० वीच्या निवडक विद्यार्थी-विद्यार्थीनींना समाविष्ट केले आहे.

'नवनिर्मिती' या अशासकीय संस्थेमार्फत नीलिमा देशपांडे यांच्या मार्गदर्शनाने गणित विषयाची भीती काढून गणिताचे जगण्याशी नाते दृढ करणारा कार्यक्रम केला जातो. डॉ. शंतनु कुलकर्णी, संजय पुजारी, यांनी नवे वैज्ञानिक घडविणारी एक प्रयोगशाळा डॉ. कल्पना चावला विज्ञानकेंद्र (२००६) या नावाने सुरू केली आहे.

## एम एन रॉय अनौपचारिक शिक्षण संस्था

'माणूस हा मूलत: बुध्दिवादी आहे. श्रध्दा ठेवणे ही त्याची मूळ प्रवृत्ती नसून प्रश्न विचारणे व ज्ञान मिळविणे ही त्याची प्रवृत्ती आहे'. या मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांच्या प्रभावाने डॉ. राजेंद्र प्रसाद कुंभार यांनी त्यांच्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने १९९३ साली मानवेंद्रनाथ रॉय अनौपचारिक शिक्षण आणि संशोधन संस्था' सुरू केली. युनिसेफ, कपार्ट, विज्ञान व तंत्रविज्ञानविषयक केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांचे अनेक उपक्रम ही संस्था राबविते. मुक्त शेती शाळा, बाल-विज्ञान-प्रदर्शने, दप्तरांचे ओझे कमी करण्यासाठी प्रयत्न, पर्यावरण विषयक स्लाईड शो व व्याख्याने, पक्षी निरीक्षण इ. शिक्षण क्षेत्रातील कार्य या संस्थेने केले असून स्वस्त घरबांधणी, पावसाच्या पाण्याचा साठा करण्याचे तंत्र, जैविक कीड नियंत्रण, गांडूळ खत निर्मिती, भूकंपनिरोधक घरबांधणी, पवनचक्क्या व अवर्षण इ. विषयावर त्यांनी संशोधन केले आहे. महिला गवंडीकाम, जटानिर्मूलन, सर्पहाताळणी, टाकाऊपासून टिकाऊ यांचे प्रशिक्षण संस्थेते दिले जाते. संस्थेने' होळी बचाव ', 'गणेश उत्सव प्रदूषण विरोधी कार्यक्रम', 'वणवा निर्मूलन' अशी आंदोलनेही यशस्वीपणे पार पाडली आहेत. मानवतावादी विचार संस्कार शिबिर , आपले साहित्य संमेलन, बहुजन शिक्षण परिषद हे उपक्रमही या संस्थेले मोठ्या प्रमाणावर यशस्वी केले. 'निसर्गज्ञान' ह्या भीत्तिपत्रकाचे ३०० अंक काढून प्रसारित केले आहेत. डॉ. चंद्रकांत साळुंखे, दत्तात्रय शेवाळे, थळेंद्र लोखंडे, हेमंत भोसले, विजय माने, अमोल शिंदे, अविनाश बीचकर, बी.जे.पाटील इ. कार्यकर्त्यांनी स्वयंसेवा वृत्तीने ही संस्था चालविली आहे.

## अकोल्याची राष्ट्रीय शाळा

सातारा जिल्ह्यातील राष्ट्रीय भावनेने भारलेल्या काही तरूण मंडळींनी अकोला येथे राष्ट्रीय शाळा सुरू केली. त्यात कालगावचे आचार्य गुरूजी, शामगावचे अनंत हरी क्षीरसागर मुनी हे प्रमुख होते. कऱ्हाडचे रघुनाथ पुरुषोत्तम (आर. पी.) कुलकर्णी यांनी या शाळेत काही काळ गणित व इंग्रजी या विषयांचे अध्यापन केले. (१९३९). याच काळात या शाळेत सुभाषचंद्र

बोस यांनी भेट दिली होती, त्यावेळी त्यांच्याशी हस्तांदोलन करण्याची संधी आर. पींना मिळाली होती.

## ग्रंथालये

ब्रिटिश राजसत्ता आल्यावर इंग्रजी साहेबांच्या पुढाकाराने किंवा अनुकरणाने गावोगावी 'नेटिव जनरल लायब्ररी' निघाल्या. कऱ्हाडलाही १८५७ मध्ये 'नेटिव जनरल लायब्ररी' स्थानिक मंडळींच्या पुढाकाराने चावडीचौकातील त्या वेळेच्या नगरपरिषदेच्या कार्यालयाच्या माडीवर निघाली. यशवंतराव चव्हाण यांनी 'कृष्णाकाठ' मध्ये या वाचनालयाबद्दल 'कसेबसे चालणारे' असे वर्णन केले असले तरी 'हे वाचनालय व्याख्याने व चर्चा यांचे महत्त्वाचे केंद्र होत', असेही त्यांनी म्हटले आहे. या वाचनालयात 'ज्ञानप्रकाश', 'निबंधमाला', 'शिवाजी', 'बोध सुधाकर', 'अरुणोदय' आणि 'इंदुप्रकाश' ही मराठी आणि 'मुंबई टाईम्स', 'लंडन टाईम्स', 'टाईम्स ऑफ इंडिया', 'लंडन बोवेल्स', 'अमृत बझार पत्रिका' ही इंग्रजी वृत्तपत्रे १८७९ मध्ये येत होती. मधल्या काळात या वाचनालयाचे नामांतर 'सार्वजनिक वाचनालय' झाले. या वाचनालयाची व्यवस्था १९५२ पर्यंत नागरिकांच्या हाती होती. १९३२ पासून प्रतिवर्षी नवरात्रात शारदीय व्याख्यानमाला या वाचनालयातर्फे आयोजित केली जात असे. या वाचनालयाचे संगोपन – संवर्धन अप्रशिक्षित सेवक आणि मु. शं. देशपांडे, उध्दवराव कुलकर्णी इ. उत्साही कार्यकर्ते तुटपुंज्या उत्पन्नातून करीत, नगर परिषदेकडून प्रतिवर्षी अनुदान दिले जाई. शारदीय व्याख्यानमालेत होणाऱ्या व्याख्यानांचे सारांश पुस्तिकेच्या रूपाने प्रकाशित करण्याचा उद्योग किसनलाल प्रेमराज ट्रस्ट चे रामविलास लाहोटी यांच्या रु. १०० आणि पु. पां. गोखले यांच्या रु. ५०/– या देणगीतून काही वर्षे करण्यात आला. अपुरा सेवकवर्ग, वर्गणीची उधारी, कार्यकर्त्या मंडळींना स्वत:च्या व्यवसायातून मिळणारी सवड आणि राजकीय चळवळीतील त्यांचा सहभाग अशा अनेक कारणांमुळे या वाचनालयाची अक्षरश: वाताहत झाली होती. तशात हे वाचनालय जेथे होते ती, चावडीची इमारत ही दुरूस्ती देखभालीअभावी निरुपयोगी झाली होती. त्यामुळे या वाचनालयाचा प्रपंच

सोमवार पेठेतील धोपाट्यांच्या वाड्याजवळ असलेल्या एका पत्र्याच्या टपरीत गेला आणि अनेक चांगल्या, दुर्मिळ पुस्तका- नियतकालिकांची अक्षरश: वाट लागली. साहित्याचे प्रेम असलेल्या आणि ग्रंथालयाचे महत्त्व जाणणाऱ्या डॉ. श्री. म. कुलकर्णी आणि प्र. ल. करंबेळकर या त्या वेळच्या नगराध्यक्षांनी या वाचनालयाची जबाबदारी नगरपरिषदेकडे घेण्याचे ठरविले आणि नोव्हेंबर १९५२ पासून अवघ्या ३३७ पुस्तकांसह हे 'सार्वजनिक वाचनालय' 'नगर पालिका नगर वाचनालय' झाले. सुरूवातीस ते नगर परिषदेच्या रविवार पेठेतील पाण्याच्या टाकीखाली चालू झाले. १९६४ पासून नगरपरिषदेच्या सध्याच्या मुख्य कार्यालयातील माडीवरील दालनात होते. १९८७ पासून 'यशवंतराव चव्हाण स्मृतिसदनात' सध्याच्या जागी ग्रंथालयासाठी नियोजनपूर्वक बांधलेल्या स्वत:च्या इमारतीत हे वाचनालय आहे. तेथे तळमजल्यावरील १०७ फूट X ५० फूट या जागेत दोन लाख पुस्तके सहज सामावू शकतील असा ग्रंथालयाचा मुख्य विभाग असून त्याशिवाय ३५ फूट X २५ फूट अशा चार दालनात वृत्तपत्रांसाठी, महिलांसाठी, बालकांसाठी स्वतंत्र विभाग आहेत. या वाचनालयाच्या विकासासाठी त्यावेळचे नगराध्यक्ष पी. डी. पाटील यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. लोकनियुक्त नगरसेवकांपैकी ना. वा. ढवळे आणि र. पु. कुलकर्णी यांनीदेखील त्यात लक्ष घातले. नियमित वाचकांचेही सहकार्य मिळत गेले. १९६२ पासून प्रशिक्षित ग्रंथपाल आणि पुरेसा सेवक वर्गही उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे सर्व ग्रंथांचे शास्त्रीय (दशांश पध्दतीचे) वर्गीकरण आणि सूचिकरण होऊ शकले. आता वाचनालयात संगणकाच्या सहाय्याने हे काम होऊ लागल्यामुळे अधिक तत्परतेने सेवा देणे शक्य होईल.

या वाचनालयात विविध विद्या शाखांतील विषयांचे ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, जुन्या दुर्मिळ नियतकालिकांचे बांधीव अंक, जुनी पंचांगे असा सुमारे ५०,००० ग्रंथसंग्रह आहे. ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी अभ्यासिकांची सोय आहे. २००५-०६ या एका वर्षात अभ्यासिकेत बसून वाचणाऱ्या वाचकांना १३८६९८ ग्रंथ पुरविले तर ५०१४६ पुस्तके वाचकांना घरी वाचण्यासाठी देण्यात आली. वाचनकक्षात एका वर्षभरात सुमारे १०८,४११ वाचक येऊन गेले. ११११ महिला व १२७४३ बालकांनीही वाचनालयाच्या सोयीचा लाभ घेतला.या

वाचनालयास 'अ' वर्ग तालुका वाचनालयाचा दर्जा सातत्याने असून १९८८-८९ मध्ये अ वर्गातील सर्वोत्कृष्ट शहरी वाचनालय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मिळाला होता. डॉ. राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानची साखळी योजना या वाचनालयातर्फे पसिरातील सुमारे ५० वाचनालय - सभासदांसाठी नियमितपणे राबविली जाते. कृष्णाकाठी यशवंतराव चव्हाण समाधी परिसरातील पर्णकुटीत यशवंतराव चव्हाणांचे साहित्य स्वतंत्रपणे ठेवले असून तेथेही वाचनालयाची सोय नगर परिषदेने केली आहे.

चावडी चौकाजवळच शिराळकरांच्या वाड्यासमोर चिकुर्डेकरांच्या इमारतीत दिवेकर वैद्यांचा दवाखाना होता. त्या संबंधातही यशवंतराव चव्हाणांनी 'कृष्णाकाठ' मध्ये लिहिले आहे. दिवेकर वैद्यांचा दवाखाना म्हणजे जणू एक वाचनालय होते. पुण्या-मुंबईची (श्रध्दानंद, नवाकाळ, विविधवृत्त, ज्ञानप्रकाश, केसरी) पत्रे वाचण्यासाठी काही स्नेही तेथे जमत. गावातली बाबुराव गोखले यांच्यासारखी चार दोन प्रतिष्टित माणसे तेथे येत असत. कधीकधी त्या वाचनालयाच्या बैठकीत विषयांवर चर्चाही रंगत त्या बोधप्रद असत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कऱ्हाडात एक व्यापारी वाचनालय असल्याची नोंद आढळते. १९१९ ते१९२८ डॉ. शामराव वाचासुंदर, विनायकराव फणसळकर आणि पु.पां.गोखले यांनी 'श्रीकृष्ण' मोफत वाचनालय चालविले होते. शनिवार पेठेत शिर्के नावाच्या गृहस्थांनी केवळ ब्राम्हणेतर चळवळीचे वाङ्मय व वृत्तपत्रे असलेले एक वाचनालय चालविले होते. ते ताब्यात घेऊन त्यात राष्ट्रीय वाङ्मयाची व वृत्तपत्रांची भर घालून चालविण्याचा यशवंतराव चव्हाण व हरिभाऊ लाड यांचा मानस होता. तो अंमलात येण्यापूर्वीच शिर्के कऱ्हाडातून कायमचे निघून गेले होते. मुस्लीम हमदर्दे इस्लाम अंजुमन तर्फे कच्छी मशिदीसमोरील इमारतीत १९३७ ते १९४७ या काळात एक मोफत वाचनालय चालविले जाई. तेथे उर्दू-मराठी पुस्तके, वृत्तपत्रे असत. गोपाळ भिमाजी बदामी यांचे 'मनोरंजक वाचनालय' चावडीचौकातील एका माडीवर होते. जवळजवळ तीन तपे ते चालू होते. त्र्यंबक तुकाराम काळे यांचे दर्ग्याजवळ प्रभात न्यूज सर्विस हे वृत्तपत्र विक्रीचे दुकान होते. त्याला जोडून 'एक पैसा वाचनालय' असे वैशिष्ट्यपूर्ण नाव असलेले वाचनालाय १९३८

पासून १९४६-४७ पर्यंत चालले होते. सुधाताई ढवळे या विदुषीच्या स्मरणार्थ भाई व्ही. डी. चितळे यांच्या प्रोत्साहनाने कऱ्हाडात १९३७ - ३८ च्या दरम्यान एक ग्रंथालय चालू होते. तेथे राजकीय, विशेषत: साम्यवादी विचारसरणीची पुस्तके ठेवण्यात आली होती. १९५० ते १९५५ च्या दरम्यान बाळ घळसासी यांचे 'दिलखुष वाचनालय' आणि रा. गो. कोल्हटकरांची 'सर्क्युलेटिंग लायब्ररी' या प्रामुख्याने रहस्यकथा, कादंबऱ्या यासाठी प्रसिध्द होत्या. दिलखुष वाचनालयास जोडून बुकस्टॉल सुरू झाल्यावर वाचनालयाच्या विभागास मर्यादा पडली असली तरी पन्नासहून अधिक वर्षे या वाचनालयाने सेवा केली असून मेच्या पहिल्या आठवड्यात या वाचनालयाच्या वर्धापना निमित्ताने प्रतिवर्षी ग्रंथ-प्रदर्शन भरविले जाते.

ओगलेवाडीस १९५३ मध्ये 'अरूणोदय वाचनालय' निघाले, १९५७ मध्ये इंदुमती बेलापुरे यांनी स्थापन केलेले 'सुरुची महिला ग्रंथालय' गेली तीन तपे कार्यरत आहे. ५५०० हून अधिक विविध विषयांवरील ग्रंथ, १६ हून अधिक मासिके, ८ वृत्तपत्रे व बालवाचकांसाठी भरपूर बालवाङ्मय असलेल्या या ग्रंथालयाचे १२५ वाचक सभासद आहेत. या ग्रंथालयातर्फे विद्यानगर परिसरात व कृष्णा हॉस्पिटलच्या परिसरात अशी दोन फिरती ग्रंथालये आहेत. सध्या या वाचनालयाच्या अध्यक्ष शर्वरी बेलापुरे असून भारती जोशी या ग्रंथपाल आहेत.

यशवंतराव चव्हाणांनी आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ शिवाजीनगर येथे १९८४ मध्ये उभारलेल्या सौ. वेणुताई चव्हाण स्मारक ग्रंथालयात सुमारे ७५०० मौलिक ग्रंथ, दुर्मिळ मासिकांचे ४०० बांधीव ग्रंथ आहेत. हे संदर्भ ग्रंथालय असून तेथे अभ्यासकांसाठी बैठकीची व्यवस्था आहे. यशवंतराव चव्हाणांना देश परदेशात मिळालेल्या भेटवस्तू व त्यांची छायाचित्रे यांचे प्रदर्शन या ग्रंथालयाला जोडून आहे.

कऱ्हाडात सोमवार पेठेत भागवतबुवांचा (चरेगावकरांचा) मठ आहे तो जुन्या काळात 'पोथीशाळा, म्हणून ओळखला जाई. तेथे अनेक जुन्या पोथ्या असून मुद्रणकला उदयास येण्यापूर्वी येथून पोथ्यांच्या नकला करून नेत. पंताच्या कोटात वेदशास्त्र विद्या संवर्धन मंडळाचे ग्रंथालय स्थापना १९९९ असून तेथे ताडपत्रे, भूर्जपत्रे, कातडी, रेशीम इ. वरील

हस्तलिखित पोथ्या, वेद धर्मशास्त्र विषय विविध दुर्मिळ ग्रंथ आहेत. कऱ्हाड न्यायालयातील वकिलांच्या 'बार कौन्सिल' या संघटनेचे स्वतंत्र वाचनालय असून तेथे कायदेविषयक ग्रंथाबरोबर लॉ रिपोर्टर चे अंक, जुन्या न्याय-निवाड्यांचे संदर्भ उपलब्ध आहेत.

याशिवाय विद्यानगर (सैदापूर) येथे प्रा. डॉ. सुमन पाटील यांच्या प्रेरणेने सुरू झालेले समाजभूषण बाबुराव गोखले वाचनालय, मलकापूर येथे समाजप्रबोधन सार्वजनिक वाचनालय, कोयना वसाहतीत सुषमा कोळेकर यांनी स्थापन केलेले सिध्दिविनायक ग्रंथालय इ. कार्यरत आहेत. कऱ्हाडातील शिक्षणसंस्थांची विशेषत: महाविद्यालयांची ग्रंथालये क्रमिक पुस्तकांपुरतीच मर्यादित नसून संदर्भ ग्रंथ, देशविदेशातील संशोधन नियतकालिके यांनी समृध्द असून बहुतेक महाविद्यालयांच्या ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारती आहेत, तेथे अभ्यासिकांची सोय आहे, शिवाय दूरदर्शन, व्ही.सी.आर, प्रोजेक्टर इंटरनेट, इ. अत्याधुनिक दृक श्राव्य साधने, झेरॉक्सींग, संगणकीकृत सूची या सुविधाही उपलब्ध आहेत. महिला महाविद्यालयातील ग्रंथालयास 'सौ. मालती व गजानन सदाशिव ढवळे' (२००४) तर स. गा. म. महाविद्यालयातील ग्रंथालयात 'केशवराव पवार 'यांचे नाव देण्यात आले आहे. (२००६) शहरात ठिकठिकाणी सार्वजनिक संस्थांनी परिसरातील वाचकांसाठी पेटी-वाचनालये उघडून वृत्तपत्र वाचनाची सोय केली आहे.

महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीत कऱ्हाडचा मोठा वाटा आहे. त्यामध्ये पु.पां.गोखले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. ते कुलाबा जिल्हा ग्रंथालय परिषद (१९५५), महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषद जळगाव(१९५८)या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. १९६० साली राज्य ग्रंथालय समितीवर त्यांची निवड झाली होती. १९५९-६१ मध्ये ते महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे अध्यक्ष होते. सातारा जिल्हा ग्रंथालय संघ उभारणीतही तेच प्रमुख होते. ग्रंथपाल विठ्ठलराव पाटील, प्रा. डॉ. शिवाजीराव चव्हाण यांनीही ग्रंथालय चळवळीत मोठेच योगदान दिले आहे. सुरुवातीच्या काळात प्रा.डॉ.अ.श्री.भडकमकर , प्राचार्य अ.रे.डिसूजा, वि.पु.गोखले, शा.द.घळसासी यांचाही सहभाग होता.

पूर्वी ग्रंथपालन विषयासाठी प्रशिक्षणाची सोय नव्हती, अशा काळात

(१८९५ – १९१६) कृष्णराव वायदंडे (मांग मास्तर) हे सार्वजनिक वाचनालयात ग्रंथपाल होते. ते १८८९ साली मॅट्रिक झाले होते. ते त्या काळाच्या दृष्टीने उत्तम संदर्भ साहाय्यक होते. तत्कालीन नवनवीन पुस्तकांची माहिती देऊन ते वाचकांना ग्रंथालयाकडे वळवीत. विठ्ठलराव विष्णू पाटील यांनीही प्रयत्नपूर्वक स्वत: शास्त्रज्ञानाशी जवळीक करून घेऊन 'वाचकाला ग्रंथ नि ग्रंथाला वाचक' भेटवून 'ग्रंथपाल' म्हणून मौलिक कामगिरी बजावली आहे.

**संशोधन**

वकील, स्वातंत्र्यसैनिक किंवा खासदार म्हणून माहिती असलेल्या गणेश सदाशिव ऊर्फ दादासाहेब आळतेकरांनी मैत्रीय संमिघ, बोधायन काव्यायन आणि हर्बर्ट स्पेन्सरचे ग्रंथ यांचा सखोल अभ्यास करून मनू आणि याज्ञवल्क्य यांच्या भूमिकांची समाजशास्त्रीय उत्पत्ती शोधून काढली होती. त्यांच्या 'मनुस्मृती व याज्ञवल्क्य स्मृती' या प्रबंधाबद्दल त्यांना १९१८ साली मंडलीक सुवर्णपदक मिळाले होते. आपल्या उतारवयात त्यांनी भांडारकर संशोधन केंद्रासाठी वाल्मिकी रामायणावर अभ्यासपूर्ण प्रबंध सिध्द करून दिला. त्यांचे बंधू डॉ. अनंतराव अळतेकर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्राच्य विद्यासंशोधक होते. 'पश्चिम भारतातील शिलाहार राजे', 'हिंदु संस्कृतीत स्त्रियांचे स्थान', 'प्राचीन भारतातील शिक्षण'या विषयावरील त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. इतिहासंशोधक डॉ. ग. वा. तगारे कऱ्हाडचेच. पु. पां. गोखले यांनी जुन्या सातारा जिल्ह्यातील गाव नि गाव पायी घालून सातारा जिल्ह्याची सामाजिक-आर्थिक पाहणी बारकाईने केली, ते संशोधन 'परिचित सातारा' या नावाने प्रसिद्ध झाले आहे. आजचा वर्तमान हा उद्याचा इतिहास असतो या जाणीवेने दैनंदिन घडामोडीतील ठळक बाबींची नोंद आपल्या लेखांतून त्यांनी केली. कऱ्हाडच्या श्री शिवाजी विद्यालयातील एक शिक्षक भगवानराव घार्गे यांनी कऱ्हाड परिसरातील प्राचीन शिलालेख व अन्य साधने मोठ्या परिश्रमाने जमविली होती. शिवाजी विद्यालयात त्यासाठी पुरातन विभाग उभारला होता, ठिकठिकाणी वेळोवेळी प्रदर्शनेही भरविली होती. एवढेच नव्हेतर तरूण विद्यार्थ्यांना इतिहास संशोधनाची नजर देण्यासाठी गडकिल्ल्यांच्या सहलीदेखील ते आयोजित करीत.

उध्दव विष्णू रुईकर यांनी वयाच्या चौदाव्या वर्षी गणित भास्कर ही पदवी अभ्यासपूर्वक संपादन केली. १९२२ पासून त्यांनी 'घरचा ज्योतिषी' हे पंचांग तयार करण्यास सुरुवात केली.(१९४४ पासून हे पंचांग कऱ्हाडातून आजही नियमितपणे प्रसिध्द होते.) आकाशदर्शनाची व विविध ग्रंथाची माहिती होण्यासाठी, तसेच वेध घेण्यासाठी त्यांनी स्वतःच्या इमारतीत गच्चीवर चाप, तुरीया, शंकू, यष्टी, गोल,चक्र गुहा इ. विविध यंत्रे बसविली आहेत. रूईकरांना ज्योतिषाचार्य ही पदवी मिळाली असून १९६६ मध्ये कालहस्ती येथे भारतातील पंचांगकर्त्यांच्या परिषदेत त्यांची ग्रहताऱ्यांचे वेध प्रत्यक्ष घेऊन दाखविले. त्यामुळे कांची कामकोटीच्या शंकराचार्यांनी त्यांचा विशेष सन्मान केला होता. कऱ्हाडचे शिवभक्त बाळूमामा गरूड यांचा ज्योतिषशास्त्र व तंत्रमंत्रशास्त्राचा अभ्यास होता. त्यांना वाचासिध्दी होती असे म्हणतात. त्यांचे नातू डॉ. विनायक मोहन गरूड यांनी 'अथर्ववेदातील स्मार्त प्रयोगांचा अभ्यास' या विषयावर संशोधन करून टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची पीएच.डी. पदवी संपादन केली. दुर्मिळ हस्तलिखितांचे जतनकार्य या केंद्रशासित उपक्रमांसाठी महाराष्ट्राचे वरिष्ठ सर्वेक्षक म्हणून त्यांची २००३ मध्ये निवड झाली आहे. डॉ. नरेंद्र दत्तात्रय जोशी (उपाध्यक्ष, थरमॅक्स) यांच्या संशोधनाला एन. डी. डी. सी. चा पुरस्कार मिळाला आहे. महाराष्ट्र स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशनचे इस्टेट मॅनेजर वसंत केशव शाळीग्राम यांनी ऊस उत्पादन श्रेत्रात संशोधन (१९७८ मध्ये आडसाली ऊस हेक्टरी २४७ टन) केले याबद्दल राष्ट्रपती संजीव रेड्डी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला होता.

**व्याख्यानमाला**

नगरपरिषद नगरवाचनालयाकडे मूळच्या सार्वजनिक वाचनालयाकडून १९३२ पासून आलेला आलेला शारदीय व्याख्यानमालेचा वारसा नगर वाचनालयाने सातत्याने समर्थपणे चालविला आहे. एवढेच नव्हे तर बालकांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यात 'साने गुरूजी कथामाले' चा उपक्रम १९७२ मध्ये सुरू केला. कऱ्हाड शहराला भूषणभूत असलेल्या यशवंतराव चव्हाणांचा वाढदिवस प्रतिवर्षी १२ मार्चला

समारंभपूर्वक साजरा केला जाई. नगर परिषदेने १९७३ मध्ये या वाढदिवसानिमित्ताने 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' प्रतिवर्षी करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून अनेक व्यासंगी विचारवंतांची अभ्यासपूर्ण भाषणे तर झालीच पण त्याहून विशेष म्हणजे अगदी पहिल्या वर्षापासूनच ती भाषणे 'अक्षरबध्द' करून नगर परिषदेने ग्रंथरूपाने प्रकाशित करण्याचा पायंडा पाडला. त्यामुळे हे विचारधन 'सार्वकालिक' होऊन 'सर्वदूर' जाऊ शकले. या व्याख्यान पुस्तिकांपैकी १९७९ व १९८१ च्या पुस्तिकांचा समावेश शिवाजी आणि मुंबई विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात झाला. यावरून हा उपक्रम अभ्यासक – संशोधकांच्या दृष्टीनेही उपयुक्त असल्याचे प्रमाणपत्रच मिळाले आहे.

१९४९ पासून ज्ञानेश्वरी जयंती उत्सव मंडळाच्या वतीने होणारी ज्ञानेश्वरी जयंती उत्सव, गीताजयंती आणि तुकाराम बीज या निमित्ताने होणारी प्रवचने, स्वातंत्र्यवीर सावरकर, दादासाहेब आळतेकर, बाबुराव गोखले, बंडोपंत धर्माधिकारी यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने होणारी व्याख्याने, सुयोग सुबोधिनी तर्फे १९९४ पासून होणारे मासिक प्रबोधन कार्यक्रम या सातत्याने होणाऱ्या उपक्रमांबरोबरच राजकारणविरहित सर्वसमावेशक व्यासपीठ असलेल्या 'चौफेर' ची व्याख्याने चर्चासत्रे शिबिरे हे कार्यक्रम आणि संभाजीराव थोरात यांनी ज्ञानेश्वर विद्यापीठ, प्रबोधन प्रतिष्ठान अशा संस्थांद्वारे केलेले प्रयत्न, तसेच संत फुटाणे, पु.पां.गोखले आणि भा.म.पागनीस, बंडामहाराज कऱ्हाडकर , विवेक घळसासी यांनी महाराष्ट्रातील गावोगावी भक्ति – अध्यात्माचा मळा पिकविण्याचे काम निष्ठेने केले. एम्. बी. जोशी, श्रीपाद पेंढारकर, शाहीर ए.के.यादव, रा.गो.प्रभुणे, के.एन.देसाई, पी.एस.खोचीकर, बी.के.मालेकर, अशा व्यक्तींनी निरनिराळ्या संस्थांत संकल्पपूर्वक दिलेली व्याख्याने, प्रवचने आणि अशा तऱ्हेचे अनेक उपक्रम कऱ्हाडात सातत्याने चालूच असतात. अशा रीतीने कऱ्हाड नगरीत विद्येचा सुगंध दशदिशांत दरवळून राहिला आहे.

*****

## १०

# 'साहित्यिक कऱ्हाड'

**प्राचीन काळ**

इसवी सनापूर्वी दोनशे वर्षांपासूनचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या कऱ्हाडातील आणि परिसरातील शब्दसृष्टीच्या ईश्वरांनी घडविलेल्या जुन्या – नव्या लेण्यांचा मागोवा घेताना आढळ होतो तो कऱ्हाडकरांच्या पांडित्याच्या प्रकर्षाचाच. नारायण तिमण्णा दीक्षित ऊर्फ पूर्णानंद (१५७८ – १६२८) यांनी 'अवधूतगीते' वर टीका लिहिली व 'शिवपार्वतीपरिणय' काव्यात पौराणिक कथाभाग घेऊन त्याची परिणती अध्यात्मात केली आहे.

मसूर येथे कल्याणस्वामींनी समर्थ रामदासांच्या 'दासबोधा' चे लेखन केले. सतीबाई शहापूरकरांचा भाच्चा तंजावर शहापूर मठांचा महन्त भीमस्वामी (मृ.१६३३)यांनी 'समर्थचरित्र' लिहिले. त्यांनी समर्थांच्या पिसाट वृत्तीचे वर्णन कडाका या वृत्तात केले आहे. सज्जनगडावर समर्थांच्या निर्वाणप्रसंगी स्वत: हजर असल्यामुळे भीमस्वामींनी त्या प्रसंगाचे पन्नास ओव्यांत केलेले वर्णन हृदयस्पर्शी आहे.

येल्होबा ऊर्फ यल्हेश्वर नरसिंह पाठक म्हणजेच निरंजनस्वामी कऱ्हाडकर (१६३७–१७२७) यांनी पंढरपूर येथे 'गणेशगीतेवर' टीका लिहिली (१६९२). गणेशभक्तिपर अल्पाक्षररमणीय विपुल स्फुट अभंगरचना केली. गणेशाच्या लीला त्यांनी मोठ्या कौतुकाने वर्णन करून सांगितल्या. "क्रीडा करिता वाजताती खुळखुळे वाळे । ज्याच्यासंगे सज्जनजन निवती भोळे । गणपती राहे ज्याचे अंतरि । मुक्तची तो संसारी रे ।" अशा पद्यांतून त्यांची नादमधुर वाणी प्रत्ययास येते .

" सुपारीच्या ठायी गणेश पूजीला । देव झाला नाही पूगीफल ।।
सुपारीच्या नावे देवास पूजणे । ऐसे हे वाचेने न बोलावे ।।
विनायक विश्वरूप दावी लीला । परंतू तयाला जन नेणे ।।
हेमाचा नागला केला तरी सोने । नाही माले उणे सुवर्ण ते ।।
सुवर्णासी नागपण नाही सत्य । तैसा सर्वातीत निरंजन ।।"

अशा अभंगवाणीने निरंजनस्वामींनी निजामी मुलखापर्यंत आपला गणेश सांप्रदाय विस्तारला. शिवदिन केसरी, समर्थ रामदास या समकालीन संतांनी त्यांचा गौरव केला होता .

समकालीन भाविकांप्रमाणेच, आधुनिक चिकित्सक रसिकांच्या मान्यतेस पात्र ठरलेली भागवताच्या दशमस्कंधावरील 'हरिवरदा' ही टीका कोपर्डे येथील नरहरी नारायण कुलकर्णी (कृष्ण-दयार्णव ) (१६७४-१७४०) यांनी लिहिली. संत एकनाथ, गोविंदगुरू व भागवत ही त्यांची श्रद्धास्थाने होती. १७१८ मध्ये त्यांना महारोगाचा उपद्रव सुरू झाला. नंतर नाथांनी त्यांना स्वप्नात येऊन ग्रंथरचनेचा आदेश दिला. 'हरिवरदा' या ग्रंथाच्या पानापानामध्ये पांडित्य आणि कवित्व बहरून आले आहे. "साखर घालूनि पहावी तोंडी । येरा पुसावी न लगे गोडी । तैशी एथीची श्रवणावडी । अपरोक्ष जोडी आणील" या शब्दांत कृष्णदयार्णवांनी 'हरिवरदे' ची गोडी वर्णिली आहे 'हरिवरदा' श्रवण करताच श्रोत्यांच्या संशयाचा संहार होऊन भेदाचा आवाक्ष मोडेल असे त्यांनी आत्मविश्वासाने म्हटले आहे. सहज सुंदर उपमा - दृष्टांन्त, बहारीची वर्णने व सुभाषितांची पेरणी जागोजागी दृष्टोत्पत्तीस येते. डॉ. रा.चि. ढेरे या ग्रंथाविषयी म्हणतात की, "अनुप्रासाची पैंजणे बांधून दयार्णवांची सरस्वती जणू कृष्णमूर्तीपुढे पूजानृत्य करीत आहे असा भास हा ग्रंथ वाचून होतो." या ग्रंथात आलेली विविध शास्त्रांची व विषयांची बारीक-सारीक माहिती वाचून मन थक्क होते. त्यांचे शब्दभांडार समृद्ध आहे. संस्कृतप्रचुर शब्दांबरोबर जुने मराठी शब्द ते वापरतात तर कधी उदबचीसारख्या यावनी शब्दासाठी 'सूरभिनिर्यासचूर्णशलाका' सारखे प्रतिशब्द निर्माण करतात. 'हरिवरदा' खेरीज, 'तन्मयानंदबोध', 'चिन्मयानंदबोध' ,'दत्तजननोत्सव', 'विचार - चंद्रिका' इ. रचनाही त्यांनी केली आहे.

“ नाही वेण न दुखे पोट । नाही प्रसूति संकट ।
अद्‌भूत बाल झाले प्रकट । श्री वैकुंठ निजरूपे ।।
तेणे (वसुदेवे) देखोन अद्‌भूत बाळ । विस्मये दाटला केवळ ।।
उत्फुल्लित नेत्रकमळ । पाहे चंचल चकितत्वे ।
अद्‌भूत तेज:पुंज बाळ । स्वप्रकाशे बंदिशाळ ।
धवळी तैसेचि हृदयकमळ । केले सोज्वळ जनकाचे ।। ”

असे कृष्णजन्माचे वर्णन त्यांनी केले आहे .

प्राचीन स्मृति – पुराण – निबंधादी ग्रंथांतील शेकडो वचने उद्‌धृत करून प्रत्येक तिथीची स्मृतीने सांगितलेली व पुराणोक्त कृत्ये समजावून सांगणारा ‘तिथितत्त्व’ हा ग्रंथ यज्ञेश्वर नारायण ढवळीकर यांनी १७४४ मध्ये लिहिला. सातारकर प्रतापसिंह महाराजांकडील गुणी पुराणिक गोपाळाचार्य कालगावकरांनी ‘नीतिमंजरी’, ‘राघवचंपू’, ‘राधा विलास’, ‘रासार्या’ ‘विठ्ठलार्या’ या ग्रंथाबरोबरच प्रतापसिंह महाराजांसाठी महाभारताचा मराठी तर्जुमा तयार केला होता. रामचंद्र दैवज्ञांनी लिहिलेल्या ‘छंदोमंजिरी’ ची अपूर्वाई नजरेत भरण्यासारखी आहे. ग्रंथारंभी ‘राम ज्योतिषी’ असे स्वत:चे नामाभिधान त्यानी दिले आहे. या ग्रंथात एकाक्षरी वृत्तापासून २६ अक्षरी वृत्तापर्यंत एकूण ९२ अक्षरगणवृत्तांची सोदाहरण माहिती दिली असून उदाहरणे अतिशय रसाळ आहेत.

त्रिपुटी ( ता. कोरेगाव जि. सातारा) येथील गोपाळनाथांच्या प्रेरणेने कार्वे येथील शाहीर शेख सुलतान (१७५०) यांनी भक्तिप्रधान काव्यरचना केली.

निरंजनस्वामी कऱ्हाडकरांचे पुत्र रत्नाकर यांचीही काही पद्ये आहेत. त्याचप्रमाणे रत्नाकर देवांचे चिरंजीव भगवंत देव यांनी आपल्या आजोबांचे लिहिलेले (१७६१) चरित्र शैलीच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे. “ माहाशोके दीर्घस्वरे आक्रोश करीते वेळे... कित्येकांचे हृदयस्फोट होऊ पाहाति. कोणी भूमीवर लोळती. कोणी वक्ष, मुखे पिटती, मूर्च्छा पावती. कित्येक देहभान विसरले. कित्येक पिशाचवत

जाहले, वस्त्र–यज्ञोपवीत गेले न कळे. कोणी म्हणे दिवस की रात्री ? कोणी म्हणे हे स्वप्नसंपत्ती! जो विश्वाचा मायबाप तो कैसा आम्हांस मोकलील ? कोणी म्हणे, आम्हांसी मारताचि भले. कोणी म्हणे, जळीं देह टाकावे, की पर्वतीं कर्वतीं घालावे, की विषप्रयोगें नाशावे. किमर्थ वांचावे या दुःखीं ?

धावे पावे श्रीनिरंजना । मायबापा सख्या सज्जना ।।
कां मोकलिशी बाळका दीना । कृपाघना भेटे गा ।।

आजी आम्हां मीना समुद्र आटला, की आम्हां पाखिरांस वृक्ष उपळला, कीं आम्हा वनचरांचा पर्वत पूर्ण जाहाला, कीं पद्मास चंद्र लोपला, कीं कमळास सूर्य कंटाळला, का धेनूनें वत्स लत्तें पाडिलें, की मांतेनें बाळा विष दिलें कीं लेंकुरासी विकिलें पित्यानें ? गेला रे गेला मायबाप, धन, पुत्र, मित्र ! आमुचे प्राण, तन, मन, धन न राहती !'' हे निरंजनस्वामींच्या समाधिवेळेचे त्यांनी केलेले वर्णन ह्रदयाला पिळवटून टाकणारे आहे. हे चरित्र म्हणजे कऱ्हाडातील प्राचीन मराठी गद्याचा पहिला अवतार म्हणावा लागेल.

वारकरी संप्रदायात आपल्या अनन्वित भक्तिभावाने संतपदास पोचलेली संत सखुबाई (१७४०–१७८२) आधुनिक काळात चित्रपट – नाटक – कवितांचा विषय झाली आहे. तिचा एक अभंग असा आहे. 'धाव देवा, देवा धाव । किती घेऊ विठ्ठल नाव ।। सासुमाई मारी लाथ । सुटे संसार हातोहात ।। देवा एकच आळवणी । तुझे पाय जीवा धनी।।'' ( साहित्यिक कऱ्हाड : पु. पां. गोखले पृ. १६). हाही प्रक्षिप्त असावा. सरोजिनी बाबर संपादित 'जनलोकांचा सामवेद' या ग्रंथात 'गणगोत' प्रकरणात संतसखूविषयी तीन पदे आहेत.

रामचंद्र दैवज्ञांचे शिष्य गोविंद बाळकृष्ण दीक्षित (१७८३–१८५४) यांचे 'मंजूषा', 'तरंगिणी', 'कालप्रबोधोदय', ' एकादशी प्रकाश' इ. ग्रंथ आहेत. शिरगाव मठाचा अधिपती, कल्याणस्वामींचा पणतू भीमस्वामी यानी भक्तलीलामृत ग्रंथ लिहिला आहे. (१७९७). त्यात श्री समर्थांसह सदतीस भक्तांची चरित्रे आहेत.

मूळ कुरोलीच्या आनंदनाथ ( मृ.१८०३) यांनी कऱ्हाडास जगदंबेची आराधना केली. त्यांनी ‘ भक्तमंजरी ’ लिहिली.

पंत – पंडित परंपरेतील अखेरचा दुवा म्हणजे विठोबा अण्णा दप्तरदार (बेंद्रे) (१८१३–१८७३). यांनी प्रामुख्याने संस्कृतमध्ये रचना केली. ‘सुश्लोकलाघव’ हा त्यांचा संस्कृत काव्यसंग्रह. त्यातील श्लेषात्मक रचना, कोटीबाजपणा, कल्पनाचातुर्य वाखाणण्यासारखे आहे. त्यांची मराठी पदे ‘पदसंग्रह ’, ‘पद्यरत्नमाला’ या संग्रहात आहेत. ‘श्रीरंगा, दे मजला सत्संगा ’ या पदात त्यांच्या हृदयातील आर्तता दिसते, तर ‘उत्तम जन्मा येऊनि रामा गेलो मी वाया ’ अशी त्यांची खंत दुसऱ्या पदात व्यक्त होते. ‘ मधुरिपुमधुविपिनी मधुकाली ।। धृ ।। सखि मधु मधुरतर मंजुळ । वाजवितो मुरली ।। ’ यासारखी जयदेवाच्या मधुरकोमलकांत पदावलीची आठवण करून देणारी गोड पदे या संग्रहांत आहेत. सुभद्राहरणांतील त्रिदंडी संन्यास घेतलेल्या अर्जुनाचे चित्र त्यांनी रेखाटले आहे. ध्रुवाने तपश्चर्या केल्यावर देवाने त्यास आपले चतुर्भुज रूप दाखविले ते ‘कोटिकोटि कंदर्प रूपलावण्य दर्पहर मनोहर ध्यान ’ पाहताच ‘ जणु नयनांत भरावे, हुंगावे, दृढ आलिंगावे की चुंबावे’ असेच कोणालाही वाटावे. विठोबाआण्णांनी ‘सत्पथलाघव’ नावाची गीतेवर गद्य टीकाही लिहिली आहे, ती अपूर्णावस्थेतच आहे. तसेच पुनर्विवाहासंबंधीच्या वादानिमित्ताने त्यांनी ‘विवाहतत्त्व’ या नावाचा ग्रंथ रचला होता.

आत्मारामबुवा चरेगावकर यांनी ‘ समर्थांचे ओवीबध्द चरित्र ’ ( १८६७) ‘संतविजय’ व ‘हनुमंत स्वामींच्या बखरीं’च्या आधारे लिहिले.

शाहीर संभू – राजू यांच्या तुरापक्षाचे एक श्रेष्ठ कवी म्हणून चिलू सोनार ( १८५८ ते १९०१), जखिणवाडी यांचे नाव गाजले होते. आगाशिवाच्या डोंगरावरील कालभैरवाचे भक्त असणाऱ्या चिलू सोनारांनी आपली कवने बाबाजी नलवडे या मित्रांस गावयास सांगितली. त्यामुळे त्यांची उपलब्ध असलेली चार – पाचशे कविता शाहीर चिलू बाबाजी

याच नावाने प्रसिध्द आहे. आपल्या एका पदात त्यांनी कऱ्हाड क्षेत्राचे माहात्म्य वर्णिले आहे. त्यांची परंपरा याकुबभाई बागवान, कऱ्हाड ( १८७७-१९६७), रामचंद्र गुरव (१९०२ - १९७२) जखिणवाडी, मारूती विभूते कऱ्हाड ( १८७९-१९३४), बाबुराव सिंगोबा चव्हाण आणि राजाराम नलवडे, जखिणवाडी अशी आहे. कृष्णा कोयनांच्या संगमावर पर्वणीच्या वेळी शाहिरीचे फड चालत, त्यामध्ये चिलू बाबाजीचा हात धरणारा कोणी भेटत नसे. कऱ्हाडात बंडू दरवेश यांची कलगी परंपराही आहे.

मध्यंतरीच्या काळात नावेच्या रेठऱ्याचे श्रीधर कृष्ण कुलकर्णी ऊर्फ पठ्ठे बापूराव ( १८६६-१९४५) यांनी शाहीर हैबतीच्या भेदिक कवनांतील प्रयोगशीलतेतून प्रेरणा घेतली. निवेदनाला नृत्य, नाट्य, संगीताची जोड देणारा वगनाट्य हा नवा प्रकार त्यांनी तमाशा क्षेत्रात सुरू केला. 'तात्या बापूचा फार्स', ' मीठाराणीचा वग' , 'सासु-सासऱ्याचा झगडा', 'मुंबई शहरावरील लावणी ' या त्यांच्या रचना प्रसिध्द आहेत. पठ्ठे बापूरावांमुळे कऱ्हाडचे नाव महाराष्ट्रभर झाले. प्रसिध्द साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी 'बटाट्याची चाळ' हे नाव पठ्ठे बापूरावांच्या 'मुंबईच्या लावणी'तून घेतले आहे.

वाघेरी येथील बापूराव लुकतुके यांनी ' सवाई पठ्ठे बापू ' या नावाने लावण्या लिहिल्या. अलीकडील काळात तुरा पक्षाचे शाहीर बाबुराव चव्हाण आणि कऱ्हाडचे लोकशाहीर आत्माराम केरू यादव यांनी शाहिरी परंपरा चालू ठेवली होती.

पूर्वीच्या काळी स्त्रिया फारशा शिकल्या नसल्या तरी त्या सहज सुंदर काव्ये करू शकत. गोपाळ गणेश आगरकरांची आई सरस्वती. ती माहेरची ठकू भागवत. फावल्या वेळात ती देवादिकांची गाणी रचत असे. यशवंतराव चव्हाणांच्या मातोश्री विठाबाई चव्हाण यांनी देखील अनेक ओव्या लिहिल्या आहेत. त्या अलीकडे 'ओव्या विठाईच्या ' नावाने पुस्तकरूपाने उपलब्ध झाल्या आहेत.

**अर्वाचीन काळ**

**निबंध – प्रबंध**

निबंधमालेपासून प्रेरणा घेऊन गोपाळ गणेश आगरकरांनी सामाजिक विचारांचा सिध्दांत प्रथम 'केसरी' तून व नंतर 'सुधारक' पत्रातून मांडला. चिकित्सक आणि अभ्यासपूर्ण वैचारिक निबंधांच्या क्षेत्रात समाजसुधारणेच्या तळमळीने आपल्या लेखांतून चैतन्य निर्माण करणारे आगरकरांचे निबंध विचारसौंदर्य आणि भाषाशैली या दोन्ही दृष्टींनी सरस ठरतील. प्रचलित प्रश्नावर अभ्यासपूर्ण लेखन आणि भाषणे पु. पां. गोखले सातत्याने करीत. त्यातूनच त्यांची 'बोलबाला' (१९३९), ' भारतभाव' (१९५२), 'देशसेवेसाठी स्वयंसेवक संघटना' (१९६०) ही पुस्तके सिध्द झाली. त्यांनीच 'जागृत सातारा' या नावाने सातारा जिल्ह्याचा १९६० पर्यंतचा इतिहास लिहिला आहे. ग. स. आळतेकरांनी 'श्रीरामदर्शन', 'सीतादर्शन', 'हनुमानदर्शन' इ. पुस्तकातून वाल्मिकीच्या रामायणाचा परिचय करून दिला. यशवंतराव चव्हाणांनी प्रसंगविशेषाने केलेली सुंदर व्याख्याने त्यांच्या 'युगान्तर' , 'भूमिका' व 'सह्याद्रीचे वारे ' या संग्रहांत शब्दबध्द झाली आहेत. वि. स. पागे (भगवंताशी संवाद,) मारूतराव नारायण कोपर्डे ('पंचामृत') (१९२७), भा. ना. विपट ('मृत्युलोकाचा प्रवास' –१९४४) वि. वा. नेने, अरविंद महादेव देशपांडे ऊर्फ प्रणवानंद, मधुसूदन गोपाळ फडके यांचे लेखन प्रामुख्याने अध्यात्म, तत्वज्ञानपर आहे. संतवाणीचा राष्ट्रीय उद्‌बोधनाला उपयोग व्हावा म्हणून भगवंत महादेव कुलकर्णी ('बालगीता'), बाळकृष्ण पांडुरंग कोल्हापुरे('समर्थ सुभाषित') आणि सदाशिव खंडो आळतेकर ('मनीबोध') यांनी प्रयत्न केला. अनंतराव आळतेकर, ('वेदकालीन शैक्षणिक इतिहास'), बा. वा. आचार्य कालगावकर, श्री. व्यं. नखाते ('इस्लामचे क्रांतिकार्य'), कृ. पां. कुलकर्णी ('भारतवर्षाचा इतिहास'), ना. ह. विंगकर ('स्वातंत्र्य मिळाले पण कुणाचे?'), डी. एम. पाटील ( साताऱ्याचे पहिले लोकराज्य प्रति सरकार), गो. रा. माटे (असा आमचा सातारा जिल्हा) यांचे ऐतिहासिक विषयावर ग्रंथ प्रसिध्द झाले आहेत. बाळकृष्ण वामन धोपाटे ('विवेकानंद'), ल. ब. हरोलीकर

(‘तत्त्वज्ञान’), नारायण बाळाजी बुधकर (‘कायदा’), लक्ष्मण महादेव देशपांडे (शेती–शेतकरी), द. पां. पाठक (कालिदास), बाळकृष्ण पांडुरंग कोल्हापुरे (लैंगिक शिक्षण व संतती), पां. न. वळवडे (शारीरिक शिक्षण), रा. पां. वैशंपायन (समाज – राज्यशास्त्र), यांचे निबंध अभ्यासकांच्या कौतुकांचे विषय आहेत.

शैक्षणिक समस्यांवर शंकरराव करंबेळकर, वा. मो. कोळेकर, अविनाश भडकमकर, रा. गो. प्रभुणे, शामराव घळसासी, ज्योती सप्रे, अल्बर्ट डिसुझा यांनी अनुभवाधिष्ठित चिंतनपर लेखन केले आहे. इंदुमती पोळ यांनी ‘विकासवाडीच्या वारली विद्यार्थ्यांचे मानसशास्त्रीय संशोधन’ केले. माणिक माने यांनी समाजशास्त्रीय संशोधन व तदनुषंगाने ‘दक्षता’ मासिकातून गुन्हेगारांविषयीच्या कथाही लिहिल्या. पु. पां. गोखले यांनी (‘परिचित सातारा’,‘सहकार संपदा’) कृ. गो. सरडे (‘रत्ने आणि मोती’, ‘सराफ परिचय ग्रंथ’,‘सहकारी बँकांची तोंडओळख’) यांचे आर्थिक विषयावरील लेखन प्रसिध्द आहे. प. गो. माटे यांनी सामान्यजनासही समजावे अशा सोप्या भाषेत वृत्तपत्रांतून विज्ञानविषयक लेखन केले तर प. रा. आर्डे यांनी अंधश्रध्दा निर्मूलनासाठी अभ्यासपूर्ण पुस्तके लिहिली आहेत. सी. वा. उमर्जीकर यांनी ‘भूकंपकन्या त्सुनामी’ अशी ज्ञानरंजक पुस्तिका लिहिली आहे.

‘मराठी भाषेचा उद्‌गम आणि विकास’ कसा झाला याचे विवेचन कृ. पां. कुलकर्णी यांनी केले. पंडित आवळीकर यांची ‘जी.एं. ची कथा’, ‘वाङ्मयचिंतन’, ‘ जुने वाङमय’, ‘नवे वाङमय’, शैलजा मळेकर यांचे ‘संस्कृत साहित्यांबरी स्त्री तारका’ ही पुस्तके उलेखनीय आहेत. डॉ. मदन पांडुरंग कुलकर्णी (कापील) यांनी ‘मराठी प्रादेशिक कादंबरी’, ‘मुक्तीबोधांच्या कविता’, ‘यल्लमाच्या जोगतिणी’ हे विवेचक ग्रंथ लिहिले आहेत. ह. बा. कुलकर्णी आणि कन्हैय्या कुंदप यांचे तत्त्वज्ञान संशोधनपर लेखन प्रसंगोपात्त प्रसिध्द झाले आहे. सुहासकुमार बोबडे व सुलक्षणा कुलकर्णी यांनी ‘भावहिंदोळे स्त्रीमनाचे’ या नावाचा ग्रामीण लोकगीतांचा संग्रह अभ्यासपूर्ण टिपणांची जोड

देऊन संपादित केला आहे. तर माणिक माने यांनी विद्याधर पुंडलिकांच्या कथांचा संग्रह 'बहर' नावाने संपादित केला आहे. काळाची गरज म्हणून मराठी साहित्यात कृषिसाहित्य हे नवे दालन सुरू झाले असून शिवाजीराव ठोंबरे यांनी शास्त्रोक्त आधार आणि व्यावहारिक दृष्टिकोन घेऊन जवळजवळ शंभर ग्रंथ तयार केले. ' शेतीचा दवाखाना' हे एक उदाहरण. वा. मो. कोळेकर यांचा खगोलविषयक 'सूर्यप्रभा', तसेच उध्दव विष्णू रुईकरांची ज्योतिषविषयक पुस्तके यांचीही नोंद घेतली पाहिजे.

**कविता**

कऱ्हाडातील आधुनिक काळातील कविमंडळींत केशवसुतांच्या आणि रविकिरण मंडळाच्या कवितांचे अनुकरण करणारे बहुतेक कवी होते. कृष्णाजी आबाजी गुरुजी 'भवानी तलवार' या कवितेमुळे आपल्या नोकरीस मुकले होते. जगन्नाथ वामन हर्षे 'आनंदीरमण' नावाने कविता लिहित. त्यांचा व केशवसुतांचा पत्रव्यवहार होता. ' कविता म्हणजे आकाशीची वीज आहे ' असा संदेश देणारे केशवसुतांचे आनंदीरमणांना लिहिलेले पत्र आजच्या कवींनाही उद्बोधक ठरेल. ('विश्रब्ध शारदा' या ग्रंथात पृ २९७ – २९९ हे पत्र आहे.) महाराष्ट्रभाषाचित्रमयूर कृष्णाजी नारायण आठल्ये यांची 'सासरची पाठवणी', 'माहेरचे मूळ' रसिकांच्या पसंतीस उतरली होती. गोविंद चिंतामणी भाट्ये यांच्या 'शिवप्रताप' काव्यास पुण्याच्या डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीने बक्षिस दिले होते. 'बाळकृष्ण' या टोपणनावाने कविता लिहिणारे बा. वा. घाटे यांचे 'हिरकणी', 'शिववात्सल्य', 'सातावरील शून्य', 'हादग्याची गाणी', 'हे अंतरंग माझे' हे काव्यसंग्रह. बसल्या बैठकीला ईशस्तवने, स्वागतगीते, मंगलाष्टके, हुकमी लिहून देण्यात घाटे यांचा हातखंडा होता. रामचंद्र विष्णू कुलकर्णी उर्फ विष्णुसुत यांच्या ' हुरडा ' या काव्यसंग्रहास ग. ह. पाटील यांची प्रस्तावना आहे. त्यांची 'मोतीवाला'ही कविता म्हणजे उसन्या कवीचा व्याजोक्त पाणउतारा होय. याच काळात वेगळ्या वाटेने जाणारे कवी वि. गं. उर्फ पंडित सप्रे. कल्पनाचमत्कृती,

अल्पाक्षररमणीयत्व, मार्मिकता, सूक्ष्म विनोद आणि उपरोध यांच्या साहाय्याने जीवनातील विसंगती दाखविणारा त्यांचा एकमेव काव्यसंग्रह म्हणजे 'अर्धचंद्र'. दत्तप्रसन्न कारखानीस यांची 'क्षितिजावर' संग्रहातील पद्यरचना रसिकांच्या कौतुकास पात्र झाली आहे. आकाशवाणीच्या माध्यमामुळे कवि विहंगांची कविता सर्वत्र पसरली. 'ललित संगीत', 'तेजस्विनी' हे त्यांचे काव्यसंग्रह. 'अशीच एक मध्यरात्र', 'पंधरा मुखांचा महाभारत' अशा काही संगीतिकाही त्यांनी लिहिल्या.राष्ट्रप्रेम, विषयांचे वैविध्य आणि गेयता ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये होत. केशवसुत आणि रविकिरण मंडळाच्या प्रभावाबाहेर पडून वासंती मुझुमदार यांनी कविता लिहिल्या. 'सहेला रे', 'सनेही' हे त्यांचे काव्यसंग्रह. मुख्यत: निसर्ग प्रतिमांतून उत्कट भावानुभूती व्यक्त करणाऱ्या त्यांच्या कवितांत त्यांची रंग-रेषा-आकार, नाद आणि लय यांची तीव्र जाण उमटलेली दिसते. 'वेळूबनातील शीळ' आणि 'संचिताचे देणे' या दोन संग्रहांत अनुराधा (धायगुडे) साळवेकर यांच्या कविता आहेत. प्राधान्याने प्रेम कविता, वात्सल्य, कौटुंबिक सुख दुःखे इ. अनुभव सर्वसाधारण पातळीवर असले तरी त्यात भावनेची उत्कटता, नादमय व लयबद्ध भाषेतून झालेली अभिव्यक्ती यामुळे त्यांच्या कविता सरस ठरल्या आहेत. पंडित आवळीकर ('दीपराग', 'स्वप्नवंती', 'प्रणयिनी', 'श्रेयसी'), 'विंझणवारा' सारख्या उत्कट कविता लिहिणारे शांताराम रामचंद्र शिंदे यांचेही कवितेच्या क्षेत्रात मोठे नाव आहे. भय्याशास्त्री वाटवे यांनी रवींद्रनाथ टागोरांच्या निष्कृती या काव्याच्या आधारे 'परिपूर्ती ' हे खंडकाव्य लिहिले आहे.

बबनराव नावडीकर ('गीत दासायन'), वा. मो. कोळेकर ('रांगतो अंगणी'), मु. शं. देशपांडे ('काव्यकुंज'), वि. स. पागे ('अमर पक्षी', 'पहाटेची नौबत'), सिंधू नामजोशी ('पडसाद'), प्रकाश केशव थोरात ('मनविहंग'), विजया मधुकर भाटे ('रुधिराभिषेक'), शरद उमराणी ('माळ'), नथुराम माने ( 'ज्योत', 'आत्मानंद'), विजय माळी ('डोहातलं चांदणं'), महादेव साने ('शब्दगंध'), विवेक घळसासी ('रेघोट्या'), त्र्यं. ग. घारपुरे ('बेलाची पाने', 'घाणेरीची फुले'), सुरेश मोकाशी ('चैतन्यकल्प'), मोहन गरूड ('शिवस्तुती'), प्रभाकर बिडवे ('बकुळफुले', 'आहुती'), चंद्रकांत

शेजवळ ('गहिवर'), शुभांगी पवार ('तरीही मी तुझीच'), चंद्रकांत गोविंद कुलकर्णी ('पिंपळपान'), असे अनेक उल्लेखनीय कवी आहेत. राजा मंगसुळीकर यांनी आपल्या 'अंतरी या' ह्या कवितासंग्रहात 'कराडकरांनी मला फुलवलं, घडवलं' असे म्हटले आहे. संग्रहरूपाने ज्याची कविता प्रकाशित झाली नाही, अशा सर्व कवींची नोंद घेणे शक्य नाही. तरीपण 'जननीजनकज' या विचित्र टोपणनावाने कविता लिहिणारे पु.पां. गोखले, 'चहापुराणा' सारखी कविता लिहिणारे ग. स. आळतेकर, दत्तानुज (यशवंतबुवा नावडीकर), पुष्कर (शंकरराव करंबेळकर), उध्दवराव कुलकर्णी , दत्त कालगावकर, मधुमालती कोटीभास्कर, श्रीनिवास विनायक कुलकर्णी, कुमुद ओगले, प्राची आळतेकर, मोहन कुलकर्णी , वसंत केशव पाटील, शिल्पा शहा, उत्तम देशपांडे, मीना देशपांडे, विलास कदम, मीना घळसासी, विलास घळसासी, प्रतिभा घळसासी, जयश्री कुलकर्णी, मुकुंद देशपांडे, मधुकर भाटे, सुहास इनामदार, सुभाष कंटक, बी.के. घाटगे, सी.वा. उमर्जीकर यांची प्रातिनिधिक नोंद घेता येईल.

शिवरायांच्या जीवनावर खंडकाव्ये अनेक मराठी असतील, पण साहित्य सेवा मंडळाच्या २८ सदस्यांनी शिवचरित्राच्या एकेका प्रसंगावर कविता लिहून केलेला 'स्वातंत्र्यशार्दूल' हा संयुक्त काव्यग्रंथ एकमेवाद्वितीयच. याच कवींचा 'फुलोरा' हा काव्यसंग्रह आहे. काँग्रेस सुवर्ण महोत्सवानिमित्त स्थानिक आठ कवींनी 'स्फूर्तिकिरण' काव्यसंग्रह सिद्ध केला तर टिळक जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'स्वातंत्र्य केसरी' ह्या संयुक्त काव्यसंग्रहाने लोकमान्यांचा स्मरणसोहळा साजरा केला. कला-सुगंध-साहित्य संघाने १९७१ च्या सुमारास ओळीने तीन वर्षे 'विहंग' नावाने प्रातिनिधिक कविता संग्रह प्रसिद्ध केले. १९७५ मध्ये अ. भा. मराठी साहित्य संमेलनानिमित्ताने कऱ्हाडातील जुन्या नव्या कवींनी 'कृष्णातरंग' नावाने हजेरी लावली.

## नाटक

गोपाळ गणेश आगरकरांनी 'हॅम्लेट' ला मराठी पेहराव चढवून शेक्सपियरची ओळख मराठी रंगभूमीला करून दिली. महादेव दामोदर कुलकर्णी यांचे

‘दंभस्फोट’ उर्फ ‘श्रद्धाव्यामोह’, माधव रामचंद्र पावनगडकर यांची ‘सिंहगड’, ‘चंद्रानना’, ‘शूरसेन–मालिनी’, शिवलिंगप्पा रामचंद्र बागणे आलटकर यांचे ‘वनविलास’, नारायण विनायक कुलकर्णी यांची ‘कान्होपात्रा’, ‘पार्थ प्रतिज्ञा’, ‘माईसाहेब’, ‘क्षमेची याचना’, ‘मंगलभुवन’, तसेच शंकरराव देशपांडे यांचे ‘देव आहे देव्हाऱ्यात’ इ. नाटके तत्कालीन रंगभूमीवर गाजली होती. श्रीधर यशवंतराव जोशी यांचे ‘सुलोचना’, ‘उज्ज्वल भवितव्य’, व्यंकटेश गोपाळ जंगी यांचे ‘नलदमयंती’, वि. स. पागे यांचे ‘तुका म्हणे जाऊ वैकुंठा चालत’, सिंधू नामजोशी यांचे ‘ब्रह्म तुकयासी आले’, दीपा गोवारीकर यांचे ‘सुपातले आणि जात्यातले’, कृष्णाजी आबाजी गुरूजी यांची ‘गंगू–अनुकरणीय स्त्री’, ‘बापूंची पगडी’, गो. वि. कुलकर्णी यांची ‘इनामदार’, ‘एकांकिका : स्मशानातल्या’, नथुराम माने यांची ‘परिवर्तन’, संकल्प, ‘सौदामिनी’, दीपचंद जाधव यांचे ‘इष्कात रंगली रंगू’ शंकरराव उमापे यांची ‘दिवा विझला यशाचा’, ‘कर्मयोग’, विनायक वैद्यांचे ‘असं कधी घडलंय’, महंमद इस्माईल भालदार यांचे ‘सं. मदिरेचा एक घोट’, तसेच रा. न. कीर्तने यांची ‘सर्वदमन’, ‘कुलांगार’ ही नाटके प्रसिद्ध झाली आहेत. डॉ. वनपाळ यांचे ‘कर्मयोग’, दत्तोपंत ओंडकर यांचे ‘शीलसामर्थ्य’, जयवंत गुजर यांचे ‘जयवंत हो, यशवंत हो’, पु. पां. गोखले यांची ‘शूरसेन’,‘स्वार्थसाधन’, बाबूराव घाटे यांचे संगीत ‘नाट्यसंन्यास’, ना. ह. विंगकर यांचे ‘बाहुलीचा संसार’, ‘पृथ्वीराज संयोगिता’, ‘कुलांगार’, संगीत ‘पाकिस्तान’, वि. र. जोशी यांचे ‘मूकनायिका’, डॉ. ग. भ. वैद्यांचे ‘निर्वासित’, बाबुराव काळे यांचे ‘दत्तक’, भीमराव मोगलगिद्दीकरांचे ‘विसकटलेली घडी’, अनिल कुमठेकर यांचे ‘निवडुंग’, सी. व्ही. कुलकर्णी यांचे ‘चंद्रमे जे अलांच्छन’, सी. वा. उमर्जीकर यांचे ‘जुळल्या न सतारी’ इ. नाटके स्थानिक कलाकारांनी रंगभूमीवर आणली असली तरी ती पुस्तकरूपाने बहुधा उपलब्ध नाहीत.

**कथा**

बापूराव बिजुटकर, के.रा. पुरोहित, श्रीराम वाघमारे, ल.ब. हरोलीकर, रा. स. ढवळे, नाथ चव्हाण, पु.पां. गोखले, ना. वि. कुलकर्णी, श्री. म.

कुलकर्णी, स.कृ. बहुलेकर, पां. न. वळवडे, बा.बा. घाटे, आनंदीरमण हे जुन्या पिढीतील काही कथाकार. कथेच्या क्षेत्रात शरश्चंद्र चिरमुले ('श्री शिल्लक', 'कॉग्ज', 'एका जन्मातल्या गाठी'), दीपा गोवारीकर ('तडा', 'वसा', 'प्रसादाचा दिवस', 'दिवस सोनियाचे', 'कहाणी गुळेच्या ढेपेची', 'खसखस आणि खुसखुस', 'साष्टांग धप्प', 'माझे पण विश्व'), माधव नावडीकर ('ते पुरूष भाग्याचे', 'प्रॉमिथियस') आणि शशिकला उपाध्ये ('प्रेरणा', 'वाळवंटातील वाट', 'सावधान') यांनी विशेष उल्लेखनीय कामगिरी केली आहे. गो. रा. माटे यांचा 'गळलेली पाने', जयवंत गुजर यांचा 'शमीवरील शस्त्रे' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. प्रभाकर बिडवे, उदयकुमार शाळगावकर, व. बा. बोधे, विलास मोहिते, मंदा टेंबे, विजय माळी, प्रभाकर रुईकर, दत्ता वाळवेकर, कन्हय्या कुंदप. इ. कथाकारांची नोंद घेतली पाहिजे. गेल्या दशकात कथाकार म्हणून आपली वेगळी मुद्रा उमटवणाऱ्या लेखकांत प्रकाश नारायण संत यांच्या विशेष उल्लेख केला पाहिजे. त्यांनी तीन तपांपूर्वीच आपल्या लेखणीची चुणूक दाखविली असली तरी 'वनवास',' शारदा संगीत', 'पंखा','झुंबर' या कथासंग्रहांच्या रूपाने ते अलीकडे वाचकांपुढे आले. पु. ल. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांची कथा पूर्वीएवढीच टवटवीत आहे.

**कादंबरी**

ना. वि. कुलकर्णी ('मजूर','शिपाई'), भाऊ श्रीधर कुलकर्णी ('आनंदमठ', ' कुलांगना की वारांगना'), जगन्नाथ वामन हर्षे ('चंद्रोदय'), भास्कर नारायण विपट ('म्हैसूरचा सिंह'), रजनी शेठ ('ऋणानुबंधाच्या चुकून पडल्या गाठी', 'वादळज्योत', 'तृषार्त', 'शिल्पकार'), प्रभाकर बिडवे ('श्यामला'), प्रभाकर रुईकर ('बचेंगे तो औरभी लढेंगे'), निर्मला कुलकर्णी ('सावली'), अरविंद महादेव देशपांडे ('सात वर्षे आठ दिवस', 'जाग', 'भाग्यश्री', 'जगावेगळा', 'पल्लवी तू परत ये'), डॉ. सुमन पाटील ('साऊ आ जी'), रा. गो. प्रभुणे ('पेशवाईतील न्यायदेवता'), डी. अनंत जाधव ('परिवर्तन', 'शाप', 'माझा गाव माझा देश'), या कादंबरीकारांबरोबर

के. रा. पुरोहितांच्या रशियन क्रांतिकारक कादंबऱ्या, रा. न. कीर्तने यांची 'अलका', बाळकृष्ण भाऊ जोशी यांच्या 'इनामदारांचा बाळू', 'रासोल्हास' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. चंद्रहास वसंतराव शेजवळ ('चुकलेली वाट'), दत्तात्रय ज्योतिराम पवार ('उगवती दौलत'), आत्माराम दिनकर कणसे ('चुकून घडलं', 'न्यायदेवता') यांनी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. कृषितज्ज्ञ शिवाजीराव ठोंबरे यांनीही 'डोंगरपल्याड', 'घर', 'अनुराधा' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. व. बा. बोधे हे एक वाचकप्रिय कादंबरीकार असून त्यांच्या 'जंगल', 'कातण', 'वाघीण', 'ससाणा', 'हिरवी गौळण' इ. साठांहून अधिक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत.

## चरित्रे

सदाशिव खंडो आळतेकर यांचे 'समर्थ चरित्र' आणि पु. पां. गोखले यांचे 'आगरकरांशी ओळख' ही पुस्तके आपल्या वेगळेपणामुळे प्रसिद्ध आहेत. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांना टिळकांचे पहिले चरित्रकार म्हणून ओळखले जाते. त्याखेरीज बाळकृष्णशास्त्री नवांगुळांचे 'निरंजन स्वामी चरित्र', गुरुनाथ प्रभाकर ओगले यांचे 'एडिसन', श्री. म. कुलकर्णी यांचे 'आद्य शंकराचार्य', मु. शं. देशपांडे यांची 'सेवक राजा', 'संत पुरंदरदास', 'हरिबाबा फलटणकर', अण्णाजीराव चव्हाणांचे 'रवींद्रनाथ टागोर तेजस्वी तारा', वि. पु. गोखले यांचे 'बाबा राघवदास', दि. पां. आफळे यांचे 'रामदासदर्शन', प्रभा फाटक यांचे ओवीबद्ध 'श्रीधरामृत', शिवाजीराव चव्हाण यांचे 'भाऊसाहेब कळंबे' ही चरित्रे प्रसिद्ध आहेत. जयवंत गुजर यांचे 'धनजीशा कूपर', शशिकला उपाध्ये यांचे 'मतिमंदांची माता सिंधुताई जोशी', विजय यादव यांचे 'दादा : एक सेनानी' ही विशेष उल्लेखनीय चरित्रे आहेत. आशा लिमये ('मसूरची संज्योत'), सिंधू नामजोशी ('जीवन : एक संग्राम'), जयंत पालकर ('एक भाग्यविधाता') यांनी आपल्या वडिलांची चरित्रे लिहिली आहेत. यशवंतराव चव्हाणांचे चरित्र बाबुराव काळे यांनी लिहिले असून विठ्ठलराव पाटील यांनी 'यशवंतराव चव्हाण : विचार आणि वारसा', 'यशवंतराव चव्हाणांच्या प्रस्तावना', 'यशवंतरावांची मानपत्रे', 'यशवंतराव चव्हाणांसबंधी समग्र साहित्यसूची','विविधांगी

व्यक्मित्व' असे यशवंतराव चव्हाण यांच्या चरित्राला अभ्यासाच्या उपयोगी पडेल असे संदर्भ साहित्य सिद्ध करून मोठीच कामगिरी बजावली आहे. कऱ्हाडातील विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा परिचय करून देणारे कृ. गो. सरडे यांचे 'रत्ने व मोती' आणि 'कर्मयोगी नाना', 'बिल्वदल', 'दादासाहेब आळतेकर', 'पुरुषार्थे जगमित्र', 'अष्टपैलू जयराम' इ. संपादित व संकलित चरित्रेही प्रसिद्ध आहेत.

## आत्मचरित्र

'डोंगरीच्या तुरुंगातील एकशे एक दिवस' हे आगरकरांचे, कृ. पां. कुलकर्णी यांचे 'कृष्णाकाठची माती', आनंदीबाई विजापुरे यांचे 'अजुनि चालतेची वाट', शशिकला उपाध्ये यांचे 'माझं पुस्तक' ही विशेष उल्लेखनीय आत्मचरित्रे आहेत. 'आत्मनिवेदन दयार्णवांचे' (द. र. कोपर्डेकर), 'पाऊलवाट' (बाबुराव काळे), 'स्मृती जयांची चैतन्यफुले', 'आगाशिवाची प्रदक्षिणा' (संभाजीराव थोरात), 'रेशीम धागे' व 'मागे वळून पाहता' (कृष्णराव सरडे), 'मी नर्साबाई' (मेधा किराणे), 'पडदा पडण्यापूर्वी' (रा. द. मोकाशी), 'माझी जीवन गाथा' (र. पु. कुलकर्णी), 'माझे जीवन' (वि. वा. नेने), 'स्मृतिगंध' (चंपा पेंढारकर-शांता कुलकर्णी), 'माझ्या राजकीय आठवणी' (हरिभाऊ लाड), 'मी केलेले माझे मूल्यमापन (ना. वा. जोशी), 'काल व आज' (रा. न. कीर्तने), 'गेलेला आवाज' (अ. श्री. भडकमकर), 'पुष्पविण कल्पतरु' (दत्ता वाळवेकर) ही आत्मचरित्रे त्यांच्या काळाचे व कामगिरीचे दर्शन घडवितात. पु. पां. गोखले यांचे 'हे प्रत्ययाचे बोलणे' वेगळ्या मांडणीमुळे लक्षात येते. 'ऋणानुबंध' या पुस्तकामुळे यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मवृत्तासंबंधी निर्माण झालेल्या अपेक्षा 'कृष्णाकाठ' मुळे अधिकच उंचावल्या आणि त्यांचे पुढील खंड वाचावयास मिळाले नाहीत याबद्दल हुरहूर निर्माण होते. 'विरंगुळा', 'विदेश दर्शन' या रामभाऊ जोशी यांनी संपादित केलेल्या पुस्तकांतील यशवंतरावांची मनोगते वाचल्यावर आपण एका उत्तम आत्मवृत्ताला मुकलो आहोत हीच जाणीव अधिक तीव्रपणाने होते.

### ललित लेखन

पंडित सप्रे यांची ‘सैतानाच्या साम्राज्यात’, ‘चपर्टपंजरी’, गुरुनाथ प्रभाकर ओगले यांचे ‘जीवन झऱ्याकाठी’, शशिकला उपाध्ये यांची ‘थोडं काळं, थोडं पांढरं’, ‘शोध’, विजय माळी यांचा ‘चांदणडोह’, जयवंत गुजर यांचा ‘शमीवरील शस्त्रे’ या ललित लेख संग्रहांची नोंद घेत असतानाच जयवंत गुजर यांनी सलग तीन तपे दररोज प्रासंगिक स्तंभ लेखन सातत्याने केले या विक्रमाचीही दखल घेतली पाहिजे. ‘सूर्यफुले’ या नावाने पुस्तकरूपाने ते प्रकाशित झाले आहे. ‘मराठी ललित गद्याचे बालकवी’ असा ज्यांचा सार्थ गौरव केला जातो त्या श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या ‘डोह’, ‘सोन्याचा पिंपळ’, ‘पाण्याचे पंख’, ‘कोरडी भिक्षा’ या संग्रहा तील ललितलेखनामुळे मराठी साहित्याला एक मानदंड लाभला. दीपा गोवारीकर यांचे ‘तळ्याकाठी, मळ्याकाठी’ व अन्य पुस्तकांतून तसेच वासंती मुझुमदार यांच्या ‘नदीकाठी’ व ‘झळाळ’ मधून विशेषत: कऱ्हाडशी संबंधित आठवणी प्रत्ययकारी चित्रित झाल्या आहेत. विद्याधर म्हैसकर या संवेदनशील लेखकाचा ‘पक्षिगण उठले’ आणि ‘रेघांचिये संगे’ या पुस्तकांतून त्यांनी वेळोवेळी अनुभवलेल्या क्षणांचे शब्दचित्रण रसरशीतपणे केले आहे. विशेषत: ‘रेघाचिये संगे’ मध्ये चित्रांवरील टिपणे आणि मूळ चित्रेही बोलकी आहेत. डॉ. मधुकर दडगे यांचे ‘हिमदिव्य’ आणि जयश्री खिरे यांचे ‘ कैलास मानसयात्रा – एक अविस्मरणीय अनुभव’ ही प्रवासवर्णने त्यांतील अनौपचरिकतेमुळे वाचनीय ठरली आहेत.

### बालवाङ्मय

थोर पुरुषांची चरित्रे, भारतीय दैवते यांच्या कथा प्रबोधनाचा हेतू डोळ्यांसमोर ठेवून पु. पां. गोखले, भा. म. पागनीस यांनी मुलांसाठी पुस्तके लिहिली. पंडित सप्रे यांनी ‘तोतयाचे बंड’, वा. मो. कोळेकर यांनी ‘गणितातील गंमती’, ‘अंधेरनगरी’, मु. शं. देशपांडे यांनी ‘सोनेरी हरण’, ‘पिवळा पोपट’, ‘जादूचा गोल किल्ला’, शशिकला उपाध्ये यांनी ‘व्यक्तिदर्शन’, ‘आमचा मोत्या’, नथुराम माने यांचा ‘दुर्वांकुर’, जगन्नाथ कुंभार यांचा ‘टिपू’, विलास कृष्णाजी घळसासी यांचे ‘नातवंडांना’ अशी कथा–कवितांची पुस्तके लिहिली आहेत.

किशोरांसाठी कृतिप्रवर्तक मनोरंजक लेखन करणारे पु. ग. वैद्य, दीपा गोवारीकर (गोल्डन सर्कशीतील 'टण्णू', 'किटकिट नगरीतील पिटपिट') आणि विद्याधर म्हैसकर ('मन्नू') यांचा बालवाङ्मयात मोठा वाटा आहे.

शालेय विद्यार्थ्यांकडून लेखन करवून घेऊन प्रोत्साहन देणारे उपक्रम झाले. त्यामध्ये पंडित सप्रे, शामराव घळसासी यांचे 'गुरुचरित्र', 'यशोदर्शन', ना. वा. जोशी यांचे 'मुलांच्या शब्दांत गांधी', 'राजा शिवाजी' तसेच रा. गो. प्रभुणे यांचे 'जडणघडण', 'लोकमानसातील यशवंतराव' हे उपक्रम लक्षणीय होते.

## अनुवाद – परभाषांत लेखन

पु. पां. गोखले यांनी स्वत:च्याच 'अठरा श्लोकी गीते'ची संस्कृत, हिंदी, इंग्रजी आणि गुजराथी भाषेत रूपांतरे केली.त्याप्रमाणे 'गीता पुरूषोत्तमी' ही मराठी समश्लोकी लिहिली तसेच त्यांनी दासबोधाचे इंग्रजीत भाषांतर केले आहे. बाबुराव काळे यांनी यशवंतराव चव्हाणांचे चरित्र इंग्रजीत लिहिले. गो. वि. कुलकर्णी यांनी पारनेरकर महाराजांच्या चरित्राचे ('संघर्ष') भाषांतर केले आहे. अंजली ढवळे, कुमुद ओगले इंग्रजीतून कविता करीत. रमेश सचदेव हिंदीतून शेरशायरी करतात. शशिकांत सोनटक्के यांनी संस्कृतमध्ये 'गीतासंक्षेप' लिहिले आहे. 'कारपेटसाहेब ' हे जिम कॉर्बेटचे का. धों. देशपांडे अनुवादित चरित्र प्रकाशात येण्याची वाट पहात आहे. अनुवादासाठीचे साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेले वसंत केशव पाटील यांची अभिमानपूर्वक नोंद घेतली पाहिजे.

## साहित्यसंस्था व साहित्यसंमेलने

कऱ्हाडातील साहित्यप्रेमी रसिकांना एकत्रित आणून साहित्यविषयक उपक्रमाचा आरंभ झाला तो साहित्य सेवा मंडळाच्या रूपाने. बा. वा. घाटे, पु. पां. गोखले हे या मंडळाचे प्रवर्तक. स्थानिक कवी – लेखकांच्या रचनांचे 'फुलोरा' (१९२७), 'स्वातंत्र्य शार्दूल' ( १९२७), 'शिव –पदी' (१९३०), 'स्फूर्ति–किरण' ( १९३५) 'स्वातंत्र्य–केसरी' (१९५६) हे संग्रह या मंडळातर्फे प्रकाशित झाले. महाराष्ट्र शब्दकोशाच्या तसेच मराठी वाक्संप्रदाय कोशाच्या रचनात या

मंडळाच्या सभासदांचा सहभाग होता.

या मंडळाच्या पुढाकारानेच २५-१०-१९४१ रोजी दक्षिण महा मराठी साहित्य संमेलनाचे तिसरे अधिवेशन कवी साधुदास यां अध्यक्षतेखाली कऱ्हाडात झाले. स्वागताध्यक्ष पु. पां. गोखले यां स्वागताच्या भाषणाचाच एक भाग असलेले 'साहित्यिक कऱ्हाड' पुस्तक आजही एक संदर्भ ग्रंथ समजले जाते. याच संमेलनात 'बहु समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आवश्यक असणारी भाषाशैली' विषयावर यशवंतराव चव्हाणांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झ होता. 'ग्रामीण लोकांची भाषा व बहुजन समाजाचा जिव्हाळा गोष्टी नजरेसमोर ठेवून लिहिले तर हा प्रश्न यशस्वी रीतीने सुटण्य मदत होईल. यासाठी ग्रामीण लेखकांनी साहित्य निर्माण केले पाहि अशा आशयाचे पुरोगामी विचार यशवंतराव चव्हाणांनी समारोपा भाषणात मांडले होते.

कऱ्हाडात १९५० साली महाराष्ट्र पातळीवरील साहित्य संमे व्हावे अशी सूचना त्यावेळी पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिष चिटणीस असलेले वा. दा. गोखले यांनी कऱ्हाडच्या साहित्य मंडळींना १९४९ मध्ये केली होती. त्याप्रमाणे त्यावेळी चाव चौकात असलेल्या सार्वजनिक वाचनालयात कऱ्हाडातील नागरिक सभाही झाली. या सभेत उध्दवराव कुलकर्णी, बा. वा. घाटे, म. पागनीस, मु. शं. देशपांडे, नानासाहेब डुबल, कमलराव दे इनामदार, नाथ चव्हाण, मनोरमा दातार, रंगूताई वाटवे यांची अस्थायी समिती नेमण्यात आली होती. पांडुआण्णा शिराळ दादासाहेब आळतेकर, बाबुराव गोखले यांची सल्लागार स करण्यात आली. ठराव करून १९५० चे साहित्य संमेलन भरविण्य निमंत्रण परिषदेकडे पाठविण्यातही आले होते. १९४९ मध्ये आच जावडेकरांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे झालेल्या साहित्य संमेल प्रत्यक्ष निमंत्रण देण्यासाठी पांडुआण्णा शिराळकर आणि कार्यकर्ते गेले होते. आचार्य अत्रे यांनी पुढील वर्षासाठी 'कऱ्

व मुंबई या दोन ठिकाणची निमंत्रणे आहेत. कऱ्हाडकरांनी निमंत्रण द्यावे' अशी सूचनाही त्या संमेलनाच्या व्यासपीठावरून केली. त्यावेळी पांडुआण्णा शिराळकर उठून म्हणाले, 'आम्ही पुढील वर्षी मुंबईच्या संमेलनात कऱ्हाडसाठी निमंत्रण देऊ' आणि मग मुंबईचे निमंत्रण स्वीकारण्यात आले. कऱ्हाडहून गेलेल्या कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला अशी आठवण त्या वेळचे एक प्रमुख कार्यकर्ते मु. शं. देशपांडे यांनी १९७५ च्या साहित्य संमेलनावेळी सांगितली होती. ( समर्थ, सातारा, साहित्य संमेलन विशेषांक १९७५ )

२६ व २७ नोव्हेंबर १९५५ या दिवशी कऱ्हाडात प्रा. अनंत काणेकर यांच्या अध्यक्षतेखाली 'उत्तर सातारा जिल्हा मराठी साहित्य संमेलन' संपन्न झाले. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न त्यावेळी ज्वलंत असल्यामुळे उद्घाटक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व संमेलनाध्यक्ष अनंत काणेकर यांच्या भाषणात उलट सुलट बाजू मांडल्या गेल्याच. शिवाय ' मराठी भाषेच्या विकासासाठी संयुक्त महाराष्ट्राची आवश्यकता आहे.' याच विषयावर मालतीबाई बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवादात प्र. ल. करंबेळकर, ना. वा. जोशी, प्रेमलाबाई चव्हाण, डॉ. ग. भ. वैद्य, ह. वा. कुलकर्णी, ह. बा. कुलकर्णी, भीमराव मोगलगिद्दीकर, रा. स. ढवळे, दत्तप्रसन्न काटदरे इ. नी हिरीरीने भाग घेतला. पं. भय्याशास्त्री वाटवे यांच्या स्वागतपर भाषणात कवी विहंग व चंद्रचकोर ( अंबादास चिकुर्डेकर) यांचा नव्या साहित्यिकांत विशेष उल्लेख होता. ओगलेवाडीच्या वझे यांचे पोवाडे, बाबुराव काळे यांचे 'दत्तक' व डॉ. ग. भ. वैद्य यांचे 'चार दिवस सासूचे' ही नाटके असे मनोरंजनाचे कार्यक्रम झाले.

कवी विहंग यांच्या पुढाकाराने बाबुराव घाटे, पंडित सप्रे, भय्याशास्त्री वाटवे, दत्त कालगावकर या जुन्या व प्रा. शांताराम रामचंद्र शिंदे, डॉ. ह. बा. कुलकर्णी, अंबादास चिकुर्डेकर, मोहन वेल्हाळ, प्रा. गिरीधर पंडित तसेच वासंती वळवडे इ. यांनी ४ फेब्रुवारी १९५८ रोजी कऱ्हाडात 'वाङमय विहार मंडळ' स्थापन

केले. या मंडळाचे सभासद महिन्यातून दोन वेळा जमून साहित्य चर्चा करीत.

३१ मार्च १९६० रोजी उत्तर सातारा जिल्हा सरकारी प्रसिध्दी खात्यामार्फत सातारा येथे कवी संमेलन झाले होते. या संमेलनात कऱ्हाडचे प्रा. प्रभाकर बिडवे आणि कवी बाळकृष्ण ( बा. वा. घाटे) यांचा सहभाग होता. विशेष म्हणजे या संमेलनाचे अध्यक्ष असलेले कऱ्हाडचेच पु. पां. गोखले यांनी आपले अध्यक्षीय भाषण संपूर्णपणे काव्यातच केले होते.

प्र. ल. ऊर्फ शंकरराव करंबेळकर यांच्या प्रेरक नेतृत्वाखाली ३० मार्च १९६१ रोजी ( वर्ष प्रतिपदा) कऱ्हाडात 'महाराष्ट्र वाङ्मय मंडळ' स्थापन झाले. प्राचार्य वि. ग. जोशी, म. श्री. राजवाडे, र. नी. (आबासाहेब) रेठरेकर, ग. य. देशमाने, विद्याधर गोखले, शामराव घळसासी हे या मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते होते. कराड नगरपरिषदेच्या शारदीय व्याख्यानमालेच्या तसेच पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण केंद्राच्या संयोजनाचे काम काही काळ या मंडळाकडे होते. केशवसुत - जन्मशताद्बी, गीत रामायण रौप्यमहोत्सव, ग्रामीण साहित्यावरील कृतिसत्र ( १९८०) इ. उपक्रम या मंडळातर्फे झाले. या मंडळाच्या निमंत्रणावरूनच ६, ७ व ८ डिसेंबर १९७५ रोजी कऱ्हाडास अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे ५१ वे अधिवेशन दुर्गाबाई भागवत यांच्या अध्यक्षतेखाली झाले. स्वागताध्यक्षपदी यशवंतराव चव्हाण होते. तर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री संमेलनाचे उद्‌घाटक होते. ऐन आणीबाणीच्या काळात झालेल्या ( इंदुमती केळकरांनी केलेल्या निदर्शनाने आरंभ झालेल्या) या संमेलनातील विचारस्वातंत्र्याच्या विषयावर झालेला वाद - संवाद , ज्ञानपीठविजेते वि. स. खांडेकर यांचे अकल्पित आगमन व भाषण, जयप्रकाश नारायण यांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून केलेली सामुदायिक प्रार्थना, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदारांची साहित्य संमेलनातील पहिलीच अनुपस्थिती, यशवंतराव चव्हाण यांच्या ऋजू साहित्यप्रेमी, सुसंस्कृत

व संयमित व्यक्तिमत्त्वाचा ठसा इ. गोष्टींमुळे हे साहित्य संमेलन लक्षणीय ठरले. या संमेलनासाठी जमविण्यात आलेल्या निधीपैकी उर्वरित रकमेचा एक ट्रस्ट नोंदविण्यात आला असून त्याच्या व्याजातून मराठीतील सर्वोत्कृष्ट ग्रंथास प्रतिवर्षी दहा हजार रूपये 'यशवंतराव चव्हाण : कऱ्हाड पुरस्कार' या नावाने दिले जातात. लेखकांचा सन्मान व प्रतिष्ठा यांना महत्त्व देणारी पुरस्काराची ही पहिली व एकमेव योजना असावी. कऱ्हाडातील वासंती मुझुमदार आणि श्रीनिवास कुलकर्णी यांना हा पुरस्कार मिळाला आहे.

कवी विहंग यांच्या स्मरणार्थ मोहन कुलकर्णी यांच्या नेतृत्वाने १५ मे १९७२ रोजी 'कलासुगंध साहित्य संघ' ही संस्था सुरू झाली. 'विहंग' या नावाने १९७२ ते १९७४ तीन वर्षे प्रातिनिधिक काव्यसंग्रह, महाराष्ट्र कथालेखिका संमेलन ( १९७५ ) महाराष्ट्र कवयित्री संमेलन ( १९७७) कवितेच्या सादरीकरणासंबंधी शिबीर, कविसंमेलने, कथालेखन स्पर्धा इ. उपक्रम या संस्थेतर्फे झाले. महाराष्ट्रातील नवोदित साहित्यिकांच्या संस्थांच्या संचालकांची राज्यव्यापी परिषदही या संस्थेने आयोजित केली होती.

'कराड जिमखाना' ही कला, क्रीडा, साहित्य, निसर्ग आणि सेवा या पाच माध्यमांतून १९७४ पासून कार्यरत असलेली एक अग्रणी संस्था. साहित्याचे मंचावर प्रकटीकरण, साहित्यवाचन, ग्रंथ प्रकाशन, ग्रंथ दिंडी, उद्योजकीय साहित्य संमेलन असे साहित्यविषयक उपक्रम या संस्थेने केले आहेत. १९८४ पासून कऱ्हाडात महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाखा आहे. या शाखेने बरेचसे उपक्रम कराड जिमखान्याच्या साहित्य विभागाच्या सहकार्याने केले. या दोन्ही संस्थांनी कऱ्हाडात जानेवारी २००३ मध्ये अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे ७६ वे अधिवेशन उत्साहाने व यशस्वीपणे पार पाडले. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्रीनिवास कुलकर्णी होते. उद्घाटनासाठी माजी पंतप्रधान व थोर साहित्यिक पी. व्ही. नरसिंह राव यांचा लाभ झाला होता.

या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अधिवेशनाबाबतची

प्रतिक्रिया म्हणून त्यापूर्वी २० ते २२ डिसेंबर २००२ या काळात प्रा. राजेंद्र कुंभार यांनी 'आपले साहित्य संमेलन' या नावाने 'मुक्या दु:खाना बोलते करणे, बोलत्यांना लिहिते करणे आणि लिहित्यांना प्रतिष्ठा मिळवून देणे' या भूमिकेतून कऱ्हाडातच आयोजित केले होते.

वा. मो. कोळेकर या उत्साही कवीने सेवानिवृत्तीनंतर १९८० च्या सुमारास कऱ्हाडातील कविवृत्तीच्या मंडळींना आठवड्यातून एकदा घरी बोलावून काव्य वाचन व साहित्यविषयक चर्चा करण्यास सुरवात केली. त्यातूनच कऱ्हाडात 'आशा किरण मंडळा' चा उदय झाला.

कऱ्हाडात १९८७ व २००३ अशी दोन वेळा राज्यस्तरीय बालकुमार साहित्य संमेलने झाली. सातारा येथे झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पु. ग. (भय्या) वैद्य हे कऱ्हाडकर होते. जुलै २००२ मध्ये कऱ्हाडात मराठी साहित्य परिषद शाखेतर्फे युवा साहित्य संमेलन भरविण्यात आले होते.

सातारा जिल्हा ग्रामीण साहित्य मंडळ व बोधे-पाटील फ्रेंडस् सर्कल यांनी ९ एप्रिल १९९५ रोजी कऱ्हाडात ग्रामीण साहित्य मेळाव्याचे आयोजन केले होते.

उंडाळे ता. कऱ्हाड येथे स्वातंत्र्यवीर दादासाहेब उंडाळकर यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमास जोडून १९९१ पासून समाजप्रबोधन साहित्य संमेलन प्रतिवर्षी भरविले जाते.

## साहित्यसेवा अशीही

मराठी भाषेतील शब्दांचा कोश 'महाराष्ट्र शब्दकोश' ( खंड १ ते ७) पुण्याचे य. रा. दाते आणि चिं. ग. कर्वे यांनी १९३८ मध्ये प्रकाशित केला. या उपक्रमात शब्द पुरविण्याच्या कामी कऱ्हाड साहित्यसेवा मंडळाची आणि कऱ्हाडच्या सुलोचनाबाई गोखले, इंदिराबाई दिवेकर यांची मदत झाल्याचा निर्देश संपादकांनी केला आहे. या प्रकल्पासाठी कऱ्हाड येथील सावकार शिराळकर यांच्या पेढीतून कर्जाऊ रकमा घेतल्या होत्या. त्यांची संपूर्ण परतफेड करता आली नव्हती, तथापि या प्रकल्पाचे महत्त्व जाणून सुमारे ३५०० रु. रक्कम व्याजासुध्दा

येणे होती, ती पांडुआण्णा शिराळकरांनी माफ केली.

लिपी सुधारणेच्या बाबत पु. पां. गोखले यांनी धडपड केली. अनुच्चारित अनुस्वारांच्या उच्चाटनासाठी गोविंद पांडुरंग पावशे (किवळकर) यांनी वर्षानुवर्षे खटपट केली. महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या लेखन नियमावलीबाबत जाणीव जागरूकता निर्माण करण्यासाठी विद्याधर गोखले, चंद्रकांत श्रोत्री यांनी शिबिरे, कृतीसत्रे घेतली. शालेय पुस्तकातून झालेल्या चुकीच्या लेखनात दुरुस्ती व्हावी म्हणून चंद्रकांत श्रोत्री आणि शामराव घळसासी यांनी पाठपुरावा केला. माधव नावडीकर यांनी १९७५ ते १९९२ अशा पंधरा वर्षांतील साहित्य संमेलनासंबंधीची कात्रणे संग्रहित करून पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयासाठी दिली. त्यांनीच शिवाजी विद्यापीठात कवी माधव ज्युलियन यांच्या नावाचे पारितोषिक ठेवण्यासाठी प्रयत्न केले. या सर्व बाबी म्हणजे एका प्रकाराची साहित्यसेवाच नाही काय ?

**प्रकाशक**

वाचक – लेखक यांना जोडणारा पूल म्हणजे प्रकाशक.हौशी लेखक स्वत:च किंवा घरातील कोणा व्यक्तीचे नाव घालून पुस्तके प्रकाशित करतात. तथापि व्यवसाय म्हणून प्रकाशन व्यवसायात पडलेले जुने कऱ्हाडकर म्हणजे दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर. कऱ्हाडच्याच कवी पंडित सप्रे यांच्या ‘अर्धचंद्र’ या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाने १९३८ मध्ये कोपर्डेकरांनी आपला व्यवसाय सुरू केला. सुमारे तीन तपे गावोगावी फिरून त्यांनी ग्रंथप्रसाराचे काम केले. शाळा शाळांत जाऊन ते कथाकथनही करीत. साने गुरुजींची पुस्तके त्यांनी घरोघर पोचविली, कोपर्डे ( कऱ्हाड) येथील त्यांचे पूर्वज कृष्णदर्याणव, त्यांच्या ‘ हरिवरदा ’ ग्रंथाची समग्र संपादित आवृत्ती हे त्यांचे मोठे काम . कऱ्हाडची माहेरवाशीण असलेल्या शशिकला उपाध्ये ( माहेरच्या पागनीस) या स्वत: उत्तम लेखिका, साहित्यप्रेमातूनच त्यांनी स्वत: चंद्रकला प्रकाशन हा व्यवसाय पुण्यास यशस्वीपणे चालविला आहे.

*परिशिष्ट*

## मराठीतील पहिली लावणी

मन्मथ शिवलिंग ( १५६०-१६१३) हा लिंगायत संप्रदायातील नागेश संप्रदायी मोठा कवी. त्याची एक वैशिष्ट्यपूर्ण रचना म्हणजे 'धने धने ऐशी कऱ्हाड नगरी' ही प्राचीन कऱ्हाडविषयीच्या कथांवर आधारलेली लावणी होय. ही मराठीतील पहिली अधिकृत लावणी असेही म्हणतात. ही लावणी भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे येथे हस्तलिखित बाड क्र. ३११ (५) मध्ये असून त्या मंडळाच्या वार्षिक इतिवृत्तात ( शके १८३७ सन १९१५) 'कऱ्हाडच्या भवानीची लावणी' छापलेली आहे. ( पृ. २७६-२७८)

कऱ्हाडक्षेत्र हे आदिक्षेत्र आहे. गरूडतीर्थ, आगाशिवाचा डोंगर, दोन मनोरे, बारव ( नकट्या रावळ्याची विहीर), बारा वर्षांनी कन्यागतात येथे गंगा येते इ. तपशील या लावणीत आहेत. तीर्थक्षेत्राची भौगोलिक माहिती देणारी ही एकमेव लावणी असावी. मूळपीठ करवीर कोल्हापूर निवासिनी भवानीदेवी कऱ्हाडला कशी आली हे या लावणीत सांगितले आहे. (गंगाधर मोरजे : 'शिवसंप्रदायी मन्मथगाथा' भाग १, ' मराठी लावणी वाङ्मय' १९७४)

मूळपेठनीवासनी : आली कऱ्हाडला ।
मग वचेन बोलली आनीया ब्राह्मणाला ।।धृ।।
हे कऱ्हाड क्षेत्र आदक्षेत्र हाये वी ठान ।
तेथ कृष्णाकोयनेचा संगम होऊन :
संगमात गरूडानी घातलं आसन :
तेथ गरूड तीर्थ नाव तेथ पावून ।।
त्या स्थळी पावकेश्वर घ्या आइकोन :
त्याच्या वरत अदेश्वराचं आहे हो ठान :
ह्या कृष्णाचा रथ दीसतो शोभाईमान :
तिचे काटी राहिला नरसीया ब्राम्हण।।
बारा वरसा कन्यागत हो येऊन :

ह्या कृष्णामाईला भागीरती भेटुन :
अलं अवघं नगरच लोक तेथ मिळून :
त्या संगमामंदी स्नान त्यांनी करून :
गंद धूप दीप अरती नवे (द) घेऊन :
हो कमळेश्वर भावे त्यानी पुजीला ।।
मग चालला गनपती पुजायला ।। १।।
('कृष्णतरंग' १९७५ मधून)

**गाणे कृष्णाबाईचे**

सुधारकाचार्य आगरकरांच्या मातोश्री सरस्वतीबाई आगरकर यांनी लिहिलेले कृष्णाबाईचे गाणे सुशीला आठवले यांच्या हस्तलिखित वहीत उपलब्ध झाले. यातील काही भाग पु. पां. गोखले यांच्या 'आगरकरांशी ओळख' या ग्रंथात समाविष्ट आहे.

कऱ्हाड क्षेत्र हो उत्तम। कृष्णा कोयनेचा संगम। वाहते कोटा खालून । संगमेश्वराला स्नान। स्नान संध्या करिती ब्राम्हण । दिले उत्पन्न पंतान । ऐका कृष्णाबाई स्तवन ।करितील मनोरथ पूर्ण । झाला कृष्णा कोयनेचा संगम ।। १।। ऐका...

दक्षिण प्रयाग माहुली । जग स्नानासी गेली ।पंचामृती हो पुजा केली । फुले साजुक आणिली । निरांजनाची गर्दी झाली । नैवेद्य मिठाई आणिली । शिवानि जटेमध्ये सामोली । पार्वती तेथे आली । माझे दरीने ग माया केली ।।२ ।। ऐका...

वाई क्षेत्र जागा मोठी । उत्साव घाटोघाटी। सवाष्ण ब्राम्हणाची दाटी । हळद कुंकूवांन नावा पाजळिल्या तुझे काठी । हरीदास नामदेव शेटी । देव रावळाची मौज मोठी । गणपतीची ग महिमा मोठी । तो हर्ष न माये माझे पोटी ।।३।। ऐका...

रत्नखचित सिंहासन । दशभुजावरी ध्यान ।पायी साखळ्या पैंजण । शुक्रवारी तुमचे हो पूजन । दर्शनासी जाती हो जन । तिरकस केली मान । तुमचे हर्षे वदन हो । पुराणांतरी वर्णन । हाती त्रीशुळ घेऊन । दैत्य मर्दन केला तिन।।४।। ऐका...

गोटपाटल्या हात सरे । रवे दोरे गजरे । पट्यान शोभति कंबर । वाक्या बाजूबंद दंडावर । वाळ्या बुगड्याची कुसर । तानवड झळकती फार । मोती कापाला अनिवार । वेणी ग मध्ये मुदबोर । नागकेवडा चंद्रकोर । गंगावन सोडी पाठीवर । बाई तू मोत्यानी भांग भर । बिजवर शोभतो निढळेवर । नाकीच्या नथेल सर्जे फार । रूपलावण्य सुकुमार ।। ५।। ऐका...

रथामध्ये हो तुमची स्वारी । अलंकार भारी । साडी नेसूनीया जरतारी ग । चोळी बुट्टेदारी टिका ग। ठुशा तन्मणी वरी । मंगळसूत्र हे गळसरी । हिरवी डाळ ग गालावरी । ढाळ देती कुंकवाची चिरी ।। ६ ।। ऐका....

चैत्रमासात तुमचा उत्सव । कृष्णाबाई पालखित । चौऱ्या मोरचेल वारीत । शींग वाजंत्री वाजतात । नौबद चौघडे झडतात । मिरवत गेली मंडपात । मखर केळीचं शोभीवंत । समया लाविलीया तिथं । शप्तशती हो वाचीत । पुजा करितात आनंदात । लक्ष ब्राम्हणाची पंगत। प्रदक्षीणा घालीत । थोर थोर उचिष्ठ काढीत । छबिना निघे मिरवत ।तुमचे पायी हो माझे चित्त । पुरवा सर्वाचे मनोरथ ।। ७ ।। ऐका....

वैशाखमासात प्रयाग महात्म । भैरोबा लक्ष्मीत्न । पाणोथ्या पाणोथी अष्टतीर्थ । व्यंकोबा हटकेश्वराची कीर्त । दैत्यनिवारिणी आहे त्यात । रेणुकेचे सत्व। कृष्ण गोपाळ नाचत । पावले उठलीत खडकात । जमदग्नी तुझा कांत, गंगा गर्जती दोघांत ।। ८।। ऐका....

जेष्ठ मासात दशहारास्नानाची महिमा फार । कृष्णाबाईचे मंदिर पुजा बांधिती नारीनर । हळद कुंकू देऊनी ओट्याभर। चुडे रक्षोत निरंतर ।। ९ ।। ऐका...

आषाढमासात महापूर । कितीक बुडाली घरदार। अकांत वर्षला आनिवार । पर्वकाळाचा सोमवार । बुडालं नंदीचे शिखर। स्नान करितसे कमळेश्वर । जग म्हणती हर हर ।। १०।। ऐका....

कृष्णाबाईचे घाटावर । शोभा किती कार्तिक मासात। दिवे पाजळीती। राम लक्ष्मणाच्या वर । स्वामीचे दर्शन घेती ।अश्वथाची हो पुजा करीती। ब्रम्हा विष्णू वरती । पुढे सांभाची आहे मुर्ती । बारा वर्षान

आली भागिरथी। घरोघरी गंगा पुजन करत । तीं सौभाग्यवाणे देती वस्त्र पडदण्या सोडिती । चुडेदान मागती ।। ११ ।। ऐका...

अश्विनमासात मौज भारी । आली पंताची स्वारी । हत्ती घोडे हो अंबारी । लोक जातात सामोरी । अंबा सोन्याचे देव्हारी। मखराला कुसरभारी। नंदादीप हे दुहेरी । लक्ष तुळस तीजवरी । अन्नपूर्णा अन्नाचे ढिगारी । ब्राम्हणभोजन असे द्वारी । नायकिणी नाचती सामोरी ।।१२।। ऐका....

टेंभू गाव हे उंचावरी । खोलेश्वरी हो संनिध । रामनारायण सन्मुख । विठ्ठल विनायक । कवन केले हे सरस्वतीनं ऐकावे चित्त देऊन । त्यासी येतील विमान ।। १३ ।। ऐका...

**कऱ्हाडचे बाड**

पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळात बाड क्र. २८३ म्हणून 'कऱ्हाडचे बाड' नावाने एक बाड आहे.

या बाडाचा आकार ६"X ४ $^{१}/_{२}$" आहे. सबंध बाड एकाच हस्ताक्षरात असून अक्षर चांगले वळणदार बाळबोध आहे. एका पृष्ठावर साधारपणे १३ ओळी लिहिल्या आहेत. वापरलेला कागद परदेशी असून त्यावर जलचित्र (वॉटरमार्क) आहे. अक्षराच्या मांडणीवरून व भाषेवरून बाडाचा लेखनकाळ अठराव्या शतका ची अखेर किंवा एकोणीसाव्या शतकाची सुरुवात हा असावा.

या बाडातील बोधाख्यान , बोधकीर्ती आणि ७ ते १४ लावण्या ज्योतिराम (किंवा जोतीराम) या कवीच्या असून १५ व १६ क्रमांकाच्या लावण्या शंभुराजाच्या (जोतीरामाचा मुलगा) असून लावणी क्र. १७ रामा शिंपी या जोतीरामाच्या शिष्याची आहे.( संदर्भ मराठी संशोधन – ३ मराठी संशोधन पत्रिका वर्ष १३–१४ऑक्टोबर १९६५ ते जुलै १९६७ पृ. १०५ ते ११९)

**राजवाडे संशोधन मंडळ धुळे**

धुळे येथील इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळात कऱ्हाड

काजी संग्रह, कऱ्हाड काशीनाथ देवसंग्रह व कोळेवाडीकर देशपांडे संग्रह असे तीन संग्रह आहेत. त्यात कऱ्हाडच्या गणपतीची बखर मोडीत व अतिजीर्ण अवस्थेत आहे, तुकाराम सदाशिव गरगटे यांनी लिहिलेले नारायणस्वामींचे चरित्र (शके१७८५) तसेच गोविंद अष्टाधानी यांचे 'गुरुकिल्ली' (शके १७३२) हा वेदान्तपर ग्रंथ आहे.

**संत सखू**

कऱ्हाडास मंगळवार पेठेत केसकर म्हणून एक घराणे होते. या केसकरांना तीन मुलीच होत्या, पैकी एक तारगावच्या शेंडे यांच्याकडे, दुसरी कऱ्हाडच्या लाटकरांकडे व तिसरी मायणीच्या देशपांडे यांच्याकडे दिली होती. यापैकी मायणीच्या देशपांड्याची एक मुलगी म्हणजे सखू.

साताऱ्याच्या छत्रपती भोसले घराण्याचे कऱ्हाडचे कुलोपाध्याय मोरेश्वर वीरेश्वर गिजरे होते. त्यांचे चिरंजीव नारायणराव यांच्या नावे छत्रपतींनी सनद दिली होती. या नारायणदीक्षित गिजरे यांची समाधी कऱ्हाडात गवळवेशीच्या पाणवठ्यास त्र्यंबकेश्वराच्या देवळाजवळ आहे. या नारायणदीक्षितांचे धाकटे बंधू कृष्णरावांचे पणतू कृष्णराव नावाचेच होते. वर उल्लेख केलेली मायणीच्या देशपांडे यांची कन्या सखू ही या कृष्णरावांची पत्नी होय. म्हणजेच कऱ्हाड हे संतसखूचे आजोळही आहे आणि सासरही आहे.

सध्या कऱ्हाडात संत सखूचे म्हणून ओळखले जाणारे विठ्ठल मंदिर मुळात केसकरांचे त्यांच्या माघारी ते त्यांच्या कऱ्हाडातील मुलीकडे लाटकरांकडे आले. लाटकर म्हणजे संत सखूच्या मावशीचे घर होय.

*****

# ११

## पत्रकारिता

मराठी वृत्तपत्रसृष्टीचा आरंभ १८३२ च्या सुमारास झाला. सातारा जिल्ह्यातील पहिले साप्ताहिक 'शुभसूचक' १८५८ मध्ये सुरू झाले. कऱ्हाडचे सुपुत्र असलेल्या सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकरांच्या हस्ते प्रथम 'केसरी' आणि नंतर 'सुधारक' या साप्ताहिकांचा श्रीगणेशा अनुक्रमे १८८१ व १८८८ मध्ये झाला, तरी कऱ्हाडचे म्हणून ओळखले जाणारे पहिले वृत्तपत्र मात्र सुरू झाले ते १८८४ मध्ये. 'विदूषक' या त्या साप्ताहिकाचे संपादक होते श्रीपतराव जोशी. 'विदूषक' मध्ये कृष्णराव देसाई मास्तरांचे राजकीय निबंध येत. "हिंदुस्थानातील राज्यव्यवस्था म्हणजे भातुकलीचा खेळ ! आम्ही सांगू तो न्याय, आम्ही करू तो कायदा. यापेक्षा जास्त वाटाघाट करण्याची हिंदुस्थानच्या प्रजेस परवानगी नाही. याप्रमाणे प्रत्येक कायदेपटू गौरकाय भट्ट म्हणत असतात" ('विदूषक' ता. ५-१२-१८८७) अशा शब्दात इंग्रजी राज्याविषयीचा असंतोष व्यक्त करून संपादक थांबले नाहीत तर त्यापुढेही जाऊन कऱ्हाड तालुका सडकेच्या कडेला असलेल्या झाडांची मालकी रयतेची आहे असे सातारा कलेक्टरच्या ( नं. ८२/१४ ऑक्टोबर १८६५) ठरावाने सिध्द असता सरकार ती झाडे आपलीच म्हणू लागल्यावर कऱ्हाडकरांनी 'विदूषका'तून कलेक्टरास नोटीसच दिली. पंतप्रतिनिधींना कऱ्हाडच्या मोबदल्यात पाचशे चौरस मैल पसरलेल्या ७२ खेडी नि ४८ वाड्यांचे संस्थान बहाल केले. त्यावेळी " ज्यापैकी एकाचा वसूल करून प्रतिनिधी दुसऱ्या गावाला जातील तर दुसऱ्या गावाचा वसूल होईपर्यंत पहिल्या गावाच्या वसुलीतील बाकी शून्य व्हायची." अशा शब्दांत उघड चेष्टा करण्यास 'विदूषक' मागे राहिला नाही.

जगन्नाथ बाळाजी सप्रे हे चाफळचे. त्यांनी १८८७ मध्ये 'चित्रगुप्त' साप्ताहिक कऱ्हाडात सुरू केले. शिळाप्रेसवर मुद्रित होणारे हे पत्र प्रत्येक गुरुवारी सायंकाळी प्रसिध्द होत असे, असे त्या पत्राचा ३ ऱ्या वर्षातील ३२ वा म्हणजे १२ डिसेंबर १८८९ इ.चा अंक उपलब्ध झाला त्यावरून दिसते. 'स्वस्ति स्वस्ति सुजन मणिगणा आर्यवंशावतंसा। सत्यं सत्यं सुविजय तुमचा पार्थ कौंतेय साचा ।। दुष्टे नष्टो जपा रे कृतिस अपुलिया धर्मदंडास देखा । येतो हा चित्रगुप्त क्षितितली तुमच्या पापपुण्यावलोका ।।१।।' असा श्लोक पहिल्याच पानावर देऊन संपादकांनी आपले धोरण स्पष्ट केलेले आहे. फुटकळ अंकाची किंमत त्या काळीदेखील २ आणे आणि एका वर्षास १ रू. ११ आणे वर्गणी होती. जाहिरातीचा दर सोळा ओळींपर्यंत १ रू. व त्यापुढे ओळीस १ आणा असा होता. दि. १२ डिसेंबर १८८९ च्या अंकात राष्ट्रीय सभेचे जनक ह्यूमसाहेब यांचे चरित्र, इंडियन पोलिटिकल एजन्सी आणि आमचे मुंबई पुणेकर, वर्तमानसार, पत्रव्यवहार, जाहिराती व जाहीर नोटीसा असा मजकूर आहे. 'अखेर तात्या भिल्लास फाशी दिलेच', 'पंढरपूर येथे लवकरच हायस्कूल होणार' या बातम्यांच्या ओळींतच फ्रान्समधील स्त्रियांचा दफनविधी, ताश्कंद येथील शेतकरी प्रदर्शन अशा आंतरराष्ट्रीय बातम्याही आल्या आहेत. संपादकीय टीकाटिपणात (१) 'तालुक्यातील बऱ्याच गावाकडील काँग्रेसची वर्गणी जमा व्हावयाची आहे, हलगरज केल्यास कऱ्हाड स्टेशनवर डेलिगेटाचे उपहार वगैरे सोय कशी होणार?' म्हणून पुढाऱ्यांना इशारा दिला आहे. (२) कऱ्हाडचे चाँदशा मनेशा काजी इनामदार यांचे कचेरीत काही कामासंबंधी जाणे झाले असता त्यांना बसण्यास खुर्ची न देता उभे केले. या अपमानाबद्दल कलेक्टरसाहेबांकडून रानडे मामलेदार यांना ताकीद दिली म्हणून रानडेसाहेबांप्रमाणे स्वभाव असणाऱ्या अंमलदारांनी लक्ष द्यावे अशी सूचना केली आहे. (३) कापील येथे काही महिन्यापूर्वी एका औरतेचा खून झाला त्याच्या तपासाबद्दल एका अनुभविकाच्या पत्रात 'असले प्रकारचे गुन्हे गपकन जिरण्याची या संस्थानास खोड लागली आहे... खुनाचे चौकशीचे काम ब्रिटिश अंमलातून होईल असे करा.' असे म्हटले आहे. (४) 'नाटकाचे बंदोबस्तासाठी पोलिस येतात. परंतु ते किती यावेत याचा नेमच नाही. शिवाय त्यांचेबरोबर बिऱ्हाड वगैरे मंडळी आहेच. यापैकी काही तर 'घोड्यावर' बसून अगदी तर्र झालेली असतात. पोलिसचे मुख्य अधिकारी यांनी हा फार्स

गुप्तपणे येऊन पहावा, हे अप्रयोजक वर्तन मोडून काढण्याविषयी वरिष्ठांनी काळजी घ्यावी'असे लिहून 'या संबंधाने पुन्हा आम्हास सूचना करण्याचा प्रसंग न येवो! म्हणजे झाले' असे संपादक म्हणतात. 'राज्य फुकाचे, धनी सुखाचे, नित्य कायदे बहुजुलमाचे, व्हिक्टोरिया दयाळु राणी, शंकूची पाहणी, पिकास हानी, शेती रडती, दस्त फिटेना, पोट भरेना, नोटीस झाली कायद्याप्रमाणे, हरकामाचे छापील नमुने, सही करावी कलेक्टराने' असा एक सार्वजनिक स्थितीचे वर्णन करणारा कटाव 'चित्रगुप्त'च्या ८-१२- १८८७ च्या अंकात आला आहे.('साहित्यिक कऱ्हाड' पु. पां. गोखले पृ. ३३) 'चित्रगुप्त'त बाळासाहेब बेलापुरे यांचे विनोदी लेखन येई.

पांडुरंग बळवंत कोल्हापुरे यांनी 'सुमंत' नावाचे साप्ताहिक १८९३ मध्ये सुरू केले. शिळापत्रावर छापल्या जाणाऱ्या या पत्राची किंमत फुटकळ अर्धा आणा होती. वार्षिक वर्गणी २ रू. होती. नोटीसा-जाहिरातींसाठी कॉलमच्या सोळा ओळींपर्यंत दीड आणा असा दर होता. १० व्या वर्षाच्या ३० व्या अंकाचा (दि.५ एप्रिल १९०९) एक तुकडा उपलब्ध झाला त्यावरून ही माहिती दिली आहे. याच अंकात 'सालाबादप्रमाणे श्री कृष्णाबाईचे उत्सवास उद्यापासून सुरुवात होणार आहे' अशी बातमी आणि 'ऋतुमानाप्रमाणे उन्हाळा कडक रीतीने भासत आहे. सकाळी चैत्र पालवीचा गारवा पडत असतो. दुपारी मधून-मधून आभ्रे येतात. उकाडा मनस्वी होतो. रोगराई काही नाही. धारण तेजी आहे.' असे हवामान दिले आहे. 'हे पत्र कऱ्हाड येथे रा. महादेव दामोदर कुलकर्णी व पांडुरंग बळवंत कोल्हापुरे यांनी सुमंत छा. छा. प्र. (छापखान्यात छापून प्रसिद्ध) केले'. अशीही नोंद आहे. 'सुमंत' मध्ये गणपतराव मारूलकरही लिहीत. १९२० पासून हे साप्ताहिक कोल्हापुरे यांचे चिरंजीव डॉ. नारायणराव यांनी चालू ठेवले. आपला वैद्यकीय व्यवसाय चालू ठेवून डॉ. कोल्हापुरे यांनी पुढे स्वत:चा 'श्री लक्ष्मी छापखाना' काढला आणि कऱ्हाडसारख्या प्रगतीपर तालुक्याच्या ठिकाणी सुबुध्द जनमत प्रकट करणारे एखादे तरी नियतकालिक असावे अशा विचाराने 'अभ्युदय' नावाचे पाक्षिक १९२८ च्या दासनवमीस सुरू केले. हे पाक्षिक १९४२ अखेर चालू होते. हे पत्र टाईपावर छापले जाई. दर १ व १५ तारखेस प्रसिध्द होई. याची वार्षिक वर्गणी १२ आणे होती. जाहिरातीचा दर कॉलम इंचास १ रू. असा असे. १५ जानेवारी १९३५ च्या आम्हास उपलब्ध झालेल्या एका अंकात 'अर्बन को- ऑप. बँकेची

व्याजदरासंबंधी  जाहिरात आहे. चालू ठेवीस २% आणि मुदत ठेवीस एका वर्षास ४% असे व्याजाचे दर होते.' 'दूध अगर पाणी गरम करण्याच्या सोयीच्या ओगले यांच्या प्रभाकर कंदिला'ची जाहिरात आहे तशीच 'मनोहर खडी व अप्रतिम कल्हई' करणाऱ्या गोरे यांचीदेखील जाहिरात या अंकात आहे. बाळकृष्ण वासुदेव घाटे (टिळक हायस्कूलमधील शिक्षक) हे 'अभ्युदया'चे सहसंपादक होते. पण थोर स्वातंत्र्यसैनिक पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले यांचे मौलिक योगदान 'अभ्युदया'च्या संपादकांना गुप्तपणे होत असल्यामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या दृष्टीने प्रेरणा, प्रोत्साहन देणाऱ्या या पत्राच्या संपादकांना १९३०–३२ मध्ये तत्कालीन ब्रिटिश शासनाकडून ताकदीही मिळाल्या होत्या. 'अभ्युदय' पाक्षिक असल्यामुळे त्याला काहीसे मासिकाचे आणि बरेचसे वर्तमानपत्राचे स्वरूप असते असे 'केसरी'ने म्हटले होते, ते पुष्कळ अंशी खरे व संपादकांनाही मान्य होते. जुन्या शुध्दलेखनाची बिनचूक व सुंदर छपाई हेही 'अभ्युदया'चे एक वैशिष्ट्य  होते. संपूर्ण वर्षात प्रसिध्द झालेल्या लेखांमधून काही संग्राह्य अशा लेखांचे एक पुस्तक 'अभ्युदयाची नवरत्ने'(वर्ष ६ वे), 'विवेक विहार' (वर्ष ७ वे) 'ज्ञानकिरण'(वर्ष ८ वे) अशा नावांनी प्रसिध्द केले जाई. 'कऱ्हाडसारख्या एका बाजूच्या तालुक्याच्या गावी अप्रसिध्द पण विचारी, गाजावाजा न करणारी आणि लोकांमध्ये खळबळ उत्पन्न न करणारी, पण त्यांना योग्य दिशा दाखविणारी माणसे आहेत. त्यांचा उपयोग जनसेवेकडे करण्यात गेल्या अर्ध तपात 'अभ्युदय'ला यश मिळाले आहे.'असे 'अभ्युदया'च्या संपादकांनी एके ठिकाणी म्हटले आहे. ('शारदासदन ')

कऱ्हाडचा एक तरूण स्वातंत्र्यसैनिक  लक्ष्मण गणेश जोशी हा येरवड्याच्या तुरूंगात २९–९–१९३२ रोजी निधन पावला. 'अभ्युदया'ने आपल्या त्या वर्षीच्या दिवाळी अंकात त्याचा मृत्यूलेख दिला होता. त्याबद्दल साताऱ्याच्या 'ऐक्य' मधून टीका झाली तरी 'त्या (दिवाळीच्या) आनंदाप्रसंगीही तसे केल्याशिवाय आम्हांस राहवले नाही. ... (पहिल्या पुण्यतिथीस) खास अंक काढून चि. लक्ष्मण जोशी यांच्या ऋणातून अंशत: मुक्त होण्याचा प्रयत्न केला. कारण तो कऱ्हाडचाअभिमन्यु होता.' असा खुलासा संपादकांनी केला. 'अभ्युदय'मध्ये बा. वा. घाटे, पु. पां. गोखले, पां. ग. भाटे, द. ल. माणकीकर, केशवराव सरडे, श्री. व्यं. नखाते तसेच यशवंतराव चव्हाण, वा. भ. मराठे,

ल. ग. जोशी, पुष्पा कोल्हापुरे यांचे लेख असत. 'अभ्युदय' पाक्षिकाला दहा वर्षे पूर्ण झाली. तेव्हा 'किंचित सिंहावलोकन' करताना 'अभ्युदय' च्या संपादकांनी लिहिले : (वर्ष १० अंक २४ दि. ३१ जानेवारी १९३८) 'मराठी नियतकालिकांचा योगक्षेम बहुत करून जेमतेमच चालतो म्हणून त्यांच्या सेवेचे समाधान अधिक मोलाचे ठरते. रोज रोज नवीन दैनिके मराठीत अवतरत असता, नवीन नवीन मासिके गर्दी करीत असता आणि नवीन नवीन प्रकाशने झळकत असता, मुद्रक- प्रकाशक -संपादक यांची आर्थिक परिस्थिती ( काही सन्माननीय अपवाद वगळले तर) मोठीशी अभिमानास्पद नाही आणि इतकेही करून ही मंडळी आपले कार्य चालविते याचे कारण जनसेवेची त्यांची उत्कट इच्छाच होय. एरवी फुकट्या वाचकांनी, चवचाल वाङ्मयाला चटावलेल्या चटोरानी नेमक्या दूषणालाच टोच मारावयास सदा टपलेल्या काकद्रष्ट्यांनी आणि केवळ 'फासन ' म्हणूनच एखादे नियतकालिक एकदा दिवसाकाठी उलटणारांनी नाके मुरडावी, नावे ठेवावी, हेटाळणी करावी आणि तरी पुन्हा संपादक - मुद्रक - प्रकाशकानी आपला उद्योग नव्या दमाने, नव्या सूर्यकिरणांबरोबर चालू ठेवावा असे त्या धंद्यात काय आहे ? कोणी समानधर्मा अगर सहृदय इतिकाहासकार केव्हा ना केव्हा तरी भेटेल असा आशावाद बळकट असतो.' 'अभ्युदय गेली दहा वर्षे या भूमिकेवरूनच सेवा करीत आहे. या भूमिकेव्यतिरिक्त भूमिकेवरून आता दक्षिणार्थ भिक्षुकगण पळत सुटल्याप्रमाणे कऱ्हाडात गेल्या दोन वर्षांत देखील कित्येक हिंदु - मुसलमानी लेखणीबहादुरांनी 'लोकसेवे' ची 'खबरदारी' घेत असल्याचा पुकारा केला. 'स्वकुळाच्या साळी' पेरल्या, 'समाजसेवेची जाळी विणली'. 'रसिकरंजनार्थ साहित्यमाला' गुंफल्या. 'शिक्षणकैवारीचे अलंकार' मिरविले. 'मर्द राजकारणाचे' दुदुंभी फुंकले. 'ब्राम्हण्याचे' शिक्षण दिले आणि 'मुहूर्त ज्वलितं श्रेय:' एवढ्यातच समाधान मानले. 'संग्राम ' चे संपादक दे. गणपतराव नलवडे यांना त्यांच्या खटल्यात 'अभ्युदयाच्या' फायलींचा उपयोग झाला, दे. सोमण - शिराळकर - आत्माराम पाटील यांच्या निवडणुकीत 'अभ्युदयाला' प्रभावी सेवा बजावता आली. जिल्ह्यातील , जिल्ह्याबाहेरील देशसेवकांच्या गुणग्रहणपर लेखांचे कौतुक झाले. नवीन होतकरू लेखकांना सार्वजनिक प्रश्नावर

लिहावयास मिळाले आणि मराठी वाङ्मयालाही 'अभ्युदयाने' हातभार लावला. फार काय, 'अभ्युदयाच्या' 'तरूणांवरील राष्ट्रीय प्रेमामुळे' 'अभ्युदयाने' सामाजिक, राजकीय अगर औद्योगिक क्षेत्रात दिग्दर्शन करताच त्या त्या क्षेत्रातील हटवाद्यांचा राग 'अभ्युदयाला' सहन करावा लागला आणि दूरदृष्टी गुणग्राहकांच्या कौतुकाचा लाभही 'अभ्युदयास' झाला. 'तरुणांची तंद्री' या राजकीय लेखाबद्दल ब्रिटिश नोकरशाहीने 'हां हां !' म्हणून नोटीस बजावली, हरिजनांच्या हक्कांचा आणि सामाजिक पुरोगामी वळणाचा पुरस्कार करताच सनातन्यांनी दारातूनच 'अभ्युदयावर' 'छू' करून आपली कुत्री सोडली तर उलट मे. ओगले ग्लास वर्क्ससारख्यांनी मुद्दाम पत्रे पाठवून 'अभ्युदयाचे' 'औद्योगिक धोरणाविषयी कौतुकही केले.' या सर्व गोष्टीबद्दल अभ्युदयास एकपरी अभिमानच वाटतो. 'राष्ट्राची किंमत जगात शास्त्रीय जीवन, विद्वानांचा परामर्श, स्त्रियांचा सन्मान, ग्रंथसंग्रहालये, जीवनपोषण सामर्थ्य, नियतकालिके आणि राष्ट्रीय वैशिष्ट्ये यावर जोखली जाते. यापैकी कोणत्याही कलमात हिंदुस्थान मागासलेला राहता कामा नये म्हणून कऱ्हाडसारख्या तालुक्यातील लोकानी देखील किती, कुणी तयारी आणि विचारसरणी ठेवली पाहिजे याचे अखंड दिग्दर्शन 'अभ्युदया' ने आपल्या कुवतीप्रमाणे केले आहे.' ( 'अभ्युदय' हिंदुस्थान अंक वर्ष १० अंक २४)

'अभ्युदया' च्या उपरोक्त 'किंचित सिंहावलोकना' त मधल्या काळातील वृत्तपत्रांचा उल्लेख आहे. त्याचा तपशील असा : 'लोकसेवा' हे साप्ताहिक महादेव पुंडलिक बिचकर यांचे. ते 'स्वकुळ – साळी – विजय' नावाचे मासिकही काढत. मीर मुनशी भालदार 'खबरदार' काढत. 'रसिक रंजन माला' गोविंद पांडुरंग देवांची, 'शिक्षकांचा कैवारी' ( पाक्षिक) सखाराम बहिर्जी पाटील यांचे. 'अलंकार' मासिकही त्यांचेच. 'ब्राह्मण शिक्षक' हे कशाळकर यांचे मासिक होते. याखेरीज १९२१ मध्ये 'पंचानन ' हे साप्ताहिक कऱ्हाडात निघत असे. क्रांतिकारक कळंबे मास्तरांनी 'कैवारी' साप्ताहिक १९२४ मध्ये कऱ्हाडास सुरू केले. काही दिवसांनंतर ते मुंबईहून प्रसिध्द होई. आ. ह. खतीब यांचे 'मुसलमान' (पाक्षिक), १९२५ च्या सुमारास उध्दव दत्तात्रय कुलकर्णी यांचे 'प्रताप' ( साप्ताहिक), मुल्ला यांचे

'राहबर' ( साप्ताहिक), त्याचप्रमाणे आण्णाजीराव शिदोजीराव चव्हाण व व्यंकटराव पिराजी पवार यांचे 'संदेश' (साप्ताहिक) अशी वृत्तपत्रे कऱ्हाडातून निघत.

यशवंतराव चव्हाण यांच्या मनात महाविद्यालयीन शिक्षणकाळापासून सातारा किंवा कऱ्हाड येथे एखादे वृत्तपत्र काढून संपादक म्हणून काम करायचे होते. ( कृष्णाकाठ पृ. १८२) लोकजागृतीसाठी वृत्तपत्रे व त्यासाठी स्वतंत्र मालकीचा छापखाना अशी योजना यशवंतराव चव्हाण आणि हरिभाऊ लाड यांनी गणपतराव बटाणे यांच्यापुढे मांडली होती आणि बटाणे – लाड यांचा 'व्यापारी प्रेस' १९२९ मध्ये सुरू झाला. त्याच वेळी 'श्री शिवछत्रपती' साप्ताहिकाचे डिक्लेरेशनही केले होते. पण सविनय कायदेभंगाच्या (१९३०) चळवळीमुळे साप्ताहिकाचे काम थंडावलेच. १९३७ मध्ये विधानसभेच्या निवडणुकीत घवघवीत यश प्राप्त झाल्यामुळे यशवंतराव चव्हाणांना वृत्तपत्र सुरू करण्याचे स्फुरण झाले. संपादक होते आत्माराम पाटील ( बोरगावकर) आणि ( पुढे मुंबईच्या 'लोकसत्ते' चे संपादक झालेले) ह. रा. महाजनी, भय्याशास्त्री वाटवे आणि स्वत: यशवंतराव चव्हाण यांचा संपादक मंडळात समावेश होता. पहिल्या अंकातील 'लोकक्रांतीचा जीवनहेतू' हा अग्रलेख यशवंतरावांनीच लिहिला होता. पहिल्या अंकाचे प्रकाशन मोठ्या उत्साहाने झाले. कऱ्हाडला 'व्यापारी प्रेस' मध्ये अंक छापला जाई. व्यवस्थापक व प्रचारक म्हणून शांताराम इनामदार, गौरीहर सिंहासने हे काम पहात. पहिल्या काही आठवड्यांनंतर यशवंतराव चव्हाण कायद्याच्या अभ्यासासाठी पुण्यास गेल्यावर भय्याशास्त्री वाटवे यांच्या लेखन सहाय्यावर लाड यांनी आर्थिक तोशीस सोसत 'लोकक्रांती' चे काम पुढे रेटले. दरम्यान संपादकांच्या राजकीय मतांतही अंतर पडत गेले आणि वर्षभराच्या आतच 'लोकक्रांती' बंद पडले.

स्वातंत्र्योत्तर काळात १९४८ मध्ये वृत्तपत्र काढण्याच्या यशवंतराव चव्हाणांच्या महत्त्वाकांक्षेने पुन्हा डोके वर काढले. त्यासाठी लिमिटेड कंपनीही काढली. कऱ्हाडच्या पाटील आणि कंपनीचे आराणके मास्तर यांच्या सहकार्याने कऱ्हाडात 'संगम प्रिंटींग प्रेस' नावाचा एक छापखाना सध्या यशवंतराव चव्हाण

स्मृतिसदन आहे, त्याच्या जवळपास उभा करण्यात आला होता . यशवंतराव चव्हाणांचे वर्गमित्र अनंतराव कुलकर्णी हे साताऱ्यात आनंद मुद्रणालयाचे काम पहात, त्यांचे सहकार्य होतेच. सातारा येथे त्याच मुद्रणालयाच्या मालकांचे 'समर्थ' हे काँग्रसवादी साप्ताहिक होते, त्याचे संपादक नरुभाऊ लिमये यांच्यावरच 'प्रकाश' दैनिकाच्या संपादनाची जबाबदारी सोपविण्यात आली आणि कऱ्हाडातील पहिले- वहिले दैनिक रोज प्रसिद्व होऊ लागले. राजकीय पाठबळ, कल्पकता, उत्साह, लेखनसहाय्य एवढेच मिळून भागत नाही, दैनिकासाठी बातम्यांचा ताजेपणा लागे तो अपुरा तर होताच पण त्याहीपेक्षा आर्थिक पाठबळ तुटपुंजे पडले. नरूभाऊ लिमये यांनी एका ठिकाणी असे सांगितले, ''अंकाचे स्वागत सर्वांकडून, मदतीची आश्वासने इतकी की त्यातील दशांश खरी ठरली असली तरी पुरे होती. पण होते, नव्हते ते सर्व घालविले'. अशा परिस्थितीत अवघ्या दोन वर्षांतच 'प्रकाश' दैनिकाचा प्रपंच आवरता घ्यावा लागला नसता तरच नवल .

यशंवतराव मोहिते यांनी १९४८ च्या सुमारास 'द्रष्टा' साप्ताहिक काढले होते. 'सुमंत' या कऱ्हाडातील जुन्या साप्तहिकाचे संपादक पांडुरंग बळवंत कोल्हापुरे यांचे नातू गोपीनाथ कोल्हापुरे यांनी २७ मे १९५४ रोजी 'संगम' या नावाने नवे साप्ताहिक सुरू केले. नाथ चव्हाण,भय्याशास्त्री वाटवे , पी.डी. पाटील हे 'संगम' च्या संपादक मंडळावर होते, तर या पत्राचे प्रकाशक होते केशवराव जोशी. ते छापले जाई गिजरे यांच्या लोकमान्य मुद्रणालयात. शे.का. पक्ष, रॉयिस्ट, काँग्रेस, हिंदूमहासभा अशा विविध राजकीय विचारसरणीच्या व्यक्तींचे सहकार्य घेऊनही कोल्हापुरे यांना दोन वर्षांपेक्षा अधिक काळ 'संगम' चे काम रेटता आले नाही. यानंतरच्या काळात 'विचार' (बहुधा डिसेंबर १९५६)या नावाचे साप्ताहिक पी. डी. पाटील यांच्या संपादकत्वाखाली सुरु झाले. गंगाधर पागे व बाबुराव नलवडे संपादन करीत असलेले 'अंकुश' नावाचे साप्ताहिक याच सुमारास निघाल्याचे समजते पण ही सर्व पत्रे अल्पकाळच चालली.

सांगलीचे गणपतराव भोसले आणि दीनानाथ भोसले यांनी कऱ्हाडात स्वत:चे मुद्रणालय नव्याने उभारून 'नवसंदेश' नावाचे दैनिक १९५८-५९

मध्ये सुरू केले. पण अवघ्या दीड – दोन वर्षांत कऱ्हाडातील पसारा आवरून त्यांना सांगलीस स्थलांतर करावे लागले.

'केसरी', 'भारत', 'ज्ञानप्रकाश' इ. चे विक्रेते आणि 'केसरी' चे वार्ताहर म्हणून वृत्तपत्रसृष्टीशी संबंध आलेल्या सखाराम सिध्देश्वर ऊर्फ आप्पासाहेब गरूड यांनी १९८० मध्ये गुढीपाडव्यास 'कोयनातीर ' हे स्वत:चे साप्ताहिक सुरू केले. निष्ठेने आणि व्रत म्हणून पत्र चालविणाऱ्या गरूडांचा २००३ मध्ये मराठी पत्रकार कल्याण निधीचा दर्पण पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. आनंद परांजपे आणि मोहन कुलकर्णी यांनी 'कराड समाचार'(१९७४), शैलजा सिंहासने यांचे 'कराड वैभव', राम होगले यांचे 'रामप्रताप', शशिकांत कुलकर्णी यांचे 'शशिलेख', गोरख तावरे यांचे 'सत्यसह्याद्री' ही साप्ताहिके कऱ्हाडातून प्रकाशित होत. १९८५ मध्ये सांगलीहून येथे येऊन अरूण गौरीहर सिंहासने यांनी 'सह्याद्री एक्स्प्रेस' हे दैनिक कऱ्हाडातून सुरू केले. पण काही काळानंतर त्यांना ते काम थांबवावे लागले. अलीकडे 'प्रीतिसंगम' (संपा. शशिकांत पाटील), 'कृष्णा एक्स्प्रेस' ( संपा. हणमंत शिंदे) 'कर्मयोगी' (संपा. सौ. मंगला लोखंडे) 'राजसत्य' ( संपा. गोरख तावरे) अशी दैनिके कऱ्हाडातून गेल्या पाच– सहा वर्षात चालू झाली आहेत. 'आपले यश' 'सत्य सह्याद्री' या स्थानिक वृत्तवाहिन्या कऱ्हाडातून सुरू झाल्या आहेत. विकास मुगुटराव भोसले हे संपादक असलेले 'यशवंतनगरी' (साप्ताहिक) १४ नोव्हेंबर २००६ रोजी सुरू झाले.

अगदी आरंभीच्या काळात बाहेरगावच्या पत्रांना बातम्या कोण पाठवीत त्याचा मागमूस लागला नाही तरी कऱ्हाडचे बातमीपत्र नेहमीच 'नवखे' किंवा 'खळबळ उडविणारे' असायचे, त्याचा मासला म्हणून येथे इस्लामपूरच्या 'प्रतोद ' मध्ये ९ – ८ – १८८६ रोजीची बातमी उद्धृत करतो : ' येथील गाडीउतारावर असलेली नाव जराग्रस्त झाल्यामुळे तिला पेन्शन देऊन दुसऱ्या तरुण तरुणीची नेमणूक करण्याबद्दल किंवा आहे तिला तरी चांगल्या विद्वान कारागीर डॉक्टरांकडून औषध देण्याबद्दल लोकांनी बराच गवगवा केला होता पण आमच्या उदार प्रभुवर्गाचे तिकडे लक्ष गेले नाही.' त्यापूर्वी दोन वर्षे आधी, ''आमचे 'स्वदेशहितजागृत' 'ट्रिब्युन' ( दाद लावणारे) 'विदूषकबुवा'

आपले काम करतील. त्याची काळजी कशाला म्हणून स्वस्थ बसलो. पण उपयोग काय ? जंगलीबुवाच ते ! आर्यधेनूचा आणि तिच्या स्वहितदक्ष गोपाळांचा तमाशा पाहण्यातच ते गुंग !! शिवाय प्राप्तीवरील कराबद्दल दोन लघुशंका करण्याची त्यास गडबड झालेली ! मग गरीबाकडे त्याचे लक्ष कसे जाणार ? ते कानावर जानवे ठेवून कच्छमुक्त होऊन बसले.'' ( 'साहित्यिक कऱ्हाड' पृ.३१, ४१)

स्वातंत्र्यपूर्व काळात तरी मराठीतील लहानमोठ्या वर्तमानपत्रांना काही सन्मान्य अपवाद वगळता, कऱ्हाडसारख्या ठिकाणी पगारी बातमीदार नेमणे परवडणारे नव्हतेच. स्थानिक महत्त्वाच्या बातम्या तयार करून पाठविण्याचा उद्योग प्रामुख्याने राजकीय - सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते व प्राथमिक शिक्षक वगैरे मंडळीच करीत असत. गणपतराव कोपर्डे हे कापड व्यवसाय आणि ग. गो. ऊर्फ बापूराव बिजुटकर हे सराफी व्यवसाय करणारे. पण हे दोघे अच्युतराव कोल्हटकरांच्या 'संदेश' पत्रासाठी बातम्या पाठवत. १९२० साली काँग्रेसने विधानसभांवर बहिष्कार पुकारल्यावर कऱ्हाडच्या सार्वजनिक वाचनालयात काळे, कानिटकर आणि वा. रा. कोठारी यांची व्याख्याने झाली. त्यावेळी कऱ्हाडकर श्रोत्यांनी व्याख्यात्यांची जी फजिती उडविली तिचे वर्णन 'कऱ्हाडात का. का. अँड को.' या शीर्षकाने 'संदेश' साठी याच कोपर्डे - बिजुटकरांनी दिली होती. गणपतराव कोपर्डे 'संदेश' चे संपादक अच्युत बळवंत कोल्हटकर यांची पुण्यतिथी प्रतिवर्षी मोठ्या भक्तिभावाने व नियमितपणे साजरी करत. ग. गो. बिजुटकर 'प्रकाश' , 'नवा काळ' या पत्रांनाही बातम्या पाठवीत. विट्याहून निघणाऱ्या 'विटावृत्त' चे संपादन त्यानी काही काळ केले. कऱ्हाडातील व्यापारी पेठेत बिजुटकरांना 'संपादक' या नावानेच ओळखत. ( बऱ्याच जणांना ते कशाचे संपादक होते हेही माहिती नसे. ) अण्णाजीराव शिदोजीराव चव्हाण ( कार्वे - कोपर्डे), भय्याशास्त्री वाटवे, विनायकराव फणसळकर वकील, 'त्रिशूळ' या टोपणनावाने मुंबईच्या पत्रांसाठी खळबळजनक बातमीपत्रे लिहिणारे डॉ. शं. ग. जोशी, पुढे काँग्रेसचे आमदार - खासदार झालेले व्यंकटराव पिराजीराव पवार किंवा ( एक काळ कऱ्हाडचे नगराध्यक्ष असलेले वैद्यकीय व्यावसायिक ) डॉ. श्री. म. कुलकर्णी

आणि हिंदूसभा कार्यकर्ते केशवराव जोशी (वकील) यांनी बातमीदार म्हणून काम केले आहे.

पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले यांनी तर महाविद्यालयीन काळात 'ज्ञानप्रकाश' व **'केसरी'** या पत्रांतून उमेदवारी केल्यामुळे आणि स्वत: इतिहासाचे अभ्यासक असल्यामुळे भोवतालच्या घडामोडींची तारीखतागायत नोंद किती महत्त्वाची आहे हे लक्षात घेऊन वेगवेगळ्या वृतपत्रांना बातम्या पाठवीतही आणि स्थानिक वार्ताहरांना बातम्या कशा लिहाव्यात याचे मार्गदर्शनही करीत. कऱ्हाडच्या 'अभ्युदय ' आणि साताऱ्याच्या 'ऐक्य' व 'समर्थ' या पत्रांसाठी त्यांनी संपादकीय लेखनही केले आहे.

यशवंतराव चव्हाण यांनीही आपल्या राजकीय कारकिर्दीच्या आरंभ काळात वृत्तपत्रांना स्थानिक बातम्या पाठविण्याचे काम केले. त्यांनी स्वत:ला ' किंचित वार्ताहर' असे म्हणविले आहे. १९३०-३१ च्या काळात कऱ्हाडात रोज प्रभातफेऱ्या निघत आणि प्रभातफेरीचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना खटल्याचे समन्स लागे. या प्रभातफेऱ्यांची, चळवळीची आणि खटल्याची बातमीपत्रे यशवंतराव 'ज्ञानप्रकाश' कडे पाठवीत. ते अधिकृत बातमीदार नव्हते त्यामुळे 'एका बातमीदाराकडून' असे त्या बातमीवर छापले जाई. १९३१ च्या मध्यापर्यंत जवळ जवळ दीड वर्षे त्यांनी हे काम केले. याच काळात कऱ्हाडास पं. मदनमोहन मालवीय यांचे व्याख्यान झाले. त्यांच्याबरोबर न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकरही होते. सभेच्या सुरुवातीस एकाने केळकरांचे तर दुसऱ्या काहींनी कऱ्हाडातील भाऊसाहेब बटाणे यांचे अशी दोन नावे अध्यक्षपदासाठी सुचविली गेली. त्यामुळे सभेत गोंधळ होऊन शेवटी दोघांनीही अध्यक्ष राहावे अशी तडजोड झाली. ही हकीकत यशवंतराव चव्हाणांनी 'ज्ञानप्रकाश' कडे पाठविली व ती बातमी 'तात्यासाहेब केळकरांना अर्धे अध्यक्षपद' या शीर्षकाखाली प्रसिध्द झाल्यामुळे कऱ्हाडात आणि इतरत्रही बरीच चर्चा झाली. 'ही बातमी खोटी आहे' असे एक पत्र यशवंतराव चव्हाणांचेच जवळचे मित्र असलेल्या गौरीहर सिंहासने यांच्या नावाने कोणीतरी 'ज्ञानप्रकाश'कडे पाठविले आणि ते प्रसिध्दही झाले. त्यामुळे आपल्याविषयी गैरसमज होऊ नये म्हणून गौरीहर सिंहासने यांना घेऊन यशवंतराव पुण्याला

‘ज्ञानप्रकाशच्या’ कचेरीत जाऊन खुलासा करूनही आले. पण पदरचा टपालखर्च करून राष्ट्रीय चळवळीला प्रसिध्दी मिळावी म्हणून हौसेने केलेला उद्योग अंगाशी कसा येतो याचा अनुभव घेऊन त्यांनी आपली ‘वार्ताहरी’ संपविली.

पूर्णवेळ / अर्धवेळ ‘वार्ताहरी’ चा व्यवसाय करणारांमध्ये वा. वा. देशपांडे मास्तर, सी. कों. (बाळासाहेब) कुलकर्णी विहेकर, वि. व्यं. ऊर्फ राजाभाऊ कुलकर्णी ( धनी ), बाळासाहेब मोघे, कवी विहंग, वसंत वासुदेव देशपांडे, आप्पासाहेब गरूड, मु. शं. देशपांडे ( मास्तर ), कॉ. डी. एम. पाटील, वासुदेवराव देशपांडे, शंकर पाटील, यांची नोंद घेतली पाहिजे. वसंत वासुदेव देशपांडे यांनी आठवीच्या ( इंग्रजी ४ थी ) वर्गात शिकत असताना पहिली बातमी पाठविली. लघुलिपीची ( शॉर्टहँड) फारशी ओळख नसूनही यापैकी बरीचशी मंडळी मोडी लिपीचा वापर करून व्याख्यानेही उतमरीतीने अक्षरबध्द करीत. काँग्रेस, हिंदुमहासभा किंवा जनसंघ अशा परस्परविरोधी पक्षांच्या बातम्या पाठविणारा बातमीदार एकच पण बातमीचा रंग त्या त्या वृत्तपत्राला हवा तसा देण्याची करामत तो करत असे. त्या काळी दूरध्वनी नव्हताच, तारेने बातम्या पाठविल्या जात. १९३० ला बिळाशीच्या सत्याग्रहाच्या खटला इस्लामपूरमध्ये चालू होता. मु. शं. देशपांडे मास्तर हे त्या खटल्यातील एक आरोपी, ते पत्रकारही होते. एका पोस्टकार्डावर अगदी बारीक अक्षरात खटल्याच्या निकालाचे तपशील लिहून निकाल लागताच ते पोस्टकार्ड त्यांनी पोस्टात टाकले आणि तिसऱ्याच दिवशी ती बातमी ‘ज्ञानप्रकाश’ दैनिकात प्रसिध्द झाली. साताऱ्याचे पत्रकार बाळासाहेब बहुलेकर यांनी ‘हिंदुस्थान समाचार’ ला पाठविलेल्या एका बातमीत एका वक्त्याच्या तोंडी घातलेल्या शब्दांच्या आधारे अनेक वृत्तपत्रातून अग्रलेखही आले. तेव्हा त्या वक्त्यांनी ‘आपण तसे बोललोच नव्हतो.’ अशी सफाई दिली. बहुलेकरांनी आपण पाठविलेली बातमी बरोबर असल्याची खातरजमा कऱ्हाडचे बाळासाहेब विहेकर यांचेकडून करून घेतली तेव्हा विहेकरांनी बहुलेकरांना सांगितले, “बोलणारे बोलतात, नाकारतात आणि नामानिराळे होतात, तेव्हा बातमीदाराने तारतम्य जाणूनच विचार करावा लागतो.” कृष्णराव सरडे हे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व. ते पुण्याला मॅट्रिकच्या वर्गात शिकत असतानाच (१९२९-३०) त्यांना ‘डेली

हेराल्ड' या इंग्रजी वृत्तपत्राची बातमीदारी मिळाली. ते बातम्या गोळा करून आपल्या राम मराठे नावाच्या मित्राकडून इंग्रजीत करून घेत आणि प्रेसमध्ये देत. त्यांना दरमहा २५–३० रू. मिळत. पुढे १९३३–३५ मध्ये सातारा येथे 'सातारा विजय' पत्रात त्यांनी व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. त्या पत्राचे संपादक देसाई यांनी सरडे यांना एक लेख लिहावयास सांगितला. तो काहीसा ब्राह्मणाविरुध्द होता. छापण्यापूर्वी तो लेख पत्राचे मालक कूपर यांनी वाचला. 'सरडे, तू लेख विचारपूर्वक लिहिला आहेस. तू ब्राम्हण आहेस, तेव्हा वाईटपणा अंगास चिकटू नये या खबरदारीने चांगला लेख लिहिलास.' अशी तरफदारी कूपर यांनी केली.

विद्याधर पुरुषोत्तम गोखले यांनी पुण्यात 'सकाळ'च्या 'कमवा शिका' योजनेअंतर्गत पत्रकारितेचे प्राथमिक धडे घेतले आणि १९५८ ते १९६३ मध्ये सातारा येथील 'समर्थ' साप्ताहिकाच्या वृत्तसंकलन संपादनापासून 'संपादकीये' लिहिण्यापर्यंत गिरविले. जयवंत गुजर, शाम घळसासी, चंद्रकांत श्रोत्री यांनी अनुक्रमे 'ऐक्य', 'समर्थ', 'कोयनातीर' या वृत्तपत्रांच्या कामी आपले लेखन कौशल्य अनेक वर्षे लावले. प्रा. अविनाश भडकमकर यांनी प्रा. मुकुंद कदम यांच्या सहकार्याने 'लोकगंगा' नावाचे साप्ताहिक काही वर्षे चालविले.

कऱ्हाडातून मधल्या काळात एकही वर्तमानपत्र निघत नव्हते. पण बाळासाहेब ढवळे, आनंद परांजपे, मोहन कुलकर्णी आणि उदय किरपेकर यांनी 'सकाळ', 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता', 'पुढारी','ऐक्य' यांच्यासाठी ताज्या, वस्तुनिष्ठ आणि माहितीपूर्ण बातम्या देऊन कऱ्हाडचे वर्तमान इतिहासाला संदर्भ देऊन राहील असे पाहिले. न्या. चोरपगारांच्या भ्रष्टाचाराची बातमी २७ – ८– १९९९ च्या 'लोकसत्तेत' आल्यानंतर लोकसत्तेचे तत्कालीन संपादक माधव गडकरी यांना न्यायालयाला तोंड द्यावे लागले. पण त्या खटल्यातील यशाचे श्रेय गडकरी यांनी प्रामुख्याने वस्तुनिष्ठ वार्ता पोचविणाऱ्या कऱ्हाडच्या मोहन कुलकर्णी यांनाच दिले आहे. ( 'निर्धार ते लोकसत्ता', माधव गडकरी पृ. ३१२ )

गेल्या पंधरा एक वर्षात 'सकाळ', 'पुढारी', 'तरूण भारत',' ऐक्य', 'सागर', 'ग्रामोध्दार',' लोकमत' या पत्रांची विभागीय कार्यालये कऱ्हाडातच

कार्यान्वित झाली असून अद्ययावत संपर्क साधनांचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून स्थानिक वृत्तपत्रापेक्षा सरस ठरतील अशी बातमीपत्रेच नव्हे तर परगावच्या पत्रांच्या स्थानिक आवृत्या, पुरवण्या काढण्याची चढाओढ चालू आहे. त्यासाठी कऱ्हाडातील उदय किरपेकर ('केसरी'), आनंद परांजपे ('दूरदर्शन' ,'आकाशवाणी', 'यू. एन. आय.'), अशोक चव्हाण ('तरूण भारत'), पाटील व सचिन शिंदे ('सकाळ'), रामभाऊ जगताप ('महाराष्ट्र टाईम्स'), विजय पाटील ('लोकसत्ता'), आनंदराव पाटील ('ऐक्य'), दिलीप भोपते ('ग्रामोद्धार'), गोरख तावरे ('सामना'), सतीश मोरे ('पुढारी'), सुधीर पाटील ('पुण्यनगरी'), जगदीश पाटील व प्रमोद सुकरे ('लोकमत'), संतोष दाभाडे ('महासत्ता'), महेश सूर्यवंशी ('मुक्तागिरी'), अतुल होनकळसे ('रत्नागिरी टाईम्स'), सर्जेराव मदने ('नवतेज'), अक्षय म्हस्के ('सागर'), हे वेगवेगळ्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधी तसेच संतोष वाघमारे व राहूल ('सत्यसह्याद्री'), बर्गे, हारूण मुलाणी व संतोष डांगे ('सिटी न्यूज'), किशोर पाटील, पिसाळ व कणसे ('आपलं यश'), भोसले ('यशवंतनगरी')अर्जुन धस्के हे वेगवेगळ्या वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी असलेल्या सजग पत्रकारांचा व कौशल्यपूर्ण सहभाग उपयोगी पडतो आहे. दत्तात्रय भट, अवधून भट, अस्लम मुल्ला, सुरेश पवार, राजू सनदी, नितीन रांगोळे, श्रोत्री बंधू, संजय फडके हे प्रेस फोटोग्राफर्स आहेत.

जुन्या पिढीतील स्वातंत्र्यसैनिक पुरूषोत्तम पांडुरंग ऊर्फ बाबुराव गोखले १९२० –२१ मध्ये दै. 'ज्ञानप्रकाश' मध्ये व १९२४ मध्ये साप्ताहिक ' केसरी' त सहसंपादक होते. साताऱ्याच्या 'समर्थ' साप्ताहिकाचे ते काही काळ कार्यकारी संपादक आणि निरंतर मार्गदर्शकच होते. १९४८ साली साताऱ्यात मराठी पत्रकार परिषदेचे अधिवेशन म. गांधींचा खून झाल्यामुळे होऊ शकले नाही. पण त्या संमेलनाचे गोखले हे स्वागताध्यक्ष होते. मराठी पत्रकारांच्या आर्थिक चौकशीसाठी नेमलेल्या समितीत गोखले अध्यक्ष होते. 'समिती नेमल्याची आठवण बुजेल इतका विलंब न लावता या समितीने दिलेला एकमताचा अहवाल हा सर्व भारतातील पहिलाच प्रादेशिक प्रयत्न होता.' असे लिहून आचार्य प्र. के. अत्रे यांनी दै.' मराठात' ( १५–११–१९६८) पुढे म्हटले

होते, 'आज सरकारने वेजबोर्ड नेमून पत्रकारांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न भारतव्यापी भूमिकेवरून सोडविला असला तरी त्या दृष्टीने पहिले पाऊल मराठी पत्रकार परिषदेने टाकले होते. त्या समितीचे अध्यक्ष म्हणून बाबूरावांनी जी कामगिरी केली, ती तर सर्व मराठी पत्रकारांनी कृतज्ञतेने सदैव लक्षात ठेवली पाहिजे.' मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे ६ जानेवारी १९६६ रोजी पत्रकार दिनासाठी गोखले यांना महनीय प्रवक्ते म्हणून बोलविले होते. अखिल भारतीय स्तरावरील मराठी पत्रकार परिषदेचे ३७ वे अधिवेशन १९ ते २० मे २००७ या काळात कऱ्हाडास झाले.

कऱ्हाडबाहेर जाऊन ज्यांनी आपल्या लेखणीचे कसब कारणी लावले त्या पत्रकारांमध्ये गोपाळ गणेश आगरकरांचे नाव (संपादक 'केसरी' 'सुधारक') अग्रक्रमाने घ्यावे लागेल. कृष्णाजी आबाजी गुरूजी ('कालिदास') कृष्णाजी नारायण आठल्ये ('केरळ कोकीळ') वामनराव व विष्णूपंत ढवळे ('श्रीशाहू' सातारा) केशवराव पुरोहित ('नवा काळ', 'मराठा') वि. वा. (बापू) नेने ('युगसंदेश', धुळे) श्री. व्यं. नखाते ('समाचार') अनंतराव कुलकर्णी (' समर्थ' सातारा), व्यंकटराव पवार ('नेता' मिरज) वसंत देशपांडे (आकाशवाणी) विद्याधर वासुदेव देशपांडे ('गावकरी'), शशिकला उपाध्ये ('तरुण भारत'), विवेक घळसासी ('तरुण भारत', सोलापूर) या कऱ्हाडकरांची नोंद घेताना अभिमान वाटतो. १९५३ पासून पंचवीसांहून अधिक वर्षे 'महात्मा' मासिकाचे संपादक असलेले गांधीवादी विचाराचे स्वांतत्र्यसैनिक दा. न. शिखरे हे उंब्रजचे. त्यांनी प्रारंभर' केसरी' त (१९३०-३८)सहसंपादक म्हणून काम पाहिले. १९३९ मध्ये त्यांनी स्वत:चे 'अग्रणी' नावाचे साप्ताहिक काढले. तीन वर्षांनी त्या साप्ताहिकाचे दैनिकात रूपांतर करण्यात आले, या दैनिकाचा प्रपंच सप्टेंबर ते नोव्हेंबर १९४३ असा दोन महिनेच टिकला. स्वांतत्र्यवीर सावरकरांचे भक्त ना. द. आपटे आणि नथुराम गोडसे यांनी हे पत्र शिखरे यांच्याकडून विकत घेतले पण त्यांत गांधींची निंदा आणि काँग्रसवर टीका होऊ लागल्यावर शिखरे यांनी त्यांना पत्राचे नाव बदलण्यास सांगितले, तेव्हा आपटे-गोडसे यांनी 'अग्रणी' या नावाला 'हिंदुराष्ट्र' शब्दाची जोड दिली. दा. न. शिखरे हे काँग्रेसच्या 'लोकशक्ती' (१९४६-५०) व 'समाचार' (१९५१-५३)चे संपादक होते.

उंब्रजचे पाध्ये यांनी नागपुरात औद्योगिक विषयाला वाहिलेले 'उद्यम' हे मासिक सुरू केले. पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश' ची 'काव्यशात्रविनोद' पुरवणी संपादन करणारे गो. रा. हिंगणेकर, ह.श्री. शेणोलीकर, 'कल्याण' या गोरखपूर (उत्तर प्रदेश )येथून निघणाऱ्या हिंदी धार्मिक मासिकाचे संपादक बाबा राघवदास, पुण्याच्या महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या 'राष्ट्रवाणी' या हिंदी मासिकाचे ज. रा. हसबनीस.' संगीत कलाविहार' या मासिकाचे वि. य. राजोपाध्ये, कवी विहंग आणि अप्पासाहेब इनामदार, खानापूरच्या 'लोकमित्रा'चे गणेश गोविंद बिजुटकर या सर्वांचा कऱ्हाडशी निकटचा संबंध होता.

वर्तमानपत्रांच्या बरोबरीनेच कऱ्हाडातील नियतकालिकांचा परामर्ष येथेच घेणे उचित ठरेल. १९१९ मध्ये वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर 'आर्यानो, उठा, जागे व्हा, व्हावी काही भारत सेवा', असा संदेश देणारे 'कर्तव्यजागृती' मासिक विनायक महादेव जोशी यांनी कऱ्हाडात सुरू केले. पुण्याच्या चित्रशाळा छापखान्यातून ते छापून आणत. ऑगस्ट १९२१ पासून विणकर समाजाचे 'स्वकुळ साळी – विजय' हे कधी मासिक तर कधी त्रैमासिक महादेव पुंडलीक बिचकर काढत. ते बारामतीहून प्रकाशित होई. पाचव्या वर्षापासून ते कऱ्हाडातून प्रसिद्ध होऊ लागले. १९३३ मध्ये या कालिकाचा अवतार संपला. स्वराज्य, खिलाफत, असहकार इ. विषयांची दखल घेणारे 'मुस्लीम' नावाचे मासिक कऱ्हाडातील तरुण राष्ट्रीय मुसलमानांनी सुरू केले असल्याची जाहिरात पुण्याच्या 'केसरी' त ११ एप्रिल १९२२ रोजी आली होती .,तर आमीन हसन खतीब यांनी सप्टेंबर १९२४ पासून 'इस्लाम विजय 'नावाचे दक्षिण महाराष्ट्रातील मुसलमानांचे मासिक सुरू केले होते. १९२६ च्या (म्हणजे शके १८४८ च्या) दासनवमीपासून मसूर येथे 'श्री दासबोध 'नावाचे मासिक शंकर धोंडो क्षीरसागर यांनी सुरू केले ते मसूरच्याच नरसिंह मुद्रणालयात छापले जाई. सुमारे चार वर्षे ते चालले. रामचंद्र बळवंत हरोलीकर यांनी व्यापार, रसायन, उद्योगधंदे, यंत्रशास्त्र इ. भौतिक शास्त्रांना वाहिलेले 'नाविन्य ' मासिक १९३१ (शके १८५३)मध्ये सुरू केले असल्याची माहिती 'श्रीदासबोध 'च्या ज्येष्ठ १८५३ च्या अंकात मिळते, तर आरोग्य ,ऐश्वर्य, जीवनसौंदर्य यांना वाहिलेल्या 'भाग्योदय 'या भास्कर नारायण विपट मास्तर यांच्या मासिकाने नोव्हेंबर १९३२ ते जून १९४१ अशी सुमारे नऊ वर्षे वाटचाल केली. या मासिकाच्या

सहसंपादक सावित्री विपट  होत्या. सखाराम बहिर्जी पाटील यांनी 'शिक्षकांचा कैवारी' हे प्राथमिक शिक्षक व स्कूलबोर्ड यांच्यासंबंधीचे लेखन करणारे मासिक जुलै १९३२ पासून चार वर्षे स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले. ते लोकमान्य छापखान्यात छापत. अण्णाजीराव शिदोजीराव चव्हाण हे कोपर्डे येथील शिक्षक त्यात लिहित.१९३६ पासून ते सखाराम बहिर्जी पाटील यांच्याच 'अलंकार' मासिकातील एक पुरवणी म्हणून छापले जाई. 'अलंकार' हे उद्योग–उत्कर्ष–उत्साह यांचा पुरस्कार करणारे नवमतवादी पण लोकहितवादी विचाराचे मासिक सचित्र असे. कविता, कथा, लेख इ. वाङ्मय त्यात प्रकाशित होई. उदयसिंह गायकवाड विवाह समारंभ, राजासाहेब अक्कलकोट विवाह समारंभ ग्वाल्हेर संस्थान व दरबार समाचार इ. खास अंक त्यांनी काढले होते. या मासिकाची वार्षिक वर्गणी अवधी ८ रू. होती. हे मासिक १९४४ पर्यंत चालले. धर्मवेदान्तादी आध्यात्मिक, भक्तिमार्ग व स्त्रियांचा पातिव्रत्यधर्म इ. सारख्या व सामाजिक शैक्षणिक विषयांवरील भारदस्त लेखांचा समावेश असलेले 'संतप्रभा' हे शिवनिरंजनबुवांचे मासिक १९३३ ते १९३५ (म्ह. पौष १८५५ पासून दोन वर्षे निघत असे.) विशेष म्हणजे या मासिकात मराठीबरोबरच हिंदीतही लेख असत. या मासिकाची कचेरी वाटेगाव (कासेगाव जवळ) येथे होती. व्यंकटराव पवार यांनी 'संदेश' (कऱ्हाड–संदेश) या नावाने ऑगस्ट १९३५ ते मार्च १९३६ असे नऊ महिने एक मासिक चालविले होते. त्यात' शिक्षक मित्र' म्हणूनही एक पुरवणी असे. याखेरीज 'हिंदखेळाडू' हे सिन्नरकर वकिलांचे, 'ब्राम्हण शिक्षक' हे कशाळकरांचे, 'नामदेव' हे गणपतराव कोपर्डे यांचे ही मासिकेही कऱ्हाडातून प्रसिद्ध होत. तर पळसगावच्या 'भाग्योदया'चे डॉ. शंकर गणेश जोशी, पुण्याच्या 'मकरंद 'चे उद्धव दत्तात्रय कुलकर्णी, 'गोरक्षण' व 'ब्राम्हण'चे मु. शं. देशपांडे असे संपादक होते. पु. पां. गोखले हे 'पुरुषार्थ' मासिकाचे अनेक वर्षे संपादक होते. श्रीनिवास विनायक कुलकर्णी १९८५ पासून मुंबईच्या 'मौज' या वार्षिकाचे संपादक आहेत.

१९६४–६५ च्या सुमारास कविवर्य पंडित सप्रे यांनी 'कथाकुंज' या नावाचे एक मासिक सुरू केले होते. दरम्यानच्या काळात कार्वे–कोपर्डे  यथील अण्णाजीराव सि. चव्हाण यांची 'भारतोत्कर्षमाला' गोविंद पांडुरंग देवांची 'रसिक –रंजन–माला', बाबुराव घाटे यांची 'साहित्य–सेंवा माला,' इ. मालाही खंडितपणे का होईना चालत असत.

मोहन कुलकर्णी यांनी ‘रंगचौफेर’ नावाने दिवाळी वार्षिक काढले. मोहन रानडे यांनी १९७१ मध्ये ‘श्रीस्वरूप’ त्या दीपावली अंक महाराष्ट्रातील प्रथितयश लेखकांच्या साहित्याने सजवून सादर केला होता. अर्थात स्थानिक कलाकारांचेही साहित्य त्यात समाविष्ट होते. कऱ्हाडचे चित्रकार डी. एम. सुतार यांचे मुखपृष्ठ होते. छपाई कऱ्हाडातच करुन घेतली होती. उज्ज्वला व ऊर्मिला बुरसे याही एक ‘रानगंध’ दिवाळी वार्षिक काढत. अलीकडे शरद गाडे यांनी ‘आरोग्यिता’ हे त्रैमासिक सुरू केले आहे. ॲड. संग्रामसिंह देसाई ‘युवकमुद्रा’ नावाचे वार्षिक ही काढत असत.

वृत्तपत्र वितरक हाही पत्रसृष्टीतील महत्त्वाचा घटक. भाऊकाका गरूड आणि नारायणराव पोतनीस ही जुन्या पिढीतील नावे. पोतनीस बंधूंनी वडिलार्जित वारसा तिसऱ्या पिढीतही चालविला आहे. प्रभात न्यूज सर्व्हिसचे त्र्यंबक तुकाराम काळे, माधवराव श्रोत्री, गंगाधर पागे, शांताराम पुरोहित, बाळासाहेब मोघे ही आणखी काही वितरक मंडळी कऱ्हाडात वृत्तपत्रवितरणाचे काम तत्परतेने करत. सध्या पोतनीस बंधू, सुरेश मोघे, मोहन वासुदेव कुलकर्णी, मोहन लाहोटी, भंडारे, चंद्रकांत कालेकर, अरविंद मुळीक, आनंद परांजपे इ. मंडळी वृत्तपत्र वितरण व्यवसाय करतात.

आगरकरांच्या ‘सुधारक’ साप्ताहिकाचे शताब्दिस्मरण १९८८ मध्ये सुशीलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या उपस्थितीत कऱ्हाडच्या ‘चौफेर’ व्यासपीठाने सन्मानपूर्वक केले. एखाद्या वृत्तपत्राची शताब्दी समाजाकडून साजरी होण्याचे दुर्मिळ भाग्य ‘सुधारक’ पत्राला मिळाले. या शताब्दीनंतर प्रतिवर्षी एका ज्येष्ठ पत्रकाराला ‘सुधारकाचार्य आगरकर स्मृति सुवर्णपदक’ देण्यात येते. अनंत भालेराव (मराठवाडा), यदुनाथ थत्ते (साधना), श्री. ग. माजगावकर (माणूस), रंगा वैद्य (संचार), विद्या बाळ (मिळून साऱ्या जणी), गोविंद तळवलकर (महाराष्ट्र टाइम्स), बाळ ठाकरे (मार्मिक), माधव गडकरी (लोकसत्ता) इ. संपादकांचा गौरव या सुवर्णपदकाने केला आहे. या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचा उल्लेख केल्याशिवाय कऱ्हाडच्या वृत्तपत्रसृष्टीचा आढावा अपुरा ठरेल.

*****

# १२

# रंगभूमी व चित्रपट

नाटक हे मराठी माणसाचे वेड आहे. त्याला कऱ्हाडकर अपवाद कसे असतील?, विष्णुदास भाव्यांनी १८४३ साली मराठी नाट्यकलेला सुरुवात केली असे समजले जाते. पण १८६० ते १८६७ या काळात कऱ्हाडकर, उंब्रजकर अशा मंडळ्या नाटके करीत गावोगाव फिरत होत्या. १८७८-७९ साली कऱ्हाडात इचलकरंजीकर नाटक मंडळी आली होती असे उल्लेख आढळतात. कऱ्हाड हे तीर्थक्षेत्र असल्यामुळे, शास्त्री पंडितांचे गाव असल्यामुळे पुरूषांनी स्त्रीवेष धारण केला आणि तो कोणी पाहिला की पाहणाराला सातजन्म स्त्री व्हावे लागते अशा धर्मसमजुतीमुळे असेल कदाचित पण कऱ्हाडच्या दप्तरी १८६२ पर्यंत प्रत्यक्ष एखादा नाट्यप्रयोग झाल्याचे वा एखादे नाटक लिहिले गेल्याचे अजून तरी आढळत नाही. पण त्यानंतरच्या काळात मात्र अगदी झुणकाभाकर प्रासादिक कंपन्यांपासून किर्लोस्कर, गंधर्व, ललितकलादर्श यासारख्या वैभवशाली मातबर मंडळ्यांपर्यंत सर्वांनी कऱ्हाडचे मनोरंजन केले आहे आणि आपले पडदे गहाण ठेवण्यापासून कऱ्हाडातून पैशाची लयलूट नेण्यापर्यंत अनेक मंडळ्यांनी कऱ्हाडशी व्यवहार केले आहेत. यावरून 'नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाह्येकं समाराधनम् 'हे कविकुलगुरू कालिदासाचे वचन कऱ्हाडातही सार्थ ठरले आहे हे लक्षात येईल.

संतमहतांनी उभारलेल्या उत्सवांतून लळिते होत आणि त्या निमित्ताने सोंगेही निघत.१८४३ साली सुरू झालेल्या नवीन नाट्ययुगाने लळिताची परंपरा पुढे चालविली. पडदा उघडताच सोंड हलवीत गणपती आणि मोरावर बसून नाचत गाणारी सरस्वती यांचे दर्शन घडत असे. हा गणपती-सरस्वतीचा

प्रारंभ-प्रवेश बहारदार करावा तर शनिवार पेठेतील मंडळींनीच असा लौकिक १८६४ पासून १९१४ पर्यंत तरी चालत आला होता.

शनिवार पेठेत गणपती उत्सवाच्या निमित्ताने बैलगाड्यांवर फळ्या टाकून सोंगे नाचविण्याचे काम संभू आप्पा तेली यांनी १८८२ पासून १८९७ पर्यंत केले आणि गावात इतरत्र हीच परंपरा होती. पूर्वी हौशीच काय पण व्यावसायिक नाटकेदेखील हाटकेश्वर, व्यंकोबा, घाटावरील जोशांचा राम, रविवारातील घाट्यांचा लक्ष्मीनारायण अशा देवळांतून, दादा वळवडे, आबुराव देशपांडे, राजाभाऊ देशपांडे, सप्रे, नेवासकर, दत्तोपंत सोनटक्के यांच्या वाड्यांतील चौकांत किंवा परसात, गवळवेस गोरक्षणात जुजबी सोयी करून केली जात. तसेच शनिवारातील (तेल्यांच्या ) गणपती पुढे, रविवारातील आझाद चौकात, माणिक (आता नेहरू) चौकात, शुक्रवारात बटाणे चौकात, मंगळवारात ज्योतिबा देवळापुढे, रविवारात पाण्याच्या टाकीजवळच्या मैदानात, गुरुवारात अर्बन बँकेजवळ, दत्त चौकात उघड्या रस्त्यात मांडव घालून नाटके करीत.

१८९७ मध्ये ज्योती आप्पा तेली यांनी नव्या धर्तीने नाटके करण्यास आरंभ केला. त्या आधी रंगमंचावर वेशभूषा केलेले नट मूक अभिनय करीत आणि पडद्यामागून मोठ्याने संवाद वाचले जात. या संस्थेने नंतरच्या काळात 'गजानन नाट्य क्लब' असे नाव धारण केले. १९६७ पर्यंत या मंडळातर्फे दरसाल पौराणिक-ऐतिहासिक नाटके होत. ज्योती राजमाने, पांडुरंग मुंढेकर, बापू बेडके, शिवलिंग बेडके, बाबुराव घोडके, बापूराव राजमाने, शंकरराव देशपांडे, कोंडिबा चिंचकर, कासम मुल्ला, सीताराम मुंढेकर, काशिनाथ मुंढेकर, गुरुबा पाटील, मधुकर डुबल, तुकाराम कैकाडी आदी मंडळी त्यात प्रामुख्याने होती.

रविवार पेठेतील बहुसंख्य भोई समाजातील लोक असलेले एक मंडळही बऱ्याच वर्षांपासून गणेशोत्सवात सामाजिक, पौराणिक व प्रामुख्याने ऐतिहासिक नाटके १९७० पर्यंत दरसाल करी. त्यांनी 'नवजवान नाट्य क्लब' असे नाव पुढे घेतले. शंकरराव जिरंगे, राजाराम जिरंगे, बाबुराव गायकवाड, वसंतराव मुळे, सखाराम चक्के, यासीन आंबेकरी, कासम

मुल्ला, युनूस कच्छी, शामराव मुळे, महादेव घोडके, हिरालाल मुळे ही मंडळी नाटकांतून काम करीत.

रविवार पेठेतील सद्‌गुरू गणेश मंडळाचे (सध्याचे जयहिंद मंडळ) शिवराम बेंद्रे, रामू तेली यांनीही नाटके करण्यास आरंभ केला. मंगळवार आणि शुक्रवार पेठांतही मारुती डांगे, गुलाब महंमद बागवान, राणबा पवार, अण्णा घोरपडे, सदाशिव अडके, ही हौशी मंडळी सामान्यत: सार्वजनिक गणेशोत्सवाच्या किंवा श्री कृष्णाबाई उत्सवाच्या निमित्ताने आपापल्या आळीत नाटके करीत. या हौशी नटांच्या उत्साहाला बळवंतराव जाधव, नरहरपंत बिजुटकर, दत्तोपंत मोघे यांनी सुशिक्षित वळण लावले. १९२३ मध्ये 'श्रीकृष्ण क्लब' आणि १९३०-३१ मध्ये नटवर्य गणपतराव जोशी यांच्या स्मरणार्थ गणपतराव चरेगावकर, नारायणराव मुजुमदार, गोविंद पांडुरंग देव यांचा 'गणेश क्लब' सुरू झाला. नगरपरिषदेचे पूर्वीचे ए. व्ही. स्कूल आणि टिळक हायस्कूल यांचे माजी विद्यार्थी एकत्र येऊन सार्वजनिक उपक्रमांच्या मदतीसाठी दहा-बारा वर्षे सातत्याने नाटके करीत. 'कृष्णाकाठ' मध्ये यशवंतराव चव्हाणांनी केलेली एक नोंद अशी : 'बळवंतराव जाधव यांना नाटके बसविण्याचा फार शौक होता. त्यांनी औंधकरलिखित 'बेबंदशाही' नाटक लागोपाठ तीन वेळा केले. सहस्रबुद्धे मास्तर संभाजीचे आणि बाबुराव गोखले कलुषा कब्जीचे काम करीत. कुठल्याही धंदेवाईक नटापेक्षा उत्तम अशी या दोघांची कामे होत.'

कऱ्हाडच्या हौशी रंगभूमीवर सामाजिक, राजकीय किंवा व्यावसायिक प्रतिष्ठितांचा मोठा सहभाग असे. 'तोंडाला रंग लावून येण्याची माझी लहानपणीची इच्छा मात्र तशीच राहून गेली आहे' ('युगान्तर' पृष्ठ २२९) असे यशवंतराव चव्हाणांनी एके ठिकाणी म्हटले असले तरी 'आमच्या शाळेच्या (टिळक हायस्कूलच्या) संमेलनातील 'माईसाहेब' या नाटकात किर्लोस्करवाडीला एका प्रयोगात मी काम केल्याचे आठवते. आमच्या नाटकाचे सूत्रसंचालन बाबुराव गोखले यांनी केले होते' ('कृष्णाकाठ' पृ. ५४) अशीही आठवण त्यांनी नोंदविली आहे. दत्तोपंत सहस्रबुद्धे, बाबुराव वळवडे, शंकरराव करंबेळकर, शंकरराव जिरंगे, कृष्णराव सरडे, युनूस

कच्छी, रा. गो. प्रभुणे, मुकुंद कुलकर्णी इ. चा उल्लेख याठिकाणी करणे उचित ठरेल.

वर उल्लेख झालेल्या कलावंतांखेरीज रसिक प्रेक्षकांना आठवतात अशा कलावंतांमध्ये बळवंतराव पुराणिक, बाबुराव घोरपडे, विनायकराव फणसळकर, शंकरराव आगाशे, किशाबापू आठल्ये, दत्तात्रय अनंत कुलकर्णी, एस. पी. कुलकर्णी, रामभाऊ तेली, शिवराम तेली, बापूराव डवरी, तमाण्णा विंगकर, विनायकराव सखदेव, महंमदभाई बागवान, बाबुराव कदम, पांडोबा कुंभार, सोनबा चौधरी, हणमंतराव कांबळे, शहाबुद्दीन पटवेकर, ज्ञानोबा लोहार, रामराव रेठरेकर, गुंडोपंत बेलापुरे, इब्राहिम बागवान, अहमद अल्ली बागवान, कुतुबुद्दीन पटवेकर, डॉ. डी. जी. देशपांडे, गोपाळराव कुलकर्णी तसेच कऱ्हाडात काही काळ वास्तव्यासाठी असलेल्या शाहीर म. ना. नानिवडेकर यांचा निर्देश करता येईल. शाहीर नानिवडेकरांनी ग. दि. माडगूळकरांचे 'युद्धाच्या सावल्या' हे नाटक कऱ्हाडातील हौशी कलावंताना हाताशी घेऊन उत्तम रीतीने वठविले होते.

१९४० मध्ये पु. पां. (बाबुराव) गोखले, बाबुराव घाटे, गजाभाऊ पेंढारकर, वसंतराव श्रोत्री, बबनराव विंगकर यांनी 'नाट्यविकास मंडळा'ची स्थापना केली. या संस्थेच्या पुढाकाराने कराडात ११ डिसेंबर १९४३ रोजी मराठी रंगभूमीचा शताब्दी महोत्सव झाला. नटवर्य गणपतराव बोडस यांच्या हस्ते पु. पां. (बाबुराव) गोखले यांच्या तैलचित्राचे अनावरण करण्यात आले. मुख्य म्हणजे 'कऱ्हाडची नाट्यसेवा' ही कऱ्हाडच्या रंगभूमीविषयक कार्याविषयी तपशीलवार इतिहास कथन करणारी बाबूराव घाटे यांची पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली. १९५५ पर्यंत या संस्थेचे कार्य चालू होते.

१९५२ मध्ये कराड नगरपरिषद सेवकांचा नाट्य क्लब सुरू झाला. शंकरराव क्षीरसागर, वसंतराव वेल्हाळ, किसन पवार, आप्पा पवार इ. मंडळींनी हौसेने बरीच नाटके केली. लिबर्टी मजदूर मंडळाच्या नाट्यशाखेमार्फत स्पर्धेतही भाग घेतला जाई. १९५३ साली गणपतराव चरेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरीनाथ हरी उर्फ तात्या वझे यांनी 'होतकरू नाट्य मंडळ' स्थापन केले. राजाराम शिंदे, शांताराम कळंत्रे,

एम. आर. नाईक, नूरमहंमद मुजावर, दत्ता परीट, गजानन महाडिक, दत्ता काटकर, बाळ माटे, विष्णू कोळेकर, राजाराम पाटील, किसन जगदाळे, बबन जगदाळे, बाबुराव कुंभार, किसन शिंदे यांचा मंडळाच्या नाटकांतून सहभाग असे. १९५० ते १९६६ च्या दरम्यान कमानी मारुती मंडळ, भारत नाट्य क्लब, उदय नाट्य क्लब, कलाविकास इ. नाट्यसंस्था उदयास आल्या.

सुमारे १९६० पर्यंत हौशी रंगभूमीवर तरी स्त्रियांच्या भूमिका पुरुषच करीत. नारायणराव मुजुमदार, भाऊकाका गरूड, नारायणराव पोतनीस, बबनराव (ना. ह.) विंगकर, विठ्ठल जोशी, केशवराव नेने, बबनराव नावडीकर, रामभाऊ मोकाशी, रामू घोरपडे, बापूराव डवरी, दत्तोपंत मोघे, कृष्णाजीपंत वैद्य, दत्ता वाळवेकर, नूरमहंमद मुजावर, राजाराम देव, बाळ लोणारी, मुकुंद श्रोत्री, वि. पु. गोखले, जुगलकिशोर ओझा इत्यादींनी स्त्री भूमिका केल्या. स्पर्धांसाठी किंवा धर्मार्थ प्रयोगांसाठी परगावाहून व्यावसायिक स्त्री-कलाकारांना नाट्यप्रयोगापुरते आणत असत.

१९५० च्या दरम्यात कऱ्हाडास महिलांनी देखील प्रथम पुरुषपात्रविरहित नाटके केली. पुढे स्त्री कलावंत पुरुषांच्या भूमिका करू लागल्या. शिक्षण मंडळाच्या कन्याशाळेत शारदोत्सवात संपूर्ण नाटक बसविण्याची त्यावेळी प्रथा होती. 'खडाष्टक', 'विस्कटलेली घडी', 'रात्र संपली पण उजाडलं कुठं?', 'एक रात्र अर्धा दिवस' अशी फक्त स्त्री कलावंतानीच सादर केलेली काही नाटके. कमल फडके, कमल पेंढारकर, सुमन दातार, सुमन अष्टेकर, उषा येडेकर, सुधा तांबवेकर, मंदाकिनी देशपांडे, सिंधू सुखटणकर, सुमन जोग अशी स्त्री कलावंतांची प्रातिनिधिक नावं.

कऱ्हाडात स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच करण्याची सुरुवात मेळ्यांच्या निमित्ताने झाली. सुमन अष्टेकर (त्यावेळी सुमन जोशी) यांनी प्रथम काम केल्याचा उल्लेख आढळतो. कऱ्हाडला महाविद्यालयांच्या संमेलनातून प्रतिवर्षी नाटके सुरू झाली. १९६५ नंतर तेथे संमिश्र नाटके होऊ लागली. परिणामत: गावातील हौशी नाटकांतही स्त्रियांच्या भूमिका करण्यास स्त्री कलावंत मिळू लागल्या. ज्योती बिजुटकर (वाघ), दीपश्री कंटक, स्वाती

कुलकर्णी, नंदिनी देशपांडे, कमल ठोके, सोनल भोसेकर*, सीमंतिनी तांबवेकर, शुभदा माळवदे, आरती चितळे, उर्मिला जोशी, विनिता पेंढारकर*, ललिता दातार, भाग्यश्री किरपेकर, पुष्पा कुलकर्णी, दीपा कुलकर्णी *, गणपुले*, शिल्पा कुलकर्णी*, स्वाती फडणीस*, गोडबोले*, प्रीती जोशी*, नीता धाक्रस, दया एकसंबीकर, वैशाली गोस्वामी, पल्लवी कुलकर्णी, माधुरी कवठेकर इ. अशी नावे सांगता येतील. (* यांनी राज्य स्पर्धेत अभिनयाची पारितोषिके मिळविली.)

शालेय शिक्षण घेत विद्याधर गोखले, पुष्पा फाटक, शरद वैशंपायन, वासंती वळवडे, बी. डी. शिंदे, श्रीपाद जोशी इ. विद्यार्थ्यांनीच १९५३ मध्ये 'नाट्योत्तेजक संघ' नावाची संस्था सुरू करून कऱ्हाडात प्रथमच नाट्यवाचन स्पर्धा सुरू केली. मराठी नाट्य परिषदेने १९५३ पासून रंगभूमिदिन ५ नोव्हेंबर रोजी साजरा करण्याचे ठरविले. कऱ्हाडात 'नाट्योत्तेजक संघा'ने सर्व नाट्यसंस्थांना एकत्रित आणून तो साजरा करण्याची प्रथा सुरू केली.

मधल्या काळात हौशी नाटकांची परंपरा खंडित झाल्यासारखी होती. पण कऱ्हाडात सुरू झालेल्या महाविद्यालयांच्या स्नेहसंमेलनातून नवनवे कलाकार चमकू लागले. नाट्यमहोत्सव आणि स्पर्धांचे वातावरण सुरू झाले. त्यामुळे १९७५ पासून 'रसगंध', 'अदाकार', उद्धव विभूते यांची 'अभिनय', बाळ देवधर यांची 'अक्षय', 'सृजन', 'त्रिवेणी', 'रंगयात्री सांस्कृतिक प्रबोधिनी' इ. अशा नव्या संस्थाही सुरू झाल्या. नवे कलावंत कऱ्हाडच्या रंगभूमीने दिले. त्यामध्ये रा. गो. प्रभुणे, मुकुंद कुलकर्णी*, सी. व्ही. कुलकर्णी*, जुगलकिशोर ओझा*, व्ही. एस. कुलकर्णी, विजय देसाई, प्रदीप हर्षे, माळवदे, महाबळ, नचिकेत वाचासुंदर, विलास घळसासी, राम शेडबाळकर, वाटवे, प्रशांत कुलकर्णी, विनय कुलकर्णी*, प्रदीप जोशी, नीळकंठ जोशी, अशोक लोंढे, राजेंद्र यादव, सदानंद घाटे, राजीव मोहिते, रवळनाथ शेंडे, सुशीलकुमार भंडारे, दत्तप्रसाद देशपांडे, प्रा. शेख यांचा नामनिर्देश करता येईल. (* यांनी राज्य स्पर्धेत अभिनयाची पारितोषिके संपादन केली. मुकुंद कुलकर्णी यांनी गणपतराव बोडस पुरस्कार महाराष्ट्र, गुजरात, गोवा, मध्यप्रदेश येथील कलावंतांच्या स्पर्धेत १९८१ मध्ये

मिळविला.) श्रीकृष्ण गजानन मंडळाने २००४ मध्ये सांस्कृतिक नाट्य विभाग सुरू केला. प्रशांत कुलकर्णी, श्रीनिवास एकसंबेकर यांचे रंगयात्री सांस्कृतिक केंद्र या विभागात विलीन झाले.

कऱ्हाडात 'कृष्णप्रासादिक थिएटर' म्हणून एक थिएटरही होते. १९०६-०७ च्या सुमारास बेलापुऱ्यांचे थिएटर (सध्याचे रॉयल टॉकीज) आणि १९३९ मध्ये सुरू झालेले प्रभात टॉकीज येथे प्रामुख्याने व्यावसायिक नाटकेच होत. १९४३ मध्ये टिळक हायस्कूलमधील 'माजी विद्यार्थी नाट्यमंदिर' हे कऱ्हाडातील पहिले खुले नाट्यगृह. १९५५ मध्ये नगरपरिषदेच्या प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीतील, नंतर टिळक हायस्कूलचे निगडीकर कलामंदिर, पंताच्या कोटातील महाराष्ट्र हायस्कूल ही खुली नाट्यगृहे व्यावसायिक आणि हौशी कलावंतांना उपलब्ध झाली. २८ डिसेंबर १९६८ रोजी एका कंत्राटदाराने नगरपरिषदेच्या खुल्या नाट्यगृहात भाऊ मांग आणि शिवा संभा या सुप्रसिद्ध तमाशांच्या जुगलबंदीचा कार्यक्रम घेतला, जागेचा अंदाज न घेता भरमसाठ तिकीट विक्री केली, त्यामुळे आत दहा हजार तर बाहेर तेवढेच प्रेक्षक होते. त्यातूनच दंगल होऊन दगडफेक झाली, नगरपरिषदेच्या कार्यालयाचे मोठे नुकसान झाली, त्यामुळे नगरपरिषदेच्या कार्यक्रमापुरताच ह्या रंगमंचाचा वापर मर्यादित झाला.

खुल्या नाट्यगृहातून रंगमंचावरील पडदे, फर्निचर, ध्वनिक्षेपण व प्रकाशयोजना आणि प्रेक्षकांसाठी खुर्च्या, कनाती यामुळे खर्चही अधिक येई आणि थंडी-पावसाचे दिवस वगळता फक्त सीझनलाच नाटके होत. यशवंतराव चव्हाण स्मृतिसदनामधील रंगमंच पडदे, मेनड्रॉप, बॉक्स सेट, मंडपी, विंग्ज, लेव्हल्स, नेपथ्याचे साहित्य, दोन रंगभूषा कक्ष, प्रकाशयोजना, ध्वनियोजना, कॅफेटेरिया, आसनव्यवस्था, कलावंतांसाठी निवास व्यवस्था इ. सर्व सुविधांसह १९८७ पासून सातत्याने कराडच्या रसिकांचे मनोरंजन व प्रबोधन करीत आहे. महाराष्ट्र शासनाचा नाट्यमहोत्सव (स्पर्धा) १९८८ पासून प्रतिवर्षी या रंगमंचावर होतो. सन २००२ सालापासून सौ. वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्टच्या इमारतीतही असेच छोटे नाट्यगृह सुरू झाले आहे. बाबासाहेब पुरंदरे यांच्या 'जाणता राजा' नाटकाचे प्रयोग शिवाजी

स्टेडीयमवर झाले होते. कऱ्हाडात सर्कशीचे प्रयोग जनावरांच्या दवाखान्यासमोरील इनस्पेक्शन बंगल्याजवळ, पाटण कॉलनी, कॉटेज हॉस्पिटल, आंबेडकर बाग, वाकाण, बैलबाजार या भागांतील मोकळ्या मैदानांवर होत.

राज्य नाट्य स्पर्धांत कऱ्हाडचे नाट्य संघ उत्साहाने भाग घेतात. 'संभूसाच्या चाळीत' (१९८०), 'कवडीचुंबक' (१९८४), 'तुझे आहे तुजपाशी' (१९८९), 'मला काही सांगायचंय' (१९९०), 'तुमचे आमचे गाणे' (२०००), 'अशी पाखरे येती' (२००२). इ. नाटकांनी चांगले यश संपादन केले. १९८९ मध्ये राज्य नाट्य महोत्सवाच्या अंतिम फेरीत कऱ्हाडच्या शिक्षण मंडळाचे 'अग्निपंख' हे नाटक राज्यात पहिले आले. १९९० साली महाराष्ट्र राज्य शासनाचे एक महिन्याचे नाट्य-प्रशिक्षण शिबीर कऱ्हाडात आयोजित करण्यात आले होते. गेल्या काही वर्षांत १२ ते १३ पेक्षा कमी प्रवेशिका आल्याने २००६ पासून कऱ्हाड केंद्र बंद झाले. अलीकडे स्थानिक हौशी कलावतांची नाटके पूर्वीच्या हिरीरीने होत नाहीत.

कऱ्हाडात अ. भा. मराठी नाट्यपरिषदेची शाखा असून अ. भा. मराठी नाट्यसंमेलनाचे ८४ वे अधिवेशन २००४ मध्ये कऱ्हाडात यशस्वीपणे संपन्न झाले याचीही येथे नोंद घेतली पाहिजे.

कऱ्हाडच्या रंगभूमीच्या सुमारे दीडशे वर्षांच्या या वाटचालीचा आढावा घेताना काही नावे, तपशील माहितीच्या अभावी राहिली असणे शक्य आहे. मात्र एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावयला हवा तो म्हणजे कऱ्हाडचे रसिकग्रणी यशवंतराव चव्हाण यांचे मराठी रंगभूमीवर निरतिशय प्रेम होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. त्याप्रमाणे नाटकांवरील करमणूक कर माफ केला. त्यांची मराठी रंगभूमीलाही ही मोठीच देणगी होती. शामराव अष्टेकर राज्यमंत्री असताना कऱ्हाडला नाट्य महोत्सवाचे केंद्र प्राप्त झाले.

नाटक उभे राहण्यात आणि यशस्वी होण्यात रंगभूमीवर दिसणाऱ्या कलाकारांबरोबरच अनेक अदृश्य हात असतात. बऱ्याच वेळा त्यांचा नामोल्लेखही होत नाही, मग नोंद कुठे असणार? पण पडद्यामागच्या अशा तंत्रज्ञ कलावंतांपैकी काही नावे आठवणींतून सांगितली जातात ती अशी :

**नाट्यदिग्दर्शक**

पूर्वी नाट्यप्रयोग बसविणाऱ्या पडद्यामागील कलावंताला तालीम मास्तर असेच संबोधत . बाळा जाधव, काका किरपेकर, कळंबे मास्तर, बाबुराव गोखले, बंडोबा कंदिलवाले, गणपतराव चरेगावकर, रामभाऊ घाटे, बाबुराव घाटे, गजाभाऊ पेंढारकर, बबनराव विंगकर, तात्या वझे, अप्पासाहेब इनामदार, शंकरराव क्षीरसागर, विद्याधर गोखले, गो.वि. कुलकर्णी, मुकुंद कुलकर्णी, सी. व्ही. कुलकर्णी, जुगलकिशोर ओझा, श्रीनिवास एकसंबेकर, सोनल भोसेकर इ.नी. स्थानिक हौशी कलावंतांची अनेक नाटके दिग्दर्शित केली आहेत.

**नेपथ्य**

नाटकाचे पडदे रंगविण्यात रामभाऊ कापरे, माधवराव नवाथे, एकनाथ पेंटर, वसगडेकर, विभूते मास्तर, बाळा जाधव, दादा मुतवल्ली, नारायणराव पोतनीस, सुतार मास्तर, वसंतराव श्रोत्री, शिवलिंगप्पा बागणे, राम कपिलेश्वर, दत्ता सांगवडकर, वामन भुर्के, विष्णु परीट, आदम पटेल, वसंत सातारकर इ. नावे सांगता येतील. कृष्णाप्पा मुंढेकर आणि संभू अप्पा तेली यांनी तयार केलेल्या देखाव्यांच्या साधनांत वैविध्य व कल्पकता असे . हणमंतराव फडके यांचा ट्रान्स्फर सीन करण्यात हातखंडा होता. नव्या पिढीतील चंद्रकांत बेडके, संजीव कुलकर्णी, विष्णू मुंढेकर यांनी राज्य नाट्य-स्पर्धांत नेपथ्यासाठी पुरस्कारही प्राप्त केले आहेत.

**रंगभूषा**

पूर्वी रंगभूषेसाठी रंग तयार करून घ्यावे लागत. रंगभूषाकार म्हणून भाऊकाका गरुड, नारायणराव पोतनीस, रघुनाथराव येडेकर, वसंतराव सदरे, दत्तोबा (परीट) राऊत, उद्धवराव विभूते , शाहीर यादव यांचा निर्देश करावा लागेल. 'त्रिवेणी'या कऱ्हाडच्या नाट्यसंस्थेने पांगम यांचे रंगभूषा - प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते.

## वेषभूषा

पूर्वी स्त्रियाच्या भूमिका पुरूषच करीत. तुकारामबापू भंडारे आणि पारुअक्का ओतारीण स्त्रीभूमिकांचे पोषाख कौशल्याने सजवत.

## ध्वनी व प्रकाशयोजना

१९२९ पर्यंत कऱ्हाडात वीजच नव्हती मग ध्वनिक्षेपक कोठले ? टेंभे किंवा बत्त्या प्रकाशासाठी वापरत. हजारो माणसांना दूरपर्यंत सहज ऐकू येऊ शकेल अशा पट्टीत नटांना बोलावे लागे. अलीकडच्या काळात प्रकाश आणि ध्वनी यांचे नियंत्रण – नियोजन आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने दिलीप शेंडे, कृष्णा इनामदार, संदीप बिजुटकर, प्रमोद गरगटे, बाळकृष्ण गायकवाड इ.नी प्रभावीपणे केले. गिरीश ताम्हनकर आणि तुकाराम पवार यांना राज्य नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट प्रकाशयोजनेसाठी पुरस्कार प्राप्त झाला होता. सुनील कुलकर्णी, संजय भोसेकर, अभय आफळे , प्रवीण अरवट्टगी इ. पार्श्वसंगीताचे नियोजन उत्तमपणे करतात.

## प्रॉम्प्टिंग

हौशी कलावंत आणि तेही निरनिराळ्या व्यवसाय क्षेत्रांतील प्रतिष्ठित असत. नाटकाच्या तालमींसाठी नियमितपणा राखता येत नसल्यामुळे बऱ्याचशा कलाकारांची भिस्त प्रॉम्प्टिंगवर असे. बाळा जाधव, शंकर बापूजी जोशी, तुकारामबापू भंडारे, विश्वनाथदीक्षित उमराणी , विनायकराव फणसळकर, कळंबे मास्तर, बाबुराव वळवडे, बाबूराव गोखले, तम्मा विंगकर, वसंत फडके, वसंत श्रोत्री, आत्माराम खेर, रामभाऊ घाटे, बंडोबा कंदिलवाले, सुतार मास्तर, विद्याधर गोखले, अप्पा पवार, स्वाती वाचासुंदर , स्वाती बिजुटकर, गणेश कुंटे या प्रॉम्प्टिंग करणाऱ्या काही ठळक व्यक्ती.

## नाटककार

मराठी रंगभूमीवर गणपतराव जोशी यांच्यासारख्या नटसम्राटांमुळे गोपाळ गणेश आगरकर यांचे 'विकारविलसित' (हॅम्लेट) गाजले. महादेव दामोदर

कुलकर्णी यांचे 'दंभस्फोट' (श्रद्धाव्यामोह) हे नाटकही रंग भरत असे. भारतीय नाटक मंडळीच्या रंगभूमीवर १९०६-०७ साली माधव रामचंद्र पावनगडकर यांच्या 'सिंहगड', 'चंद्रानना', 'शूरसेन मालिनी' या नाटकांचा प्रभाव होता. आनंद संगीत नाटक मंडळींने शिवलिंगप्पा बागणे (आलटकर) यांचे 'वनविलास' तर गंधर्व कंपनीने ना. वि . कुलकर्णी यांची 'कान्होपात्रा' , 'माईसाहेब' ही नाटके रंगविली होती.

१९२४ साली श्रीकृष्ण क्लबाने बाबुराव गोखले यांचे 'शूरसेन', १९४१ मध्ये दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या निमित्ताने नाट्यविकास मंडळाने सादर केलेले बबनराव विंगकर यांचे 'बाहुलीचा संसार', १९४३ मध्ये नाट्यशताब्दी महोत्सवप्रसंगी वि. र. जोशी यांचे 'मूकनायिका', १९५४ मध्ये सातारा येथील मेडिकल कॉन्फरन्स निमित्ताने झालेले डॉ. ग. भ. वैद्यांचे 'निर्वासित', १९५५ मध्ये उत्तर सातारा जिल्हा साहित्य संमेलनावेळी केलेले बाबूराव काळे यांचे 'दत्तक' , भीमराव मोगलगिद्दीकरांचे महिला मंडळाने सादर केलेले' विस्कटलेली घडी' ही कऱ्हाडकरांची पुस्तकरूपाने सिद्ध न झालेली काही नाटके. सी. व्ही. कुलकर्णी यांचे 'चंद्रमे जे अलांच्छन', सी. वा. उमर्जीकर यांचे 'जुळल्याच ना सतारी' यांची नाटके राज्यस्पर्धेतही सादर झाली व त्यांना नाट्यलेखनाबद्दल पुरस्कारही प्राप्त झाले आहेत.

## व्यावसायिक रंगभूमी

व्यावसायिक मराठी रंगभूमीवर पदार्पण करणारे पहिले कऱ्हाडकर म्हणजे व्यंकू ऐतवडेकर. १८९० मध्ये हल्याळकरांच्या नाटक मंडळीत ते व्यंकू कऱ्हाडकर म्हणून गाजले. पुढे त्यांनी त्यांची स्वत:ची 'नाट्यकलोत्सव नाटक मंडळी' काढली. स्त्रियांनी नाटकांत काम करणे अधर्म्य मानले जाणाऱ्या त्या काळात व्यंकू कऱ्हाडकरांनी आपल्या कंपनीत काम देऊन सखुबाई कऱ्हाडकर यांना प्रोत्साहन दिले. ती मराठी रंगभूमीवरील पहिली महिला कलाकार होय. मनमाडमध्ये कर्मठ प्रेक्षकांनी सखुबाईचे नाटक बंद पाडले, त्याचा निषेध 'इंदुप्रकाश' या मुंबईच्या वृत्तपत्रात केला होता. (१८ जुलै १८९२). कऱ्हाडचे गणपतराव व रघुनाथराव चरेगावकर हे बंधू गणपतराव

जोशांच्या तालमीत तयार झाले होते. 'त्राटिका' नाटकातील 'पिल्या' च्या भूमिकेबद्दल गणपतरावांची ख्याती होती. उत्तरायुष्यात चित्रपटांतून किरकोळ भूमिका आणि शाळाशाळांतून नाट्यप्रवेश करण्याची पाळी त्यांच्यावर आली होती. 'हॅम्लेट' नाटक कऱ्हाडकर हौशी कलावंतांकडून बसविण्याची त्यांची इच्छा अपुरीच राहिली. 'शारदा' नाटकातील वल्लरीची भूमिका ठसकेबाजपणे करून टाळी मिळविणाऱ्या शंकरबुवा लाटे यांनी वेगवेगळ्या कंपन्यांत स्त्रीभूमिका केल्या. दत्तोबा केळकर सुलोचना संगीत मंडळीत, गणपतराव भागवत महाराष्ट्र नाटक मंडळीत, अप्पासाहेब इनामदार अरूण व केशव या मंडळ्यांत, बबनराव नावडीकर बालगंधर्व मंडळीत होते. बापूराव डवरी, एकनाथ महाडिक , शंकरराव वेदपाठक यांनीही व्यावसायिक रंगभूमीची सेवा केली. ज्येष्ठ कलावंत राजा परांजपे यांचा जन्म व बालपण यामुळे कऱ्हाडशी संबंध आहे. अप्पासाहेब इनामदारांनी पुण्याला स्वत:ची' कलासंगम' संस्था काढली, 'आतून की र्तन करून तमाशा, 'थांबा थोडं दामटा घोडं' इ. नाटके ते करीत. ती संस्था त्यांचे चिरंजीव प्रकाश इमानदार यांनी समर्थपणे चालविली. राजाराम शिंदे, शाहीर यादव, रामभाऊ मोकाशी, मुकुंद कुलकर्णी यांनी काही काळ व्यावसायिक नाटकांतूनही कामे केली

### सामाजिक बांधीलकी

कऱ्हाडच्या हौशी कलावंतांनी श्री कृष्णाबाई उत्सवाच्या खर्चाची तरतूद होण्यासाठी, गोरक्षण संस्थांना मदत करण्यासाठी, टिळक हायस्कुलच्या इमारत निधीसाठी, सार्वजनिक वाचनालयाच्या चरितार्थासाठी , सुधाताई ढवळे स्मारक मंदिरासाठी फार काय सावरकर सत्काराच्या नावानेसुद्धा आपले नाट्यकौशल्य समाजसेवेस लावले.सामाजिक कृतज्ञता निधीसाठी 'लग्नाची बेडी' हा व्यावसायिक संयुक्त संचाच्या प्रयोगाचे संयोजन मार्च १९८८ मध्ये कऱ्हाडात करून सुमारे लाखभर रुपये मिळवून दिले. ब. मो. पुरंदरे यांच्या 'जाणता राजा' चे प्रयोग सातत्याने पंधरा दिवस करून 'जनकल्याण निधी' उभारण्यात आला.

## नकला आणि मेळे

नाटकांबरोबर नकला आणि मेळे यांचाही उल्लेव अपरिहार्य आहे. काशीनाथ अनंत ऊर्फ बाबुराव एकांडे नकलांतून खेडूतजीवनाचे अस्सल चित्र उभे करीत, तर शंकरराव करंबेळकर समाजातील प्रतिष्ठितांचे छंद बेमालूम व्यक्त करीत. बाबुराव गोखले थोर माणसांच्या वक्तृत्वाच्या नकला प्रसंगोपात्त करीत . उपजीविकेचे एक साधन म्हणून नकलांचे कार्यक्रम पेंटर वनपाळ करीत असत.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने प्रतिवर्षी मेळे होत. कऱ्हाडात शिवाजीराव बटाणे यांचा शिवछत्रपती मेळा (१९२५), श्रीकृष्ण मेळा, कलबुर्गी यांचा गजानन मेळा, जयहिंद मेळा, मंगळवार पेठेतील रामचंद्र कृ.भोसले यांचा हिंदविजय मेळा, राजकमळ मेळा, जयभारत मेळा, इ. मेळे होते. मेळ्यांच्या जोडीला शाहीर आत्माराम यादव यांचे कलापथक आणि शे.का. पक्षाचे लाल बावटा पथक यांचीही नोंद घेती पाहिजे. कलबुर्गी, पन्नालाल लाहोटी, भीमराव जाधव हे काही मेळ्यांचे व्यवस्थापक होते. बापूराव गोंधळी व रामचंद्र पाचुंदकर हे बटाणे मेळ्याचे, तर शंकरराव मसूरकर व बापूराव येडेकर श्रीकृष्ण मेळ्याचे संयोजन करीत. काका अष्टेकर, अप्पासाहेब इनामदार हेही काही काळ संयोजक होते. मेळ्यांचे संवाद व पदे डॉ.वनपाळ, गं. गो. ऊर्फ बापूराव सोमण, बाबूराव घाटे, गोविंदराव देव, यशवंतराव चव्हाण, लोखंडे मास्तर, शाहीर यादव लिहून देत, 'तुम्ही आम्ही सकल हिंदू हिंदू । बंधू बंधू ' हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे लोकप्रिय पद सरकारी परवानगी मिळवून मेळ्यात गाईले जाई. मेळ्याच्या पद्यावलीत ते गाणे समाविष्ट केले होते. सिनेसंगीताच्या चालीवर भक्तिगीते, राष्ट्रीय गीते सादर केली जात. नंतरच्या काळात लोकप्रिय हिंदी–मराठी चित्रपटांतील पदेही म्हटली जाऊ लागली. गनी कागदी (हार्मोनियम), अली आवटे (क्लॅरिओनेट), पिलोबा वास्के (तबला, ढोलची), इसाक शेख (ट्रंपेट)अशी साथ करणाऱ्या मंडळींची काही नावे. शिवछत्रपती मेळ्यात तुकाराम हा हरिजन मुलगा उत्तम गाई. वासुदेव घळसासी, बाळकोबा देवळेकर, लक्ष्मण बटाणे, दत्ता किरपेकर, जयसिंग शिंदे, बाबूराव देवळेकर, हणमंत वाघ,

सुमन जोशी (अष्टेकर), पुष्पा फाटक, सुधा फणसळकर, बेबी खेडेकर ही त्या वेळच्या छोट्या कलाकारांपैकी लोकांच्या स्मरणात असलेली काही नावे. सुप्रसिद्ध भावगीत गायक बबनराव नावडीकर आणि दत्ता वाळवेकर हेही मेळ्यांतूनच उदयास आले.

### अभिवाचन

ज्ञानेश्वरांच्या जीवनातील कथा- प्रसंगांचे नाट्य व संगीत यांचा मधुर मेळ साधून अभिवाचनाचे कार्यक्रम विद्याधर गोखले, सौ. विनया गोखले आणि सौ. कुंदा आगवेकर हे १९७५ पासून करतात.

### जादूचे प्रयोग

जादूचे प्रयोग हा लोकरंजनाचा एक प्रकार. शंकरराव करंबेळकर खाजगी बैठकीत विशेषत: लहान मुलांना जादूच्या करामती करून गुंग करून टाकत असत, तर उद्योजक सुधीर विठ्ठलराव शिराळकर एखाद्या व्यावसायिक जादूगाराला लाजवतील असे जादूचे प्रयोग सार्वजनिक ठिकाणी सभा संमेलने - समारंभांतून तीन तीन तासांचे करत असत. राम सूर्यवंशी व बाबा शामराव पवार हेही जादूचे प्रयोग करतात. जादूगार रघुवीरांप्रमाणे डोळे बंद करून मोटार सायकल चालविण्याचा, तसेच बोलक्या बाहुल्यांचा प्रयोग बाबा शामराव पवार करतात.

### लोककला

कऱ्हाड येथे जत्रा- यात्रांच्या हंगामापूर्वी मार्केट यार्डजवळ तमाशा मंडळे आपली कार्यालये (तंबू) टाकतात. या भागाला 'पठ्ठे बापूराव नगर' असे नाव असून यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत हिंगमिरे हे त्याचे संयोजन करतात. सुपारी घेऊन येणारी पार्टी आणि त्यांना अपेक्षित दिवस यावर बिदागीचा दर अवलंबून असतो . एका महिन्याच्या वास्तव्यात साधारणता २० ते ३० सुपाऱ्या मिळतात. मागणी करणाऱ्या यात्रा कमिटीच्या फर्माईशीनुसार तमाशातील पात्रे ठरविली जातात.

### चित्रपटगृहे

मूकपटांच्या जमान्यात कऱ्हाडात गुरूवार पेठेतील दर्ग्याजवळ, सध्याच्या

'अर्बन बझार'च्या जागेत नारायणराव पेंढारकर यांचे परशुराम थिएटर होते, चित्रपट बोलू लागले, त्या काळातही पुण्या– मुंबई खेरीज त्या वेळच्या मुंबई प्रांतात अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, बार्शी, धारवाड, सातारा, बारामती आणि कऱ्हाड अशा मोजक्याच ठिकाणी चित्रपटगृहे होती.१९३६ मध्ये कऱ्हाडातील सोमवार पेठेतील बेलापुरे यांच्या नाट्यगृहाचे रूपांतर रॉयल टॉकीज या नावाने चित्रपटगृहात मनोहर सदाशिव ऊर्फ दादासाहेब करंदीकर यांनी केले. त्यांचे बंधू विसुभाऊ करंदीकर, बापूसाहेब व अप्पासाहेब हे चाफळकर बंधू या चित्रपटगृहाची व्यवस्था पहात. शामराव पवार हे मुख्य ऑपरेटर होते. १९३९ मध्ये कऱ्हाडात वीज कंपनी सुरू होईपर्यंत थिएटर ऑईल इंजिनवर चाले. त्या काळात सिनेमाचे रोज दोन खेळ असत. तर शनिवार, रविवार आणि अमावास्या या दिवशी रोज तीन खेळ असत. तिकीटांचे दर जमीन (पीट) ४ आणे, बाक ८ आणे व खुर्ची १ रुपाया असे होते. १९४५ पासून रॉयल टॉकीजचे व्यवस्थापक शंकरराव बेलापुरे झाले. याच सुमारास वर्तमानपत्रात सिनेमाच्या जाहिराती येऊ लागल्या. बँड लावून सिनेमाची पोस्टर्स लावलेले त्रिकोणी ढकलगाडे बाजारात – पेठेत फिरवून जाहिरात केली जाई. दरम्यान (बहुधा) डॉ. गो. ना. दातार यांनी बांधलेल्या बुधवार पेठेतील जागेत सुप्रसिद्ध प्रभात फिल्म कंपनीचे एक भागीदार फत्तेलाल यांनी १९३९ मध्ये 'प्रभात' या नावाने चित्रपटगृह चालविण्यास सुरूवात केली. कऱ्हाडात एस. टी. स्टँडजवळ १९५३ मध्ये 'राजमहाल' हे चित्रपटगृह सुरू झाले. १९८५ मध्ये शहराच्या बाहेर कोल्हापूर रस्त्यावर 'भैरवनाथ' हे चित्रपटगृह सुरू झाले.आता 'राजमहाल हे चित्रपटगृह बंद करून तेथे २००५ मध्ये व्यापारी संकुल सुरू झाले आहे. दूरदर्शनचा प्रभाव, केबलचा मोठ्या प्रमाणात वापर यामुळे गेल्या सात – आठ वर्षांत संध्याकाळी ६ चा खेळ तर बंद झालाच आहे, पण एरवी देखील प्रेक्षकवर्ग फारच मर्यादित असतो.

उत्तमोत्तम दर्जेदार चित्रपट, नाटक व अभिजात, संगीत रसिकांपर्यंत पोहचविण्यासाठी डॉ. अजय ब्रह्मनाळकर, केशव कुलकर्णी , डॉ. रा. ग. नानिवडेकर, शर्वरी बेलापुरे, प्रभृतीनी पुढाकार घेऊन 'अभिरूची' या संस्थेची सुरुवात २००४ मध्ये केली आहे.

**चित्रपट**

कऱ्हाडचे नाटककार ना. वि. कुलकर्णी यांनी आपल्या लेखणीने 'मायाबाजार' या बोलपटासाठी कसरत केली आणि त्या कसरतीला शंकरराव करंबेळकर यांच्या पदांनी साथ दिली होती. शंकरराव वेदपाठक, राजाराम शिंदे यांनी मराठी चित्रपटांतून कामे केली.आणि गणपतराव चरेगावकर (कऱ्हाडकर)यांनी 'रामशास्त्री', 'लाखाची गोष्ट' इ. चित्रपटात केली. राजा परांजपे या मराठीतील श्रेष्ठ नट-दिग्दर्शकांचा जन्म नि बालपण कऱ्हाडातील. रेठरे बु. (ता. कराड) येथील मनोहर मोहिते इ.नी १९८८ मध्ये 'सर्वश्रेष्ठ' चित्रपटाची निर्मिती केली होती. 'ताईचं लग्न' या चित्रपटाचे चित्रीकरणच कऱ्हाडात झाले. त्यात शीतल कुलकर्णी, जुगुलाकेशोर ओझा यांच्या प्रमुख भूमिका होत्या. 'मी अमृता बोलतेय' हा चित्रपट चैतन्य क्रिएशन नावाने कऱ्हाडचे डॉ. सुप्रिया व डॉ. सुश्रुत पुराणिक, डॉ. कमलेश शहा यांनी तयार केला (२००६). बर्लिन येथे स्प्रिंग २००७ महोत्सवात सादर केल्या जावयाच्या दहा लघुपटांत समाविष्ट करण्यासाठी माणिक बर्गे यांनी 'बोबडे बोल' हा एका मिनिटाचा लघुपट तयार केला असून त्यात मुकुंद कुलकर्णी (धनी), पूजा उमराणी, पंकज, रसिका देशपांडे व त्यांचा छोटा मुलगा तनीष यांच्या भूमिका आहेत.

*****

१३

# ललित कला

## संगीत

संगीत ही एक श्रेष्ठ व माणसाचे उन्नयन करणारी कला आहे. परंतु या कलेच्या वस्तुनिष्ठ अभ्यासाला सुरुवात इंग्रजी राज्याच्या अमदानीतच झाली. पूर्वी या कलेचा उपयोग प्रामुख्याने धार्मिक कारणांसाठी होई. मुस्लीमपूर्व काळात नृत्य व संगीत या कलांचा विकास 'मंदिर' या संस्थेच्या विकासाबरोबर झाला तर मुस्लीम काळात राजाश्रय त्यांच्या विकासाला कारणीभूत ठरला.

शास्त्रीय संगीताच्या बाबतीत आधुनिक काळात कऱ्हाडातील सर्वांत जुने नाव कल्लुबुवा कुलकर्णी असे असावे. त्यानंतर महत्त्वाचे नाव म्हणजे वि. ल. उर्फ अप्पासाहेब इनामदार यांचे होय. हे कऱ्हाडमधील संगीत प्रसाराचा आधारस्तंभ होते. पुण्यात संगीतचूडामणी विनायकराव पटवर्धन यांच्याकडे त्यांनी गायन वादनाचे शिक्षण घेतले. संगीत विशारद ही पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केली. विनायकरावांच्या सांगण्यावरूनच त्यांनी प्रथम इस्लामपूर येथे व नंतर कऱ्हाडला गांधर्व महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून दोन वर्षे काम केले. अजमेर येथील संगीत महाविद्यालयाचे ते दोन वर्षे प्राचार्य होते. त्यानंतर कऱ्हाडमध्ये येऊन त्यांनी गांधर्व महाविद्यालयाचे काम परत सुरू केले. इनामदारांनी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाचे अधिवेशन कऱ्हाडला भरविण्याचे मोठे धाडस केले. त्यानंतर १९४८ मध्ये असेच अधिवेशन नाशिकला घेण्यात त्यांचाच पुढाकार होता. पुढे गांधर्व महाविद्यालय, मुंबई या संस्थेच्या परीक्षा विभागाचे ते कुलसचिव झाले.

बी. एन्. क्षीरसागर हे मूळचे सातारचे. पण नंतर ते कऱ्हाडला महाराष्ट्र हायस्कूलमध्ये संगीत अध्यापक म्हणून आले. तसेच गांधर्व महाविद्यालयाच्या कऱ्हाड शाखेची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. पं. क्षीरसागरांच्या ख्यालगायनाच्या मैफली त्यावेळचे कऱ्हाडचे नायब तहसिलदार अण्णासाहेब मरळीकर यांच्याकडे होत. बी. एन्. क्षीरसागर यांनी ग्वाल्हेरचे पं. कृष्णराव पंडीत व पं. राजाभैय्या पूछवाले यांच्याकडून संगीताची तालीम घेतली होती. १९४० मध्ये ते 'संगीतरत्न' झाले. पुढे १९६२ मध्ये ते जोधपूरला गेले. तेथेही त्यांना मेवाडचा प्रतिष्ठित 'डागर' पुरस्कार मिळाला. विष्णू दिगंबरांचे शिष्य अनंतबुवा कुलकर्णी पंताच्या कोटात रहात. ते गायन व वादन शिकवायचे. इनामदारांनी सुरू केलेल्या गांधर्व विद्यालयाचे पुनरुज्जीवन द. म. उर्फ तात्या मारुलकर व कवी विहंग यांनी ११-४-१९५४ रोजी केले. अत्यंत गोड 'जवारीदार' आवाज व सरळ स्वभाव यामुळे मारुलकर 'बडे मिठे गवय्ये' होते. गांधर्व महाविद्यालयाची शाखा चालवत असताना कवी विहंग हे 'संगीत कला विहार' या गांधर्व महाविद्यालयाच्या मासिकाचे संपादकही होते. त्यांनी डॉ. डी. जी. देशपांडे, रमाकांत देवळेकर प्रभृतींचे सहाय्य घेऊन विष्णू दिगंबर पलुस्करांच्या पुण्यतिथिनिमित्त प्रतिवर्षी तीन दिवसांच्या गायन-वादन मैफिलींना आरंभ करून कऱ्हाडकरांना ज्येष्ठ व श्रेष्ठ गायक-वादकांचे श्रवणसुख उपलब्ध करून दिले.

आकाशवाणीचे एक ज्येष्ठ कलाकार यशवंतराव नरहर उर्फ बाळ क्षीरसागर हे १९४६ ते १९५६ या काळात कऱ्हाडलाच होते. त्यांचे संगीत शिक्षणही गांधर्व महाविद्यालय कऱ्हाड येथेच झाले. श्री शिवाजी विद्यालयातून १९५१ साली 'संगीत' हा विषय घेऊन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले ते एकमेव विद्यार्थी होते. १९९२ मध्ये औरंगाबाद येथे 'मराठवाडा परफॉरमिंग आर्ट सेंटर' या संस्थेची स्थापना केली. ही संस्था केवळ ख्यालगायनाची अभिरुची वाढविण्याचे कार्य करते. आप्पासाहेब इनामदार यांचे चिरंजीव विलास इनामदार हे एक उत्तम गायक कऱ्हाडला होऊन गेले. ते कुमार गंधर्व यांचे शिष्य असल्यामुळे पुढे ते देवासला गेले.

कऱ्हाडला दत्तोबा देसाई नावाचे एक मोठे ख्यालगायक होऊन गेले.

हैद्राबादचे ख्यातनाम गायक पं. लक्षमनसिंगजी यांच्याकडे ते शिकले. स्वभावाने अतिनम्र व प्रसिद्धिपराङ्मुख. ह्यामुळेच त्यांच्या कलेचे चीज व्हावे तसे झाले नाही. सोमवार पेठेतील देशपांडेवाड्याच्या एका खोलीत त्यांचा रियाज चाले. प्रख्यात तबलजी रमाकांत देवळेकर यांची व त्यांची गाढ मैत्री. भगवान शंकर हे त्यांचे दैवत. त्यामुळेच श्रीकमळेश्वराची ते गानरूपाने सेवा करत. कोकणातील काटकामते निवासिनी श्रीदेवी भगवती हे त्यांचे उपास्यदैवत. या देवीचा दरबारगायक म्हणून त्यांनी तिची पन्नास वर्षांवर सेवा केली आणि नंतर तिच्याच चरणी त्यांनी देह ठेवला. दत्तोबा देसाईंनी श्री गुरु माणिकप्रभू संगीत विद्यालयाची स्थापना केली. दर वर्षी ते आपल्या गुरूंची म्हणजे लक्ष्मणसिंगजी यांची पुण्यतिथी साजरी करीत. दत्तोबांकडे अनेक विद्यार्थ्यांनी संगीताची संथा घेतली. त्यापैकी चंद्रकांत शिवलाल शहा यांनी त्यांना गुरुदक्षिणा म्हणून घर बांधून दिले. दुसरे विद्यार्थी म्हणजे कऱ्हाडमधील हॉटेल व्यावसायिक मोहन राव. ते अजूनही मोठ्या श्रद्धेने आपल्या गुरूची पुण्यतिथी आपल्या 'सुस्वर' या संस्थेतर्फे संगीत कार्यक्रमाने साजरी करतात.

इनामदार, क्षीरसागरबुवा व दत्तोबा देसाई यांच्या प्रयत्नाने कऱ्हाडमध्ये पुढच्या काळात चांगले ख्यालगायक निर्माण झाले. त्यामध्ये विमलाबाई ओगले, शांताबाई शाळीग्राम व पुढील काळात गाजलेल्या सरस्वती काळे यांच्या मातोश्री या होत्या. या सर्वजणी शास्त्रीय गायन प्रस्तुत करण्यापर्यंत शिकल्या. कुमुदिनी चिरमुले–काटदरे या पणजी आकाशवाणीवरुन कार्यक्रम सादर करू लागल्या व पुढे पुण्याचे ॲड. एन्. आर्. मारुलकर यांच्याकडून त्यांनी आणखी विद्या मिळवली. याखेरीज प्रमिला कुलकर्णी, प्रमिला किरपेकर, हरिभाऊ किरपेकर, सुमन रिसवडकर, रजनी जावडेकर, कुमार राजे, कु. कीर्तने इत्यादी विद्यार्थी पण ख्याल विद्या शिकत होते.

संगीत विद्येच्या प्रसाराला वाहून घेतलेल्या म्हणून स्वरगंधा टिळक (सरस्वती काळे) यांचा खास उल्लेख करावा लागेल. त्यांच्या मातोश्री या ख्याल गायिकाच होत्या. त्यामुळे स्वरगंधा टिळक या वयाच्या अकराव्या वर्षांपासून संगीताचे कार्यक्रम करीत आहेत. संगीत अलंकार, संगीतातील

पदविका अशा परीक्षा त्यांनी पूर्ण केलेल्या आहेत. १९५१ ते १९७० या काळात त्यांचे ८०० ते ९०० एवढे कार्यक्रम झाले आहेत. 'साता जन्मांचा सोबती' या चित्रपटासाठी त्यांनी पार्श्वगायन केले आहे. संगीत कलेच्या प्रसारासाठी त्यांनी 'स्वरनिर्झर' ही संस्था स्थापन केली. १९७५ साली ही संस्था अ. भा. गांधर्व महाविद्यालयाशी संलग्न झाली. गेली ३६ वर्षे या गावात शास्त्रीय संगीताची जाण यावी यासाठी त्या धडपडत आहेत. यामध्ये  नारायणराव टिळक व रमाकांत देवळेकर यांचाही मोलाचा वाटा आहे. संस्थेचे अनेक विद्यार्थी आकाशवाणी दूरदर्शनवर चमकले आहेत. शास्त्रीय संगीताप्रमाणेच भावगीत गायनामध्येही टिळक बाईंनी आपला ठसा उमटवला आहे. गणेशोत्सवातील त्यांच्या कार्यक्रमांना खूप मागणी असे. संगीत क्षेत्रातील त्यांच्या या बावन्न वर्षांच्या प्रदीर्घ कामगिरीमुळे पुण्याच्या गानवर्धन संस्थेने जुलै २००२ मध्ये त्यांचा सत्कार केला होता.  संगीतातील गायन , वादन व नृत्य या तिन्ही आविष्कारांचे दर्शन दर वर्षी नियोजनपूर्वक पुणे येथे (मूळ कऱ्हाडचे) कृ. गो. धर्माधिकारी १९७८ पासून नियमितपणे, निष्ठेने करीत आहेत.

या काळात कऱ्हाडमध्ये किर्लोस्करबुवा, रघुनाथ थोरात व निवृत्तीबुवा सरनाईक यांचे शिष्य देशमुख हे शास्त्रीयगायनात नावाला आले होते. सूरसिंगार, सूरमणी किताब मिळवणाऱ्या कुमुदिनी काटदरे (चिरमुले), नीला खंडकर, वासंती किरपेकर (टेंबे), प्रज्ञा टोणपे (देशपांडे) यांनी गायक म्हणून चांगली प्रसिद्धी मिळवली. संगीता कोल्हापुरे व शिल्पा चिकुर्डेकर (बहुलेकर) यांनी संगीतातील वाचस्पती (पी. एच्. डी.) ही पदवी मिळवली. संगीता काणे या अलंकार परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. वासंती किरपेकर (टेंबे) यांनीही संगीत क्षेत्रातील वाचस्पती ही पदवी 'जयपूर घराण्याच्या बंदिशांचे सांगितिक विश्लेषण' या विषयावर संशोधन करून मिळवली.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या काही दशकात शंकरबुवा लाटे, बाबुराव कोल्हापुरे, राजा आगाशे, शशिकांत घळसासी हे शास्त्रीय संगीतात नाव राखून होते. याच काळात पद्मा गोपालन या आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीने रसिकांना प्रभावीत करीत होत्या. गोपालनबाई हिंदुस्थानी व कर्नाटकी अशा दोन्ही पद्धतींनी गात असत.

नव्या पिढीचे कलाकार अर्थातच पुढे येत आहेत. पण निव्वळ शास्त्रीय संगीताची जोपासना हा प्रकार एकूण कमीच होत चालला आहे. क्षिप्रा कुलकर्णी, कुंदा आगवेकर, श्रीवल्लभ शहाणे, सतीश काणे, असिफ बागवान, इब्राहिम सय्यद, आसावरी जोशी, अदिती फडके, संगीता मुळे, शुभदा पटवर्धन, अपर्णा पठाडे, मधुरा नवरे, मृणाल परांजपे, एस्. डी. कल्याणकर, सविता इनामदार, रोहिणी भिंताडे, विभावरी जोगळेकर, डॉ. विश्वास धायगुडे, डॉ. विजय करंबेळकर, डॉ. सुहासचंद्र कुलकर्णी, आलापिनी जोशी अशी ही नवी पिढी शास्त्रीय संगीताच्या आधारावरच पुढे येऊ बघत आहे.

तबला, हार्मोनियम इ. वाद्यवादनाचे तसेच शास्त्रीय व सुगम संगीताचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण व सादरीकरण करण्यासाठी मुलांना घडविण्याचे काम 'कृष्णा' बालवाद्यवृंद २००४ पासून करीत आहे .

## सुगम संगीत

सुगम संगीत हे शास्त्रीय संगीतावरच प्रामुख्याने आधारलेले असते. पण गेल्या शतकाच्या ४ थ्या ते ६ व्या दशकापर्यंत अशा पद्धतीच्या गायकाला भावगीत असेच म्हटले जाई. पुढे मात्र सुगमसंगीत हेच नाव प्रामुख्याने आकाशवाणीने रूढ केले. अशा गायनाचे मुगुटमणी होते गजाननराव वाटवे. पण त्याच्या बरोबरीने दोन कऱ्हाडकरांची नावे गाजत होती. एक म्हणजे बबनराव नावडीकर व दुसरे म्हणजे दत्ता वाळवेकर.

श्रीधर यशवंत कुलकर्णी उर्फ बबनराव नावडीकर हे गांधर्व महाविद्यालयाचे संगीत विशारद होते. पण गजाननराव वाटव्यांचे गायन ऐकून त्यांनी भावगीते गाण्याचे ठरवले. त्यासाठी ते वाटव्यांकडे दहा वर्षे शिकण्यासाठी जात होते. हळू हळू भावगीत गायक म्हणून त्यांची कीर्ती होऊ लागली. 'नका गडे माझ्याकडे पुन्हा पुन्हा पाहू', 'कुणी आलं, कुणी आलं, जीवाला वेड लावून गेलं', 'जारे चंद्रा पळभर जा' ही त्यांची काही गाजलेली भावगीते. 'गडबडमामा', 'लैला मजनू 'अशा विनोदी कविताही ते गायले. गीत रामायणाच्या पहिल्या ध्वनिक्षेपणात 'लाडके कौसल्ये राणी' हे गाणे त्यांनी म्हटले होते. पुढे ते गीतरामायणाचे स्वतंत्र कार्यक्रमही करू

लागले. गीतरामायणाच्या धर्तीवर 'गीत दासायन' हे त्यांनी स्वत: रचले व गायलेही. आकाशवाणीचा पहिला महाराष्ट्र राज्य संगीत शिक्षक पुरस्कार त्यांना १९८० साली मिळाला. ते मंगलाष्टके करीत व विवाहसमारंभात गात. आदर्श शिक्षक पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार असे काही सन्मानही त्यांना प्राप्त झाले होते. असे हे कऱ्हाडचे कलारत्न २८-३-२००६ रोजी दिवंगत झाले.

भावगीतगायनात नाव मिळवलेले दुसरे कलाकार म्हणजे दत्ता वाळवेकर. भावगीतातला 'भाव' बरोबर ओळखून ते गात. १९४५ पर्यंत ते कऱ्हाडच्या मेळ्यांतून व नाटकांतून काम करीत. पुढे नोकरीच्या निमित्ताने ते पुण्यात स्थायिक झाले. जाहीर भावगीतांच्या कार्यक्रमाबरोबरच आकाशवाणी व ध्वनिमुद्रिका या माध्यमांतूनही ते लोकप्रिय झाले. १९५३ मध्ये आकाशवाणीचे पुणे केंद्र सुरू झाले. उद्‌घाटनगीत होते ग. दि. माडगूळकरांचे पण त्याला चाल लावून ते म्हटले वाळवेकरांनी. अलीकडेच भावगीत गायनाच्या त्यांच्या सेवेबद्दल सवाई गंधर्व पुण्यतिथी महोत्सवात त्यांचा सत्कारही झाला. वाळवेकरांनी कवी विहंगांच्या 'सांग पोरी सांग', 'हे काय गडे' या कवितांना चाली देऊन त्या लोकप्रिय केल्या.

## साथ आणि वाद्यवादन

संगीतात तालाला फार महत्त्व आहे व ताल म्हटलं की पहिले नाव येते तबल्याचे. कऱ्हाडचे सर्वात जुने तबलावादक म्हणजे त्रिंबकराव उमराणी. 'पखवाजी हात आणि ध्रुपद अंगाने लयकारी करणारे आक्रमक वादक' असे त्यांचे वर्णन केले जाई. प्रचंड तयारीचे लयकार तबलावादक असल्याने त्यांच्या साथीत गाणे म्हणजे भल्याभल्यांना कसरत वाटे. त्यांच्याच तोलामोलाचे पुढच्या तरुण पिढीतील एक अतिशय प्रसिद्ध तबलावादक म्हणजे रमाकांत शंकर देवळेकर. त्यांचा जन्म २४-१०-१९३० चा. त्यांनी आपले प्रारंभिक तबलाशिक्षण त्रिंबकरावांच्याकडे घेतले व नंतर पै. उस्ताद महबुब खान मिरजकर पुणे यांचा गंडा त्यांनी बांधला. तेथे त्यांनी दहा वर्षे तबल्याचे शिक्षण घेतले. १९५० मध्ये त्यांनी अखिल भारतीय गांधर्व

महाविद्यालयाची 'तबला विशारद' ही पदवी घेतली. पुणे आकाशवाणीचे ते 'बी हायग्रेड' या उच्चश्रेणीचे कलाकार झाले. देवळेकरांचा हात मृदू असून गोडव्याकडे त्यांचे फार लक्ष असते. पुढे त्यांनी पं. भीमसेन जोशी, जितेंद्र अभिषेकी, वसंतराव देशपांडे, व्हायोलीनवादक गजाननराव जोशी यांना साथसंगत केली. १९६४ मध्ये भारत सरकारच्या सहकारातून पं. भीमसेन जोशी, उस्ताद विलायतखान, सामताप्रसाद यांच्याबरोबर त्यांनी अफगाणीस्तानचा दौरा केला. अलाहाबादच्या प्रभाग संगीत समितीने त्यांना 'संगीतश्री' ही पदवी दिली. हौशी तबलावादकांत बबनराव व्हावळ हे एक जुन्या पिढीतील नाव. त्यांचा ठेका अतिशय उत्तम असे. तसाच ठेका असलेले व व्यवसायाने वैदिक पंडित असलेले असलेले विठ्ठलराव पटवर्धन, नगरपरिषदेचे प्रशासकपद भूषविलेले शिवाजीराव जाधव हेही या कलेत नावारूपाला आलेले. या शिवाय 'घिस्साबाज' वसंतराव तारळेकर कुलकर्णी हेही प्रसिद्ध होते. तबलावादकांची नवीन पिढी खूप समृद्ध आहे. प्रा. नारायणराव टिळक स्वत: तबला वाजवतात. त्यानंतर संगीत अलंकार विश्वनाथ पुरोहित, नंदा जोशी, मकरंद किर्लोस्कर, हरीभाऊ चरेगावकर (हे मृदुंगही वाजवतात), मारुतराव फुटाणे, रामभाऊ उमराणी, यशवंतराव तेली, रघुनाथराव व्यास, वामनराव गिजरे व अमृत गिजरे, विजय किरपेकर, डि. एच्. कुलकर्णी, सुनील पुरुषोत्तम कुलकर्णी, शशिकांत घळसासी, अबुबकर सुतार, सिद्धार्थ दिलीप इनामदार अशी ही तबलावादकांची मांदियाळी आहे. यापैकी विजय वासुदेव किरपेकर हे मध्यरेल्वेतून निवृत्त होऊन पुण्यात स्थायिक झाले. ते तबला विशारद असून साथसंगत व तबलावादनाच्या स्वतंत्र कार्यक्रमासाठी त्यांनी दुबई व शारजाचा दौरा केला होता. 'तालनिनाद' व 'तालवैभव' ही त्यांची तबल्यावरील दोन पुस्तके प्रसिद्ध आहेत. प्रथम आपल्या वडिलांचे व नंतर रमाकांत देवळेकर व पांडुरंग मुखडे यांचे मार्गदर्शन त्यांना मिळाले.

**स्वरवाद्ये**

१९४९ च्या सुमारास चित्तरंजन कोल्हटकर यांचे बंधू बबनराव कोल्हटकर

हे कऱ्हाडला सब रजिस्ट्रार होते. ते व्हायोलिन अप्रतिम वाजवत. याशिवाय मुरलीधर माईणकर, वासुदेवराव किरपेकर, विनायकराव पंडीत यांची पण व्हायोलीनवादनात कीर्ती होती. लाटेबुवा हे जुन्या पिढीतील तर बापूराव कुलकर्णी, बापूराव मुळे, अंतोबा गजरे, स्वरगंधा टिळक हे संवादिनी वाजवण्यात निपुण आहेत. दत्तोपंत मोघे, आत्मारामपंत किरपेकर, भिकाजीपंत गिजरे, अनंतबुवा कुलकर्णी, वासंती वळवडे-मुझुमदार, हरीभाऊ चरेगावकर ह्यांचा हात सतारीवर छान चालत असे. रवींद्र पंडित हे व्हायोलिन व सतार दोन्हीही उत्कृष्ट वाजवतात. त्यांचे शास्त्रीय संगीत शिकवण्याचेही काम चालू असते. बासरी हे वाद्य अतिशय गोड. तिची आराधना प्रसाद कुलकर्णी , हरीभाऊ कुलकर्णी तसेच श्रीपाद कुलकर्णी हे अतिशय निष्ठेने करत असतात. बाबरमाची येथील पोपट पोळ हे नाकाने ते वाद्य वाजवून श्रोत्यांना थक्क करतात. रेठऱ्याचे रजाक बाबालाल मुजावर हे क्लेरोनेट वादक असून डोळे बांधून जलतरंग वाजवत. वाद्यांच्या बाबतीत एक विशेष माहिती अशी की १९५१ मध्ये वासुदेवराव किरपेकर यांनी स्वत: व्हायोलीन तयार केले होते तसेच १९६७ मध्ये येथील डॉ. रामभाऊ पटवर्धन यांनी गणेशवीणा म्हणजे एकतारी वीणा, तंबोरा, सतार व बीन या पाच तंतुवाद्यांचे एकत्रीकरण असणारे वाद्य स्वत: तयार करून घेतले होते.

### कीर्तन

कीर्तनकला ही बहुरूपी व बहुअंगाने जाणारी कला आहे. कीर्तनाला संगीत कलेच्या अनेक घटकांची गरज असते. कीर्तनभक्तीला वाहिलेली कऱ्हाडची दोन घराणी म्हणजे सोमवार पेठेतील देव आणि शुक्रवार पेठेतील श्रोत्री ही होत. कऱ्हाडमधील सर्वात जुने ज्ञात असे कीर्तनकार म्हणजे विठोबा अण्णा दप्तरदार (१८१८-१८७३) हे होत. अनेक गेय पदांची निर्मिती करून त्यांनी कीर्तनकारांच्या अनेक पिढ्यांना ठेवा दिला. आपल्या मांडणीच्या पद्धतीने व गायनाच्या मधुरतेने काशीनाथबुवा आणि श्रीपादबुवा या आपटे पितापुत्रांनी व मसूरकर आफळ्यांनी उत्तर हिंदुस्थानात लौकिक संपादन केला होता. दतात्रय वासुदेव उर्फ आबासाहेब धोपाटे यांचे शिवजन्म आख्यान फार रंगात येई. निरूपणी कीर्तनात बळवंत कृष्ण फुटाणे (संत) व राघुआण्णा धोपाटे यांचे नाव घेतले जाते.

नारदीय कीर्तनपरंपरेतील दुसरे श्रेष्ठ व ज्येष्ठ नाव म्हणजे ह. भ. प. कीर्तनकेसरी नरहरबुवा कऱ्हाडकर. हे राहणारे नरसिंगपूरचे असल्याने नरसिंगपूरकर या नावानेही ओळखले जात. कीर्तनात प्रामुख्याने शास्त्रीय संगीताचाच प्रभाव जास्त असतो. कऱ्हाडकरबुवांची ध्रुपद गायनावर जबरदस्त पकड होती. याशिवाय ओवी, साकी, दिंडी, कटाव आणि विविध रागांतील तराणे यांचा ते भरपूर उपयोग करीत. आकाशवाणीवरील सुप्रसिद्ध संगीत विशारद अधिकारी व साहित्यिक कृ. द. दिक्षित यांनी 'बाळकृष्ण चरणी लक्ष लागो' या शीर्षकाने कऱ्हाडकरबुवांचे फार सुंदर शब्दचित्र रेखाटले आहे. त्यांच्या समकालीन कीर्तनकारांत ते अगदी उठून दिसायचे. अस्खलित रसाळ वाणी, हास्यविनोद हा स्थायीभाव असे. बहुरूपी, बहुढंगी व बहुरंगी ही सर्व विशेषणे त्यांना लागू होत. त्यांनी संगमनेरकरबुवा व रामचंद्र काशिकरबुवा यांच्याकडे कीर्तनाचे धडे घेतले. पाध्येबुवा व भास्करबुवा बखले या संगीत शिरोमणींकडून संगीताचे धडे घेतले. तालावर त्यांची पूर्ण पकड असे. बुवांचा आवाज सुरेल असे. तान स्वच्छ कथेकरी वळणाची. त्यांच्या झांज वाजवण्यातही डौलदारपणा असे. बुवांचा व्यासंग व पाठांतर त्यांच्या कीर्तनातून पुरेपूर दिसे. नरहरीबुवांचे शिष्य व चिरंजीव म्हणजे रामचंद्रबुवा कऱ्हाडकर. यांचाही आवाज उत्तम व भाषा खास कोल्हापुरी. पेटीही उत्तम वाजवत. आकाशवाणीने त्यांना उच्चवर्गीय कलाकार म्हणून पात्रता दिली होती. पुढे ते करवीर पीठाचे शंकराचार्य झाले. कऱ्हाडच्या कीर्तन परंपरेतील आणखी एक पिता पुत्राची जोडी म्हणजे यशवंतबुवा नावडीकर व त्यांचे कीर्तिमान चिरंजीव श्रीधरबुवा म्हणजेच सुप्रसिद्ध भावगीत गायक बबनराव नावडीकर हे होत. १९७९ च्या अ. भा. कीर्तन संमेलनात बबनरावांना 'कीर्तनभूषण' ही पदवी देण्यात आली. कीर्तनात उपयोगी पडतील अशा एक हजार आर्या त्यांनी रचल्या आहेत. कऱ्हाडच्या शकुंतलाबाई रेमणे यांनी पंचवीसाव्या वर्षी पहिले कीर्तन केले. पुढे सांगली, नागपूर, हैद्राबादपर्यंत त्या गेल्या. मात्र त्यांचे दर रामनवमीचे घरचे कीर्तन चुकले नाही. 'कथा कौमुदी', 'अध्यात्मगंगा' असे सन्मान, व उपाध्या त्यांना प्राप्त झाल्या होत्या. याशिवाय श्री शिवाजी विद्यालयातील शिक्षक बी. बी. कुलकर्णी उर्फ बापुराव सवादेकर हेही चांगले कीर्तन करीत. त्यांची कन्या कुमुद हीही बालपणी कीर्तन करे. ओगलेवाडीच्या शकुंतलाबाई आगाशे, सीताबाई लाटकर, रामचंद्र बळवंत जोशी (काळे) यांच्या बरोबरच कऱ्हाडच्या अभियांत्रिकी

महाविद्यालयातील व्याख्याते श्रीकांत खाडीलकर आणि कऱ्हाडमधील दुसरे एक अभियंता श्रीपाद पेंढारकर या नवकीर्तनकाराची तसेच स्मिता देशपांडे या बालकीर्तनकारांची नोंद येथे घेतली पाहिजे.

## नृत्य

वासुदेवराव किरपेकर १९४७-४८ सालात नृत्याचे वर्ग चालवीत असत. डॉ. रामभाऊ पटवर्धन हेही कथ्थक व भरतनाट्यम् या नृत्यप्रकारांचे शिक्षणवर्ग चालवीत. सध्या 'अंकुर', 'नुपूर', 'दर्पण' 'बोल्ड अँड ब्युटिफूल डान्स ॲकेडमी' या संस्था नृत्याचे शिक्षण देतात. सुचेता गोडबोले, सौ. जाधव, मीनल ढापरे, सौ. नाटेकर, सौ. तोलपाडी, सौ. प्रज्ञा वाळिंबे या नृत्य शिक्षणात अग्रेसर आहेत. कीर्ती आनंद चरेगावकर, प्रगती वसंतराव गुंजीकर, सोनाली यशवंतराव कुलकर्णी, अदिती प्रशांत बहुलेकर यांचा अरंगेत्रम गुरू श्रीकृष्णमूर्ती यांच्या उपस्थितीत तर अगदी अलीकडे सौ. प्रज्ञा वाळिंबे यांची कन्या श्री लक्ष्मी उर्फ मनाली हिचा भरतनाट्यममधील 'अरंगेत्रम' कार्यक्रम कऱ्हाडमध्ये मोठ्या तालेवारपणाने साजरा झाला. त्यावेळी तिचे गुरू अखिल भारतीय कीर्तीच्या सौ. सुचेता चाफेकर या उपस्थित होत्या. अमृता उज्ज्वलकुमार लाहोटी वयाच्या सातव्या वर्षापासून नेहा दलाल यांच्या मार्गदर्शनाने 'भरतनाट्य' शिकू लागली. तिचा 'अरंगेत्रम' कार्यक्रम मुंबईस भव्य प्रमाणात झाला.

रामनाथ अमरसिंह भूल (गोरखा) हे नेपाळचे रहिवासी असून त्यांनी गणेश चौगुले यांच्याकडे पाश्यात्य नृत्यकलेचे शिक्षण घेतले. त्यांना विष्णू मर्ढेकर यांनी दिशा दाखवली. कऱ्हाडला 'ग्लोबल एक्स' हा मंच स्थापन करून तेथे ते नृत्य शिकवतात. 'तारूण्याच्या लाटेवर' चित्रपटात त्यांनी नृत्य केले आहे.

## शाहिरी परंपरा

सुप्रसिद्ध शाहीर सम्राट खाडीलकर हे कऱ्हाडला बरीच वर्षे राहत होते. तर त्यांचे पट्टशिष्य शाहीर वामनराव हेर्लेकर यांची सासुरवाडी कऱ्हाडची होती. शाहीर नानिवडेकर हे स्वरचित पोवाडे गात. त्यांच्या पोवाड्यांच्या

ध्वनिमुद्रिका खूप खपत. निरनिराळे ऐतिहासिक रोमहर्षक प्रसंग ध्वनिक्षेपकाशिवाय खड्या आवाजात डफांच्या साथीने ते उभे करीत. याकूब सगाजी बागवान उत्कृष्ट भेदिक म्हणत. शाहीर आत्माराम यादव यांनी स्वत:चे कलापथक काढले होते.

**भजनी परंपरा**

काकडआरतीच्या निमित्ताने भक्तिरसाने ओथंबलेली गाणी स्वामीच्या बागेतील मंदिरात, गोंदवलेकर राम मंदिरात व इतर काही मंदिरांत गायली जात. देसाईबुवांचे गुरु लच्छुबुवा, बंडुबुवा, रामभाऊ रेपाळ हे कऱ्हाडमधील जुने भजनी गायक. सौ. रमा देशपांडे, गणेश पारगावकर यांची भजनी मंडळे, तसेच संत सखू महिला भजनी मंडळ ही भजनकलेचा प्रसार गेली कित्येक वर्षे करीत आहेत. याशिवाय गोंदवलेकर महाराजांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार व उपासना करणारी ब्रह्मचैतन्य मंडळ, सद्गुरु भजनी मंडळ आणि इतर सांप्रदायिक भजनी मंडळांतूनही संगीताची उपासना होत असते.

**संकीर्ण**

कवाली या प्रकारामध्ये शमशुद्दीन अंबेकरी, हुसेन बेपारी, नुरअब्बास शिकलगार यांनी नाव कमवले आहे. तर शेरबानू मुल्ला या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या गझल गायिका आहेत. स्वरगंधा टिळक यांनी कवितांना चाली लावून त्या परिमाणकारकरीत्या सादर करण्याचा यशस्वी उपक्रम केला. कृणाल कंपनीचे अरुण कचरे यांनी मोठ्या प्रमाणांवर निरनिराळ्या विषयांवर सी. डी. आणि कॅसेट्स यांचा व्यवसाय नावारूपाला आणला. सिनेमा क्षेत्रातील संगीत संयोजक म्हणून गाजलेले शामराव कांबळे यांचा जन्म कऱ्हाडला झाला. त्यांची बरीच मोठी कारकीर्द सुधीर फडके यांच्याबरोबर काम करण्यात गेली. पं. गंगाधरबुवा पिंपळखरे यांच्याकडे गायनाचे व पं. अरविंद मूळगावकर यांच्याकडे तबल्याचे शिक्षण घेतलेले संगीत (तबला) विशारद अभिजित कुलकर्णी यांनी 'वास्तुपुरूष' चित्रपटासाठी पार्श्वगायन केले आहे.

### संगीतविषयक कार्य करणाऱ्या संस्था

छायाचित्रकार वासुदेवराव किरपेकर यांनी १९४८ मध्ये विलास म्युझिक सर्कलची स्थापना केली. गांधर्व महाविद्यालयाचा उल्लेख वर केला आहेच. याशिवाय दत्तोबा देसाई यांचे माणिक प्रभू संगीत विद्यालय, रमाकांत देवळेकर व विहंग यांचे गुरुवार मंडळ ह्या काही जुन्या संस्था होत. सध्या 'स्वर निर्झर', 'नादब्रह्म', 'सुस्वर', 'स्वरनिनाद', 'अभिरुची', 'उमेद', 'रसगंध', 'कराड जिमखाना', 'चौफेर', 'अनुसंधान', 'तेजस ज्ञानदीप मंडळ', 'संगीत कलाकेंद्र', 'कोयना क्रीडा मंडळ', 'कृष्णाबाई उत्सव समिती', 'मधुअण्णा स्मृती विश्वस्त' ह्या संस्था निरनिराळ्या निमित्ताने संगीताचे कार्यक्रम आयोजित करत असतात.

वेणूताई चव्हाण यांच्या पुण्यतिथीच्यानिमित्ताने त्यादिवशी वेणूताई चव्हाण स्मारक समिती संगीताचा दर्जेदार कार्यक्रम सादर करीत असते. तर अर्बन बँक यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीला संगीताचा कार्यक्रम सादर करीत असे. पूर्वी श्रीगुरु माणिक प्रभू, गायनाचार्य लक्ष्मणसिंग व विष्णू दिगंबर यांच्या पुण्यतिथीला संगीताचे कार्यक्रम होत असत. हल्ली 'सुस्वर' या संस्थेमार्फत मोहन राव व महिंद्रकुमार शहा हे दत्तोबा देसाई व ऐतवडेकर बुवा यांची पुण्यतिथी संगीत कार्यक्रमाने साजरी करतात.शिवणकामाचा व्यवसाय करणारे इब्राहिम सय्यद हे गेली पंचवीस वर्षे म्हणजे १९८१ पासून 'सुहानी शाम रफीके नाम' या नावाने महंमद रफींची याद जागवत असतात. त्यांचा 'मीलन ऑर्केस्ट्रा' प्रसिद्ध आहे. इ. स. २००० मध्ये त्यांनी नौशादसाहेबांवर एक भव्य कार्यक्रम केला होता. फारूक शेख हेही १९९७ पासून महंमद रफींच्या स्मरणार्थ दर वर्षी कार्यक्रम करतात.

### कार्यक्रमांचे स्थळ

आज ज्या ठिकाणी 'अर्बन बझार' आहे तेथे पूर्वी अर्बन बँकेचा हॉल होता. हा हॉल संगीताच्या मैफिलींना फार उत्कृष्ट समजला जात असे. भारतातील अनेक श्रेष्ठ गायक व गायिका येथे गाऊन गेल्या आहेत. आता कृष्णाबाईचे जुने व नवे सांस्कृतिक सभागृह, यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन व वेणूताई चव्हाण सभागृह याठिकाणी निरनिराळ्या

संगीत सभा होत असतात. अलीकडे कृष्णा घाटावरील कृष्णेच्याच वाळवंटात मोठा मंच उभारून 'गीतरामायण' सारखे उत्तमोत्तम कार्यक्रम होऊ लागले आहेत.

**चित्रकला**

कऱ्हाडच्या चित्रकलाविषयक आढावा घेताना आपल्याला पोथ्यापुराणापर्यंत पोहोचता येते. कराडच्या 'वेदशाळा विद्यासंवर्धन मंडळ' यांच्याकडे वेद, न्याय, व्याकरण इत्यादी प्राचीन विषयांवरील हस्तलिखितांचा मोठा संग्रह आहे. त्यांत हस्तचित्रे व पोथ्यांच्या लाकडी फळ्यांवरील अशी मिळून १५० च्या दरम्यान रंगीत चित्रे आहेत. त्यामध्ये 'ज्वरपराजय' हा आयुर्वेदावरील ग्रंथ व 'सप्तशती' यामधील रंगीत चित्रे हा अमूल्य ठेवा आहे.

कऱ्हाडचे विठोबा अण्णा दप्तरदार हे आपणास परिचित आहेत, ते मोठे पंडित, कवी व कीर्तनकार म्हणून. पण ते चित्रे काढीत व मातीची चित्रेही तयार करीत. टेंभूच्या भिवा सुतारास औंधच्या राजेसाहेबांनी रामपंचायतनाचे चित्र रेखाटण्यास सांगितले. तेव्हा या भिवा सुतारास विठोबा अण्णांनी 'ध्यायेदाजानुबाहुं' या ध्यानाप्रमाणे चित्र काढण्यास सांगितले व त्याप्रमाणे मार्गदर्शनही केले. इ. स. १८७१ मध्ये भिवा सुताराने काढलेले हे चित्र अभिजात समजले जाते. चित्र कमालीचे जिवंत तर वाटतेच, परंतु चार भावांतील कुटुंब सातत्य आणि एकीकडे भावाभावांतील रूप सादृश्यता कायम ठेवूनही त्यांच्या चेहऱ्यातील निराळेपणा दाखवण्यात चित्रकार यशस्वी झाला आहे. रंगाचा मेळ व हातांपायांमधील वजनाचा तोल अतिशय उत्कृष्ट असल्याचा अभिप्राय नोंदवून औंधच्या बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी 'पाऊणशे वर्षांनंतरही त्या चित्रातील रंग नवे वाटतात' अशी प्रशंसा इ. स. १९४६ मध्ये केली आहे.

खुद्द बाळासाहेब पंत प्रतिनिधींचा चित्रकार म्हणून कऱ्हाडच्या संदर्भातील उल्लेख आवश्यक आहे. 'प्रतिनिधी कऱ्हाडचा आहे व कऱ्हाड हे प्रतिनिधींचे आहे' असे ते म्हणत. आपले राजेपण संभाळत त्यांनी अनेक कलांची जोपासना केली. त्यात चित्रकला ही प्रमुख मानावयास हवी. लहानपणापासून त्यांना या कलेचा नाद लागला. पुढे राजा रविवर्मा यांच्या सहवासात राहून त्यांनी आपली परंपरागत कला पूर्णत्वास नेली. रामायण, शिवचरित्र या विषयांवरील त्यांची

चित्रे आजही अभिमानाचा विषय ठरावा. राजा या नात्याने त्यांनी श्री. दा. सातवळेकर, माधव सातवळवेकर, रा. द. चितारी या सारख्या जगप्रसिद्ध चित्रकारांना उत्तेजन देऊन मोठे केले. कऱ्हाडच्या व्यंकटराव ओगले, प. तु. भंडारे या कलावंतांना त्यांचेच उत्तेजन होते.व्यंकटराव ओगल्यांच्या चित्रकलेतील नैपुण्यामुळे कोल्हापूरच्या प्रभात फिल्म कंपनीमध्ये ते चित्रकार म्हणून रुजू झाले. त्यावेळी चित्रकारांना फिल्मउद्योगात 'चितारी' म्हणून संबोधत. अंगच्या कलागुणामुळे प्रभातमध्ये ते चांगले स्थिरावले. नंतर प्रभातचे स्थलांतर पुणे येथे झाल्याने ते पुण्याला जाण्याच्या विचारात होते. परंतु ओगलेवाडी येथे श्रीपादराव ओगले यांना आपल्या काच कारखान्याच्या परिसरात इनॅमल विभाग सुरू केला व त्या विभागाची संपूर्ण जबाबदारी व्यंकटरावांकडे सोपविली. त्यामुळे प्रभातला रामराम ठोकून त्यांनी इनॅमल विभागावर आपले लक्ष केंद्रित केले.

इनॅमलच्या विविध वस्तूंबरोबरच लहान मोठे इनॅमल साईन बोर्ड त्या विभागात तयार होत असत. व्यंकटरावांचा मूळ पिंड चित्रकाराचा असल्यामुळे आपली रंगीत निसर्ग चित्रे '( Landscapes) व व्यक्तिचित्रे ( Portraits) इनॅमलमध्ये निर्माण करण्याची कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. बहुरंगी चित्रे विविध छटांसह तयार करण्यासाठी प्रत्येक चित्र अनेक वेळा भट्टीत भाजावे लागत असे. अशा प्रकारच्या अनेक इनॅमल चित्रांची त्यांनी निर्मिती केली. त्यावेळी भारतातील अशा प्रकारचा हा एकमेव प्रयत्न असावा. आयुष्याच्या उत्तरार्धात आपला मुलाकडे अमेरिकेला जाण्यापूर्वी ही चित्रे येथेच राहावीत म्हणून रसिक ग्राहकांचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. परंतु अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने ती इनॅमल पेंटिंग्ज त्यांनी आपल्याबरोबर अमेरिकेत नेली. काही पेंटिंग्ज व्यंकटरावांनी स्वीडनच्या इनॅमल असोसिएशनला पाठवली. तेव्हा त्यांच्या कलाकृतींनी प्रभावित होऊन असोसिशनने त्यांना फेलोशिप देऊन सन्मानित केले.

आर. व्ही. कापरे हे गेल्या पिढीतील चित्रकार व शिल्पकार . त्यांनी तयार केलेले तैलरंगातील लो. टिळक यांचे चित्र टिळक हायस्कूलमध्ये होते. कऱ्हाड अर्बन बँकेच्या जुन्या इमारतीवरील लक्ष्मीची मूर्ती कापरे यांनीच तयार

केली होती. याच बँकेच्या सभागृहातील भिंतीवर लक्ष्मी - सरस्वतीची चित्रे कोणेगावकर यांनी काढली होती.

वामनराव जंगी यानी चित्रकलेचे शिक्षण जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमधील तत्कालीन पाश्चात्य व भारतीय ज्येष्ठ चित्रकारांकडून घेतले होते. प्रसिध्द चित्रकार ग. ना. जाधव, स. कृ. काळे, माळी हे त्यांचे काही समकालीन सहाध्यायी. काही वर्षे दिल्लीत राहिल्यानंतर ते मुंबईला टाइम्स ऑफ इंडियामध्ये चित्रकार म्हणून रूजू झाले. एक उत्कृष्ट व निष्णात चित्रकार म्हणून त्यांचा उल्लेख होत असे.

प. तु. भंडारे यांनी औंधला पंतप्रतिनिधीच्या अनुग्रहामुळे अन्य चित्रकारांप्रमाणे कलासाधना केली. भोरच्या राजवाड्यातील भिंतीवरील चित्रे साकारणाऱ्या चित्रकारांत त्यांचा समावेश होता. संभाजी राजासह आग्र्याला कैदेत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे तैलचित्र भंडारे यांच्या कलाकौशल्याची प्रचिती देणारे आहे.

वि. पां. ऊर्फ नाथमामा काळे यांनी चित्रकलेचे शास्त्रोक्त शिक्षण मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये घेतले. ही प्रेरणा त्यांना कऱ्हाडच्या वामनराव जंगी या चित्रकारांनीच दिली. त्यावेळचे जे. जे. चे प्राचार्य सालोमन यांच्या चित्रशैलीचा प्रभाव नाथमामांवर दिसतो. प्रा. त्रिदांद, देऊसकर, धुरंधर या श्रेष्ठ चित्रकारांचाही ते वारंवार उल्लेख करीत. त्यांची चित्रे काढण्याची पध्दत तत्कालीन पाश्चात्य पध्दतीची म्हणजे फिनिश्ड फोटोग्राफीक होती. चित्रकलेचे प्रात्यक्षिक त्यांनी दाखविल्याचे आढळत नाही. पण टागोर, गुरूवर्य दुवेदी, शेणालीकर, हुतात्मा सदुभाऊ पेंढारकर व लक्ष्मण जोशी, पांडुअण्णा शिराळकर, समाजभूषण बाबुराव गोखले, ल. म. ऊर्फ नानासाहेब देशपांडे, भैय्यासाहेब तांबवेकर व्यक्तिचित्रे पाहिल्यानंतर नाथमामांच्या चित्रसाधनेची साक्ष पटते.

विभूतेमास्तर कमीतकमी जलरंगात अतिजलद गतीने कागदावर तसेच भिंतीवर चित्रे काढण्यात तरबेज होते. शरीर रचनेचे (Anotomy) शास्त्रीय शिक्षण नसल्याने त्यांची चित्रे ढोबळ वाटत. तरीही सुमारे पंचेचाळीस वर्षापूर्वी कऱ्हाडमधील प्राथमिक शाळांच्या प्रत्येक वर्गाच्या भिंतीवर, पाठ्यपुस्तकांवर आधारित प्रसंगचित्रे, पौराणिक, ऐतिहासिक प्रसंगांची चित्रे ते रंगवत असत.

त्यांच्या चित्रात (Perspective) त्रिमितीचा प्रत्यय येई. दिवाळीपूर्वी तीन चार दिवस बाजारपेठेत सकाळी, गल्लापेटीच्या मागच्या भिंतीवर लक्ष्मी, सरस्वती, गजानन यांची चित्रे भराभर रंगवणारे विभुते मास्तर दिसले की रस्त्यावरचे लोक थोडावेळ ती करामत पहात राहत. ते चित्र दहापंधरा मिनिटांत पूर्ण करून मास्तर पुढच्या दुकानात जात. प्रमाणबध्द चित्रे इतक्या जलद रीतीने काढणारे चित्रकार अपवादानेच आढळतील. कच्छी इमारतीसमोर पूर्वी लाला मिठाईवाला यांचे बैठे दुकान होते. त्या दुकानाच्या एका पूर्ण भिंतीवर विभूते मास्तर स्वातंत्र्यपूर्व काळात दरवर्षी एक अशी राजकीय व्यंगचित्रे काढत.

सुप्रसिध्द लेखिका वासंती मुझुमदार या चित्रकार म्हणून देखील प्रसिध्द होत्या. त्या रेखाचित्रे व व्यक्तिचित्रे काढत. विष्णू दिगंबर पलूसकर यांचे त्यांनी काढलेले व्यक्तिचित्र खूप गाजले होते. शालेय वयात प. तु. भंडारे यांचे मार्गदर्शन त्यांना मिळाले. मुंबईत जहाँगीर आर्ट गॅलरी, ललित कला ॲकडमी, ताज आर्ट गॅलरी येथे त्यांच्या चित्रांची प्रदर्शने झाली. अनेक प्रथितयश साहित्यिकांच्या पुस्तकांची मुखपृष्ठे, मांडणी व सजावट त्यांनी केली आहे. सुप्रसिध्द लेखक व भूगर्भशास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र गोपाळ दीक्षित ऊर्फ प्रकाश संत हे लेखणीइतकाच ब्रशही सफाईने चालवत. आज त्यांची सुमारे शंभर निसर्गचित्रे उपलब्ध आहेत. इ. स. २००४ मध्ये त्यांच्या 'झुंबर' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी या चित्रांचे प्रदर्शन भरले होते. निसर्ग तर त्यांना अतिप्रिय होताच पण त्यातूनही वर्षाकाळातील निसर्ग रंगवण्यास त्यांना फार आवडे. अनेक वेळा ब्रशच्या ऐवजी बोटांचा वापर करून ते हवा तो परिणाम मिळवत. पुढे संधिवातामुळे त्यांना हा छंद सोडावा लागला. प्रकाश संत यांच्या पत्नी डॉ. सुप्रिया व चिरंजीव डॉ. अनिरूध्द हेही तोलामोलाचे चित्रकार आहेत. डॉ. अनिरूध्द हे रेखांवर जास्त भर देतात. आपल्या वडिलांच्या साहित्यकृतीला आपल्या रेखाचित्रांनी सजवण्याचे भाग्य त्यांना लाभले आहे.

आनंद करंबेळकरांना विद्यार्थीदशेपासून चित्रकलेची आवड होती. डी.टी.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर काही वर्षे त्यांनी कलाशिक्षक या नात्याने काम केले. मनस्वी स्वभावाच्या या कलावंताची रेषेवर विलक्षण हुकमत होती. अगदी टोकदार टाकाने ( क्रोकविल) ते चित्र रेखाटत असत. कराडच्या ५१ व्या अ.

भा. मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने त्यांनी जवळ जवळ सर्व प्रथितयश मराठी साहित्यिकांची दर्जेदार रेखाचित्रे तयार केली. जगप्रसिध्द रेखाचित्रकार व्ही. एन. ओके यांना त्यांनी मनोमन गुरूस्थानी मानले आणि पूर्ण ताकदीने कलाकृतींची निर्मिती केली. आपल्या मानलेल्या गुरूच्या बरोबरीने यश व कीर्ती प्राप्त करण्याची पात्रता असलेल्या या प्रतिभावंत कलाकाराच्या काहीशा मनस्वी वृत्तीमुळे ते त्यांना शक्य झाले नाही.

रा. न. कीर्तने या चित्रकाराने कवी विहंगांच्या 'ललित संगीत' या पुस्तकाचे मुखपृष्ठ केले होते. त्यामधील 'ही नाव रिकामी उभी किनाऱ्याला' या कवितेवर हे चित्र आधारित होते.

रंगविश्वात अहोरात्र रंगून गेलेले आणि या माध्यमातून कऱ्हाडचे कलाविश्व समृध्द करणारे म्हणून डी. एम. ऊर्फ दादासाहेब सुतार यांचा उल्लेख करावा लागेल. शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते दोन वर्षे कोल्हापूरच्या कलानिकेतनमध्ये होते. तेथे प्रख्यात चित्रकार रविंद्र मेस्त्रींच्या सहवासात ते आले. त्यानंतर ते मुंबईत आले. मुंबईच्या बांद्रा स्कूल ऑफ आर्टस्मधून त्यांनी पेंटींगचा डिप्लोमा घेतला व मुंबईच्या एका स्टुडिओत सहाय्यक चित्रकार म्हणून कामाला सुरूवात केली. पण मुंबईच्या व्यापारी जगात त्यांच्या कलावंत मनाची उपासमार होऊ लागली व त्यामुळे ते इ. स. १९७६ साली कऱ्हाडला स्थायिक झाले. कऱ्हाडला काम सुरू केल्याबरोबरच त्यांनी तेथील कलावंत व रसिक यांचे लक्ष वेधून घेतले. कलेचे नवे तंत्र व प्रतिभा अवगत असूनही त्यांना ग्राहकांच्या मागणीनुसार पारंपारिकतेशी तडजोड करावी लागली. अडचणीच्या वेळी आर्थिक तडजोड म्हणून गणेशोत्सवकाळातील आराशीचा भाग म्हणून पौराणिक, ऐतिहासिक देखावे रंगवावे लागले. परंतु या कामातही त्यांनी आपले कसब दाखविले. काही काळ त्यांनी छायाचित्रणाचाही व्यवसाय केला. पोर्ट्रेट हा दादासाहेबांचा खास विषय. शंतनूराव व शंकरराव किर्लोस्कर यांच्या त्यांनी काढलेल्या पोर्ट्रेटची खूप वाहवा झाली. आजवर त्यांनी पी. डी. पाटील, प्र. ल. करंबेळकर, डॉ. द. शि. एरम, सुभाषराव जोशी, जयवंतराव भोसले इत्यादींची तैलचित्रे साकारली आहेत. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्यासाठी कऱ्हाडच्या उत्तरालक्ष्मीचे मोठे तैलचित्र तसेच अमेरिकेतील सुहास

काकडे यांच्यासाठी तयार केलेले ६' X १२' आकाराचे शिवाजी महाराजांच्या राज्यारोहणाचे प्रत्ययकारी तैलचित्र यांची अनेकांनी भरभरून प्रशंसा केली आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्रातील निरनिराळ्या प्रसंगांवर भव्य अशी तैलचित्रे निर्माण करण्याचा प्रकल्प त्यांनी हाती घेतला आहे. स्कूल ऑफ क्रिएटिव्ह आर्ट या आपल्या संस्थेमार्फत या कलेची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करतात. त्यांचे दोन्ही चिरंजीव दिगंत व केदार सुतार हे आपल्या वडिलांचा चित्रकलेचा वारसा समर्थपणे सांभाळीत आहेत. दोघांनीही चित्रकलेतल्या पदविका उच्च श्रेणीत संपादन केल्या आहेत व दोघांनीही अनेक स्पर्धांत भाग घेऊन पारितोषिके मिळवली आहेत. त्यापैकी दिगंत सिनेमासृष्टीत असून छायाचित्रकार म्हणून काम करीत आहे तर केदार कलादिग्दर्शक म्हणून वाटचाल करीत आहे. दिगंत सुतार यांचे 'आत्मप्रकाशाकडे( ज्ञानेश्वर ते स्वरूपानंद )' या विषयावरील चित्रपदर्शन ऑगस्ट २००६ मध्ये मुंबईच्या जहांगीर कलादालनात भरले होते.

पांडुरंग हरी देशपांडे ( ए.एम.) हे कलाशिक्षक आहेत. जलरंगातील निसर्गचित्रे साकार करण्यात ते कुशल आहेत. लहानमोठ्या आकारातील त्यांची निसर्गाचित्रे अतिशय आल्हाददायक असून छाया, प्रकाश, रंगाचा संयमपूर्ण उचित वापर, यथार्थता या बाबतीत त्यांची चित्रशैली उत्तम दर्जाची वाटते. ज्ञानेश्वर जयंत्युत्सव मंडळाच्या व्याख्यानमालेसाठी त्यांनी तयार केलेले श्री विठ्ठल व ज्ञानेश्वर यांची चित्रे अतिशय प्रेक्षणीय आहेत.

डी. के. कळेकर यांनी कोणत्याही कलामहाविद्यालयात शास्त्रोक्त शिक्षण घेतले नसले तरी निरीक्षण आणि साधना करून चित्रकार म्हणून नाव कमावले आहे. लहान छायाचित्रावरून मोठी व्यक्तिचित्रे साकारण्याचे कसब त्यांनी आत्मसात केले आहे. कृष्णाबाईच्या उत्सवात वाळवंटात कार्यक्रमासाठी जो मंच उभारला जातो त्यावर कृष्णा कोयना संगमाचे एक अतिशय विलोभनीय दृश्य असलेला पडदा लावण्यात येतो. हा पडदा कळेकर यांनीच रंगवला आहे.

अलीकडच्या दिवाळी अंकात विद्याधर म्हैसकर यांचे अनेक ललित लेख व त्याबरोबरच त्यांनी रेखाटलेली रेखाचित्रे अनेकांनी पाहिली असतील.

विद्याधर म्हैसकरांची रेखाचित्रे लक्ष वेधून घेणारी व प्रत्ययकारी असतात. 'पक्षीगण उठले' व ' रेघांचिये संगे ' ही त्यांची दोन्ही पुस्तके त्यांच्याच रेखाचित्रांनी नटली आहेत. त्यातील 'रेघांचिये संगे' हे पुस्तक तर रेखाचित्र हा विषय घेऊनच तयार केले आहे. रेखाचित्रे रेखाटण्याची त्यांची शैली स्वत:ची अशी वेगळी असून कमीत कमी रेखाटनातून ते हवा तो आशय व्यक्त करतात. शब्दांवर आणि रेखांवर प्रेमाची हुकमत गाजवणारे म्हैसकर हे एक प्रतिभाशाली साहित्यिक चित्रकार आहेत. महादेव साने हे उत्तम व्यंगचित्रे काढतात.

सौ. पुष्पा डी. कुलकर्णी (ए. एम.) याही कलाशिक्षक आहेत. विविध स्पर्धातून त्यांच्या कलाकृतींना पारितोषिके मिळाली आहेत. चित्रकलाविषयक अभिरुची वाढावी म्हणून त्यांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी अनेक शिबिरे आयोजित केली आहेत. चित्रकलाविषयक प्रासंगिक लेखनही त्यांनी केलेले आहे. दिलीप लिमये , किरण बिजुटकर व अस्मिता पोतदार (कुष्टे) हेही कऱ्हाडचे प्रतिभावान चित्रकार आहेत.

**नव्या पिढीतील कलाकार**

बी. एस. पवार विंग येथील कलाशिक्षक. दादासाहेब सुतार यांचे मार्गदर्शन मिळाल्याने प्रगतीला नवी दिशा मिळाली. पवार यांच्या अनेक कलाकृतींना राज्यस्तरीय प्रदर्शनांत व स्पर्धांत पारितोषिकें मिळाली आहेत. आर्ट मास्टर ही पदवी त्यानी राज्यात पहिल्या क्रमांकाने प्राप्त केली आहे. तानाजी अवघडे ( जी. डी. आर्ट) यांच्या चित्रांचे प्रदर्शन नेहरू सेंटर मुंबई येथे भरले होते. श्री यंत्र विषयक त्यांनी केलेली चित्रे देशात व परदेशात खूप गाजली आहेत. अस्लम बादशहा मुल्ला (जी. डी. आर्ट,ए. एम. व डीप. ए. एड.) यांच्या चित्रांची प्रदर्शने कोल्हापूर, सांगली, पुणे येथे भरली होती. मलेशिया व ऑस्ट्रेलिया येथेपर्यंत त्यांच्या कलाकृती पोहोचल्या आहेत. नितीन कुंभार या आगाशिवनगर येथील कलावंताला त्यांच्या आईचे वडील कलामहर्षी गुरूवर्य गणपतराव वडणगेकर यांचे मार्गदर्शन लाभले. नमिता शहा (जैन) यांनी अभिनव कला महाविद्यालय पुणे येथून जी. डी. आर्ट व डीप. ए. एड. या पदविकानंतर एस.एन. डी. टी. विद्यापीठाची एम. ए. (पेंटींग) ही पदवी प्राप्त केली. बालगंधर्व कलादालनात भरलेल्या 'मेक ए विश' या सांघिक चित्र

प्रदर्शनात नमिताच्या पाच चित्रांचा यशस्वी लिलाव झाला. राजस्थान या विषयावरील ४० चित्रांचे लंडनमध्ये नोव्हेंबर २००७ मध्ये प्रदर्शन भरले होते. लंडनमधील भारतीय उपहारगृहांतून तिची ६० चित्रे लावली गेली आहेत. ती सध्या लंडनमध्ये चित्रकार म्हणून कार्यरत असून आदिवासी कला संस्था यांच्या प्रकल्पामध्ये काम करीत आहे. संभाजी कुलकर्णी हेही एक उत्तम कलाकार आहेत. ओंडचा सागर बोंद्रे हा जी. डी. आर्ट झालेला कलाकारही विविध ठिकाणच्या स्पर्धांत भाग घेऊन पुढे येत आहे.

## चित्रकलेसाठी कार्य करणाऱ्या संस्था

कऱ्हाडमधील कलावंत व रसिक यांच्या विचारविनिमयातून १९७७ साली 'कलासंगम' ही संस्था स्थापन झाली. तिचे पहिले अध्यक्ष नाथमामा काळे हे होते तर सचिव वसंतराव श्रोत्री ( फोटोग्राफर) हे होते. त्यांच्यानंतर आता अध्यक्ष दादासाहेब सुतार तर सचिव चंद्रकांत श्रोत्री हे आहेत.

स्थानिक व परिसरातील कलावंतांना त्यांच्या कलाकृती सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळावे व समाजात कलेविषयी जिज्ञासा व रसिकता वाढावी तसेच अनेकांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने 'कलासंगम' ने प्रदर्शने, नामवंत कलाकारांची प्रात्यक्षिके , चित्रप्रदर्शने असे उपक्रम केले गेले. त्यात अरूण दाभोळकर, मुरली लाहोटी, चंद्रकांत मांडरे, भय्यासाहेब ओंकार असे प्रथितयश कलावंत होते.

बी. ए. पवार, अस्लम मुल्ला वगैरे विंगमधील तेरा कलावंतांनी एकत्र येऊन 'केव्हज् आर्टिस्ट ग्रुप ' ही संस्था स्थापन केली. या ग्रुपच्यावतीने राज्यस्तरीय प्रत्यक्ष निसर्गचित्रण स्पर्धेचे आयोजन केले जाते. या चित्रांचे प्रदर्शनही भरवले जाते. विकास शेवाळे (काले), सतीश गायकवाड (कार्वे) हे 'सृजन' शिक्षणसंस्थेतर्फे चित्रकलेचे विनामूल्य शिक्षण देतात.

आता पुण्यात स्थायिक झालेले कऱ्हाडचे शशिकांत पांडुरंग सोनटक्के यांनी संस्कृत वाङ्मयाचा आढावा घेणारे 'आपले संस्कृत वाङ्मय ' (२००५) हे काव्यचित्रप्रदर्शन भरविले होते.

## अक्षरचित्रण

कऱ्हाडमध्ये पूर्वी माधवराव नवाथे हे अक्षरचित्रण करणारे (पेंटर) होते. ते

पुण्याच्या प्रभात फिल्म कंपनीत होते. त्यांचे शिष्य लक्ष्मणराव जकाते हे कऱ्हाडच्या पेंटींग क्षेत्रातील अग्रगण्य नाव होते. याशिवाय अलीकडे एकनाथ पेंटर, विभूते, वसगडेकर, वेदपाठक यांनीही या क्षेत्रात चांगले नाव मिळवले आहे.

**शिल्प**

कऱ्हाड व आजूबाजूच्या भागातील मंदिरे, मशिदी, मनोरे इत्यादी मधील शिल्पे कऱ्हाडचा प्राचीन शिष्यकलेची थोडीफार साक्ष देतात. त्यातूनही हाटकेश्वर, संगमेश्वरसारख्या देवळांचा जीर्णोध्दार झाल्याने मूळ रूपही शोधावे लागते. यामध्येच सैदापूरचे पावकेश्वर मंदिर, वनवासमाचीचे धर्मेश्वर, कृष्णाघाटावरील रत्नेश्वर ही मंदिरे आपली हेमाडपंती कला अजूनही दाखवित आहेत. कराडमधील निमजग्याच्या माळावरील शिलाहारांनी बांधलेले महालक्ष्मी मंदिर आज उपलब्ध नसले तरी 'कऱ्हाड महात्म्या'च्या काही श्लोकांवरून व त्यामधील एक देवता उत्तरालक्ष्मी हिच्या गुणावरून या मंदिराच्या शिल्पसमृध्दीची कल्पना येऊ शकते. तसेच कऱ्हाडमध्ये जरी अनेक प्राचीन मशिदी व दर्गे असले तरी गुरुवारपेठमधील जामा मशिद व तिच्याशेजारील दोन मनोरे हे तत्कालीन मुस्लिम शिल्पकलेची कल्पना देऊ शकतात. लहान शिल्पाच्या बाबतीत सांगायचे झाले तर कऱ्हाडमध्ये अनेक वीरगळ, निरनिराळ्या मूर्ती, तोरण खंडे सापडली आहेत. अलीकडेच कोटाखालच्या गणपतीचे शेंदूर कवच गळून पडल्यामुळे आतील एक प्राचीन नितांत सुंदर अशी बालगणेशाची मूर्ती प्रकट झाली आहे. या मूर्तीचा पाषाणदेखील एक विशिष्ट हिरव्या रंगाचा आहे. याशिवाय कृष्णाबाई मंदिरासमोरील काशीविश्वेश्वर या मंदिरातला दारावरील शिल्प, पिंड ही देखील दखल घेण्यासारखी आहेत. कृष्णा नदीच्या किनाऱ्यावर जर उत्खनन झाले तर अशी अनेक शिल्पे सापडण्याची शक्यता आहे.

## कऱ्हाडमधील काही कलापूर्ण मूर्ती

१. उत्तरालक्ष्मी – दशभुजा असलेली ही मूर्ती काळ्या पाषणातील असून त्रिभंगी व विषमतोलात घडविली आहे. शिल्पशास्त्रात निरनिराळ्या देवतांच्या मूर्ती कशा घडवाव्यात हे सांगितले आहे. त्याबरहुकूम ही मूर्ती आहे. अतिशय सुबक असे घडीव काम आहे. या मूर्तीचा काल साधारणत: १२ व्या शतकातला आहे.

२. नरसिंह – सोमवार पेठेतील नरसिंहाच्या देवळातील ही मूर्तीदेखील अतिशय देखणी आहे. ही पण काळ्या पाषाणातील असून तिचा कलाप्रकार हा उत्तरालक्ष्मीसारखाच असावा.

३. व्यंकटेश मूर्ती – सोमवार पेठ – ही मूर्ती तांबूस रंगाच्या पाषाणातील असून समतोलातील ही मूर्ती विविध अलंकारांनी युक्त व तिच्यावर अतिशय सुरेख असे घडीव काम केले आहे.

४. कालिकादेवी – कासार गल्लीतील कासार समाजाने बांधलेल्या कालिका मंदिरात ही मूर्ती बसवली आहे. या मूर्तीच्या पाषणास अम्री स्टोन असे म्हणतात. दगडामध्ये सुध्दा नर व मादी असे प्रकार असतात. नर प्रकारच्या दगडात पुरूषाची तर मादी प्रकारात स्त्रीप्रतिमा घडवली जाते. साहजिकच याही मूर्तीचा दगड मादी प्रकारचा आहे. चेन्नईमधील जागतिक कीर्तीचे शिल्पकार व स्थपती एस. एम. मुथ्थय्या यांनी ही मूर्ती घडविली आहे.

५. केदारेश्वर – शुक्रवार पेठेतील विजय धर्माधिकारी  यांच्या घरातील मंदिरात ही मूर्ती आहे. मूर्ती चतुर्भुज असून चार हातांमध्ये अनुक्रमे खड्ग, त्रिशूल, पद्म व अमृतपात्र आहे. ही मूर्तीही काळ्या पाषाणातील असून विविध अलंकारांनी युक्त अशी आहे. या देवतेला श्री ज्योतिर्लिंग, श्री रवळनाथ या नावानी संबोधले जाते.

६. शुक्रवार वेताळ मारूती – अगदी अलीकडेच शुक्रवार पेठेतील सात शहीद मंडळाने अकरा फुटी मारूतीची स्थापना केली आहे. ( १९९५)

कऱ्हाडमधील काही चित्रकारांचा हात शिल्पकलेतही चाललेला दिसतो. विठोबा अण्णांचा व आर. व्ही. कापरे यांचा उल्लेख वर आलाच आहे. नाथमामा काळे शिल्पकलेतही रस घेत. ज्ञानेश्वरी जयंत्युत्सव मंडळासाठी श्री ज्ञानेश्वरांची मूर्ती ही नाथमामांनी तयार केली आहे. कुंभारवाड्यातील मूर्तिकारांना ते छायाप्रकाश, रंगसंगती याबद्दल मार्गदर्शनही करत. अलीकडे चित्रकार विद्याधर म्हैसकर हे देखील शिल्पकलेकडे वळले आहेत. राम दीक्षित हे काही वर्षापूर्वी कऱ्हाड येथे राहत होते. त्या काळात मिळतील ती कामे करणारे दीक्षित हे कसबी शिल्पकार होते. संगम पेट्रोल पंपासमोरील सरस्वती हॉटेलच्या प्रवेशद्वारात दिसणारी प्रसन्न सरस्वतीची मूर्ती पाहिल्यावर राम दीक्षितांच्या शिल्प कौशल्याची प्रचिती येते. तेल्यांच्या गणपती मंदिराच्या गणेशोत्सवात कृष्णा मुंढेकर हे

कागद, भुस्सा, चिंचोक्याची खळ वापरून लहान मोठ्या चित्तवेधक मूर्ती करत. दुर्दैवाने ६ जून १९७६ रोजी आलेल्या कृष्णेच्या महापुरात ही चित्रे वाहून गेली. कऱ्हाडचे बहुआयामी रामभाऊ पटवर्धन हे ही मूर्ती तयार करीत असत. म. गांधींचा एक सिमेंट पुतळा मंडईच्या कोपऱ्यात पूर्वी बसवला होता. तो कऱ्हाडच्याच परदेशी नावाच्या गृहस्थानी तयार केला होता. कुंभारवाड्यातील नथू ऊर्फ दादा कुंभार हे श्रींच्या मूर्तीसाठी प्रसिध्द होते. त्यांना नाथमामा काळे मार्गदर्शन करीत. जी. ए. नाईक हे मंदिरांच्या शिखराचे काम करीत. कऱ्हाड व परिसरातील अनेक मंदिरांच्या शिखरांचे सुबक बांधकाम त्यांनी केलेले आहे. अच्युत कुलकर्णी (वाटेगावकर) बैलजोड्या, शेतीची अवजारे, फळफळावळ, मिठाई इ. वस्तू पाहणाराला अस्सल वाटाव्यात अशा पण लाकडातून बनवितात.

### छायाचित्रकार

कऱ्हाडमधील अगदी पहिल्या पिढीतील छायाचित्रकार (Photographer) म्हणून गणेश विनायक फडके यांचा उल्लेख करावा लागेल. त्यानंतर गोवारीकर हे एक छायाचित्रकार होते. पण नंतर ते कोल्हापूरला गेले. एस. टी. तोडकर हे एक व्यावसायिक छायाचित्रकार होते. त्यानंतर कमलाकर फडके व वसंतराव श्रोत्री या दोघांनीही आपल्या क्षेत्रात खूप लौकिक मिळवला. वसंतराव श्रोत्री अनेक वेळा मोठ्या कलात्मक पध्दतीने छायाचित्रण करीत.

इ. स. १९३० च्या सुमारास कराडात व्ही. ए. किरपेकर हे संगीताप्रमाणेच हौशी छायाचित्रणासाठी पण प्रसिध्द होते. 'सकाळ'च्या मासिक फोटो स्पर्धेत त्यांनी अनेक वेळा बक्षिसे मिळविली होती. या फोटोंना दिलेली शीर्षकेदेखील काव्यपूर्ण असत.

रांगोळी या प्रकारात गेल्या पिढीतील कलावंत म्हणून म्हणून सदाशिव वळिवडेकर यांचे नाव घ्यावे लागेल. रांगोळीत काढलेले त्यांचे गालीचे उत्कृष्ट असत. अलीकडे 'संस्कार भारती'या संघटनेतर्फे देखील निरनिराळ्या प्रसंगाच्या निमित्ताने भव्य प्रमाणात रांगोळ्या काढल्या जातात.

### कला समीक्षा

साहित्य संगीत चित्रकला आदींशी निकटचे नाते असणाऱ्या वासंती

मुझुमदार यांचे' पं. कुमार गंधर्व व त्यांचे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतावरील विचार' हे पुस्तक प्रसिद्ध असून मुंबई 'दूरदर्शन'साठी त्यांनी कुमार गंधर्व यांच्यावर माहितीपटही तयार केला आहे. साहित्य , संगीत व अभिजित कला या क्षेत्रांत महनीय कार्य करणाऱ्या पेंटर शिरूर, एन. एस. बेंद्रे इ. व्यक्तींच्या मुलाखती त्यानी 'दूरदर्शन'च्या 'प्रतिभा – प्रतिमा' या कार्यक्रमात सादर केल्या आहेत.

**सोयी, सुविधा**

आजकाल चित्रकलेचे शिक्षण बहुतेक शाळांमधून मिळते. पण कऱ्हाडमध्ये चित्रकलेच्या शिक्षणासाठी विवेकानंद संस्थेचे विवेकानंद चित्रकला महाविद्यालय असून तेथे जी. डी. आर्ट या पदविकेचे शिक्षण दिले जाते.

कऱ्हाडमध्ये यशवंतराव चव्हाण स्मृतिसदनात कलादालनाची सोय असली तरी प्रदर्शनासाठी असलेल्या आवश्यक सुविधांचा पूर्ण अभाव आहे. ही उणीव दूर होणे आवश्यक आहे.

*****

१४

# क्रीडा क्षेत्र

सर्वसामान्यपणे महाराष्ट्रातील इतर गावांप्रमाणेच कऱ्हाडमध्येही नेहमीचेच देशी खेळ म्हणजे कुस्ती, हुतूतू, आट्यापाट्या, विटीदांडू, खो-खो, लंगडी, लगोऱ्या, सूरपारंब्या इ. पुरूषांचे आणि सागरगोटे, फुगड्या, झिम्मा, गोफ इ. स्त्रियांचे खेळ खेळले जात. बुध्दिबळ, गंजिफा इ. बैठे खेळ खेळले जात. कऱ्हाडात मैदानी खेळांसाठी इदग्याचे मैदान किंवा कृष्णाकाठचे वाळवंट असे. रामदास स्वामींनी प्रयत्नपूर्वक गावोगावी कुस्तीचे आखाडे सुरू केले. त्यातूनच कऱ्हाडातील तालमींचा उगम झाला असावा. तथापि क्रिकेट, बॅडमिंटन, टेनिस, कॅरम इ.विदेशी खेळांचा प्रसार आणि वेगवेगळ्या क्रीडाप्रकारांना स्पर्धांचे स्वरूप, क्रीडाप्रकारांचे सामने, संघटना इ. गोष्टी इंग्रजी राज्य आल्यावर आणि विशेषत: शाळा महाविद्यालयांमधून खेळांना प्रोत्साहन मिळू लागल्यावर आल्या असाव्यात.

कऱ्हाडात कुस्तीची परंपरा फार जुनी आहे. कृष्णेच्या वाळवंटात वीर मारूतीचे देऊळ उभारणारे राघोपंत आपटे, त्यांचे मित्र बलदंड कुस्तीगीर होते. हसन मुजावर यांनी १८९७ मध्ये दुष्काळाच्या काळात गरीब लोकांना धान्य मिळावे, यासाठी कऱ्हाडचा बाजार लुटवला. हसनसाहेब आणि त्यांचे सहकारी वामन खेर, तात्या माने, भाऊ म्होप्रेकर, सिलेमान आवटे, कोंडी काटकर, रामू भापकर हे सर्वजण तांबट तालमीत तयार झालेले कुस्तीगीर होते. पुढील काळात येसू गोविंद पाचुंदकर, तुकाराम विठ्ठल पत्की, बजरंग विठू पाटील, मारुती तात्या माने, गणपतराव तांबट यांची नावे घेतली जात. ऑलिम्पिक विजेते खाशाबा जाधव आणि मारुती वडार ही याच तालमीची देणगी आहे.

१७७५ मध्ये उमराणी यांनी शिखराखाली तालीम असलेले त्र्यंबकेश्वराचे देवालय बांधले ही कऱ्हाडातील सर्वात जुनी तालीम असावी. भोई तालीम १८९० सुरू झाली. या तालमीतील पैलवानांना कोल्हापूरच्या महाराजांनी प्रोत्साहन दिले होते. बाबुराव वास्के, ईश्वरा मुळे, बटू शिंदे, हरूभाई बागवान, दगडू मगरे, तातोबा खैरमोडे, गजानन मुळे, गणपत चव्हाण, महंमद तांबोळी, किसन शिंदे, मनोहर तेली, दत्तू वास्के इ. पैलवान या तालमीत तयार झाले. १९२३ साली शुक्रवार पेठेत सुरू झालेल्या सात सईद तालमीचे वस्ताद रामचंद्र ज्योती नलवडे आणि यासीन बाबा पटेल, राजाराम भोसले, भिकू शेलार, अंतू शिंगण, बाळू भोपते, मीरा माळी, सीताराम सातुरे इ. पैलवानांची परंपरा आहे. रामकृष्ण नरसिंह काळे सावकार हे कुस्तीचे शौकीन. त्यांनी सोमवार पेठेत काळे व्यायामशाळा बांधली. येसू गोविंदा पाचुंदकर, बाबुराव अष्टेकर, नारायणराव पोतनीस, राजाभाऊ गुमास्ते, बाबुराव काळे, रामराव रेठरेकर हे कुस्तीगीर येथे तयार झाले. गुरुवार पेठेत मुख्य मशिदीलगत आझाद हिंद आखाडा होता. बाबुराव वास्के या वस्तादांचे मार्गदर्शन या आखाड्यास होते. शामराव मुळीक, गुलाबभाई बागवान, आनंदा शिरगावकर, राघू बनपुरीकर, महिबूब बागवान असे पराक्रमी वीर या तालमीचेच. शामराव मुळीक यांचे नाव महाराष्ट्रभर झाले होते. त्यांना हिंदकेसरी पुरस्कार मिळाला होता.

वर उल्लेख झालेल्या कुस्तीगीरांखेरीज मारूती कापूरकर,दिनकर रामजी पाटील, गणपतराव बळवंतराव चव्हाण, दादू ज्ञानू जाधव, गंगारामबापू गुजर, शंकर तांबवेकर, यशवंतराव पार्लेकर, पी. डी. पाटील, दाजी माळी, आनंदा शिरगावकर, वसंत नरसू डुबल, हिंदुराव केसू जाधव, गजाभाऊ पेंढारकर इ.नावे कुस्तीच्या क्षेत्रात घेतली जातात. जागतिक नकाशावर कऱ्हाडचे नाव कुस्तीच्या निमित्ताने नेले ते खाशाबा जाधव आणि मारूती वडार यांनी.

गोळेश्वरचे खाशाबा जाधव हे कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलचे विद्यार्थी. तेथे गुंडोपंत बेलापुरे यांच्याकडून कुस्तीचे शास्त्रीय शिक्षण

मिळाले. महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथे घेत असतानाच १९४८ मध्ये लखनौच्या राष्ट्रीय स्पर्धेत फ्लायवेट गटात प्रथम क्रमांक मिळवून ते महाराष्ट्रातील पहिले राष्ट्रीय विजेते ठरले. कोल्हापूर येथे त्यांना गो. ना. पुरंदरे यांचे मार्गदर्शन लाभले. १९४८ मध्येच लंडन येथे खाशाबा जाधव ऑलिम्पिक स्पर्धेसाठी गेले. दोन फेऱ्यांत ऑस्ट्रेलिया व अमेरिकेच्या कुस्तीगीरांना त्यांनी जिंकले होते. तिसऱ्या फेरीत इराणी पैलवानाशी लढत असताना वेळ संपल्याचे जाहीर होऊन इराणी पैलवानास विजयी ठरविण्यात आले. १९५२ च्या फिनलंड – हेलिसिंकी येथील ऑलिम्पिकमध्ये खाशाबा यांनी सात कुस्त्या केल्या. बॅटमवेट गटात त्यांनी कास्यपदक संपादन केले. ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक सुयश संपादन करणारे खाशाबा जाधव हे भारताचे एकमेव खेळाडू होते.

कऱ्हाडजवळील पार्ले येथील मारूती वडार यांनी प्रथम आझाद हिंद आखाड्यात कुस्तीचे धडे घेतले. पुढे कोल्हापूरच्या मोतीबाग तालमीत त्यांचे शिक्षण झाले आणि सरावही झाला. पाकिस्तानचा भिल्ला पंजाबी, मारूती माने, बुडन चार्ली तसेच पाकिस्तानचा बाळा रथिक यांच्याशी लढत करून त्यांना चितपट केले. त्यांचा लौकिक ऐकून इंग्लंडच्या स्पोर्टस् असोसिएशनने त्यांना इंग्लंडमध्ये बोलावून घेतले. तेथे त्यांनी दोन वर्षांत अनेक प्रेक्षणीय कुस्त्या केल्या.

जन्माने कऱ्हाडकर असलेले गणेश सखाराम वझे (१८६२ – १९२९) पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वझेमास्तर म्हणून प्रसिध्द होते. जुन्या तऱ्हेचे कुस्तीचे हौदे आरोग्यदृष्ट्या सदोष म्हणून पुणे येथे कबूतरखान्यात पहिला नमुनेदार आखाडा त्यांनी तयार केला. 'वज्रांग नियुद्ध शिक्षा' हे कुस्तीवरील पुस्तक त्यांनी लिहिले आहे. त्यांनी १८८६ मध्ये पुण्यात 'अच्युतानंद व्यायामशाळा' (वझे व्यायामशाळा) सुरू केली.

कऱ्हाडात आणि परिसरातील गावांतूनही पूर्वी घरटी एक तरी पैलवान असे.गावोगाव तालमीही असत. विशेषत: किवळ, जिंती, मनव, वाघेरी, ओंड,अटके, रेठरे बु. इ. ठिकाणी व्यायामशाळाही होत्या. जिंतीचे नथुराम चव्हाण आणि पंजाबराव पाटिल, काल्याचे बळवंतराव देसाई (बाळू पैलवान),

कोपर्डे हवेलीचे जालिंदर शिवाजी चव्हाण, शेवाळवाडीचे प्रदीप मारूती शेवाळे, ओंडचे आप्पा नलवडे, मनवचे दगडू आबा करमरकर, कासारशिरंबे येथील वसंतराव मारूती कळसे, अटक्याचे संजय पाटील यांनी कुस्तीच्या क्षेत्रात मुंबई महापौर केसरी, महाराष्ट्र केसरी तर कालवड्याचे दादासाहेब थोरात यांनी उपमहाराष्ट्र केसरी हे किताब मिळविले.

इंग्रजी काळातील शिक्षण पध्दती सुरू होण्यापूर्वी निरनिराळ्या क्रीडाप्रकारांसाठी संघटना नव्हत्या. सुविधाही नव्हत्या. विशेषत: माध्यमिक शाळा सुरू झाल्यावर त्यातील काही उत्साही शिक्षकांनी पुढाकार घेऊन शालेय कर्तव्यापलीकडे जाऊन खेळाडू घडविण्यास सुरूवात केली. टिळक हायस्कूलच्या पहिल्या पिढीतील प्र. श्री. ऊर्फ आबासाहेब शेणोलीकरांचे नाव या दृष्टीने अजूनही निघते. त्यांच्याच तालमीत तयार झालेल्या सदुभाऊ पेंढारकर यांना पुण्यात एस. पी. कॉलेजच्या महाविद्यालयीन क्रिकेट संघाचे नेतृत्व करून यश संपादण्याची संधी मिळाली. शिवरामपंत उमराणी, आर. पी. कुलकर्णी, गुंडोपंत बेलापुरे, दत्तोपंत सूर्यवंशी, बाबूराव वळवडे, इंदुताई बेलापुरे इ. शिक्षकांनी कऱ्हाडच्या युवाशक्तीला खेळण्यासाठी प्रवृत्त केले. शामराव शहाणे यांनी टिळक हायस्कूलच्या मैदानावर क्रिकेट बरोबरच हॉकी, फूटबॉल, बॉस्केटबॉल यांची क्रीडांगणे आखून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन विदेशी खेळांचीही गोडी लावली. पुढील काळात महाविद्यालये सुरू झाली. सरकारने क्रीडाक्षेत्राला उत्तेजन देण्यासाठी विविध स्पर्धाही सुरू केल्या. त्याचा उपयोग खेळासाठी पोषक वातावरणनिर्मितीस झाला.

कऱ्हाडात स्वातंत्र्यपूर्व काळात खेळांचे व व्यायाम प्रकारांचे शिक्षण शाळांच्या बाहेर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्रसेवादल, राष्ट्र सेविका समिती यांच्या शाखांतून दिले जाई. कृष्णराव सरडे यांनी १९३०-३१ च्या सुमारास कऱ्हाडात दोन तीन ठिकाणी लाठीकाठी, दांडपट्टा, भालाफेक, जंबिया, फरीगदगा यांचे वर्ग चालविले होते. या वर्गात तत्कालीन वयस्क मंडळीही भाग घेत. मसूराश्रमाच्या काही शिष्यांनी सूर्यनमस्कारादी व्यायामाचे वर्ग कऱ्हाडात काही काळ घेतले. शाहीर नानिवडेकर यांचे

वास्तव्य १९५० च्या सुमारास कराडात होते. त्या काळात ते दांडपट्टा, लाठीकाठी इ. चे शिक्षण तरूण वर्गास देत. स्त्रियांसाठी लाठीकाठीचे शिक्षण इंदिराबाई दिवेकर, सुलोचनाबाई गोखले यांनी कोटातील पेंढारकर वाड्यात दिले.

नदीकाठी असलेल्या गावातील तरुणांना पोहण्याचा छंद आपोआप लागतोच. याला कऱ्हाड कसे अपवाद असेल ? पण या छंदातही प्रावीण्य संपादन करून विशेषत: महापुरात कोयनेच्या पुलावरून उडी टाकून कृष्णेच्या पुलापर्यंत पोहणारे पट्टीची मंडळी प्रसिद्ध आहेत. त्यापैकी नारायणराव पोतनीस, गुंडोपंत बेलापुरे, लक्ष्मणराव कासेगावकर (धन्वन्तरी), नामदेवराव धोपाटे, तुकाराम दळवी अशी काही नावे सांगता येतील. पोहण्यासाठी आता संगम हेल्थ क्लबमध्ये पोहण्याचा तलाव आणि त्याचे तंत्रशुद्ध शिक्षण देण्याचीही सोय आहे. नदीकाठच्या गावांना महापुराचा उपद्रव होतो. त्यावेळी या पोहणाऱ्या मंडळींचे खूपच सहाय्य होते. २००५ व २००६ मध्ये झालेल्या महापुरावेळी अल्टिमेट ॲडव्हेंचर संस्थेची खूपच मदत झाली. २००६ साली माधव काळे, सुरेश पवार, मुरली वत्स, क्षितिज बेलापुरे, गौतम करपे यांनी कोयना धरणाच्या सांडव्यापासून कऱ्हाडच्या प्रीतिसंगमापर्यंत १२० कि.मी. हवेवरील बोटीतून साहसी व चित्तथरारक नौकाप्रवास अवघ्या साडे आठ तासांत केला. कऱ्हाड येथे शालेय राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी (१०० व २०० मी बॅकस्ट्रोक) महाराष्ट्राच्या संघात कऱ्हाडच्या अनुजा अरुण डोईफोडेची निवड झाली.

दत्तोपंत जोगळेकर, जगन्नाथराव केळकर, गणपतराव आळतेकर, वामनराव फडके, भाऊसाहेब देशपांडे, आप्पासाहेब सखदेव या वकील मंडळींनी पुढाकार घेऊन १९२५ मध्ये कऱ्हाडात 'सोशल क्लब' सुरू केला. सुरूवातीस कॅरम, ब्रीज, बुध्दिबळ असे बैठे खेळ खेळले जात. पुढे टेनिस, बॅडमिंटन आणि क्रिकेट हे खेळही सुरू झाले. १९३७ मध्ये मंगळवार पेठेत टिळक हायस्कूलजवळ क्लबची स्वत:ची वास्तूही झाली. तेथे दोन टेनिस कोर्टही करून घेण्यात आली. १९५५ नंतर काही काळ या क्लबच्या कार्याला काहीशी मरगळ आली होती. १९६८ मध्ये शंकरराव करंबेळकर व नंतर राजाभाऊ कोटणीस यांनी सोशल क्लबचे

नेतृत्व करून त्याचा कायापालट करून चैतन्य निर्माण केले. क्लबच्या जुन्या इमारतीलगतच बॅडमिंटनसाठी वुडन कोर्ट असलेला ६५' X ४०' आकाराचा व २६ फूट उंचीचा हॉल त्यांच्याच काळात झाला. महाराष्ट्र वि. बडोदा, महाराष्ट्र वि. राजस्थान, या रणजी ट्रॉफी मॅचेस, बाळू गुप्ते बेनिफिट मॅच (१९८१) हे सामने कऱ्हाडात भरविण्यात सोशल क्लबचा पुढाकार होता. सोशल क्लबतर्फे दर वर्षी राजाभाऊ कोटणीस स्मृतिप्रित्यर्थ बॅडमिंटन व टेबल टेनिस स्पर्धा होतात. २००१ मध्ये सोशल क्लबमध्ये महिलांसाठी स्वतंत्र जिमची सोय करण्यात आली. सोशल क्लबच्या कार्यासाठी विस्तारास सहाय्य करण्याचा दृष्टीने प्रवीण लांजेकर, श्याम कोटणीस, मोहन घळसासी, भाऊ कुडाळकर, जगदीश टोणपे, कुमार तांबवेकर, भय्या विंगकर, रमेश विंगकर, बाळ उमराणी, सुभाष टोणपे, यांनी १९७१ मध्ये 'सोशल क्लब मित्रमंडळ' स्थापन केले होते.

कऱ्हाडात मारुती उपासक मंडळ दरवर्षी हनुमान जयंतीच्या निमित्ताने व्यायामाच्या स्पर्धा घेई. त्यातूनच हुतूतू, आट्यापाट्या, कुस्त्या इ. मैदानी – मर्दानी खेळांचे सामने मोठ्या प्रमाणात भरविण्याचा उपक्रम सुरू करण्यासाठी हनुमान मंडळाची स्थापना १९४० मध्ये झाली. डॉ. डी. जी. देशपांडे, दत्तोपंत सूर्यवंशी, बाबुराव वळवडे, गुंडोपंत बेलापुरे, शिवरामपंत उमराणी, आर. पी. कुलकर्णी, वासुदेवराव घळसासी, बाबुराव अष्टेकर, वसंतराव वराडकर, गजाननराव उमराणी, रामबिलास लाहोटी यांच्या सहभागाने १९४६ पर्यंत कऱ्हाडात सामने भरविले गेले. त्यांना महाराष्ट्रातील विविध क्रीडा संघाचा प्रतिसादही उत्तम मिळाला. तसेच अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाची शाखाही कऱ्हाडात सुरू झाली.त्यामुळे प्रतिवर्षीच्या सामन्यात सुसूत्रता आली.

१९४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या तरुणांतील देशप्रेम, सेवावृत्ती, चिकाटी आणि खिलाडूपणा वाढीस लावण्याच्या हेतूने माधवराव जाधव आणि कासेगावकर वैद्य (धन्वन्तरी) यांनी पुढाकार घेऊन ९ ऑगस्ट १९४३ रोजी नडशी ता. कऱ्हाड येथे हुतूतूचे

सामने भरविण्यास सुरुवात केली होती. १९४६ ते १९४८ फक्त हुतूतूचे सामने घेत. पुढे लंगडी, आट्यापाट्या, खो-खो, मल्लखांब, कुस्ती, पोहणे अशा सांघिक व वैयक्तिक खेळांच्या स्पर्धाही त्यांनी सुरू केल्या आणि १९४९ मध्ये या सामन्यांसाठी 'मैदानी मर्दानी सामना समिती' अशी संस्था स्थापन केली. या समितीतर्फे प्रतिवर्षी डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात टिळक हायस्कूलच्या मैदानावर सामने होऊ लागले. हे सामने अखिल महाराष्ट्रातील नामवंत क्रीडासंघांचे आणि खेळाडूंचे आकर्षण ठरले. विविध प्रकारच्या उड्या, फेकण्याचे निरनिराळे प्रकार, धावणे, नेमबाजी, नमस्कार, योगासने, कसरती, कॅरम, पतंग उडविणे, कबुतरे उडविणे, बुध्दिबळ, ब्रीज, लोकनृत्य, लेझीम अशा सांघिक, वैयक्तिक खेळांची नंतर भर पडत गेली. सामने भरविण्याबरोबर विविध क्रीडा प्रकारांसाठी पंच तयार करण्यासाठी प्रशिक्षण देण्याचा उपक्रमही सामना समितीने केला. अलीकडे हे सामने बंद झाले आहेत.

'मैदानी मर्दानी सामना समिती' पूर्वीच्या हनुमान मंडळाच्या कार्याचेच विकसित रूप असल्यामुळे त्या मंडळाचे कार्यकर्ते सामना समितीत होतेच त्याशिवाय गौरीहरअप्पा सिंहासने, वसंतराव घोलकर, शामराव शहाणे, मधुकरराव पेंढारकर, मुरलीधर काळे, बाबा पाटील, राम शेडबाळकर, एन. बी. डिग्रजकर, पिसाळ गुरूजी, शंकरराव संसुद्दी, उस्मान बागवान, एस. एस. पाटील, बाळ भुर्के, धोंडीराम महामुनी, दत्ता नारकर इ. क्रीडाप्रेमी कार्यकर्त्यांची जोड या समितीस मिळाली. शामसुंदर अष्टेकर, ज्ञानबा जाधव, राम रेपाळ, दत्ता आचार्य हे सामना समितीचे १९५६ पासून अनेक वर्षे कार्यवाह होते. शामराव अष्टेकर हे कार्यकुशल संघटक होते. पुढे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाल्यावर त्यांच्याकडे क्रीडाखात्याचा भार होता, तो समर्थपणे पार पाडला तो सामना समितीतील त्यांच्या अनुभवाच्या बळावरच.

१९३७ मध्ये स्थापन झालेल्या 'नवजवान क्रीडा मंडळा'ने हुतूतू, कुस्ती या खेळांसाठी आपले संघ तयार केले. त्यासाठी दिनकरराव मुळीक, खाशाबा जाधव, शंकरराव जिरंगे यांनी मेहनत

घेतली. यशवंत कोंडिबा मुळे, राजाराम शिंदे, आकाराम वंजारी, बाबुराव गायकवाड, गणपतराव चव्हाण, महादेव सावंत, नामदेव पाडळे, प्रभाकर मुळे हे या मंडळाचे नामवंत खेळाडू होत. मंगळवार पेठेतील राष्ट्रसेवादलाच्या किसान शाखेतील युवकांनी खाशाबा दाजी शिंदे यांच्या पुढाकाराने सुरू केलेले किसान मंडळ (स्थापना १९४४-४५), शहर पातळीवर कबड्डी स्पर्धा घेणारे 'कमानी मारूती मंडळ' ( स्थापना १९५४), दत्तात्रय बापूसाहेब मोरे, सुरेश केशवराव घाडगे यांनी स्थापलेले 'श्रीराम मंडळ '( स्थापना १९५४), पी. व्ही. बोडके, एस. के. देसाई यांनी सुरू केलेले 'उदय कला मंडळ' ( स्थापना १९५७), वसंतराव माने यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले पुरोगामी तरूण मंडळ, व्हॉलीबाल व कबड्डी या देशी-विदेशी खेळांसाठी जिजाबा शिंदे यांनी स्थापन केलेले अजंठा क्रीडामंडळ, शेती व्यवसायात गुंतलेल्या युवकांनी सुरू केलेले 'वंदेमातरम् क्रीडा मंडळ' अशी क्रीडामंडळे कऱ्हाडात काही काळ कार्यरत होती.

क्रिकेट, व्हॉलीबॉल, हॉकी या विदेशी खेळांसाठी शामराव अष्टेकर, बाबा पाटील, शाळगावकर बंधू, अशोक देशपांडे, फडके बंधू, सुधाकर आचार्य, काका माने यांनी १९५८ मध्ये 'कराड स्पोर्टस् असोसिएशन' स्थापन केली. शाळगावकर बंधू, बाबा पाटील हे या संस्थेचे गाजलेले क्रिकेटपटू होते. या असोसिएशनने कबड्डी, खो-खो यासाठीही संघ तयार केले.

कऱ्हाडात पूर्वी 'जॉली क्लब' ही एक संस्था होती. मारूती निवृत्ती लादे, मारूती सदू माने, नारायण विष्णू थोरवडे, अशोक सीताराम सोनावले यांनी 'जॉली क्लब'चे पुनरुज्जीवन 'जॉली क्रीडा मंडळ' नावाने १ नोव्हेंबर १९६७ रोजी केले. गोविंदराव नातू यांच्या प्रेरणेने रजनीकांत रमणलाल शहा यांनी 'जयविजय क्रिकेट क्लब'ची स्थापना केली होती. 'शाहीन क्रिकेट क्लब' १९७२ पासून क्रिकेटचे सामने भरवित असतो.

खेळाच्या विकासासाठी एका खेळासाठी एक संस्था या भारत

सरकारने मान्य केलेल्या तत्त्वानुसार ४ डिसेंबर १९६० रोजी ‘सातारा जिल्हा कबड्डी असोसिएशन’, ‘सातारा जिल्हा खोखो असोसिएशन’ या संस्थांची कार्यालये कऱ्हाडात सुरू झाली. त्यानंतर ‘सातारा जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन’, ‘ सातारा जिल्हा अमॅच्युअर ॲथलेटिक असोसिएशन’ या संस्थाही कऱ्हाडात सुरू झाल्या.

कऱ्हाडातील ‘ताजमहाल टीम’, ‘आझाद मंडळ’, ‘बाल मजदूर मंडळ’, ‘एन. व्ही. क्रिकेट क्लब’ या संस्थांच्या उस्मान बागवान, ज्ञानाबा जाधव, राम रेपाळ, शंकराप्पा संसुद्दी या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन १९५४ मध्ये ‘लिबर्टी मजदूर मंडळा’ची मुहूर्तमेढ रोवली. कऱ्हाडास झालेल्या मैदानी मर्दानी सामना समितीच्या स्पर्धात कबड्डीमध्ये ९० पौंडाखालील गटात १९५४ पासून सलग तीन वर्षे प्रथम क्रमांकाची ढाल मिळविल्यावर उत्साहाने १९५७ मध्ये मंडळाला घटनात्मक स्वरूप दिले गेले. महाराष्ट्रातील ठिकठिकाणच्या स्पर्धात सहभागी होऊन उदंड यश मिळविणाऱ्या संस्थेला सरावासाठी प्रथम सध्याच्या नगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या जागेत असलेल्या हौदडीत, कासमभाई बोर्डिंगमध्ये, शिवाजी हौसिंग सोसायटीतील रिकाम्या प्लॉटवर, सध्याच्या स्टेडियमच्या जागी, मंगळवारातील गणपतीच्या परड्यात अशा वेगवेगळ्या जागा बदलाव्या लागल्या. मंडळाने मिळविलेल्या लौकिकामुळे सध्या वेणुताई चव्हाण स्मारकालगतची जागा नगरपरिषदेकडून मंडळास कायमस्वरूपी प्राप्त झाली.

कबड्डीच्या खेळात ‘ निदान रेषा बंद ’( नो क्रॉस) चा प्रयोग ‘लिबर्टी मजदूर मंडळा’च्या खेळाडूंनी प्रथम करून खेळात जिवंतपणा आणला. या उपक्रमात बाळक रेपाळ, उस्मान बागवान, मानसिंग पाटील, बशीर रजमान इनामदार, धोंडीराम भोसले, वसंत सोनावले, रमणिक गुजर, सुहास धोंडीराम डोळ, शंकर भाऊ बर्गे, नूरमहंमद मोमीन, विठ्ठल निवृत्ती पाटील इ. नी शर्थीचे प्रयत्न केले. ‘लिबर्टी’च्या कबड्डी संघात शशिकांत शामराव पाटील, सत्यनारायण मिणियार, लक्ष्मण सीताराम पाटील यांच्याबरोबरच १९६२ मध्ये राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपदाच्या सामन्यात

महाराष्ट्राचे नेतृत्व करणारे गणेश किराणे, मणिपूर राज्यात इंफाळ येथे १९६४–६५ च्या सामन्यात आपले क्रीडापटुत्व सिध्द करणारे ज्ञानू कांबळे यांचा समावेश होता. रामभाऊ रेपाळ, दत्ता आचार्य, गोरख जाधव, हे कबड्डी – खो–खो चे अभिजात क्रीडा शिक्षक व पंच होते. शंकराप्पा संसुद्दी, ज्ञानबा जाधव, चंद्रकांत रंगराव जाधव, मारूती रेडेकर, रामभाऊ कणसे हे व्हॉलीबॉल संघाचे उत्कृष्ट खेळाडू होते. आकाराम रावजी पाटील यांनी राष्ट्रीय व्हॉलीबॉल अजिंक्यपदाच्या दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे नेतृत्व केले होते. बडोदे येथे झालेल्या राष्ट्रीय खो–खो अजिंक्यपदाच्या सामन्यात अरविंद फडके यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. अशा तऱ्हेने कऱ्हाडच्या क्रीडाक्षेत्रात या संस्थेने महत्त्वपूर्ण कामगिरी बजाविली आहे.

१९७३ मध्ये प्रामुख्याने क्रिकेटसाठी म्हणून 'कराड जिमखाना' ही संस्था अनिल दिवेकर, सुरेश गुप्ता, जयंत गरगटे, दीपक शहा, अरुण देशपांडे यांनी सुरू केली. या संस्थेच्या खेळाडूंना माजी रणजी खेळाडू रामभाऊ खैरमोडे यांचे मार्गदर्शन मिळत असे. पुढे कला, क्रीडा, साहित्य, निसर्ग आणि सेवा या पाच माध्यमांतून सेवा करणारी संस्था म्हणून १९८८ साली या संस्थेची नोंदणी झाली. अनिल दिवेकर, सी. वा. उमर्जीकर, आनंद परांजपे, कुमार शहा आणि सध्या अनिल कुलकर्णी यांनी या संस्थेचे नेतृत्व केले. १९९५ मध्ये राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन जिमखान्याने केले होते. १९९२ पासून आंतरशालेय बॅडमिंटन स्पर्धा ही संस्था घेते. प्रतिवर्षी मे महिन्यात या संस्थेतर्फे घेतल्या जाणाऱ्या वासंतिक प्रशिक्षण शिबिरात क्रिकेट, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस हे खेळ शिकविले जातात. इंग्लंडमधील न्यू स्टेटस्मन क्लबच्या नामांकित पत्रकारांचा संघ भारत दौऱ्यावर आला असताना त्यांच्या संघाबरोबर जिमखान्याच्या संघाचा एक क्रिकेट सामना झाला. या लक्षणीय सामन्यात जिमखान्याचा संघ विजयी झाला होता. कऱ्हाडात झालेल्या रणजी सारख्या सामन्यांच्या संयोजनात जिमखान्याचाही मोठा वाटा होता. कऱ्हाडात महिलांचे क्रिकेट संघही खेळू लागले असून २००५ मध्ये महिला

क्रिकेट असोसिएशनची स्थापना झाली आहे. पंकज लांजेकर यांची महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस महासंघाच्या व्यवस्थापन समितीवर निवड झाली आहे.

चंद्रकांत पुरोहित यांनी १९८५ पासून 'तांबट तालमी'चा कालोचित कायापालट करून तिची 'बलभीम व्यायामशाळा' बनविली आहे. चंद्रकांत पुरोहित शरीरसौष्ठव, वजन उचलणे, पॉवर लिफ्टिंग या क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षक, पंच, संघव्यवस्थापक व संघटक असून त्यांचे खेळाडू जिल्हा, राज्य, देशपातळीवर चमकले. त्यांच्यापैकी एक शुभस्वा शिखरे आंतरराष्ट्रीय पातळीवर पोचली आहे.

प्रामुख्याने ॲथलेटिक्सचे प्रशिक्षण देणारी 'ऑलिम्पिक स्पोर्टस् क्लब' ही संस्था दिलीप चिंचकर यांनी १९८५ मध्ये सुरू केली. बंगलोरच्या नॅशनल इन्स्टिटच्यूट ऑफ स्पोर्टस्मध्ये त्यांनी स्वत: प्रशिक्षण घेतले आहे. संपत भोसले यांनी गोळा, थाळी, भाला यांच्या फेकींच्या स्पर्धात सलग तीन वर्षे प्रथम क्रमांक मिळविला. प्रज्ञा पाटील हिने हेप्टॅथॅलॉन स्पर्धेत सलग तीन वर्षे सुवर्णपदक मिळविले आहे. आयुब संदे, वैभव पाटील, विक्रांत लाडी, उदयराज पाटील, संतोष कुचेकर, अमिता मुळे, सोनाली पवार, प्रथमेश कुंभार, पूजा मोहिरे हे त्यांचे उल्लेखनीय खेळाडू. २००३ मध्ये महाराष्ट्र राज्य कनिष्ठ गट मैदानी स्पर्धांचे संयोजन या क्लबने केले होते. १९९३ मध्ये स्थापन झालेल्या 'कराड ॲथलेटिक स्पोर्टस् क्लब' नेही राष्ट्रीय व राज्यस्तरावर स्पर्धांत भाग घेण्यासाठी खेळाडू तयार केले. विद्यानगर येथे 'स्टर्लिंग फिटनेस', सोमवार पेठेत 'गोल्डन फिटनेस', संगम हॉटेलमध्ये 'संगम हेल्थ क्लब व स्वीमिंग पूल', अमोल पालेकर यांचा 'गुरूकुल तायक्कांदो क्लब' अशा क्रीडा व्यायामविषयक सुविधा उपलब्ध आहेत. नॅशनल असोसिएशन ऑफ एज्युकेशन (NAPES) २००४ मध्ये स्थापन झाली.

कराटे हा जपानी खेळ . या खेळाचे प्रशिक्षण सी.एच. वीरभद्र रेड्डी देतात. ते कऱ्हाडात १९८३ मध्ये आले. येथे हमीद सय्यद, नर्सय्या नायडू यांच्याकडून त्यांनी स्वत: कराट्याचे प्रशिक्षण घेतले. जिल्हा स्तरापासून अखिल भारतीय स्पर्धांमधून भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदके संपादन केली. १९९१ मध्ये

आशिया कप, मध्य प्रदेश सुवर्णपदक त्यांनी मिळविले. १९९१ पासून अनिल घराळ यांच्या सहकार्यान शिवाजी क्रीडा मंडळात ते कराटे शिकवतात.

कैलास माने यांच्या 'सूर्या स्पोर्टस् ॲकेडमी'च्या शब्बीर पटेल यांची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती .

**नामवंत क्रीडापटू**

१९३५ साली अंबाबाई तालीम मिरज येथे झालेल्या वजन उचलण्याच्या स्पर्धेत डॉ. डी. जी. देशपांडे यांनी सुवर्णपदक संपादन केले होते. छत्रपती शिवाजी पुरस्काराच्या पहिल्या मानकरी (१९७०-७१) चित्रा नाबर आणि क्रांती नाबर या कऱ्हाडच्या. १९७०-७२ मध्ये आंतर महाविद्यालयीन सामन्यात मुंबई विद्यापीठ कबड्डी संघाच्या चित्रा नाबर या कर्णधार होत्या. १९६७ ते ७३ सतत सहा वर्षे राष्ट्रीय अजिंक्यपदाच्या स्पर्धेत त्यांनी चढाईची खेळाडू म्हणून महाराष्ट्रातर्फे भाग घेतला होता. क्रांती नाबर यांनीदेखील कोल्हापूर, मुंबई, जबलपूर, पुणे येथे भरलेल्या आंतरविद्यापीठ सामन्यात १९६९-७३ चार वर्षे सतत भाग घेऊन त्यांनी अजिंक्यपद मिळवून दिले. १९७३ च्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत त्या महाराष्ट्राचा कर्णधार होत्या. पुण्याच्या राणा प्रताप संघातून कबड्डी खेळणाऱ्या नीलिमा पुसाळकर व अरूणा पुसाळकर याही कऱ्हाडच्याच. नीलिमाने राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले होते. मंगल पाटील शिवाजी विद्यापीठ संघाची १९७१-७२ मध्ये उपकप्तान व १९७२-७३ मध्ये कप्तान होती. तसेच फिरोज पठाण, विकास पाटील, परवीन मुजावर यांनीही विद्यापीठ क्षेत्रात कबड्डीचे उत्तम खेळाडू म्हणून लौकिक मिळविला होता. शिवाजी विद्यापीठ व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार म्हणून ( १९६९-७०) मीनल बागवेची निवड झाली होती. तर व्हॉलीबॉलपटू सोनल साठे हिला राज्याचा शिवछत्रपती पुरस्कार (२००१-२००२) प्राप्त झाला होता. अंजली दशरथ १९८७-८८ च्या विद्यापीठ बास्केटबॉल विजेत्या संघाची कप्तान होती.

दिलीप चिंचकर व राजेंद्र कडणे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम करणाऱ्या रामा मुल्ल्या याने शरीरसौष्ठवाच्या महाराष्ट्र श्री, पश्चिम महाराष्ट्र श्री, खाशाबा जाधव श्री इ. स्पर्धा जिंकल्या असून भारत श्री स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. संगम हेल्थ क्लबचे त्यांना प्रोत्साहन आहे. वसंत पाटील व ए. जी. पाटील (१९६६-६७) व बळवंत बाबर(१९८५-८६) हे चमकले. टेबल टेनिस मध्ये उमा ओगले ( १९७२-७३) संजय बदियाणी व संजय भट्टड(१९८३-८४) तर बॅडमिंटनमध्ये महेश सटवे(१९९२-९४), नीलेश फणसळकर (१९९३-९४) मनिषा सटवे (१९९६-९८) यांनी चमकदार कामगिरी केली. वजन उचलण्याच्या स्पर्धात रामकृष्ण चिंचकर ( १९९२-९३), सुचिता खबाले (१९९३-९४), संजय बर्गे (१९९४-९५), स्मिता शिंदे (१९९४-९८), सीमा लाड(१९९५-२०००), रामचंद्र जाधव (१९९८-९९), राजेंद्र यादव (१९८७-८८), एच. बुरूंडे (१९८७-८८), करूणाकरन नाईक (१९९२-९३), दीपाली निकम (१९९९-२०००), सरफराज अत्तार ( १९९४-९५), रजनीगंधा माने ( १९९७-९८), सुनील माने ( १९९९-२०००), रोहित पाटील (२००३-०६) कामगिरी लक्षणीय होती. सीमा लाड, शुभांगी कारंडे व शुभस्वा शिखरे यांना 'शिवछत्रपती पुरस्कार' प्राप्त झाले.

शिवाजी विद्यापीठात सलग तीन वर्षे पॉवर लिफ्टिंग प्रकारात प्रतिनिधित्व करणाऱ्या शुभस्वा सुभाष शिखरे हिने उदयपूर (राजस्थान) येथील पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. मे २००६ मध्ये दक्षिण कोरिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरिताही तिची निवड झाली. तिने देशपातळीवरील १७ व रशिया, अमेरिका आणि भारत या तीन जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धांत यश संपादन केले. कऱ्हाडमधील विविध क्रीडासंस्थांनी तिची शहरातून भव्य मिरवणूक काढून गौरव केला.

प्रज्ञा शशिकांत पाटील हिने महाराष्ट्र राज्य कुमार मैदानी स्पर्धेत ( २००५) हेप्टॅथलॉनमध्ये प्रथम क्रमांक मिळविला तर चेन्नई येथे झालेल्या राष्ट्रीय कुमार मैदानी स्पर्धेत (२००५) सुवर्णपदक संपादन केले. तिची आशियाई आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

रश्मी गौतम निलाखे हिने २ मार्च २००२ रोजी संकरॉक ते गेट

वे ऑफ इंडिया ही पाच कि.मी. सागरी जलतरण स्पर्धा पोहून पूर्ण केली तर २६ फेब्रुवारी २००५ रोजी हीच स्पर्धा ५२-५३ मिनिटात विक्रमी वेळेत पूर्ण केली. महाराष्ट्र राज्य ट्रायथलॉन संघटनेच्या ४०० मी. पोहणे स्पर्धेत तिने सुवर्णपदक मिळविले.

गेल्या पन्नास वर्षात कऱ्हाडातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनींनी विविध क्रीडा प्रकारात आपले प्रावीण्य सिध्द केले. सर्व तपशील येथे देणे शक्य नसले तरी काही निवडक नोंदी अशा :

कुस्तीमध्ये शंकर अण्णा डांगे यांनी नागपूर येथील महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत तिसरा क्रमांक संपादन केलाहोता.आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत शिवाजी फाटक (१९६७), मारूती फाटक (१९७८), संजय पाटील (१९८५), एम. एन. जाधव, आर. बी. शेळके (१९८२), एच. वी. नलवडे यांनी लक्षणीय यश मिळविले. संजय पाटील यांनी महाराष्ट्र केसरी (१९९५-९६) हा किताब संपादन केला.

गोळा फेक, भालाफेक, हातोडा फेक, थाळीफेक या फेकींच्या स्पर्धात शंकर तांबवे (१९७१-७२), सागर जोशी (१९९१-९२), किशोर पाटील (१९९२-९३), जीवन मोरे (१९९५-९६), चंदना जोशी (१९९२-९३), सोहन कदम (२००३-०४), सुप्रिया जगदाळे (२००४-०५), तर रायफल शूटिंग स्पर्धेत सागर जाधव (२००१-०२), योगेश पवार (२००२-०३), अमित निकम (२००२-०३) चमकले. धावण्याच्या स्पर्धात शशिकांत पाटील (१९९१-९२), अतुल पाटील (१९९४-९९), अरूण डुबल (१९८८-९०), स्वाती खुपसंगीकर (१९९१-९२), दत्तात्रय देसाई (१९९२-९३), मेधा पवार (२००३-०४), संतोष बर्गे (१९८८-९०), ए. जी. सावंत (१९६३-६४), शंकर तांबवे (१९७०-७१), एम. पद्मनाभन (१९७६-७७), मधू माने (१९७६-७८), बळवंत बाबर (१९८४-८५), नीलिमा किराणे (१९९१-९२), चंदना जोशी (१९९२-९३), सोनाली पाटील (१९९७-९८), संभाजी नलवडे (२००२-०३), इ.नी नाव मिळविले. कैलास माने ह्याची क्रॉसकंट्री प्रकारासाठी दक्षिण आफ्रिका व हॉलंड येथील स्पर्धेसाठी (१९९३-९४), निवड झाली होती. ॲथलेटिक्समध्ये दत्तात्रय रैनाक (१९६८-७२), संतोष पवार (१९८९-९०), नितीन भराडे (१९९४-९५), राजेश कुंभार (१९९३-९४), महेंद्र शेवाळे (१९९४-९५), अतुल

पाटील (१९९४-९९), धर्मा ऐवळे (१९९८-९९), हे विजयी स्पर्धक होते. आर. के.पवार याने अ. भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेत (१९८१-८२), सुवर्णपदक संपादन केले होते. शरीरसौष्ठव स्पर्धेत अजित थोरात, दीपक गायकवाड व सुनील माने (१९९९-२०००) यांनी अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळविली. बुध्दिबळात हृपेंद्र जाधव (१९८७-८८) यांनी नाव काढले.

नीता नारायण देशपांडे (१९७१), रंजना त्र्यंबक मळेकर (१९७७), यांनी उत्तम खेळाडू म्हणून सातारा जिल्हा शिष्यवृत्ती मिळाली होती. स्वाती नारायण खुपसंगीकर, नीलिमा कुमार किराणे या राष्ट्रीय पातळीवर गुजराथ, बिहार, पंजाब राज्यात खेळण्यासाठी गेल्या होत्या. स्वाती खुपसंगीकर हिला १९८७ मध्ये रिले रेस मध्ये रौप्यपदक मिळाले. १९८९-९० मध्ये क्रीडा प्राधिकरण दिल्लीच्यावतीने अॅथेलेटिक प्रशिक्षणासाठी ऋतावरी श्रीधर कुलकर्णी हिची तर पं. नेहरू शताब्दीनिमित्त दिल्लीला झालेल्या 'भारतीयम्' मध्ये नीलिमा दांडेकरची निवड झाली होती.

### शिवाजी स्टेडियम

पूर्वी कृष्णाबाईचे वाळवंट किंवा गावाबाहेरील माळराने, कोटातील भवानी शाखेचे मैदान, मराठा बोर्डिंगचे आवार, जुन्या वाड्यांच्या, मोठी परडी, खेळांसाठी मैदाने म्हणून वापरली जात. निमजग्याच्या माळावर कुस्त्यांची मैदाने होत. टिळक हायस्कूल, शाळा नं. १, शिवाजी विद्यालय इ. शाळांची मैदाने वापरली जात. गाव वाढू लागले तशी ही मोकळी मैदाने कमी होऊ लागली. कराड नगरपरिषदेकडे समाज विकास योजनेमार्फत स्टेडियमचा प्रकल्प १९५७ मध्ये चालून आला आणि त्या संधीचे सोने नगर परिषदेने केले.

कराड नगरपरिषदेच्या हद्दीबाहेर पूर्वेकडील माळावर दक्षिण अंगास राज्य शासनाने समाजविकास योजनेमार्फत स्टेडियम व जिम्नॅशियमसाठी एक इमारत बांधण्याचे काम १९५७ मध्ये हाती घेतले होते. नगर परिषदेने १६-१०-१९५७ रोजी एक ठराव करून रू. ५००० लोकवर्गणी देऊन हे स्टेडियम चालविण्यासाठी घेण्याचे ठरविले. स्टेडियमचे काम अपूर्ण अवस्थेत असतानाच शासनाने ते कराड नगरपरिषदेकडेच सोपविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे ३१मार्च १९५९ रोजी या अपुऱ्या बांधकामाचा कब्जा नगरपरिषदेकडे आला. या प्रकल्पाचा काही भाग नगरपरिषदेच्या

हद्दीबाहेर असल्यामुळे त्यास शासनाची मंजुरी घेणे आवश्यक होते. १९५९-६० या दोन वर्षांत नगरपरिषदेने सुमारे बारा हजार रुपये स्टेडियमच्या कामासाठी खर्चही केले होते. या स्टेडियमच्या जागेचे संरक्षण व देखरेख करण्याचे काम 'लिबर्टी मजदूर क्लब'कडे सोपवावे व त्या क्लबने सरावासाठी त्या जागेचा वापर करावा यासाठी त्या क्लबला ती जागा वार्षिक नाममात्र एक रू. भाड्याने देण्याचे नगरपरिषदेने १५-१०-१९६० रोजी ठरविले.

दरम्यानच्या काळात जिल्हा गृहसंरक्षक दलाची वार्षिक सराव शिबिरे या जागेवर भरविली जात. १९५८ पासून कराडच्या 'मैदानी, मर्दानी सामना समिती'चे सामने या परिसरात भरत असत. १९६० मध्ये सातारा जिल्हा क्रीडा महोत्सव तेथेच पार पडला. १९६६-६७ पर्यंत अशा प्रसंगाने कऱ्हाडच्या युवाशक्तीची साथ मिळून श्रमदानाने तेथे उत्तम मैदाने तयार झाली. त्यामुळेच अखिल भारतीय खो-खो फेडरेशनला खो-खोच्या राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपदाची स्पर्धा कऱ्हाडसारख्या तालुक्याच्या गावी घेता आली. १९६९-७० पासून कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी खेळांचे प्रशिक्षण वर्ग या क्रीडांगणावर होऊ लागले. पण त्याबरोबरच एकंदर प्रकल्पाच्या दृष्टीने ही जागा अपुरी असल्याचेही ध्यानी आले. त्यामुळे त्या जागेला लागूनच असलेली सुमारे २ एकर जागा १९६९ मध्ये नगरपरिषदेने खरेदी केली. नवीन खरेदी केलेल्या जागेत पूर्वी एक टेकडी होती. ती सपाट करून व खड्डे बजुवून घेण्यात आले. एकूण आराखड्याच्या सोयीच्या दृष्टीने शिवाजीनगर हाऊसिंग सोसायटीची काही जागा स्टेडियमसाठी घेऊन मोबदल्यात नगर परिषदेची जागा सोसायटीस अशी देवाणघेवाण १९७१ मध्ये करण्यात आली. एका अत्याधुनिक व सर्व सोयींनीयुक्त स्टेडियमची आखणी करण्यासाठी पुण्याच्या नेहरू स्टेडियमचा आराखडा तयार करणारे आर्किटेक्ट यु. एम. आपटे यांना बोलावून घेऊन त्यांच्याकडून स्टेडियमचा प्लॅन व एस्टिमेट तयार करून घेतले. दि. १७ आक्टोबर १९७१ रोजी भूमिपूजन आणि अवघ्या दीड वर्षात पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण होऊन २९ एप्रिल १९७३ रोजी क्रिकेटमहर्षी

दि. ब. देवधर यांच्या अध्यक्षतेखाली कसोटीवीर चंदू बोर्डे यांच्या हस्ते स्टेडियमचे उद्‌घाटन झाले. या प्रसंगी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने महोत्सवी प्रदर्शनीय सामना झाला. १९७८ मध्ये पॅव्हेलियनच्या कामास सुरूवात झाली. याच वर्षी जिम्नॅशियमसाठी सुमारे सात गुंठे जागा खरेदी करण्यात आली. यथावकाश पुढील टप्प्यांचे काम पूर्ण झाले. एकूण तीन हेक्टर चोवीस आर अशा प्रशस्त जागेवर उभ्या असलेल्या या क्रीडासंकुलाला 'छत्रपती शिवाजी स्टेडियम' असे नाव देण्यात आले असून येथे आंतरराष्ट्रीय सामने होऊ शकतात. ४०० मीटर्स धावपट्टी (ट्रॅक) या मैदानावर सहजगत्या बसू शकते. सर्व क्रीडांगण समपातळीत असून कोठेही चढउतार नाहीत. स्टेडियमच्या एकूण क्रीडांगणाचे क्षेत्र ५००फूट X ६०० फूट असे आहे. सज्जाच्या अंतर्भागातील क्षेत्र अर्धवर्तुळाकृती दक्षिणोत्तर २३१फूट त्रिज्येचे असून अर्धवर्तुळाच्यामधील पट्टा ८६ फुटांचा आहे. लंबवर्तुळाकृती मैदान क्षेत्र २६५०६३.३४ चौ.फूट आहे. टर्फ क्रिकेट असलेल्या क्रीडांगणावर पाणी मारण्यासाठी स्प्रिंकलर्स बसविले आहेत.स्टेडियमच्या दक्षिण बाजूस तीन मजली पॅव्हेलियनची भव्य इमारत असून त्या इमारतीत सर्व सोयींनीयुक्त तीन मोठी बॅडमिंटन ( लाकडी फ्लोअरची) कोर्ट, एका हॉलमध्ये टेबल टेनिसची टेबलेही आहेत. बाजूला खेळाडूंच्या निवासासाठी खोल्या आहेत. स्टेडियमच्या दुसऱ्या मजल्यावर कॉमेंट्री बॉक्स व बैठक व्यवस्था आहे. बाजूला प्रशस्त जागा असून तेथून क्रीडांगणावरील खेळ पाहता येतात. तिसऱ्या मजल्यावर ध्वजस्तंभाची जागा आहे. दक्षिण कोपऱ्यात डबलबार, सिंगलबार, रोप क्लायंबिंग या सुविधा असून वायव्य कोपऱ्यात बास्केटबॉलची सोय उपलब्ध आहे. ईशान्येस तालमीची इमारत असून तेथे गादीवरील (मॅट) व मातीवरील अशा दोन्ही प्रकारांच्या कुस्त्यांची सोय आहे. इमारतीच्या व स्टेडियमच्या चारही बाजूंना संरक्षक भिंत असून आत तारेचे कुंपण आहे. सावलीसाठी सभोवती झाडे लावलेली आहेत. पाण्यासाठी तीन विंधनविहिरी व त्यांना विद्युत्‌पंप जोडले आहेत. या स्टेडियमवरील धावपट्टी सर्वोत्तम असल्याचा निर्वाळा माजी क्रिकेटपटू,

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे धावपट्टीतज्ज्ञ धीरज परसाना यांनी२००६ मध्ये कऱ्हाडात झालेल्या रणजी क्रिकेट सामन्यांसाठी केलेल्या पूर्वपाहणीत दिला आहे.

स्टेडियमचा वापर राजकीय सभा, मेळावे, प्रात्यक्षिके, समारंभ – संमेलने, प्रदर्शने यासाठी केल्यामुळे मैदानाचे व खेळपट्टीचे नुकसान होते म्हणून स्टेडियमचा वापर खेळाशिवाय अन्य कोणत्याही कारणासाठी होऊ नये अशी याचिका डिसेंबर २००६ मध्ये आनंद परांजपे यांनी केली. मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील क्रीडांगणांबाबत असाच निर्णय दिला होता व सर्वोच्य न्यायालयानेही त्या निर्णयाला दुजोरा दिला होता. तथापि कऱ्हाड नगरपरिषदेनेदेखील 'काईट ८८' प्रदर्शनासाठी स्टेडीयम ही 'अखेरची बाब' म्हणून वापरू दिले होते आणि खेळाशिवाय अन्य कामांसाठी स्टेडियम देऊ नये असा सप्टेंबर १९८८ मध्ये ठरावही केला होता.

कऱ्हाडसारख्या ग्रामीण भागातील तालुक्याच्या गावी सर्व सुविधांनी परिपूर्ण असे श्री छत्रपती शिवाजी क्रीडा संकुल ( स्टेडियम) कऱ्हाडच्या सांस्कृतिक विकासातील वैभवशाली टप्पा आहे. यशवंतराव चव्हाण यांनी क्रीडा संकुलाच्या उद्‌घाटनप्रसंगी पाठविलेल्या शुभसंदेशात म्हटले होते, 'खेळाच्या मैदानावर अंगी बाणलेले उत्कट गुण भावी जीवनातील अनेकविध जबाबदाऱ्या पार पाडत असताना प्रामाणिक साथ देतात. आपल्या तरुण पिढीमध्ये खेळांची आवड निर्माण करण्यात शिवाजी स्टेडियमचे बहुमोल सहाय्य खचितच होणार आहे ', ते यथार्थ ठरले आहे.

*****

१५

# धार्मिक

सृष्टिनिर्मात्या ब्रह्मदेवाने श्री कृष्णाककुद्मतीच्या संगमावर शिवलिंगाची समंत्रक स्थापना करून तेथे वसाहत करावयास सांगितले अशी पौराणिक आख्यायिका आहे. कऱ्हाडात शिवपूजा नवव्या शतकापूर्वी कैक्र शतके अस्तित्वात होती त्यामुळे हाटकेश्वर वगैरे लिंगे इ. स. पूर्वीची असावीत. (कऱ्हाड पृ.१०) कऱ्हाडात शंकराची देवळे अधिक आहेत हे खरे असले तरी वैदिक, शैव, वैष्णव, भागवत, नाथ इ. हिंदू धर्ममतांतील संप्रदायांबरोबरच जैन, इस्लाम, ख्रिश्चन इ. धर्ममतांची मंडळी ही कऱ्हाडात एकात्मतेने नांदतात. बौध्द सांप्रदायिकांनी तर इसवी सनाच्या पहिल्या शतकातच आगाशिवाच्या विशाल भूधरात सुंदर लेणी खोदून आपल्या धर्ममतांची कऱ्हाडवर कायमची छाप उमटविली आहे.

कऱ्हाड शहर ज्या कृष्णा – कोयनांच्या काठी वसले आहे त्या नद्यांच्या प्रीतिसंगमामुळे कऱ्हाडास तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झाले आहे. पण 'दक्षिण काशी' म्हणून एकेकाळी वेदाध्ययन अध्यापनासाठी किंवा धर्मनिर्णयांसाठी वेदमूर्तींची मांदियाळी येथे असली तरी कऱ्हाड हे तीर्थक्षेत्र म्हणून विकसित झाले नाही. गुरू हा ग्रह प्रत्येक राशीत एक वर्षभर असतो. तो ज्या वर्षी कन्या राशीत जातो ते वर्ष 'कन्यागत पर्व' मानले जाते. या पर्वकालात गंगा नदी कृष्णेला भेटावयास येते. त्यामुळे त्या वर्षी कृष्णा गंगास्वरूप होते आणि त्या काळात कृष्णाकाठी होम, हवन, स्नान, दान, जप, तप एवढेच नव्हे तर श्राध्दादी विधी करणे पुण्यकारक समजले जाते. असा योग बारा वर्षांतून एकदा येतो. अलीकडे २००४ – २००५ साली 'कन्यागत पर्व' होते.

‘ कऱ्हाड महात्म्यात’ १) प्रीतिसंगम किंवा दैत्यनिवारिणी येथे गरूडतीर्थ २) हाटकेश्वर देवळासमोर हाटकतीर्थ ३) भैरवाच्या देवळासमोर भैरवतीर्थ ४) वड्याच्या गणपतीच्या देवळासमोर इभतनू गणेशतीर्थ ५) कमळेश्वर मंदिरासमोर नागतीर्थ ६) जुन्या गवळवेशीच्या पुढील बाजूस लक्ष्मीतीर्थ ७) नृसिंह देवालयासमोर नृसिंहतीर्थ आणि ८) फरशीस लागून मृकुंडतनय किंवा मार्कंडेय तीर्थ अशी अष्टतीर्थे असल्याचे सांगितले आहे.

कऱ्हाडात १८८५ पूर्वी हिंदू धर्ममताची सुमारे ५२ देवळे होती. त्यापैकी प्रमुख तीन – श्री कृष्णामाईचे, हाटकेश्वराचे आणि कमळेश्वराचे. ही देवळे फारशी प्राचीनही नाहीत आणि सुंदरही नाहीत पण एकेकटे देऊळ सुंदर नसले तरी कृष्णाघाटावरील देवळांचा समूह मात्र मनोहारी दिसतो. कऱ्हाडात सध्या सुमारे दीडएकशे हिंदू देव-देवतांची मंदिरे आहेत. मधल्या काळात या देवालयांची दुरवस्था झाली होती. पण आता बहुतेक देवालयांचे जीर्णोध्दार झाले असून त्यांचा कालोचित कायापालट झाला आहे. अनेक नवीन मंदिरेही उभारली गेली आहेत. एवढेच नव्हे तर प्रवचन, कीर्तन, उत्सव, मिरवणुका इ. कार्यक्रमही मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहेत. भक्त भाविकांची नित्य वर्दळही वाढली आहे. केवळ हिंदू धर्माच्या मंदिरांबाबत नव्हे तर जैन, बौध्द, ख्रिश्चन, मुसलमान इ. धर्ममतांच्या देवस्थानांबाबतही असेच म्हणता येईल.

## हिंदू मंदिरे

### शंकराची देवळे

**संगमेश्वर.** हे प्रीतिसंगमाजवळचे सर्वात प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात चौमुखी ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. संपूर्ण भारतात पुष्करतीर्थ, माहुली व कऱ्हाड या तीनच ठिकाणी अशी मूर्ती आहे. आत गाभाऱ्यामध्ये महादेवाची पिंड आहे. पंतप्रतिनीधींनी १७२७ मध्ये मंदिराची दुरूस्ती केली त्यानंतर पुन्हा अलीकडे मंदिराचे नूतनीकरण झालेले आहे.

**हाटकेश्वर.** कऱ्हाडचे हे ग्रामदैवत आहे. मात्र आज ज्या ठिकाणी हे मंदिर आहे, त्याठिकाणी ते पूर्वी नसावे. प्राचीन काळी हे मंदिर नदीकाठी असावे. आजच्या हाटकेश्वराचा गाभारा व नजीकचा सभामंडप हा हेमाडपंतीच

म्हणजे तसा जुनाच आहे. १७२७ मध्ये उमराणी मंडळींनी, १७३७ मध्ये शिवाजीराव डुबलांनी व त्यानंतर १७५० मध्ये पुन्हा उमराणींनीच पुढील लाकडी सभामंडप बांधला. हा पेशवाईकाळ असल्याने हे सर्व बांधकाम त्या पध्दतीचेच आहे. गाभाऱ्यातील पिंड पाच फूट उंचीची आहे. या मंदिरात वर्षभर प्रवचने, कीर्तने, पुराणे इत्यादी धार्मिक कार्यक्रम चालू असतात.

**भैरोबा मंदिर (क्षेत्रपाल).** हे मंदिर १७२७ मध्ये टाळगाव ता. कऱ्हाड येथील इनामदार गिजरे यांनी बांधले. मंदिराचे पूर्वीचे बांधकाम हेमाडपंती असून आतल्या बाजूस दोन महिरपी आहेत. बाजूला छोटीशी बांधीव जागा असून तेथे पूर्वीपासून संन्यासी उतरत असत. कार्तिक वद्य अष्टमीस भैरवाचा जन्मकाळ असून त्यावेळी काही कार्यक्रम होतात. प्रत्येकाच्या घरात लग्नमुंज झाल्यावर तसेच काशीयात्रेस जाताना या भैरवाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे.

**कमळेश्वर.**हे कृष्णाकाठी असलेले एक प्राचीन शिवमंदिर असून ते स्वयंभू मानले जाते. पिंड आत गाभाऱ्यात असून नंदी मात्र एकदम बाहेर आहे. देवळाच्या भोवती तट आहे. चलेजाव चळवळीत क्रांतिकारकांच्या गुप्त बैठकी येथे होत असत. १७३९ मध्ये परशुराम नाईक अनगळांनी या मंदिराचा जीर्णोध्दार केला होता व आता पुन्हा या मंदिराचे नूतनीकरण झाले आहे. त्यात यशवंतराव कवडे, डॉ. गजाननराव पावसकर, मुरलीधर फल्ले, लक्ष्मण व प्रभाकर हे अनगळ बंधू व दिलीप शंकरराव देशमाने, डॉ. कंटक यांचा पुढाकार आहे.

**रत्नेश्वर.**१७३९ साली सरदेशमुखांनी हे मंदिर बांधले. त्या अगोदर या ठिकाणी एक लहानसे हेमाडपंती देऊळ होते. गाभारा व मंडप हे नक्षीदार खांबांनी युक्त आहेत. मंडपाला तीन प्रवेशद्वारे असून एका बाजूला देवासमोर नंदी मंडपातच आहे. या मंदिराचे शिखर अलीकडील म्हणजे पेशवाईकालीनअसून ते वैशिष्ट्यपूर्ण आहे. मध्ये मुख्य शिखर व त्याच्या चारी बाजूंना शिखराच्या मध्यापर्यंत मनोरे आहेत. वारणा खोऱ्यात करूगली नावाचे गाव आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी तेथे देशपांडे नावाचे सावकार राहत. त्यांना चार मुले होती पण त्यांनी आपल्या संपत्तीचे पाच वाटे केले. पाचवा वाटा रत्नेश्वराच्या जीर्णोध्दारासाठी ठेवला. त्यांच्या मुलांनी पण वडिलांच्या इच्छेप्रमाणे त्यावेळी

भाट्यांची बाग म्हणून प्रसिध्द असलेल्या जागेत बाग, विहीर व आता जे मंदिर दिसते त्याची उभारणी केली. १९६७ च्या भूकंपात वरच्या शिखराची बरीच नुकसानी झाली. पण अलीकडेच म्हणजे २००६ मध्ये कर्नल कुलकर्णी, इनामदार, कुंभार वगैरेंनी पुढाकार घेऊन या मंदिराच्या शिखराची पुनर्बांधणी केली.

**त्रिंबकेश्वर.** हे मंदिर १७३४ साली त्र्यंबकदीक्षित उमराणी यांनी बांधले. हे कमळेश्वराच्या पूर्वेस व नृसिंह मंदिराच्या पश्चिमेस कृष्णाकाठावर आहे. मंदिराचे बांधकाम जुन्या पध्दतीचे आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराला गोल कमान आहे. गाभाऱ्यात फक्त शिवपिंड असून शिखरात अनेक देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. त्या मात्र आता अस्पष्ट दिसतात.

**रुद्रेश्वर.** शुक्रवार गुरुवार व सोमवार या पेठांच्या तिकाटण्यावर बालाजी मंदिराच्या दक्षिणेला शिवभक्त रूक्मिणीबाई दामोदर किरपेकर यांना १९३८ साली घर बांधण्यासाठी पाया खणताना ही पिंड सापडली. या पिंडीवर रुद्राक्षासारखी केशरचना असलेला अडीच फूट घेराचा मानवी चेहरा आहे. १९५८-५९ मध्ये झालेल्या रस्ता रूंदीत रस्त्याच्या मध्ये येणारे हे देऊळ सध्याच्या ८' X ६' या जागेत नगरपालिकेने बांधून दिले आहे.

**कोयनेश्वर.** कोयनाकाठी घोडे खडक म्हणून मोठा खडक आहे. या खडकावरच हे जुने हेमाडपंती शिवमंदिर आहे. दगडावरील जुने शिल्प देखणे आहे. पुढे सुरेख फरसबंदी आहे. या मंदिराची व्यवस्था जयभारत मंडळ हे पाहते. गावातील सर्व एकतारी भजनी मंडळे निमित्तानुसार येथे हजेरी लावतात. या देवळाचे शिखर व कृष्णापूल यांची समुद्रसपाटीपासूनची पातळी एक असावी. त्यामुळे कोयनेश्वर देवळाचे शिखर बुडाले की कृष्णा पुलावरून पाणी गेले असे समजले जाते.

**सोमेश्वर.** रविवार पेठेत नगरपरिषदेच्या मुख्य इमारतीसमोर मंडईत पूर्वाभिमुख असे हे पुरातन व जागृत देवस्थान आहे. पूर्वी हे एक लहानसे शिवमंदिर होते. १९८२ मध्ये त्याचा जीर्णोध्दार करण्यात येऊन साडे चौदा फूट X साडे चौदा फूट एवढा गाभारा, गाभाऱ्याखाली ध्यानधारणा तळघर, फरशी टाईल्स मूर्तीचे सिंहासन असे सुशोभीकरण करण्यात आले. मंदिरात

शंकर, पार्वती, गणेश यांच्या मूर्ती आहेत. महादेवाची शाळुंखी साडेतीन ते पाच फूट उंच असून त्यावर तांब्याच्या नागांच्या फणा दोन फूट उंच आहे. समोर नंदी व कासव आहे. मंदिराचे भव्य शिखर तीस फूट उंचीचे असून तामिळनाडूमधील रामेश्वरचे कलाकार शेरवाई यांनी केले आहे. शिखरावर संतांची व देवादिकांची चित्रे काढण्यात आली आहेत. शिखरावरील कळस तांब्याचा आहे. शामराव रामजी पवार, गोविंद तुकाराम बर्गे, खाशाबा गोपाळ पाटील, तुकाराम खाशाबा घोडके इत्यादींनी या मंदिराचा जीर्णोध्दार केला.

**बटाण्यांचे शिवमंदिर.** गुरूवार पेठेतील मनोऱ्यासमोर ज्ञानोबा कृष्णराव बटाणे यांनी सुमारे दीडशे वर्षांपूर्वी हे प्रशस्त शिवमंदिर स्थापन केले. आत खंडोबाची म्हाळसाकांत मूर्ती, एकवीरादेवी आणि स्वयंभू पिंड आहे. अलीकडे १९९० मध्ये या देवळाचा जीर्णोध्दार करण्यात आला.कऱ्हाडातील सार्वजनिक गणेशोत्सवाची तसेच स्वातंत्र्य आंदोलनाच्या संबंधातील अनेक घटना उदा. मिठाचा सत्याग्रह इ. हालचालीचा आरंभ येथे झाला.

**जोतिबा.** मंगळवार पेठेतील हे जागृत देवस्थान आहे. मातीच्या ढिगाऱ्यात खेळणाऱ्या मुलांना तेथे जोतिबांची मूर्ती सापडली. तेव्हा काले येथील गोपाळ माणकेश्वर कुलकर्णी यांनी १८२७ मध्ये एक लहान देऊळ बांधले. नंतर किसनलाल प्रेमराज मारवाडी यांनी सभामंडप बांधला. आता ट्रस्टकडून या मंदिराच्या जीर्णोध्दाराचे भव्य प्रमाणावर काम चालू आहे. गाभाऱ्यात ४ फूट उंचीची काळ्या पाषणाची रेखीव मूर्ती आहे. भैरोबा व मारुती यांच्या मूर्ती व महादेवाची एक लहान व एक मोठी अशा दोन पिंडी आहेत. देवळाच्या मागे मोठे तुळशीवृंदावन आहे. चैत्र पौर्णिमेला चार दिवस यात्रा भरते. औंधची यमाई, येडोबा व पांढरीचा मारूती या तीन देवांना भेटण्यासाठी जोतिबांची पालखी जाते.

**ज्योतिर्लिंग.** शुक्रवार पेठेतील कोयना नदीच्या काठी हे मंदिर आहे. या पेठेतील विजय धर्माधिकारी यांना झालेल्या दृष्टांताप्रमाणे देव ज्या ठिकाणी वास करीत आहे तेथून त्यांनी शिल्पकाराला घेऊन एक कठीण असा दगड आणला व त्या दगडामधून ही मूर्ती अवघ्या चोवीस तासात घडवली. तेव्हा आपल्यामागे काही वेगळी शक्ती आहे याची जाणीव त्या शिल्पकाराला झाली

व तेच त्याने धर्माधिकारी यांना सांगितले. ही मूर्ती सध्या मंदिराच्या तळघरात प्राणप्रतिष्ठित असून वर्षातील विजयादशमी व चैत्र व दशमी या दोनच दिवशी तिचे दर्शन घडते. वाडी रत्नागिरी येथील श्री ज्योतिबा देवस्थानात जे जे उपचारविधी केले जातात ते सर्व व सणवार उत्सव येथे होतात. अश्विन शुक्ल पक्षात नवरात्र उत्सवात श्रींना वेगवेगळे पोषाख व अलंकार चढवले जातात. मंदिरात वरती कऱ्हाडचे प्रसिध्द शिल्पकार दादासाहेब सुतार यांनी घडवलेली मूर्ती आहे. १९८९ मध्ये संपूर्ण मंदिरावर संगमरवर चढवण्यात आला आहे.

**नाईकबा.** शुक्रवार पेठेत काका शिंदे यांच्या मालकीचे हे मंदिर आहे. बनपुरीच्या नाईकबाचे पितळी मुखवटे आहेत. देवळाची बांधणी नव्या पध्दतीची आहे. गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी बनपुरीला पालखी जाते व रामनवमीला परत येते.

**बिरोबा.** १७०२-३ साली देशगावडे धनगरांनी हे मंदिर बांधले. शनिवार पेठेत कासमभाई बोर्डिंगकडून स्टँडकडे जाणाऱ्या रस्त्यावर हे मंदिर आहे. मूळचे बांधकाम दगडी हेमाडपंती असून १९९२ मध्ये त्याचा जीर्णोध्दार झाला आहे. आता गाभारा १०' X १५' व सभामंडप २५' X ३०' असा असून शिखराची उंची २१ फूट आहे. गाभाऱ्यामध्ये दगडी मूर्ती असून मूर्तीला दोन पितळी मुखवटे असून समोर पितळी घोडा आहे. देवाला पिवळ्या रंगाची तरवडाची फुले वाहिली जातात. मूर्तीला जरीचा फेटा, उपरणे, पाठीमागे साडेतीन रेघांचा जावळी लोकरीचे हातावर विणून तयार केलेले कांबळे व सोन्याचांदीचे दागिने आहेत. आजूबाजूच्या १६० गावामध्ये बिरूदेवाची भक्त मंडळी आहेत. वर्षातून चार वेळा नवरात्रीचे नऊ दिवस व दसरा, दीपावलीचा पाडवा, गुढीपाडवा व सरता श्रावणी सोमवार या दिवशी हे भक्त येतात. त्यावेळी यात्रा भरते. देवाला मुकुट घालतात. देवाचे पाच मानकरी असतात. ढोल, गजा, ओव्या, छबिना इ. कार्यक्रम होतात. चिकुर्डे, नेर्ले, मुंढे, खोडशी, काशिळ, मसूर व कऱ्हाड अशी बिरोबाची सात प्रमुख देवस्थाने असून कऱ्हाड हे त्यातील प्रमुख आहे म्हणूनच त्याला म्हातारा (मोठा) देव असे संबोधतात. सरत्या श्रावण सोमवारी बिरोबाला कृष्णाबाई घाटावर स्नानासाठी नेतात.

याशिवाय स्वामीच्या बागेतील गोपाळेश्वर (१७५२), नाडगौडांचा महादेव

(१७५२) घाटावरील लाटकरांचा सिध्देश्वर (१७८९), सखाराम यशवंत सप्रे यांचा बहिरोबा आळीचा केशवेश्वर (१८००), पंढरपुरे यांचा रामेश्वर (१८०३), काशी विश्वेश्वर (१८३३) या शिवमंदिराबरोबरच कऱ्हाडच्या भोवताली गोळेश्वर, कपिलेश्वर (कापील), नीळगळेश्वर (आगाशिव), वरूणेश्वर (वारूंजी), धर्मेश्वर ( वनवासमाची), कोटेश्वर ( खोडशी), निळेश्वर (वडोली निळेश्वर), आनंदेश्वर (गोटे), पावकेश्वर ( सैदापूर) या शिवमंदिरांमुळेच कऱ्हाड हे शिवस्थान झाले आहे.

### गणपती मंदिरे

**वड्याचा गणपती.** निरंजन पाठक हे निष्ठावान गणपती भक्त असून ते समर्थ रामदास स्वामींचे शिष्य होते. या पाठकांना समर्थांनी गणपती दर्शन घडवले व त्यामुळे ते पाठकांचे देव झाले. या निरंजन देवांनी तीनशे वर्षापूर्वी १६७२ मध्ये सिध्दिविनायक गणपतीची स्थापना केली. १८१३ मध्ये गणेश देवांनी त्याला मंदिरांचे स्वरूप दिले. भिक्षेतून आलेल्या सर्व धान्यांचे पीठ करून वडे करीत व त्याचा नैवेद्य करून त्या प्रसादाच्या वड्याचा तुकडा घरच्या धान्यात मिसळून ठेवला तर वर्षभरात घरात धान्याचा तुटवडा भासत नाही अशी भाविकांची श्रध्दा आहे. भवानीदास या भक्ताने दिलेली गणेशाची मूर्ती पंचधातूंची असून अतिशय सुंदर आहे. माघ शु १४ पासून पाच दिवस या गणपतीचा उत्सव असतो. या मंदिरात शाळिग्राम गणपती (विष्णुविनायक) आहे. या देवस्थानाचा जीर्णोद्धार १९८१ मध्ये झाला.

**कोटाखालचा सिध्दिविनायक.** हा उजवा सोंडेचा असून कडक असला तरी पावणारा आहे. आतापर्यंत हा सिंदूर विलेपितच होता पण २००६ साली याचे शेंदराचे जाड कवच गळून पडले व मूळ बालगणेशाचे सुंदर ध्यान प्रकट झाले. मूर्तीचा दगड हिरवट रंगाचा आहे. ही मूर्ती १२ व्या किंवा १३ व्या शतकातील असावी. हा सध्या अस्तित्वात नसलेल्या चावडीजवळील ख्वाजा खिजरच्या दरवाजाजवळ हा गणपती असावा किंवा निमजग्याच्या माळावर जे भव्य महालक्ष्मी मंदिर होते. त्या मंदिराच्या गणेशपट्टीवर ही मूर्ती असावी असे म्हणतात. हिची स्थापना बाबाजी नारायण कुलकर्णी यांनी कोटाखाली

केली. त्यावेळी श्रीमंत परशुराम श्रीनिवास पंतप्रतिनिधींनी या गणपतीस मलकापूरवाडीजवळील जमीन १८२० मध्ये इनाम दिल्याचा उल्लेख आहे. हल्लीच्या देवळाचे काम १८८० मध्ये श्रीनिवास परशुराम पंतप्रतिनिधी यांच्याकडून पूर्ण झाले.

**मंगळवार पेठेतील गणपती.** ज्योतिबा मंदिरासमोर लोंढे पाटील यांच्या पश्चिमेस हा गणपती आहे. त्याची स्थापना १७७७ मध्ये चिंचवडचे मोरया गोसावी यांनी केल्याचे सांगतात. २१ कलशांचे जागृत देवस्थान म्हणून यास ओळखतात. मंदिराचा गाभारा व सभामंडप प्रत्येकी १२' X १२' असा आहे.

याखेरीज डुबल व जगन्नाथ शागीर्द यांनी १७८९ साली बांधलेल्या कृष्णाबाई घाटावरील गणपती, नरसोबा नाईक वाघमारे यांचा गवळवेस गणपती (१७७७), मार्केट यार्ड, शनिवार पेठ व शुक्रवार पेठ येथे गणपतीची मंदिरे आहेत. यापैकी शनिवारातील 'तेल्यांचा गणपती' म्हणून प्रसिध्द असलेला उजव्या सोंडेचा गणपती सुमारे २०० वर्षांपूर्वीचा आहे.

## मारुती मंदिर

**काळा मारुती.** सोमवार पेठेतील या मारुतीची स्थापना १७४२ साली झाली. हा मारुती जागृत व साक्षात्कारी समजला जातो. विठोबा अण्णा दप्तरदार यांचे समकालीन प्रकांड पंडित बाबाचार्य काळे हे हनुमंताचे निष्ठावंत उपासक होते. त्यांनी करवीर क्षेत्रातील एका शिल्पकाराकडून शाळीग्राम शिलेतून ही मूर्ती आपल्या ध्यान साधनेनुसार करवून घेतली. शिखा, यज्ञोपवीत, उजव्या हाती जपमाळ, डाव्या हातात गदा असे या मूर्तीचे देखणे बलदंड स्वरूप आहे. कऱ्हाडच्या पूर्व टोकाला कृष्णेकाठी बाबाचार्य यांचे घर होते. तेथेच या मारुतीची स्थापना झाली. पुढे बाबाचार्यांनी संन्यास घेण्याचे ठरविल्यामुळे हनुमंताची पूजाअर्चा व इतर व्यवस्था त्यांनी आपला शिष्य रामाचार्य केंच यांच्याकडे त्यांना क्षेत्र माहुलीहून बोलावून सोपविली. रामाचार्य केंच यांच्या मुलाने – वेदभूषण भीमाचार्य केंच यांनी या देवतेचे स्थलांतर सध्याच्या जागेत केले. नंतर त्यांची पत्नी इंदिराबाई यांनी हे देऊळ विश्वस्त समितीकडे सोपविले. वे.शा.सं. हरिआण्णा गिजरे यांच्या नेतृत्वाने काळ्या मारूती मंदिराचा जीर्णोध्दार

झाला. येथील वेदपाठ शाळेने सुरुवातीस दहा हजार रूपयांची देणगी दिली.

**पांढरीचा मारुती.** पांढर – पांढरी म्हणजे गावठाण. पूर्व बाजूने गावात प्रवेश करताना हे पांढरीच्या मारूतीचे मंदिर आहे. मारूतरायाचे ध्यान उग्र स्वरूपाचे आहे. १७६७ साली जानोजी अवसरे यांनी मंदिराचा जीर्णोध्दार केला.

**वीर मारुती.** कृष्णा नदीच्या पलीकडे सैदापूरच्या वाळवंटात १८३८ च्या सुमारास राघोपंत आपटे यांनी आपले सहकारी नारायण रामचंद्र कुर्लेकर, विठोबाआण्णा दप्तरदार, हरिभट बापूभट वळवडे इ. च्या सहकार्याने बांधलेले दगडी, चिरेबंदी, भव्य असे वीर मारुतीचे मंदिर खोडशीच्या धरणानंतर नदीचा प्रवाह बदलल्यामुळे कऱ्हाडच्या वाळवंटात आले. पुरामुळे हानी होऊ नये अशी योजना मंदिर बांधणीत केली आहे. या मंदिराजवळच हिंदूंचे दहन संस्कार पूर्वी केले जात. त्यामुळे याला 'मढ्या मारूती' या नावाने ओळखले जाई. बाबुराव गोखले यांनी तरूण मित्र मंडळाच्या सहाय्याने त्याला 'वीर मारूती' असे प्रयत्नपूर्वक म्हणण्यास सुरूवात केली.

**सातशहिद मारुती.** शुक्रवार पेठेतील गणेश मंडळाने वर्गणी करून उघड्यावर ह्या ११ फुटी भव्य हनुमंताची स्थापना केली व नंतर त्याच्या भोवती सध्याचे मंदिर बांधले.

**कमानी मारुती.** सोमवार, मंगळवार आणि गुरुवार या तीन पेठांच्या तिकाटण्यावर पूर्वी वेस होती. शंकर ज्ञानोबा पवार (वनपाल) व शांताराम कृष्णाजी कळंत्रे यांना १९३४ च्या सुमारास प्रीतिसंगमावर मारुतीची मूर्ती सापडली. त्यांनी या वेशीत तिची स्थापना केली. पुढे बाळा जाधव यांनी मूर्तीसाठी कमान बांधून दिली. यावरून याला कमानी मारुती असे म्हणतात. त्यानंतर शामराव अष्टेकर, बाळासाहेब दिवेकर, शांताराम कळंत्रे, गजानन पावसकर, किसन पवार यांनी पुढाकार घेऊन आजचे मंदिर उभे केले.

**शनिवार मारुती.** हा मारुती पूर्वी गावाच्या दक्षिण वेशीवरील मारूती म्हणून होता. त्यावर १८४७ मध्ये भवानदीन परदेशाने छप्पर बांधले. १९१४ पासून महादेव भाऊराव मुळे हे व्यवस्था पाहू लागले. १९२२–२३ मध्ये राजारामबापू गुजर यांनी सध्याचे देऊळ बांधून दिले. आता मंदिराचा ट्रस्ट

आहे. मारूतीची काळ्या पाषाणातील मूर्ती साडेतीन फूट उंच आहे.

याशिवाय घाटावर बालहनुमानाचे मंदिर नागोबा अवळे वाणी यांच्या पत्नीने १७८९ मध्ये बांधले. त्याचा जीर्णोध्दार बंग यांनी केला. १७५२ मध्ये स्थापन झालेले भैरोबा आळीतील समस्त देशपांडे मंडळींचे मारुती मंदिर, त्याच्या खाली दिवटे यांनी टिळक हायस्कूलच्या मागे उभे केलेले मारु ती मंदिर, रंगारवेशीतील उत्तराभिमुखी मारुती, डुबल गल्ली मारुती (१८३८) अशी काही मारुती ची देवस्थाने पण आहेत. रामदासांनी स्थापन केलेल्या अकरा मारुतींपैकी सात मारुती कऱ्हाडच्या परिसरातच आहेत.

## देवीची मंदिरे

**श्रीकृष्णाबाई.** चाफळचे बाजीपंत करकरे यांनी कोकणात बसवण्यासाठी पांढऱ्या पाषाणाची देवीची एक मूर्ती उत्तर हिंदुस्थानातून करवून आणली होती. पण त्यांच्या पत्नीला 'ही मूर्ती कृष्णाकाठी स्थापन करावी व कऱ्हाडच्या अंताजी बहिरव यांच्या स्वाधीन करावी' असा दृष्टांत झाला. म्हणून त्यांनी कऱ्हाडात कृष्णाकाठी एका झोपडीवजा जागेत त्या देवीची स्थापना केली व व्यवस्थेची जबाबदारी अंताजी बहिरव आवटे यांच्या स्वाधीन केली. भगवंतराव पंतप्रतिनिधी यांची पत्नी राजसबाई या विटे येथे राहत. त्यांच्याकडे कामासाठी असलेला गुजराथी ब्राह्मण निपुत्रिक मरण पावला. त्यामुळे त्याच्या बेवारशी तीन हजार रुपयांच्या मालमत्तेचा विनियोग मूळ झोपडीच्या जागी सध्याचे दगडी बांधकाम असलेल्या देऊळ बांधण्याच्या कामी त्यांनी केला व देवीला 'कृष्णाबाई' असे नाव दिले. श्री कृष्णाबाईची ही मूर्ती दशभुजा, सिंहारूढ असून महिषासुराचा वध करताना दाखवली आहे. या मूर्तीची मान तिरपी असून ती कृष्णा प्रवाहाकडे पाहते आहे असे वाटते. म्हणून तिला 'कृष्णाबाई' हे नाव मिळाले असावे. १९७६ च्या महापुराने या देवळाचे बरेच नुकसान झाले. पण त्यामुळे जीर्णोध्दार करताना प्रदक्षिणा मार्ग प्रथमच सापडला.

**उत्तरालक्ष्मी.** शिलाहार राजे हे लक्ष्मीभक्त होते. त्यांच्या राज्याची कऱ्हाड ही उत्तर सीमा म्हणून त्यांनी कऱ्हाड शहराच्या दक्षिणेस निमजग्याच्या माळावर आजही दिसत असलेल्या २२८ फूट लांब व ९० फूट रूंद अशा

चौथऱ्यावर एका काळी उत्तरालक्ष्मीचे भव्य मंदिर बांधले. त्या मंदिराच्या शिखराचे प्रतिबिंब कृष्णा – कोयनांच्या प्रीतिसंगमात पडत असे. ('साहित्यिक कऱ्हाड' पु. पां. गोखले पृ. ४६) या मंदिरातील एक मूर्ती आक्रमणाच्या वेळी कोठेतरी लपवून ठेवली असावी आणि १७२७ मध्ये शिवाजीराव डुबल यांनी सध्या भैरोबा गल्लीत असलेले महिषासूरमर्दिनी उत्तरालक्ष्मीचे मंदिर बांधून तेथे त्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली असावी. मूर्ती साधारणपणे ३१ इंच उंच व १६ इंच रूंद अशा काळ्या कुळकुळीत पाषाणात कोरलेली आहे. देवीला दहा हात असून प्रत्येक हातात शस्त्र आहे. डाव्या बाजूच्या हाताचे एक बोट नुसतेच वर आहे. कारण त्या बोटातील चक्र खाली असलेल्या रेड्याच्या पोटात शिरलेले दिसते. देवीच्या बाजूला दोन दैत्य असून त्यापैकी एकाचे मस्तक देवीने उडवलेले दिसते. देवीचे वाहन सिंह असून त्या सिंहाने पाठीमागून रेड्याला जबड्यात धरलेले आहे. मूळ मूर्तीचा चेहरा कमालीचा शांत आहे. कारण तिच्याकडून संहारकर्म घडले ते जनकल्याणास्तवच, स्थितप्रज्ञवृत्तीने. निरनिराळे अलंकार तिच्या अंगावर आहेत. मंगळसूत्र, चांदीचे डोळे मात्र नंतर घालण्यात आले. ही मूर्ती १२ व्या ते १३ व्या शतकातली असून शिल्पशास्त्राच्या दृष्टीने ही एक अजोड कलाकृती व ऐतिहासिक दृष्टीनेही फार महत्त्वाची आहे. आता या मंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे.

**दैत्यनिवारिणी.** कमला लक्ष्मीचे निवासस्थान म्हणून पुराणात कऱ्हाडचा उल्लेख आहे. समुद्रमंथनातून मिळालेला अमृतकलश घेऊन निघालेल्या गरुडाने कऱ्हाडास कोयनाकाठी क्षणभर विश्रांती घेतली व पुन्हा उड्डाण केले. ते ठिकाण गरुडतीर्थ. कृष्णा कोयनेच्या परिसरात तपश्चर्या करणाऱ्या असुरांचा विनाश करण्यासाठी ब्रह्मा–विष्णू–महेश यांनी निर्माण केलेली तेजस्वी शक्ती, हिने नऊ दिवस नवरात्रीत असुरांचा नाश केला आणि युध्दानंतर ती विसावली. ते ठिकाण म्हणजे दैत्यनिवारिणी. हे मंदिर कऱ्हाड शहराच्या पश्चिमेस कोयनेकाठी कोयनेच्या जुन्या पुलाजवळ आहे. निसर्ग परिसर असलेले हे मंदिर पुरातन असावे. पण प्राचीन देवालय कोठे जवळपास गडप झाले असावे. १७५२ मध्ये ते पंतप्रतिनिधींनी बांधले. गाभाऱ्यात उत्तम कलाकुसर केलेली. देवीची देखणी अष्टभुजा मूती आहे. गाभाऱ्याचे दार मात्र बरेचसे ठेंगणे आहे. गाभाऱ्यास

जोडूनच भव्य सभा मंडप असून त्याचा जीर्णोध्दार १९९२ मध्ये करण्यात आला आहे. दरवर्षी नवरात्रात येथे मोठा उत्सव साजरा केला जातो. गेल्या काही वर्षापासून नवरात्रातील यात्रेच्यावेळी बैलबाजारात जनावरांचा मोठा बाजार 'नंदीयात्रा' या नावाने भरत असतो.

**अंबाबाई.** १८४४ मध्ये शामजी व्यंकटेश काळे यांनी सोमवार पेठेत हे देऊळ बांधले. देवीची मूर्ती सव्वा फूट उंच असून कोरीव व देखणी आहे. देवीसमोर पूर्वी सभामंडप होता. बाजूला डाव्या सोंडेचा गणपती, दत्तात्रेय पादुका व महादेवाची पिंड आहे.

**लक्ष्मी मंदिर.** सुमारे २०० वर्षांपूर्वी कुंभार समाजाकडून हे मंदिर उभारण्यात आले. १९८६ मध्ये त्याचा जीर्णोध्दार करण्यात आला. लक्ष्मीच्याच शेजारी म्हसोबापण आहे. आषाढात व अधिकमासात यात्रा भरते. गोरोबा पुण्यतिथी पण साजरी होते. ही लक्ष्मी नवसास पावते अशी श्रध्दा आहे.

**रेणुका मंदिर.** कृष्णा नदीपलीकडे सैदापूर गावात रेणुकेचे हे निसर्गरम्य हेमाडपंती मंदिर आहे. दंडकारण्याचा भेद करून तेथे आर्यांची वसाहत करण्याचा प्रयत्न परशुरामांनी केला. ते कोकणात जाण्यापूर्वी काही काळ कऱ्हाड परिसरात राहिले असावेत. कृष्णा नदीपलीकडील सिध्दपूर. (सध्याचे सैदापूर) येथे ते थांबले असावेत. तेथे त्यांनी आपल्या मातेचे पूजन केले असावे व याच जागेवर रेणुका देवीचे हे प्राचीन मंदिर बांधलेले असावे. रेणुकेची मूर्ती तेराव्या-चौदाव्या शतकातील असावी असा 'यादवकालीन मूर्ती ' या विषयावरील तज्ज्ञ डॉ. सुरेश रघुनाथ देशपांडे यांचा कयास आहे. मूळ मंदिर हेमाडपंती असून सभामंडप सुमारे शंभर वर्षापूर्वीचा असावा. दत्तसांप्रदायिक वासुदेवानंद सरस्वती टेंभे महाराजांचे परमशिष्य दीक्षितस्वामी यांनी या सभामंडपाचे काम केले आहे. १९६७ च्या तीव्र भूकंपाने हे मंदिर खिळखिळे झाले होते. आता त्याचा जीर्णोध्दार झाला आहे. गाभाऱ्यात श्रींचे सिंहासन त्यावर सुवर्णदक्षिणा व एक कोटी श्री जगदंबेच्या जपाचे टोकण बसवून त्यावर आई आदिशक्तीची जुनी मूर्ती बसवली आहे. ह्या प्राचीन मूर्तीवर सुमारे पन्नास वर्षांपूर्वी कोण्या भक्ताने सिमेंटचा लेप दिला आहे. वर चांदीचा मुखवटा आहे. आता तेथे नव्याने घडवलेली पाषाणमूर्ती सुमारे २७ इंच उंचीची, बागलकोट येथील

शालिगिरी काळ्याशार पाषाणात घडवलेली आहे. ती मूळ मूर्तीप्रमाणे कमलासनावर उभी, द्विभुज असून उजवा हात वर देणारा तर डावा हात अभय देणारा आहे. कोणतेही आयुध नाही. या नवीन मूर्तीच्या दोन्ही बाजूस परशुराम व जमदग्नी यांच्या पाषाणातील मूर्ती आहेत. याच रेणुकामूर्तीची पंचधातूंची ११ इंच उत्सवमूर्ती एका भक्ताने दिली आहे. महाराष्ट्र – कर्नाटकात रेणुका मातेवर अपार श्रध्दा असणारे अनेक लोक आहेत. एका बाजूला खोडशी धरणातून कोसळणारे फेसाळ जल, तर दुसरीकडे रम्य वनश्रीने युक्त असे कृष्णेचे पात्र या पार्श्वभूमीवरील रेणुकेच्या दर्शनाला व सहलीसाठी पौष महिन्यात विशेषत: मंगळवारी व शुक्रवारी कऱ्हाडातील बहुसंख्य कुटुंबे दर्शनास जातात.

**धानाई** .कऱ्हाडच्या पूर्वेस कृष्णा नदीपलीकडे कार्वे गावाच्या हद्दीत हे कार्वे, बहे व वाळवे येथील थोरातांचे देवस्थान आहे. सुमारे ४०० वर्षापूर्वी धनाजीराव थोरात यांनी कार्वे शिवारातील चिंचवनात देवीची उपासना व तपश्चर्या केली. तेव्हा देवी प्रसन्न झाल्यामुळे त्यांनी धानाई म्हणजे धनवासिनी देवीचे देऊळ बांधले. हे देऊळ भव्य असून सर्व बांधकाम दगडी आहे. जुन्या मध्ययुगीन वास्तुशिल्पाचा हा एक उत्तम नमुना आहे. शेजारीच धानाईची धाकटी बहिण जखूबाई हिचे मंदिर आहे. मुख्य मंदिराभोवती तटबंदी असून आतील बाजूस दगडी चिरेबंदी बांधकामाच्या ओवऱ्या भक्तनिवासासाठी आहेत. पूर्वेस छोटी पण वैशिष्ट्यपूर्ण दीपमाळ आहे. या दीपमाळेच्या पूर्वेस मूळ पुरूषाची समाधी आहे. या सर्व मंदिराच्या पूर्वेस भव्य दरवाजा व त्यावर उंच हवेली असून तेथे नगारखाना आहे. मंदिराच्या पश्चिमेसही भव्य दरवाजा असून त्यास लागूनच हत्तीखान्याची दगडी इमारत आहे. तेथेच हत्तीवर अंबारी चढविण्याची व्यवस्था आहे. मंदिराच्या पश्चिमेस उत्तम प्रकारच्या दगडी बांधणीची चौकोनी विहीर आहे. सबंध मंदिराच्या परिसर व प्रांगण दगडी फरशीने बांधले आहे. मंदिराच्या शिखरावर देवदेवतांचे दर्शन घडते.देवीची मूर्ती पाषाणसदृश कठीण रसायनात तयार केलेल्या चुनखडीची आहे. मूर्तीची उंची ४ फूट आहे. वरचा भाग निमुळता टोकदार किरीटासारखा आहे. खालच्या भागात नाक, डोळे व तोंड भव्य रूपात दाखविले आहे. मूर्ती शेंदूरवर्णी आहे. श्रावण सोमवारी धानाई कृष्णास्नानास कार्वे येथे येते. त्या दिवशी तिची

गावभर सवाद्य मिरवणूक निघते. चैत्र शु.१५ नंतर त्रयोदशीस विशाखा नक्षत्रावर येथे यात्रा भरते. तसेच नवरात्रातही उत्सव होतो.

**कालिकादेवी.** रविवार पेठेत बंडोबा तुकाराम मोहिरे यांनी १९६९ साली कासार समाजासाठी हे मंदिर बांधण्याचे ठरविले. १९७० मध्ये बांधकामही सुरू झाले. पण १९७३ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांच्या पत्नी व चिरंजीवांनी मोठ्या जिद्दीने ते काम १९९० च्या सुमारास पूर्ण केले. ३०'X ६०' ची ही दुमजली वास्तू असून पहिल्या मजल्यावर चौकोनी गाभारा, २०'X ३०' चा सभामंडप, प्रदक्षिणामार्ग व पुजाऱ्यासाठी निवासस्थान आहे. दुसऱ्या मजल्यावरील गाभारा अष्टकोनी आहे. पहिल्या मजल्यावर, कालिकादेवीची व दुसऱ्या मजल्यावर चांदीच्या गणेशमूर्तीची स्थापना केली आहे. शिवाची पत्नी आदिमाया हिचे उग्र रूप म्हणजे काली. तिची मूर्ती तामिळनाडूचे जगप्रसिध्द मूर्तिकार मुथ्थय्यास्वामी स्थपती यांनी काळ्या पाषाणात साडेतीन फूट रूंदीची व २५० किलो वजनाची बनवली आहे.

**मळाईदेवी.** सुमारे दोनहजार ते बावीसशे वर्षांपूर्वी आगाशिवाच्या पायथ्याशी असलेल्या यक्षिणवाटिका (जखिणवाडी ) येथील जखणाई देवीपासून जवळच वडाच्या झाडावर मळाईदेवी प्रगट झाली, अशी आख्यायिका आहे. पुराणातील भस्मासुराचा वध करण्यासाठी अवतरलेली मोहिनी म्हणजेच मळाई. मळाईदेवीची मुख्य मूर्ती उभ्या स्वरूपात पाच फूट उंचीची, संपूर्ण चंदनाच्या लाकडाची आहे. अतिशय रेखीव, आकर्षक व प्रसन्न चेहरा आहे. या मंदिराचा जीर्णोद्वार १९८५ मध्ये झाला. या देवीची मुख्य जत्रा आश्विन महिन्यातील नवरात्रात असते. दुसरी जत्रा रंगपंचमीच्या दिवशी असते. देवळाच्या बाहेर दीपमाळ असून देवळात सुमारे ५० कि. वजनाची घंटा आहे.

**चौंडेश्वरी.** रविवार पेठेत पाण्याच्या टाकीच्या पश्चिमेकडे बळी बाबाजी होगाडे यांनी आपली जागा १९०३ मध्ये देवांग कोष्टी समाजास दिली. १९२४ मध्ये जोते व गाभारा झाला. १९५३ मध्ये देऊळ पूर्ण झाले. १९८८ मध्ये जीर्णोध्दार झाला. देवीची मूर्ती संगमरवरी ३ फूट उंचीची रेखीव आहे.

**महालक्ष्मी.** खालच्या भोई गल्लीत नगर पालिकेच्या भुयारी गटार योजनेचे खोदकाम चालू असताना १९७१ मध्ये ही काळ्या पाषाणातील देवीची मूर्ती

मिळाली. गजानन मुळे यांनी पुढाकार घेऊन ८'X ८' असे देऊळ बांधले.

**दुर्गादेवी.** खालच्या भोईगल्लीतील आदिमाया महालक्ष्मीच्या मागील बाजूस हे देऊळ आहे. देवीचे चार मोठे मुखवटे आहेत. ज्येष्ठ महिन्यात यात्रा भरते.

**भवानी**.पंताच्या कोटात या भवानी मंदिराची उभारणी परशुराम उर्फ थोटेबाबा यांची पत्नी काशीबाई यांनी इ. स. १८०० मध्ये केली.

याखेरीज कृष्णा घाटावरील दुर्गा, सोमवारातील येसूबाई, शुक्रवारातील धनवडे यांचे 'सटवाई' (१७५२) व यल्लमादेवी अशीही देवींची स्थाने आहेत. नवजात बालकाला घराबाहेर पडतेवेळी प्रथम सटवाईला नेण्याची प्रथा आहे. गावकऱ्यांनी कोर्टाजवळ, दवाखान्यासमोर जरीमरीचे देऊळ बांधले.

## श्रीराम मंदिरे

**गोंदवलेकर राम.** सोमवार पेठेतील भैरोबा गल्लीत दक्षिणाभिमुख प्रवेशद्वार असलेल्या या मंदिराची प्रतिष्ठापना श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या हस्ते १९११ साली झाली. त्यावेळी मुख्य पीठाचे शंकराचार्य उपस्थित होते. सुरुवातीला मंदिरावर साधे छप्पर होते. मूळ जागा रामभाऊ देव यांची होती. बापूराव चिवटे यांनी त्यांच्याकडून ती विकत घेऊन हे मंदिर बांधले. राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती काले येथून करवून आणल्या. रामासमोर परंपरागत दास मारूती हात जोडून उभा आहे. शांताश्रम स्वामी हे काशीच्या तारकमठाचे अधिपती होते व ते ब्रह्मचैतन्यांचे शिष्यपण असावेत. ब्रह्मचैतन्यांच्या समाधीनंतर ते पंधरा वर्षे याच मंदिरात राहिले होते. त्यांची समाधी मुख्य मूर्तीच्या शेजारीच आहे. शिवाय गोंदवलेकर महाराजांच्या पादुकाही आहेत व त्याखाली महादेवाची पिंड पण आहे. देवालयाचे विश्वस्त चिवटे व केशव रामचंद्र काटकर हे असून १९३५ ते २००० या काळात देवाची पूजा व इतर व्यवस्था विनायकराव देशपांडे यांनी पाहिली.

**ठाकूरद्वार ऊर्फ रामदेव मंदिर ( बैराग्याचे राममंदिर ).** अर्जुनदास गुरू हरिदास बैरागी यांचे हे देऊळ कृष्णाबाई घाटाच्या पायऱ्या उतरून नदीकडे जाताना पूर्वाभिमुख असे आहे. त्याची स्थापना १८८० मध्ये झाली. या बैरागी यांनी मंगळीबाई जवाहरमल सिकची यांना केलेल्या विनंतीनुसार १९२४ मध्ये

त्यांनी १५००० रूपये खर्च करून देवळाचा जीर्णोध्दार केला. देऊळही मोठे प्रशस्त केले. मोठा तीन खणी दुमजली नगारखाना, दुपाखी पत्र्याचे पाख असलेली तुळशीकट्ट्याची व पाणी पडण्याची जागा, मोठा चौक, त्यामागे पाच खणी सभामंडप, सभोवार तिन्ही बाजूस पत्र्याचे आच्छादन असणारा गाभारा व त्याभोवती ४०'X ३०' प्रदक्षिणेची मोकळी जागा असे हे मंदिर आहे. गाभाऱ्यात राम, लक्ष्मण व सीता यांच्या सुमारे दोन फूट उंचीच्या संगमरवरी मूर्ती आहेत. समोर पारंपारिक दास मारूतीची मूर्ती व गाभाऱ्याच्या बाहेर दगडावर कोरलेली गणेशाची मूर्ती या सर्वच सुबक व रेखीव आहेत. १९५२ मध्ये या मंदिराचा ट्रस्ट करण्यात आला. संस्थापक विश्वस्त मंगळीबाईंचे पुत्र बाळकृष्ण जवाहरमल सिकची हे होते. त्यानंतर १९८० मध्ये विश्वस्त मंडळाची पुनर्रचना होऊन त्यामध्ये दादासाहेब देशपांडे, रमेश सिकची, चंद्रकांत सिकची व प्रभाकर हरी गिजरे हे आले.

**जोशी यांचा राम.** कृष्णाबाईचा घाट चढून आल्यावर समोरच हे राम मंदिर आहे. जोशी यांच्या पिढीजात मालकीचे हे मंदिर आहे. जुन्या धाटणीची संगमरवरी राममूर्ती पूर्वाभिमुख असून शेजारी लक्ष्मण, सीता व बसलेल्या स्थितीत हनुमंत यांच्या मूर्ती आहेत. पूर्वी हे मंदिर कौलारू होते. सभामंडप ३०'X ५०' एवढा आहे. शेजारी देवालयाचीच धर्मशाळा आहे.

याशिवाय कऱ्हाडात सोमवार पेठेतील १८२७ मधील दाजिबा वारूंजकर मोकाशी यांचा राम, शुक्रवारातील महादेवबुवा चिवटे यांनी स्थापना केलेले १८३८ मधील धनी कुलकर्णी यांचा राम अशी मंदिरे प्रसिध्द आहेत.

## श्रीकृष्ण मंदिरे

**बालाजी.** कऱ्हाडातील पिढीजात कापड व्यापारी लाहोटी हे होत. त्यांचे मूळपुरूष राजारामशेठ यांना झालेल्या स्वप्नदृष्टांताप्रमाणे त्यांनी खोदकाम केले. तेव्हा त्यांना काळ्या पाषाणाची स्वयंभू चतुर्भूज तीन-साडे तीन फूट उंचीची प्रसन्नचित्त व आल्हाददायक बालाजीची मूर्ती सापडली. तेथेच त्यांना ५०० नाणीही मिळाली. ही रक्कम वापरून राजाराम शेठ यांनी सोमवार पेठेत एक लहान देऊळ बांधले. व त्यात या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. पुढे किसनलाल

प्रेमराज यांनी कोरीव काम असलेला लाकडी सभामंडप व त्यानंतर श्रीमती रुक्मिणीबाई लाहोटी यांनी चांदीचे मखर आणि आता मूळ देवालय गाभारा सभामंडप कायम ठेवून सिमेंट कॉंक्रिटची दोन मजली प्रशस्त इमारत बांधली आहे. मूळ मंदिर, दगडी असून गाभाऱ्यात चांदीचे मखर, प्रदक्षिणामार्ग खाली मोठा चौक २०'X २५' चे सभागृह आहे.

**गोपाळकृष्ण.** पंतांच्या कोटाखाली माहेश्वरी समाजाचे १०० वर्षाचे जुने असे हे मंदिर आहे. कणिराम लाहोटी यांनी देवस्थान स्थापून गाभाऱ्याचे बांधकाम केले. गोपालकृष्णाची संगमरवरी मूर्ती त्यांनी १९११ च्या सुमारास बसवली. या मंदिराचा ट्रस्ट असून माहेश्वरी समाजाची मालकी आहे. १२'X १५' चा गाभारा, ३०'X ५०' चा सभामंडप, पुढे मोठा चौक असून देवालयाची पूर्वाभिमुख तीन मजली इमारत असून मागील बाजूस दोन मजली इमारत निवास व्यवस्था म्हणून आहे. मुख्य मूर्ती राधाकृष्णाची असून शिवाय श्रीराम, हनुमंत, महादेव पिंड, गरुड इत्यादी मूर्ती पण आहेत.

वरील दोन्ही मंदिरांत व त्यांच्या कार्यक्रमात माहेश्वरी (राजस्थानी) संस्कृतीचे हृद्य दर्शन होते.

**गरुड मामांचे राधाकृष्ण मंदिर.** १८१० साली अण्णा दीक्षित उमराणी यांनी कृष्णा घाट जेथून सुरू होतो तेथे उजव्या बाजूला एक कौलारू छोटे मंदिर बांधले. ते कोणत्या देवाचे होते हेही कळत नाही. पण १८७५ च्या महापुरात हे सर्व मंदिर अगदी मूर्तीसकट वाहून गेले. फक्त एक कमान बचावली होती. १९२१–२२ च्या सुमारास ही पडिक जागा सरकारजमा का करू नये अशा अर्थाची नोटीस त्यावेळचे मालक गोपाळ आप्पा उमराणी यांना आली. ते पंगू होते म्हणून त्यांनी ही जागा बक्षिसपत्राने बाळकृष्ण वामन गरुड ऊर्फ गरुडमामा यांना दिली व जागा वाचवण्यासाठी काहीतरी करा अशी विनंती केली. देऊळ नव्हतेच, कमानीतच मूर्तीची स्थापना करायची असे ठरले. त्यासाठी बाळूमामा गरुड आपले मित्र किसनलाल लाहोटी यांना घेऊन मुंबईला गेले. पण कमानीला साजेशी अशी मूर्ती त्यांना कोठेच मिळेना. शेवटी एका जुन्या मूर्तींच्या दुकानातील ढिगाऱ्यामध्ये त्यांना सांप्रतच्या राधा व कृष्णाच्या मूर्ती मिळाल्या. कृष्णाची मूर्ती मुरलीधर – मुरली वाजवणारी, पाय

दुमडलेली काळ्या संगमरवराची तर राधेची पांढऱ्या संगमरवरी पाषाणाची आहे. मंदिराच्या त्या अवशिष्ट कमानीतच या मूर्तीची प्रतिष्ठापना १९२२ मध्ये करण्यात आली. पुढे त्यावर लाकडी सभामंडप बांधण्यात आला. देवालयाचे बांधकाम व नित्य व्यवस्थेसाठी बाळूमामांनी आपले स्वत:चे राहते घर विकले व ते स्वत: मंदिरातच राहण्यास आले. १९४९ साली सुप्रसिध्द अभियंते बापूसाहेब मनोळीकर यांच्या प्रयत्नाने चातुर्मासात पुरूषोत्तम नारायण देवळालीकर यांचे प्रवचन सुरू झाले व ही प्रथा १९६० पर्यंत चालू होती. त्यात निरनिराळ्या विद्वानांची प्रचवनेपण होत. १९५५ पासून प्रतिवर्षी पौष महिन्यात ऋग्वेद संहिता स्वाहाकार करण्याची प्रथा सुरू झाली. ती आजतागायत चालू आहे. याशिवाय गोकुळाष्टमी, जयरामस्वामी वडगावकर यांची पुण्यतिथी असेही कार्यक्रम होतात.

**व्यंकटेश.** सोमवार पेठेत गिरीचे पुजारी श्री अर्जुनगिरी यांना दृष्टांत होऊन त्यांनी मूर्ती शोधली. ही मूर्ती मोगली आक्रमणाच्या भीतीने जमिनीत पुरून ठेवली होती. १७७५ मध्ये हे मंदिर बांधले. याही मंदिराचे आता भव्य व आधुनिक अशा मंदिरामध्ये रूपांतर झाले आहे.

**नरसिंह.** नरसिंहाची गावात एकूण तीन मंदिरे आहेत.१) संतसखू मंदिराच्या पाराजवळ १७४३ मध्ये अनगळ गोसाव्यांनी हे बांधले. (शके १६६६ रक्ताश्री संवत्सर) २) १८११ मध्ये गणेश देवांनी नरहरी (नरसिंह) व गणेश यांची देवालये स्थापन केली. ३) कुंभारवाड्याजवळ सोमवार पेठेत. यामधील मूर्ती अतिशय चांगली असून मंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे.

**सत्यनारायण (विष्णू).** सुमारे ११० वर्षापूर्वी बीड जिल्ह्यातील नारायणगडचे बाळाबुवा महाजन तळबीड येथील त्यांचे शिष्य केशवराव रामचंद्र जाधव (चंदुगडे) यांच्याकडे येत. त्यावेळी ते कऱ्हाडातही कृष्णास्नान व देवदर्शनासाठी येत. त्यांच्या भक्तांच्या विनंतीवरून बाळाबुवा यांनी सत्यनारायणाची अडीच फूट उंच देखणी रेखीव मूर्ती दिली. शुक्रवार पेठेत हे मंदिर बांधण्यात आले. महाराजांचे देहावसान येथे झाले. त्यांची समाधीही येथेच बांधण्यात आली. त्यांची पुण्यतिथी कार्तिक अमावस्येस साजरी करतात.

**कालियामर्दन श्रीकृष्ण (मुरलीधर).** कृष्णाघाटावर वाईकर दातारांनी

१७८९ मध्ये हे देऊळ बांधले. त्याची व्यवस्था चौकर पाहतात.

**विठ्ठल.** चर्मकार समाजाचे विठ्ठल मंदिर तांबट तालमीजवळ आहे. १९८३ मध्ये त्याचा जीर्णोध्दार झाला. गाभाऱ्यात ४ फूट उंचीचा विठ्ठल, साडेतीन फूट उंचीची रूक्मिणी अशा मूर्ती व महादेवाची जुनी पिंड आहे.

**संत सखूचा विठ्ठल.** या मंदिराची स्थापना १७७५ मध्ये जानोजी अवसरे यांनी केली. गाभाऱ्यात विठोबा- रखुमाईच्या मूर्ती असून समोर मंडपात पादुका व सखुबाईची मूर्ती आहे, वृंदावन आहे. दर एकादशीला दर्शनासाठी लोक येतात. या देवळास लागूनच मंडप होता. तो १९२६ सुमारास पडला बाजूच्या धर्मशाळाही जमीनदोस्त झाल्या. आता डॉ. मोहन कंटक यांच्या नेतृत्वाखालील विश्वस्तांनी सखू मंदिराचा संपूर्ण कायापालट केला आहे. सखू मंदिराशेजारीच वाळवंटात पुंडलिकाचे मंदिर पण आहे.

शिंपी आळीत श्रोत्री यांच्या घरात पंतप्रतिनिधींनी १८०३ मध्ये विठोबाची स्थापना केली.

**म्हसोबा.** कृष्णा घाटावर गरूडांच्या राधाकृष्ण मंदिरासमोर हे देऊळ आहे. पूर्वी मसूर उतारावरून गावात ये जा होत असे त्यामुळे तेथे एकादी वेस वगैरे असावी व तेथे हे दैवत असावे. कुंभार समाजाची या म्हसोबावर मोठी भक्ती आहे. श्रावण महिन्यात म्हसोबाला नारळ, दहीभाताचा नैवेद्य अर्पण करतात. कृष्णाबाई उत्सवासाठी मंडपाकडे जाताना व परत पुजाऱ्यांच्या घरी येताना म्हसोबाला नारळ देण्याची पध्दत आहे.

**नागोबा.** पंताच्या कोटाखाली पिंपळाजवळ, कमळेश्वर मंदिराजवळ व शिवाजीनगर मध्ये नागोबाची स्थाने आहेत.

## दत्तात्रेय मंदिरे

**पुरोहितांचा दत्त.** कऱ्हाडात दत्त चौकातील दत्त मंदिर प्रसिध्द असून त्यामुळेच या प्रशस्त चौकाला दत्ताचे नाव मिळाले आहे. १९२७ साली गोविंद हरी पुरोहित यांनी हे मंदिर बांधले. गाभारा व मंडप असून पाठीमागच्या बाजूला औदुंबर व त्या पलीकडे एक बांधीव विहीर आहे. त्यामुळे दत्ताला एक चांगला प्रदक्षिणा मार्ग झाला आहे. चौकाच्या बाजूला भव्य प्रवेशद्वार

आहे. पाठीमागे कोयना नदी असल्यामुळे भर गावात असून देखील हे मंदिर निसर्गरम्य झाले आहे.  दत्तात्रयाची मूर्ती प्रसन्नचित्त व आकर्षक आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार झाला (२००६) असून ते आता अधिक रम्य झाले आहे.

**आगाशिवनगर** येथे १९७७ साली सौ. यशोदा मारूतराव पाटील यांनी हे दत्तमंदिर बांधले. दत्तात्रेय कमलारूढ असून मूर्ती गारेची आहे. जवळच औदुंबर वृक्षपण आहे.

याशिवाय कृष्णाबाई घाटवर लाटकरांचा (१८००) व पंताच्या कोटात पेंढारकरांचा अशी दत्त मंदिरे आहेत.

**नवग्रह मंदिर.** एस. टी. स्टँडजवळील नवग्रहाचे मंदिर वैशिष्ट्यपूर्ण आहे. मध्ये मारूती व बाजूला नवग्रह अशी याची रचना आहे.

**नवी मंदिरे** – १९८२  मधील शिवाजीनगरमधील रामाचे मंदिर, विठामाता हायस्कूलजवळील साईमंदिर, गजानन हौसिंग सोसायटीमधील गणेश मंदिर, रूक्मिणीनगरमधील सिद्धकला ट्रस्ट  माता कलावती देवीचे हरी मंदिर, गजानन महाराजांचे मंदिर ही काही अलीकडील मंदिरे होत.

## मठ, आश्रम, संतांची मंदिरे

**मारुतीबुवांचा मठ.** गुरुवार पेठेत मध्यवर्ती चौकात हा मारुतीबुवांचा मठ आहे.  येथे विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती आहेत. नेर्ले (ता. वाळवा) येथील नाना महाराज नेर्लेकर यांचा देहूकर फडाशी संबंध होता. ते सध्याच्या मारूतीबुवांच्या मठाच्या जागेत राहत असत. कुंडलचे मारूतीबुवा लाड हे त्यांचे शिष्य. त्यांनी स्वत:चा फड सुरू केला. पंढरपूर येथे झेंडे गल्लीत मारूतीबुवांच्या मठाची भव्य वास्तू आहे. गोकुळाष्टमीचा उत्सव बुवांनी मोठ्या प्रमाणात सुरू केला. त्यामुळे त्यांच्याच नावाने हा मठ ओळखला जातो. मारुतीबुवांचा मृत्यू १९१३ मध्ये झाला. त्यानंतर दाजी (मामा), संतोबा शिंदे (१९४८) आण्णाबुवा सूर्यवंशी (नेर्ले)(१९५९) आणि सध्या भगवानमामा ज्ञानोबा जाधव १९५४ पासून मठाधिपती म्हणून आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बंडा महाराज कराडकर ऊर्फ तात्या (म्हणजेच प्रकाश सदाशिव जंत्रे) हे ब्रह्मचारी कार्यकर्ते, भगवान प्रासादिक मंडळ, कराड तालुका वारकरी संघ, संत वाङमय प्रसारक मंडळ,

व्यसनमुक्त युवक संघ, श्रीकृष्ण गोपालन संस्था इत्यादी उपक्रम मोठ्या जोमाने चालवत आहेत. मारुतीबुवांच्या मठात रोज सायंकाळी प्रवचन, पंचपदीचे भजन व प्रत्येक एकादशीस कीर्तन होते. गोकुळाष्टमी व तुकारामबीज, मारूतीबुवा, दाजीमामा यांची पुण्यतिथी तसेच चातुर्मासात नारदभक्तिसूत्र, चांगदेवपासष्टी इ. ग्रंथांचे चिंतन असे नित्यनैमित्तिक कार्यक्रम होत असतात. मठाचा जीर्णोध्दार १९९१ मध्ये झाला. १९८७ पासून पाच वेळा ज्ञानेश्वरी पारायणाचे भव्य प्रमाणावरील सोहळे झाले.

**जनार्दन महाराज.** वसंतगड येथे इंचगिरी सांप्रदायातील जनार्दनमहाराज हे संत होते त्यांनी हजारो साधकांना परमार्थाची शिकवण दिली, महाराजांनी अनेक गावे व्यसनमुक्त व अंधश्रद्धामुक्त केली.

**बाळनाथ बुवांचा मठ.** कोरेगाव जवळील त्रिपुटीचे गोपाळनाथबुवा यांनी कऱ्हाडात सुरू केलेली शाखा बाळनाथबुवांचा मठ म्हणून ओळखली जाते. मठाधिपती रामचंद्र एकनाथ घाडगे हे आहेत. त्यांचा वाडा मठासमोरच आहे. या वाड्यातील एका खोलीत यशवंतराव चव्हाण अभ्यास करीत. येथे शंकराचे मंदिर आहे. शंकराची गारेची सुंदर सुबक मूर्ती आहे. जवळच एकमुखी दत्ताची एक गारेचीच अपूर्णावस्थेतील मूर्ती आहे. समोर बाळनाथबुवांची संजीवन समाधी आहे. गाभाऱ्यातच तळघरात ४'x ६' आकाराची जप तपध्यानासाठी जागा असून ती खोल भुयारवजा असूनही तेथे वायुवीजनाची सोय चांगली आहे. उतरण्यासाठी जिनाही आहे.

**नामदेव मंदिर.** कऱ्हाडातील नामदेव शिंपी समाजाने १९५२ मध्ये रविवार पेठेत एक जागा खरेदी करून २०'x ५०' असे सभागृह बांधले. २५०–३०० वर्षापूर्वी एका घराच्या बांधकामात सापडलेली उजव्या सोंडेची गणपतीची मूर्ती तसेच राजस्थानातून तयार करून आणलेली संत नामदेवांची गारेची मूर्ती व काळ्या पाषाणातील विठ्ठल रखुमाईची मूर्ती त्या सभागृहात बसवण्यात आल्या. सभागृहाशेजारी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह पण बांधले आहे. गोकुळाष्टमी, नामदेव पुण्यतिथी इत्यादी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम होतात.

**श्रीधराश्रम.** सोमवार पेठेत कृष्णाकाठी हा आश्रम १९६० साली स्थापन झाला. त्यापूर्वी श्रीधरस्वामी कऱ्हाडास त्यांचे अनुगृहित डॉ. अ. ल. वाळिंबे

यांच्या निवासस्थानी येत. येथे आश्रम व्हावा अशी स्वामींची इच्छा होती. स्वामींच्या शिष्या लीलाताई पुजारी व गंगाक्का यांनी यात पुढाकार घेतला. काशीताई काळे यांनी आश्रमासाठी सध्याची जागा मोफत दिली व देणग्यांच्या आधारावर आश्रम उभा राहिला. येथे श्रीधर स्वामींचा मुक्काम होऊ लागला. १९६६ मध्ये या आश्रमाचा ट्रस्ट करण्यात आला. त्यात काशीताई काळे, दत्तोपंत शाळिग्राम, अण्णाबुवा कालगावकर, डॉ. वाघ, श्रीमती वाळिंबे हे भक्त होते. आश्रमात दासनवमी, श्रीधरस्वामी पुण्यतिथी, गुरुपौर्णिमा, रामनवमी इ. उत्सव होतात. प्रतिवर्षी दासबोध पारायण होत असते. शिवाय नित्यनियमाने भजन पूजन, आरती, दासबोध पठण व दर गुरूवारी भजन व रामदासी उपासना असते.

**संतसेना.** हे मंदिर नाभिक समाजाचे असून काझीवाड्याशेजारी आहे.श्रावण वद्य १२ ला तेथे संतसेना पुण्यतिथी साजरी होते.

याशिवाय भागवत बुवांचा मठ व चरेगावकरांचा मठ हेही प्रसिध्द आहेत.

### समाध्या

कृष्णेच्या तीरावरील परिपूर्णानंद स्वामी व घाटावरील नारायण दाजी देशपांडे (कोळेवाडीकर) यांच्या जिवंत समाध्या आहेत. तर तोफखाने स्वामी व ईश्वरानंद सरस्वती ऊर्फ काशीस्वामी यांच्या समाध्या ह्या त्यांच्या मृत्यूनंतरच्या आहेत. निरंजनस्वामींची समाधी वड्याच्या गणपतीजवळ आहे.

### यती - संन्यासी

कऱ्हाडात आता यशवंतराव चव्हाणांच्या समाधीसन्निध जो प्रीतिसंगम उद्यानाचा परिसर आहे तो स्वामीची बाग म्हणून प्रसिध्द आहे. रंगनाथ महाराज निगडीकर यांचे वडील व गुरूही परिपूर्णानंद स्वामी यांनी त्या बागेतील गोपाळेश्वर मंदिरापुढे १८४७ मध्ये जिवंत समाधी घेतली. तेव्हापासून ती बाग स्वामीची बाग म्हणून ओळखली जाई. कऱ्हाडच्या ग्रामोपाध्ये घराण्यातील भैरव दीक्षित १८३७ ते १८४६ व आप्पा दीक्षित गिजरे (कऱ्हाडकर) हे १८४६-१८५९ संकेश्वर पीठावर शंकराचार्य झाले.

शांताश्रमस्वामी हे हटयोगी सिध्दपुरूष होते. ते काशीहून कऱ्हाडास आले होते. देहत्यागानंतर कऱ्हाडच्या प्रीतिसंगमात देह विसर्जन करण्यास त्यांनी सांगितले होते. त्यांची समाधी सोमवार पेठेतील गोंदवलेकर राम मंदिरात श्रीराम मूर्तींच्या पायाशी आहे. तोफखाने स्वामी या नावाने प्रसिध्द असलेले एक संन्यासी १९५० च्या सुमारास कऱ्हाडात होते. त्यांचे वास्तव्य गोंदवलेकर राम मंदिरात होते. ते मुला-मुलींकडून गीता पाठांतर करून घेत. त्यांची समाधी बागेत आहे. ईश्वरानंद सरस्वती (काशी स्वामी) हे जगद्गुरू चंद्रशेखर भारती यांचे शिष्य. ते १९५६-५७ पासून कऱ्हाडात सोमवार पेठेतील भैरव मंदिरात राहत. त्यांचीही समाधी स्वामीच्या बागेत आहे.

सोमवार पेठेतील काळ्या मारूतीचे देऊळ ज्यांच्या जागेत आहे ते बाबाचार्य काळे, तसेच पोपटस्वामी हेही संन्यासी होते. करवीर पीठाचे शंकराचार्य म्हणून रामचंद्रबुवा कऱ्हाडकर (नरसिंहपूरकर) यांची त्या पीठाच्या विश्वस्तांनी १९८३ मध्ये नेमणूक केली होती. त्या नेमणुकीबाबत वाद होऊन प्रकरण उच्च न्यायालयापर्यंत गेले. सतरा वर्षांनी २००० मध्ये निकाल झाल्यावर रामचंद्रबुवा कऱ्हाडकरांच्या डोक्यावर सोन्याचा मुकुट चढविला. त्यानंतर त्यांनी २००४ मध्ये शंकराचार्य पदाची निवृत्ती स्वीकारली. कोटाखाली भवानीच्या देवळातील एका स्वामींचा उल्लेख शरश्चंद्र चिरमुले यांच्या 'वास्तुपुरूष' (पृ.५) मध्ये आहे.

कऱ्हाडच्या सोमवार पेठेतील भैरव गल्लीत राहणारे रामचंद्र गणेश जोशी हे १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारक. लढ्यात अपयश आल्यावर ते संन्यासी झाले. त्यांनी लंबोदरानंद स्वामी असे नाव घेतले. रेवस-अलिबाग रस्त्यावर कनकेश्वर हे शंकराचे स्वयंभू स्थान आहे. तेथे जवळच त्यांनी लक्ष्मी-गणेश-सिध्दिविनायकाचे मंदिर बांधले. ते ज्येष्ठ वद्य ७ शके १८२० (इ. स.१९०८) रोजी समाधिस्थ झाले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुरू प्राज्ञशाळेचे नारायणशास्त्री मराठे (केवलानंद सरस्वती) यांना कऱ्हाडच्या बाबाशास्त्री आठल्ये यांनी टेंभू येथे संन्यास दीक्षा दिली होती. सौराष्ट्रातील सोमनाथाचा जीर्णोध्दार ११ मे १९५१ रोजी झाला. त्या वेळी बाबा आठल्ये यांना केवलानंद सरस्वती यांनी

आपल्याबरोबर आवर्जून नेले होते. औदुंबर येथील श्री नृसिंह सरस्वती शाश्वत पूजा ट्रस्ट निधी कऱ्हाडचे ना. वा. ऊर्फ बाबुराव गोगटे यांनी १९६२-६३ मध्ये सुरू केला.

**यज्ञयाग**

कऱ्हाडात यज्ञ झाल्याचा जुना उल्लेख आढळतो. तो १८५३ चा ( शके १७७५). बाबाचार्य काळे यांनी केलेल्या या यज्ञासाठी कण्वशाखीय चंदावरकर दीक्षित, गजेंद्रगडकर तसेच काशीचीही विद्वान मंडळी आली होती. या यज्ञात कऱ्हाडच्याच विठोबा अण्णा दप्तरदार यांनी यज्ञकुंडे यथाविधी करून दिली होती. विठोबा अण्णा श्रौतस्मार्त कर्म विधीत निष्णात होते. यज्ञ कुंड रचनेसाठी त्यांना काशी क्षेत्रातूनही बोलावत असत. १९१४ मध्ये (शके १८३६) शिदुभाऊ गरूड यांनी यज्ञ केला होता. १९२८ मध्ये मुतालिक वाड्यात एक यज्ञ झाला होता. बहुधा हा पाचवड ता. वाई जि. सातारा येथील श्रौताचार्य धुंडिराज गणेश दीक्षित बापट यांनी केलेला चातुर्मास्य याग असावा. याच बापटांनी पुणे येथे १९५५ मध्ये वाजपेय यज्ञ केला होता. त्यात कऱ्हाडचे बाळकृष्ण रामचंद्र भागवत (चाफळकर) हे चमसाध्वर्यू होते. कोटातील पंतप्रतिनिधींच्या वाड्यात एक विद्वान अग्निहोत्री होते अशी शरश्चंद्र चिरमुले यांच्या 'वास्तुपुरूष' (पृ.८) मध्ये नोंद आहे.

सत्तेचे पाठबळ किंवा सामाजिक प्रतिष्ठेचे प्रोत्साहन नसतानाही विसाव्या शतकात वेदविद्येचे जतन संवर्धन करून तो वसा पुढील पिढीकडे सोपविणाऱ्या लक्ष्मणशास्त्री (सोनबा) उमराणी यांच्या षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्ताने १९५४ मध्ये हरिअण्णा गिजरे यांच्या पुढाकाराने त्यांच्या सर्व सहाध्यायांनी ऋक्संहिता स्वाहाकार (यज्ञ) केला आणि तेव्हापासून प्रतिवर्षी पौष महिन्यात पन्नासाहून अधिक वर्षे हा उपक्रम निरंतर चालू राहिला आहे. २००४ मध्ये सुवर्णमहोत्सवानिमित्ताने भागवत सप्ताह आणि ऋग्वेदाच्या जोडीस यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद यांचीही पारायणे करण्यात आली.

शंकर सदाशिव ऊर्फ भाऊकाका वैद्य यांनी वयाच्या ७१ व्या वर्षी १ जुलै १९६५ ते ३१ मे १९६६ या काळात अतिरूद्रानुष्ठान केले होते. अकरा

एकादशण्या म्हणजे एक लघुरुद्र, अकरा लघुरुद्र म्हणजे एक महारुद्र व अकरा महारुद्र म्हणजे एक अतिरुद्र. रोज अकरा तास याप्रमाणे सतत अकरा महिने हा कार्यक्रम चालू होता. मुख्य उपाध्याय हरिअण्णा गिजरे होते. या व्रताचा उद्यापनसोहळा १५ जून ते १९ जून १९६६ पाच दिवस चालला होता.

## मुस्लिम धर्मस्थळे

बहामनी आणि नंतरच्या आदिलशाही या मुस्लिम सत्तांच्या काळात कऱ्हाड हा एक महत्त्वाचा सुभा होता. तसेच दाभोळ बंदराच्या मार्गे हजला जाणाऱ्या मुस्लिमांचा महत्त्वाचा मुक्काम कऱ्हाडलाच होत असे. त्यामुळे कऱ्हाडला साहजिकच मुस्लिम धर्मस्थळे तुलनेने बरीच आहेत. यापैकी काही देवस्थानावरून असेही दिसते की मुस्लिम सत्ता येण्याच्या अगोदरच्या म्हणजे यादवांच्या काळात देखील मुस्लिम धर्मस्थळांची स्थापना व भरभराट होत होती.

संतांची देवस्थाने आणि फकिरांची देवस्थाने असे मुस्लिम देवस्थानांचे, दोन प्रकार आहेत. संत हे विवाहित तर फकीर सर्वस्वाचा त्याग करून परमेश्वरी मार्गाकडे आलेले असतात.

## संतांची देवस्थाने

**करडीपीर.** मंगळवार पेठेतील हे देवस्थान शेख फरीद यांच्या नावाने आहे. शेख फरीद यांच्या मृत्युनंतर म्हणजे इ. स. १२६२ नंतर हे उभारले गेले आहे. कऱ्हाडमधील हे सर्वात जुने मुस्लिम धर्मस्थान आहे. कऱ्हाडला मुस्लिम सत्ताधारी कलहराबाद वा करहार असे म्हणत. कलहरीचे करडी असे नामांतर होऊन हा करडीपीर झाला. या स्थानाच्या आवारात शेख फरीद यांचे कुटुंबीय व त्यांच्या सेवेत ज्यांनी आपले आयुष्य व्यतीत केले त्या सुलतान अली शहा उर्फ लालबाबा यांच्या समाध्या आहेत. शेख फरीद यांच्या वंशजांना विजापूरच्या सुलतानाने इ. स. १६३० मध्ये कऱ्हाडच्या आसपासच्या गावांमध्ये १०० एकर जमिनी इनाम दिल्या होत्या. शेख फरीद यांचा उरुस ७ मोहरम रोजी असतो. तेथे पंजे उभारले जातात.

**सात शहिद.** हे देवस्थान शुक्रवार पेठेत असून हुतात्म्यांच्या म्हणजे शहिदांच्या पाच कबरी असून हे हुतात्मे कोण हे मात्र माहीत नाही. मात्र त्यांची चिन्हे आहेत. पूर्वी येथे कच्च्या मातीची उत्तराभिमुखी इमारत होती आता पक्क्या विटांची इमारत आहे. पूर्वी येथे मोठा उरूस भरत असे. आज मात्र मोहरमध्ये पिराचे पंजे ठेवले जातात.

## फकिरी देवस्थाने

ऐहिक सुखांचा त्याग करून विरक्तपणे परमेश्वराची सेवा करणाऱ्या फकिराची कबर म्हणजे फकिरी देवस्थान. या देवस्थानाची व्यवस्थाही अविवाहित फकीरच बघतात. त्यांना नाडबंद म्हणतात. त्यांच्या मृत्यूनंतर त्या जागी दुसरा फकीरच येतो. अशा कऱ्हाडमधील कबरी खालीलप्रमाणे आहेत.

१. गुरूवारपेठेत जुम्मा मशिदीच्या आवारात **सैफुल्ला शहा बाबा** यांची कबर आहे. ती मनोरे बांधण्याच्या आधीपासून आहे असे म्हणतात. तेथे दरवर्षी उरूस साजरा होतो.

२. गुरूवार पेठेत अलीची कदमगाह व नबीचा राजा यांच्या दक्षिणेस सहा कबरी एकत्रित आहेत. त्याला **बलखंडीपीर** असे म्हणतात. मूळ बलखंडीबाबा हे अरबस्थानातील बलखंडी येथून आले. हे देवस्थान दर्गा या नावाने प्रसिध्द असून त्याची व्यवस्था सय्यद कुटुंबाकडे आहे. मौलालीचा दर्गा १३५० मध्ये बांधला.

३. बलखंडी बाबांच्या परंपरेतील एक फकीर **खाजा सय्यद मस्तान बाबा** यांची कबर गुरुवार पेठेतील दर्ग्याच्या पश्चिमेस अर्बन बँकेच्या इमारतीच्या पूर्व भिंतीत आहे. रमजानच्या २६ तारखेला बलखंडीबाबा व मस्तानबाबा यांचा उरूस दरवर्षी साजरा केला जातो.

४. सोमवार पेठेत खैरतखानाच्या बोळाच्या सुरुवातीस **बायजीदबाबा** यांची कबर आहे. या देवस्थानच्या इमारतीत पश्चिमेस तकीया असून मध्यभागी बायजीदबाबाची कबर आहे. या तकियाचे बांधकाम इ. स. १६७७ मध्ये झाले. आवारात यतीबशा, रोशनशा, मकबुलशा, गुलाबशा, मलमलशा इ.

च्या कबरी आहेत. या देवस्थानची व्यवस्था पाहण्यासाठी कोणी फकीर न राहिल्यामुळे शेजारील खैरतखान कुटुंबाकडे ही व्यवस्था आली. मोहरममध्ये येथे ताबूत व पंजे बसवले जातात.

५. कोटाखाली शुक्रवार पेठेत कवठीच्या झाडाखाली **फकीर रोडाशाबाबाने जकला पीर** यांचा हा तकिया बांधला. हा तकिया पूर्वाभिमुख होता व त्यांच्या पूर्वेस पाच कबरी होत्या. येथील फकीराने विवाह केल्यामुळे त्याचे वंशज येथील व्यवस्था बघतात. एका छोट्या खोलीत एक लहानशी कबर नव्याने बांधली आहे. येथेही मोहरममध्ये पंजे बसवले जातात.

६. गुरुवार पेठेत सध्याच्या जनकल्याण पतसंस्था व शिराळकर यांची इमारत या मध्ये **कासम सुलेमान फकीर** यांची लहानशी कबर आहे. हे देवस्थान सुमारे २०० वर्षापूर्वीचे असावे. मोहरममध्ये पंजे बसवण्याचा मान नदाफ यांचा असून त्याची व्यवस्था अली आवटे हे बघतात.

**स्मृतिस्थाने**

१. गुरुवार पेठेतील अलीची कदमगाह दर्गा मोहल्ल्यात दोन घुमटांपैकी पश्चिमेकडील घुमटाला **हजरत अलीची कदमगाह किंवा अलीचा रोजा** असे म्हणतात. येथे अली मूर्तजा यांच्या पायाचे ठसे होते म्हणून लोक पूजा करीत. सन १३९७-१४२२ या काळातील सुलतान हसन फिरोज बहामनी यांनी या ठिकाणी पूजा केल्याची नोंद आहे. येथे एक मेंदीचे झाड होते. ते खूप पवित्र मानले जाई व त्याला लोक नवसही करीत. तेथे मोठा उरूस भरत असे.

१४९१ च्या सुमारास कऱ्हाडच्या शहा सद्रुद्दिन या व्यापाऱ्याची काही मालवाहू जहाजे वादळात सापडली. तेव्हा त्याने जहाजे सुखरूप पोहोचल्यास घुमट बांधीन असा नवस मेंदीच्या झाडाजवळ केला. त्याची जहाजे सुखरूप पोहोचली. तेव्हा त्याने १४९२ ते १४९५ या काळात ३५२६ होन खर्च करून घुमट बांधला. पुढे या शहा सद्रुद्दिनने हाज यात्रेहून येताना हजरत पैगंबराचे अवशेष व हजरत अलींच्या पादुका आणल्या. पैगंबराच्या नावे एक स्मारक बांधले. पुढे शहा हिदायतुल्ला याने १५२६ मध्ये त्यावर एक सुंदर घुमट बांधला. त्यानीही पवित्र अवशेष त्या घुमटात ठेवले. अहमदनगरची

राजकन्या चांदबीबी हिने अलिमूर्तजा यांच्या घुमटावर एक घुमट बांधला. अलीची कदमगाह ही चौरस इमारत असून त्याच्या पहिल्या घुमटात एक पोटमाळा आहे. घुमटाच्या वरच्या बाजूस दरवाजा असून आत बसण्यासाठी जागा आहे. या दर्ग्यालाच मौलालीचा दर्गा असेही म्हणतात. हा १३५० मध्ये बांधला

२. **नबीचा रोजा** अलीच्या कदमगाहच्या पूर्वेस असून ती चौरसाकृती इमारत आहे. हा १३९१ मध्ये बांधला

३. **शमनामीरा** मिरजेचे पीर शमसुद्दिन ऊर्फ शमनामीरा यांची कबर पंताच्या कोटात नकट्या रावळाच्या विहिरीजवळ कोपऱ्यात आहे. ही इमारत साध्या कच्च्या विटांची, पत्र्याची आहे.

४. **राजे बागसवार ( वाघावर आरूढ)** यांचा चिल्ला म्हणजे स्मृतिस्थान नदीकाठी होता. या ठिकाणी एक पक्के बांधीव घुमट होते व तेथे पंजेही बसवले जात.१९७६ च्या महापुरात हा घुमट वाहून गेला.

५. **बावासफा व शंभूआप्पा** हा चिल्ला जोड कबरींचा असून शनिवार पेठेत यशवंत हायस्कूलसमोरील केंद्र शाळेच्या पश्चिमेस रस्त्यालगत आहे. येथे पूर्वी फकीरांचा तकिया होता व तेथे फकीर राहत. शंभूअप्पा हे बाबा सफाचे अनुयायी होते. या दोघांचे दोन वेगवेगळे घुमट उरूण इस्लामपूरला आहेत व तेथे प्रतिवर्षी मोठा उरूस होतो.

६. **ख्वाजाखिजरचा दर्गा** आदिलशाहीच्या काळात हाजला जाण्यासाठी दाभोळ बंदराकडे जाताना यात्रेकरू कऱ्हाडला जमत. १९४१ पर्यंत ही वहिवाट होती. एकदा अशा यात्रेकरूंच्या तांड्याची वाट चुकली व त्यावेळी एका सुफी संताने त्यांना वाट दाखवली व तो नंतर गुप्त झाला. हा सुफी संत म्हणजेच ख्वाजा खिजर. यांचा दर्गा सध्याच्या यशवंतराव चव्हाण स्मृतिसदनाजवळ आहे. या ठिकाणी कबर नाही. घुमटामध्ये आत तेलपणत्यांचे झाड आहे. दाभोळ येथेही याच ख्वाजाखिजरचा घुमट कऱ्हाडसारखाच आहे. हा दर्गा सौदागराने बांधला

७. **जाफर महंमद** हे मूळचे सैदापूरच्या मुल्ला घराण्यातील परमेश्वर भक्त. त्यांनी अनेक चमत्कार करून दाखवले. पण विजापूरच्या

आदिलशाहीची त्यांच्यावर इतराजी झाली व बादशहाचे लोक पकडण्यासाठी आले असता प्रीतिसंगमाच्या पश्चिम बाजूस भुईकोटाजवळ ते अदृश्य झाले. या स्थानावर पूर्वी निरनिराळ्या रंगाचे झेंडे लावले जात. आता तेथे कबर बांधली आहे.

८. **तुरताबी.** शनिवार पेठेत ७ फूट चौरस आकाराच्या जागेत एक कमान व छोटीशी कबर आहे. पूर्वी तुरताबीचा उरूस मोठ्या प्रमाणावर होत असे.

९. **माँसाबका लंगर.** अहमदनगरच्या चाँदबीबीने कऱ्हाडमध्ये माँसाहबका लंगर या नावाने अन्नछत्रही सुरू केले होते. त्यासाठी लागणारे साहित्य आजूबाजूचे शेतकरी व व्यापारी यांच्याकडून मोफत गोळा केले जात असे. ही पध्दत सुमारे १९५८ पर्यंत चालू होती. हे ठिकाण रूक्मिणीनगरच्या उत्तरेस असून मोहरममध्ये तेथे पंजे बसवले जातात.

१०. **आसुरखाना.** दर्ग्याच्या दक्षिण अंगास चाँदबीबीने बारा इमाम ऊर्फ आसुरखान्याची इमारत बांधली आहे. तेथे मोहरमध्ये पंजे बसवतात. त्या पंजांना प्रथम क्रमांकाचे स्थान आहे.

**मशिदी**

चांदबीबीच्या काळात कऱ्हाडमध्ये १८ मशिदी होत्या असे सांगतात.

१. **जुम्मा मशिद.** ही कऱ्हाडातील सर्वात जुनी व मोठी मशीद गुरुवार पेठेत आहे. विजापूरचा पाचवा राजा पहिला आदिलशहा याच्या कारकीर्दीत १५७३ ते १५७६ या काळात ह्या मशिदीचे बांधकाम झाले. विजापूरचे सरदार आणि कऱ्हाडचा मोकाशी कामिलखान इस्माईलखान याचा मुलगा इब्राहिम याने मशिदीचे बांधकाम पैलवान अली बिन अहमद इस पिहानी ऊर्फ तुज्जेतखान याच्याकडून करवून घेतले अशा अर्थाचा शिलालेख मशिदीत आहे. या मशिदीचे क्षेत्र ३३५१ चौ. मि. (३३.५ गुंठे) एवढे असून इमारत ८२ फूट लांब, ४१ फूट रूंद व ३० फूट उंच आहे. सर्व बांधकाम दगडी आहे. इमारतीत सुंदर कमानी, खांब व घुमट आहेत. भिंतीवर व कमानीवर कुराणातील श्लोक (आयते) कोरलेले एकूण ९ लेख आहेत. १८९८ साली हैदरशहा बाबाशहा कागदी इ. मंडळींनी मशिदीच्या समोर वजू करण्यासाठी पाण्याचा हौद व प्रवेशद्वार बांधून घेतले. मशिदीच्या उत्तरेस हमामखाना नावाची इमारत

असून मनोऱ्याजवळील मळग्यात (कमानीवजा खोल्या) घोडी बांधली जात. १९६९ पासून मशिदीची व्यवस्था विश्वस्तांकडून बघितली जाते. या मशिदीस ५० एकर जमिनीचे उत्पन्न मिळते. अलीकडे या मशिदीच्या परिसराचे सुशोभीकरण व नूतनीकरण करण्यात आले आहे.

२.**बागवान मशिद.** गुरुवार पेठेतच चावडी चौकात शनिवारात जाणाऱ्या रस्त्याच्या पश्चिमेकडे ही मशिद आहे. जुम्मा मशिदीच्या बांधकामावरील मजूर येथे नमाज पढत असे सांगतात. १८९६ मध्ये या मशिदीची दुरूस्ती झाली व १९९५-९८ या काळात मशिदीचे तीन मजली आर. सी.सी. मध्ये बांधकाम करण्यात आले.

३. **मोमीन मोहल्ला मशिद.** १८९८ मध्ये अब्दुल्ला हाजी वलीउल्ला वाईकर यांनी दगडी पक्के बांधकाम करून ही मशीद बांधली. १९७४-७६ या काळात मशीद आर. सी. सी. मध्ये बांधून १९९३-९४ या मध्ये तिच्यावर दुसरा मजला चढवण्यात आला आहे. प्रवेशद्वाराजवळ सुंदर मनोराही उभा करण्यात आला आहे.

४. **मंगळवार मशिद.** मीरखान पठाण यांनी १९ व्या शतकाच्या सुरवातीस स्वत:च्या जागेत मशिदीसाठी दगडविटांची शेड बांधली. पुढे १९४१ मध्ये तिचे पक्के बांधकाम झाले असावे. आता १९९३ मध्ये ही मशिद आर.सी.सी. बांधकामाने युक्त अशी दुमजली झाली आहे.

५.**छोटी मशिद.** जुम्मा मशिदीच्या पूर्वेस गुरूवार पेठेत स्त्रियांसाठी म्हणून वेगळी अशी ही मशिद होती. १९५८ पासून हिचा उपयोग पुरूष करू लागले. १९७८ मध्ये या मशिदीची दुरूस्ती करण्यात आली.

६. **मदिना मशिद.** आदिलशाहीच्या काळात काझी लोकांची एक मशिद रविवार पेठेत होती. मौलाना महंमद इब्राहिम आबू परदेशी यांनी ही भग्नावस्थेतील मशिद काझी मंडळींकडून जीर्णोध्दारासाठी घेतली. १९४२ मध्ये घुमट व मनोरे बांधून घेतले. १९५६ मध्ये यामध्ये आणखी जागेची भर पडून आता १९९७ मध्ये आर.सी.सी. दोन मजली मशिदीत तिचे रूपांतर झाले आहे.

ही मशिद तबलिक जमातीचे प्रमुख ठिकाण आहे.

७. **काझी मशिद.** आदिलशाहीच्या काळात ही मशिद देखील स्त्रियांसाठीच

होती. आता तेथे पुरूष नमाज पढतात. रविवारातील या मशिदीवर १९४२ मध्ये घुमट व मनोरे बांधले गेले. ते पाडून १९९६ मध्ये वरचा मजला बांधण्यात आला.

८. **कच्छी मशिद.** गुरूवार व रविवार या पेठाच्या सरहद्दीवर साहेबजी मणेर यांच्या मालकीच्या जागेत एक लहानशी झोपडीवजा मशिद होती. १९२५ मध्ये त्यांनी लोकवर्गणीने ती बांधण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पुढे हाजी अहमद कासम कच्छी यांनी स्वखर्चाने ही मशिद बांधून पूर्ण केली. म्हणून ती कच्छी मशिद या नावाने ओळखली जाते.

९. **दर्गा मशिद.** एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मियाँ मुजावर यांनी गुरुवार पेठेत ही मशिद बांधली. १९९४-९६ या काळात तिचे रूपांतर आर.सी.सी. दुमजली इमारतीत झाले.

१०. **खोजा मशिद.** हाशमभाई  हाजी यांनी खोजा समाजासाठी खरेदी केलेल्या शनिवार पेठेतील जागेत कमरूद्दिन हाजी यांनी व महंमद अली मंगळजी खोजा यांनी १९६८-६९ मध्ये ६०० चौ. फुटात ही दक्षिणाभिमुख मशिद बांधली. या मशिदीची व्यवस्था आगाखान फौंडेशनकडे आहे.

११. **मक्का मशिद.**  शनिवार पेठेतील ही मशिद सौदागरने बांधली. १९३८ मध्ये पहिला जीर्णोध्दार झाला व १९९७ मध्ये ही मशिद आर.सी.सी. मध्ये बांधण्यात आली. एका वेळी २००० लोक येथे नमाज पढू शकतात.

रूक्मिणीनगरच्या उत्तरेस असलेल्या लंगर मशिदीत आता नमाज पढत नाहीत पण मोहरममध्ये पंजे बसवले जातात. अलीकडे शनिवार पेठेत **मस्जिदे अकसा,** कार्वे नाक्याजवळ दक्षिणेकडील त्रिमूर्ती कॉलनीत **मस्जिदे कुबा,** कार्वे नाक्याजवळील सुमंगल नगरमध्ये **इनाम मशिद,** ऑक्सिडेशन पाँडजवळ **निहाल मशिद,** मुजावर कॉलनीत **नुरानी मशिद,** मलकापूर येथे वारणा हॉटेलजवळ **उस्मानी मशिद** अशा मशिदी आहेत. पूर्वी एक **घोडेपीर मशिद** होती असेही सांगतात.

**कऱ्हाड ग्रामीण भाग**

१. बनवडी येथे अब्दुल्ला गारी हा दर्गा, त्याच्या उत्तरेस लंगरची साखळी व पूर्वेस सवानी बाबाची कबर आहे. अब्दुल्ला गारी  यांनीच इ. स. १५८२

मध्ये कडेगावच्या जुम्मा मशिदीचे काम केले होते.

२. गोटे येथे चिस्ती महंमद शहाबाबा नावाची कबर आहे. पूर्वी येथे मोठा तकिया असल्यामुळे या कबरीस तकिया म्हणूनच म्हटले जाते. मुसलमानी रज्जब महिन्याचा १४ तारखेस येथे उरूस भरतो. तर सफर महिन्याच्या शेवटी बुधवारी सर्व मुस्लिम बांधव येथे एकत्र जमतात.

३. कापिल येथे सात शहीद हे ठिकाण असून तेथे दरवर्षी उरूस होत असतो.

४. या देवस्थानापासून जवळच ९० चौ. फुटाची एक विहीर असून तिच्या आत नैऋत्येस सहा गाळ्यांचा एक महाल असून त्यात कुंवा महाल असे म्हणतात.

५. या कुंवा महालाच्या जवळच एक भव्य सुंदर घुमट असून त्यात मधोमध एक कबर असून ती बादशहाच्या मलिकेची आहे अ स े म्हटले जाते. त्यावरूनच या गावाचे नाव मलेकापूर - मलकापूर असे पडले असावे .

**ईदगाह**

शहराच्या आग्नेय कोपऱ्यात आदिलशाहीपासून कब्रस्थानसाठी जागा राखून ठेवलेली असून या कब्रस्थानातच ईदचा नमाज पठण्यासाठी इदग्याची जागा ठेवण्यात आली आहे. येथे २५० फूट लांब व ३० फूट उंचीची भिंत असून पूर्व बाजूस २० फूट उंचीचे प्रवचनासाठी व्यासपीठही ठेवण्यात आले आहे. त्यावर जाण्यासाठी पायऱ्या पण आहेत. भिंतीची तळाची रूंदी ९ फूट व माथ्यावर ४ फूट रुंदी आहे. ही भिंत किंवा इदगाह १५७३ साली बांधण्यात आला आहे. मौलाना निजामद्दीन अब्दुला मुल्ला यांची कऱ्हाडच्या मुस्लिम समाजाने शहर इमाम म्हणून निवड केली. ते शाही कब्रस्थानात इमाम म्हणून ईदची नमाज पठण करतात.

इदग्याच्या पूर्वेस दोन लिंबांच्या झाडाखाली **पोलादखानाची कबर** आहे. या कबरीच्या दगडाचा आवाज पोलाद वाजवल्यावर जसा येतो तसा येत असतो.

**जैन समाज**

भारतात जैन धर्माची सुरूवात बौध्द धर्मापेक्षा प्राचीन म्हणजे इ. स.पू. ५ व्या शतकापूर्वीची असली तरी कऱ्हाडमध्ये जैन संस्कृती सातव्या शतकापासून असावी. कारण त्या अगोदर पाचव्या शतकात सामंतभद्र नावाचा एक जैन पंडित येथे वादविवाद करण्यासाठी आला होता. मात्र हा वादविवाद हिंदू तत्त्वज्ञानासंबंधी होता की जैन तत्त्वज्ञानासंबंधी होता हे कळत नाही. इ. स. १२८८ च्या एका ताम्रपटात अशी माहिती मिळते की जैनांमधील दिगंबर व श्वेतांबर या पंथातील मतभेद विकोपास गेले असता कऱ्हाडचा राजा भूपाल याने यापनीय संघ स्थापन करून हे मतभेद मिटवण्याचा प्रयत्न केला. अर्थात १२८८ च्या ताम्रपटात एवढी जुनी माहिती कशासाठी दिली हा प्रश्न उरतोच. या पूर्वीच्या ११७८ च्या एका ताम्रपटात असेही दिसते की चालुक्य सम्राटांनी कलचुरी घराण्यातील जैन बिनजल राजास कऱ्हाड प्रांत दान दिला होता व तो तेथे राज्य करीत होता.

मध्ययुगात महाराष्ट्रात अत्यंत अस्थिर राजकीय परिस्थिती असताना व्यापार उदीम हा प्रामुख्याने गुजराती व मारवाडी या समाजाकडूनच सांभाळला जाई. या समाजातल्या व्यापाऱ्यांना श्रेष्ठी म्हणत. त्यांना अभय देऊन त्यांच्याकडून पेठा वसवल्या जात. त्यामुळेच महाराष्ट्रातल्या खेडोपाडी हा समाज पसरला आहे. कऱ्हाडात विसाव्या शतकाच्या सुरुवातीस जैन मंडळींची आठ घरे आणि लोकसंख्या तीस ते चाळीस होती. प्रामुख्याने ही मंडळी गुजरात, राजस्थान व कच्छ येथून आली होती व शेंगा, गूळ, हळद, कापड, किराणा यांच्या व्यापारासाठी येथे येऊन स्थायिक झाली होती. २००६ मध्ये जैनांची ५६० घरे व लोकसंख्या २००० होती. सध्या कऱ्हाडमधील जैन हे जरी प्रामुख्याने व्यापारात असले तरी आता त्यांनी समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात यशस्वी प्रवेश करून आपला ठसा उमटवला आहे.

सुरुवातीला संख्येने अत्यल्प असलेल्या या समाजाने पूजेअर्चेसाठी श्री पार्श्वनाथ भगवान यांचे एक लहानसे मंदिर बांधले. पुढे १८८९ मध्ये शेठ हातीभाई मलुकचंद यांनी पंचवीस हजार रुपयांची पहिली देणगी देऊन कऱ्हाडमधील एक भव्य मंदिर उभारण्याला सुरुवात केली. या मंदिरास

बस्तीचे देऊळ म्हणतात. हे मंदिर जैन धर्मातील तिसरे तीर्थंकर भगवान संभवनाथ यांचे होणार होते. रविवार पेठेतील या मंदिराची जागा चिंतामणी पार्श्वनाथ यांच्या मंदिरासमोरीलच होती. ही जागा मूळची तेली लोकांची होती व ती जागा शेठ परमचंद यांनी खरेदी केली व मंदिरास देणगी म्हणून दिली. शेठ हातीभाई यांच्या हस्ते पाया खणण्यास सुरुवात झाली व त्याचवेळी कवड्याचे पोते व धनद्रव्यांनी भरलेली पेटी सापडली. मात्र या द्रव्याचे अपहरण करण्यात आले. त्याकाळी कऱ्हाडातून प्रसिध्द होत असलेल्या 'विदूषक' या वर्तमानपत्रात धन सापडल्याचा उल्लेख आहे. यथाकाली मंदिर पूर्ण झाले. संभवनाथांची मूती श्री मोतीचंद जयचंद यांनी अलाहाबादजवळील रतन पोळ येथून आणली. ही मूर्ती देखील ऐतिहासिक असून औरंगजेबी जुलुमातून वाचलेली आहे. इ. स. १६२६ साली ही मूर्ती कस्तुरभाई लालभाई यांच्या पूर्वजाने आपल्या आईच्या स्मरणार्थ केली होती. १९०६ साली मोठ्या थाटामाटात हिची शास्त्रोक्त प्रतिष्ठापना झाली. यावेळी श्रीमंत पंतप्रतिनिधी यांनी आपला पंताचा कोट या जैन समारंभाला वापरण्यासाठी दिला होता. परंतु नग्नमूर्ती म्हणून अनेक कर्मठ सनातन्यांनी विरोधही केला होता. मूर्तीच्या मिरवणुकीच्यावेळी या लोकांनी दारेही लावून घेतली होती व पोलिस पार्टीही मागवण्यात आली होती.

या मंदिराची व्यवस्था मोतीचंद जयचंद व राजाराम मगनचंद मेहता हे कित्येक वर्षे बघत होते. नंतर राजाराम मयाचंद, श्री मंगलदास लल्लुभाई शहा यांनी बरेच वर्षे वहिवाटदार म्हणून मंदिराची सेवा केली. १९५० च्या नव्या विश्वस्त कामकाजाप्रमाणे पहिले विश्वस्त मंडळ शिवलाल उगारचंद यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आले. १९३३ मध्ये या मंदिराच्या आवारातच शांतीनाथ भगवान चौमुखी मंदिराची उभारणी झाली. शांतीनाथ, संभवनाथ, कुंचुनाथ व सुविधीनाथ या चार मूर्तीची चौमुखजी म्हणून चारी दिशांना तोंड करून प्रतिष्ठापना झाली. या शिवाय शासन देवता व गुरूमूर्ती यांच्याही मूर्ती बसविल्या आहेत. पुढे याही मंदिरांचा जीर्णोध्दार करण्याचे ठरले. हा जीर्णोध्दार अतिशय भव्य प्रमाणात व पूर्ण शास्त्रीय पध्दतीने करण्यात आला. मंदिरात लोखंडाचा कोठेही वापर करण्यात आला नाही. भारतीय परंपरेतील उत्कृष्ट

शिल्पकलेने नटलेले पश्चिम महाराष्ट्रातील हे नयनरम्य मंदिर समजले जाते. या मंदिराचे काम सुमारे पाच वर्षे चालले होते. नेमिनाथ भगवान व मूळ गाभाऱ्यातील नव्या मूर्तीचा अंजनशलाका (प्राणप्रतिष्ठा) समारंभ हा ७-१२-१९९४ रोजी झाला तर १९-२-१९९९ रोजी रामचंद्र सूरिश्वरजी यांच्या गुरुमंदिराची स्थापना मोठ्या थाटात झाली. हे मंदिर म्हणजे एक मोठा मंदिर समूहच आहे. मंदिरातील स्तंभांवर व इतरत्र अनेक देवदेवता, जैन धर्मातील मुख्य तीर्थक्षेत्रे कोरण्यात आली आहेत. गुरुमंदिरात गुरुमहाराजांचा उपदेश व चरित्रे सांगणारी भित्तिचित्रे आहेत. छत व भिंत यावर काचकाम केले आहे आणि मुख्य म्हणजे आता हा सर्व मंदिर समूह संगमरवरात बांधला गेला आहे. मंदिरासमोरच नूतनीकरण झालेली तीन मजली धर्मशाळा आहे. त्यासाठी देवचंद शहा व श्रीमती चंचलाबाई राजाराम मेहता यांनी देगण्या दिल्या आहेत. याच आवारात जैन धार्मिक शिक्षण देण्याच्या हेतूने धर्मोत्तेजक पाठशाला १९४७ मध्ये सुरू करण्यात आली. श्री. चिमणलाल हिरालाल शहा हे तिचे पहिले अध्यापक होते. समाजासाठी मर्यादित असे वाचनालय बा. मो. शहा यांनी सुरू केले ते आता या पाठशाळेकडे आले आहे. सुमारे ३५०० ग्रंथ तेथे आहेत. २००० मध्ये शेठ जयंतीलाल मोदी भोजन शाळा सुरू झाली. येथे अल्पदरात जैन पध्दतीचे जेवण सर्वांना मिळू शकते. २००५ मध्ये मारुतीबुवा मठासमोर शेठ बाबुलाल पदमसी शहा सांस्कृतिक भवन हे बहुउद्देशीय भवन बांधण्यात आले आहे. इ. स. २००६ या वर्षी या भव्य अतिशय सुंदर अशा मंदिरात १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून संपूर्ण वर्षभर अनेक भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कऱ्हाड येथे द. महाराष्ट्र जैन श्वेतांबर परिषद राजाराम मयाचंद शहा यांच्या प्रेरणेने भरली होती.

वाढत्या जैन समाजाच्या सोयीसाठी उपरनिर्दिष्ट बस्तीच्या देवळाखेरीज शनिवार पेठेत तहसीलदार कचेरीसमारे **महावीर स्वामी** (९-६-१९७९), रविवार पेठेत पागे यांच्या घराजवळ **सुमतिनाथ** (११-६-१९९३), शिवाजी हाऊसिंग सोसायटीत **अभिनंदन स्वामी** (१-१२-१९९५), शनिवार पेठेत महावीर नगरात **नेमिनाथ** (१७-६-२००५) अशी मंदिरे झाली असून रविवार पेठेत येथे नवीन मंदिराचे बांधकाम चालू आहे याशिवाय १९५२ मध्ये रविवार पेठेत हिरालाल

शहा यांचे **पार्श्वनाथ भगवान,** १९६५ मध्ये पोपटलाल शिवलाल शहा यांचे सोमवार पेठेतील **पद्मप्रभू** आणि १९९७ मध्ये परमार परिवाराचे शुक्रवारातील **सुविधिनाथ** अशी तीन गृहमंदिरेही झाली आहेत.

## बौध्द धर्मीय

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे १९५६ नंतर महाराष्ट्रात पूर्वास्पृश्यांमध्ये बौध्द धर्म स्वीकारण्यास आरंभ झाला. त्यामुळे कऱ्हाडमध्ये देखील प्रामुख्याने १९५६ नंतर बौध्द वस्ती अस्तित्वात आली. आज बौध्दधर्मीय समाज बुधवार पेठेत तीन आळ्यांत विखुरला आहे. वरची आळी थोरवडे यांची, मधली लादे यांची तर खालच्या आळीत कांबळे-काटरे यांची वस्ती आहे. त्यांची एकूण घरे ४५०-५०० असून लोकसंख्या ४००० ते ५००० आहे. याशिवाय शिवाजीनगरजवळील स्टेडियम परिसरात व कृष्णा पुलाजवळ पण या समाजाची वस्ती आहे.

इतर धर्मीयांची जशी प्रार्थनास्थळे म्हणजे मंदिरे, मशिदी असतात तशी बौध्दांची प्रार्थनास्थळे म्हणजे विहार हे होत. पण कऱ्हाडमध्ये विहार ह्या संज्ञेस पात्र अशी वास्तू नाही. अलीकडे माता रमाबाई हॉल हा लादे मंडळीनी बांधलेला हॉल विहार म्हणून वापरला जातो. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ बांधण्यात आलेले सांस्कृतिक समाज मंदिर हेही धर्मकार्यार्थ वापरले जाते. कऱ्हाड शेजारील बनवडी येथे मात्र विहार आहे. कऱ्हाडमध्येही बुध्दिस्ट सोसायटी विहार बांधण्याचा प्रयत्न करीत आहे.

कऱ्हाडमधील बौध्दधर्मीय दरवर्षी महाड, भीमा कोरेगाव, नागपूर व मुंबई या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी संबंधित असणाऱ्या ठिकाणाची यात्रा करतात. १४ एप्रिल आंबेडकर जयंती व वैशाख पौर्णिमा म्हणजे बुध्द जयंती ही गावातच उत्साहाने साजरी होते. गुढ्यांऐवजी पंचरंगी धम्मचक्र व निळे ध्वज उभारले जातात. मिरवणुकी काढल्या जातात. उदबत्ती व मेणबत्ती प्रज्वलित केली जाते.

बौध्द समाजाचे विधि हे श्रामणेर व बौध्दाचार्य हे करतात. त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था बुध्दिस्ट सोसायटीमार्फत केली जाते. बौध्द समाजात

धार्मिक, सांस्कृतिक कार्य करणारी सुमारे दहा मंडळे आहेत. रक्तदान, धर्मजागृती, गरजूंना मदत अशा तऱ्हेची कामे ही मंडळे करीत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमेटी ही कमेटी प्रमुख असून त्यांच्यामार्फत उत्सव पार पाडले जातत. द बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया यांच्या वतीने धर्मशिबिरे पार पाडली जातात. दरवर्षी २४ डिसेंबरला जखिणवाडीला धर्मयात्रेचे आयोजन केले जाते.

गेल्या ५० वर्षांत या समाजात खूप बदल झालेला दिसतो. हिंदूधर्माचे देवधर्म, आचार विचार, यात्रा हे कटाक्षाने टाळले जाते व बौध्द धर्माचेच रीतिरिवाज पाळले जातात. शैक्षणिकदृष्ट्या समाजाची खूप प्रगती झाली असून डॉक्टर, वकील, प्राध्यापक, इंजिनियर यांचे प्रमाण लक्षणीय आहे.

**ख्रिश्चन**

कऱ्हाड शहरात ख्रिश्चन समाज संख्येने अतिशय कमी म्हणजे सुमारे ५०० व एकूण शहराच्या लोकसंख्येच्या ०.८ % एवढाच आहे. असे असले तरी या समाजानेही या शहराच्या प्रगतीत आपला वाटा उचलण्याचा प्रयत्न केला आहे. कऱ्हाड शहरातील ख्रिश्चन समाजाचा ज्ञात इतिहास सुमारे १२० वर्षांचा आहे. २५ मे १८८९ रोजी कराड शहरातील एकमेव चर्च अमेरिकेतील कमिशन ऑन एक्युमेनिकल मिशन अँड रिलेशन्स ऑफ द प्रस्बिटेरियन चर्च या संस्थेने स्थापन केले. हे चर्च प्रभात टॉकीजकडून कोर्टाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पूर्व वाजूस टाऊन हॉलच्या पिछाडीस सुमारे एक एकर जागेत उभे आहे. तेथे सुमारे ३० लोकांची सोय होऊ शकते. त्या मागे अमेरिकन मिशनरी रेव्हरंड ह्युम हार्डिंग यांचे प्रयत्न होते. त्या काळी कऱ्हाडचीच लोकसंख्या कमी असल्यामुळे ख्रिश्चन लोकांची संख्या हाताच्या बोटावर मोजता येईल इतकीच होती. मात्र पुढे इतर शहराप्रमाणे निरनिराळ्या निमित्ताने शहरातील ख्रिश्चनांची संख्याही वाढत गेली. त्यामुळे सध्याची चर्चची इमारत अपुरी पडत आहे व आता मोठी इमारत बांधण्याची योजना आखण्यात आलेली आहे. सामान्यपणे रविवारी सकाळी किंवा संध्याकाळी ख्रिश्चन धर्मीय सामुदायिक प्रार्थनेसाठी चर्चमध्ये जमत असतात. या दिवसाला शब्बाथ किंवा विश्रांतीचा पवित्र दिवस असे म्हणतात. कऱ्हाड येथील

चर्चमध्ये कऱ्हाडप्रमाणेच आजूबाजूच्या अगदी विटा खानापूर पासून ते रत्नागिरी चिपळूणपर्यंतच्या अनेक गावातील लोक उपासनेला येत असतात.

कऱ्हाड चर्चचे प्रशासन उत्तर भारतासाठी असलेल्या चर्च ऑफ नॉर्थ इंडिया यांच्याकडून केले जाते. सी.एन.आय.ची विभागणी २६ धर्मप्रांतात होते. त्यापैकी कोल्हापूरला असलेल्या धर्मप्रांतामध्ये कऱ्हाडचा समावेश होतो. कोल्हापूर धर्मप्रांताचे रेव्ह. बी. आर. तिवडे हे तर कऱ्हाड चर्चचे रेव्ह. जे. बी. मोरे हे धर्मगुरू आहेत. त्यांचा प्रशासकीय मदतीसाठी पास्टोरेट कमिटी काम करते. त्यामध्ये प्रा. व्ही. बी. गायकवाड (सचिव), डॉ. जॉन एस. अँड्रयूज (खजिनदार), व पी. बी. एव्हांजनेर, जे. वाय. तेलंग, दयानंद पवार, सुनील गायकवाड, हेमंत महापुरे व सौ. एल. एम. घोरपडे हे सदस्य म्हणून काम पाहतात.

कऱ्हाड शहरातही ख्रिश्चन धर्मीयांचे दोन पंथ आढळतात. त्यापैकी प्रोटेस्टंट हा सुधारणावादी पंथ असून कऱ्हाड चर्चमध्ये याच पंथाच्या लोकांची उपासना चालते. ही उपासना मराठीमध्ये असते. रोमन कॅथलिक हा परंपरावादी पंथ असून त्यांना स्वत:चे असे चर्च नाही. याशिवाय इतर छोटे छोटे प्रार्थनापंथही आहेत.

कऱ्हाडमधील ख्रिश्चन पंथीय इतर ठिकाणांप्रमाणेच ख्रिसमस किंवा नाताळ, गुडफ्रायडे व इस्टर हे सण साजरे करतात.

कऱ्हाड शहरातील ख्रिश्चन समाज हा शांतताप्रिय व सामाजिक बांधिलकी मानणारा समाज आहे. सर्व जातिधर्माच्या लोकांशी हा समाज मिळून मिसळून राहतो व नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मग ती स्थानिक, राज्य किंवा राष्ट्रीय कोणत्याही पातळीवर असो ताबडतोब मदतीला धावून जातो. शिक्षणक्षेत्रात हा समाज खूप पूढे गेलेला आहे. होली फॅमिली कॉन्व्हेन्ट हायस्कूल ही इंग्रजी माध्यमाची शाळा खूप नावाजलेली मानली जाते. अनेक शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर्स, इंजिनियर्स यांनी या नगरीच्या विकासातील आपला वाटा उचललेला आहे.

कऱ्हाड ख्रिश्चन चर्चच्या परिसरात इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच ख्रिश्चन लोकांसाठी एक कम्युनिटी हॉल बांधणे

अशा तऱ्हेचे  या समाजाचे संकल्प आहेत.

**उत्सव – यात्रा**

कऱ्हाडमध्ये निरनिराळ्या धर्मीयांची जी देवस्थाने आहेत त्यांचे जे परंपरागत सण व उत्सव असतात ते नियमितपणे होत असतातच. राम, कृष्ण, दत्तात्रेय यांच्या मंदिरातून त्यांच्या जयंत्या होत असतात. तरी पण काही उत्सव हे संपूर्ण कऱ्हाडलाच नव्हे तर आजूबाजूच्या परिसरालाही आपलेसे करतात अशा काही उत्सवांची माहिती  खाली दिली आहे.

**कृष्णाबाई उत्सव.** कृष्णा नदीच्या घाटावर कृष्णाबाईचे मंदिर आहे. या कृष्णाबाईचा प्रतिवार्षिक उत्सव चैत्र वद्य प्रतिपदेपासून वद्य चतुर्थीपर्यंत पंतप्रतिनिधी संस्थानामार्फत होत असे. प्रतिनिधींनी कऱ्हाड शहर ब्रिटिश सरकारकडे दिल्यानंतर १८९१ च्या सुमारास ग्रामस्थांनी वर्गणी करून हा उत्सव साजरा करण्यास सुरूवात केली. उत्सव काळात कृष्णेच्या वाळवंटात मोठा मंडप उभारून तेथे उत्सवमूर्तीची स्थापना केली जाते. त्यासाठी आदल्या दिवशी म्हणजे चैत्र शु. १५ ला उत्सवमूर्ती कृष्णाबाई पुजाऱ्यांच्या घरून निघून भैरोबा गल्ली, कमानी मारूती, चावडी चौक मार्गे घाटावर मिरवत आणली जाते. उत्सव काळात शहरातील प्रेमराज किसनलाल लाहोटी, गंगाबिसन जयनारायण बंग या दानशूर व्यापाऱ्यांनी एकेका दिवसाच्या महाप्रसादाची जबाबदारी उचलली ती परंपरा अजूनही चालू आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात उत्सव साजरा  करण्यात थोडे शैथिल्य आले होते. १९५७ पासून या उत्सवास व्यापक स्वरूप आले. विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम व अन्नदान हे सर्व उपक्रम उत्साहाने होतात. उत्सवात मंगळवारी किंवा शुक्रवारी श्री कृष्णाबाईचे हळदी-कुंकू झाल्यानंतरच कऱ्हाडातील घरोघरी चैत्रगौरीचे हळदीकुंकू करण्याची प्रथा आहे. शेवटच्या दिवशी छबिना निघून पुजाऱ्यांच्या घरी श्री कृष्णाबाईची उत्सव मूर्ती पोचविण्यात येते. त्यानंतर व्यंकटेश मंदिराजवळील चौकात येसूबाईची जत्रा साजरी केली जाते.

यासाठी श्री कृष्णाबाई उत्सव समिती ही नोंदणीकृत धर्मादाय संस्था झाली असून लोकवर्गणीतून निर्माण झालेल्या या संस्थेने श्री कृष्णाबाई

उत्सवाखेरीज गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार, शालेय क्रीडा स्पर्धा आणि इतर सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम सुरू केले आहेत. कोटाच्या प्रवेशद्वारी आणि जुन्या मुतालिक वाड्याच्या जागी अनुक्रमे श्री कृष्णाबाई आणि प्रीतिसंगम अशी दोन भव्य सांस्कृतिक सभागृहे या संस्थेने उभी केली आहेत. तुकाराम हरी शिंदे, महादेव विनायक खंडकर आणि १९८५ पासून वसंतराव वराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेचे काम उत्साहात चालू आहे.

**श्री कृष्णाबाईची जत्रा** उत्सवाचा शेवटच्या दिवशी म्हणजे चैत्र वद्य चतुर्थीस आणि श्रावणातील शेवटच्या सोमवारी अशी वर्षांतून दोन वेळा भरते. या काळात पंचक्रोशीतील देवदेवता वाजतागाजत श्री कृष्णाबाईच्या भेटीसाठी येत असतात.

कार्तिक पौर्णिमेस कृष्णा नदीवरील सर्व घाटांवर देवळांवर व दीपमाळांवर तेलाच्या पणत्या आणि जोडीला विद्युत दीपमाळा अशी रोषणाई केली जाते. याला **घाट पाजळणे** (प्रज्वलित करणे) असे म्हणण्याची पध्दत आहे.या रात्री वाळवंटात शोभेचे दारूकाम व आतषबाजी केली जाते.

**गणेशोत्सव.** लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप देण्याच्या कितीतरी आधी कऱ्हाडात १८३३ मध्ये शनिवार पेठेत तेली मंडळींनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला होता तर रविवार पेठेतील श्री सद्‌गुरू मंडळ १८६० पासून गणेशोत्सव करीत असे. स्वातंत्र्योत्तर काळात या मंडळाचे नाव जयहिंद गणेश मंडळ असे झाले. गुरूवार पेठेत ज्ञानोबा शेठ बटाणे यांनी १९०५ पासून गणपती बसवण्यास सुरूवात केली. १९५० मध्ये कऱ्हाडात २५ ठिकाणी सार्वजनिक गणपती होते शिवाय १० ते १५ बालचमूने बसवलेले गणपती होते.

कऱ्हाडातील तवर गल्लीतील जयभारत गणेश मंडळ (१९५०), शुक्रवार पेठेतील शिंदे गल्लीतील श्री कला विकास गणेश मंडळ (१९५२) आझाद चौकातील नवजवान गणेश नवरात्र उत्सव मंडळ (१९५२), रविवार पेठेतील देवांग गणेश मंडळ (१९५३) कराड नगर पालिका सेवक गणेशोत्सव मंडळ (१९५४), हाटकेश्वर मंदिरातील सोमवार पेठ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (१९५५), दिवटे गल्लीतील आझाद माळ (स्था. १९५५) आणि कासार

गल्लीतील श्री गणेश मंडळ (स्थापना १९५६) ही मंडळे पन्नासांहून अधिक वर्षे सातत्याने गणेशोत्सव साजरे करीत आहेत.

**मारुती उत्सव.** अण्णासाहेब मुतालिक व त्यांच्या वडिलांनी १८६५ मध्ये सोमवार पेठेतील खैरतखानाच्या बोळासमोर, सध्या डॉ. पटवर्धन, कुमठेकर यांची घरे आहेत तेथे जंगी यांच्या घरात मारुतीचा उत्सव सुरू केला. एका वर्षी आकस्मिकपणे आग लागून जंगीची इमारत भस्मसात झाली. तेव्हापासून सोमवार पेठेतील व्यंकटेशाच्या मंदिरात हा उत्सव होऊ लागला. नरहर गोविंदशेठ बिजुटकर, अनंतराव लाटकर, वासुदेव नाईक घाटे, बंडोपंत चक्रदेव, गणपतराव ढवळीकर, बाळासाहेब जाधव, गोपाळशास्त्री उमराणी, गोविंद दीक्षित गरूड, दत्तोपंत पोंक्षे, अंबुराव आटकेकर यांनी मारूती उपासक मंडळ या नावाने धार्मिक कार्यक्रम व शारीरिक खेळांच्या स्पर्धा इ. उपक्रमाने हा मारुती उत्सव चालू ठेवला. प्लेगच्या साथीत प्रमुख कार्यकर्त्यांचा बळी गेल्याने उत्सव यथातथाच होऊ लागला होता. दत्तोबा गोवारकर, केशवराव निगुडकर यांनी पुन्हा पूर्वीसारखा उत्सव सुरू केला. १९२७–२८ मध्ये हाटकेश्वर मंदिरात व १९३० पासून घाटावरील जोशी राम मंदिरात मारुती उत्सव आजतागायत नियमितपणे चालू आहे. सुरुवातीस मल्लखांब, पोहणे, पळणे, बुध्दिबळ अशा स्पर्धा होत. दत्तोपंत सहस्त्रबुध्दे, गुंडोपंत बेलापुरे, डॉ. डी. जी. देशपांडे यांच्या सहकार्याने भाऊकाका गरूड आणि रामकिसन सुरजमल यांनी हुतूतूचे सामने भरविण्यास सुरूवात केली. हे सामने हनुमान मंडळाचे म्हणून १९४१ अखेर गाजले. नंतर राजकीय घडामोडी, शिधानियंत्रण इ. कारणामुळे उत्सवाचे स्वरूप निव्वळ धार्मिक राहिले. १९६० नंतर पुन्हा पूर्वपरंपरेला साजेसा मोठा उत्सव होऊ लागला. मंडळाच्या शताब्दिनिमित्त १९६७ मध्ये महारूद्र स्वाहाकार करण्यात आला होता.

पांडुअण्णा शिराळकर आणि म. ह. दुवेदी यांनी तासगावचे वे. शा. सं. सदाशिवशास्त्री भिडे यांच्या हस्ते १९२४ मध्ये कऱ्हाडात **गीताजयंती उत्सव** सुरू केला. सध्या हा उपक्रम वेदपाठशाळेमार्फत होतो.

**मोहरम सण**

कऱ्हाडात मोहरमचा सण उत्साहाने साजरा केला जातो. त्यात सर्वधर्मीय

लोक सामील होतात. मोहरममध्ये पंजे आणि डोले यांची मोठी विसर्जन मिरवणूक निघते. दरवर्षी मोहरमध्ये लंगर मशिदीत सात पंजे ख्वाजा खिजरच्या दरग्यात दोन पंजे, मंगळवारातील करडीपीर सात शहीद, गुरुवार पेठेतील शिराळकरवाड्याजवळील कासम फकीर येथे प्रत्येकी एक असे पंजे बसवले जातात तर सोमवार पेठेतील बागवान, सुतार, खैरतखान बोळातील वायजिदबाबा आणि जामा मशीद यांचे ताबूत किंवा डोले असतात. या दोघांची मोठी विसर्जन मिरवणूक निघते. मिरवणुकीत दांडपट्टा, लाठी फिरवणे तलवारीचे कमळ इ. प्रात्यक्षिके होतात. दांडपट्टा खेळणाऱ्यात अब्बास सगाजी अंबेकरी हे प्रसिद्ध वस्ताद होते. दामद बापू बागवान, बाबू ढालाईत, अहमद मुजावर हे वाघाची वगैरे सोंगे काढून खेळ करीत. दर्गा मोहल्ल्यातील बारा इमाम ऊर्फ पंजे आसदखानाच्या इमारतीत दरवर्षी बसवले जातात. त्याचे धार्मिक विधी मुजावर करतात. मोहरमच्या ८ तारखेस येथे उरूस होतो. गुरुवार पेठेतील कागदी समाजाकडे पंजे बाहेर काढण्याचे तर गावातील पंजे वाहण्याचे काम खोडशी, सैदापूर, वारूंजी येथील सुतार व आंबेकरी यांचे असते. निखाऱ्यातील आंघोळ घालण्याचे काम इनामदार यांच्याकडे तर साफसफाई रंगरंगोटीचे काम ढालाईत यांच्याकडे असते. या पंजांना कऱ्हाडात पहिले स्थान असते. मोहरम आल्यावर हे पंजे नबीचा रोजा व अलीची कदमगाह या इमारतींत विभागून ठेवतात.

मेहेतर समाजाच्या वतीने **वीर गोगादेव याचा जन्मोत्सव** दि. ५ ऑगस्ट २००६ रोजी कऱ्हाडात प्रथमच विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

**उत्सव, मिरवणुका**

याशिवाय वड्याचा गणपती, दैत्यनिवारिणी यांचेही उत्सव वैशिष्ट्यपूर्ण असतात. अश्विन शु १ व १० या काळात दैत्यनिवारिणीला जाण्याची प्रथा आहे. तर पौषात सैदापूरच्या रेणुकेचा मोठा उत्सव असतो.

गणेशोत्सव विसर्जन, दुर्गादेवी विसर्जन, महावीर जयंती, ईद, पैगंबर जयंती, आंबेडकर जयंती व शिव जयंती या दिवशी कऱ्हाडमध्ये मोठमोठ्या मिरवणुका निघातात.

*****

१६

# संकीर्ण

**'कऱ्हाड माहात्म्य'**

महाक्षेत्र या दृष्टीने कऱ्हाडचे प्राचीनत्व आणि महती स्कंद पुराणातील 'कृष्णा माहात्म्य' (विराज वैभव छापखाना, वाई, कार्तिक शु.१२ शके १८०७ म्हणजेच इ. स. १८८५) भागात कथन केली आहे. एकोणीसाव्या अध्यायात करहाट-क्षेत्र-संगमाचे वर्णन केले आहे. कृष्णा-वेण्णा आणि कोयना (ककुद्मती) यांची त्यात स्तुती असून त्यांच्या संगमात स्नान केल्याने सद्गती प्राप्त होते अशी फलश्रुती सांगितली आहे. स्कंदपुराणांतर्गत माहात्म्याचा काळ इसवी सन दहाव्या-अकराव्या शतकाचा आहे. या 'कृष्णामाहात्म्य' नंतर त्याच्या आधारे 'करहाटकमाहात्म्य' हा संस्कृत हस्तलिखित ग्रंथ रचलेला असावा. त्या ग्रंथात बहुधा फक्त आठ अध्यायच असावेत. 'करहाटकमाहात्म्य' या संस्कृत ग्रंथाची प्रत उपलब्ध होऊ शकली नाही. तथापि त्या ग्रंथातील काही निवडक श्लोक पु. पां. गोखले ह्यांच्या 'साहित्यिक कऱ्हाड' या पुस्तकात मिळाले ते पुढे देत आहोत. मूळ संस्कृत ग्रंथाचा उपयोग करून कोणा नीळकंठ भैरव या कवीने मराठीत ओवीबद्ध 'कऱ्हाटकोपाख्यान' लिहिले असावे. या हस्तलिखित पोथीच्या काही प्रती उपलब्ध आहेत. मूळ मराठी ग्रंथ तीनशे-चारशे वर्षांपूर्वी लिहिलेला, त्याच्या १८८२ मध्ये केलेल्या हस्तलिखित प्रतीवरून दाजी गुरव (तारुख, ता. कराड, जि. सातारा) यांनी स्वत: १९६५ मध्ये पोथी उतरवून घेतली. त्यावरून १९९७ मध्ये मो. के. कुंटे व त्यांच्या पत्नी विजया कुंटे (पुणे) यांनी मुद्रित रूपात ती प्रसिद्ध केली. (कुंटे यांचे प्राथमिक-माध्यमिक शिक्षण कऱ्हाडात झाले असून महाराष्ट्रातील मंदिरांचा इतिहास व छायाचित्रे यांचे संकलन त्यांनी परिश्रमपूर्वक केले आहे.)

'कऱ्हाटकोपाख्यान' या मराठी ग्रंथात २१ अध्याय आहेत. एकविसाव्या अध्यायाच्या अखेरीस 'आता पुढील अनुसंधान। चंडिकेचे महदाख्यान।।' अशी ओवी आहे. त्यावरून हा ग्रंथ अपूर्ण स्वरूपातच आहे असे दिसते. 'मध्यदेशी महाक्षेत्र । श्री कऱ्हाटक नाम पवित्र। वसते स्थान ममप्रिय' (१ - २३) असे श्री शंकरांनी स्वत: म्हटले असून तेच पार्वतीला या क्षेत्राची माहिती देत आहेत अशी कल्पना केली आहे.

पहिल्या अध्यायात कऱ्हाटकच्या मित्रदत्त या वेदविद्यासंपन्न ब्राह्मणाचा व्यसनाधीन व चौर्यकर्मप्रवीण मुलगा आणि गरुड यांची किरातनगरात गाठ पडते, त्यामुळे गरुड कऱ्हाटकास येऊन हजार वर्षे प्रीतिसंगमावर स्नान करून तपसाधना करतो आणि ब्रह्मा-विष्णू-महेश यांच्याकडून 'या स्थळाचे नाव गरुडतीर्थ राहील व तेथे स्नान करणाऱ्या व्यक्तीस अश्वमेध यज्ञाचे पुण्य मिळेल' असा वर प्राप्त करतो, असा कथाभाग आला आहे. अरुणाची व गरुडाची जन्मकथा आणि आपल्या आईची दास्यत्वातून सुटका करण्यासाठी तो अमृतकुंभ कृष्णा-नदीच्या वरप्रसादाने मिळवितो, ही कथा १८ व्या अध्यायात आहे. अयोध्येचा राजा वशिष्ठाच्या शापाने नरभक्षक होऊन फिरत फिरत कऱ्हाटकास येतो. तेथे कऱ्हाटकच्या श्रीकर या पुण्यशील व्यक्तीचे दर्शन घडते आणि तो पापमुक्त होतो. श्रीकर ब्राह्मणाच्या उग्र तपाने प्रसन्न होऊन शंकर श्रीकराकडे रोज सुवर्णपात्रातून अमृत पाठविण्याची इंद्राला आज्ञा देतो. 'आपले (श्रीकर) आणि देवाचे (हाटकेश) असे दोघांचे मिळून नाव या क्षेत्रास असावे' या श्रीकराच्या विनंतीनुसार या महाक्षेत्राचे नाव 'श्रीकरहाटक' होते. (अध्याय २ ते ४). दुष्प्रवृत्त गौतम आणि सत्प्रवृत्त धर्मदत्त यांचा वृत्तान्त आणि भैरवतीर्थाचे महत्त्व ५ व ६ या अध्यायांत सांगितले आहे. कऱ्हाडास नौकाविहार करताना बुडालेल्या आणि नागराजाच्या कृपेने सुखरूप परत आलेल्या चंद्रसेनाने कऱ्हाटकातच कृष्णास्नानाचा आनंद घेत हाटकेश्वराची उपासना करण्यात उर्वरित आयुष्य घालविले. (अध्याय ७).

आठव्या अध्यायात गणेशजन्माची कथा सांगितली आहे. दक्षकन्या दाक्षायणी कऱ्हाटकास प्रीतिसंगमात आपल्या सख्यांसह विवस्त्र स्नान करीत होती व त्यावेळी पहाऱ्यासाठी तिने आपल्या मळापासून तयार केलेला पुत्र उभा केला होता असे म्हटले आहे. गजासुराचा वध करून त्याचे डोके त्या पुत्राच्या कलेवराला लावून भाद्रपद शु. चतुर्थीस गणेशाराधन केले ते कऱ्हाटकातच. पण आपणच

तयार केलेल्या पुत्रास नमस्कार कसा करावा या अहंकाराने दाक्षायणी तिकडे फिरकली नव्हती. हिमालयकन्या पार्वतीच्या खडतर तपश्चर्येनंतर प्रसन्न झालेल्या शंकरांनी पार्वतीला तिच्या पूर्वजन्मातील हकिकत ऐकवून 'कऱ्हाटकस्थित गणेशाची आराधना करून तो प्रसन्न झाल्यावरच आपले शुभ-मंगल होईल'अशी अट घालून कऱ्हाडच्या गणपतीचे महत्त्व विशद केले आहे. हिरण्यकश्यपूच्या वधानंतर क्रोधाविष्ट नृसिंह सौम्य झाला ते कऱ्हाटकच्या प्रीतिसंगमात स्नान केल्यावरच. (अध्याय ९ ते ११). कऱ्हाटकातील श्री लक्ष्मीच्या कृपेने मार्कंडेयाचा जन्म झाला. त्या मार्कंडेयाचे तीर्थ कृष्णाकाठी संगमापासून सर्वात शेवटी आहे. (अध्याय १२). चंद्रचूड हा ज्ञानदान-संपत्तिदान-अन्नदान-इच्छादान करणारा. पक्षीरूपाने आलेल्या इंद्राला त्याने स्वत:च्या देहाचे मांस काढून दिले. (अध्याय १३). पुढील १४-१५ या अध्यायात भस्मासुराची कथा असून भस्मासूर मागे लागला त्यावेळी आपण श्री कऱ्हाटक दर्शनामुळे वाचलो असे शंकर पार्वतीस सांगतात. येथील तुकाई-मळाई या मोहिनीरूपधारिणी आहेत.

देवदास पत्नी सायला पुढील जन्मी गणेश ब्राह्मणाची पत्नी पालिका झाली. त्या दोघींना झालेल्या प्रीतिसंगमातील स्नानाचा लाभ सांगितला. (अध्याय १६) दैत्यनिवारिणीच्या दर्शनाने दशरथाचे श्रावण व त्याचे आईवडील यांच्या हत्येचे पातक दूर झाले (अध्याय १९-२०). सीता वियोगानंतर श्रीराम दैत्यनिवारिणीच्या दर्शनास आले होते (अध्याय २). शेवटच्या २१ व्या अध्यायात जमदग्नी-रेणुका-परशुरामाची कथा सांगितली आहे. परशुरामाने वडिलांची आज्ञा शिरसावंद्य मानून आपल्या आईचा वध केला होता, पण कऱ्हाटकवासिनी लक्ष्मीच्या कृपेने रेणुका जिवंत राहिली.

कृष्णा-वेण्णा-कोयना यांचे प्रवाह कसे वहात गेले, त्यांचा संगम कसा झाला यांचे वर्णन व कृष्णा काठच्या कऱ्हाटक क्षेत्रातील जुन्या मंदिरांचे भौगोलिक तपशील बरेचसे बरोबर असले तरी इतर कथाभागांचा कऱ्हाटकशी लावलेला संबंध ओढून ताणून आणला आहे असे दिसते.

कऱ्हाडकडे येण्यापूर्वी साताऱ्याजवळ माहुली येथे कृष्णा आणि वेण्णा यांचा संगम झाला असला तरी त्या कऱ्हाडास येतात, कृष्णा-वेण्णा या जोडनावानेच. येथे कोयनेस त्या मिळाल्या म्हणून त्रिवेणी संगम झाला असे मानतात. कोयना नदीचा उल्लेख संस्कृत व मराठी दोन्ही पुराणांत ककुद्मती

असा केला आहे. आगाशिवाच्या भैरवदऱ्यात उगम पावून मध्येच गुप्त झालेली वेणी नावाची नदी उडपी चौकाच्या मागील बाजूस कोयनाकाठी नागझरीचे कुंड आहे, तेथे प्रगट होते व पुन्हा पुढे गुप्त स्वरूपात कोयनेस मिळते. अशी उपपत्ती कुमार गरुड यांनी 'सकाळचे' ना. वा. ढवळे यांना सांगितली. (सकाळ १-९-१९९२) पण संस्कृत मराठी ग्रंथात सर्वत्र कृष्णा-वेण्णा असाच शब्दप्रयोग असल्यामुळे तो तर्क निराधार वाटतो.

आपल्या पतीने आपण उपस्थित नसता यज्ञ केला म्हणून ब्रह्मा-विष्णू-महेश या तिघांना 'स्त्रीरूप धारण कराल' असा शाप सावित्रीने संतापून दिला म्हणून या तिघांनी नद्यांची रूपे धारण केली. ककुद्मती (कोयना) म्हणजे ब्रम्हरूप, कृष्णा म्हणजे विष्णुरूप आणि वेण्णा म्हणजे शंकररूप त्यामुळे कऱ्हाटकास प्रीतिसंगमाच्या रूपाने तिन्ही देवांचा वास झाला आहे. अशी समजूत आहे. (अध्याय १६) तसेच या प्रीतिसंगमामुळे सत्त्व, रज, तम या त्रिगुणांपैकी रज तमाचा लोप होऊन कृष्णेच्या रूपाने केवळ शुध्द सत्त्व गुण राहतो असे मानतात. (अध्याय १३).

गुरू हा ग्रह प्रत्येक राशीत एक वर्ष याप्रमाणे एकेका राशीस बारा वर्षांनी येतो. त्याप्रमाणे गुरू हा कन्याराशीत ज्या वर्षी असतो त्या काळात कन्यागत पर्वकाळ म्हणतात. या काळात कृष्णाकाठी जे धार्मिक विधी केले जातात. ते फलप्रद मानले जातात. कन्यागतात कृष्णा नदीस भेटण्यासाठी गंगा येते अशी समजूत आहे. (अध्याय १६).

कऱ्हाडातील नदीचे वर्णन ती औट मात्रा ॐ काररूपिणी आहे असे म्हटले आहे. कऱ्हाडजवळील आगाशिव किंवा सदाशिव या डोंगरावरून कृष्णा कोयनांचे दर्शन घडते. खोडशीपासून डेरेदार वळसा घेत असलेली कृष्णा ही ॐ काराच्या अकारमात्रेच्या उदात्त वलयाच्या आकाराची आहे. दक्षिणेकडून सुपने-वारूंजीकडून वळून आलेली कोयना अकारमात्रेच्या अनुदात्त अर्धवलयासारखी आहे. प्रीतिसंगमामुळे ही अकारयात्रा पूर्ण होते. पुढे कऱ्हाड क्षेत्राला कवेत घेऊन कृष्णा नदी पूर्वेकडून दक्षिणेकडे उकारमात्रेच्या आकाराने वाहते. अशा रीतीने हा परिसर प्रणवाकार ॐकाराच्या स्वरूपाचा आहे अशी कल्पना करता येते. (अध्याय १७).

कऱ्हाटक क्षेत्रात नागतीर्थ, सोमतीर्थ, धर्मतीर्थ, ज्ञानतीर्थ, हंसतीर्थ, मणिमंत्रतीर्थ, कूर्मतीर्थ, सुमंत्रतीर्थ, प्रभाकरतीर्थ, अश्विनतीर्थ, तारकतीर्थ, शुक्रतीर्थ, तपतीर्थ, कंकणतीर्थ अशी १४ जलतीर्थे (सरोवरे) आहेत. (अध्याय २०). दैत्यनिवारिणीच्या जवळून वाहणारी ककुद्मती (कोयना) नदी म्हणजे दक्षिण भागीरथीच. अश्विन महिन्यातील नवरात्रात रोज प्रातःस्नान केल्यास काशी-प्रयाग पुण्य लाभते. त्यातही शुक्रवारच्या स्नानाने विद्या-संपदा-संतती प्राप्ती, मंगळवारच्या स्नानाने सौभाग्य, रविवारच्या स्नानाने आयुष्य-आरोग्य प्राप्ती असे लाभ होतात. (अध्याय २०).

**दत्तमाहात्म्य**

'दत्ता, ब्रह्मचारी, ब्रह्मचारी । त्रिभुवनात तुमची फेरी' असे ज्या दत्तगुरूंच्या संबंधात श्री माणिकप्रभूंनी म्हटले आहे, त्या श्री दत्तगुरूंनी प्रातःकालच्या संध्यावंदनासाठी कऱ्हाडच्या प्रीतिसंगमाची निवड केली आहे अशी दत्तभक्तांची श्रध्दा आहे.

१) निद्रा मातृपुरेस्य सह्यशिखरे पीठे मिमक्षापुरे ।
काशाख्ये करहाटकेऽर्घ्यवरे भिक्षास्य कोल्हापुरे ।।
('श्री दत्तभावसुधारस' श्लोक १०५)

२) ज्याचे सह्याद्रिवरी स्थान, माहुरी करी शयन,
नित्य भागीरथीस्नान तुंगापान ।।७६।। कुरूक्षेत्री
आचमन, कऱ्हाडात संध्यास्नान, कोल्हापुरी भिक्षा
नित्य करी ।।७७।। ('श्री दत्तलीलामृताब्धिसार' )

३) कुरूक्षेत्री आचमन, धोपेश्वरी जाऊन करी जो
भस्मधारण, संध्यावंदन कऱ्हाडी ।।८४।।
('श्री दत्तमहात्म्य' अध्याय ४)

४) मन हो माझे भ्रांत, की तू कऱ्हाडात ।
संध्यावंदनात गुंतलाशी? तळ्ळासा न तुझी
लागे वासुदेवा, कोण तुझ्या भावा जाणे दत्ता ?
( श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी )

## ।। करहाटक महात्म्य ।।

अध्याय १ ला

मध्यदेशे महाक्षेत्रं नाम्ना श्रीकरहाटकं ।
यत्र श्रीकृष्णवेण्यायाः ककुद्मत्यास्ति संगमः ।।१७।।
तादृशः संगमः पक्षिन् नास्ति भूमंडले क्वचित् ।
यत्रोत्तरा महालक्ष्मी ब्रह्मविद्भिः सुसेविता ।।१८।।
वर्तते पीठमध्यस्था देवी सर्वार्थदा नृणां ।
साध्वष्टगुणसम्राज्ञी सायुधा स्वगणैर्वृता ।।१९।।
सिध्दचारणगंधर्वैमुनिभिवेदवादिभिः ।
प्रत्यहं सेव्यते देवी भुक्तिमुक्ति-फलप्रदा ।।२०।।
गरुडः प्राप नगरं लक्ष्मीदक्षिणहस्तजं ।।४१।।
साम्राज्यहेमवलयं रत्नसानुविराजितं ।
रथ्या चत्वर रम्येतद्धेनसौध-विराजितं ।।४२।।
अग्निहोत्रार्चनासक्तैर्देवपूजापरायणैः ।
वेदाध्ययनसक्तैश्च प्राप्तातिथिविपुजकैः ।।४३।।
ऋग्यजुःसामपाठेन पवित्रीकृतमानसैः
ब्रह्मचारी-वनस्थाना यतीनां पूजने रतैः ।।४४।।
एतादृशैर्मुनिवरैः पूरितं गायनं परं ।
तथा युध्देषु कुशलैः प्रजापालनतत्परैः ।।४५।।
षष्टांशभोजिभिः कान्तैर्देवब्राह्मणपूजकैः ।
वेदाध्ययनशीलैश्च तथा याजनतत्परैः ।।४६।।
देव्याराधनशीलैश्च पूरितं क्षत्रबंधुभिः ।
तथा कुशीदवार्तासु चतुरैर्मितभाषिभिः ।।४७।।
लक्ष्मीसेवापरैः शान्तैर्वैश्यंसंधैः सुपूरितं ।
वर्णत्रयस्य शुश्रूषापरैः शूद्रगणैर्वृतं ।।४८।।
एतादृशं सुनगरं देवीपीठोपरिस्थितं ।
तन्मध्ये मणिभूषाभिर्भूपितानेकर्दिङ्मुखं ।।४९।।

सुरत्नरचिताभित्तिर्दीप्तिजालसमुश्रिता ।
यस्मिन् रत्नमयास्तंभाः मंडपेषु विराजिताः ।।५०।।
द्वारस्तु रत्नसम्राजत् कपाटा यत्र संस्थिताः ।
रत्नसौधं सकलश संराजद्देवतागृहम् ।।५१।।
प्रभया यत्र तत्रस्था प्राणिनो मोहमागताः ।
दिनं नक्तं च नावित्रमरा इव सुप्रभाः ।।५२।।
तस्मिन् रत्नमयी मूर्तिः कमलायाः सुसस्थिता ।
देवी कनकवर्णाभा भुजैः षोडशैर्युता ।।५३।।
महालक्ष्मी महामाया आदिशक्ती परा स्वयं ।
भव-विष्णु-विरिंच्याद्यैरमरैः परिपूरिता ।।५४।।
पीठमध्ये जगन्माता भक्तानां वरदा स्थिता ।
तस्या वामे महादेवी रेणुका भक्तवत्सला ।।५५।।
द्विभुजा वसते पीठे वामकोणे हरोन्मुखी ।
वरदा सर्व जन्तुनां प्राप्ते कलियुगे स्थिता ।। ५६।।
तथा पुरो महादेवी साक्षान्महिषमर्दिनी ।
सायुधा प्राङ्मुखी पूज्या पीठप्राक्कोणगा प्रिये ।।५७।।
भक्तानां वरदा चण्डी ईश्वरी सिंहवाहना ।
ततो दक्षिणभागेऽपि दूरितस्यापहारिणी ।।५८।।
देवी रत्नमयी रामा वरदा प्रकृतानना ।
पीठदक्षिणकोणस्य रक्षणार्थं स्थिता प्रिये ।।५९।।
देवी वायव्यदेशेच पतगेन विनिर्मितं ।
स्थूलं गृहं प्रयत्नेन कांचनस्तंभमंडितं ।।६१।।
'तीर्थं चापि भवेत् पवित्रितमिदं मन्नामकं मुक्तिदं ।
स्नातानां सुरपूर्णगर्भगृहमित्याख्यायुतं कल्पतः' ।।७६।।
तथेत्युक्त्वामराः सर्वे शिव-विष्णु-पुरोगमाः ।
स्थिता तस्मिन् गृहे स्वांशैर्गरुडो विष्णुवाहनः ।।७७।।

अतो वरप्रदानेन सुराणां क्षेत्रपुण्यतः ।
तदाप्रभृति तत्क्षेत्रं ताक्ष्र्यगर्भगृहं प्रभो ।।७८।।
जातं सन्मुक्तिजनकं चाश्वमेधफलप्रदं ।।७९।।

अध्याय २ रा

तदग्रे हाटकेशस्य पुण्यं तीर्थमुदाहरत् ।।१।।
हाटकेशं कृष्णातीरनिवासिनं ।।९।।
स्नात्वा ककुद्मतीसंगे प्रीत्या कर्त्रीविवर्जिते ।
सखीसमागमो यद्वत् संमुखं प्रीतिसंभवः ।।१०।।
तथा ककुद्मतीसंगः कृष्णया प्रीतिसंगमः ।
तत्र स्नातो नरः कृष्णाप्रीतिमाप्नोत्यसंशयम् ।।११।।
कर्त्रीसंगे नरः स्नात्वा पापलेशात्समुच्यते ।
प्रीतिसंगे तु यः स्नाति तस्य पापं पुण्यतामियात् ।।१२।।
अयस्कान्तस्य संसर्गाल्लोहं भवति काञ्चनम् ।
प्रीतिसंगजलस्पर्शात् तद्वत् पापानि पुण्यतां ।। १३।।
कृष्णा भक्तजनप्रतापशमनी माता महामङ्गला ।
श्रीविष्णोरमराधिपस्य सुतनुः संसारचिच्छक्तिदा ।।
तत्संगं कमलासनस्य च हरेस्तन्वोर्जलाकारयोः ।
पश्यन् हाटकनायकः सुरवरः श्रीशंकरस्तिष्टति ।।६४।।
सेव्यः क्षेत्रपतिः प्रभाव–ननितानेकप्रतापे विभुः ।
श्वेताश्वेन दिवा, निश क्विचिनो भ्रांतिकृता हिंसकः ।।६५।।
दण्डेनाक्रमयन् समस्तदुरितं सद्भक्तचिन्तास्थितो ।
याम्येशं दमयन् विभाति निकटे श्रीभैरवः सौख्यदः ।।६६।।
गजेंद्राननः क्षेत्रविघ्नापहारी विशालोदरो दंतवक्रः प्रतापी ।
शिवादेहजः सेव्ययानो मुनींद्रैः सुरेंद्रादि सिध्दिप्रदो भाति देवः ।।६७।।
मेघश्यामः पीतकौशेयवासः । श्रीवत्सांकः पुंडरीकायताक्षः।।
लक्ष्म्या वामे भूषितः ... ... ... धन्वा स विष्णुः ।।६८।।
शेषो गौरवपुः सहस्त्रवदनः श्यामाम्बरः कुंडली ।
देवश्री हलधृक् तथा मुशलधृक् संस्तूयमानोऽगरैः ।।

भूगोलं सनगं सशलैजलधिं स्वीये फणाग्रे दधन् ।
देवं विष्णुमजं हरं स्ववपुषा बिभ्राण आस्तेऽत्र हि ।।६९।।
विनतातनयः प्रतापवानरुणाम्बरजोऽसुदरः ।
अमराधिपसूनुवाहनः खग आस्ते तप आस्यितः किल ।७०।।
सीतावियोगाप्तसुखैकराशिं दुःखैकराशिं परिहर्तुकामः ।
रामः समीपे सहलक्ष्मणोऽत्र सेवापरो यो दुरिताम्बिकायाः ।।७१।।
महिषासुर एष दैत्यराट् भगवत्या परिमर्दितासुरेश्वरः ।
प्रतापी वरदासुलब्धपूजनः सन्निधौ तिष्टत्यमरत्वामास्थितः ।।७२।।
अमराधिप–पूजितः सुरेशः सगणो सौमणिसंभवः सुरेशः ।
अतिपिंगटमस्तकजटावानुदस्यभिमुखवेर्विभाति ।।७३।।
अतिताम्रशलाक एष वन्हेर्दिशमास्थाय विभाति वन्हिरिव ।
अनलेश्वरनाम स महेशः प्रतिभया कपिलेन वर्णितः ।।७४।।

अध्याय ३ रा

कृष्णा–ककुद्मतीसंगे पुण्यातिशयकारिके ।
स्नात्वात्र कमलां दृष्ट्वा नरः प्रयतमानसः ।।८।।
अश्वमेधस्य यज्ञस्य फलमाप्नोति वै सुकृत् ।
यत्र स्थिता जनाः सर्वे पुनर्भवविवर्जितः ।।९।।
तस्मात्तु हाटकं लिंगं बभूव कमलामिंधं ।
ईश्वरस्य पुरो देव आग्नेयामग्निनायकः ।।६५।।
याम्यामैतेश्वरो देवो नैऋत्यां निऋतेश्वर :
वारूण्यां वरुणेषो वै वायव्यां मारूतेश्वरः ।।६६।।
उत्तरस्यां तु सोमेश ईशान्यामीशनायकः ।
ईशान पूर्वयोर्मध्ये कपिलेश उदारतः ।।६७।।
इंद्र आग्नययोर्मध्ये गोलेशः परिसंस्थितः ।
अनलेश्वरनामा च आग्नेयां दिशिसं स्थितः ।।६८।।

अध्याय ४ था

ततोऽन्यद्भैरवं तीर्थंपुरतः पापनाशनं ।
महापातकयुक्तोऽपि स्नात्वा भैरवतीर्थके ।।१।।

पापबन्धाद्विमुच्येत नात्र कार्या विचारणा ।।२।।

अध्याय ५ वा

नागानां परमालयं धवलितं तीर्थं महापुण्यदं ।
सेव्यं सद्भिरनुत्तमं सुखकरं श्रीहाटकोपस्थितं ।।
पापौघस्य विनाशनं परतरं विद्यापदं श्रीपदं ।।३।।

अध्याय ६ वा

ततः परं गणेशस्य तीर्थं श्रीकरहाटके ।।१।।
सर्वावौघविनाशार्थं गणेशस्तत्रसंस्थितः ।।२।।

अध्याय ७ वा

यस्मात् साक्षान्नृसिंहोऽत्र स्नात्वा सौमत्वमागतः ।
असो नृसिंहतीर्थं वै सर्व पापप्रणाशनं ।।१०२।।

अध्याय ८ वा

मुकुंदकृत लक्ष्मीस्तवन
एहि एहि भक्तजनमानसकामधेनो ।
दिव्यांबुजाक्ष ललिते हृदयांबुजे मे ।।
कामादिषड्रिपुविनाशनहेतुभूते ।
त्वां चिंतयामि सततं परिमुक्तयेऽहं ।।११।।
पद्मासने शिव-विरंचि-हरिप्रियादि-
भैदैरनेकगतपूजितविग्रहेऽम्बे ।।
तत्त्वं पदार्थपरिशोधितलक्ष्यवृत्ति
विद्योत्तमान् सुदयासनमाश्रयस्त्वम् ।।१२।।
विद्योत्तमाननचंद्रवत्तांगुलीभि -
रासक्तबुध्दि- कविभावित पादयुग्मम् ।
संक्षालयामि ललिते विमलाम्बुजं ते
संभावयामि नवनीतगतिं च तस्य ।।१३।।
अम्ब त्वदंगुलिभूषणरत्नभाभि -
श्चित्रैर्जलैर्विविधरत्नफलैः सुपुष्पैः ।
रक्ताक्षतैश्च सहितं प्रददामि तुभ्यं -

मर्घ्यं त्वनर्घ्य गुणनीरयसे स्वहृद्भिः ।।१४।।
हेम्नश्च चूडं मणिबन्धभूषण –
माकर्पूरं स्वांगदसंयुतं च ।।२५।।
सत्कंठसूत्रं मणिभिर्विराजित्
एकाबली मौक्तिकहारमाला ।
ताडंकयुग्मं मणिमौक्तिकाढ्यं
मुक्तायुतश्चो श्चोपरि वालुकास्ते ।।२६।।
केशद्विपक्षांतरगं च सूत्रं
मुक्तायुतं भालगतश्च चंद्रः ।
नासाग्रमुक्तामणिहेमयुक्ता
रत्नानुविद्धा मणिमेखला च ।।२७।।
सद्रत्नपूर्णांगुलिभाविता तां
नासाग्रमिश्रीकृतरत्नभूषां ।
सद्ब्रह्मसूत्रं नवतंतुयुक्तं
चिद्ग्रंथितं देवि गृहाण भक्त्या ।।२८।।
मार्कडेयमुनिश्चचार विपुलं कृष्णातटे संस्थितः ।
पौराणाः कथयन् कथा समुदितो देव्याः समीपोस्थितः ।।
तत्तीर्थं विमलं धनुःशतनितं कृष्णातटे संस्थितं ।
ये सेवन्ति च वर्णयन्ति मनुजास्ते मुक्तिभाजः खलु ।।५३।।
( केऽपि सुश्लोकाः करहाटकमहात्म्यात् )

**'कऱ्हाड '**

यशवंत राजाराम गुप्ते, बी.ए.एम.आर.ए.एस. हे माजी असिस्टंट सुपरिन्टेंडेंट फॉर एपिग्राफी, पंजाब व संयुक्त प्रांत यातील हिंदू व बौध्द इमारतींचे पुराण वस्तु संशोधन खात्याचे माजी असिस्टंट सर्व्हेअर, केर्न रिसर्च इन्स्टिट्यूट (लीडेन , हॉलंड) व भारत इतिहास संशोधक मंडळ (पुणे) या संस्थांचे सभासद होते. कऱ्हाड येथे नोकरीनिमित्त काही दिवस त्यांचे वास्तव्य होते. सातारा जिल्ह्याचे तत्कालीन कलेक्टर एम. वेब, पुराण वस्तू संशोधन खात्याचे सुपरिटेंडेंट

का. ना. दीक्षित, इ. च्या आग्रहावरून य. रा. गुप्ते यांनी कऱ्हाडविषयी माहिती संग्रहित केली. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या चौदाव्या वार्षिक संमेलनावेळी गुप्ते यांची ही माहिती लेखरूपाने मंडळाच्या त्रैमासिकात १९२५ मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. म. म. दत्तो वामन पोतदार यांनी मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेचा अकरावा क्रमांक म्हणून तो लेख 'कऱ्हाड' या पुस्तकरूपाने १९२७ मध्ये प्रकाशित केला. दरम्यान गुप्ते यांची बदली पुन्हा कऱ्हाडास झाली. तेव्हा कऱ्हाडसंबंधीची अधिक माहिती जमा करून त्यांनी या पुस्तकाची दुसरी आवृत्ती १९२९ मध्ये प्रकाशित केली या पुस्तकाची किंमत अवघी आठ आणे ( पन्नास पैसे) होती.

'कऱ्हाड' या गुप्ते यांच्या या पुस्तकाची डेमी आकाराची ९+५४ पृष्ठे असून त्यात नाव, प्राचीन शिलालेखातील उतारे, बौध्दकालीन जैन, हिंदू, मुसलमानी प्राचीन अवशेष, व्याप, विस्तार, व्यापार व त्यांचे स्थित्यंतर, इतिहास, धार्मिक देणग्या, व्यापार, राहणी वगैरे, प्राचीन, मुसलमानी अमदानी, मराठ्यांचा अंमल व इंग्रजी आमदानी, साध्वी स्त्रिया, काही ऐतिहासिक (हिंदू व मुसलमानी) घराणी अशी सात प्रकरणे या पुस्तकात आहेत.

या पुस्तकात जखिणवाडी येथील लेणी क्र. ६, १२ कोयनेकडे तोंड असलेल्या लेण्यातील मूर्ती, लेण्यातील त्रुटीत लेख, श्रीकृष्ण-ककुद्मती प्रीतिसंगम, श्रीकृष्णाबाईच्या देवळाजवळील वीरगळ, संत सखूचे देऊळ, मनोरे, मौलालीचा दर्गा, अशी तत्कालीन छायाचित्रेही दिली आहेत.

असे हे पुस्तक आता दुर्मिळ असून काही थोड्याच ठिकाणी ते उपलब्ध आहे. शिवाय या पुस्तकाला ८० वर्षाहून अधिक वर्षे होऊन गेली असल्यामुळे उपलब्ध प्रतीतील पृष्ठेही जीर्ण झाली आहेत.

**महापूर**

कऱ्हाड शहराच्या तीनही बाजूंना दोन्ही नद्यांचे प्रवाह वाहत असल्यामुळे या शहरास पावसाळ्यात दर वर्षी पुराची सवय होणे स्वाभाविकच आहे. कऱ्हाडातील महापुराची जुन्यातील जुनी नोंद आढळते ती १८४४ ची. त्या वर्षी 'त्यापूर्वीच्या दोनशे वर्षांत बसला नव्हता एवढा धक्का कृष्णा

नदीच्या महापुराने दिला' असे सांगतात. पाणी वीस फुटांपर्यंत चढल्यामुळे शहराच्या वायव्य बाजूची संरक्षक तटबंदी वाहून गेली. शहरातील मुख्य रस्त्यावर पुराचे पाणी आले, नावांतून नागरिकांची ये-जा चालू होती. पंतांच्या कोटासमोरील सर्व घरे वाहून गेली. त्यावेळी पलीकडे असलेले मारुतीचे दगडी देऊळ वर्षानुवर्षे पुराच्या पाण्याखाली जात असूनही या वेळी प्रथमच त्याचेही नुकसान झाले.

१८५३ मध्ये कृष्णेच्या महापुरात श्री कृष्णाबाई उत्सवाचा रथच वाहून गेला. १८५६ मध्ये कृष्णा-कोयना या दोन्ही नद्यांना प्रचंड महापूर आल्याचे सांगितले जाते. १८६६ मध्ये कृष्णा नदीवर खोडशी येथे बंधारा बांधण्यात आला. त्यामुळे कृष्णा नदीचा प्रवाह उत्तरेकडे सैदापूर गावाकडे सरकला. त्यामुळे कऱ्हाडास कृष्णा नदीच्या पुरापासून थोडे संरक्षण मिळाले, तरीही १८७५ मध्ये कृष्णा नदीस महापूर येऊन त्याचा तडाखा भुईकोट किल्ल्याच्या तटास बसलाच. १९१४ मध्ये तर शहरातूनही नावेने ये-जा करावयास लावणारा महापूर कृष्णेस आला होता. १९३९ मध्ये कृष्णा नदीवर पूल झाल्यापासून दर वर्षी एकदा तरी पुलावरून पाणी जाईच. १९४३ मध्ये कृष्णा नदीस महापूर आल्याची नोंद आहे. त्यासंबंधात सुप्रसिध्द साहित्यिक शरश्चंद्र चिरमुले लिहितात, ''कृष्णा कोयनांच्या पुरांचा भीषणपणा मोजण्याचा पंताचा कोट हा एक मापनदंड होता. 'पाणदरवाजाला पाणी लागले' आणि 'कोटाला वेढा पडला' हे वाक्प्रचार कऱ्हाडकरांना सुपरिचित आहेत. स्वामीच्या दोन्ही बागा व्यापून खरोखरीच पाणदरवाजाच्या पायरीला भिडलेला आणि तटांना घसटून चाललेल्या कृष्णेच्या पुराचा विराट तांबडा पांढरा प्रवाह त्रेचाळीस साली मी पाहिला. कृष्णेचा पूल झाल्यानंतर 'मारूती बुडाला', 'पुलावरून पाणी गेलं' असं म्हटले जाऊ लागले. गावातून कोटात शिरण्याच्या वाटेवर (स्थानिक भाषेत 'कोटाखाली') पाणी येऊन ठेपले की 'कोटाला वेढा पडला' असे म्हणण्यात येते. ('वास्तुपुरूष' पृ.३) कोयनेचा प्रवाह पश्चिमेकडून बालाजी मंदिरासमोर येऊन उत्तरेकडे धावायला लागतो आणि कृष्णेचा प्रवाह स्वामीची बाग, देवळे पोटात घेऊन दक्षिणेकडे पसरत कोटाखालील धर्मशाळेसमोरील रस्त्यावर संथपणे वाढत कोयनेच्या प्रवाहाला

आपल्या कवेत घेतो. कृष्णा कोयनांचा पुन्हा एकदा प्रति - प्रीतिसंगम होतो.

बहुधा दर दोन तीन वर्षाआड तरी कोटाखाली असा 'दुसरा प्रीतिसंगम' घडायचाच. पुढे हेळवाकला कोयनेवर धरण झाले, कृष्णेवर धोम, कण्हेरला धरणे झाली, त्यामुळे कृष्णा कोयनांचे प्रवाह क्षीण होत गेले, पाऊसमान कमी होत गेले त्यामुळे असेल कदाचित, तो योग दुर्मिळ होत गेला. १९६७ मध्ये झालेल्या कोयनेच्या भूकंपाने धरणफुटीचा धाक उत्पन्न झाला होता. त्यावेळी कोयनेचे पाणी कऱ्हाडात शिरले तर 'मनोऱ्यावर बसून कावळा पाणी पिईल' अशी कल्पना केली जात होती.

६ जून १९७६ रोजी मात्र कृष्णेला प्रचंड महापूर आला. कृष्णेच्या प्रवाहाने कोयना नदीला रेटून संगमेश्वराच्या देवळापासून कृष्णाबाईच्या घाटाला घासून वाहण्यास सुरवात केली. पुराचा तडाखा एवढा जबरदस्त होता की त्यापूर्वी दर वर्षी येणाऱ्या पुरा-महापुराना दाद न देता ऐटीने उभ्या राहणाऱ्या देवळांचे कळस छाटले गेले, दत्त मंदिरामोरील सभामंडप उद्ध्वस्त झाला. दीपमाळांची नाव-निशाणी राहिली नाही. स्वामीच्या बागेत औषधालाही झाड उरले नाही. नदीकाठचे जाफरमहंमदचे स्थान आणि राजेबागसवार दर्गा दोन्ही उद्ध्वस्त झाले. कृष्णेच्या पुलावर दहा फूट पाणी होते. सुमारे छत्तीस तास वाहतूक ठप्प होती.

१९९४ आणि १९९७ मध्येही महापूर आले होते. १९९७ मध्ये कृष्णेच्या पुलावर तीन फूट पाणी होते.

२६ जुलै २००५ पासून सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे व धरणातून पाणी सोडल्यामुळे कृष्णा कोयनांना महापूर आला होता. कृष्णा पुलावरील वाहतूक सुमारे बहात्तर तास बंद होती. कृष्णापुलाला जोडून नवा केलेला पायरस्ता नादुरूस्त झाला. जुलै २००६ मध्ये याच प्रकाराची पुनरावृत्ती झाली. कृष्णा पूल छत्तीस तास पाण्याखाली होता. १९७६ नंतर तीस वर्षांनी मुख्य बाजारपेठ ठप्प झाली होती.

महापुराच्या काळात पुणे- बेंगलोर महामार्गावरील नवीन सेवारस्ते, पाटण तिकाटणे, वारूंजी फाटा, अन्नपूर्णा हॉटेलमागील रस्ता, जुन्या

कोयना पुलानजीकचे जलशुध्दिकरण केंद्र, शासकीय विश्रामगृह, दूधगंगा प्रकल्प कॉलनी, शाहू चौक, दत्त चौक, पाटण कॉलनी, संगम पेट्रोल पंप, यशवंत हायस्कूलमागील बाजू, पायऱ्यांखालील भाग, लल्लुभाईची चाळ, कोटाखालील बालाजी मंदिरासमोरील पेंढारकर पुतळ्यामागील बाजू , रुक्मिणीनगर अशा नागरी वस्तीत पाणी शिरून मुख्य गावाचा संपर्क तुटतो. विटे, ढेबेवाडी, पाटण रस्त्यांकडील वाहतूक बंद पडते, टपालव्यवस्था विस्कळीत होते. पाटण कॉलनीकडील कोयना काठच्या झोपड्या बहुतांशी १९९५ पूर्वीच्या आहेत. नदीकाठच्या सुमारे ४५० कुटुंबातील २००० लोकांचे तात्पुरते स्थलांतर नगर परिषदेच्या शाळांतून करावे लागते. लोकाना चहापाणी, जेवणखाण आरोग्य सुविधा इ. सहाय्य नगर परिषद आणि स्वयंसेवी कार्यकर्ते संघटना पुरवित असतात. शहराला पाणीपुरवठा करणारी यंत्रणा व त्या यंत्रणेस वीजपुरठा करणारी यंत्रणा पाण्यात जाते. २००५ आणि २००६ साली शहराचा पाणीपुरवठा काही काळ बंद होता. कऱ्हाडच्या ‘अल्टिमेट ॲडव्हेंचर क्लब’चे अध्यक्ष माधव काळे आणि त्यांचे सहकारी माणिक शितोळे, सुनील कुलकर्णी यांच्या मदतीने संगम स्वीमिंग पूलचे सदस्य किरण पवेकर आणि सतीश गायकवाड यांच्या सहकार्याने वीज मंडळाचे व पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी पाणीपुरवठा यंत्रणा असणाऱ्या परिसरात जाऊन अल्पावधीतच त्यांनी पाणीपुरवठा सुरू केला होता.

याच अनुषंगाने दि. १६ ऑगस्ट १९५४ रोजीच्या त्यावेळी साप्ताहिक असलेल्या साताऱ्याच्या ‘ ऐक्य ’ मध्ये ‘ कऱ्हाडकरिता’ या सदरात ‘या पावसाचे काय करावे’ ? या शीर्षकाखाली आलेला मजकूर येथे उद्धृत करणे उचित ठरेल.

“कऱ्हाडला दरसाल पडणाऱ्या पावसाची मर्यादा एव्हाना जवळजवळ गाठण्यात आली असून आसपासच्या भागात गेल्या आठवड्याच्या आरंभासच ओल्या दुष्काळाची भीती वाटू लागली होती. अशा संततधारेमुळे व त्या योगे येणाऱ्या नदीच्या पुरामुळे गावाच्या वाढलेल्या व वाढू पाहणाऱ्या वसतीला व वसाहतीलाही दिवसेंदिवस पाण्याचा धोका

केव्हा निर्माण होईल याचा नियम नाही. आपल्या नागरिकांकडून घरपट्टीपासून कर वसूल करणाऱ्या नगरपालिकेला आपल्या उत्पन्नाच्या शाश्वतीसाठी वसतीच्या सुखरूपतेकडे लक्ष देणे आणि आवश्यक तेवढे सरकारचे सहाय्य मागणे भाग आहे. पण किती मेहेरबानांच्या लक्षात ही गोष्ट आली आहे श्रीकृष्णाबाईच जाणे! दैत्यनिवारणीच्या देवळापासून थेट भुईकोट किल्ल्याच्या फकिरी निशाणापर्यंत कोयनाकाठाने गावात पाणी केव्हा व किती प्रमाणात शिरेल याचा नेम कोणी काढण्याचा खटाटोप केला आहे काय? त्या बाजूंनी सुसंरक्षणाच्या तरतुदी केल्या नाहीत तर पंधरा ते वीस वर्षांनी कऱ्हाडच्या वसतीची काय अवस्था होईल याचा विचार करणे नगरपित्यांचे कर्तव्य नाही काय? भुईकोट किल्ल्याच्या सुरक्षिततेसाठी पूर्वी कऱ्हाडात काळजी घेणारी एक वेळची आदिलशाही अगर औंधकर पंतप्रतिनिधी यांचा वारसा आपल्याकडे काळाच्या ओघात आला आहे हे समजून आमची नगरपालिका आपल्या टाऊन प्लॅनिंगमध्ये या पुरापासूनच्या संरक्षणाला यापुढे महत्त्व देईल तर लोकमताचा आब तिने राखला असे होईल.

असाच अचाट पाऊस ज्यावेळी पडतो त्यावेळी शेतीच्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी काय उपाययोजना केली पाहिजे, वाजवीपेक्षा जास्त होणाऱ्या पाण्याचा निचरा कसा लवकरात लवकर होईल आणि तो शक्य नसेल तर हे सर्वाधिक झालेले पाणी कशा रीतीने कोठे आणि किती आवारात साठवून ते अन्य कामी लावता येईल अगर पुढील पावसाने ओढ दिल्यास त्यावेळी कसे उपयोगिता येईल याचा सोदाहरण धडा शेतकीखात्यातर्फे कऱ्हाडात किंवा अन्यत्र चालणाऱ्या प्रायोगिक (एक्सपेरिमेंटल फार्म) शेतवाडीमार्फत शेतकरीवर्गास मिळावयास नको काय?''

**भूकंप**

११ डिसेंबर १९६७ पहाटेच ४ वा. ३१ मि. ने सगळे दख्खनचे पठार हादरले. कोयनानगर येथे ७.५ रिश्टरचा भूकंपाचा धक्का बसला.या भूकंपाचा केंद्रबिंदू कोयनानगर होते. या वेळी वसाहतीतील ४८ व परिसरातील १२६ अशी १७४ मनुष्यहानी झाली. कोयनानगर तर उद्ध्वस्तच झाले पण आसमंतातही त्या भूकंपाचे लहान मोठे परिणाम झालेच.

कऱ्हाडचा आणि कोयनानगरचा अगदी निकटचा आणि अतूट संबंध. कोयनेच्या प्रवाहाला कृष्णा येऊन मिळाली. ('कृष्णा मिळाली कोयनेप्रती, सखे ग सुरेख संगम किती') पण कऱ्हाडपासून ती कृष्णामयच झाली. कोयनेचे धरण उभे राहण्याआधीपासून त्याची आखणी-आराखडे अंमलबजावणी कऱ्हाडातूनच केली जात होती. कऱ्हाड-कोयनानगर अंतर ५०-५२ किमीचे पण ते अंतर स्थानिक दूरध्वनीने कमी करून टाकले होते. त्यामुळे कोयनेला भूकंप झाला तेव्हा कऱ्हाडच नव्हे तर कऱ्हाडकरही हादरले होते. भूकंपाचा केंद्रबिंदू धरणात आहे आणि धरण फुटले की सारे कऱ्हाड त्या पाण्याखाली बुडून जाणार अशा कोणीतरी उठविलेल्या आवईने बरेचसे कऱ्हाडकर धास्तावलेही होते. पण तरीही कोयना भूकंपग्रस्तांना मदतीचा हात देण्यासाठी कऱ्हाडातील सार्वजनिक संस्था आणि स्वयंसेवी कार्यकर्ते कोयनेकडे धावले होते. कोयनेकडे जाणारा रस्ताही काही ठिकाणी खचला होता, पण मन खचून न देता घाबरलेल्या, भांबावलेल्या जखमी झालेल्या, शुध्द हरपलेल्या कोयना परिसरातील लोकांना मिळेल त्या वाहनाने कऱ्हाडात आणले गेले, कॉटेज हॉस्पिटल, मोठे दवाखाने यांत जखमींची शुश्रूषा करण्यात आली. शाळांच्या इमारतींतून निवास भोजनासाठी छावण्या उभारण्यात आल्या होत्या. आपद्ग्रस्तांची आपुलकीने दखल घेण्यात येत होती. निवारा, नातेवाईक, निधी गमावलेल्या कोयनावासीयांना मदतीचा ओघ मिळण्याचे कऱ्हाड हे मध्यवर्ती केंद्र झाले होते.

कऱ्हाडच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोयनानगरला श्री शिवाजी विद्यालय हे माध्यमिक विद्यालय होते. कोयनानगरला नोकरीनिमित्ताने बदली होऊन आलेल्या पालकांनी आपली मुले आपापल्या सोयीच्या गावी नेली. पण त्या शाळेत कोयनागरच्या परिसरातीलच एकशेतीस मुले होती. जूनअखेर सहा महिने तरी त्यांची सोय करावयास हवी होती. त्या सर्वांची राहण्या-जेवणाची सोय कऱ्हाडच्या महाराष्ट्र हायस्कूलला जोडून असलेल्या वसतिगृहात केली होती. कोयनानगरचे श्री शिवाजी विद्यालय सहा महिन्यांसाठी कऱ्हाडात चालू राहिले होते. (प्रस्तुत 'कऱ्हाड दर्शन'या ग्रंथाचे एक लेखक विद्याधर गोखले हेच त्या काळात कोयनानगरच्या श्री शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक होते.) भूकंपाविषयी शास्त्रीय व वास्तव कल्पना सर्वसामान्य माणसाला समजाव्यात म्हणून अध्यापक

मंडळ कऱ्हाडने वाईच्या विश्वकोशातील भूगर्भशास्त्र शाखेचे प्रमुख प्रा. क. वा. केळकर यांचे व्याख्यान श्री शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर ६ जानेवारी १९६८ रोजी आयोजीत केले होते. या व्याख्यानाला अवघे गाव लोटले होते.

माध्यमिक आणि महाविद्यालयातील शिक्षणाला वंचित झालेल्या विद्यार्थ्यांची पाहणी अध्यापक मंडळाचे शा. द. घळसासी, वि. पु. गोखले, मा. का. माने यांनी किर्लोस्कर ब्रदर्स किर्लोस्करवाडी यांच्यासाठी जानेवारी १९६८ मध्ये केली होती.

१९६७ पूर्वी महाराष्ट्राला भूकंपाची माहिती (आणि भीतीही) नव्हती. कोयनानगरला झालेल्या भूकंपाने त्याची तीव्र जाणीव करून दिली. त्यानंतरच्या काळात कोयनानगरला आणि कऱ्हाडातील भूकंपाचे धक्के बसत होते आणि अजूनही बसतात. सुरुवातीच्या काही काळात त्या भीतीचा धसका एवढा होता की बऱ्याचशा कऱ्हाडकरांनी स्थलांतर करण्याच्या योजना आखल्या होत्या आणि दुर्गाडीच्या दुष्काळावेळी जसे कऱ्हाड ओसाड झाले तसे होईल की काय अशी भीती निर्माण झाली होती. कऱ्हाडच्या औद्योगिक विकासालाही खीळ पडेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पण सुदैवाने ती तात्पुरतीच ठरली.

## निसर्ग संरक्षण

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात निसर्गसंरक्षणाची एक नवीन चळवळ उदयास आली. यामध्ये निरनिराळ्या प्रकारांनी होणारे पाणी, हवा यांचे प्रदूषण, जंगलांचे संरक्षण, वन्यजीवनाचे संरक्षण इत्यादींचा समावेश होतो. याबाबत इतरत्र फारशी जागृती झालेली नसताना कऱ्हाडमध्ये प्रा. का. धों. देशपांडे, प्रा. वि. पु. गोखले इत्यादीनी १९७८ साली 'वन्यजीवनप्रेमी संघ' नावाची संघटना स्थापन केली. निसर्गावर आत्यंतिक प्रेम करणाऱ्यांची ही संघटना होती व निसर्गाची होणारी हानी समाजाच्या लक्षात आणून देऊन त्याबद्दल जागृती निर्माण करणे व निसर्गाबद्दल आत्मीयता निर्माण करणे हा संस्थेचा हेतू होता. संघटनेमार्फत व्याख्याने, प्रदर्शने असे कार्यक्रम झाले. त्यानंतर हे काम कऱ्हाडमधील 'कराड जिमखाना' या संस्थेने त्यांच्या निसर्गविभागातर्फे खऱ्या जोमाने पुढे नेले. त्यासाठी सातत्याने

निसर्गशिबिरे, निसर्गप्रदर्शने, व्याख्याने व सहली आयोजित केल्या, एवढेच नव्हे तर १९९८ मध्ये अखिल भारतीय पक्षी संमेलनाचे आयोजनही केले. या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद वाटवे हे होते. चित्रस्पर्धा, हस्तलिखित स्पर्धा, चित्रप्रदर्शन, वृक्षदिंडी, अनेक नामवंत निसर्गवाद्यांची व्याख्याने यांनी हे संमेलन चांगलेच गाजले. परिणामी कऱ्हाडच्या आसंमतात या प्रश्नाबद्दल चांगलीच जागृती झाली आहे. यासाठी जिमखान्याचे महेंद्रकुमार शहा व त्यांचे सहकारी यांचे प्रयत्न कारणीभूत आहेत.

या चळवळीतून व्यक्तिगतरीत्या कार्य करणारे चांगले कार्यकर्ते उदयास आले. रोहन भाटे यांनी क्रिएटिव्ह नेचर फ्रेंडस् ही संस्था स्थापन केली. सर्प बचाव मोहिम, प्राणी–पक्षी व व्याघ्र गणना, बिबळ्या बचाव मोहीम अशा चळवळीत या संघटनेचे कार्यकर्ते पुढे असतात. रोहन भाटे हे सापांना पकडण्यात निष्णात समजले जातात. त्यांच्यामुळे काही हजार साप नक्कीच वाचले असतील. सुधीर कुंभार यानी कऱ्हाड ढेबेवाडी रस्त्यावरील पशुपक्षी व सरपटणारे प्राणी यांची वर्षभर पहाणी केली व त्याचा अहवाल प्रसिध्द केला. त्यांच्यामार्फत दर महिन्याला ‘ निसर्ग ’ नावाचे एक पोस्टर प्रसिध्द होते. ते व त्यांचे सहकारी खेड्यापाड्यात जाऊन निसर्गप्रबोधन, जटानिर्मूलन, डोंगरावरील वणवे इत्यादींचे प्रबोधन करतात. चंद्रकांत जाधव यांनी कऱ्हाड परिसरात हजारो वृक्ष तर लावलेच पण त्यांच्या संवर्धनाचेही काम केले. नामा बाळकृष्ण पवार हे गेली अनेक वर्षे कृष्णेच्या वाळवंटात पक्ष्यांसाठी धान्य देणे, मंदिरे स्वच्छ करणे अशी कामे निरलसपणे करत असतात. प्रा. जालिंदर काशीद यांनी इन्कायरी फ्रेंड नॅचरल क्लब या संस्थेची स्थापना केली व त्यामधून निसर्गविषयक अनेक उपक्रमांचे आयोजन ते करत असतात. अमोल शिंदे यांनी आपल्या ॲनिमल प्रोटेक्शन क्लबातर्फे गोरक्षण, जीवदया हॉस्पिटल असे उपक्रम हाती घेतले आहेत. अशाच तऱ्हेचे काम सेहराभाभी या व्यक्तिगतरीत्या करतात. मांजर, घोडा, गाढव, गाय, कुत्रा, माकड किंवा कोणताही पक्षी जर जखमी स्वरूपात आढळला तर या भाभी तनमनधनाने त्या मुक्या जीवाची शुश्रूषा करतात. स्वत:ची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नसताना त्यांची ही धडपड दाद देण्यासारखीच आहे.

अलीकडेच झालेले बंडातात्या कराडकर यांचे देहू परिसरातील आंदोलन हे पर्यावरण संरक्षणासाठीच आहे. शामराव जगन्नाथ यादव मेढेकर हे निवृत्तीनंतर गेली अनेक वर्षे सदाशिवगडाच्या पायथ्याशी वनराई निर्माण करण्यासाठी धडपडत आहेत. कुलदीप देसाई व खोचीकर यांनी गडकोट, ऐतिहासिक अवशेष, निसर्गविषयक जागृती इत्यादी उपक्रमांद्वारे नवीन पिढीच्या मनात ही मूल्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बंडातात्यांच्या प्रेरणेने अलीकडे या उपक्रमाचाच एक भाग म्हणून देसाई यांनी आग्रा ते राजगड या पदयात्रेचे नेतृत्व केले.

## समाजसेवेचे एक वेगळे व्रत

१९१६ मध्ये कऱ्हाडातील काही तरुण पुण्यास लोकमान्य टिळकांना भेटण्यासाठी गेली, त्यावेळी लोकमान्य टिळकांनी त्यांची आपुलकीने विचारपूस करताना 'सार्वजनिक काम काय करता'? असा प्रश्न त्यांना विचारला. तेव्हा त्या तरुणांनी 'आम्ही बेताचं शिक्षण घेतलेली, आगकाड्यांच्या कारखान्यात काम करणारी सामान्य माणसं. आम्ही कसलं सार्वजनिक काम करणार?' हे ऐकून लोकमान्य टिळकांनी 'तुमच्या गावात माणसं मरतात ना? मग कुणाच्याही प्रेतास खांदा देण्यास कधीही नाही म्हणू नका' असे त्या तरुणांना सांगितले.

त्या काळात प्लेग, कॉलऱ्यासारख्या साथीने माणसे मरत, नातेवाईकदेखील नाइलाजाने अंत्यसंस्कारासाठी जमत. सोवळ्या-ओवळ्याच्या, सुतकाच्याही कल्पनांचा समाजमनावर मोठा पगडा होता. अंत्यविधीसाठी लागणाऱ्या सामानाची जमवा जमव करणे, आवश्यक तेवढी माणसं जमविणे, पैशाची जमावाजमव करणे वाटते तेवढे सोपे नव्हते. कित्येकवेळा पदराला खारही लागे. अंत्यसंस्कार उरकल्यावर नदीवरूनच आंघोळ करून यावे लागे. एकेका दिवशी आठ-दहा जणांना स्मशानभूमीत पोचवावे लागे. पुन्हा 'मुडदेफरास' म्हणून लोक संभावना करीत ती वेगळीच. अंत्यसंस्कारासाठी पुढाकार घेणाऱ्या या मंडळींना लग्नासाठी राहू द्याच, चौदाव्याला देखील निमंत्रण देत नसत. लोकमान्य टिळकांनी सांगितलेले एक छोटे व्रत खरोखरच खडतर होते.

तथापि कऱ्हाडातील सिध्देश्वर यज्ञेश्वर उर्फ भाऊकाका गरुडांनी एका

महापुरुषाने सांगितलेले व्रत आयुष्याच्या अखेरपर्यंत निष्ठेने, निरपेक्षपणे निभावले. काही कर्मठ ब्राह्मणांनीच भाऊकाका गरुडांवर बहिष्कार घालावा असा प्रस्ताव शंकराचार्य कऱ्हाडास आले असताना त्यांच्यापुढे मांडला होता. सुदैवाने शंकराचार्यांनी मात्र भाऊकाका गरुडांचीच बाजू घेतली.

भाऊकाका गरुडांच्या या जगाआगळ्या समाजसेवेच्या व्रताचा वारसा त्यांच्या समकालीनांपैकी नारायणराव पोतनीस, दिवेकर वैद्यांनी आणि पुढील काळात गजाभाऊ पेंढारकर, गजाभाऊ कोल्हटकर, मधुकर मराठे, मुकुंद कुलकर्णी (धनी), विठ्ठलराव शिखरे, आदी मंडळींनी चालविला. (आणखीही असे स्वयंसेवक असतीलही, ही नावे प्रातिनिधिक समजावीत.) आपल्याला आलेल्या अडचणी नव्या पिढीला येऊ नयेत, त्रास कमी व्हावा म्हणून त्यांनी लोकवर्गणी करून एक समाजसेवा मंडळ उभारले. आता वाळवंट तुडवत उन्हा पावसात बांबू, कडबा, मडके, सुतळी, कापड, सरण आणखी असेच काही साहित्य जमा करण्यासाठी धावाधाव करावी लागत नाही. पूर्वीसारख्या स्पर्शास्पर्शाच्या कल्पना राहिल्या नाहीत. आता नगरपालिकेनेही अंत्यसंस्कारासाठी सोयीस्कर स्मशानभूमी उभारली आहे आणि सर्व साहित्य कोणत्याही घडीला उपलब्ध होईल अशी जवळच सोय झाली आहे, ते भाऊकाका गरुडांसारख्या स्वयंसेवी समाजसेवकांच्या कष्टाचे फळ म्हणावे लागेल.

## पुण्यातील कऱ्हाडवासीयांचे स्नहेसंमेलन

परक्या गावात आपल्या गावाचे माणूस भेटले म्हणजे अत्यानंद होतो. आपुलकी निर्माण होते. व्यवसायानिमित्ताने नोकरी उद्योगासाठी किंवा शिक्षण घेण्यासाठी पुण्यात आलेल्या कऱ्हाडकरांनी १९५८ मध्ये एकत्र येण्याचा उपक्रम केला होता. (तसा त्यापूर्वी वा त्यानंतरही झाल्याचे ऐकिवात नाही.) २५ सप्टेंबर १९५८ रोजी पुण्याच्या लक्ष्मीपथावरील गोखले स्मारक मंदिरात त्यावेळी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असलेले कऱ्हाडकर यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली हे स्नेहसंमेलन साजरे झाले होते. पुण्यातील सुमारे पाचशेहून अधिक कऱ्हाडकर या स्नेहसंमेलनात सामील झाले होते.

या उपक्रमासाठी निवडलेल्या कार्यकारिणीचे अध्यक्ष होते पद्मश्री दि. वा.

जोगळेकर तर अप्पासाहेब इनामदार उपाध्यक्ष होते. बबनराव नावडीकर आणि कार्यवाहपदाची जबाबदारी वामन सखदेव यांच्यावर आणि खजिनदारपदाची जबाबदारी श्रीराम गोगटे यांच्याकडे होती. त्यांना सहाय्य करण्यासाठी राम घळसासी, विद्याधर गोखले, भारती नगरकर मंदा दातार), गजानन खटावकर इ. कार्यकर्ते होते. जवळजवळ चार महिने सारे पुणे पिंजून काढून पुण्यातील कऱ्हाडकरांशी संपर्क साधलेला होता.

कार्यक्रमाची सुरुवात समर नखाते, श्रीराम देशपांडे, शैलजा धोपाटे, विठ्ठलराव धोपाटे, गजानन कुलकर्णी यांच्या विविध गुणदर्शनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुणे यशवंतराव चव्हाण यांचे भाषण झाले, ते म्हणाले, "आपल्या कर्तव्याला स्फूर्ती घेण्यासाठी आपल्या गावाचा जिव्हाळा वाटणे व त्या पार्श्वभूमीवर एकत्र येणे गैर काहीच नाही. पण बाहेर कार्य करीत असताना आपण राहतो, त्या गावातील जनतेतही समरस झाले पाहिजे, आपले वेगळेपण विसरले पाहिजे. कऱ्हाडहून बाहेरच्या व्यापक जीवनात पदार्पण करणाऱ्या मंडळीनी त्या-त्या ठिकाणच्या क्षेत्रात तेथील समाजसेवेत आपले काही विशेष कर्तृत्व दाखविण्याचा प्रयत्न करावा '.

पुण्यातील कऱ्हाडवासीयांनी हा संघ चालविताना मोठ्या योजना, घटना, नियमांच्या चाकोरीत न शिरता प्रेमाच्या, आपुलकीच्या नात्याने एकत्र येऊन शेजारधर्मानुसार एकमेकांना साह्य करावे अशी सूचनाही यशवंतरावांनी केली. कऱ्हाडविषयी बोलताना ते म्हणाले होते, "कऱ्हाडच्या पाण्यात काही विशेष गुण आहे अशी माझी मनोमन श्रध्दा आहे. भारतात वेगवेगळ्या तत्त्वप्रणालीचे जे पक्ष निघाले, त्या सर्वांना कऱ्हाडने चांगले मातब्बर पुढारी पुरविले आहेत ते गाव छोटेसे असले तरी सर्व बौध्दिक संघर्षाचे प्रातिनिधिक स्वरूप तेथे पहावयास मिळत असल्यामुळे मला या माझ्या गावाचा मोठा अभिमान वाटतो ".

पुण्यातील कऱ्हाडकरांपैकी त्यावेळी सर्वात ज्येष्ठ व वयोवृध्द असलेल्या डॉ. गणपतराव फडके यांनी कार्यकर्त्यांच्या उत्साहाबद्दल आनंद व्यक्त करून संमेलन घडवून आणल्याबद्दल सर्वांना आशीर्वाद दिले. रात्री कऱ्हाडातून आलेल्या गजाभाऊ पेंढारकर प्रभृती कलाकारांनी संगीत 'संशयकल्लोळ'या नाट्यप्रयोगाची पुण्यातील कऱ्हाडकरांना गोड भेट दिली.

( या संमेलनानिमित्ताने एकत्र आलेल्या पुण्यातील काही कऱ्हाडकरांनी

पुढे पुणे – सातारा रस्त्यावरील विवेकानंद पुतळ्यानजिक संगम सोसायटी नावाने एक वसाहत सुरू केली. )

## विजयदिन समारोह

स्वातंत्र्योत्तर काळात भारताला ज्या लढाया कराव्या लागल्या, त्यातील १६ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तानबरोबरच्या लढाईतील विजय हा सर्वश्रेष्ठ मानावा लागेल. या दिवसाचे स्मरण प्रतिवर्षी समारंभपूर्वक करण्याची कल्पना कर्नल संभाजीराव पाटील, कर्नल एम. डी. कुलकर्णी या कऱ्हाडातील माजी लष्करी अधिकाऱ्यांच्या मनात १९९७ मध्ये स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाच्या काळात आली. माजी सैनिकांसाठी काम करणाऱ्या त्रिमूर्ती फौंडेशनतर्फे महाराष्ट्र सरकार आणि केंद्रीय संरक्षण खात्याच्या सहकार्याने १९९८ पासून हा विजय दिवस समारोह कऱ्हाडात प्रतिवर्षी साजरा होतो. रणगाड्यांसारख्या वाहनांचे प्रदर्शन, लष्करी विमानांच्या हवाई कसरती, वीर सैनिकांचे तसेच विधवा वीरपत्नीचे सत्कार, संचलने, मार्शल आर्ट, पोलिसांचे व लष्करांचे बँडवादन, संरक्षणविषयक भाषणे अशी कार्यक्रमांची रेलचेल असते.

## आख्यायिका आणि लोकसमजुती

### (१) नकट्या रावळ्याचे भूत

कऱ्हाडात पंतांच्या कोटात एक जुनी विहीर आहे. ती नकटा रावळ नावाच्या भूताने एका रात्रीत बांधली म्हणून. नकट्या रावळ्याची विहीर म्हणून प्रसिध्द आहे. ही विहीर एका बाजूला खोल आणि लोकांचा वावर तिकडे बेताचाच. त्या एकांतामुळे निर्जनतेमुळे विहिरीविषयी एक गूढ वलय निर्माण झालेले, त्यामुळे त्या विहिरीत तथाकथित नकट्या रावळ्याचे भूत वास्तव्य करत असल्याची वदंता होती. त्यामुळे त्या विहिरीकडे कोणी फिरकत नसे, तरीही ही भुताची भिती कायमची संपुष्टात आणण्यासाठी काही नागरिकांनी एका मांत्रिकाला पाचारण केले. तेव्हा त्या भुताला कोणीतरी भुलवून विहिरीच्या बाहेर गावात घेऊन यावे म्हणजे मग आपण त्या भुताला बाटलीत

बंद करून टाकू  अशी खात्री त्या मांत्रिकाने दिली.

आता भुताला भुलविण्यासाठी का होईना, पण विहिरीवर जायला कोण तयार होणार? पण त्यावेळी वाळव्याची यल्लमा नावाची एक नायकीण कऱ्हाडात रहात होती, तिने जीवावर उदार होऊन गावासाठी हे धाडस करण्याचे ठरविले.

एका अमावस्येच्या मध्यरात्री यल्लमाने स्नान करून स्वच्छ पांढरी वस्त्रे धारण केली, केस मोकळे सोडले आणि आपल्या देवतेचे नामस्मरण केले, घराबाहेर  पडताना घराचे दार लावून घेऊन त्या दारावर पांढऱ्या चुन्याने फुलीचे चिन्ह केले. तिने आपल्याबरोबर एक मोकळी कळशी घेतली होती. तिने  गावातील लोकाना आधीच कल्पना दिली असल्याचे सर्व रस्ते निर्मनुष्य होतेच. तिने भुईकोट किल्ल्यात प्रवेश केला. रस्त्यात मोठी चिंचेची झाडे, काळोख सर्वत्र भरलेला. सगळीकडे सामसूम, फक्त रातकिड्याची किरकिर ऐकू  येत होती.

विहिरीच्याअलीकडेच एका झाडाखाली थांबून  यल्लमाने आपल्या अंगावरील सर्व आभूषणे आणि वस्त्रे काढून तेथे दडवून ठेवली. हातात कळशी घेऊन यल्लमा विवस्त्र स्थितीतच विहिरीकडे गेली. विहिरीच्या पायऱ्या उतरून ती पाण्याजवळ  गेली. हातपाय धुवून तिने  पाण्याने कळशी भरून घेतली. ती  मागे वळणार एवढ्यात  मागून आवाज  आला,  'ए, कोण  आहेस  तू  आणि  इथं कशाला  आलीस' ?

यल्लमाने मागे वळून पाहिले तर तेथे एक प्रचंड धिप्पाड पुरूषाची आकृती तिला दिसली. मनातून घाबरलेली असून तिने उत्तर दिले,'महाराज, मी आपली दासी, वाळव्याची यल्लू. घरी पिण्यासाठी पाणी नेण्यास आले आहे क्षमा करा'. तेव्हा त्या भव्य आकृतीने तिला सांगितले, 'यल्लू , तू माझी दासी आहेस  ना. मग  माझे  पाय  तुझ्या घागरीतील पाण्याने  स्वच्छ  धू आणि माझी  सेवा  कर'. यल्लमाने  ठीक आहे  असे  म्हणून  तिने  कळशीतील पाण्याचे  त्याचे पाय  धुतले आणि  ती मोकळी  कळशी  घेऊन  पायऱ्या  चढून विहिरीच्या बाहेर जाऊ लागली. त्याबरोबर त्या आकृतीने प्रश्न  केला, 'यल्लू,  तू कुठे चाललीस ? माझे पाय  धुतलेस  पण  पुसले  नाहीत'. यल्लमाने  उत्तर दिले, 'महाराज, आपले पाय  पुसण्यास  मजजवळ  वस्त्र नाही. मी घरी जाऊन घेऊन येते, तोपर्यंत आपण  थांबा'.

'मी वाट पाहतो, पण लवकर आली नाहीस तर मला तुझ्या घरी यावे लागेल. कुठे आहे तुझे घर ?' असा प्रश्न त्या आकृतीने यल्लमाला केला. तेव्हा यल्लमाने सांगितले की 'मी कोटाखालीच डाव्या बाजूच्या गल्लीत राहते. तुम्हाला माझे घर सापडावे म्हणून मी चुन्याने त्या घराच्या दारावर पांढऱ्या चुन्याने फुलीची खूण करून ठेवते. तरीपण मी लगेच परत येतेच. तोवर तुम्ही कृपा करून इथेच थांबा'. यल्लम्मा घाईघाईने घराकडे निघाली. पण एव्हाना पहाट झाली. त्या धिप्पाड आकृतीची संचार करण्याची वेळ संपली होती. यल्लमाने झाडाखाली ठेवलेली वस्त्रे, आभूषणे परिधान केली. ती थेट मांत्रिकाकडे गेली. मांत्रिकाला ही हकीकत ऐकून आनंद झाला.

मांत्रिकाने गावातील लोकाना सकाळी एकत्र बोलावून 'सर्वांनी आपापल्या घराच्या दारांवर चुन्याने फुलीची खूण करावी आणि रात्री सर्वांनी आपली दारे कोणीही हाक मारली तरी उघडू नयेत. तसेच पहाटेपर्यंत कोणी घराबाहेरही येऊ नये' अशा सूचना दिल्या.

त्या मध्यरात्री नकट्या रावळ्याचे भूत विहिरीतून बाहेर पडले आणि कोटाखाली येऊन चुन्याची फुली असलेले घर शोधू लागले तर प्रत्येक घरावर चुन्याची फुली. तेव्हा दिसेल त्या घरावर थाप मारून ते भूत ओरडू लागले, 'ए वाळव्याची यल्लू. दार उघड'. प्रत्येक घरापुढे जाऊन ते भूत हाका मारीत होते. मांत्रिकाच्या सूचनेप्रमाणे कोणीच दार उघडले नाही, उत्तरही दिले नाही.

नकट्या रावळ्याचे भूत या गल्लीतून त्या गल्लीत यल्लूच्या नावाने हाका मारीत भटकत होते. मांत्रिकाने एका ठिकाणी जागा मंतरून ठेवली होती, त्या जागेत त्या भूताने प्रवेश करताच मांत्रिकाने आपल्या मंत्रतंत्राने त्या भूतास एका छोट्या बाटलीत बंदिस्त करून टाकले. अशा रीतीने मांत्रिकाने नकट्या रावळाच्या भुताला निष्प्रभ करून टाकले.

सर्वांनी यल्लम्माची आणि मांत्रिकाची प्रशंसा केली व त्या दोघांना बक्षिसही दिले. त्यानंतर मांत्रिकाने भूत बंद करून ठेवलेली बाटली कऱ्हाडपासून खूप दूर मिरजेजवळ खोल खड्ड्यात गाडून टाकली. अशा

रीतीने नकट्या रावळाच्या भुताचा कायमचा बंदोबस्त झाला. नकट्या रावळाच्या भुताला बाटलीत बंदिस्त करून जेथे गाडले आहे तेथे त्यानंतर सदर्न मराठा रेल्वेचा मार्ग झाला आहे असे जुने लोक सांगत. नकट्या रावळाच्या विहिरीवर एक सैतान राहत असे. तो लोकांना फार त्रास देई. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी मिरजेचे पीर (संत) शमसुद्दिन मीरा ऊर्फ शमना मीरा आले होते. त्यामुळेच शमनामीरा चे स्मृतिस्थान (चिल्ला) या विहिरीच्या प्रवेशस्थानीच पूर्वेस उत्तर कोपऱ्यात आहे. अशी ही एक लोकसमजूत आहे . खाजा शमसुद्दिन मीरा मलिक यांचा मिरजेतील वास्तव्याचा काळ सामान्यपणे १३६६ ते १३९६ असा आहे. नकट्या रावळ्याची विहीर या काळातील किंवा तत्पूर्वीची असावी.

बाटलीत बंद करून गाडलेले नकट्या रावळाचे भूत बाटलीतून निसटले आहे अशी अफवा १९४२-४३ च्या सुमारास कऱ्हाडात पसरली होती. ज्या घरावर चुन्याच्या फुल्या केल्या नसतील त्या घरात ते भूत आसरा घेईल अशा समजुतीने त्यावेळी कऱ्हाडातील बहुतेक सर्व घराच्या दारावर चुन्याने फुल्या केल्या होत्या.

## (२) भुयारी रस्ते व भुयारी नळ

१९९८ मध्ये 'मौलाना अबुल कलाम ते डॉ. अबुल कलाम' या नावाने एक स्मरणिका मुस्लिम जमाअततर्फे प्रकाशित करण्यात आली. सदर स्मरणिकेत कऱ्हाडमधील भुयारी रस्ते व भुयारी पाणी योजना या शीर्षकाखालील परिच्छेदात कऱ्हाडमध्ये गावात सर्वत्र निरनिराळ्या ठिकाणी भुयारी रस्ते आढळतात. वस्तुत: शहरात सर्वत्र जमिनीखाली रस्त्याचे जाळे पसरले आहे. आजही काझी वाड्यात व मनोऱ्याशेजारील खोलीत भुयारी रस्त्यात जाण्याची प्रवेशद्वारे आहेत. भुयारी रस्ते मदिना मशिदीत, शिराळकर वाड्यासमोरील रस्त्यावर उत्तर बाजूस, कब्रस्तानमध्ये इदग्यात एच. के. डी. हायस्कूलच्या उत्तरेस असे अनेक ठिकाणी आढळले आहेत. हे भुयारी रस्ते संपूर्णत: दगडी बांधकामाचे उंची ९ फूट रूंदी ४ ते ५ फूट असे आहेत. पूर्वी काही लोकांना यात समया मिळाल्या आहेत. मलकापुरात

ज्ञानबा कराळे यांच्या शेताशेजारी भुयारी रस्त्याचे एक प्रवेशद्वार आहे. एक दरवाजा कापीलमधील काजींच्या विहिरीत आढळला आहे. रविवार पेठेत गणी काझी यांचे घर व बाळासाहेब यादव यांच्या घराच्या मधून पूर्व पश्चिम जाणाऱ्या रस्त्याखाली दक्षिण उत्तर भुयारी रस्ता आहे. गुरूवार पेठेत अर्बन बँकेसमोरील खैरतखान वाड्याकडे जाणाऱ्या रस्त्याखाली एक भुयारी रस्ता आढळला होता. गुरुवार पेठेतील दिलीप मेडिकलच्या पाठीमागील बाजूस एक भुयारी रस्ता आहे. इदगाहच्या पश्चिमेस दक्षिण उत्तर म्हणजे मलकापूरकडे जाणारा एक भुयारी रस्ता आहे. काझी वाड्यातून इदग्यात भुयारी रस्त्याने काझी लोक नमाज पढविण्यासाठी जात. मनोरे, काझीवाडा, इदगाह, मलकापूरची विहीर यांना जोडणारे हे सर्व भुयारी रस्ते आदिलशाहीतीलच असावेत. संकटप्रसंगी कऱ्हाडमधून बाहेर पडण्यासाठी ते उपयोगात आणले जात असावेत.

भुयारी रस्त्यांप्रमाणेच कऱ्हाडमध्ये भुयारी नळ आहेत. १९६६ साली मटण मार्केटच्या बांधकामाच्या वेळी जमिनीत आठ फुटांखाली दीड फूट रूंदीचा पाण्याचा बांधीव घाट आढळला. त्यातून शुध्द पाणी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत होते. नकट्या रावळ्याच्या विहिरीकडून (सध्याच्या नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या जागेत) हौदडी होती. त्यात हे पाणी जात असावे. सध्याच्या नगर परिषद इमारतीचा परिसर हा पूर्वी किल्ल्याबाहेरील खंदकाचा भाग होता व खंदकामध्ये पाणी सोडून शत्रूला रोखले जाई.

पुण्याच्या भारत इतिहाससंशोधक मंडळाने १९४८ मध्ये कऱ्हाडात भुईकोट किल्ला व नकट्या रावळयाची विहीर एवढाच भागापुरते उत्खनन केले असल्यामुळे वरील तर्काधिष्ठित माहितीस पुष्टी मिळत नाही.

पुराणवस्तू संशोधन खाते १९१४ च्या महायुध्दापूर्वी प्राचीन कऱ्हाडचे उत्खनन करणार होते. ('साहित्यिक कऱ्हाड' पृ. १२)

(३) सध्याच्या श्री शिवाजी विद्यालयाच्या पिछाडीस 'विरंगुळा' बंगल्यासमोरून जाणाऱ्या रस्त्यावर नागोबाचा चबुतरा आहे. तेथे पूर्वी वारूळ होते. नागपंचमीस तेथे नाग निघत असे म्हणतात. आता वर्दळ वाढली, वारूळही नाही.

(४) कमळेश्वराच्या मंदिरात ज्ञानदेव राहिले होते. त्यावेळी कृष्णाघाटावरून ज्ञानेश्वर चढून आल्याचा उल्लेख आहे .

(५) उत्तरालक्ष्मीच्या दर्शनाला छत्रपती संभाजीराजे आले होते.

(६) आज २२८ फूट ९० फूट रूंद चौथरा दिसत असलेल्या उत्तरा लक्ष्मीच्या भव्य देवळाच्या शिखराची सावली कृष्णा कोयनेच्या संगमात पडे. ('साहित्यिक कऱ्हाड'१२) य. रा. गुप्ते

(७) बाळनाथबुवाच्या मठात अच्युतराव पटवर्धन, सावरकर येऊन गेले होते.

(८) देवांच्या सिध्दिविनायकाच्या (वड्याच्या गणपतीचा) प्रसादातील वड्याचा तुकडा धान्यात ठेवला की बरकत होते.

(९) कार्व्याच्या धानाईपर्यंतचा भाग कऱ्हाडात समाविष्ट असावा असे साताऱ्याचे धर्मवीर विष्णुपंत करंदीकर म्हणत (सा. क. १२)

(१०) कोयना काठाच्या नागझरी कुंडात सतत पाणी असते. ते कधी आटत नाही. कुंड दहा फूट खोल असून बांधकाम दगडी आहे. परिसरातील लोक अमावस्या पौर्णिमेला नारळ नेवैद्य देतात. वर्षातून एकदा ज्येष्ठी पौर्णिमेला सात खणी परडी देतात. या कुडालगत एक पिंपळाचे व एक वडाचे झाड आहे. येथे देऊळ वगैरे काही नाही.

*****

# १७

# समारोप

प्रस्तुत ग्रंथाला ' कऱ्हाड: समग्र दर्शन ' असे नाव दिले असले तरी त्यातील समग्रपणाला मर्यादा आहे. एक तर रोज काहीतरी नवीन घडत असते. त्यामुळे कालमर्यादा ठरवून थांबावे लागते हे आहेच. पण भूतकाळाच्या पडद्याआड गेलेल्या सगळ्याच चिजा सलगपणे उपलब्ध होत नाहीत अनवधानाने ही काही राहिले असणे शक्य असते.

विषयाच्या अनुषंगाने जास्तीत जास्त नोंदी संकलित केल्या असल्या तरी काही विषयांबाबतच्या नोंदी पुरेशा नाहीत याची आम्हांसही जाणीव आहे. तरीही अशा काही नोंदींची कल्पना पुढील टिपणांवरून वाचकांना येऊ शकेल.

**समाजसेवी संस्था**

वैद्यकीय सेवा सुविधा या प्रकरणात कऱ्हाडातील 'आरोग्य मंडळ' या स्वयंसेवी संस्थेच्या कार्याचा उल्लेख आहे. सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून कार्यरत असलेल्या रोटरी क्लब, लायन्स क्लब, इनरव्हील क्लब, लायनेस, रोटरॅक्ट, लिओ अशा आंतरराष्ट्रीय संस्थांच्या शाखा व महिला मंडळ, नवभारत महिला मंडळ, राधा महिला मंडळ, लिबर्टी मजदूर मंडळ, शिवाजी उदय मंडळ, उमेद, चौफेर, कराड जिमखाना, सोशल क्लब, आ. पी. डी. पाटील प्रतिष्ठान, मधुअण्णा कुलकर्णी ट्रस्ट, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, प्रीतिसंगम प्रतिष्ठान, साहित्य परिषद शाखा, कराड अर्बन सामाजिक कृतज्ञता न्यास, जैन सोशल क्लब, रसगंध, सुयोग सुबोधिनी, जनकल्याण प्रतिष्ठान, पार्श्वनाथ प्रतिष्ठान, मर्चंटस् प्रतिष्ठान, त्रिवेणी, अक्षय, तेजस, ज्ञानदीप मंडळ, वन्य जीवनप्रेमी मंडळ प्रवासी संघटना, वृत्तपत्र लेखक संघ, स्वच्छंद, अशा अनेक सेवाभावी संस्था, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम करीत असतात. टेन डाऊनिंग स्ट्रीट, मित्रत्रयी, हास्यक्लब,

विद्यापीठ, भ्रमण मंडळ, अशा नावांची काही अनौपचारिक मंडळेही आहेत किंवा होती. येथे केवळ नाममात्र उल्लेख करीत आहोत आणखीही असतील.

## वाक्प्रयोग

‘कऱ्हाड होणार होते काशी पण रेणुका झाली विटाळशी’, ‘देणे-घेणे हरिभाऊ जाणे’, ‘वाटचुके कऱ्हाडकर’, ‘साडेतीन साहेब ’, ‘काकांची चुटकी’ असे काही वाक्प्रयोग कऱ्हाडातील जुन्या लोकांच्या तोंडी असत. मळग्या, बंबांची धर्मशाळा, नळ, फरशी, हौदडी, नालबंदाची डबी, रामोशाचा वड, बोरीचे परडे, व्यंकोबाचा कट्टा. इ. स्थलदर्शक शब्दांचे त्या-त्या काळात कऱ्हाडकरांना अभिप्रेत अर्थ कोणते होते पण ते का, कसे निर्माण झाले याचा शोध आम्हांस घेता आलेला नाही.

## घरां - दुकानांची नावे

कऱ्हाडातील दुकानांच्या काही पाट्या वैशिष्ट्यपूर्ण होत्या. उदाहरणार्थ ‘न्यू मेडिकल स्टोअर्स’, या संपूर्ण इंग्रजी नावाच्या दुकानाची पाटी मोडीत लिहिलेली होती, तर एका (एकनाथ वास्के यांच्या) हेअर कटींग सलूनवर ‘कुशल केश कर्तन केंद्र’ अशी प्रासयुक्त शब्दांची रेलचेल करणारे नाव झळकत असे. (हे नाव सुचविणारे काका करंबेळकर यांच्या नावातही प्रास होता.) सायकल विक्री दुरूस्तीच्या दुकानाला गजाभाऊ कोल्हटकर या हिंदुत्वनिष्ठ सावरकरप्रेमीने ‘स्वस्तिक दुचाकी गृह’ असे संपूर्ण संस्कृतप्रचुर नाव दिलेले तर पोकळे यांच्या दुकानावर ‘वॉच आणि क्लॉक मंदिर’ असे आंग्ल मराठी संस्कृत भाषांचे मिश्रण असलेली पाटी होती. तर [illegible] अशी उलटी पाटी लावून लक्ष वेधण्याची युक्ती पंडितराव सप्रे यांची. बहुतेक पिंजारी मुस्लीम असल्यामुळे कोटात जाणाऱ्या रस्त्यावरील भिंतीवरची ‘हिंदू पिंजारी’ ही अक्षरे उठून दिसत.

घरांना आणि सदनिकांना नावे देण्याची प्रथा आता चांगलीच रूढ झाली आहे. त्यामुळे जुन्या काळातील शनिवार पेठेतील ‘कालिदास मॅन्शन’ सोमवार पेठेत बहिरोबाच्या गल्लीतील ‘इंदू निकेतन’, सोमवारातील कुंभार वाड्यालगतचे (गोल पायऱ्यांचे) ‘मध्वभुवन’ ही नावे लक्षणीय वाटतात.

## व्यक्ती आणि वल्ली

कऱ्हाडचे काही काळ नगराध्यक्ष असलेले शंकरराव ढवळीकर उतारवयात हौसेने बी. ए.ला बसले आणि इतिहासाची उत्तरपत्रिका त्यांनी चक्क मोडी लिपीत लिहिली. चित्रकला शिक्षक, फोटोग्राफर म्हणून नावलौकिकाला आलेल्या गणपतराव फडक्यांनी देखील आयुष्याच्या उत्तरार्धात मॅट्रीक होण्यासाठी शाळेत नाव घातले. कऱ्हाडात भाऊराव पाटील यांनी महाविद्यालय सुरू केल्यावर मधली अनेक वर्षे संसार आणि समाजसेवेत घालविलेल्या मंदाकिनीबाई देशपांडे यांनी आपली बी.ए. होण्याची हौस पुरवून घेतली, अशा गोष्टी आणखीही असू शकतील.

राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढविणारे बाबुराव बटाणे, राजकीय भाकिते वर्तविणारे चावडीमनी, इंग्रजी कविता मोठ्याने म्हणून कऱ्हाड रेल्वे स्टेशनवर भीक मागणारे आणि त्या भिक्षेच्या पैशातून टाईम्स विकत घेणारे नाना आगरकर, कऱ्हाडातील गल्लीपासून दिल्लीतील यशवंतराव चव्हाण, आनंदराव चव्हाणांच्या, आळतेकरांच्या बंगल्यांतही हक्काने जाणारा हरकाम्या महादू (जोशी), 'भाग्योदय' आणि 'श्रीमंत कसे व्हावे'? लिहिणारे गरीब राहिलेले विपट मास्तर, कायम वेगवेगळ्या कारणांनी उपोषण करून सत्याग्रह करणारे मंगळवारातील पाटील वकील, तान्ह्या मुलाच्या रडण्याचा आवाज हुबेहूब काढून टांग्यात बसलेल्या पॅसेंजरला अचंबित करणारा टांगेवाला प्रभाकर कोपर्डेकर, हातात बेडी असलेला फक्त धोतराचा काचा घातलेला कायम उघडा राहणारा कुलकर्णी हमाल, भल्या पहाटे नदीवर आंघोळीला जाताना 'जय शंभो'चा पुकार करणारे रानडे किंवा नरहर बिंदो वळवडे, नदीच्या पात्रात प्रेतासारखी मांडी घालून तरंगणारे नारायणराव पोतनीस, महापुरात कोयना पुलावरून उडी टाकून कृष्णा पुलावर निघणारे 'एकहाती कारभार' म्हणून ओळखले जाणारे एस. टी.तील तुकाराम दळवी, माकड, ससे, चितळ, हरीण असे पशू आणि काकाकुवा, काळी मैना इ. पक्षी घरात पाळणारे, हरिणाची गाडी करणारे डॉ. रामभाऊ पटवर्धन, आपल्या विनोदाने बैठका रंगविणारे बाबुराव धोपाटे, मौन आहे म्हणून स्लेटपाटीवर पेन्सिलने लिहून संवाद करणारे भाऊबटाणे, वाचकांच्या पत्रव्यवहारात

नित्यनियमाने लिहिणारे भीमराव बा. मोगलगिद्दीकर, बा. रा. पालेकर व त्यांच्या पत्नी यासारख्या व्यक्ती गावोगावी असतीलही. तरी कऱ्हाडकरांच्या स्मरणात असलेल्या अशा या काही व्यक्ती आणि वल्ली.

## रस्ते – चौकांची पडनावे

'तोंडओळख' या पहिल्या प्रकरणात रस्त्यांची व चौकांची अधिकृत नावे दिली आहेत. तथापि 'चावडी चौक', मारुतीबुवाच्या मठासमोरील 'विठ्ठल चौक', 'नेहरू चौक' (हा कच्छी चौक किंवा माणिक चौक म्हणूनही ओळखला जाई.) आझाद चौक (हा तर 'गाढव चौक' म्हणूनही ओळखला जातो.) 'पटेल चौक', 'दत्त चौक', 'चांदणी चौक', 'अल फतेहा चौक', 'टिपू सुलतान चौक', 'अशोक चौक', 'हिंदकेसरी शामराव मुळीक चौक' अशी नावे लोकरूढ आहेत.

ज्या रस्त्याचे नाव नगरपरिषदेने ठराव करून 'टिळक पथ' केले त्या रस्त्यावर 'अली मूर्तिजा रोड' ची पाटी झळकत आहे. तसेच नगरपरिषदेने कामगार चौक म्हणून अधिकृत केलेला चौक अजूनही 'विजयदिन चौक' म्हणूनच लोकांच्या तोंडात आहे. पूर्वीचा काळ्यांचा, वाघमाऱ्यांचा बोळ आता 'वार्ताफलक रोड' झाला आहे.

## कैलास मानस सरोवराची परिक्रमा

कैलास मानस सरोवराची परिक्रमा करणे अत्यंत कष्टप्रद. फार थोड्यांना ती साधते. त्यापैकी डॉ. श्रीकृष्ण ढगे, सुभाषराव जोशी, दिलीप भीमराव जाधव (१९९२), डॉ. मधुकर दडगे, सुभाष पांडुरंग पाटील (१९९७), डॉ. एस. एन. चिंगळे, सुभाष व्यंकटराव डुबल, दीपक बेलवणकर, धुमाळ (२००१), जयंत दिगंबर खिरे व त्यांच्या पत्नी सौ. जयश्री खिरे (२००२) ही काही नावे. या परिक्रमेला कऱ्हाडहून गेलेल्या चंद्रकांत गोसावी याचे अपघाती निधन झाले. २००३ मध्ये शशिकांत दत्तात्रय आंबर्डेकर व त्यांच्या पत्नी. तसेच शीला रेठरेकर, विजया पाठक ही मंडळी नेपाळमार्गे गेली होती.

**इतरत्र गेलेले कऱ्हाडकर**

व्यवसाय उद्योगाची क्षेत्रे शोधत परगावी परप्रांतात फार काय परदेशातदेखील कऱ्हाडकर विसावले, तेथेही वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कर्तबगारीने त्यांनी नाव मिळविले. ते कऱ्हाडचे म्हणून कऱ्हाडचाही लौकिक वाढला. मुंबईचे महापौर झालेले बाबुराव शेटे किंवा नासा, अमेरिकन विमान कंपन्यांना स्पेअर पार्टस् पुरविणाऱ्या यु. एस. एरोडायनॅमिक्स या कंपनीचे सुहास काकडे यांचा उल्लेख उदाहरणादाखल करता येईल.

अशा तऱ्हेची उर्वरित माहिती, संस्था आणि व्यक्ती यांच्या कार्याचा परामर्श घ्यावयाचा तर या ग्रंथाएवढाच दुसरा एक ग्रंथ किंवा या ग्रंथाचा दुसरा खंड होऊ शकेल एवढी सामग्री उपलब्ध होऊ शकेल असे आम्हांस वाटते.

या ग्रंथात विविध क्षेत्रांतील कामगिरीचा आढावा घेताना मूल्यमापन किंवा समीक्षा करण्याचा हेतू नव्हताच. उपलब्ध साधन सामुग्रीचा उपयोग करताना तपशीलाविषयी खातरजमा करण्याचा, व्यक्ती, संस्था, घटना, प्रसंग, स्थल-काल-क्रम या बाबतीत माहिती बिनचूक असावी असा प्रयत्न केला असला तरी जेथे नेमकी अस्सलच काय दुय्यम साधनेही उपलब्ध नाहीत तेथे 'श्रुती' (ऐकलेल्या गोष्टी) 'स्मृती' (आठवत असलेल्या, कोणीतरी सांगितलेल्या गोष्टी) यांवर भरवसा ठेवणे भाग असते. आमच्या या सामर्थ्य-मर्यादा लक्षात घ्याव्यात आणि हा 'अखेरचा शब्द' नाही. ही 'समर्थ सुरुवात' आहे हेही ध्यानी घ्यावे.

*****

# कालपट
## ख्रिस्तपूर्व ७ वे शतक ते इ. स. २००६ पर्यंत

| काळ | घटना |
|---|---|
| **ख्रिस्तपूर्व काळ** | |
| इ.स.पू. ७ वे ते ३ रे शतक | राष्ट्रीकांची राजवट. |
| इ.स.पू. ३ रे ते १ ले शतक | जबलपूरजवळील भारहूत या स्तुपास व अलिबागजवळील कुडाच्या लेण्यास कऱ्हाडच्या यात्रेकरूंनी देणग्या दिल्या. |
| इ.स.पू. ३२२ ते इ.स.पू.१८५ | मौर्यांची राजवट. |
| इ.स.पू. १ ले शतक | आंध्रभृत्य, क्षत्रप यांच्या राजवटी. |
| **इसवी सन** | |
| २५०–३०४ | विजयसेन, तिसरा दामजयश्री, दुसरा रुद्रसेन, विश्वसिंह, भर्तृदामन, विश्वसेन यांच्या राजवटी. |
| ३ रे शतक | कुंतल राजवट. |
| ५००–६०० | माधववर्म्याची राजवट. |
| ७९३ – | राष्ट्रकूट राजा दुसरा दंतिदुर्ग याच्या सामानगड येथील ताम्रपटात 'करहाटक' असा उल्लेख. |
| ८७१ – | नरसिंह दीक्षित, रक्षादिव्य त्रिविक्रम, पंगर्वित, केशव गहियसहास या कऱ्हाडच्या चार ब्राम्हणांचा परामर्ष पहिल्या अमोघवर्षाने घेतला. |
| ९०० – | कऱ्हाडवर चालुक्यांची राजवट. |
| ९५९ मार्च ९ | ईशानशिवाचा विद्यार्थी गगनशिव (व्यासभट्ट) यास तपश्चर्या करण्यासाठी कऱ्हाडवर राज्य करणाऱ्या तिसऱ्या कृष्णराजाने दानपत्र दिले. |

| काळ | घटना |
|---|---|
| ९७२ – | कऱ्हाडवर राष्ट्रकुटांची राजवट |
| १०५९ – | शिलाहार राजा मारसिंह याची कन्या चंद्रलेखा हिचे स्वयंवर |
| ११२९ – | जैन पंडित समन्तभद्र कऱ्हाडला अजिंक्यपत्रासाठी आला. |
| ११५४ – | शिलाहार राजा विजयादित्य याने कऱ्हाडच्या नरसिंहभट सत्यवादी यास कोकणातील संगमेश्वर हे गाव इनाम दिले. |
| ११६५ – | कऱ्हाडवर सिंदांची राजवट |
| ११९० डिसेंबर २५ | वीर भोजदेव राजाने कऱ्हाडच्या घैसास ब्राह्मणास शेत दान दिले. |
| १२६२ – | शेख फरीद तुमरचे निधन. त्याचे थडगे 'करडीपीर' या नावाने. |
| १३५० – | गुरुवार पेठेतील मौलालीचा दर्गा बांधला. |
| १३९१ – | बी फातिमाचा पंजा आणि बलखंडी फकिराची कबर असलेला गुरुवार पेठेतील नबीसाहेबाचा दर्गा तयार झाला. |
| १३९६ ते १४०८ | दुर्गाडी ऊर्फ दुर्गादेवीचा दुष्काळ. कऱ्हाड उजाड झाले. |
| १४२६ – | दादो नरसो काळे याने बिदरच्या बहामनी बादशहाकडून कौल घेऊन कऱ्हाडची वस्ती केली. |
| १४८५ – | बहामनी राज्याचे पाच तुकडे. कऱ्हाडवर आदिलशाही राजवट. |
| १५७३ ते १५७६ | गुरुवार पेठेतील जुम्मा मशीद आणि दोन मनोरे यांचे बांधकाम. |
| १५७३ – | ईदगाहची भिंत उभारली. |

| काळ | घटना |
|---|---|
| १५९६ – | मालोजी भोसले व वणंगपाळ निंबाळकर यांनी भुईकोट किल्ला घेतला. |
| १६२० – | करडेपीर ऊर्फ फरीद तुमर याची बहीण बिबी दुल्हन हिच्या वंशजास शेख अहंमद वल्ली शेख फरीद यास मुजावरकीची सनद मिळाली. |
| १६३७ – | शहाजीराजे भोसले यांना विजापूरच्या महंमद आदिलशहाकडून कऱ्हाडसह २२ गावांची देशमुखी मिळाली. |
| १६४४ – | शहाजीराजांच्या जहागिरीतील मसूर येथे रामदासांनी पहिली सार्वजनिक रामनवमी साजरी केली. |
| १६५३ – | कऱ्हाडची देशमुखी बाजी घोरपडे यांच्याकडे. |
| १६५७ मे | काशीपंत ऊर्फ ध्यानतराव देशपांडे यांना विजापूरकडून 'मजहर' मिळाला. १६५९ |
| – | अफजलखानाच्या पराभवानंतर कऱ्हाड प्रांत शिवाजी महाराजांकडे. |
| १६६१ – | इदग्याजवळ मोरोपंत पिंगळ्याचा अली आदिलशहाच्या सैन्याशी सामना. |
| १६७२–७३ | पिलदेव रामनामे (रामरामी ) कुलकर्णी म्हणून कऱ्हाडात आले. |
| १६८९ फेब्रुवारी १ | अर्जोजी यादव व गिरजोजी यादव यांच्या वतनाच्या वादाचा निर्णय संभाजीराजांनी केला. |
| १६९५ – | कऱ्हाड औरंगजेबाच्या ताब्यात |

| काळ | घटना |
|---|---|
| १६९८ – | परशुराम त्रिंबक हे प्रतिनिधी झाले. |
| १६९९ जुलै २० | राजाराम महाराजांचा वसंतगडावर मुक्काम. |
| नोव्हेंबर २५ | औरंगजेबाने वसंतगड घेतला. |
| १७०८ – | शाहू महाराजांनी वसंतगड घेतला. |
| १७१४ – | शाहू महाराजांनी कऱ्हाड प्रांत श्रीपतराव पंतप्रतिनिधींना दिला. |
| १७२७ – | रंगारवेशीजवळ गावकऱ्यांनी कोयनेस घाट बांधला. |
| १७३१ फेब्रुवारी २० | कऱ्हाडजवळ जखिणवाडी येथे शाहू व कोल्हापूर संभाजी यांची भेट होऊन वारणेचा तह झाला. |
| १७४० ते १७६१ | बाळाजी बाजीराव ( नानासाहेब) यांच्या काळात ( १७४० – १७६१ ) शामराव अंबाजी यांनी कऱ्हाड प्रांतातील ३१ गावांचे सर्वेक्षण केले. |
| १७५१– | पंतप्रतिनिधींनी कऱ्हाडची मोजणी केली. |
| १८१८– जानेवारी २३ | दुसऱ्या बाजीरावांचा पळून जाताना कऱ्हाडला मुक्काम. |
| मे १३ | वसंतगडाचा दरवाजा इंग्रजांनी जमीनदोस्त केला. |
| १८२० – | विजापुरास जाताना एलफिन्स्टनची कऱ्हाडास भेट. |
| १८३३ – | तेल्यांचा गणपती उत्सव सुरू. |
| १८४० – | कोळे येथील धारराव पवार यांचे बंड. |
| १८५३ – | कृष्णेच्या महापुरात कृष्णाबाईचा रथ वाहून गेला. |
| १८५४ ऑगस्ट १ | प्राथमिक शाळा नं.१ सुरू. |

| काळ | | घटना |
|---|---|---|
| १८५५ | | प्रतिनिधींची राजधानी कऱ्हाडहून औंध येथे हालवली. |
| | सप्टेंबर १५ | कऱ्हाड नगरपरिषदेची सुरुवात |
| १८५६ | जुलै | कृष्णा व कोयना यांना महापूर. |
| | | कोयना पुलाचे बांधकाम सुरू. |
| १८५७ | मार्च २२ | भवानदीन धर्मशाळा नगरपरिषदेकडे. |
| | – | कऱ्हाडचे दौलता हरी पवार १८५७ च्या बंडात सामील. |
| | मे ३ | दर गुरुवारी रविवारी बाजार सुरू. |
| | डिसेंबर ३० | नगरपरिषदेच्या रस्त्यांवर २२ कंदिलांची सोय. |
| | – | सार्वजनिक वाचनालय सुरू. |
| १८५९ | – | कॉलऱ्याची साथ. |
| १८६३–६७ | | खोडशी येथे कृष्णा नदीवरील धरण. |
| | | कृष्णा कालव्याच्या कामाची सुरुवात. |
| १८६५ | – | मारूती उपासक मंडळाची स्थापना. |
| | मार्च | नगरपरिषदेचा दवाखाना सुरू. |
| १८६७ | – | कृष्णा कालव्याचे पाणी नळाने शहरात आले. |
| १८६९ | मे १ | मुलींची शाळा क्र. ४ सुरू. |
| १८७१ | ऑगस्ट १३ | कऱ्हाडच्या सार्वजनिक सभेची स्थापना. |
| १८७२ | मे १ | कोयनापूल वाहतुकीस खुला. |
| | – | पहिली खानेसुमारी. लोकसंख्या ११४१९. |
| | ऑगस्ट ६ | उर्दू शाळा क्र. ५ सुरू. |
| १८७५ | – | वक्तृत्वोत्तेजक सभेची स्थापना |
| | | कृष्णा पुराने भुईकोट किल्ल्याच्या तटास धक्का. |
| १८७५ ते १८७७ | | कॉलऱ्याची साथ. |

| काळ | | घटना |
|---|---|---|
| १८७६ | – | अवर्षणामुळे दुष्काळ |
| १८७८ मध्ये | – | नगरपरिषदेच्या मदतीने प्रा. शाळा क्र.१ इंग्रजी शिक्षणाचे वर्ग सुरू. |
| १८८४ | – | 'विदूषक' हे कऱ्हाडातील पहिले साप्ताहिक सुरू. |
| | – | महापूर. दोनशे वर्ष बसला नाही एवढा पुराचा धक्का बसला. |
| १८८४ | एप्रिल १ | जन्म – मृत्यू नोंदीस सुरुवात |
| १८८५ | – | कॉलऱ्याची साथ. |
| १८८७ | – | कऱ्हाड रेल्वे स्टेशन सुरू. |
| १८८८ | सप्टेंबर २४ | कऱ्हाडात काँग्रेसचे काम सुरू. |
| १८८९ | – | पंतांची कचेरी कऱ्हाडहून कुंडलला हलवली. |
| १८९० | – | नगरपरिषदेने घरांना क्रमांक दिले. |
| १८९१ | – | गायरानाच्या जप्तीवरून सातारा येथे कलेक्टरच्या बंगल्यावर शेतकऱ्यांचे मोर्चे |
| १८९२ | – | रॅले कंपनीने शेंगाची वखार उघडली. |
| १८९६ | जून | मामलेदार कचेरीचे सध्याच्या जागेत स्थलांतर. |
| | – | पंतप्रतिनिधींनी भवानी (कऱ्हाड देवी) औंधास हलवली. |
| १८९७ | – | प्लेगची पहिली भेट. कॉलरा, दुष्काळ |
| | नोव्हेंबर १० | हसन मुजावर यांनी कऱ्हाडची बाजारपेठ लुटवली. |
| १८९८ | | प्लेग. |
| १८९९ | | प्लेग. जागोजागी अचानक आगी लागून २८ घरे भस्मसात. |

| काळ | | घटना |
|---|---|---|
| १९०२ | ते १९०३ | प्लेग. |
| १९०६ | फेब्रुवारी ११ | लो. टिळक, शि. म. परांजपे यांची कोटाखालच्या धर्मशाळेत व्याख्याने. |
| | ऑगस्ट १ | हरिजनांसाठी मराठी शाळा क्र. ८ सुरू. |
| १९०७ | जानेवारी १ | काड्यापेटींच्या कारखान्याची सुरवात. |
| | ऑगस्ट | शेतकरी व गावकरी यांच्या उत्पादनाचे प्रदर्शन. |
| १९०८ | – | आप्पासाहेब आळतेकर हे कोल्हापूरहून कऱ्हाडात स्थायिक झाले. |
| १९११ | – | गोरक्षण संस्थेची स्थापना. |
| १९१४ | – | गावातूनही नावांनी ये–जा करावी असा महापूर. |
| १९१५ | – | प्लेग. |
| १९१६ | – | प्लेग. |
| | नोव्हेंबर २५ | ओगले ग्लास वर्क्स सुरू. |
| १९१७ | जानेवारी २४ | कऱ्हाड अर्बन को–ऑप. बँकेची स्थापना. |
| | – | प्लेग. |
| | | कऱ्हाड वॉटर वर्क्स सुरू. पाणी पुरवठा योजना. नळाने पाणी सुरू (१९१३–१६) |
| १९१९ | | एन्फ्ल्युएंझा व दुष्काळ. |
| १९२० | नोव्हेंबर | म. गांधी यांचा अली बंधूसमवेत दौरा. सिटी सर्वेच्या कामास आरंभ. |
| १९२१ | एप्रिल १ | शिक्षण मंडळ व टिळक हायस्कूलची स्थापना मुळशी सत्याग्रहात मारुलकर वकील सामील |
| १९२३ | – | काले येथे सत्यशोधकांची परिषद |
| | – | कऱ्हाडमध्ये नामदेव समाजोन्नती परिषदेचे १७ वे अधिवेशन. |

| काळ | | घटना |
|---|---|---|
| १९२४ | – | गीताजयंती उत्सव सुरू. |
| | – | प्लेग. |
| १९२५ | – | प्लेग. |
| | जून १ | सोशल क्लब सुरू. |
| १९२६ | – | प्लेग. |
| १९२७ | – | प्लेग. |
| | फेब्रुवारी २५ | म. गांधीना नगरपरिषदेने कृष्णा घाटावर समारंभपूर्वक मानपत्र दिले. |
| | | मांगवाड्यात विठ्ठल मंदिर उभारणी. |
| | मे ९ | श्रीनिवास अयंगार यांचा दौरा. |
| १९२८ | – | प्लेग. |
| | – | नगरपरिषदेचे कार्यालय रविवार पेठेत टाकीखाली. |
| | – | रा. स्व. संघाचे काम कऱ्हाडात सुरू. |
| १९२९ | – | प्लेग. |
| | जुलै २३ | सेवादलाच्या शाखा सुरू. |
| | डिसेंबर १४ | वे. शा. सं. विष्णुशास्त्री उमराणी धर्मांतरितांच्या शुध्दिकरणाचे कार्य करू लागले. |
| १९३० | – | त्रिशतसावंत्सरिक शिवजयंती. |
| | जुलै १३ | कायदेभंगाच्या चळवळीत गव्हर्नरांचे काळ्या निशाणांनी स्वागत. |
| १९३१ | जून२३ | पं. मदनमोहन मालवीय यांची कऱ्हाडला भेट. |
| | डिसेंबर १६ | पं. जवाहरलाल नेहरू यांचा कऱ्हाड रेल्वे स्टेशनवर सत्कार. |
| १९३१ | डिसेंबर२५ | सुभाषचंद्र बोस यांची कऱ्हाडला भेट. |
| १९३२ | – | डॉ. हेडगेवार, बाबाराव सावरकर यांची कऱ्हाडला भेट. |
| | – | नेमस्तांची प्रांतिक परिषद. |

| काळ | | घटना |
|---|---|---|
| १९३३ | – | अ. भा. सनातन धर्मीयांच्या वर्णाश्रम स्वराज्य संघातर्फे विलायतेला जाणाऱ्या शिष्टमंडळात ल. म. देशपांडे यांची निवड. |
| | – | कऱ्हाड इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीची स्थापना. |
| १९३५ | मे १४,१५,१६ | डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा दौरा. तांबवे येथेही भेट. |
| | जून २८ | सातारा जिल्हा को ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँकेची स्थापना |
| १९३६ | – | महाराष्ट्र इन्शुरन्स कंपनीची स्थापना. |
| | जुलै १५ | शहरात वीजपुरवठा सुरू. |
| | – | मानवेंद्रनाथ रॉय यांचा दौरा. |
| | – | कृष्णा पूल बांधकाम सुरू. |
| १९३७ | – | महिला मंडळाची स्थापना. |
| | – | कऱ्हाड खरेदी विक्री संघाची स्थापना. |
| | – | वीरशैव लिंगायत परिषद भरली. |
| | – | पंडित नेहरू यांचे स्वामीच्या बागेत भाषण. |
| | – | डॉ. हेडगेवार, बाळासाहेब खेर यांचे दौरे. |
| १९३८ | फेब्रुवारी | प्रांतीय वैद्य हकीम परिषद. |
| १९३९ | – | कृष्णा घाटावरील ताबूत वाद. |
| | ऑक्टोबर ३ | कृष्णा पुलाचे ना. नुरी यांचेकडून उद्घाटन. |
| | – | अ. भा. गांधर्व महाविद्यालय सुरू. |
| १९४० | – | जिल्हा हिंदुमहासभा अधिवेशन. |
| | – | युध्दसहाय्यासाठी कुस्तीचा फड ना. गव्हर्नरांची भेट. |
| | ऑक्टोबर २ | डॉ. आंबेडकर यांचा नगरपरिषदेतर्फे सत्कार |
| | डिसेंबर १९ | नगरपरिषद प्रशासकाकडे. |
| १९४१ | – | कॉलरा. |
| | – | कृष्णाघाट श्रमदानाने गाळ काढून मोकळा केला. |

| | काळ | घटना |
|---|---|---|
| | ऑक्टोबर २५ | दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन अधिवेशन ३ रे |
| | ऑक्टोबर १९–२२ | सातारा जिल्हा औद्योगिक शेतकी प्रदर्शन. |
| १९४२ | ऑगस्ट २४ | दादा उंडाळकर यांच्या नेतृत्वाने मामलेदार कचेरीवर मोर्चा. |
| | डिसेंबर ११ | शिरवडे स्टेशन जाळले. |
| १९४३ | डिसेंबर ११ | नाट्यशताब्दी महोत्सव. |
| १९४४ | जानेवारी १ | कऱ्हाड शेती उत्पन्न बाजार समिती सुरू. |
| १९४५ | – | प्लेगची शेवटची साथ. |
| | एप्रिल १३ | श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना. |
| | जून ११ | शिवाजी विद्यालय सुरू. |
| | डिसेंबर २३–२४ | प्राथमिक शिक्षक संघाचे इलाखा अधिवेशन. |
| १९४६ | मार्च १२ | बँक ऑफ कराडची स्थापना. |
| | मे ५ | कोणेगाव येथे भूमिगत स्वातंत्र्यवीर प्रकट झाले. |
| | – | भूमिगत क्रांतिकारक प्रकट झाल्यावर स्वामीच्या बागेत सभा. |
| | – | कऱ्हाडला महाराष्ट्र प्रांतिक हिंदू महिला परिषदेचे अधिवेशन. |
| | – | मैदानी – मर्दानी सामना समिती सुरू. |
| १९४८ | जानेवारी ३१ | जुन्या स्टँडवर म. गांधी निधनानिमित्त शोकसभा. |
| | एप्रिल १२ | होमगार्ड संघटनेची स्थापना. |
| | डिसेंबर ८ | काँग्रेस सेवादल स्थापना. |
| | – | पंतांच्या कोटात भारत इतिहास संशोधक मंडळातर्फे उत्खनन. |
| १९५० | जानेवारी २६ | शिवाजी उद्यान सुरू झाले. (येथेच पुढे स्मृतिसदन झाले.) |
| | सप्टेंबर–ऑक्टोबर | कॉलऱ्याची साथ. |

| | काळ | घटना |
|---|---|---|
| १९५२ | जानेवारी | कऱ्हाडला एस टी. चे आगार सुरू. |
| | | सार्वजनिक वाचनालय नगरपरिषदेकडे आले. |
| | – | हेलिसिंकी येथील ऑलिंपिक स्पर्धेत खाशाबा जाधव यांनी कास्य पदक मिळविले. |
| १९५३ | – | मधुसूदन कोल्हटकर व शशिकांत वळवडे शालान्त परीक्षेत अनुक्रमे पहिले व दहावे. |
| | एप्रिल ३० | पं. नेहरूंना नगरपरिषदेचे मानपत्र. |
| १९५४ | ऑक्टोबर १९ | स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना. |
| | – | ऋग्वेद संहिता स्वाहाकार सुरू. |
| | – | कऱ्हाडमध्ये शालान्त परीक्षा केंद्र सुरू |
| | – | स. गाडगे महाराज महाविद्यालय सुरू |
| | – | तंत्रनिकेतन विद्यालय सुरू |
| १९५५ | जून १०/१८ | गोवा मुक्ती संग्रामात कऱ्हाडचे कॉ. रघुनाथराव चव्हाण इ. नी भाग घेतला. |
| | सप्टेंबर १५ | नगरपरिषद शंभर वर्षाची झाली. |
| | – | कृष्णा सहकारी साखर कारखाना स्थापना. |
| १९५८ | – | श्री कृष्णाबाई उत्सवाचे सतरा वर्षांनी पुनरुज्जीवन. |
| | | स्त्री संरक्षक गृह सुरू. |
| | | शिवाजी शिक्षण संस्थेच्या सायन्स कॉलेजची सुरुवात. |
| १९५९ | – | जलसंशोधक दिगंबर वा. जोगळेकर यांना पद्मश्री. |
| | मार्च १२ | यशवंतराव चव्हाण यांचा वाढदिवस साजरा करण्याची प्रथा सुरू. |
| १९६० | – | बाल सुधार केंद्र (रिमांड होम) सुरू. |
| | – | कोयना सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ स्थापना. |
| | | महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा |

| काळ | | घटना |
|---|---|---|
| | | मुख्याध्यापक परिषदेचे दुसरे अधिवेशन. |
| | जुलै ११ | महापूर. |
| | – | रेठरे साखर कारखान्यासाठी सदुभाऊ पाटील यानी काढता घालता येण्यासारखा पूल बांधला. |
| १९६२ | ऑक्टोबर ३१ | जनता सहकारी बँकेचे उद्घाटन . |
| | | कऱ्हाडमध्ये कुटीर रूग्णालय सुरू. |
| १९६३ | – | कृष्णा नदीवर कार्वे येथे पूल. |
| १९६५ | – | क्रिकेटचा रणजी करंडक सामना |
| | | कऱ्हाडमध्ये कम्युनिस्ट पदयात्रा मूक मोर्चा. |
| | | चावडी चौकात दुकाने पेटवण्याचा प्रयत्न. |
| | – | कऱ्हाडला विमानतळाची सोय. |
| १९६७ | डिसेंबर ११ | कऱ्हाडला भूकंपाचा मोठा धक्का |
| १९६८ | – | किर्लोस्कर कारखाना सुरू. |
| १९७० | जानेवारी २६ | पु. पां. ऊर्फ बाबुराव गोखले यांना पद्मश्री. |
| १९७२ | – | दुष्काळ. |
| १९७३ | मार्च १२ | यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला सुरू. |
| | मे २४ –२५ | सातारा जिल्हा औद्योगिक प्रदर्शन श्रीशिवाजी विद्यालय मैदानावर. |
| | – | भा. म. पागनीस व माधवराव जाधव यांना राष्ट्रपती पुरस्कार. |
| १९७५ | डिसेंबर ६ ते ८ | अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे ५१ वे अधिवेशन. |
| १९७६ | – | महापूर. |
| १९८० | डिसेंबर २६ –२८ | कऱ्हाडमध्ये नामदेव समाजोन्नती परिषदेचे |

| | काळ | घटना |
|---|---|---|
| | | ४५ वे अधिवेशन. |
| | – | हिंदू एकता आंदोलन शाखा सुरू. |
| १९८२ | जानेवारी २६ | वृध्दाश्रमाचे उद्घाटन. |
| | – | कऱ्हाडमध्ये कृष्णा हॉस्पिटल सुरू. |
| १९८४ | नोव्हेंबर २७ | यशवंतराव चव्हाणांचा अंत्यसंस्कार. |
| १९८५ | डिसेंबर | २७ ते ३१ 'काईट ८५' व्यापारी व औद्योगिक प्रदर्शन. |
| १९८७ | नोव्हेंबर १४/१५ | बालकुमार साहित्य संमेलन. |
| १९८८ | नोव्हेंबर २५ | 'काईट ८८' व्यापारी व औद्योगिक प्रदर्शन. |
| १९९३ | सप्टेंबर ४ | भूकंपाचा धक्का. |
| | सप्टेंबर १४ | नगराध्यक्ष पी. डी. पाटील यांच्या सातत्याने प्रदीर्घ कारकीर्दीची नोंद गिनीज बुकात व्हावी असा एकमुखी ठराव. |
| १९९८ | | अ. भा. पक्षीसंमेलन . |
| | | विजयदिन समारोह सुरू. |
| १९९९ | मार्च ३१ | नगराध्यक्ष जयवंतराव जाधव यांची हत्या. |
| २००३ | जानेवारी१० ते १२ | ७६ वे. अ. भा. मराठी साहित्य संमेलन अधिवेशन |
| | नोव्हेंबर २५ | यशवंत कृषी औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शन |
| २००४ | जानेवारी ३१ | ८४ वे अ. भा. मराठी नाट्य संमेलन |
| २००५ | – | महापूर. |
| २००६ | – | महापूर. |

*****

# संदर्भ साहित्य


**संदर्भ साहित्य :**

(लेखक, ग्रंथनाम आवृत्ती, प्रकाशनवर्ष, स्थळ, प्रकाशक या क्रमाने)

गुप्ते यशवंत राजाराम (संपादक) – **कऱ्हाड**, दुसरी आवृत्ती, १९२९ पुणे, य. रा. गुप्ते

गोखले पुरुषोत्तम पांडुरंग – **साहित्यिक कऱ्हाड**, १९४७ कऱ्हाड, सुलोचना गोखले

गोखले पुरुषोत्तम पांडुरंग – **जागृत सातारा**, दुसरी आवृत्ती १९६६ सातारा, लोकसेवा संघ

पाटील पांडुरंग दादासाहेब ( संपादक) – **कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृतिग्रंथ** १८५५–१९५५ , कऱ्हाड , कराड नगरपालिका,

फडके यशवंत दिनकर – **विसाव्या शतकातील महाराष्ट्र** खंड १ ते ८ वठारे

जि. दे. – प्राचीन कऱ्हाड (करहाटक),१९७५ वाळवा, अभय आणि कंपनी

**Satara District Gazefeer** 1885 & Revised 1963

माटे गोविंद रामचंद्र – **असा घडला जिल्हा सातारा** १९८८ सातारा, गो. रा. माटे

कोलते वि. भि. – **महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख** , १९८७ मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

निकम राजश्री दिलीप ( सौ. राजश्री शामराव पाटील) –**कराड नगरपालिकेचा इतिहास १८५५–१९८३**, २००४ , कऱ्हाड , पी. डी. पाटील प्रतिष्ठान

हर्षे द. स.– **सातारा जिल्ह्यातील हिंदुसभेचे कार्य** ( १९३७–७९)

**New Indian Antiqary** Vol VII no. 364 June July 1944

कुलकर्णी मोहन – **तिसरी बाजू** , १९९६ कऱ्हाड, चौफेर प्रकाशन

Explorations at Karad 1949 , Poona ,Bharat Itihas Sanshodhak Mandal

**आत्मचरित्रे**

चव्हाण यशवंतराव - **कृष्णाकाठ**, १९८४ , पुणे, प्रेस्टिज पब्लिकेशन्स

लाड हरी पांडुरंग - **माझ्या राजकीय आठवणी**, १९७४, कऱ्हाड, श्री. रा. देशपांडे

कुलकर्णी रघुनाथ पुरूषोत्तम - **माझी जीवनगाथा**, १९९९, कऱ्हाड, गोपाळ र. कुलकर्णी

कुलकर्णी शांता ( पेंढारकर चंपा) - **स्मृतिगंध** , २०००, पुणे, विजय कुलकर्णी

गोखले पुरूषोत्तम पांडुरंग - **हे प्रत्ययाचे बोलणे**, १९८८, कऱ्हाड, वि. पु. गोखले,

कोपर्डेकर दयार्णव रघुनाथ - **आत्मनिवेदन दयार्णवांचे**, १९९८, तळेगाव दाभाडे, सुधन्वा कोपर्डेकर

पंतप्रतिनिधी बाळासाहेब - **आत्मचरित्र** खंड १ व २

थोरात संभाजीराव - **स्मृती जयांची चैतन्य फुले**,१९८१, कार्वे, ज्ञानेश्वर विद्यापीठ

सरडे कृष्णराव - **रेशमी धागे**, १९६६, कऱ्हाड, विठ्ठल सरडे

नेने वि. वि. - **माझे जीवन** , १९९०, पुणे, माधव कानिटकर

वाळवेकर दत्ता - **पुष्पाविण कल्पतरू**

**चरित्रे**

पाटील डी. एम. - **सातारचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार**, २०००

सरडे कृष्णाजी गोपाळ (संपादक) - **रत्ने आणि मोती** , १९८५

पुराणिक अ. द. ( संपादक) - **कर्मयोगी नाना**, १९७२

खंडकर म. वि. (संपादक) - **बिल्वदल**, शंकरराव करंबळेकर **: व्यक्ती आणि विचार** , १९७०

लिमये नरूभाऊ - **कल्याणी : काळ, कर्तृत्व, व्यक्तिदर्शन** , १९८८

कुलकर्णी वि. द. - **उभे रिंगण**, २०००

**दादासाहेब आळतेकर - व्यक्ती आणि विचार**

**स्मरणिका, विशेषांक इ. प्रासंगिक**

**कऱ्हाडची नाट्यसेवा**, १९४३, सं. बा. वा. घाटे

**मैदानी मर्दानी सामना समिती** (रौप्यमहोत्सव),१९७० ,सं. शामसुंदर अष्टेकर

**टिळक हायस्कूल** (रौप्य / सुवर्ण / हीरक / अमृत महोत्सव ) स्मरणिका

**कन्या शाळा** सुवर्ण महोत्सव हीरक महोत्सव स्मरणिका

**स्मृतिकलश** ( श्री शिवाजी विद्यालय रौप्यमहोत्सव ), १९७१

**यज्ञेश** ( ऋग्वेद संहिता स्वाहाकार - रौप्य / सुवर्ण महोत्सव )

**खेळिया** ( लिबर्टी मजदूर संघ - रौप्य महोत्सव ), १९८०

**अ. भा. मराठी साहित्य संमेलन** स्मरणिका १९७५ व २००३

**दूधसागर** ( कोयना सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ रौप्यमहोत्सव), १९८३

**कराड : सर्वांगीण विकासाचे दर्शन** ( १९५४-१९९६), २००४ पी. डी.पाटील गौरव प्रतिष्ठान

**मौ. अबुल कलाम ते डॉ. अबुल कलाम** सं. युनूस अहमद कच्छी ,१९९८

**पत्रकार सातारा**, १९४८, सं. मु. शं. देशपांडे

**कराड अर्बन को ऑप बँक** (रौप्य -सुवर्ण-अमृत महोत्सव स्मरणिका) १९४३, १९६७, १९९२

**श्री आई आदिशक्ती रेणुका** श्री रेणुकादेवी जीर्णोध्दार समिती, कऱ्हाड, सैदापूर, १९८७

**उंबरठ्यावर आज तिशीच्या** (कराड सहकारी खरेदी विक्री सोसायटी स्मरणिका), १९६७

**शताब्दि संभारणु** (श्री संभवानाथ जिनालय शताब्दि ), २००६

द. स. हर्षे **प्रीतिसंगमावरील सन्मित्र** (केशवराव जोशी ),१९७०,द. स. हर्षे

**पाऊलखुणा** (आळतेकर परिवाराचा संक्षिप्त मागोवा )

**प्रीतिसंगमावरून** ही दैनिक सकाळमधील लेखमालेची कात्रणे

याशिवाय वसंत नारायण दातार, आत्माराम नारायण जाधव, वा. आ. किरपेकर आणि माधव काशीनाथ बिजुटकर यांचे स्वत:विषयीचे अप्रकाशित लेखन.



श्री उत्तराळक्ष्मी



ग्रामदैवत श्री कृष्णाबाई

श्री कृष्णा मंदिरासमोरील घाट





प्रीतिसंगम



अगाशिवाच्या डोंगरातील लेणी




लेणे क्र. ६



स्तूप



जामा मस्जिद



मनोरे



नकट्या रावळ्याची विहीर - उपेक्षित आणि संरक्षित





सदाशिवगडावरील महादेव मंदिर



मलेका घुमट, मलकापूर


कऱ्हाड




कोटातील पंतप्रतिनिधींचा वाडा



भुईकोट किल्ल्याचा बुरूज

हाटकेश्वर मंदिर (जुने व नवे स्वरूप)

रत्नेश्वर मंदिर (जुने व नवे स्वरूप)



कऱ्हाडातील जुने जैन मंदिर : नवे स्वरूप



संत सखूचे
विठ्ठल मंदिर



ऐतिहासिक अवशेष
(भगवानराव घार्गे यांच्या संग्रहाची छायाचित्रे)



वीरगळ



ऐतिहासिक अवशेष



यशवंतराव चव्हाण
यांची समाधी




यशवंतराव चव्हाण
स्मृतिसदन



सौ. वेणुताई चव्हाण
स्मारक



खोडशी येथील
कृष्णा नदीवरील बंधारा



कोयना नदीवरील
जुना आणि नवा पूल



कृष्णापूल

१

चित्रगुप्त

२


३


अभ्युदय

४


१. 'चित्रगुप्त' कऱ्हाडातील सर्वात जुने वृत्तपत्र - दि. १२ डिसें. १८८१
२. सुधारकाचार्य गोपाळराव आगरकर यांचे हस्ताक्षर व स्वाक्षरी
३. 'अभ्युदय' साप्ताहिकाचे एक पान - दि. १५ जाने. १९३५
४. 'सुमंत' साप्ताहिक अंक - दि. ३ एप्रिल १९०९


जलकुंभ
नदी
मैदान, बाग
राष्ट्रीय महामार्ग
राज्य मार्ग / जिल्हा मार्ग
शहरातील प्रमुख रस्ता
इतर रस्ते.

कऱ्हाड


शहर सीमा
शहर

**'कऱ्हाड : समग्र दर्शन'** हा ग्रंथ आटोपशीर आणि तरीही परिपूर्ण असाच झाला आहे...

कऱ्हाड नावाच्या विकसनशील नगरीबाबत एक मोठी उणीव भरून निघाली आहे.

स्मृतिकातर होऊन ऐतिहासिक सत्याचा अपलाप आपल्या लेखनात होऊ न देण्यावर लेखकांचा भर आहे. म्हणून सांगोवांगी कळलेल्या कथांना इतिहासाचा अंगरखा चढविण्याचा प्रमाद त्यांच्या हातून घडलेला नाही, हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल....

हा ग्रंथ अधिकारी म्हणजे संदर्भमूल्य असलेला निश्चित झालेला आहे.

कऱ्हाड शहरावर प्रेम असणाऱ्या प्रत्येकाच्या घरी हा असणं अगत्याचं आहे. कऱ्हाडमधून देशाच्या अन्य शहरात तसेच परदेशी स्थलांतर केलेल्यांना तर हा ग्रंथ आपल्या गावाची सतत आठवण करून देईल. त्या सर्वांच्या घरांत या ग्रंथाची प्रत हवीच.

***- डॉ. अरूण टिकेकर***

